महाराष्ट्रसारस्वत.

१ प्राचीन, मध्यकालीन व अर्वाचीन मराठी भाषेंत जें जें कांहीं लिहिलेलें किंवा बोललेलें उपलब्ध आहे किंवा होईल तें सर्व महाराष्ट्रसारस्वतांत मोडतें. वररुचि वगैरेंनीं जिचें व्याकरण केलें व कालिदासादि कवींनीं नाटकांतून जिचा उपयोग केला ती मराठी भाषा प्राचीन होय व तिलाच महाराष्ट्री अशी संज्ञा आहे. ही महाराष्ट्री भाषा वैदिक आर्ष भाषेशीं समकालीन असून, संस्कृत भाषेचा बोलण्यांतून लोप झाल्यावर शातवाहनादि राजांच्या राज्यांत शालिवाहनशकाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकापर्यंत चालू होती. शालिवाहनाच्या सहाव्या शतकापासून मध्यकालीन मराठीला सुरुवात झाली. ही मध्यकालीन मराठी ज्ञानेश्वरापर्यंत ह्मणजे शालिवाहनाच्या बाराव्या शतकापर्यंत प्रचलित होती. शालिवाहनाच्या बाराव्या शतकानंतर मराठीला फारशीचा स्पर्श होऊन तींत कांहीं फेरफार झाले. तिलाच अर्वाचीन मराठी अशी संज्ञा देणें रास्त आहे. ही अर्वाचीन मराठी शालिवाहनाच्या बाराव्या शतकापासून ह्या कालपर्यंत चालू आहे. अर्वाचीन मराठीचेही दोन भाग पडतात. बाराव्या शतकांतील जाधवांच्या राजवटीच्या अंतापासून तों अठराव्या शतकांतील पेशव्यांच्या राजवटीच्या अंतापर्यंतची जी मराठी ती खरी अर्वाचीन मराठी समजावी. त्यानंतर अलीकडील ऐंशी पंचायशी वर्षांतील जी मराठी ती वर्तमान सद्यःकालीन मराठी होय. ह्या वर्तमान सद्यःकालीन मराठींतील लेखनरूप किंवा भाषणरूप जें सारस्वत सध्यां बरें वाईट निर्माण होत आहे त्याच्याशीं प्रस्तुत मासिकपुस्तकाला कांहीं करावयाचें नाहीं. ह्या वर्तमान मराठीच्या पाठीमागील जें (१) अर्वाचीन, (२) मध्यकालीन, (३) व प्राचीन मराठी लेखनरूप किंवा भाषणरूप सारस्वत सध्यां उपलब्ध झालें आहे किंवा पुढें उपलब्ध होण्याचा रंग दिसत आहे, त्याचा समावेश ह्या महाराष्ट्रसारस्वत मासिकपुस्तकांत करावयाचा संकेत आहे. ह्यांत (१) काव्य, (२) नाटक, (३) लावण्या, (४) कहाण्या, (५) लोककथा, (६) मंत्रतंत्र, (७) पवाडे, (८) बखरी, (९) ज्योतिष, (१०) वैद्यक, (११) गणित, (१२) वेदांत, वगैरे जें

जें ह्मणून कांहीं सामान्यतः गेल्या दोन हजार वर्षांतील व विशेषतः अलीकडील सातशें वर्षांतील मराठी सारस्वत उपलब्ध होईल तें तें छापावयाचें आहे.

२ अलीकडील सातशें वर्षांतील अर्वाचीन मराठी सारस्वत अफाट आहे. ह्या अवधींतील ग्रंथकारांची नांवनिशी देऊं गेलें तर तिचा विस्तार हजार पंधराशें नावांपर्यंत जाईल. तेव्हां त्या भानगडींत सध्यां न पडतां, ह्या नांवनिशींतील एकेक ग्रंथकाराच्या ग्रंथालाच प्रारंभ करावा हें जास्त उपयोगाचें आहे. ग्रंथकारांचे ग्रंथ छापून निघाल्यानंतर, त्यांवर प्रशस्त्या व पवाडे रचण्यास वाटेल त्याला मुभा आहे व हव्या तितक्या रचतां येतील.

३ ह्या मासिकांत एक सबंद ग्रंथ संपल्यावर नंतर दुसऱ्याला प्रारंभ केला जाईल. लोकांचें केवळ मनोरंजन करण्याच्या नादानें दहा ठिकाणीं दहा फरफाटे ओढून, महिनेच्या महिने एखादा ग्रंथ चालू ठेवण्यापासून, कोणत्याही प्रकारचा फायदा नाहीं. जुना अप्रसिद्ध ग्रंथ सबंद चटदिशी छापून निघाला, ह्मणजे त्याचें संपूर्ण स्वरूप विचारवंताच्या लक्ष्यांत येऊन, तत्संबंधी अनुमानें व सिद्धांत बांधण्यास सोईचें होतें. मराठींतील गत सारस्वतासंबंधानें एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं; हें सर्व सारस्वत अद्याप बहुतेक अप्रसिद्ध आहे. त्यामुळें तत्तत्कालीन सामाजिक, राजकीय व धार्मिक स्थितीचा अंदाज जसा यावा तसा अद्याप करतां येण्यास कांहींएक साधन प्रसिद्ध नाहीं. हें साधन प्रसिद्ध नसल्यामुळें अज्ञानानें, दुराग्रहानें, द्वेषानें, मत्सरानें, भोळेपणानें व धूर्तपणानें, आपल्या समाजाविषयीं नानाप्रकारचे तर्कवितर्क प्रचलित आहेत. कोणाच्या मतें मराठींत सारस्वतच नाहीं, कोणाच्या मतें असल्यास तें गचाळच असेल, कोणाच्या मतें नुसतें काव्यमयच सारस्वत मराठींत आहे, कोणाच्या मतें नुसतें वेदांतमयच आहे, असे अनेक रंगाचे तर्क सध्यां प्रचलित आहेत. हीं तर्कटें नीट ताळ्यावर आणण्यास एकच सौम्य, रामबाण व तोडग्याचा उपाय आहे. तो हा कीं, हें जुनें सारस्वत होईल तितकें लवकर छापून काढिलें पाहिजे. ह्मणजे आपल्या ह्या जुन्या सारस्वताचें संपूर्ण स्वरूप उघडकीस येईल आणि त्यांत जो कमीपणा असेल तो भावी सारस्वतांत पुढें होणाऱ्या बुद्धिमान् ग्रंथकारांना भरून काढतां येईल.

(४) प्रत्येक ग्रंथाच्या शेवटीं कठिण शब्दांचा वगैरे कोश देणार आहों.

(९) प्रथम दासोपंतांच्या पदांना प्रारंभ करीत आहों. १९०२ साली दासोपंताची कांहीं माहिती ग्रंथमालामासिक पुस्तकांत दिली होती तीच ग्रंथ-मालासंपादकांच्या परवानगीनें येथें देतों.

दासोपंताचें चरित्र.

६ बेदरच्या ब्राह्मणी पादशाहांच्या रियासतींत नारायणपेठ ह्मणून एक तालुक्याचें ठाणें होतें. तेथील देशपांड्ये दिगंबरपंत गाल्वगोत्री ह्यांना पार्वती-बाईच्या पोटीं शके १४७३, भाद्रपद वद्य ८ स ह्मणजे इसवी सन १५५१ त, मुलगा झाला. त्याचें नांव दास. त्यालाच पुढें दासोपंत ह्या नांवानें लोक ओळखूं लागले.

७ एकनाथस्वामीचे गुरु जनार्दनपंत हे दिगंबरपंताचे समकालीन होत. हे दत्तपंथी होते. एकदां दुष्काळ पडला असतां, पातशाही रसद दिगंबरपंताचे हातून वेळेवर पोंहोचली नाहीं. सबब, दिगंबरपंताला आपला मुलगा जो दासो-पंत त्यास पातशाहाजवळ ओलीस ठेवावें लागलें. रसद महिन्याच्या आंत पोंहोंचवावी, नाहीं तर मुलगा बाटविला जाईल, अशी ह्या ओलीची अट होती. अटीच्या महिन्याचा शेवटला दिवस आला, तरी दिगंबरपंताच्या रस-दीचा पत्ता कांहींच लागेना. इकडे तर, दासोपंताला भरदरबारांत यवनी धर्माची दीक्षा देण्यास काजी सिद्ध झाला. इतक्यांत दिगंबरपंताकडून एक महार रसद घेऊन आला अशी वर्दी पोंहोंचली. महार रसद गुजरून एका-एकीं गुप्त झाला !

८ ह्या आकस्मिक दैवी कृपेनें दासोपंताच्या वृत्तींत चमत्कारिक फरक पडून त्या दिवसापासून तो विरक्त झाला व हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्याचा त्यानें निश्चय केला. ह्यावेळीं दासोपंताचें वयमान अठरा वीस वर्षांचें असावें.

९ दासोपंत शके १५३७, माघ वद्य ६ स ह्मणजे इसवी सन १६१६ त समाधिस्थ झाला. त्याच्या वंशजांची याद येणेंप्रमाणें:—

१ दिगंबर

|

२ दासोपंत (ग्रंथकार—इ० स० १६१६)
|
३ दत्ताजीपंत
|
४ दासोपंत
|
५ विश्वंभर
|
६ दासोबा
|
७ दत्ताजी
|
८ देवाजी
|
९ विश्वंभर
|
१० गुरुबोवा
|
११ अवधूत
|
१२ अत्रिवरद
|
१३ विश्वंभर (वर्तमान--इ० स० १९०२)

१० दासोपंत ग्रंथकार जोगाईच्या आंब्यास रहात असत. आंब्याचे गार्ग्य-गोत्री देशपांड्ये दासोपंताचे शिष्य होत. देशपांड्यांच्या घराण्यांतलि शितोपंत हा दासोपंताचा पहिला शिष्य झाला. दासोपंताच्या वंशजाची दोन घरें सध्यां जोगाईच्या आंब्यास आहेत. त्यांना थोरलें देवघर व धाकटें देवघर अशा संज्ञा आहेत. दासोपंताचे एक वंशज सध्यां नागपुराजवळील चंद्रपुरास व दुसरे बेदराजवळील बावगीस आहेत. आंबे येथील देवघरांत दासोपंताचे खालील ग्रंथ आहेत:—

१ गीतार्णव.
२ पदार्णव.
३ गीतार्थबोधचंद्रिका.
४ वाक्यवृत्ति.
५ ग्रंथराज.
६ अवधूतराज.
७ दत्तात्रेयमाहात्म्य (संस्कृत).
८ पंचीकरणपासोडी.

९१ पैकीं गीतार्णव हा ग्रंथ ओंवीबद्ध असून सुमारें सवा लाख आहे. ह्याच्या एकट्या अठराव्या अध्यायाच्या सोळा हजार ओव्या आहेत. पदें सुमारें पांच हजार आहेत. मूळ पदेंहि सवा लाख होतीं. गीतार्थबोधचंद्रिकेचे १८ अध्याय आहेत. वाक्यवृत्ति गद्य असून प्रश्नोत्तररूप मराठींतील पहिला गद्यग्रंथ, मला माहित असलेला, हाच आहे. अवधूतराज व ग्रंथराज हेहि वेदान्तपर ग्रंथ आहेत. सारांश, दासोपंताचा एकंदर उपलब्ध ग्रंथ सुमारें दीड लाख आहे. हा सबंध छापण्याचें काम कोण करील तो करो ! दासोपंताच्या लेखांपैकीं पदेंच तेवढीं काव्यांत मोडतील. बाकीचे सर्व ग्रंथ वेदान्तशास्त्रपर आहेत.

१२ वर निर्दिष्ट केलेले ग्रंथ जोगाईच्या आंब्यास रा० रा० श्रीधर अवधूत देशपांड्ये मोहर्रार, दासोपंताच्या शिष्यपरंपरेंतील घराण्यापैकीं एक सद्गृहस्थ, ह्यांजपाशीं आहेत.

१३ दासोपंताच्या पंचीकरणासंबंधानें एक बाब नमूद करण्यासारखी आहे. ती ही कीं, हें सबंध पंचीकरण एका पासोडीवर लिहिलें आहे. ही पासोडी बरोबर चोवीस हात लांब व अडीच हात रुंद आहे.

१४ ह्या आठ ग्रंथांखेरीज दासोपंतानें दुसरे अनेक संस्कृत आगमनिगमादि आचारग्रंथ लिहिले आहेत; परंतु, ते प्राकृत नसल्यामुळें त्यांची विल्हे दिली नाहीं.

१५ दासोपंत, एकनाथस्वामी, मोरोपंत, वगैरे प्राकृत कवींचे व ग्रंथकारांचे ग्रंथ पाहिले ह्मणजे एक गोष्ट स्पष्टपणें ध्यानांत येते ती ही कीं, युरोपियन कवि व शास्त्रज्ञ ह्यांच्यापेक्षांही कित्येक मराठी जुने ग्रंथकार जास्त ग्रंथ

प्रसवणारे होते. खुद्द दासोपंताविषयीं अशी आख्यायिका सांगतात कीं, ते दररोज एका ढबूची शाई ग्रंथलेखनाच्या कामीं जिरवीत असत.

१६ वरील हकीकत दासोपंताच्या एका ओंवीबद्ध चरित्रावरून व इतर माहितीवरून लिहिली आहे. सदर चरित्र रा० रा० श्रीधर अवधूत देशपांड्ये ह्यांच्याजवळ आहे; व ते सध्यां (१९०४ जानेवारी) रा० भावे महाराष्ट्रकवी नामक मासिकपुस्तकांत छापीत आहेत.

१७ दासोपंताचीं पदें रसभरित व प्रसादपूर्ण आहेत. भक्तीनें कवीचें मन भरून जाऊन, सहजगत्या निघालेले हे उद्गार उदात्त काव्य आहेत. शेक्सपियरच्या नाटकांतील To be or not to be ? वगैरे दहा पांच वेदान्तपर चुटके, किंवा वर्डस्वर्थच्या काव्यांतील आत्म्याच्या अमरत्वासंबंधीं किंवा स्त्रीपुरुषप्रेमासंबंधीं किंवा औदासीन्यासंबंधीं पांचपंचवीस पदें पाहून इंग्लिश पदसंग्रहकार आपल्यास धन्य मानतात. सध्या प्रसिद्ध होत असलेल्या पदसंग्रहांत तर, वेदान्त, इतिकर्तव्य, औदासीन्य, विरह, भक्ति, तादात्म्य, वैराग्य; प्रेम, राग, लोभ; वगैरेंसंबंधानें दोन हजार पदें आहेत; आणि प्रायः प्रत्येक पद युरोपांतील उच्च कवींच्या पदांच्या तोडीचें आहे. तेव्हां एका पुरातन साधुकवीनें जी ही अपरंपार देणगी आपल्याला दिली आहे ती-बद्दल आपणां महाराष्ट्रांतील लोकांना किती धन्यता वाटावी, बरें? मोगलाईंत गोदावरीच्या तीरीं दासोपंताच्या शिष्यमंडळांतील स्त्रीपुरुष हीं पदें मोठ्या प्रेमानें व भक्तीनें गातात व संकटसमयीं त्याच्यापासून त्यांना अनुपम समाधान प्राप्त होतें. हें प्रेम व हें समाधान महाराष्ट्रांतील सर्व लोकांच्या वांट्यास येण्याच्या योग्यतेचें आहे.

महाराष्ट्रसारस्वत.

(दासोपंतांचीं पदें.)

ॐश्रीमदादिगुरवे सर्वज्ञाय स्वपक्षपालाय नमः ॥

नाट.

(१)

भवदुःखपर जनीं, वणवा ज़ळतां वनीं, ऐसें मज़ सांडूंनि, कैसा ज़ासी?
कामक्रोधगुणीं, व्याघ्राचा गोठणीं, ऐसें मज़ सांडूंनि, कैसा ज़ासी?
कर्मत्रयमिळणी जिउ पडला काच्रणी ऐसें मज़ सांडूंनि कैसा ज़ासी?
विषयविषहरणी निष्ठुरता धरूनि ऐसें मज़ सांडूंनि कैसा ज़ासी? १
देहाचा निर्वाणी दोषत्रयमिळणी ऐसें मज़ सांडूंनि कैसा ज़ासी?
भवजन्मबंधनीं पिडलों तृष्णागुणीं ऐसें मज़ सांडूंनि कैसा ज़ासी?
विकळ ज़ालें प्राणी सुटैन ये क्षणीं ऐसें मज़ सांडूंनि कैसा ज़ासी?
दिगंबरा! मरणीं स्वहस्तें लोटूंनि ऐसें मज़ सांडूंनि कैसा ज़ासी? २

(२)

तुझा पुत्र जनीं पडलों मी बंधनीं; आतां मज़पासूंनि परुता न वच्रें.
मिनले रोग तीन्ही; वरि पडलों निदानीं. आतां मज़पासूंनि परुता न वच्रें.
भव–नद–घाळणी तृष्णा वाहे पाणी. आतां मज़पासूंनि परुता न वच्रें.
पाय धरीतु दोन्हीं; लगैन चरणीं; आतां मज़पासूंनि परुता न वच्रें. १
विकळ ज़ालों गुणीं; न च्रळे माझी करणी; आतां मज़पासूंनि परुता न वच्रें.
मन चंचळ त्रिगुणीं पडों चि पाहे मरणी. आतां मज़पासूंनि परुता न वच्रें.
पीता ना मज़ जननी; निरास ज़ाली मनीं; आतां मज़पासूंनि परुता न वच्रें.
दिगंबरा! जनीं तूं माझी जननी. आतां मज़पासूंनि परुता न वच्रें. २

(३)

नळनीं दळगतजळ चंचळ चळ ढळतां; मा तैसें श्रीअवधूता! माझें जीणें.
माध्यान्हीची छाया वसवी ज्या आश्रया; तैसें योगिराया माझें जीणें.
तरत के तरंगु तरले पावे भंगु; तैसा हा प्रसंगु; माझें जीणें.

कर्मज साकार शरीर हें क्षर; आतां कैं साचार माझें जीणें. १
धरितां मृगजळ ज़ैसें तें पोकळ; तैसें हें केवळ माझें जीणें.
स्वप्नाचीया परि क्षणिक भान तरि, स्थिर नाहीं संसारीं माझें जीणें.
दुःखाचें कारण, दुर्मतीचें स्थान, तुज़ येकेवांचून माझें जीणें.
दिगंबरा ! जाण, तुझी मातें आण; तूं; तरि चि हें धन्य माझें जीणें. २

(४)

कल्पांतीचें पाणी न गणवे गणितां; मा तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें.
लीन विरळ नभ नये हातीं धरितां; तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें.
केवळ परब्रह्म न ये दृष्टी भज़तां; तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें.
बुद्धीचें कारण न ये अवगमितां; मा तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें. १
दृष्टीचें चैतन्य न ये तें पाहतां; मा तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें.
जळ धरूं ज़ैसा बाहीं न ये कवळितां; तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें.
चैतन्याची सोये नलगे प्रकटतां; तैसें श्रीअवधूता ! सगुण तुझें.
निर्विकल्प ब्रह्म; साकार खलुता; दिगंबरा ! सत्ता सगुण तुझें. २

(५)

आत्मा तूं; तुज़हूनि नाहीं देवा ! मज कव्हणीं; तनु मनु ठेउंनि चरणीं, नमन तूतें.
संसार--परजनीं तूं माझी जननी; तनु मनु ठेउंनि चरणीं, नमन तूतें.
मोक्षार्थसाधनीं विद्येची तूं खाणि; तनु मनु ठेउंनि चरणीं, नमन तूतें.
ज्ञानचिंतामणी, प्रबोधु दिनमणी, तनु मनु ठेउंनि चरणीं, नमन तूतें. १
तुझा मूर्ति--ध्यानीं पांगुळ ज़ाली करणी; तनु मन ठेउंनि चरणीं, नमन तूतें.
गुणद्रष्टा तूं गुणी; गुण ते तुज पासूनि. तनु मनु ठेउंनि चरणी, नमन तूतें;
नित्यानित्यज्ञानी स्मरती तुजलागुनी; तनु मनु ठेउंनि चरणीं, नमन तूतें.
दिगंबरा ! तुजहूनि नाहीं त्राता निर्वाणीं; तनु मनु ठेउंनि चरणीं, नमन तूतें. २

(६)

विज्ञानसागरा ! भक्तकरुणाकरा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें.
देवदेवेश्वरा ! पुरपती ईश्वरा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें.
परब्रह्मसाकारा ! अनुसूयेकुमरा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें.
परात्परतरा ! सद्विद्याजळधरा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें. १
मायातमसंहारा ! स्वानंदसागरा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें.

अलक्ष्य अगोचरा ! गुरुमूर्ती दातारा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें.
अद्वयगुणविस्तारा ! योगानंदकरा ! लीलाविश्वंभरा ! नमन तुतें.
बापा ! दिगंबरा ! मी नेणें दूसरा; लीलाविश्वंभरा ! नमन तुतें. २

(७)

तूं माझें साधन; तूंचि योगधन; सम करूंनि करचरण, नमन तूतें.
न करवे चिंतन; न तुठें मातें ध्यान; सम करूंनि करचरण, नमन तूतें.
ज्ञान कीं विज्ञान मीं न मनीं तुजवीण; सम करूंनि करचरण, नमन तूतें.
निर्जीवीं जीवन, तूं माझें चैतन्य; समकरूंनि करचरण, नमन तूतें. १
जपतपअनुष्ठान हेंचि देवार्चन; समकरूंनि करचरण, नमन तूतें.
स्वानंदचिद्घन पद परम कल्याण; सम करूंनि करचरण, नमन तूतें.
सर्वांचें कारण तूं तरी देवा ! ज्ञाण. सम करूंनि करचरण, नमन तूतें.
दिगंबरा ! तुजविण दुजा नाहीं ज़ाण; सम करूंनि करचरण, नमन तूतें. २

(८)

मन सुमनसुवर्णी समर्पिलें ध्यानीं; आतां तें परतोनि न मगें ! न मगें !
बा ! हे दृष्टिदर्शनीं समर्पिली वदनीं; आतां तें परतोनिं न मगें ! न मगें !
बापा ! शरीर संकीर्तनीं हें दिधलें नर्तनीं; आतां तें परतोनिं न मगें ! न मगें !
वाणी तव स्मरणीं दिधली प्रगर्जनीं; आतां तें परतोनि न मगें ! न मगें ! १
हे पैं हस्त दोन्हीं दिधले तव भजनीं; आतां तें परतोनि न मगें ! न मगें !
बा ! मति हे तुझा गुणीं अर्पिली निर्वाणीं; आतां तें परतोनि न मगें ! न मगें !
क्रिया-फळें चरणीं अर्पिलीं पूजनीं; आतां तें परतोनि न मगें ! न मगें !
दिगंबरस्थानीं आत्मत्व ठेउंनि, आतां तें परतोनि न मगें ! न मगें ! २

(९)

करितां विषयध्यान वय गेलें निघोन; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं.
भवदुःख दारुण वरि पडलें निर्वाण; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं.
कर्मे भवबंधन न तुटे सहसा, ज़ाण; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं.
मन माया सगुण नव्हेचि योगें क्षीण; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं. १
बोलतां शब्दज्ञान सुख ना तें साधन; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं.
मुक्तीचें साधन तूंचि तत्वज्ञान; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं.
आत्मां तूं चैतन्य माझें ध्येय ध्यान; आतां मज़ तुज़वीण कव्हणी नाहीं.

दिगंबरा ! ज्ञाण, मातें तुझी आण; आतां मज्ज तुजवीण कव्हणी नाहीं. २

(१०)

अनुमान येथ सांडूंनि, लागैन दोन्हीं चरणीं. ॥ १ ॥ ध्रु ॥
नावडे येर साधन; आवडि मनिची तूं; ज्ञाण. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुं तारकु; तुज्ञवांचूंनि नेणें आणीकु. २

(११)

अरे ! अरे ! शुद्धमयामळा ! तुझें रूप पाहीन या डोळां. ॥ १ ॥ ध्रु ॥
जीवाचें वो ! माये ! जीवन; न सवे वो ! तेणेंवांचून. ॥ छ ॥
येसु काय कैसा ? तो नेणें. दिगंबरु आत्मा, हें ज्ञाणें. २

(१२)

न यें, न यें आतां शरीरा; भेटि दुर्लभ दत्ता ! माहेरा ! ॥ १ ॥ ध्रु ॥
मोक्षु आंगीं न साहे; भेटीसि अंतर होताहे. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें सेवन; मोक्षु नलगे, तें मीं मागैन. २

(१३)

आरे ! आरे ! आरे ! शंकरा ! देवदेवा ! करुणासागरा ! ॥ १ ॥ ध्रु ॥
पाडलें मज्ज दाखवीं; ठेविलें मानस नूठवीं. ॥ छ ॥
काय करूं येर साधनें दिगंबरा तुझेनि दर्शनें ? २

(१४)

लक्षलाभु तो मी न पाहें; अवधूतु आत्मां कें आहे ? ॥ १ ॥ ध्रु ॥
पाहीन मीं माझारी, सांडूंनि अवस्था च्यान्ही. ॥ छ ॥
दिगंबरु आत्मा देखिला मीं; आपणु अवघाचि ज्ञाहाला. २

(१५)

नेति नेति ऐसें बोलणें, तें मीं विसरलों तुझेनि सेवने. ॥ १ ॥ ध्रु ॥
भुललें मन दातारा ! अर्थाचि न गमे दुसरा. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं मीं सर्वही आतां निरसूं येथे तें कायी ? २

(१६)

मोक्षु नेणें; बंधु न कळे; अवधूतीं मीपण मावळे. ॥ १ ॥ ध्रु ॥
भुललें मन सखिये ! आंगीं मीपण नसाहे. ॥ छ ॥
दिगंबरु ब्रह्म निर्गुण; तेथें मोक्षु कैंचें बंधन ? २

(१७)

देह गेह सर्व सांडूनि, मीं रातली तुझां गुणीं. ॥ १ ॥ धृ ॥
ञाडूं न धरीं लौकिकें; हासतु कां जन पारिखे. ॥ छ ॥
दिगंबरीं मन गुंतलें; तें परतोनि आप भूललें. २

(१८)

अरे! अरे! अरे! आत्मयां! अवधूता! न दवीं हे माया. ॥ १ ॥ धृ ॥
तूंचि ब्रह्म साकार, जड नेणती जन पामर. ॥ छ ॥
दिगंबरा! तुझें सगुण गुण भासक केवळ निर्गूण. २

(१९)

नाट. चालि भिन्न

ञाईन, ञायीन; दोहीं बाहीं कवळीन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तु पढिये मानसीं जीवाहुनि, आत्मारामु, अद्वयमती, विश्वंभरु,
आसक्त आसक्त दिगंबरीं ञालें चित्त. २

(२०)

आरत आरत; हेंचि माझें दृढव्रत. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तु कीर्तनीं गायिन, निरंतरु; आत्मावो!
माझा, श्रीयोगिराजु, परमप्रियु. ॥ छ ॥
सिद्धीचा दातारु सिद्धराज दिगंबरु. ॥ २ ॥ छ ॥

(२१)

विकळ वीकळ मन माझें उतावीळ. ॥ १ ॥ धृ ॥
रूपीं गुंतलें मानस; दत्तात्रय, अवधूत,
श्रीसिद्धराजु, श्रीदेवदेव, श्रीकृष्णश्याम. ॥ छ ॥
ञालतु डुलतु दिगंबरु पैलयेतु. २

(२२)

ञाल्तु ञाल्तु ञाली ञालों विसरतु. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तु हृदयीं भरला, आत्मारामु, ञालतां नये मींपण खाये,
भासतु आहे, मी माञि माये. ॥ छ ॥
प्रमादु! प्रमादु! दिगंबरें ञाला बोधू. ॥ २ ॥

(२३)

बोल्तु बोल्तु बोलों विसरलों मातू. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तीं गुंतलें मानस नुपडे माये; भूललें माये; बोलतां नये;
मौन न साहे; करूं मीं काये ? ॥ छ ॥
आठवें वीसरू; ऐसा भासे दिगंबरु. ॥ २ ॥

(२४)

खेळतु खेळतु ऋषीपुत्रांसमवेतु. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तु अदृष्टु ज़ाहाला; सकळांप्रति सलील घरीं; मायाधारी, न दीसे तरि;
पासीं नां दूरि; विषयवृत्ती, अयोगयुक्ती कुमरांप्रति, पाहाणें कित्ती ? ॥ छ ॥
देखिला समग्रीं दिगंबरू मायाधारी. ॥ २ ॥

(२५)

दिसतु दिसतु दृष्टीआड ज़ाला गुप्तु. ॥ १ ॥ धृ० ॥
सारा गगन आडिच्नें, असेष सैये! स्वरूपवृत्ती, गुणीकभान, दृष्टयाप्रति,
श्रीदत्तु पाहों, आत्मावो ! पाहों. अनंतु अनंतु दिगंबरु गुणगुप्तु. ॥ २ ॥

(२६)

पाहतां पाहतां भूलि ज़ाली यया चित्ता. ॥ १ ॥ धृ० ॥
दत्तु द्रष्टा वो ! सखिये ! पाहों मीं केवि ? माया वो दावी,
दृष्टीसि गोवी, अभावीं भावीं. ॥ छ ॥
देहींचा देखणा दिगंबरू जाणों खूणा. ॥ २ ॥

(२७)

दोखलें नयनीं; रूप रूपिलें माये !
नदिसे लोचनीं; मातेंहृदयीं स्फूरत आहे. ॥ १ ॥ धृ ॥
न यें मीं वो ! या शरीरा. आत्मयां तया वेधली सुखसागरा. ॥ छ ॥
नावडे शरीरसुख ध्यानधारण माये !
दिगंबरु आत्मा; ययाच्ने पाहिन पाये. ॥ २ ॥

(२८)

न दीसे देखणा गुणीं गूण हरणु माये !
आत्मां श्रीदत्तु याचें सहज़ देखणें आहे. ॥ १ ॥ धृ ॥
गुणा गूणी भेदु खरा. आत्मयां तया नाहीं निर्गुणा परा. ॥ छ ॥

देहाचें भान हें सार सर्व मायीक माये !
देहीं दिगंबरु आत्मा मज्ञ मीच्रि मीं पाहें. ॥ २ ॥

(२९)

सावळा सुंदरु येतां दृष्टी देखिला माये !
अवधूतु हा; याच्ने धरीन दोन्ही पाये. ॥ १ ॥ ध्रु ॥
हृदयींच्रा हा देखणा आत्माराम होये ज्ञाणत्रे खूणा ॥ छ ॥
वेधलें माझें वो ! मन; प्राण पांगूळ ज्ञाले.
दिगंबरीं चित्त चैतन्य तन्मय ठेलें. ॥ २ ॥

(३०)

कमलनयन कृष्ण श्यामस्वरूप माये !
देखिलें नयनीं; आतां देहीं मन न राहे. ॥ १ ॥ ध्रु ॥
न रमे वो ! चित्तगुणें. आत्मया तया रातली मीं येणें मनें. ॥ छ ॥
सुखाचें पारणें मातें ज्ञाहालें; सांगों मीं काये ?
दिगंबरीं रती; तेवो ! खूणा बोलतां नये. ॥ २ ॥

(३१)

आनंदकंदु स्वयंबोधु भेटवा माये ! अवधूतु आत्मा; धरीन तूमच्ने पाये. ॥ १ ॥ ध्रु ॥
न धरी वो ! या शरीरा. आत्मया तया भेटवा ज्ञानसागरा. ॥ छ ॥
भुललें माझें वो ! मन; प्राण देयींन माये !
दिगंबरू आत्मा हा हृदयीं भेटीसि नये. ॥ २ ॥

चालि भिन्न (३२)

हृदयगत कामु तद्‌वृत्ती हरला; योग संग्रहो भरल्रारे ! ॥ १ ॥
देखिलारे ! तो देखिला.
योगिराजु कैसा मीं मज्ञ स्फुरला ? सत्य चिन्मयु संचल्रा रे !
विगतदेह भाव स्ववृत्ती राहिला. दिगंबरू संचल्रा रे ! ॥ २ ॥

(३३)

दीज़े सिद्धराजाही जीवसगुणा. जना अनिवार बंधु नाशी स्वसंगें.
पापहरस्मरणु मुनी स्तविती. आत्रेय तो अवधूतु वरद येकु.
स्वजनस्वंशोभितु जनानंदकु भवभेदि. अरे मानस हें त्या वेधिनलें. ॥ छ ॥ १ ॥

(३४)

तत्ताथडिंकु थडिंढिढिंकु ढिंकुकु तादिगदा थोदिगदा धिमिकित्ता धिमिकि धिमीकि
धिमिकितो
टङ्णणां गिणंणा गिणंण्णां
टङ्णणां गिणां गिणां
टङ्गणणां गिणां गिण
तथारि थारि थारि द्धिमिकि द्धिद्धिमिकिधिमिकिटा ॥ छ ॥ २ ॥

(३५)

सासानिधपा सनिधपा निप निप निसा ॥
निप निप निसा ॥
रिगमगरिसां मगरिसां सस्सनिपमगमपा ॥
रिसानिरिसा धनिसानिपा मपासानिपा ॥
मपानिपामागमापमागा रिगमगरिसाम् सांमांमृमगमपा ॥
सांममागारि सानिसा सां ममपामपा सस सनिधपां मगरिसाम् ॥ छ ॥ ३ ॥

मळाप (३६)

अमळा श्यामळा सगुणवा शुधियांतें करुणाघना ॥
संपूर्णा कळाहंसा प्रबंधें स्तविनले बहुगुणनाथा ॥
दिगंबरा देवराया ॥ छ ॥ ४ ॥

(३७)

त्रिभुवनं परिपूजितु परमेशु. श्रीष्टीविस्तारिता, रविशशित्रिनेत्रु, ॥
अनुसूयात्मज, दत्तु, कृष्ण तनुदेऊ ! स्वजनगतभयकारणामरि ज्ञो ॥
सुरराजु अवधूतगुणी गोवितु. ॥ छ ॥ ५ ॥

३८

सासागमपागमागमासा सासागमापागमागमागमापा गमापानिपानिसासा मागारिसानिसा गमपाससा सानिधापमंगारी पनिसारिरि पसासा सनिधापमं-गारिसा ॥ ३ ॥ छ ॥

३९

दाम्दाम् तादिग्दिग् थोदिग्दिग् दिग् ढिंकुढिककुकु झककुनककिण्णा झुक्कु-द्दाकुंथारि थारिकुथारिकिट्टा झेंत्रझेंत्रझेकुझककिण्णा ॥ ४ ॥ ॥ छं ॥

४०

तेन्नातेन्नातेनातेन्नातेनातेनातेन्नतेन्नातेन्नतेन्नातेन्ना ॥ ५ ॥ छ ॥

४१

अतुळ स्वरूप रे ! सगुणगुणाहिन.
न दावति प्रबंधें अरे ! भक्तिभावें तो दिगंबरु.
देवनायकु स्वर्गदानीं उदारु गाइला; गुणभेदासि मारुनियां. ॥ छ॥१॥

(४२)

शोभे मुकुटु शिरि यारे ! सुरनरवरदिप्पळेया.
दलितनेत्रमुखाब्जि साजती अधर सुरगितनिरुपमवरि.
दंतकिरण राजतिया. अखिल दीप्ति भवतम पळिनलें.
मुनि वेधले; इतरें न रमती. येकैक देव त्रिदिव सोडूनि;
येकैके देव स्वसुख सांडुनि; येकैके देव जीवदान देउनि;
सकळ देव सेविति या; आनंदरूप श्रीदत्तुबा रे ! ॥ १ ॥

(४३)

कलिमलादहन अवधूतु उद्धउ जना गुणेशु वा ! रे !
दीनदयाभरितमेघु, शोभनु, मुनिमनधामु,
निजसेवककुळानंदकु, सुरपतिअरिदमनु, सोमु,
दिगंबरु देवो धरियला मनीं. यियाईया ॥ स्वर ॥ छ ॥
जया विवर्त्तु गुणत्रुतुहा आईति हिनु पुराणु वा ! रे ! ॥ २ ॥

(४४)

अरे ! उज्वळ–विद्रमशोभि–नखगणदीप्ति–विराजितु !
कमळदळसमश्रीचरणे !
रे ! रे ! लोकाधिपु ! कैवल्यनिसंशोभितु ! पितवाससीं
अमरादिगण रातल्या !
सगुणसुंदररूपगुणीया ! श्रीगुरुसंगें रे !
परपदा रे ! सुभक्त पावले. पापभोगें ज्ञानसागरीं
निमज्जलेया रे ! भेदा मोडुनि जीविता अर्पूनि अरे ! जीविता
अर्पूनियां तो गुरु धरियला मनीं तेहीं.
वैरिमुळा दुस्तरा छेदिलें; तो अवधूतु

ध्यान ज्ञान सांडूनियां अतिगौरमूर्त्ति म्यां धरियला. ॥ छ ॥ १॥

(४५)

आरेतियाईय्याईय्याईय्या
अरेथियाईय्याईय्याईय्यय्ययाईयय्ययाईयय्या
अय्याईयेअय्याइयेअय्याइये
अयेईयंवोईयाईया
ईय्यय्ययाईईयंवोइय्यईय्या ॥ छ ॥ २ ॥

(४६)

॥अहीरी नाट ॥

गगनीं गहना चमकती ज्वाळा; पावकू उधळला रे !
यसणातपसू दारूणु; ब्रह्मगोळु तडतडिला. ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! रे ! तापस हो ! अत्रीचें तप ऐसें.
महां कल्पांतु मांडला; मूर्द्धा भूटला तपसें. ॥ छ ॥
त्या त्या सकळा प्राशुनि ज्वाळा; पावला त्वरितु रे !
दिगंबरु आत्मारामु तया ज्ञाला हृदयगतु. ॥ २ ॥

(४७)

बहुतां दिवसां हा दिनु ऐसा देखिला नयनीं रे !
दत्ता ! तुझें स्वरूप अगम्य प्रकट ज़ालें त्रीभूवनी. ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! रे ! तापस हो ! अत्रीचें तप कैसें ?
येसणें निधान साधिलें परब्रह्म अनायासे. ॥ छ ॥
देवांच्या देऊ देहीं सर्वां योगिया आधारु रे !
अवधूतु आत्माराम प्रकटु ज़ाला दिगंबरु. ॥ २ ॥

(४८)

किरणीं जळकल्लोळ गमतां मृगें लांचावलीं रे !
सेखीं जळचि वाऊंते; कैसी ? दुराशा कवळली रे ? ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! रे ! सुजाण हो ! संसारीक हें तैसें.
जन हें जनासी नोळखे; वृथा ममतेचें पीसें ! ॥ छ ॥
गुरुवचनावरि सावधु हो ! पां ! साच तेच्चीं विचारींरे ! जना साच तें.
दिगंबरें तूटें भ्रमु; न धरीं मीपण शरीरीं. ॥ २ ॥

(४९)

क्षितितळगतजळचंचळ ढळतां सागरीं वीसांवे रे !
नाहीं तया पुनरावृत्ति; कार्यकारणीं सामावे. ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! रे ! सुज़ाण हो ! जिवासि ज़ालें तैसें.
अवधूतें येकेंवीण लेया कोठेंचि न दीसे. ॥ छ ॥
नाना योनी भ्रमतां श्रमले साधनें आयासें रे !
दिगंबरीं ज़ाले लीन, ते निवाले ब्रह्मरसें. ॥ २ ॥

(५०)

मुनिजनजिवना ! पंकजनयना ! पाये मीं पाहीनरे !
अवधूता ! येणें देहें येर न ठके साधन. ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! रे ! सुजाण हो ! चरणीचें महिमान.
बहुतां जन्माच्या सेवटु; सत्य स्फुरे ब्रह्मज्ञान. ॥ छ ॥
निश्चळ नथेरे; चंचळ हें मन मानसें वोढाळें रे !
दिगंबरा ! तूं मीं आत्मा; आतां न करीं वेगळें. ॥ २ ॥

(५१)

तुझें रूप रूपलें हृदयीं; वाणु लागला वासनेचा ठाई. ॥ १ ॥ धृ ॥
आतां काय सांगो ? दातारा ! अवधूता ! करुणासागरा ! ॥ छ ॥
जीवें नुरिजे ऐसें ज़ाहालें; दिगंबरीं मानस निमालें. ॥ २ ॥

(५२)

योगिराजीं रातलें हें मन; आतां न करीं मीं परचिंतन. ॥ १ ॥ धृ ॥
काइसा लौकिकु मातें ? मीं येणें पंथें रातलियें. ॥ छ ॥
दिगंबरीं अर्पिलें हें मन; आतां न करीं आणिक स्मरण. ॥ २ ॥

(५३)

देवा ! हृदय तुमचें मंदीर; करूं नये इतर व्रिढार. ॥ १ ॥ धृ ॥
कायिसा लौकिकु आतां ? मी अवधूता रातलियें. ॥ छ ॥
दिगंबरेंचि दीपु लाविला; नांदे हृदयीं आत्मा येकला. ॥ २ ॥

(५४)

दोन्हीं नेत्रकमळें वायीलीं; तीं माझीं न ह्मणें आपुलीं. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कुंठलें येर दर्शन; अवधूता येका वांचून. ॥ छ ॥

दिगंबरीं वाचा दीधली; तेणें नेउंनि स्मरणीं बांधली. ॥ २ ॥

(५५)

पाय पाहिन नयनीं; शिर ठेवीन पुडती चरणीं. ॥ १ ॥ धृ ॥
न करीं येरधारा आतां; श्रीअवधूता ! कृपाळुवा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! अमृतसागरा ! आदिगुरो ! तूं माहेरा बापा ! ॥ २ ॥

(५६)

दोन्हीं हात जोडूंनि मागेन; नेणें बोलों सेवक अज्ञान. ॥ १ ॥ धृ ॥
पुरे हा संसारु मातें; तूंविण परुतें नलगे. ॥ छ ॥
दिगंबरा ! स्वदीनवत्सला ! भवसागरू तारीं अवलीळा. ॥ २ ॥

(५७)

सिद्धराजा ! अमृत जळधरा ! धर्मु न कळे मातें दुसरा. ॥ १ ॥ धृ ॥
येइन तुज संगें संगें तूं पुढें मागें, हेंचि पुरे. ॥ छ ॥
दिगंबरा ! सुरगणवंदीता आदिगुरो ! श्रीअवधूता बापा ! ॥ २ ॥

(५८)

संसार सर्पु मीं धरीन; तापत्रय आंगीं साहीन. ॥ १ ॥ धृ ॥
परि संगु तुझा न सोडीं; भेदु विसरैन तुझिये आवडी. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं मी होईन; मग दंडु तोही मीं साहीन. ॥ २ ॥

(५९)

आदिगुरो ! आत्मया रामा ! मंगळधामा ! अद्वैता ! ॥ १ ॥ धृ ॥
मीं तूझा; तरि कां दीनवाणा जन्ममरणा आधीनू ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं सर्वज्ञु देहीं; तुजहूंनि नाहीं आणीकू. ॥ २ ॥

(६०)

तत्वता तूं तत्व अदेही; तुजहूंनि नाहीं सर्वथा. ॥ १ ॥ धृ ॥
पाये मी दिव करीन; आतां न भजे आणिक साधन. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं माझा आत्मा; संसारु आह्मां तो कइंचा ? ॥ २ ॥

(६१)

बहु जन्म गेले कर्मसिंधु निस्तरतां; योग साहिले मायें ! दुःखाची सरिता. १ धृ
सावळें रूप दावा नयनीं; मनस चरणीं लीन करीन गे ! माये ! ॥ छ ॥
दिगंबरेवीण योगु अयेगु सखिये ! मनस चरणीं राहे; तरीचि बरे वें. ॥ २ ॥

(१२)

अवस्था नेणें मी ग्यान्ही; मा ऊ॰ शरीरीं थारेचि ना. ॥ १॥ धृ ॥
चित्त दुश्चित ठेलें; मन विरालें बाइये वो ! ॥ छ ॥
दिगंबरें मज लाविलें पींसें; मी मज कैसें पारूषलें ? ॥ २ ॥

(१३)

डोळांचें देखणें; सारा दृश्य निवारा बाइयानो ! ॥ १ ॥ धृ ॥
मीपण न साहे आंगीं; मी मज लागि वगळलियें. ॥ छ ॥
दिगंबरें मज ऐसें केलें. मी मज नेलें चोरूनियां ! ॥ २ ॥

(१४)

जाणणें सरलें वो ! माझें श्री योगिराजें स्वविषयीं. ॥ १ ॥ धृ ॥
तें माझेंपण मातें दावां; आवडि जीवा होति असे ॥ छ ॥
काळाचा काळु निखळु काळा श्री दत्तु आला बाइ वो ! ॥ २ ॥
गवान गीळिलें येणें; अगुणगुणें प्रकटला. ॥ ३ ॥
दिगंबरीं आभासु नाहीं; देह अदेहीं सामावलें. ॥ ४ ॥

(१५)

प्राणांचा प्राणु, डोळ्यां डोळा, जीउ जिवला श्रीदत्तु. ॥ १ ॥ धृ ॥
जाईन तेणेंसीं भेटी; रिघैन पोटीं जनकाचां. ॥ छ ॥
दिगंबरु माये माझी आत्मा; व्यक्त चिदात्मा श्रीदत्तु. ॥ २ ॥

(१६)

जळज लोचनें येणें अगुणगुणें गोवियेलें. ॥ १ ॥ धृ ॥
मज मी नकळे मातें; गुंपलें नुगवे तें मानस. ॥ छ ॥
दिगंबरें द्वैत मोडलें माये ! नीजे निजरूप अखंड पाहे. ॥ २ ॥

(१७)

स्वप्निचें सुख भोगुंनि काये? जागरीं होये लटीका. ॥ १ ॥ धृ ॥
आतां निश्चळ राहीं मना ! कां दृढ कल्पना वाढविसी? ॥ छ ॥
दिगंबर येक जोडीं सत्य दृश्य असत्य सांडूंनिया. ॥ २ ॥

(१८)

देहिचा देखणा देही आत्मा वाहीं आळंगिला. ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्तु माझें जीवन साजिये ! हृदयीं राहे हेंचि करा. ॥ छ ॥

दिगंबरें—वीण नलगे कांहीं; मींपण तेंही सांडियेलें. ॥ २ ॥

(६९)

सहजीं प्रपंचु सहजचि नाहीं; सहज ठाइकें ठायीं सहजचि. ॥१॥धृ॥
सहजाची खूण सहज जाणरे ! भावे न संमत्रें सहजची. ॥ छ ॥
सहज दिगंबर निजरूप त्रिमळ भान मृगजळ पारुषलें. ॥ २ ॥

जरा जन्म भूलि लागु पावला काळाचा;
शरीर वेचलें; काये पीटितासि वाचा ? ॥ १ ॥ धृ ॥
सावधान रे ! मना ! सावधान रे !
स्वहीतविषयीं होयीं सावधान रे ! ॥ छ ॥
मन न धरितां तोचि लागईल चाळा;
दिगंबरु ध्यायीं; मुक्त होसी अवलीळा. ॥ २ ॥

(७१)

गगनीं सूटला बाणु गेला न परतें;
तैसें हें शरीर ज्ञात असे मरण पंथे. ॥ १ ॥ धृ ॥
सावधान रे ! जना ! सावधान रे !
वय वोसरलें; आतां सावधान रे ! ॥ छ ॥
स्वप्न तें असत्य; भ्रमु न धरी गव्हारा !
सांडि हें ममत्व; ध्यायीं तया दिगंबरा. ॥ २ ॥

(७२)

मन बहिर्मुख काये करी जपमाळा ?
वाचा—रंभु खोटा; सांडि सांडि आतां चाळा. ॥ १ ॥ धृ ॥
सावधान रे! सावधान रे !
हृदय नाशलें; होयीं सावधान रे ! ॥ छ ॥
वेषें न तरि-जे सत्य जाणपां !
निदानीं दिगंबरेंवीण गति; वाउगी बोलणी. ॥ २ ॥

(७३)

काम—क्रोध—शोक—मोह—वणवां जळालें मन वणवां जळालें.
अंकुरून धरीं; मोक्ष-बीज करपलें. ॥ १ ॥ धृ ॥
सावधान रे ! मना सावधान रे ! दुर्लभ शरीर पुढें सावधान रे ! ॥छ॥

ऐसें हें शरीर पुढें नाहीं रे ! गव्हारा !
शरण रीघयीं वेगीं तया दिगंबरा. ॥ २ ॥

(७४)

क्षणिक वैराग्य—बोल बोलतासि का हृदया?
मावेचें तें प्रेम नव्हे तारक आत्मयां. ॥ १ ॥ धृ ॥
भ्रमु सांडि रे मना ! भ्रमु सांडि रे !
शाब्दीकें तरिजे, ऐसा भ्रमु सांडि रे ! ॥ छ ॥
वेष संपादूनि काज न दीस चतूरा !
शरण रीघयीं आदिगुरु दिगंबरा. ॥ २ ॥

(७५)

श्रीदत्ता सद्गुरु तूं माझें योगधन; देवा माझें योगधन;
हृदयीचा ठेवा नित्य करीन जतन. ॥ १ ॥ धृ ॥
चंचळ रे ! मन चंचळ रे! पायीं स्थिरावीजे; भारी चंचळ रे ! ॥ छ ॥
तुझेनि स्मरणें भवसागरु तरणें. दिगंबरा! तया तूतें केवि विसरणें? ॥ २ ॥

(७६)

श्रीदत्ता ! सद्गुरु ! तूं आमची जननी.
भवार्के दुस्तर केवि सांडितासि वनीं? ॥ १ ॥ धृ ॥
देईन रे ! प्राणु देयीन रे ! तुझेनि स्मरणें प्राणु देयीन रे ! ॥ छ ॥
तुझें नित्य ध्यान; मन माझें उतावीळ;
दिगंबरा ! कृपामेघु ! कयी वोळसील? ॥ २ ॥

(७७)

आत्मा तूं, आमुतें तरि कायीसें बंधन?
वाया योगु सेवा; कांहीं न करीं साधन. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन रे ! तूतें पाहीन रे ! मीपण गाळूंनि तुतें पाहीन रे ! ॥ छ ॥
सत्य तूं साचार; येर माया मृगजळ.
दिगंबरा ! आतां मी तें न मनीं सकळ. ॥ २ ॥

(७८)

उभा ना बैसला, सर्वपणें सदोदीतू, अखंडु, अव्ययो, आत्मारामु अवधूतु. १ धृ॥
पाहीन वो ! माये ! पाहीन वो ! वीपटांवेगळें रूप पाहीन वो ! ॥ छ ॥

वितुळलें भान; भावीं गगन बुडालें; दिगंबरा! तुझें रूप रूपीं प्रकटलें. ॥२॥

(७९)

बापयाकारणें मेघु बोले अंतराळीं; घनु बोले अंतराळीं;
तैसा मी चातकु; तरि येयीं यये काळीं. ॥ १ ॥ धृ ॥
पाहीन रे! वाट पाहीन रे!
न येसील तरि प्राणु देयीन रे! ॥ छ ॥
दिगंबरा! तूजवीण नेणें आन कांहीं.
आत्मयां! सद्गुरू! कयीं बोल्सी हृदयीं? ॥ २ ॥

(८०)

सुरगणप्रणीत! सकळदुःखहरगा!
भवदकेवळ! कर्मकरणविमथना! ॥ १ ॥ धृ ॥
तुझां गुणीं मन माझें विगुंतलें.
ठाइकें ठायीं ठेलें; न चळे रेया! ॥ छ ॥
दुरितदुस्तर—भवमयतमदहना!
दिगंबरा! तूं मज्ज हृदयीचा देखणा. ॥२॥

(८१)

क्षितितळ सकळवीकळ जाली भ्रमतां
श्रीदत्तासारिखें रूप न दिसे वो! पाहतां. ॥ १ ॥ धृ ॥
गुंपलें मन नुगवे वो! सखिये!
सकळ—शरिर—सोये पारूषली. ॥ छ ॥
श्रवणीं देखिलें, तैसें न ये दृष्टी भजतां.
दिगंबरी अवृत्ति—प्रबोधु आइता. ॥ २ ॥

(८२)

जनकुजननी, जन्मबीज तूं सकळां.
तरि कां लाविसी चाळा? गुणकर्मविकळा! ॥ १ ॥ धृ ॥
काळ बहु मज्ज भेटोनि ज्ञाहाले.
राहिलों तुझेनि बोलें दातारा! ॥ छ ॥
योगु न करीं; नेणें साधन भूमिका.
दिगंबरा! तुजवीण न भजे मीं आणीका. ॥ २ ॥

(८३)

हृदय भूवन तुझी वसतीची भूमिका.
कैसेनि सद्गुरुराया देइजे तें आणीका ! ॥ १ ॥ धृ ॥
न स्मरे तुजवांचूनि दुसरें.
प्रीति अभ्यंतरें दातारा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझां गुणीं गुणबुद्धि हरली.
स्मरणें गति झाली सुरवरां ! ॥ २ ॥

(८४)

हृदयकमळमळरहित निवळलें.
देह ना देखणा तेथें सहज्ञचि पाहालें. ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्तें दीनु सुदीनु सखिये !
निवळ मज्ञ मीं पाहें स्थीरावला. ॥ छ ॥
न चळे चंचळ मन चळ वृत्ती सुटलें.
चळण मिळुंनि दिगंबरीं स्थीति राहिलें. ॥ २ ॥

(८५)

स्वजनवीजननिरंजनजनका !
मज्ञ मीं पाहिन मनें; न भज्ञवे आणिका. ॥ १ ॥ धृ ॥
लागलें ध्यान मीं माजि सखये !
बोलतां बोलणें माये ! पारूषलें. ॥ छ ॥
करणचेतन चित्तचैतन्य सखिये !
दिगंबरगुणी गुणां बोधु न नये. ॥ २ ॥

(८६)

असतां वो ! संसारीं हृदयकोशापुरीं
मी माझां मंदिरीं चोरटें आलें. ॥ १ ॥ धृ ॥
माझें नेलें वो ! सुपाणी माये ! मन–मोतीं चोरुनी;
चिद्रत्नें आंगणीं विखुरलीं माये ! ॥ छ ॥
समाधीची पेटी माये ! मोडली खूण गांठी.
नदिसे मार्गु; कष्टी मी; काये करूं ? ॥ २ ॥
मी माजी परवृत्ती; वो ! चोरटें स्ववृत्ती.

दिगंबरें अवृत्तीतें धरियेलें. ॥ ३ ॥

(८७)

विषयरसक्षीण माये ! मन माझें चेतन
स्वारामी रमण करीत होतें. ॥ १ ॥ धृ ॥
मज्ज ज्ञाला वो ! संचारु; पडला अंधकारू;
गुणाच्चा व्यापारु प्रकटला माये ! ॥ छ ॥
जनजाया गुणभासू नेणों काये हा त्रिदोषु? कामाचा आवेशु; मीं काये करूं?॥२॥धृ
गुणियां योगेश्वरु माये ! बोलावा सद्गुरू; भ्रमु हा दिगंबरू उतरील माये! ॥३॥

(८८)

जनधनयौवनजाया भूलि ज़ाली आत्मयां; वरि पडलां विषयां; उतारु करा. ॥१॥
गगनाच्चें वो ! फळ माये ! दिसताहे रसाळ; पाणीं मृगजळ साचार ऐसे. ॥ २ ॥
तुह्मी ज़ा ज़ा वो ! त्या स्थाना माये !
अवधूतभुवना; सर्वज्ञु तो आणा गुणिया माये ! ॥ छ ॥
नुतरे वो ! स्वमती; कां करा आधावती?
दिगंबरेंविण भ्रांति न निरसे माये ! ॥ ३ ॥

(८९)

देखिलें वो ! नयनीं; रूप भरलें माझां मनीं;
जिवें जिवामीळणीं येकत्व ज़ालें. ॥ १ ॥ धृ ॥
मीं न सोडीं वो ! तया; रातली अव्यया;
लौकीकु आणि क्रीया सांडीन गे ! माये ! ॥ छ ॥
रूपलें रूपीं मन; माये ! वेधलें चैतन्य; परवृत्तीचें दैन्य मी विसरली. ॥ २ ॥
गुणाची ज़े हनी ते साहिन निदानीं; दिगंबरमीळणीं विसरेन रूप. ॥ ३ ॥

(९०)

वियोगताप-वर्णु माये खरतरु तपे भानू; देहीं हूताशनु प्रकटु ज़ाला ! ॥१॥धृ॥
मज़ न साहे चंदन; अवो ! चंद्रामृतपान; सुरसही गायन तें विष ज़ालें!॥छ॥
जिवने बोळे तान; काये तेथें घृतपान? क्षुधा अन्नेवीण तैसीचि माये ! ॥२॥
हरिलें तेवी मन; या दिगंबरें ज़ोधन; विण तेणें हे प्राण वेचती माये ! ॥३॥

(९१)

भक्तजनप्रीयपंकजनयनु देखिला लोचनीं; माझा वेधला मनु.

देह गेह न स्मरे; देहिचा गुणू आत्मा अवधूतु प्राणामाजिचा प्राणु. ॥१॥धृ॥
ज्ञाइंन गे माये तया भुवना; पाहिन नयनीं मीं जळजनयना;
सावळें डोळस रूप आवडे मना; प्राणु वोवाळीन; माझी हेचि वासना. ॥छ॥
गेली न परतें; नये तेथूंनियां; क्षणु न विसंबें दत्ता! योगिराया!
रूपलें मानस देहीं; न चळे क्रिया; दिगंबरु आत्मा मी भेटैन तया. ॥ २ ॥

(९२)

गुणीं मन गुंपलें नुगवे माये; अनुगतचैतन्युभेदु न साहे.
श्रीदत्तीं मानस माझें मिसळत आहे; आतां मीं न राहें; त्याचे पाहिन पाये.॥१॥धृ
रातलीये मीं वो! तये सगुणीं; न धरीं लौकीकु गुण; गुंपले गुणी.
सुखरूप सखिये! ययाची मीळणी; आनंदु न समाये तो त्रीभुवनीं. ॥ छ ॥
मननी मननें मति पांगुळली; भेदाची वासना माझी पारूषली.
तन्मय ज्ञाहालें गुणीं; भूली पडली; दिगंबरें आनंदपद पावली. ॥ २ ॥ छ ॥

(९३)

योगिजनवल्लभ रूप सावळें पाहतां नयनीं येथें मन मावळे.
बुद्धि पारुषली; निजें नीज नीवले; डोळांचें देखणें तें वो! ज्ञालें वेगळें. १ धृ ॥
पाहिन गे! माये तया सगुणा; वेधलें हें मन देहीं; न धरी गुणा.
गुंपली वो! माझी मन—वासना; कैसी मी विसरों यया आनंदघना? ॥ छ ॥
डोळांचें देखणें माझें हारपलें; दत्ताचां स्वरूपीं चित्त बुडोनि गेलें.
दिगंबर भेटीं भेटणें न कळे; मींतूंपण ग्रासूंनि रूप नीवळे. ॥ २ ॥

(९४)

वाट पाहतां बहु सीणलियें वृथा स्पंदसी कां तूं बाहुलिये?
माये माझी दत्तु नये, नये; आतां प्राणु येथूनि न रखें माये! ॥ १ ॥ धृ ॥
वेचलियें मातें धरा, धरा; येकवेळा ज्ञायिन तया माहेरा;
पाहिन नयनीं सर्वज्ञु सोयेरा; कवळीन बाहीं लीला--विश्वंभरा. ॥ छ ॥
डोळुले स्पंदती; खुणा जाणीतली; जीवाची जननीं दत्तु वोळखिली.
धावोनि गळया मीं वो! झोंबीनली. दिगंबरें माझी आर्ति संपूर्ण केली. ॥२॥

(९५)

मृगजळ तें; जळ नव्हे; हरिणा! वायां दढविसी मनवासना.
जागृती भोगिज़े ऐसा नव्हे सीवणा; तैसा हा संसारभ्रमु ज्ञाईज़णा. ॥१॥धृ॥

हर ! हर ! वेच्चलें, वय वेच्चलें ! सदनें स्वजनें धनें जन भूललें !
अहीत सोषितां हित अंतरलें ! पासींचि निधान; अंधा जेवि न कळे ! ॥छ॥
अर्थेंचि अनर्थु ऐसें जाणोनिया, सांडितो विभ्रमु जना जनत्व माया.
शरण रीघर्या येका दत्तात्रया. दिगंबरें वो ! नाशु तापत्रया. ॥ २ ॥

(९६)

जन्म वेच्चले; कोटि काळ क्रमले पाठीं; भेटी भेटणें योगियां.
भक्तकरुणाकरा ! श्रीगुरो ! माहेरा ! केवि पाहें मीं आत्मयां ? ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! तुझें नामस्मरण भेषज, तापत्रयहरण मोक्षबीज. ॥ छ ॥
ज़ळो हें विषयसुख ! तुज़वीण सर्व दुःख ! मूर्ख भज़ती तैसिया.
दिगंबरा ! तुझें नाम नित्य--स्मरण, प्रेमसाध्य, परम, प्राणियां. ॥ २ ॥

(९७)

काम--क्रोधु हे जनी कृष्ण भुजंग दोन्ही गुणीं बांधती आत्मयां.
विष वीषयरसु विषमु त्रीगुणदोषु स्वासु तत्कर्म अक्रिया. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! तूज वांचूंनि विष नूतरे; कामकल्पना--वेगु कैसेनि मरे ? ॥ छ ॥
सदन स्वजन जाया ऊर्मी लागती ईया; नित्य बाधिती आश्रया.
दिगंबरा ! तूजवीण मनीं न स्मरे आन; ध्यान लागलें अव्यया. ॥ २ ॥

(९८)

विकळ चंचळ मन; कैसें करूं मीं ध्यान ज्ञान साधन; बाइये !
न कळे ययाची खूण; माडलें निर्वाण; प्राण प्रयाण; गोरिये ! ॥ १ ॥ धृ ॥
अर ! पावे, पावे कमलनयना ! तुझा संदु लागलाय या मना. ॥ छ ॥
नदिसे वो ! येतां दृष्टी; प्राणु धरिला कंठीं; मन विकळ; गोरिये !
दिगंबरू वो ! आणा; दुःख न साहे; मना मान कठीण; सखिये ! ॥ २ ॥

(९९)

ज़ातां अविद्या--पुरे कामवेगाचें वारें धारे लोटी वो बाई--ये ये !
नेत्र भ्रमती दोन्ही; तृष्णा न तूटे; पाणी; गूणी गुंपली; गोरिये ! ॥१॥ धृ ॥
अरे ! देयी कास, सद्गुरो ! माहेरा ! परपारू पाववी, ज्ञानसागरा ! ॥ छ ॥
कर्मे त्रिविद्ध भारी; भ्रमे आवर्तापरीं; मारी अहि--तें प्राणियां.
दिगंबरा ! तूज़वीण कास न धरी आन, प्राणु ही परी गेलियां. ॥२॥

(१००)

आप पारिखे जन हीतविषयीं वन भान सकळ, गोरिये !

सद्गुरू वांचूंनि कोणी आप्त न दिसे वनी गूणीं गुणघ्न, बाई—ये !॥१॥ धृ॥
देवा ! तुजवीण निरास मानसीं; करितां विचींतन कयीं पावसी ? ॥ छ ॥
कर्मवासनावृक्षीं पाशबद्ध मीं पक्षी लक्षी गगन वीरळ.
दिगंबरा ! तुसी आश; तुजवीण सर्व वोस; क्लेशद अर्थ सकळ. ॥ २ ॥

(१०१)

असवैल केवि तुतें, सांडूनि येथे आमूतें ?
केवि सुटे प्रीति तुज ! सांग वो ! माये ! मातें. ॥ १ ॥ धृ ॥
धरवैल कैसें पांदुरी ; वाढविलें जें उदरीं.
अवधूतें तुजवीण कें गति वो ! दुसरी ? ॥ छ ॥
दिगंबरा ! निश्चयेंसीं कळलें हें मानसीं::—
विण आज्ञा क्षणुभरी देवा ! तुं न राहसी. ॥ २ ॥

(१०२)

अवधूतेंविण येथें राहावे कैसें पां मातें ?
धरवैल कैसें मज सखिये ! निष्ठूरतें ? ॥ १ ॥ धृ ॥
वर—देसीं करा वो ! भेटी; वंदीन पाये लल्लाटीं.
गुण—भ्रमें भ्रमली मीं; पडली पैं बहु तुटी. ॥ छ ॥
दे ॐ तो श्री दिगंबरु दूरी करी हा संसारू.
करील, न कळे; आतां न धरे वो ! सैये ! धीरु. ॥ २ ॥

(१०३)

अखिळ सुरवर वेधले पांयीं; मुखकमळ कैसें शोभत ! सैये ! ॥१ धृ॥
कोण श्यामतनुगे ! सैये ! कोण श्याम तनु ? ॥ छ ॥
सुंदरतरतनु नीरजनेत्रु श्री दिगंबरु दे ॐ पाहे: वो सैये ! ॥ २ ॥

(१०४)

अनंतगुणहीन, अनंतगुणपरिपूर्ण,
अनंत—निर्मळ, मायावर्जित, अनंतपरमनिधान. ॥ १ ॥ धृ ॥
क्रीया—चरणें द्विजु नेणे; वैयाकरणें नित्यानंदें;
आनंदें नित्यानंदें; प्रबोधें नित्यानंदें; स्वानंदें नित्यानंदें;
अवबोधें; मन राहे परमानंदें;
येणें आनंदें; अविस्पंदें. ॥ छ ॥

अगूण–सुखमान, अगूण–परमनिदान,
अगूण, विज्वर, विमळ, सनातन, दिगंबर, कल्याण. ॥ २ ॥

(१०५)

असंगभवहीन, असंगविषयी सुभान.
असंग–विज्वर, विमळ, सनातन, अनुभव–गमकनिधान. ॥ १ ॥धृ ॥
क्रीयाचरणें, आचरणें, क्रियाचरणें, अनुमानें, ज़नुनेणे,
ज़डुनेणे, द्विजुनेणे, वैयाकरणें, श्रवणेंवैयाकरणे,
ज्ञानेंवैयाकरणे, हां ! रे ! क्रियाचरणें. ॥ छ ॥
गुरूविण गति नाहीं; गुरुविण न पडे ठायीं;
गुरू परमगति; परब्रह्मकेवळ; गुरु दिगंबरु देहीं. ॥ २ ॥

(१०६)

अरे ! अरे ! अज्ञाना ! अरे ! अरे ! मतिहीना !
असंगु आत्मा जवळिचि असतां, भ्रमसी विषयमती नाना. ॥ १ ॥ धृ ॥
स्व स्वानंदें आनंदें, स्व स्वानंदें, स्वानंदें स्वस्वानंदें, सानंदें सदानंदें,
निजबोधें, खुण पाहे; अनुपायें, स्थिर राहे स्वगुरुशब्दें. ॥छ ॥
गेलें वय तें परतोन न ये; न ये; न ये; जाण.
अनंत–मृगजळ–माया–मयजग दिगंबरें कल्याण. ॥ २ ॥

(१०७)

दिसे तें तव माया. दिसे विषयद्रुमछाया.
दिसे त्रिगुणमती सगुणतदन्वित; दिसे तो भ्रमु वायां. ॥ १ ॥ धृ ॥
विषयानंदें, आनंदें विषयानंदें, संवादें, विषयानंदें,
प्रमादें विषयानंदें, भवबोधें,
मन माजे; मन माजे; येणें दुर्वादें गुण संस्पंदें. ॥ छ ॥
असंगामृतपूर्ण, असंगपदनिर्वाण,
असंगगुणगण—त्रिगुणविवर्जित, दिगंबर निर्गुण. ॥ २ ॥

(१०८)

अरे ! अरे ! तूं मना ! अरे ! अरे ! दुर्जना !
अरे ! अरे ! खुण सांडुनि पळसी.
लपणीं लपसी; अज्ञाना ! ॥ १ ॥ धृ ॥

निजानंदें, आनंदें निजानंदें, स्वबोधें, परमानंदें,
अवरोधें, योगानंदें, स्थिरु हो पां !
लिनु हो पां ! वश हो पां ! येणें अवरोधें. ॥ छ ॥
श्रमोनी सुख नाहीं; श्रमोनियां फळ कायी ?
श्रमु श्रमासि फळ भ्रमसील; कां पर दिगंबरसुख घेईं. ॥ २ ॥

(१०९)

आत्मयां कैसें ज्ञाणों ? मना–अंतरीं हा मीपणा अंतरीं.
माये बुद्धीचें बोद्धव्य तें वो ! ठेलें बाहेरीं.
अहो ! मीपण हें दूरी. ॥ १ ॥ धृ ॥
शब्दें शब्दें सखिये ! जातुसे दूरी; अवो ! हा रामु.
अंतरीं यया भेदासि वैरी. ॥ छ ॥
दृश्य अदृश्य खाये एकलेपणें अवो ! हा आपुलेपणें.
दिगंबरु कैसा भजों येणें बोधनें गुणप्रधानें मनें अवो ! भेदस्पंदनें ? ॥२॥

(११०)

देह जायील माये ! यया कर्माचि वारीं गुण–धर्म–व्यापारीं.
अवधूती नाहीं भेटि; आता कैसें मीं करीं ?
अरे ! संतोष शरीरीं, कोंव शरीर धरीं ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! संगें तुझया क्षेम ! संसारीं; अरे ! संतोषु शरीरीं.
आनु नेणें तुजवांण; मना ! विश्रांति करीं; रूप दावी अंतरीं;
छेदी अवस्था च्यार्‍ही. ॥ छ ॥
पाये पाहीन माये ! मना अंतरीं या हृदया अंतरीं.
दिगंबरेंवीण येणें न पवे थोरी; नाहीं लाभु शरीरीं; मोक्षु यये संसारीं. ॥ २ ॥

(१११)

येकुदा दावा वो ! दृष्टी. लाभु ने घें मीं कोटी.
अवधूतीं मातें माये ! आसक्ति मोठी; अवो ! हे प्रीति वो ! मोटी. ॥ १ ॥ धृ ॥
दृष्टादृष्ट न गमे. मज़माजीं अंतरीं द्रष्टपणा अंतरीं.
अवसरु नाहीं भेटी. कायें मीं करीं ? आतां कैसें मी करीं ? ॥ छ ॥
परिखेपण वो ! खोटें; जीवीं वाउगें उठे; दिगंबरीं नाहीं भेदु;
लपणें के कोठें ? याचें असणें कोठें ? ॥ २ ॥

(११२)

आजिज्ञा सुदीनु माये ! भेटि झाली अंतरीं;
सूति ज्ञाली अंतरीं; हृदय भरलें सुखें सागर च्या-न्हीं;
ते नस्माये अंबरीं. लोपी अवस्था च्या-न्हीं. ॥ १ ॥ धृ ॥
राहीं राहीं मानसा ! खुण पाव अंतरीं; सूख पाव अंतरीं;
अवधूताचें स्वरूप तूंतें; तूंचि निर्धारी. ॥ छ ॥
शून्य सारूनि माये ! रूप याचें लाहिज़े;
प्रेम याचें लाहिज़े. दिगंबरू दीनत्राता;
यया नावडे दूजे; यया न साहे दुज़ें. ॥ २ ॥

(११३)

आश्चर्ये येणें ! वो मातें बुझावीलें अंतरीं;
नीववीलें अंतरीं; रूपाची देखणी दृष्टी सांडूनि दूरी,
रूपा करूनि चूरी. ॥ १ ॥ धृ ॥
नीजानंदें येणें वो ! मन मालवे अंतरीं.
देहीं देह पारूषलें बोलाचि वरी येका शब्दाचि वरी. ॥ छ ॥
द्रष्टेपणा बां ! मूळीं; निवळलें अंतरीं; कवळलें अंतरीं.
दिगंबर नीजरूप, नव्हे विकारी; विश्व मुक्तचि करी. ॥ २ ॥

(११४)

भेदु न साहे वो ! भेटणें ऐसें आहे;
नभ-निभ-निरंजन गुणगुणविलयें. ॥ १ ॥ धृ ॥
पाहें मीं कैसी वो ! मींचि माते गें ! बाई ये ! ॥ छ ॥
देहाची सोये वो ! येणें सूटली माये !
दिगंबरें केलें वर्म; प्रळपतां नये. ॥ २ ॥

(११५)

प्रारब्ध खोटें वो ! दत्तु न दिसे कोठें.
काय करूं मी सखिये ? सुस्वरूप न वटे. ॥ १ ॥ धृ ॥
पाये धरीन वो ! भेटि करीं गे ! बाइये ! ॥ छ ॥
देह ज्ञाईल तो; कर्म ययासी मूळ;
दिगंबरेंवीण सर्व दुःखचि मूळ. ॥ २ ॥

(११६)

सावळा सुंदरू वो ! देखिला आदिगुरू.
मन माझें उतावीळ, केसें मीं करूं ?
तें मीं केवि सावरूं ? ॥ १ ॥ धृ ॥
ज़ाईन सर्वे वो ! चित्त गुंतलें, माये ! ॥ छ ॥
मन निमालें वो ! बोध नवी तूळलें.
दिगंबरें येणें माझें मीपण गोविलें. ॥ २ ॥

(११७)

वाट पाहीन वो ! ध्यान धरीन माये !
अवधूतेंवीण मन निश्चळ न राहे. ॥ १ ॥ धृ ॥
वेळ ज़ाला वो ! दत्तु न ये गे ! बाइये ! ॥ छ ॥
आश लागली वो ! बूद्धि गुंपोनि ठेली.
दिगंबरेंवीण सैये ! निराशा ज़ाली. ॥ २ ॥

(११८)

देह नाठवे माये ! दूरि भासत आहे.
गुणीं गुणाचा हरा सुदर्शन बीलयें. ॥ १ ॥ धृ ॥
दुसरें मीं नेणें वो ! मज़वांचुनि गे बाये ! ॥ छ ॥
येक अर्थटवे शुद्ध केवळ माये !
दिगंबर बीजरूप--बोधन-- मूळ. ॥ २ ॥

चालि भिन्न

(११९)

स्वरूपसिद्धा ! निजानंदा ! सुरगणसिद्धा ! त्रीवरदा ! ॥ १ ॥ धृ ॥
निजानंदा ! आनंदा ! ॥ छ ॥
अद्वयशुद्धा ! संपूर्णपदा !
दिगंबरानेकविधा ! ॥ २ ॥

(१२०)

अद्वयमाना ! गुणनिधाना ! मुनिजनधीगहना ! ॥ १ ॥ धृ ॥
अत्रीवरदा ! आनंदा ! ॥ छ ॥
त्रीगुणहीना ! परिपूर्णा ! दिगंबरा ! तूं सगुणा ! ॥ २ ॥

(१२१)

अद्वयस्थाना ! योगनिधाना ! परमगुरो अगुणा ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्तात्रया ! सानंदा ! ॥ छ ॥
विसारसारा ! दिगंबरा ! सुरपतिमाहेरा ! ॥ २ ॥

(१२२)

अनादिसिद्धा ! स्वयंबोधा ! सदा स्वजनवरदा ! ॥ १ ॥ धृ ॥
योगिराजा ! राजेशा ! ॥ छ ॥
चित्तविश्रामा ! मंगळधामा ! दिगंबरा ! सर्वसमा ! ॥ २ ॥

(१२३)

गुणीं गुण गुंपलें चेतन मनीं रूप बैसलें सगुण.
दत्ता ! तुज केधवां पाहिन, उतावीळ दर्शना लागुन. ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! तुझें पाउल गोजिरें, सकुमार सुंदर साजिरें.
छांदस वाद स्पंदती नोपुरें. मोक्षबीज सेविती चतुरें. ॥ छ ॥
नावडे जप तप--सू बाइ--यें ! योगें नाहीं भान वो ! गोरिये !
दिगंबरु पाहिन सखिये ! मानस येणें हरिजत आहे ! ॥ २ ॥

अहिरी चाली मल्हार

(१२४)

भवसर्पु लागला अंतरीं. प्रमादु वो ! येतिसे लहरी.
विकळ ज़ाली; कवण सावरी ? स्वजन दूरि राहिले बाहेरी. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तूं रे ! केधवा पावसी ? आतां धीरू न धरे मानसी.
विषयविष केधवां हरिसी ? स्वरसें चित्त माझें निववीसी ? ॥ छ ॥
अंतर बहु पडलें मानसीं. मातु पावे तुज़वरि कैसी ?
दिगंबरा ! अझुणी न येसी ? हृदयगतदुःख कां नेणसी ?

(१२५)

अंध मूक बधिर ज़ाहाली; तुझा पंथु न कळे, भूलली;
भवदुःखसागरीं पडली; विषयजळचरीं विसंचिली. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तूं केउता गेलासी ? कठिणपण धरिलें मानसीं.
काय मीं करूं ? ज़रि न पवसी. कुंठली गति आजिचा दिवसीं. ॥ छ ॥
जनकु तूं रे ! तूं माझी जननी, आत्मा गुरु नारद म्हणौनी;

न स्मरे मी दुजया लागूनी, संकटीं परम निर्वाणी. ॥ २ ॥
चंचळ मन मानसें दुस्तरें माझें मज्ञ चित्त न संवरे.
दिगंबरा ! तुझेनि अंतरें भवार्णवीं ज्ञात असें पुरें. ॥ ३ ॥

(१२६)

खरतर तपती किरण; भवदुःख दुस्तर हें बन.
छाया नाहीं; न दिसे जीवन; क्रोध—व्याळ काम—कांठ—वन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! मज्ञ करिरें ! साउली; बाळकु तूझें, तूं माझी माउली.
हृदयावरि घेउनि कवळीं; उपेक्षिसी क्षणें अंतकाळीं ? ॥ छ ॥
चिंता ते मी सांडूनी देयिन; जीवें जिउ जीवि आळंगिन.
दिगंबरु माझें योगधन. काये करूं अपर साधन ? ॥ २ ॥

(१२७)

परतोनि दाखवी वदन. न करीं बहु मानस कठिण,
न करीं हें मानस कठिण.
तुझां ठाईं गुंपलें हें मन. वियोगदुःख न साहे दारूण. ॥ १ ॥ धृ ॥
दूर देसीं मज्ञ कां दीधलें ? भेटीलागीं अंतर पडिलें ?
दोन्ही डोळिये पाणियें भरले. लल्लाट पीटीं करतळें. ॥ छ ॥
मुळ कयी येसिल मागुता ? मज्ञप्रति; सांग अवधूता !
दिगंबरें हारिली ते चिंता. आत्मारामु नव्हे येता ज्ञाता. ॥ २ ॥

(१२८)

आमुतें कर्म कासया लाविलें ? गुणीं गुण आमुचे गोविले ?
ऐसें आह्मीं, सांग, काय केलें ? अंतर कां तूज्ञ मीं पडलें ? ॥ १ ॥ धृ ॥
कैसा, नेणें, साधु वो ! ह्मणती. तैसा गुणुं नाहीं ययाप्रति.
अगुणीं गुण भासताहे व्यक्ती. मायामय ययाची आकृती. ॥ छ ॥
आह्मी तुझे का येरे कवण ? सत्य बोल प्रमाण वचन.
दिगंबरा ! ज्ञाणितली खुण. आतां वरि न पडे मोहन. ॥ २ ॥

(१२९)

दिसे तैसा नव्हे वो ! साज्ञणी ! न कळे तुह्मां ययाची करणी.
प्रकटपण तें यया लपणी. लपे स्वयं प्रकटले—पणी. ॥ १ ॥ धृ ॥
योगीजन श्रमले ज्ञाणतां. शास्त्र मती कुंठली बदतां.

आत्मारामु सेवटीं आइता. सहज़ भोगी सकळ अवस्था. ॥ छ ॥
नयन दोन्ही राहिले अपरा; मना बुद्धी न कळे तें घरा.
दिगंबर ! स्वरूप अक्षर; सकळ दृश्य मायिक नश्वर. ॥ २ ॥

(१३०)

ऐसें वर्म बोलतां सखिये ! शब्दवादु ययासी न साहे.
रुसला; वृत्ती अवृत्ती न पाहे. अतःपर करणें वो ! काये ? ॥१॥धृ॥
आतां मौन धरीन साज़णी ! ययाप्रति नच्चले करणी.
रूसला; या करूं बुझावणी, जींत बळी जीवत्व देउंनी. ॥ छ ॥
मौन ते ही बाण वो ! लागती; शब्दाहुनि आगळे रूपती.
दिगंबरु मज्ञात्मस्थिति बुझावील ज़ाणता—ज़ाणती. ॥ २ ॥

(१३१)

देहेंवीण तूमचें भेटणें. त्रिपूटीसि वेगळ पाहाणें.
भेदेंवीण अवृत्ती भेटणें. गगन कैसें पाईं वळघणें ? ॥ १ ॥ धृ ॥
एसी मज़ नलगे करणी. तुझें रूप पाहिन नयनीं.
परब्रह्म सावळें येथुनि. हाचि योगु आवडला मनीं. ॥ छ ॥
मीपण कैसें गालिज़े येथूनी ? शून्य केवी देइज़े सांडूनि ?
दिगंवरा ! ते पुरे करणी; आत्मयां तुज़ मीं मज़ पाहोंनी. ॥ २ ॥

(१३२)

स्वजन जन वीजन स्वजना तेथें माझी नलगे वासना.
क्षणीं कवयक्षीण, क्षण—क्षणा, विषम काव्यु मांडली वेदना. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कैसे काये रे ! करणें ? कवण काळ दुःख हें भोगणें ?
तुझी सोये सहसा मी नेणें. चंचल मन न भज़े साधनें. ॥ छ ॥
शरिरीं पंचप्राण हे विकळ. करणगण कुंठले केवळ.
करणी माझी न च्चळे; तें बळ दिगंबरा सोडिता, हें स्थूल. ॥ २ ॥

(१३३)

हा सुखाच्चा सागरू. नाहीं अंतु यया पारू.
निजभक्तां कल्पतरू. दत्तु योगियां आधारू. ॥ १ ॥ धृ ॥
माझें सर्वस्वसाधन योगिराजू योगनिधान. ॥ छ ॥
सर्व देह हाचि देही. सर्व बाळकु हृदयीं.

दिगंबरीं दुजें नाहीं. चाल्य चाळक येथ काई. ॥ २ ॥

(१३४)

हा साराचें ही सार, अज, अव्यय, अक्षर,
निजरूप, निरंतर; येथ न सरती विकार. ॥ १ ॥ धृ ॥
काये कीजे स्तवन? कुंठलें प्रळपन! ॥ छ ॥
भेदमतीच्या संहारु; ज्ञानगुणें दीवाकरू;
आत्मा हा दिगंबरू; योगीयां परमगुरू. ॥ २ ॥

(१३५)

कर्मभ्रमु ज़ाला चित्ता. आंगीं लागली अहंता.
केवि निवारीसी आतां? माये-बापु तूं अवधूता. ॥ १ ॥ धृ ॥
आतां यावें; भेटावें; स्वरसें नीववावें. ॥ छ ॥
भवतापु खरतरू; विषविषय नदपूरू;
दिगंबरा होई तारूं; मातें पाववीं परपारू. ॥ २ ॥

(१३६)

वासनेची करूनि होळी, भान उंडवूंनी अंत्राळीं,
देह अभावें पोकळीं, आत्मा तूं हृदयकमळीं. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा कै येसील भेटी? मीं सामावैन पोटीं. ॥ छ ॥
द्रष्टत्वा देउंनि पाणीं; बुद्धीचा लय स्थानीं;
मन ज़ाये हारपोनी; दिगंबरा जी निर्वाणी. ॥ २ ॥

(१३७)

गगनाहूनि वाड, पीयूषापरिस गोड,
द्वैताची मोडी चाड, ऐसे भरलेसे नीबीड. ॥ १ ॥ धृ ॥
आतां काये ते बोलावें? बोलें न बोलवें स्वभावें. ॥ छ ॥
कांहीं नाहीं; हेहीं नाहीं; आहे तें नव्हे कांहीं.
दिगंबरा ते ज़ाणयीं; बैसलें माझां हृदयीं. ॥ २ ॥

(१३८)

दिनु हारपे दिनमानीं; निसिमान निसीमानीं;
शशी सूर्य ही दोन्हीं; वीरे प्रपंचु गगनीं. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें देखणें देखावें. नलगे योगें सिणावें. ॥ छ ॥

हे निमाली त्रीपुटी; अवलंबा केवळ तूटी;
नभ जीरे नभा पोटी; तइं दिगंबरीं भेटि. ॥ २ ॥

(१३९)

जीउ जीवाच्या कारणी, मनाचा लयस्थानी,
बालि दीधला निर्वाणीं. अवधूता पात्र निदानी ॥ १ ॥ धृ ॥
कृपानीधी ! दातारा ! कइ प्रकटसी ? माहेरा ! ॥ छ ॥
अहंमतीचा वीलयीं अये ! ठाउ ठाइंचा ठांयीं.
दिगंबरा ! प्रकट देहीं. भेदु मारुनि, स्वरूप पाहीं. ॥ २ ॥

(१४०)

अखंड, प्रचंड, गुणवीरहीत, अमळ, अगूण, परब्रह्म सदोदीत. ॥ १ ॥ धृ ॥
भासलें, प्रतिभासलें, रे ! स्वरूपें स्वरूप स्वयं निवळलें रे. ॥ छ ॥
असंग, अभंग, गगनसमान, दिगंबररूपीं अस्ति भाति सुखभान. ॥ २ ॥

(१४१)

अनंत, अद्वैत, भासविहीन, अचलस्वरूप, शिव, परमकल्याण. ॥ १ ॥ धृ ॥
देखिले रे ! दत्ता देखिले रे ! स्वरूपें स्वरूप आह्मी आपुलें रे ! ॥ छ ॥
अलक्ष, अमोघ, गुणवीरहीत, दिगंबर प्रकटले; न उरवी द्वैत. ॥ २ ॥

(१४२)

समूर्त, अमूर्त, अतिसुखभान, श्रीदत्ताचें रूप देखिलें सगूण. ॥ १ ॥ धृ ॥
श्यामळरे ! कृष्ण श्यामळ रे ! नयन रूप श्यामळ रे ! ॥ छ ॥
सगूण, निर्गूण, पद सुखभान, दिगंबररूप, द्वैतभाव–विलक्षण. ॥ २ ॥

(१४३)

चरणस्मरण ! भवनिर्दळन ! श्रीदत्ता ! सद्गुरो ! तुझें परमकल्याण. ॥ १ ॥ धृ ॥
लाभलें रें ! आह्मा लाभलें रें ! आजन्म न सूटे. प्रेम संचरले रे ! ॥ छ ॥
सगूण, त्रीगूण, गुणवीरहीत, दिगंबरा रूप तुझें भजती ध्यानस्थ. ॥ २ ॥

(१४४)

हृदय विषयपुर ज़ालें माय ! श्रीदत्ताचें रूप आतां तेथ कैसे आहे ? ॥ १ ॥ धृ ॥
चंचळरे ! मन चंचळ रे ! येगेंवीण ज़ाले आति चंचळ रे ! ॥ छ ॥
न येवोनि राहे मन माझें माये ! दिगंबरें कवळिलें ! मग करी काये ? ॥ २ ॥

(१४५)

हृदयीं माध्यानी मन करी जपमाळा;
चाळितुसे मणी; वाचा नांगवे तोंडाळा. ॥ १ ॥ धृ ॥
वेचलें रे! वय वेचलें रे!
लाहोनि मानव्य वायां दवडिले रे! ॥ छ ॥
साधनीं ना भोगीं देह वायांचि गेलें.
दिगंबरेवीण प्राणी ऐसें नागवलें. ॥ २ ॥

(१४६)

हृदय सराग; करीं जपमाळा;
काम क्रोध देहीं; वाचे ग्रामणीचा चाळा. ॥ १ ॥ धृ ॥
नाशलें रे! मन नाशलें रे! जीतचि शरीर; मन नाशलें रें! ॥ छ ॥
श्रवण श्रमद दमु तो आंगीं न साहे. दिगंबरा ! ऐसें जन;
योगु तया कायें? ॥ २ ॥

(१४७)

संगविहीन, परभंगविवर्जित, योगसारश्रवणा! ॥ १ ॥ धृ ॥
न मानें; न मनवे; रूपनामानें; न मनवे.
निःसीम निर्ममि प्रबोधु तो प्राणियां; ॥ छ ॥
योगजनीत सार भोगविवर्जन दीगंबर स्वजना. ॥ २ ॥

चालि भिन्न

(१४८)

अगणितु, अद्भुतु, अच्युतु, अविकारी, अद्वैतु; आ::—॥ १ ॥
अपरांपरु. ॥ १ ॥ निर्जन, निर्गुणनिधान, निरवैव, गुणगणी;
॥ आ::—॥ ० ॥ शाश्वत, सचराचरु, सर्वा अतीतु; ॥ आ::—॥
ज्ञानविज्ञानद, गुरू ऐसा दिगंबरु. ॥ आ::— ॥ ० ॥ २ ॥

(१४९)

अनुकंपामृतधारा! गति कुंठली पामरां.
श्रीगुरू वोळला घनु; नुदवी, नुरवी, परा. ॥ १ ॥ धृ ॥
आतां हृदय भरलें माझें! मनस गळीत, गळीत, विगळीत;
त्रिगुणवीहीन ठेलें. ब्रह्मानंद भरीत आतां. ॥ छ ॥

आनंदानंतानंदा ! शंकरा ! पूर्णबोधा ! दिगंबरा !
दीनपती ! पूर्णानंदपदा ! ॥ २ ॥

(१९०)

प्रतिक्षणी क्षणक्षणा मज़आगळी वासना.
भेटीच्ने आरत माये ! न पडे विसरु मना. ॥ १ ॥ धृ ॥
आतां मन हें नव्हे वो ! माझें; ज़ालें विपरीत !
तेणेंसीं ज़डोनि ठेलें; न भज़े आन विहीत. ॥ छ ॥
अद्वया ! गुणातीता ! आत्मयां ! अवधूता !
दिगंबरा तूज़वीण सकळ मान वृथा. ॥ २ ॥

(१९१)

बहुकाळ भेटि नाहीं; मन गुंपलें वीषयीं.
अवधूता ! तूं माउली; एकुदां भेटीसि नेई. ॥ १ ॥ धृ ॥
आतां, नधरे धीरु वो ! मातें. न कळे स्वहीत,
विहीत. अहीत नयनी लोटती धारा हृदयदुःखभरीत. ॥ छ ॥
आत्मयां ! दत्ता ! येई; येकूदां भेटी देयीं; देवदेवा !
दिगंबरा ! हृदयीं भेटसी कयीं? ॥ २ ॥

(१९२)

प्रतिदिनीं प्रतिक्षिणी भासतांसि, अंतःकरणीं.
आणितां विसरू नये. न गमे विषयो मनी. ॥ १ ॥ धृ ॥
आतां, मज़सी भुलली माये ! चित्त विपरीत.
बोधन बोधासी न ये; न कळे हीत विहीत. ॥ छ ॥
आशंका नुरे भावें; बोधली येणें जीवें.
दिगंबरु आत्मा सैये ! जिविच्ना जिवनु जिवें. ॥ २ ॥

(१९३)

सावळा डोळसु माये ! ध्यानीं चिंतनीं मीं पाहें.
अरती विरती याची न कळे; प्रतिती नये. ॥ १ ॥ धृ ॥
आतां, मज़ मीं भुलली जीवें. खुण विपरीत !
बोधनु अपर ठेलें. देखणें दृश्यसहीत. ॥ छ ॥
देखिला दृष्टीवीण; रूपीं गुंतलें हें मन;

दिगंबर आत्मा येणें गुणिका प्रकटे निदान. ॥ २ ॥

भिन्न चाली

(१५४)

गुणी भजता भाव ना भेद मति पारूषली.
अवधूताचें दर्शन, दृष्टि मावळली; गुणमति मावळली. ॥०॥१॥ धृ ॥
जिवीचें आरत कांहीं गुज्ज बोलयीन.
रूप हृदयीं सखिये ! बाहीं कवळीन. ॥ छ ॥
गुण ययाचे निर्गुण, ऐसें मी वो ! काये ज्ञाणें ?
दिगंबरीं अनुसरु; कुंठें बोलणें. ॥ २ ॥

(१५५)

हा वो ! देहीचा देखणा; येणेंसीं मीं काये चोरूं ?
मन माझें हें चंचळ; कैसें काये करूं ? ॥ १ ॥ धृ ॥
जीवीचें आरत ऐसें कयी पावयीन ?
अवधूताचां चरणी माळवैल मन. ॥ छ ॥
मन ज्ञाये वो ! ज्ञेय हें; तेथवरि तोचि आहे.
दिगंबर आत्मा; तेथ मन मरोनि ज्ञाये. ॥ २ ॥

(१५६)

बहु दिवस क्रमले; सखिये ! मी काये करूं ?
भेटी न ये अवधूतु; याचे पाये धरूं. ॥ १ ॥ धृ ॥
भेटीचें आरत माझें परिपूर्ण करा.
मन माझें उतावीळ; पाहिन माहियेरा. ॥ छ ॥
वाट पाहतां कुंठली गति, मति, आठवण.
दिगंबराचें भेटणें मनीं मारूनि मन. ॥ २ ॥

(१५७)

सुख नाहीं वो ! शरीरीं; तापत्रय बाधिताहे.
अवधूतें वो ! संडिली; आतां करूं काये ? ॥ १ ॥ धृ ॥
कठीण येसणें ऐसें; मी वो ! काये ज्ञाणे ?
बुध्नविज्ञे अवधूतु अंगें कवणें ? ॥ छ ॥
प्राणप्रयाणसमयीं आतां मज्ञ भेटि देई.

दिगंबरा! तूज़वीण मज़ कव्हणी नाहीं ? ॥ २ ॥

(१५८)

देह, गेह हें पारिखें जन, धन, वन, ज़ालें;
अवधूतेंवीण सुख दुःख परतलें. ॥ १ ॥ धृ ॥
॥ १ ॥ न धरी शरीर; आतां मी ज़ाति असे.
संगु न सोडीं माहेरा ! मज़ मांडलें ऐसें. ॥ छ ॥
देह ज़ायील; न चुके; येणें मज़ चाड नाहीं.
दिगंबरु, आत्मारामु पाहिन हृदयीं. ॥ २ ॥

(१५९)

प्राणाचें मज़ नाहीं वो ! या जिवाचें मज़ नाहीं वो !
स्वजनजनितभय देहीं वो ! नयनीं भरलें रूप दोहीं वो !
डोळां भरलें रूप दोहीं वो ! कवाळिन दोहीं बाहीं वो ! ॥ १॥ धृ ॥
देव हरे ! देव हरे ! देव हरे ! देव हरे ! देव हरे ! देव हरे !
देवारे ! देवारे ! देवारे ! रे ! रे ! रे ! रे ! रे !
तुज़विण मातें क्षण न सरे ! ॥ छ ॥
मानस मीपण वरियलें; मन मनाप्रति चोरियेलें;
मन मनाप्रति चोरियेलें.
देहादि सकळ सारियलें; दिगंबरसुख माये ! भोगियेलें. ॥ २ ॥

(१६०)

बोलें बोलणें मज़ मानेना. शास्त्रश्रवण तें वो ! मज़ मानेना. ॥ ० ॥
सद्गुरूवांचुनि पढियेना. योगाची मति उपज़ेना.
साधनबुद्धि मनीं उपज़ेना. श्रीदत्तु आठवे मनी क्षणक्षणा. ॥ १ ॥ धृ ॥
पाउलें, पाउलें, पाउलें, पाउलें,
सावळें पाउलें, देवारे ! रे ! रे ! रे ! रे ! रे !
देवारे ! देवारे ! आठवति मनी तुझें पाउलें. ॥ छ ॥
ध्यानधारण मज़ उपज़ेना. जपु तपसु मज़ उमज़ेना. ॥ ० ॥
देह अदेह प्रति प्रति भासेना. दिगंबरीं मीपण उमज़ेना.
दिगंबरीं बोधन उमज़ेना. पुरे सखीये ! अनुभवकल्पना. ॥ २ ॥

(१६१)

लोक बोलती तें मीं साहीन; जनाचे अपवाद साहीन. ॥ ० ॥
अवधूतपंथें मीं जायीन; करूं नये, तें मीं करीन. ॥ ० ॥
बोलों नये ऐसें करीन. देवोचि स्वयें होयीन. ॥ १ ॥ धृ ॥
अरे मना ! अरे मना ! अरे मना ! अरे मना !
मनारे ! मनारे ! अरे ! अरे ! मनारे ! तुजवीण मनसा नाहीं दुसरे. ॥ छ ॥
क्रिया कर्म तें सांडीन; गुणाचे व्यापार निरसीन;
न करणें कर्म करीन; दिगंबरु मी ऐसे ध्यायीन;
आत्मा अवधूतु उमजैन; भेदाचि बळि तेथ देयीन. ॥ २ ॥

(१६२)

चालि भिन्न कल्याण

त्रिरालें चरणीं त्याचां मन हें माझें; नेणें आपुली सोये. ॥ १ ॥
आहे श्रीगुरुविण या कांहीं ? नेणिजे स्वहित ये देहीं. ॥ छ ॥
देऊ॰ दिगंबरु बैसला जीवीं. येरा रीघु ते ठाइं नोहे. ॥ २ ॥

भिन्न

(१६३)

प्रीति न धरी विण तेणें वो ! सोये माझें मनस हें; जाणा. ॥ १ ॥
पाहिन कई सखयाचे मीं पाये ? ॥ छ ॥
मन हें सगुणाविण न करी ध्यान; योगसाधन तें सोसेना;
देव दिगंबरीं जडे. पुडती वेगें सखिये ! वो ! वो ! आणा. ॥ २ ॥

(१६४)

कैसी भजों मीं आतां येणें वो ! सैये ! केलें मीपण हें दूरी. ॥ १ ॥ धृ ॥
पाहीं मी केवी दत्ता ! तूझे पाय ? ॥ छ ॥
करितां स्मरण मनप्रवृत्ति क्षीण राहे स्वस्थिती सुलीन.
देव दिगंबरें येणें येथून केले सकळ धर्म क्षीण. ॥ २ ॥

भिन्न

(१६५)

दाखवी चरणा पंकजनयना !
योगिराया ! स्वजना तुं जीवनु जीवना,

दिगंबरा ! तूज़वीण मज़ कव्हणी नाहीं ? ॥ २ ॥

(१५८)

देह, गेह हें पारिखें जन, धन, वन, ज़ालें;
अवधूतेंवीण सुख दुःख परतले. ॥ १ ॥ धृ ॥
न धरीं शरीर; आतां मी ज़ाति असे.
संगु न सोडीं माहेरा ! मज़ मांडलें ऐसें. ॥ छ ॥
देह ज़ायील; न चुके; येणें मज़ चाड नाहीं.
दिगंबरु, आत्मारामु पाहिन हृदयीं. ॥ २ ॥

(१५९)

प्राणाचें मज़ नाहीं वो ! या जिवाचें मज़ नाहीं वो !
स्वजनजनितभय देहीं वो ! नयनीं भरलें रूप दोहीं वो !
डोळां भरलें रूप दोहीं वो ! कवळिन दोहीं बाहीं वो ! ॥ १ ॥ धृ ॥
देव हरे ! देव हरे ! देव हरे ! देव हरे ! देव हरे ! देव हरे !
देवारे ! देवारे ! देवारे ! रे ! रे ! रे ! रे ! रे !
तुज़विण मातें क्षण न सरे ! ॥ छ ॥
मानस मीपण वरियलें; मन मनाप्रति चोरियेलें;
मन मनाप्रति चोरियेलें.
देहादि सकळ सारियलें; दिगंबरसुख माये ! भोगियेलें. ॥ २ ॥

(१६०)

बोलें बोलणें मज़ मानेना. शास्त्रश्रवण तें वो ! मज़ मानेना. ॥ ० ॥
सद्गुरूवांचुनि पढियेना. योगाची मति उपज़ेना.
साधनबुद्धि मनीं उपज़ेना. श्रीदत्तु आठवे मनी क्षणक्षणा. ॥ १ ॥ धृ ॥
पाउलें, पाउलें, पाउलें, पाउलें,
सावळें पाउलें, देवारे ! रे ! रे ! रे ! रे ! रे !
देवारे ! देवारे ! आठवति मनी तुझें पाउलें. ॥ छ ॥
ध्यानधारण मज़ उपज़ेना. जपु तपसु मज़ उमज़ेना. ॥ ० ॥
देह अदेह प्रति प्रति भासेना. दिगंबरीं मीपण उमज़ेना.
दिगंबरीं बोधन उमज़ेना. पुरे सखीये ! अनुभवकल्पना. ॥ २ ॥

(१६१)

लोक बोलती तें मी साहीन; जनाचे अपवाद साहीन. ॥ ० ॥
अवधूतपंथें मी जायीन; करूं नये, तें मी करीन. ॥ ० ॥
बोलों नये ऐसें करीन. देवोचि स्वयें होयीन. ॥ १ ॥ धृ ॥
अरे मना ! अरे मना ! अरे मना ! अरे मना !
मनारे ! मनारे ! अरे ! अरे ! मनारे ! तुजवीण मनसा नाहीं दुसरे. ॥ छ ॥
क्रिया कर्म तें सांडीन; गुणाचे व्यापार निरसीन;
न करणें कर्म करीन; दिगंबरु मी ऐसे ध्यायीन;
आत्मा अवधूतु उमजैन; भेदाचि बळि तेथ देयीन. ॥ २ ॥

(१६२)

चालि भिन्न कल्याण

विरालें चरणीं त्याचां मन हें माझें; नेणें आपुली सोये. ॥ १ ॥
आहे श्रीगुरुविण या कांहीं ? नेणिजे स्वहित ये देहीं. ॥ छ ॥
देऊं दिगंबरु बैसला जीवीं. येरा रीघु ते ठाइं नोहे. ॥ २ ॥

भिन्न

(१६३)

प्रीति न धरी विण तेणें वो ! सोये माझें मनस हें; जाणा. ॥ १॥
पाहिन कईं सखयाचे मी पाये ? ॥ छ ॥
मन हें सगुणाविण न करी ध्यान; योगसाधन तें सोसेना;
देव दिगंबरीं जडे. पुडती वेगें सखिये ! वो ! वो ! आणा. ॥ २ ॥

(१६४)

कैसी भजों मी आतां येणें वो ! सैये ! केलें मीपण हें दूरी. ॥ १ ॥ धृ ॥
पाहों मी केवी दत्ता ! तूझे पाय ? ॥ छ ॥
करितां स्मरण मनप्रवृत्ति क्षीण रहि स्वस्थिती सुलीन.
देव दिगंबरें येणें येथून केले सकळ धर्म क्षीण. ॥ २ ॥

भिन्न

(१६५)

दाखवी चरणा पंकजनयना !
योगिराया ! स्वजना तुं जीवनु जीवना,

भवभयहरणा ! येकु वेळ ये रे ! ॥ १ ॥ धृ ॥
ये नीवारीं शंकरा ! दयासागरा ! बाधकु भवतापु.
तुं वांचूनि आणिका नतरे वरदा ! भ्रमजल्पु बा ! रे ! ॥ छ ॥
न दिसे विषयो आन तुंविण मना; भेदपापमथना !
तुं येइ बा ! सगुणा ! देव ! दिगंबरा ! वाट पाहें; ये रे ! ॥ २ ॥

(१६६)

अहिरी

सराग मानस विषयीं लागट भारी.
न वळे, स्वहितपर विपरीत करीं. ॥ १ ॥ धृ ॥
निवारी वरदा ! गुणमाया भेदमाया.
करुणासागरु, तरि न विचारीं क्रिया. ॥ छ ॥
न घली येथुनि समळ देवा ! हें मज़वरि.
चूकले सेवक; क्षमा दिगंबरा ! करीं. ॥ २ ॥

गौडी

(१६७)

मातलें हें मन विषय रस सेवनीं; वळितां तेथूनि परतेचिना. ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयना ! कमळनयना ! अधिकारु दे मज़ चरणस्मरणा. ॥ छ ॥
दिगंबरा ! मन दिधलें तवचरणीं; आपुलें ह्मणौनि सांभाळिज़े. ॥ २ ॥

(१६८)

चित्त हें रातले तवचरणस्मरणीं; आतां तें परतोंनि मागेच्चिना. ॥१॥ धृ ॥
देवदेवा ! देवदेवा ! स्वजनजनजीवना ! कृपाळुवा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुतें दिधलें अवदान मानस; तें परतोंन घेउंन ये. ॥ २ ॥

(१६९)

चित्त हें दुश्चित्त अगुणगुणरहणीं; लावितां सगुणीं लागेच्चिना. ॥ १ ॥ धृ ॥
देवराया ! देवराया ! कैसेनि मज़ भेटसी ? दत्तात्रया ! ॥ छ ॥
अगा ! दिगंबरा ! तुझें विपरीत करणें::—भजनसुखभजनें दूरि लोक. ॥२॥

(१७०)

दृढावलें गुरो ! तुमचें ध्यान. स्वजन धन परजन भासेचिना. ॥ १ ॥ धृ ॥
हेंचि पुरे, देवदेवा ! मननीं मन अनुसरलें योगसेवा. ॥ छ ॥

दिगंबरा ! तुझें ध्यानचि साधन; चरणगुणमहिमान न्वोजवेना. ॥ २ ॥

(१७१)

लांचावलें मन तुझांचि वदनीं;
शरीरसुख परतोनि पाहेचिना. ॥ १ ॥ धृ ॥
अगा ! देवदेवा ! दत्तात्रया !
मननीं मन माळवे, तेचि क्रीया. ॥ छ ॥
दिगंबरा ! पुरे योगादिसाधन ! तव चरणीं मम मन मावळलें. ॥ २ ॥

(१७२)

मन हें सुमन वाइलें ईश्वरीं अगुणगुण–जळधरीं दत्तात्रयीं. ॥ १ ॥ धृ ॥
केवि पाहों मन आपुलें ? लवण मिने सागरीं; तेवि ज़ालें. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुतें मी माजि पाहातां, मन सगुण निवडितां निवडेचिना. ॥२॥

(१७३)

श्रवणाचें सुख नयनीं लाहीना. परमपद तवचरण दत्तात्रया ! ॥ १ ॥ धृ ॥
पाहीन गा ! जन्मवरी. न पवें मग संसरण भवसागरीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें दर्शन तारक. अपर भवभयजनक तें नलगे. ॥ २ ॥

(१७४)

भक्तचिंतामणी ! अमृतजळधरा ! विज्ञानसागरा ! दत्तात्रया ! ॥१॥ धृ ॥
तझें नामसार ध्यानसार. ज्ञानविज्ञान तूं योगसार. ॥ छ ॥
सिद्धराजा ! भवदुःखार्कनाशना ! स्वानंदवर्धना ! दिगंबरा ! ॥ २ ॥

(१७५)

विश्वभासा ! तत्वविज्ञानदिनमणी ! भक्तचिंतामणी ! योगिराया ! ॥१॥धृ॥
तुझें ध्यान लागो; प्रेम लागो; नित्यसंकीर्तनीं प्रीति लागो. ॥ छ ॥
वरदमूर्ती ! ब्रह्मनिर्वाणदायका ! त्रीपुरनायका ! दिगंबरा ! ॥ २ ॥

(१७६)

योगियाचें धन योगासि कारण. ब्रह्मसनातन योगिराजू. ॥ १ ॥ धृ ॥
मज़ भेटवा वो विश्वकंदू श्रीदत्तु पूर्ण विज्ञान बोधु. ॥ छ ॥
आदिकर्ता, भेदताप–विध्वंसनु, सुभक्तपावनु, दिगंबरू. ॥ २ ॥

(१७७)

संसारदुःखसागरू हा तत्वता प्रपंचु पाहातां; पारु नाहीं. ॥ १ ॥धृ ॥

कास देयीं योगिराया ! त्राहि ! त्राहि ! गुरो ! दत्तात्रया ! ॥ छ ॥
अगा ! कामादिके बहू बाधिती जळचरें. पाव कृपाभरें दिगंबरा ! ॥२॥

(१७८)

संसारु हा कृष्णसर्पु विश्वंभरा ! चढतां पाहारी झोंबीनला. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! मंत्रराजा ! मंत्रमूर्ती ! पाव करुणाकरा ! पुण्यकीर्ती ! ॥ छ ॥
नाम तुझें तेंचि अमृतप्राशन जीवासि जीवन; दिगंबरा ! ॥ २ ॥

(१७९)

संसारदुःखदावानळु पेटला; माजि सांपडला वनचरू मी. ॥ १ ॥ धृ ॥
आतां वोळ बा ! रे ! दत्तात्रया ! काळाग्निशमना ! देवराया ! ॥ छ ॥
ज्वाळमाळाकुळ मानस ज़ाहालें, तुज़ वीसरलें ह्मणौनियां. ॥ २ ॥
दिगंबरा ! तुझें नामानुस्मरण संतापनाशन भवरोगियां. ॥ ३ ॥

(१८०)

विषयांची वृत्ती न सुटे या मना; अतेव कामना दृढ ज़ाली. ॥ १ ॥ धृ ॥
आतां वंचलों गा ! देवराया ! वीसरलों तुतें दत्तात्रया ! ॥ छ ॥
अयोगता मन मातलें; नाकळे; तूज़ विसरलें; दिगंबरा ! ॥ २ ॥

(१८१)

योगिराजा ! परमात्मया ! रामा ! राम विश्राम तूं; परम निःकामा ! ॥१ ॥ धृ ॥
आह्मीं चूकलों गा ! सर्वापरी; अतेव आतसों भवसागरीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें स्मरणसारा आणीक न दिसे याहूनि थोरा. ॥ २ ॥

(१८२)

आदिदेवा ! सुरवंदीतचरणा ! शरण आलों तुतें; भवदुःखहरणा ! ॥१॥ धृ ॥
तुतें चूकलों, गा ! सत्य जाण; अतेव पावलों जन्ममरण. ॥ छ ॥
दीगंबरा ! परब्रह्म ! सगूणा ! सर्वरूपा ! शिवा ! संतापहरणा ! ॥ २ ॥

(१८३)

सिद्धराजा ! परब्रह्म ! अगाधा ! बाध–मुक्ता ! गुरो ! आत्मयां ! शुद्धा ! ॥१॥धृ॥
आह्मीं चूकलों, गा ! देवराया ! अतेव मोहलों तव मायया. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें न कळे ध्यान. ज्ञान विज्ञान तूं पूर्ण चैतन्य. ॥ २ ॥

(१८४)

दत्तमूर्ती ! जगव्रह्मविस्तारा ! सार सर्वत्र तूं; विज्ञानसारा ! ॥ १ ॥ धृ ॥

तुतें चुकलों, गा ! विषयवृत्तीं; आहि देवा ! परब्रह्ममूर्ती. ॥ छ ॥
दिगंबरा ! परब्रह्म तूं सार पारवीवर्जीत, पूर्ण, अक्षर. ॥ २ ॥

(१८५)

कृष्णरूपा ! परब्रह्म ! निःकामा ! नाम तूझें, परमात्मया ! रामा ! ॥१॥ धृ ॥
न कळे, गा ! या मनातें; अतेव दंडि जो पादघातें. ॥ छ ॥
दिगंबरा ! भवसंतापहरणा ! शरण तुतें; नमो ! काळाग्निशमना ! ॥ २ ॥

(१८६)

मंत्रराजा ! जयमंगळधामा ! नाम तूझें, परमात्मया ! रामा ! ॥ १ ॥ धृ ॥
दुर्लभ गा ! लोकत्रयीं; त्याहूंनि दुसरें पर नाहीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें स्मरण देहीं देहत्व—नाशन परम अदेहीं. ॥ २ ॥

(१८७)

मोक्षरूपा ! मनबुद्धि-विश्रामा ! काम मुक्ता ! नंत-गुणकीर्ति-महिमा ! ॥१॥धृ॥
कमळनयना ! कृपाळुवा ! भक्तजनवत्सला ! देवदेवा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें स्वरूप शिव, व्यक्त जालें परब्रह्म निरवैव. ॥ २ ॥

॥ चालि भिन्न ॥

(१८८)

सुमनाची सेज काइसी खरा ? खर निखर तें; परुतें सारा ! ॥ १ ॥ धृ ॥
सार बोलवेना; मनें उमगेना; निजसुखसार बोलवेना. ॥ छ ॥
दिगंबर ये स्वरूपसार; येर मायामय सर्व निसार. ॥ २ ॥

(१८९)

रावां वोले तो बोलिका काये ? आत्मसंवित्तीवादु न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
राहे आपरूपीं जना ! निर्विकल्पीं परोपरि. ॥ छ ॥
दिगंबर निजस्वरूपसत्ता. पुरें हें बोलणें. पारुषो आतां. ॥ २ ॥

(१९०)

नामघोषें जनु वाजवी टाळी. पातलीं पातकें जाती अंतराळीं. ॥ १ ॥ धृ ॥
मुळीं भेदु नाहीं; साधन येथ कायी अतःपर ? ॥ छ ॥
दिगंबरनामस्मरणतारूं तरिजे रोकडा भवसागरू. ॥ २ ॥

(१९१)

वपु नेणें; मज न कळे टाळी. टाळूंनि मानसें लागलों मूळीं. ॥ १ ॥ धृ ॥

मूळ सोडवेना; ने घे जीवपणा, माझें मज. ॥ छ ॥
दिगंबरें हेंचि वर्म मीं ज्ञाणें. ज्ञाणत नेणणें ज्ञाणणें नेणें. ॥ २ ॥

(१९२)

सुजन कैसा ? हंसुका ज्ञैसा. अर्थसारू भजे; इतरु भेषा. ॥ १ ॥ धृ ॥
दिगंबरूसार चतूर घेती. येर ते पामर खूण नेणती. ॥ २ ॥

(१९३)

रिवरिचें जेवण; साखर वाढा. नाम संकीर्त्तनीं टाळ्या गोडा. ॥ १ ॥ धृ ॥
मुढा घोटवेना; नुमज़े प्रीति; मना अहंकृती. ॥ छ ॥
दिगंबरनाम स्वताचि गोड. टाळी वाज़वणें त्यावरि कोड ! ॥ २ ॥

(१९४)

आजिष्ठा सूदीन ! लागेन पायां; नयनीं देखिलें श्रीयोगिराया. ॥ १ ॥धृ ॥
क्रिया पालटली. विषयमति मेली. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझे पादचि सार. अक्षयी सुख तें तेथ अपार. ॥ २ ॥

(१९५)

विषयांचा लाभु रे ! न मनीं प्राणियां !
देह नाशवंत; कवण आश्रयो तया ? ॥ १ ॥ धृ ॥
अति स्वार्थु वोखटा अर्थकामवीषयीं.
अर्थेंचि अनर्थु; सत्य आणिकें नाहीं. ॥ छ ॥
दिसतें सकळ रे ! मायावी सर्वथा.
दिगंबर सत्यतत्व, ज्ञाण, तत्वता. ॥ २ ॥

(१९६)

प्रमीत हे जीणें; रे ! नीदानी मरण. कवणाचें धन जन जाया स्वजन ? ॥१॥धृ॥
भ्रमु सांडीं मानसा. तुंते तुंचि सोयेरें. विचारें पाहातां, तुतें नाहीं दूसरें. ॥ छ ॥
स्वप्नीचें जाग्रतें रे ! वाउगी कल्पना. दिगंबरेंवीण सत्य न दिसे या मना. ॥२॥

(१९७)

मनुजशरीर रे ! मोक्षाचें कारण. वाया हें ज्ञातसे; करीं हीतसाधन. ॥१॥धृ॥
धिग्य जन्म वेचला, माझें मीं हे सोषितां. वयाचा नीदानीं तुझा तूंचि सर्वथा. ॥छ॥
कवणाचें धन रे ! यौवन रे ! मायिका ! दिगंबरेंवीण, सत्य ! न भजें आणिका. ॥२॥

(१९८)

ज्ञातयां येतयां मीं पुसेन वाटुली. दूर देशीं दत्तु माये ! माझी माउली. ॥१॥धृ॥
कधीं आइन माहेरा आपुल्या ? साजणी ! कमळनयनरूप आठवे मनीं. ॥ छ ॥
कवळीन रूप दोहीं बाहीं सखिये ! दिगंबरीं भेटि कै होइल ? गोरिये ! ॥ २ ॥

(१९९)

कमळीं कमळ वो ! कमळनयना !
पाहें नडिाळुंनि कमळकोशीं वासना. ॥ १ ॥ धृ ॥
कमळीं पूजा कमळा. कमळा वल्लभा तुझी.
कमळीं कमळें सर्वदा तुझां वसतुकां माझीं. ॥ छ ॥
कमळीं कमळें रे ! स्फूरती सर्वदा.
दिगंबरा ! तूझें ध्यान लागलें सदा. ॥ २ ॥

(२००)

पाहिजेसें रूप; ना लाहिजेसें केवळ.
मृगार्तें मायीक मिथ्या आभासे जळ. ॥ १ ॥ धृ ॥
तैसें दृश्य लटिकें. येथें माऊ न धरीं.
अवस्था–जनींत मान मना ! विचारीं. ॥ छ ॥
दृश्य, दर्शन, रे ! द्रष्टत्व सांडुनी,
दिगंबररूप पाहे आपुलां स्थानीं. ॥ २ ॥

(२०१)

जनवन भ्रमतां श्रमलीं येतां ज्ञातां मीचि मीं येकलीं. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन कमळनयना; तेणें माझी हरैल वेदना. ॥ छ ॥
सर्वही दुःखाचें कारण. दिगंबरु माझें वो ! जीवन. ॥ २ ॥

(२०२)

दिनें दिनु पावलीं क्षिणता. वय गेलें विषय स्मरतां. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन सुखाचें कारण अवधूतरायाचें चरण. ॥ छ ॥
जीवींचि मुक्तीचें साधन दिगंबरा ! तूमचे चरण. ॥ २ ॥

(२०३)

तो दिनु कधीं मीं लाहिन ? देवा ! तुतें हृदयीं पाहिन. ॥ १ ॥ धृ ॥
साधन न करीं दूसरें अवधूता ! तुझेनी विसरें. ॥ छ ॥

कर्मज शरीर न धरीं. दिगंबरु पाहीन अंतरीं. ॥ २ ॥

(२०४)

भवपुर भ्रमतां श्रमली; आपुल्यां प्रति मीं चूकली. ॥ १ ॥ धृ ॥
ज़ायिन श्रीदत्तभूवना; भेटयीन माये मीं स्वजना. ॥ छ ॥
दिगंबरु ते माझी माउली, श्रमहर सुखद साउली. ॥ २ ॥

(२०५)

भोगें क्षीण शरीर वेचलें; काम क्रोध प्रबळ ज़ाहाले. ॥ १ ॥ धृ ॥
तें ज़िणें ज़ळो रे! पामरा! अहंमती न धरी शरीरा. ॥ छ ॥
अंतकाळु मांडला समयीं. दिगंबरु नाठवे हृदयीं. ॥ २ ॥

(२०६)

मनस हें मानसीं मातलें. स्व-स्वरूप तयासी न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन तुमचे चरण. तेणें मन होईल उन्मन. ॥ छ ॥
दिगंबरा! तूं माझी धारणा, योगमुद्रा, समाधी, चेतना. ॥ २ ॥

(२०७)

मार्गें मार्गें येयीन येकली. अवधूता! बापु तूं माउली. ॥ १ ॥ धृ ॥
तूंविण नेणें मीं दुसरें, मनें, मती, मानसें, शरीरें. ॥ छ ॥
संगें संगु-संसार-छेदन; दिगंबरा! सत्य हें वचन. ॥ २ ॥

(२०८)

कर्म-कूप-कुवाडां पडली. अवधूता! तुज़ मीं चूकली. ॥ १ ॥ धृ ॥
होयिल प्राणाची सांडणी. तुज़वीण नाहीं बा! कव्हणी. ॥ छ ॥
दिगंबरा! निवारी वेदना भवदुःख संसार कल्पना. ॥ २ ॥

(२०९)

॥ चालि तेचि हे चौचरणी ॥

अद्वय-ब्रह्म, स्वरूपत्वें रूपस; श्रमती ज़या लागूनि तापस;
योगी योग सेवित्ती बव्हस; येथें वो! माझें गुंपलें मनस. ॥१॥ धृ ॥
पाहिन नयनीं सखिये! मन माझें वेधलें बायिये!
देहावरी न ये वो! गोरिये! येणें ज़ाणें कुंठलें वेसिये! ॥ छ ॥
मुमक्ष ज़यालागोनी श्रमती; मुक्त ज़ेथें आनंदु भोगिती;
भक्तजन सगुण भज़ती; दिगंबरु पाहातां पूजिती. ॥ २ ॥

(२१०)

प्राचीन कैसें ? तें न कळे. सद्गुरूसी अंतर पडिलें.
आठवती हृदयीं पाउलें. मन माझें ज्ञाहालें आंधळें. ॥ १ ॥ ध्रु ॥
मी पाहिन कमळनयना; लागयीन, न सोडीं, चरणा.
न साहे वो ! वियोगवेदना. मन दुजी न करी कामना. ॥ छ ॥
कर्म-भूति कर्मासी कारण; येणें देहें नव्हे वो ! साधन.
संगयोग त्राणले गहन. दिगंबरीं न स्फुरे चेतन. ॥ २ ॥

(२११)

कर्मयोग श्रमली सोषितां माझें तुझें दुःखाची सरिता.
वय गेलें विषय भोगितां. अंतकाळ पावला सर्वथा. ॥ १ ॥ ध्रु ॥
मि पाहिन देवाचें वदन मायबापु माझें वो ! स्वजन.
हितकर, गतीचें कारण, आतां तन्हीं रिघेन शरण. ॥ छ ॥
लक्ष-लभु ज्ञाला, तो न मनीं. देह नाहीं मज्ज हें येयुनी.
आत्मारामु दाखवा नयनीं. दिगंबरीं करा कां मीळणी. ॥ २ ॥

(२१२)

विषयसुख दुःखासी कारण. विषयभ्रमु श्रमाचें साधन.
विषयवृत्ति अवृत्तीबंधन. विषय मीं वो ! न करी सेवन. ॥ १ ॥ ध्रु ॥
मी ज्ञायिन तया वो ! मंदिरा; भेटइन श्रीदत्ता माहेरा.
विषयो मी न भजे दुसरा. अर्थभोगु न साहे शरीरा. ॥ छ ॥
चंदन-पोळी, वो ! चांदिणे, न रुचती मधुरें गायनें.
दीपें दीपां लागलीं दूषणें. दिगंबरीं रंगलें ज्ञाणणें. ॥ २ ॥

(२१३)

डोळाचें मीं काढीन देखणें. दृश्य सर्व हाणेन गगनें.
प्राणेसीं वो ! न करी साजणें. देह माझें नेलें वो ! कवणें ? ॥ १ ॥ ध्रु ॥
मि पाहिन नयनें—वाचुनी मीपण आंगिचें फेडुनी.
शब्दब्रह्म नावंडे श्रवणीं. गानि माझा नेणती करुणी. ॥ छ ॥
गगन गीळिलें गगनें. गणो नये ज्ञाणिवा ज्ञाणणें.
गुणीं गुण ग्रासिलें अगुणें. दिगंबर महिम्न येसणें. ॥ २ ॥

(२१४)

श्रवणें भेदलें अंतर. नयन वो ! ज्ञाहाले तत्पर.
दृश्य तेथें निमाले गोचर. काय नेणों ज्ञाहालें शरीर ? ॥ १ ॥ धृ ॥
पाहीन प्रपंचु नयनीं. लावा कां वो ! सुमनें गगनीं !
वंध्यापुत्रु भेटवा साजणीं ! मृगजळ भरा कां रांज़णीं ! ॥ छ ॥
मीपण निमालें बोलणें. मन माझें हरिलें अगुणें,
चैतन्य, अचैत्य, चेतनें. दिगंबरीं तन्मय असणें. ॥ २ ॥

(२१५)

मनीं मन मानस माळवे. आपपर नेणवे, नेणवे.
मीपण असोनि नाठवे. अतःपर कैसें वो बोलवे ? ॥ १ ॥ धृ ॥
मी सांडिन लौकीकु येथूनी. अवघृतीं ज्ञाली वो ! मीळणी.
प्रपंचु नाइकें श्रवणी. गुणीं गुणें गुंपलीं अगुणीं. ॥ छ ॥
नेणपण निमालें जाणणें. ठायें ठाउ मी मज़ भोगणें.
हा ही बोलु न साहे बोलणें. ऐसें दिगंबराचें करणें ! ॥ २ ॥

(२१६)

श्रवणीं आनंदु माये. नयनीं तो कैसा पाहे ?
आणितां गुणासि न ये आत्मा वो ! माझा सैये ! ॥ १ ॥ धृ ॥
काये मी करूं वो ! आतां ? मन वेधलें श्रीदत्ता.
वय सरली सरीता अर्थ काम हे ध्यातां ध्यातां. ॥ छ ॥
अरि मीत्रसम ज्ञाले. देह हें निदाना आले.
दिगंबरु कवणे काळें देखतील हे माझे डोळे? ॥ २ ॥

(२१७)

गुणी गुपलें चैतन्य. विसरलें पाप पुण्य.
लागलें वो ! याचें ध्यान. न करी तें देही स्थान. ॥ १ ॥ धृ ॥
अक्षुणी न ये, वो ! न ये, आत्मा. मीं करूं काये ?
जाणवा तयाची सोये. पाहिन नयनीं पाये. ॥ छ ॥
धर्मु नेघती नयन बिरता हे माझें मन.
अति प्रीती, येकपण, दिगंबरीं समाधान. ॥ २ ॥

(२१८)

रूप नाहीं; कैसी पाहों ? निरालंबीं केवि राहो ?
जीवहानि जीवीं साहे. फेडा का वो ! हा संदेहो. ॥ १ ॥ धृ ॥
वेधलें माझें वो ! मन. न कळे ययाचें ध्यान.
गुणी गुणीक बोधन. न सरे ते ज़ाले क्षीण. ॥ छ ॥
भेदु नाहीं; भज़ों कैसी ? भान न साहे ययासी.
दिगंबरु हा सर्व--देशी. भज़तां भेदूचि ग्रासी. ॥ २ ॥

(२१९)

न करीं मीं येरवारा. श्रमु ज़ाला जी माहेरा.
मायेवापु तूं दातारा ! आनु नेणें मीं दूसरा. ॥ १ ॥ धृ ॥
वय गेलें; वाये शीण. नलगेचि तुझें ध्यान.
श्रमभूत माझें मन. योगु नेणें मीं साधन. ॥ छ ॥
पाये पाहिन नयनीं; रूप तुझें नीडाळूनी;
दिगंबरा सत्य मानी. न करीं आणीक करणी. ॥ २ ॥

(२२०)

जन--वन-- भान-- माया, धनद--स्वजन--जाया,
करण--कारण--क्रीया, दूरी करी योगिराया. ॥ १ ॥ धृ ॥
का दुःखाचें करिसी ? माझें मातें न दवीसी ?
आत्मया कें लपसी ? अवघेंचि तूं अवघा होसी. ॥ छ ॥
सांडूं तरि कैसें काये ? धरूं ते तरि कोठें आहे ?
दिगंबरा ! नेणें सोये. करणें तें वायां ज़ाये. ॥ २ ॥

(२२१)

[गौडी दाक्षिण साळ]

सासू, मासुरें, दूरदेसु, दुःखद माये !
वापु, सद्गुरू, अवधूतु, कैसेनि पाहें ?
आठवे वो ! प्रतिक्षणीं: मज़ वियोगून न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
एकदां तऱ्हीं येउनि मुख दाखवावें; श्रीमुख मज़ दाखवावें;
ते मुख मज़ दाखवावें; स्वमुख मज़ दाखवावें. ॥ छ ॥
काम--क्रोध--द्वेषादिक न वाधक माये !

आशा मन माया मज़ तोडिती सोये.
दिगंबरा ! तुज़विण मज़ माझें कोण आहे ? ॥ २ ॥

(२२२)

बोलू बोलतां, नेणों, काये कठीण ज़ालें ?
ऐसें दूरदेशीं कां मज़ सांगे, दीधलें ?
बोलवितां न बोलसी; ऐसें म्या वो ! काये केले ? ॥ १ ॥ धृ ॥
माये ! तरी तें मन कैसें वो ! धरावें ? तुझें मन कां वो ! धरावें ?
आह्मी मन कां वो ! धरावें ? तें मन कैसें वो ! धरावें ? ॥ छ ॥
प्राणू देयीन; तुज़विण न सवे माये !
कंठ दाटला; नयनीं जळपूरू वाहे.
दिगंबरे ! तूतें कळवळ कैसी न ये ? ॥ २ ॥

(२२३)

धिग्य जीणे हें ! बहु दिन ज़ाले गे ! माये !
भेटी न दीसे ! पुढें तऱ्ही करूं मीं काये ?
कंठू दाटला; माझें हियें फूटताहे. ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं ? कां मज़ केलें वो ! निदान ?
माये ! मज़ केलें वो ! निदान ?
तुवां कां केलें वो ! निदान ? ॥ छ ॥
बापुमाये तूं; तुज़विण कोण्हीचि नाहीं.
जन पारिखे; याप्रति बोलोंनि कायी ?
दिंगंबरे ! येकुवेळ येईं; भेटी देयीं. ॥ २ ॥

(२२४)

सप्तसागर क्षितितळगतजळ माये !
ने घे चातकु; गगन विचरतु आहे.
तैसा सद्गुरूराया ! तुझी वास पाहे. ॥ १ ॥ धृ ॥
मेघू तूं; तरी जीवन माझें मज़ देयीं:
तें मुख ० ॥ तें पद० ॥
अमृत माझें मज़ देयीं ० ॥ छ ॥
काळें वोळळा जळधरू अगणीत धारा;

तैसा सद्गुरूराया पाव येक सरा.
दिगंबरा ! तुजवीण मज नाहीं रे ! दूसरा. ॥ २ ॥

(२२५)

शब्द श्रवणीं खरतर लागती बाण.
रूप नयनी तुजवीण तैसेंचि आन.
पोळी, चांदणें चंपकु नावडे सुमन. ॥ १ ॥ धृ ॥
हें मीपण मारूनी मज भेटि देयीं;
आतां भेटि देयीं;
मारूनी मज भेटि देयीं. ॥ छ ॥
धन यौवन जन जनवन करूं मीं काये ?
आत्मा श्रीदत्तु पाहिन हृदयीं माये !
दिगंबरेंवीण माझें मनस न राहे. ॥ २ ॥

(२२६)

योगीं न थेर; मन माझें चंचळ; माये !
आत्मा श्रीदत्तु ज़ाणोंनि तेथेंचि राहे.
नुमज़े वो ! गुणमति ! आंगिं मनत्व न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
तु मी; तरी साधन कवणें करावें ?
मनन, प्रलपन, मनक्षीण, साधन. ॥ छ ॥
ध्यानधारणा, जपु, मज़ नावडे; माये !
ज्ञानविज्ञानप्रलपन तेंही न साहे.
दिगंबरा ! आत्मा तुं; तरि पुरे; येर काय ? ॥ २ ॥

(२२७)

कार्य ज़ाहालें; आतां येथें राहोनि काई ?
दत्ता ! स्वपुराप्रति मज़ घेउनि ज़ायीं.
पाहीन मी तुझें रूप; येकुवेळ भेटि देयीं. ॥ १ ॥ धृ ॥
तो मी; तरी तें पद माझें मज़ द्यावें.
दासत्व०; शिवपदें०;
तें पद माझें मज़ द्यावें. ॥ छ ॥
कैसा भेटसी अंग ! मज़ निदान काळीं ?

रूप सावळें पाहिन मी अती ज़वळी.
दिगंबरा ! कवळिन तुज़ हृदयकमळीं. ॥ २ ॥

(२२८)

नित्य करितां गुणश्रवण आनंदली आनंदकंदें.
बाइ--ये वो ! सखिये वो ! ॥ ० ॥
अपपर हे ठेली वासना;
अनुरंजनें छेदली द्वंद्वें; माझी वो ! ॥०॥ माये वो ! ॥०॥
येणे जाणें हें; विकुंठली अविकारिता;
गृटली भेदें; येणे वो ! ॥ ० ॥ त्रीवीधें ! ॥ ० ॥
गुणीं गुंपले माये मानस परतेचिना वीषयबोधें. ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं? संसारिं कीं मन माझें वो !
काज़ासी नये, बाईये वो ! गोरिये वो !
क्रीया न कळे मज़ केवळ संदर्शन--रूप वो ! माये ! हा वो !
शब्दसुख वो दुःखदायक. संबोधनें
खेदूचि होये. अचळकरण मज़ राहिलें,
वींचेतन करणें काये ? ॥ छ ॥
नित्य करितां रूपसेवन संकोचली
मती वो माझी. गुणीं अगुणगुण आटले.
संस्पंदने, माजीची माजी. चेत्य चेतन.
येक रसलें. तेथें कुंठली भावना दूजी.
दिगंबरीं भेदु मालवे; दीपकळिका ज़ैसी वो ! तेजीं. ॥ २ ॥
वाट पाहतां दीन लागले; सादु वालीन; येइ वो ! माये !
नयन सजळ जळधर हें संभ्रमती; वींनउं काये ?
शब्दु न फुटे; हियें दाटलें; आक्रंदनें मोकली धाये.
देह पडले श्राणवार्गीं; वो ! कयी बोळसी ? श्रमती आहे. ॥ १ ॥ धृ ॥
चांदु--चंदनें माये ! चंपक--चेतनें मूळीं लागती बाण.
श्रमु श्रवणीं; सुखकर ही अनुरंजन नेघे वो ! मन.
जन, स्वजन, वन, वेंसिये, भवन, धनद, कनक, आन
तुज़वांचुनि पढिये ना; वो ! काये पाहासी ? वेचती प्राण. ॥ छ ॥

प्राणेंसीं मज्ञ वैर पडलें; काळ काळ जें आंतीं हें व्याळ.
माझी मज्ञ हे बाधी कामना; कर्मकल्पना दुःखासीं मूळ.
स्वगुण--करण--गण पारिखे; पापास्तव ज़ाहाले काळ.
दिगंबरा ! मन माझें मीनु हा; तया पडलें प्रपंच जाळ. ॥ २ ॥

(२२९)

लक्ष ठेउँनि तव चरणी म्या सांडिली सकळ चिंता.
मन सगुणगुणी गोविलें; अवधूता रे ! ते नेघे आतां.
हृदयकमळ तुझें मंदिर, नित्य राहातें, मानलें चित्ता.
चाड न दिसे येर साधनें; योग--सेवया होयील वेथा. ॥ १ ॥ धृ ॥
दुःख--दुःखददोष--दमना ! दमु आवडे ऐसा हा मातें.
सकळ वीषय मनीं नाठवीं रूप सावळें धरूनि चित्तें.
योगविरुद्ध जनी होयील; तरि हो सुखें नमनो तूतें.
मन मातलें माये ! आवडी; काये करणें येणेंची पंथे ? ॥ छ ॥
देह देउंनी भक्ति घेइन; आत्मया रे ! तुं माझें धन.
रात्रि दिवसु तुतें आठवीं, हेंचि मागणें; नेघे मी ज्ञान.
येणें अवेदनें मुक्ति पाहिज़े; प्रेमसागरीं बुडो हें मन.
दिगंबरा ! निजसुखसागरा ! कां दुरावीसी ? कळली खूण. ॥ २ ॥

(२३०)

विकारी, चंचळ, मन भारी विषयपर,
न धरी परति माये ! सीणली मी फार. ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं ? गेले वय विफळचि, माये !
सांग कैसेनि ज़ोडती मज्ञ अवधूते पाये ? ॥ छ ॥
संगु घडला बाधकु वैरभावें.
न सूटे मज्ञ; निवारी कवण माझें समळ केवळ ?
भेटवा माउली माझी देउ॰ दिगंबरु.
बहु वो ! श्रमला; आतां न करावा उसीरु. ॥ २ ॥

(२३१)

आतां तया न सोडीं येथून; ॥ ० ॥
न सोडीं; न सोडीं येथून.

बहु श्रमीत ज़ालें मन. अवधूतरायाचे चरण,
हे चरण, मी नविसंबे. ॥ १ ॥ धृ ॥
माये ! मी वो ! ज़ाइन येकली.
वो ! तया रातली.
पंकजनयनें हरीली मती. नावडे तो विण येर चित्तीं.
आतां मी नयें मागुती. बहुदिन तुटी पडली होती. ॥ छ ॥
तपस ज़ाहालें सुफळ. रूप सावळें देखिलें माये !
श्री दिगंबरा यया वांचून दैवत आन न भजें मी वो ! ॥ २ ॥

(२३२)

आतां तया धरि ज़ा धावोन. अतिक्षिण ज़ाले नयन.
सद्गुरुरायाचें ध्यान, तें ध्यान, तें ध्यान करी हे मन. ॥ १ ॥ धृ ॥
मी पाहिन नयनी त्या वो प्रिया साज़णी !
विकळपणें न धरे धीरु. त्यावींण मी वो न मनीं परु.
आतां मी तेणेंवाचूंन श्रमद हें साधन न करी आन. ॥ छ ॥
दिगंबरु आला वो धावोन, भुजा साहि पसरुनि,
सुरपती वोळगोनि, हा वोळगोनी वोळला. ॥ २ ॥

(२३३)

(गौडी)

अगुणीं गुणु माये ! कैसी मी धरूं ?
आत्मा निगुर्णु; ध्यान कैसें मी करूं ? ॥ १ ॥ धृ ॥
त्रिविध भेदु माझा हरला गे ! माये !
स्वरूपें स्वरूप सिद्ध नीवळत आहे. ॥ छ ॥
स्वजन जन सर्व बीज न माये.
मननाची वृत्ति मन न साहे. ॥ २ ॥
चंचळ मन माये ! नीश्चळ ज़ालें.
अवस्था-जनीत-भान नाशोंनि गेलें. ॥ ३ ॥
दिगंबरु अवृत्ती मी मज़ पाहें.
पाहातां पाहातेपण पाहाणें न साहे. ॥ ४ ॥

(२३४)

मनन्नीं मनन मन मेरें निमालें.
मंत्रसाधन मज़ कांहीं न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
आपुली खूण मि व्रो ! आपण ज़ाणें.
नेणती नेणती मज़ ह्मण तु अज्ञानें. ॥ छ ॥
आपुलें पारिखें मज़ कांहींचि नाहीं.
सांडणें मांडणें तें न करीं मीं कांहीं. ॥ २ ॥
योग सेवा मज़ न कळे गे ! माये !
अवस्थारहित सहज़चि आहे. ॥ ३ ॥
शास्त्रश्रवणीं हा वो ! भाऊँ न राहे.
दिगंबरु कळे तया कळणें न साहे. ॥ ४ ॥

(२३५)

आपुली तूटि मी वो ! आपण साहें.
मींचि पारिखें आंगीं मज़ मी न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! वो ! काये पुससील खूण ?
शून्य उडालें, तेथें माझें पूर्णपण. ॥ छ ॥
अपरमीत ते मी कासेन धरूं ?
धरणें, सोडणें तेथें कुंठला वीचारू. ॥ २ ॥
सगुण ह्मणो कीं मी वो ! निर्गूण माये !
गुणेंसीं सहीत गुणकरण न साहे. ॥ ३ ॥
आत्मा निर्गुणु मायेचे न साक्षी.
दिगंबरु अवृत्ती मज़ मीचि लक्षी. ॥ ४ ॥

(२३६)

चंचळ हें मन कैसेनि धरूं ?
सकळ साधन नेणें; न कळे आधारू. ॥ १ ॥ धृ ॥
सद्गुरू मज़ भेटवा वो ! माये !
सकळ साधन मज़ ययाचे पाये. ॥ छ ॥
विषयकामभ्रमें चित्त विकारी.
हित स्वहित तें कांहीं न विचारी. ॥ २ ॥

लक्षलाभु तो ही काये मीं करूं ?
भवसागरीं येणें पविजे पारू. ॥ ३ ॥
स्वप्नधन मृषा प्रपंचभान.
दिगंबरु सखिये ! सत्य निधान. ॥ ४ ॥

(२३७)

येणेंसीं दूरिपण; कैसें मीं धरूं ?
जीवीं जिवनु दत्तु; प्राणा आधारू. ॥ १ ॥ धृ ॥
हें माझेपण सांडीन माये !
पाये पाहीन; भेदू तेणेंसीं न साहे. ॥ छ ॥
येणेंसीं येकपण कैसें मीं साधूं ?
साध्यसाधनवृत्तिविळयें अभेदु. ॥ २ ॥
कैसा हा ? भक्ति भाउ भजन करूं.
आत्मा विषयो नव्हे; न पवें मी पारू. ॥ ३ ॥
गुणीकवर्म तें बो ! यया न साहे.
दिगंबरु गुणहीनु आपणूचि आहे. ॥ ४ ॥

(२३८)

योगियांचें योगधन; ज्ञेय ज्ञानीयांचें ज्ञान; ॥ १ ॥ धृ ॥
रे ! आत्मयां ! दत्तात्रेया ! न कळे हे तुझी माया. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं चिन्मात्र. नाहीं तुजहुनि पर. ॥ २ ॥

(२३९)

सकळही मृषाभान. परब्रह्म तूं सगूण. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! आत्मयां ! दत्तराया ! सन्मयी तुझी काया. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझांठायीं दृश्य निमालें सर्वही. ॥ २ ॥

(२४०)

अनुमानें व्यक्ति न ये. उपमानातें न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! अवधूता ! तुझें रूप परब्रह्म विर्विकल्प. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं अमेय, शिवरूप, सुखमय. ॥ २ ॥

(२४१)

भक्तजन—कामधेनू अवधूतु हा सगूणु. ॥ १ ॥ धृ ॥

वो ! माहेर माझे माये ! वाट पाहे; कां पां ! नये ? ॥ छ ॥
दिगंबरु दीनत्राता कयी पाहिन मी येतां. ॥ २ ॥

(२४२)

भक्तजन—चिंतामणी अवधूता तूं जननी. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! चिंतनीं ध्यानीं मनीं आठवेसी अंतःकरणीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! (तुझी आण) आन नेणें तूजवीण. ॥ २ ॥

(२४३)

परब्रह्म सुखसार ! मनबुद्धी—अगोचर ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! कमळनयनरूप ! ज्ञेय सानले स्वरूप. ॥ छ ॥
दिगंबर दिव्यमान अहंमतीचें कारण. ॥ २ ॥

(२४४)

जनजाया चिदव्यया ! दृश्य दिसे तें पैं माया. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! आत्मयां ! भेदहीन केवि भजें मी निर्गुण ? ॥ छ ॥
दिगंवरा ! तूं मीं ब्रह्म; तेथ कैंचें रूप नाम ? ॥ २ ॥

(२४५)

मिसळले गुणी गुण. रूपीं निमालें हें मन. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! अवधूता ! केवि स्मरें ? तुज कैसेनी वीसरें ? ॥ छ ॥
दिगंवरा ! तुझां ठायीं मीतूंपणस्फूर्ति नाहीं. ॥ २ ॥

(२४६)

जपुतप तीर्थाटण माझें हेंचि ब्रह्मज्ञान. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! अवधूता ! तुझें ध्यान माझें सकळ साधन. ॥ छ ॥
योग यज्ञ दान क्रीया दिगंबरेंवीण वाया. ॥ २ ॥

(२४७)

मन माया, मन पर, मन निज निर्विकार. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मना ! तूझें करणें गुण—मती तें मी नेणें. ॥ छ ॥
दिगंवरीं माया मन, हेंही मनें कळे खूण. ॥ २ ॥

(२४८)

निंदा मुक्तामनें बंधू. मनें बंधन विछेदु. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मना ! तूंचि सर्व. नाहीं तूतें पूर्वापूर्व. ॥ छ ॥

दिगंबरीं मन क्षर. सेष मनचि अक्षर. ॥ २ ॥

(२४९)

लय लक्षमान मृषा. वृत्तिरंजन मनसा. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मन्ना ! तूंचि पर सुखमय चिद्विसार. ॥ छ ॥
दिगंबरीं मने मोक्षु. मनें घेतला तो पक्षु. ॥ २ ॥

(२५०)

मन माझें नये आया रूपीं तुझां योगिराया ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मन्नाचें तूं बीज सत्य स्वरूप सहज़. ॥ छ ॥
दिगंबरिं आटे मन; तरि चुके संसरण. ॥ २ ॥

(२५१)

मनें घ्येला तोचि योगु. मनें मानिला तो भोगु. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मन्ना ! तूझें करणें ! काये करिसी ? मी नेणें. ॥ छ ॥
देव भक्त मनें केलें. दिगंबरु मन ज़ालें. ॥ २ ॥

(२५२)

ध्यानीं, मनीं, सूचिंतनीं, आठवसी प्रतिक्षणीं. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! आत्मयां ! योगिराया ! आदिगुरो ! दत्तात्रया ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें ध्यान करी अवस्था भेदूंन. ॥ २ ॥

(२५३)

ह्रदईं काम ना क्रोधु असंवरू; संन्यासु तोवरि काई ?
वाक्यविचारणा; प्रणवाचा जपु; निष्ठेसि ठावोचि नाहीं !
दंड, कमंडलु, पादुका, काशाय वस्त्र, पवित्रसे देहीं.
अंतरीची खूण न कळे; प्राणियां ! न सुधी बोंडिकी डोई ! ॥ १ ॥धृ॥
ऐसे चूकलें रे ! चूकलें रे ! वेषूचि दाविती देहीं !
सद्गुरूवांचूंनि ज्ञान नाहीं; पुढें विश्रांति ते तेथ कायी ? ॥ छ ॥
शास्त्रवादें बहू बोलती सैराट; भक्षिती गोमुखें अन्न !
अंतरीचा क्रोधु; बाह्य तें वैराग्य; मध्यभागीं तपे मन !
निविज़े तेथ तो उपाऊ न दिसे; व्यर्थ मायीक ध्यान !
दिगंबरेंवीण चूकले प्राणिये; न कळे तत्त्व निर्वाण ! ॥ २

(२९४)

हृदयीं कौटिल्य, संतापु सर्वदा; कासया चाळिसी मणी ?
ग्राम्य जल्पीं मन नित्य रंगलें; उठती तरंग ध्यानीं !
आसनाच्या बंधु; गोमुखें.गवाळीं मांडूनिचि दाविजे जनीं !
मन पिसाळलें दशदीशा भ्रमे; आइके वार्ता कानीं ! ॥१ ॥ धृ ॥
ऐसे चूकले रे ! चूकले रे ! दंभु विस्तारिती जन !
सद्गुरूवांचूनि वर्मचि न कळे; कायिसे योगसाधन ? ॥ छ ॥
स्वप्न कां सुषुप्ती, दोनीचि अवस्था; श्रवणीं तीसरी नाहीं.
पिंडु पडो; परि पराते न धरि; ऐसिया सांगणें कायी ?
वीष घोटे; परि स्वहित न गिळे; विश्रांति मानिलि देहीं !
दिगंबरा ! जन चूकलें सर्वथा; सत्य तें तुझांचि ठायीं ! ॥ २ ॥

(२९५)

शिष्यपरिग्रहें आगळे; त्यावरि काव्य कुशलता देहीं !
शांति निवृत्ति तो वेषचि दावीती; हृदयीं कांहींचि नाहीं !
दानयुक्ती जन मोहिती सर्वथा; गुरुत्व तें तेथ कायी ?
धन मान मद अन्वीत प्राणिये; संसारु न तुटे तेही ! ॥ १ ॥ धृ ॥
ऐसे मोहक रे ! मोहक रे ! मोहिती जन जनाते !
उद्यमा माझारीं हा येकु; यापरी नलगे मानु साधुतें ! ॥ छ ॥
वरि इंद्रावण सुंदर साजिरें, अंतरीं तें काळकूट !
तैसाचि बाहिजू रमणीयू ; परि मन नव्हे चोखट !
ज्ञान वां कर्मसें मध्येंचि नाशिती, कर्पूर जेवि मर्कट !
दिगंबरेंवीण सत्य तें न कळे; कायिसी ते खटपट ? ॥ २ ॥

(२९६)

नामसंकीर्तनीं टाळिया वादितां; करिती प्रेमनर्त्तन.
आसक्त ज्ञाहाले सद्गुरूस्मरणीं; लागलें तद्‌ग ध्यान.
निर्लज्ज मानस; मति प्रकाशली; गर्जती भक्त सज्जन.
सर्व असो ते निदंभचि नाडलें; दीवसा पडले खान. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसे चूकले रे ! चूकले रे ! चूकले पासूनि जन !
मानवांचीं मुखें पाहाती प्राणिये; काये देती तया जन ? ॥ छ ॥

सुमनाची सेज़ खरासि ! कासया चंदन मर्दिज़े आंगीं ?
कर्पूराची राशी शूकरा देयिज़े; तो काये तेथिचा भोगी ?
नाम हें अमृत वीषयीं; कां तेंवि अर्पिज़े दंभाचिलागी ?
दिगंबरेवीण मायीक सकळ श्रमु; तो श्रमु दे जगीं. ॥ २ ॥

(२५७)

जनन जन्म भूली, दुःखाची सरिता भज़तां उसंत नाहीं.
विषयभोगु भ्रमु भ्रांति खलुता चिंता झगटे हृदयीं.
मीं माझेंपण बंधन दृढ गा ! वाउगा तो संदु देहीं.
देहचि सांडूंनि ज़ाणें निदानीं मग ते कवणाचें काई ? ॥ १ ॥ धृ ॥
ऐसी जनभूलि रे ! जनभूलि रे ! जनभूलि जनासि ज़ाली !
मोक्षु ना संसारू, मध्येंचि भ्रमतांहे; ना ते गति ज़ाली. ॥ छ ॥
सदन, धन, जाया, जननी, कनक, कानक, भज़तासी ?
प्रतिदेही विपरीत नानाविध ते मोहक ज़ाण मनासी.
आपुलें हीत तुतें कांहींचिं न कळे; कवण होइल गति कैसी ?
दिगंबराप्रति वेगीं रिघ कां शरण; जना ! खुण परियेसीं ? ॥ २ ॥

(२५८)

तुझें चि तुज़ कांहीं न कळे; बापा ! सिकवण ते कित्ती काई ?
चंचळपणा सर्व सांडूंनि न राहातां निवसी ठायिंचा ठायीं.
आप ज़ाणोनियां परतें विसरें; तुज़हूंनि कांहींचि नाहीं.
परमतत्व परब्रह्म तुं; देह–दीनत्व सांडूंनि देयीं. ॥ १ ॥ धृ ॥
जना ! तव हित रे ! तव हित रे ! तव हित तूज़चि पासी.
कर्पुरु ढिवळें करूंनि इंधन कुळथि कां पचितासि ? ॥ छ ॥
जिवन–हीन वन निर्जन भ्रमतां मन तें संतोषु मानी.
चंचळ हें मन विलुवरि; स्वमनी दुःखचि तेथ न मनी.
एकांतु ह्मणतां नामचि नाइके; निद्रा पावे अवसानीं.
दिगंबरें–विण सुनाट हें मन श्रमे जन्म मरणीं. ॥ २ ॥

(२५९)

दुर्लभ हें मन मानव्य; मनुजा ! पळ, पळ, ज़ातसे वायां.
कवण हीत तुझें करील साधन ! तळमळ करिसी काह्या ?

स्वजन, धन, जन, यौवन, पाहासी; सर, सर. हे सर्व माया.
कर्पुरु सांडुनि शूकरु जैसा मळ पंकु पाहिजे तया. ॥ १ ॥ ध्रु ॥
मना ! भव–तम रे ! भव–तम रे ! भव–तम ऐसें आहे.
देखोनियां दीपु पतंगु झडपी; ऐसिया करणें काये ? ॥ छ ॥
दुर्लभ हा गुरु–संगु मनुजा ! भाग्यें वर–पडि जाली.
हातिचें निधान तुझचि देखता जाइल; मानस घाली.
गेलियांवरि मग कवींचि नलगे; तळमळ तेचि उरली.
दिगंबरेंविण न घडे सुटिका; आइके, हें सत्य बोली. ॥ २ ॥

(२५९)

विवर्त्त–मृगजळ–चंचळ–सरिरा धरितां काहिंचि नाहीं.
स्वप्न विषय सुख सरला भोगुंनि; संतोषु तेणें कायी ?
इंद्रजाल सर्व समान लटिकें जाणती सर्वज्ञ देहीं.
अवस्था जनित भान तैसेंचि; मनुजा ! आप विचारूनि पाहीं. ॥ १ ॥ ध्रु ॥
निर्मळ रे ! निर्मळ रे ! निर्मळ गगनाकार.
विविध–भेद–विरहीत भजिजे ब्रह्म शुद्ध अक्षर रेया ! ॥ छ ॥
कमळणीदळ–गतजळ–चंचल तें कळतां मानचि नाहीं.
घटिकायंत्री द्रवतें पाणी; निदान तयाचें कायी ?
तैसें हें मानव्य दैवज चपळ; प्रेत्नु न करिसी काहीं ?
दिगंबरा–प्रति जाउनि पुस खुण; सांपडेल हृदयीं रे ! ॥ २ ॥

(२६०)

मृगमद परिमळ, चंदन, लसना. लेपुनि काजचि नाहीं.
धृत, मधु, पय, रसु, योगा न मिळे; निम्ब–बीज हृदयीं.
तैसे जन मन–मळ–खळ भजती; परगुणु नेघति देहीं.
सद्गुरूही परि पुरे ह्मणती; हीत न संगति काहीं रे ! ॥ १ ॥ ध्रु ॥
आतां, निदान रे ! निदान रे ! नरदेह गेलें वाया.
साहींचि पाहे, तया कित्ती मुंडन ? काय करणें ? देवराया ! ॥ छ ॥
तेचि दिसे; परि सरिता वाहे; धर धर वाहे पाणी.
जन धन भजतां निदान आलें; संचरलें तव गुणीं.
घनगुणें घन–वदु शब्दही नाइकें; न दिसे रूप नयनी.

दिगंबराप्रति शरण रिघ पां! शरण पडलें देह-मरणीं. ॥ २ ॥

(२६१)

चंद्र बो! चांदिणे चंदन आंगी न साहे.
वियोग-तापु तपे; तापया तापनु सुमन सेज; करूं काये? ॥ १ ॥ ध्रु ॥
सखिये! सावळया! सुंदरा! वेधलें माझें मन वो!
गुंपलें अंतःकरण देह गेह सुख सांडुनि सर्वही लागलें अखंड ध्यान ॥ छ ॥
दीपक निर्दीप; गायन ग्वोंचती बाण वो! शब्द खरतर बाण!
दिगंबरेंविण शरीर आपुलें सांडीन, हें मीपण. ॥ २ ॥

(२६२)

परवशा डोळुलयां! स्पंदन करिसील काह्या रे!
उद्बोधु करिसील काह्या रे!
मायेबापु दूरदेशीं स्वजन; सांडियेलि तेहीं माया. ॥ १ ॥ धृ ॥
बाइ-ये! मन माझें उन्मळलें. तदंग लागले ध्यान वो! तन्मय जालें वेदन.
कृष्णरूप निरजाकृत लोचन कइ कयी पाहीन? ॥ छ ॥
देखियेला दूरूनि; पालटु ज़ाला हृदयीं वो! संतोषु वाटे देहीं!
दिगंबरु परमात्मा सखिये! आळंगीन दोहीं बाहीं. ॥ २ ॥

(२६३)

पालऊ न सोडीं; येयिन मी तुज़सवें रे! येईन मीं सवें, सवें!
मायेबापु तूं दत्तात्रिया; सांपडलासि देवें. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कठीण न करावें. पाये मीं साडीन केसीं रे! चरण छाडीन कैसीं?
अवधूता! मीं बाळक धाकुलें; सांडूनि कैसा ज़ासी? ॥ छ ॥
मन माझें परतेना. करीन येथें निदान रें! करीन मीं निर्वाण!
दिगंबरु तूं आत्मा सगुणु; माझे पांचही प्राण. ॥ २ ॥

(२६४)

पाडसा! चूकलियां कुरंगिणी वन पाहे रे! हरिणी वन भ्रमताहे! ॥ ० ॥
वत्सालागिं वन सांडुनिया धेनु धावतीसे लवलाहें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा कें यसी मज़लागी? उचलूनि च्यान्हीं भुजा रे! पसरूनि साही भुजा.
अवधूता! माझी माये तूं; जरि न धरीज़ो भावो दूज़ा. ॥ छ ॥
चांचु वा कण वेंची; पिलया पक्षिणी धांवे रे! चारा घेऊंनि धांवे.

दिगंबरा ! मी पोटिचें बाळक; स्नेह कवणें लावावें ? ॥ २ ॥

(२६५)

करुणामृत धारा झरझर झरती निसारा रे ! द्रवती सैरांबरा ! ॥ ० ॥
सद्गुरु–मेघ वोळला; हृदयीं वीराली तेथ धरा. ॥ १ ॥ धृ ॥
सखिये ! मन माझें वीरालें. देहासि ठावोचि नाहीं वो !
दृश्य तें काहींचि नाहीं. आदि–अंत--मध्य--वीहिन केवळ
मीचि मी तत्व अदेहीं. ॥ छ ॥
जाणपणें सूटलिये; गुणगण अगुणीं विराले वो ! ॥ १ ॥
गुणगण ब्रह्मचि ज़ालें. दिगंबरें माझें हरिलें
मीपण. कळतांचि कांहीं न कळे. ॥ २ ॥

(२६६)

अवधूतु आत्मा गुणतंतु माये !
सखिया बोलती काये ययाला ? ॥ १ ॥ धृ ॥
प्राणु देयीज़े मनधी, ययाला, ययाला. ॥ छ ॥
अवृत्ती पाहे. गुणवंतु नोहे. ज़ाणपण आंगीं न साहे ययाला.
दिगंबरु माये ! गुज़रीतु आहे. विसरलें मी मज़ सेये. ॥ २ ॥

(२६७)

स्पर्शसुख माये ! अगणीत आहे.
हृदयीं भेदु न साहे ययाला. ॥ १ ॥ धृ ॥
बाहीं धरूनि कवळा, ययाला, ययाला. ॥ छ ॥
अभिनव माये ! बाळक पाहे; रूपीं रूप सर्व समाये.
ययाला. दिगंबरु आत्मा ज़ाणीतली खूण.
द्वैतमती येणें न राहे ययाला. ॥ २ ॥

(२६८)

रूपीं चित्त माये ! अनिवड होये.
ज़ालिया परति न साहे तयाला. ॥ १ ॥ धृ ॥
स्वजन वीजन नावडे, तयाला, तयाला. ॥ छ ॥
गुणस्पंदु राहे, ऐसें मी न पाहे. चित्त दुश्चित्त. करूं काये ययाला ?
दिगंबरु देहीं देहसीं अदेहीं. विरे मन; परति न साहे तयाळा. ॥ २ ॥

(२६९)

अर्थसुख माये ! क्लेशकर आहे.
विषयीं चित्त न साहे तयाला. ॥ १ ॥ धृ ॥
धनें स्वजनें वेदना, तयाला, तयाला. ॥ छ ॥
क्रियाबीज होयें; अर्थु मीं न पाहें. मनस विकृति वेत आहे तयाला.
दिगंबर मायेवीण न राहे. लागली मी माजि सोयें ययाला. ॥ २ ॥

(२७०)

सर्व सुखदाता सद्गुरुमाये हृदयीं केवि स्थीरु होये ? बाइये ! ॥ १ ॥
न्नळे चंचळ मनस, बाइये ! बाइये ! ॥ छ ॥
दिगंबर तत्व चित्सुखमान तुरीयाँ भेदूंनि पाहें; बाइये ! ॥ २ ॥

गौडी [चालि भिन्न]

(२७१)

गेलें वो ! माये ! क्षीण क्षणें पळ पळ.
मनुज शरीर सेतु, माये ! अर्थ भोगू करू काये ? ॥ १ ॥ धृ ॥
माये ! वो ! विकळ वो ! मन त्रिगुणी भृत हें. ॥ छ ॥
साधन पर चेतन देखैन हें कैं के ? नित्य लागैन ध्यान मज़ कै कै ?
दिगंबरु हा गुणगोचरु नव्हे; गुण मात्र रूप अगूण; माये वो ! ॥ २॥

(२७२)

विषयांची मति अति प्रीति; तळमळ करूंनि कवणि हेतु तेथें ?
योग भंगू बाधिताहे. ॥ १ ॥ धृ ॥
माये वो ! न कळे वो ! मन विकळ ज्ञातसे. ॥ छ ॥
श्रवणसुख सेवन साधन हें कै कै ? नित्य मनन भज़इन कै कै ?
दिगंबरु हा माये ! मी माजि देही श्रवणाश्रय रूप अगूण. ॥ २ ॥

(२७३)

न गणवे माये ! क्षिती–तळ–गत–जळ. पाहोनी कवण काज़ तेणें ?
अर्थु तोची मुख्य होये. ॥ १ ॥ धृ ॥
माये ! वो ! आपलें चेतन आपण लाहिज़े. ॥ छ ॥
श्रवण बहु साधन श्रमद तें हे हें. तत्व–वीषयीं गुणहीन है है.
दिगंबरु वो ! द्वैते–वांचूनि आहे.

न दिसे वो ! खूण अखूण माये ! वो ! ॥ २ ॥

(२७४)

सत्य–प्रिति, श्रवण, भजन, ते अनुश्रुत, तद्रूप मानस करीं. ॥१॥धृ॥
नये अनुमाना ज्ञाना परी. ॥ छ ॥
गुण–गण–सिद्धया ज्ञानें तळपति. करणें न जाति सरी. ॥ छ ॥
दिगंबर परब्रह्म न भजवे घेतांचि गुणवरि. ॥ २ ॥

(२७५)

दिनु गेला व्यापारें; निषा निद्राभरें; कांहीं मज्ञ येणेप्रकारें घडेचिना.
तुझें मुख मी आतां केवि पाहों ? श्री दत्ता !
करूनि करूनि वेचा, देईन प्राणु. ॥ १ ॥ धृ ॥
काये बोलों तन्हि; मीं निर्वाण. चंचळ माझें मन.
हितविषयीं वेदन स्फुरेचिना. ॥ छ ॥
काम, क्रोध मज्ञ भारी बाधिति ये संसारीं. मनसा मदमत्सरीं वेढाविलें.
दिगंबरा ! ज्ञाण, वरि आलें निर्वाण; आतां
तुज्ञविण आन नाहीं मातें. ॥ २ ॥

(२७६)

बाळपणें क्रीडणें; यौवन विषयध्यानें;
जरा अतिक्षीणपणें वेचली माझी.
येणें देहें, ज्ञाण, नटकेचि तुझें ध्यान;
काये करूं स्मरण ? वाटे शंका. ॥ १ ॥ धृ ॥
काये विनउं रे ! तुज्ञप्रति; पडली हे भवभ्रांति;
अतिविषयीं आसक्ति सुटेचिना. ॥ छ ॥
जन, धन, यौवन, जाया; भ्रमु ज्ञाला आत्मयां.
न घडे, ते ते क्रिया घडली मातें.
दिगंबरा ! ज्ञाण; वरि पडलें निर्वाण;
कंठीं ठेउनि प्राण स्मरण करीं. ॥ २ ॥

(२७७)

नरदेह वेचूंनि ज्ञोडिलें भवबंधन; दुर्गतिपतन सिद्ध केलें.
वेचूनि धन पीयूष; ज्ञोडीं भरिलें वीष;

मरमरपर अविनाश लागेचिना. ॥ १ ॥ ध्रु ॥
काये करी रे ! उपदेशु ! आपुला आंगी दोषु;
नरु मी नव्हे पशु जालों ! देवा ! ॥ छ ॥
दिवसाचि आंधारें, कामक्रोधवारें, श्रमताही व्यापारें, श्रमु न वटे.
दिगंबरा ! आतां किती करणें वेथा ?
तुजविण आतां त्राता दुसरा नाहीं. ॥ २ ॥ छ ॥

(२७८)

दिवसा अस्तमान हृदयीं पडलें खान;
नेलें माझें चिद्रत्न; काये करूं ?
बाहेरि ना अंतरीं गेलें कवणेपरी !
माये ! माझी मजवरि चोरी आली. ॥ १ ॥ ध्रु ॥
माये ! धरा वो ! हें मन माझें; नव्हते येथें दुजें; सारी
आली धनगुण धनकाजें; येणें नाशिलीं. ॥ छ ॥
गुरुमुद्रा रंगिली; असिद्धि कळसा नेली: समाधि विसंचिली येणें मनें.
दिगंबरा ! ज्ञाण: दिधलें तें तुज मन:
योगधन चिद्रत्न अवघेनसीं. ॥ २ ॥

(२७९)

किरणांचा अंतरीं जळ भासु भासला; तेथं हरणु पाणियां आला रे !
जळ वाऊ; परि आशा न तुटे; तोचि न्याऊ मज जाला रेया! ॥ १ ॥ ध्रु ॥
विषयीं मन भ्रमताहे. सत्य नेणें; परति न साहे माझें. ॥ छ ॥
दिपावरि पतंगु आपणूंचि पडिला. किं तो परवशु प्राणी गेला रे !
दिगंबर तैसा सावधु नव्हतां; मीं येकुं त्रायां गेला रेया ! ॥ २ ॥

(२८०)

विषाचा अरुवारीं सुखाची निद्रा; मरमर कारिसी गव्हारा रे !
सुख तोचि भ्रमु वृथा; मरण न भूल; या संसारा रेया ! ॥ १ ॥ ध्रु ॥
मन्ना परतोनि पाही. सुख पावसील तूं, ठाइचें ठाईं, आतां. ॥ छ ॥
कामाचेनि बोलें कां भ्रनासि मनसा ? सेषी कामुचि तुझा वैरीरे !
दिगंबराप्रति रिघ कां शरण: ब्रह्माची पावसी थोरी रेया ! ॥ २ ॥

(२८१)

बोला सारिखी करणी कांहींचि न दिसे ! कां बोलु बोलसी सेरा ! रे !
ज्ञानहीन परिबोल्के पक्षी न पवती तत्वनिर्द्धारा रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
आपआपणा पाही; खुण जाणोनि उगलाचि राहीं; बापा ! ॥ छ ॥
कर्दमरसें मातुले दर्दुर शब्द करिती ! कानु देउंनि तेथ कायी रे !
दिगंबरेवीण शास्त्राचे जाळ श्रमकर होये देहीं. ॥ २ ॥

(२८२)

बगाचा तपु काये मानितासी रे ! मना ? तया हृदयीं कुश्चिळ आहे रे !
देहीं ध्यान; मन विषयांचा ठायीं; नरु येकु ऐसाचि पाहे रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
हातीं सहज़ चाळा; मणि चाळितुसे जपमाळा; रे बापा ! ॥ छ ॥
मानसीक तेंचि केलें; येर अवघेंचि वावे. जपु ना समाप्ती रे !
दिगंबरा ! जन वायां गेलें; व्यर्थचि पडिले भ्रांतीं. ॥ २ ॥

(२८३)

विषाचां गुसळां अमृत निघालें. मना ! करि करि कां वर–पडी रे !
तसा संसारू मायीकु; भज़तां सद्गुरूची ज़ाली ज़ोडि रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
सावळें रूप डोळां मी पाहिन वेळोवेळा श्रीदत्तु. ॥ छ ॥
वारूळ खणतां निधान लागलें. साटवीता गगन न पूरे रे !
दिगंबरु गुरू आत्मा सन्मय; नेणती या पामरें रेया ॥ २ ॥

॥ भिन्न चालि ॥

(२८४)

बहु जन्म गेले वायां गुणी गुण भज़तां.
श्री दत्तस्मरण कांहीं केलेंचि नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
सखिये ! मन माझें कयीं लागयील सद्गुरू पायीं ? ॥ छ ॥
देह गेह सर्व माया तेणेंवीण पाहातां.
दिगंबर ध्यान माये ! जीवन देहीं. ॥ २ ॥

(२८५)

कमळनयनरूप हृदयीं मी साटवीं;
तेणें संजीवन अवो होईल जीवीं. ॥ १ ॥ धृ ॥
बाईये ! मन माझें कयीं निश्चळ होइल हृदयीं ? ॥ छ ॥

दिगंबरु दीनत्राता हृदयीं भरला माये ?
तेणें माझें मन अवो ! वीरोनि ज़ाये. ॥ २ ॥

(२८६)

हृदयकमळ कोश सदीप जांहाले.
तमस मीपण तें वो नाशोनि गेलें. ॥ १ ॥ धृ ॥
बापा ! तुझें ध्यान देहीं आपपर नूरवी कांहीं. ॥ छ ॥
दिगंबरु दीनमणी उदयातें पावला;
गुणाचें बोधन भान नाशूनि ठेला. ॥ २ ॥

(२८७)

आपुला तूं कैसा होसी ? चरण झाडीन केंसीं.
अवधूता ! सांग मातें तें पद देसी. ॥ १ ॥ धृ ॥
बापा ! तुझें ध्यान कयी अनुश्रुत लागेल हृदयीं ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझी माया, सूर मोहले जीयां,
न तरवे, ज़ाण, आह्मां साधन–क्रीया. ॥ २ ॥

(२८८)

अनुकंपामृतधारीं घनु वोळला अंतरीं.
निमालें मीपण मन त्रिगुण विकारीं. ॥ १ ॥ धृ ॥
देवा रे ! भेदभावना नाहीं तुझा रूपीं अगुणीकहीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं चीदात्मा; प्रपंचु केंचा आह्मा ?
पुडती बोलणें नाहीं पूसणें तुह्मां. ॥ २ ॥

(२८९)

विषयांचा भासू गेला. गुण भान नाशलें.
सुखाचें स्वरूप मन मोहूंनि ठेलें. ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! तुझें नाम जपों. रूपें तव स्वरूपीं हारपों. ॥ छ ॥
दिगंबरा ! सत्य तें तूं, मज़प्रति मानलें.
आणीक साधन श्रमु होउंनि गेलें. ॥ २ ॥

(२९०)

॥ **माळ गौडा** ॥

सुरतरु चिंतामणी यीं ज़ालीं ठेंगणीं.

ते गुरुचरण दोन्ही ध्याइं; मना ! ॥ १ ॥ धृ ॥
हें मोक्षसाधन मंत्र अनुष्ठान न करीं न करीं. ध्यान अतःपर ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें ध्यानचि तारक. नरमती चरणीं मूर्ख पामर ते. ॥ २॥

(२९१)

अवनीतळगत जळ नदिया नद कल्लोळ;
परि तें ने घे जळ चातकु जैसाः ॥ १ ॥ धृ ॥
तैसा मी चातकु तुझा विश्वंभरा ! करुणामयजळधरा ! कें वोळसी ? ॥छ॥
दिगंबरा ! ज्ञाण, तूं माझें जीवन. तुजवीण पंचप्राण वायां ज्ञाती.॥२॥

(२९२)

पुराण ! पुरुषेश्वरा ! गुरुमुर्ती ! दातारा !
लीला–विश्वंभरा ! दत्तात्रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
तुझें चरणस्मरण मायादहन. भवहर संकीर्तन वखताहे. ॥ छ ॥
अखिळविश्वधरा ! धर्मज्ञा ! ईश्वरा !
शिव ! शिव ! दिगंबरा ! योग–मूर्ती ! ॥ २ ॥

(२९३)

गगन घालुंनि पोटीं गुणाचीं त्रीपुटी,
सबरा भरीत दृष्टी पडतासि कां ? ॥ १ ॥ धृ ॥
चंचळ माझें मन करितों तेथें लीन.
कायसें भवबंधन तयावरी ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें स्वरूप असंग. बुद्धी अंतरंग भासतें कां ? ॥ २ ॥

(२९४)

रूप नाहीं तया दृष्टी कें पाहील ? मनकरण सकळ भांबावले. ॥१॥ धृ ॥
ऐसें तें विज्ञान तत्त्वात्मदर्शन. बुद्धीचें कारण बोद्धय नव्हे. ॥ छ ॥
दिगंबर परब्रह्म निरामय. ज्ञातें ज्ञान ज्ञेय तेथें कैंचें ? ॥ २ ॥

(२९५)

ज्ञाणीव नाहीं; परि ज्ञाणणें साचार;
मीपण मारूनि परब्रह्म आत्मा. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें हें वचन मानिती सज्ञान. सहजीं सहज़पण तेंही नाहीं. ॥ छ ॥
दिगंबर ! ऐसें गुरुगम्य तत्वता. या डोळां पाहातां न लाहिजे. ॥ २ ॥

(२९६)

पूर्वीं आह्मी काये? कवणाचे कैसे?
हें तुजप्रति मी पुसे; सांगे देवा!
आतां तुजसी आन आह्मीं विलक्षण;
प्रकट अवट घटण कैसें घडलें? ॥ १ ॥ धृ ॥
करि कां मजसी वादु? जालों मी सावधु;
कायीसा भवबंधु दावितासी? ॥ छ ॥
मीपण माझें काये? मजप्रति कें आहे?
सिवेन तुझे पाये येये अर्थीं. सकार्यकारण तूंचि सर्व भान
दिगंबरा! जाण, जाणीतलें. ॥ २ ॥ छ ॥

(२९७)

अंतर्यामी तूं करण–नियंता;
तरि कर्मफळभोक्ता मीं तो कैसा?
सर्वांचें निदान तूंचि उपदान;
तरि कें भवबंधन परमपुरुषा? ॥ १ ॥ धृ ॥
वर्म हें निर्वाण बोलिलों वचन;
सकळ साधूजन परिस–तूं का? ॥ छ ॥
तुं आत्मा अंतरीं; तरि मीं कवणु दूरीं?
सर, सर, तूं संसारीं कैसा ह्मणसी?
दिगंबरा! जाण, सांपडली खूण;
आतां मजपासून कैसा जासी? ॥ २ ॥

(२९८)

भवदुःखें गादलें, तुतें शरण जायें; झडकरि त्यातें पाये दावावे कीं!
कर्मांचा अधिकारी घातलें तें दूर;
हे पैं तूझी थोरी कैसी लोकीं? ॥ १ ॥ धृ ॥
वायांविण निर्वाण पाहातांसि देवा; सत्य सकळ तुवां सांडियेलें! ॥छ॥
अविद्या कैसी? कवणें सिद्ध केली? आह्मां कां लाविली खरतर माया
दिगंबरा! तूंवीण दुजें कैचें स्थान? गुंपलें अज्ञान नुमजे तयां. ॥ २॥

(२९९)

जळ चंचळ ज़ाये; सागरीं सामाये; सर सरितां कें लाहे पूर्व—रूप ?
तैसें तुझां रूपीं मिनलों निर्विकल्पां !
आतां कें पुनरपि आया गमन ? ॥ १ ॥ धृ ॥
सर्वाचें कारण, ह्मणौनि तुझें ध्यान, प्रेम संकीर्तन, दत्तात्रया ! ॥ छ ॥
घटीं घटपण अघट ज़ालें तें अस्पष्ट;
नभि नभ नभसे स्पष्ट भिन्नपणें.
तैसें माझें मन नुरऊनियां मीपण तव चरणीं सूलीन दिगंबरा ! ॥ २ ॥

(३००)

योग—विज्जन हृदय—भूषण स्वरूप सगुण सावळें.
नित्य निर्मळ केवळ भक्त ज़ेथ विसांवले.
साधुवंदित सुरनरार्चित नित्य युक्त विराजले.
हृदयमळ भवबंधमोचन, भेदु ज्याप्रति नातळे. ॥ १ ॥ धृ ॥
देखिलें ! देखिलें ! परमपद शिव देखिलें !
नित्य निर्गुण स्वरूप सगुण दत्तरूप विराजलें. ॥ छ ॥
पुण्यकीर्तन, परमकारण, सत्य, सद्गुण—भाजन,
पाप—ताप—विलाप—नाशन, साधकां सुखसाधन,
भवभयांतक, मुक्तिदायक, ब्रह्म, एक, निरंजन,
दिगंबर, निजमायया गुणगुप्त, पंकजलोचन. ॥ २ ॥

(३०१)

करण—गण—गुण—वर्जनाश्रय, ज्ञान—ज्ञेय—निरंजन,
भ्रमद—जनपद—भेद—नाशन, ध्यान—ध्येय—सनातन,
अखिळ, निर्मळ, नित्य, केवळ, ब्रह्म, सेव्य, पुरातन,
हृदयगत—तमसापनोदन, नित्य, चेतन, वर्द्धन, ॥ १ ॥ धृ ॥
देखिलें ! देखिलें ! नयनीं तव रूप देखिलें !
कमळलोचन, शुद्ध, श्यामळ, अगुणगुणमय, देखिलें ! येकलें. ॥ छ ॥
परमसार—विसार—पार, विवर्जितात्मगुणाश्रय,
त्रिगुण—विरहित, धर्मवर्जित, कर्मदोषनिरामय,
विषयभ्रम—भवभाननाशन, केवळ पद, अव्यय,

दिगंबरा ! गुणपारवर्जित रूप तुझें सन्मय. ॥ २ ॥

(३०२)

कर्मठांतें नाहीं अनुसरू; शाब्दिकांतें सर्वदा;
योगसेवा दुःख साधन; न भजें मी ते कदा.
तप सुतपिया तपे दिनकरु; वेदना करी विविधा;
काये सांगों? तुज़ काये मागों ? त्राहि अत्रीवरदा. ॥ १ ॥ धृ ॥
प्रेम दे ! मज़ प्रेम दे ! सर्वसुखमय प्रेम दे !
परमानंदानंदकंदा ! सर्वदा मज़ प्रेम दे ! ॥ छ ॥
आत्मयां तुज़ ज़ाणतां मज़ योगुसाधन कासया ?
पूर्णब्रह्मपुराण तूं; तरि भेदु कें परमात्मयां ?
सगुण निर्गुण भागु न करीं मीं; नावडे मज़ ते क्रिया.
दिगंबरा ! तुझें नित्य सेवन आवडे मना माझया. ॥ २ ॥

(३०३) भिन्न

मुनिजन–सखया ! श्रीगुरुराया ! कें भेटी देसी दत्तात्रेया रे ! ॥१॥धृ॥
सखया ! माझया ! अव्यया ! वियोगें न राहें तूझया रे ! ॥ छ ॥
हृदय दुखवत आहे. मन माझें निश्चळ नोहे. ॥ छ ॥
तुजवीण आन नलगे, ज़ाण, दिगंबरा सत्य ह्मणौन. ॥ २ ॥

(३०४)

पर निर्गुण ज़ेथें भेद निमाला;
न पवे मन बुद्धि; माये ! वो ! वादु राहीला. ॥ १ ॥ धृ ॥
देखणें निवारीं; मी माजि चोरीं;
सहज़ अवृत्ती सखिये ! तें तत्व विचारीं. ॥ छ ॥
माऊ अगाऊ भावीं लोपोनि गेला.
देऊ दिगंबरु सखिये ! मीचि वो ! ज़ाला. ॥ २ ॥

॥ माल गौडा ॥ [भिन्न चालि]

(३०५)

प्राणु ठेउंनि कंठीं वाटुली पाहें; उदास न धरीं; दावीं पाये. ॥ १ धृ ॥
येइं माये ! येइं माये ! ॥ ० ॥ उसीरु न करीं; येइं माये ! ॥ छ ॥

देवदिगंबरे ! तूंविण मातें येकलें नसवे. आण, येणें. ॥ २ ॥

नामावळी ॥ भिन्न ॥

(३०६)

मानससुमन अर्पिलें पाईं. न भजें मीं साधन आणिक काहीं. ॥ १ ॥धृ॥
शंकरा जन—शं कराया गुणगणदळन हरी क्रिया. ॥ छ ॥
इतुलेंचि साधन ना मनुचिंतन. देवदिगंबरा दाखवीं चरणा. ॥२॥छ॥

खंड प्रबंध

(३०७)

अरे ! करुणाकरु विनमिला यया, सुरवर—सेवितु, विराजितु वा,
श्यामतनु, श्रीरंजनु, पावनु ! संतापशमनु,
जगतीमाजी स्वजनकुळातिप्रियंकरु यया. ॥ १ ॥

॥ ताल ॥

दिग् दिग् दां थडींकु ढिंकु ढिम ढिम ढिम झकझेंकुकु
थारिनककिणकिण थारिकिटकुकुदां ज्ग ज्ग झें ज्ग ज्ग किण
किडिकिडिदा किडिकिडिदा किट्ट किट्ट
तो दिग् दिग दिग दिग दाम् झक किले नक किण किण ॥ छ ॥
ऐसा जगदीशु, परेशु, नाथ, योगी—जनां शंकरु, गुरु,
अपारु, गुणातीतु, आनंदसागरु, निरंतरु,
येक, कारण, स्वरूपु, दत्त देखिला यया यया यया. ॥२॥

॥ स्वर ॥

निन्निदधमददनिदधम गमध गमध ग म ध नि सनिनिदधममगध.

(३०८)

अखिला—भासा—भासकु, नाशनु भेदा, ज्ञानमूरती, हा श्रीगुरु राउ.
भवतापुभेदी तो इंदु, सिद्धराजु, अक्षरपरु,
नरसुरगुरु, देउ अवधूतु तो दिगंबरु.
अगुणु, श्रीवर्द्धनु प्रबंधें वचनीं स्तविनला यया यया यया. ॥ ३ ॥

(३०९)

केदार

गुणीं गुंपलें नुगवे माझें मन. कर्म नावडे; न करीं अनुष्ठान वो !

नित्य श्रवणें कीर्तनें भज़यीन. प्रेमें आनंदली नृत्य करीन. ॥ १ ॥धृ॥
आतां जन हें दुर्जन माये ! तयां निंदकाचें वदन न पाहें.
मूर्ख बोलोंनि करितील काये ? शंका न धरीं; न धरीं त्यांची सोये. ॥छ॥
यया लौकिका न धरी माझें मन. मज़ लागलें अखंड तुझें ध्यान वो !
दिगंबरे ! मज़ देयीं दर्शन. नित्य कीर्तन मीं करीन श्रवण. ॥ २ ॥

(३१०)

धन, धनद, कनक, जन जाया, हें मायीक सकळ योगिराया रे !
विष, विषयीकरस, गुणक्रीया,
नित्य भज़तां संसारु गेला वांयां . ॥ १ ॥ धृ ॥
आतां कैसेनि भेटसी मज़ दीना रे ? अवधूता ! गुणनिधाना !
तुझें रूप आठवें क्षणक्षणा. मातें वियोगाची न साहे वेदना. ॥ छ ॥
नद–गतू–जळ चळ ढळताहे. वय शरीरी तद्वत. करूं काये वो ?
हीत कांहीं न घडे येणें देहें. दिगंबरा ! तुझें आठवीन पाये. ॥ २ ॥

(३११)

देवा ! ज़ळो ज़ळो हें जनजाळ ! माया, ममत्व दुःखासि नित्य मूळ वो !
अशा किती ? प्राशिज़े मृगजळ.
स्वप्न, धन मृषा भोग ते सकळ. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कैसेनि भेटती ते साधू ? वो ! जयाप्रति न साहे द्वैतवादू;
जयां स्फुरे अखंड ब्रह्मबोधू; उपदेशु विज्ञानसारासिंधु. ॥ छ ॥
आतां देह गेह ज़ाहालें सर्व भारू. तत्वविषयीं पडला अंधकारू.
दिगंबरु न दिसे; काये करूं ?
आतां न दिसे वो ! आणीक आधारू. ॥ २ ॥

(३१२)

बहू जन्म गेले वो ! वायांविण ! आतां ज़ोडलें श्रीदत्त सत्यधन वो !
करूं ययाची मीं कैसी ज़तन ?
अतिचंचळ भ्रमीत माझें मन. ॥ १ ॥ धृ ॥
आतां मीपण धरूंनि काज़ नाहीं वो ! मनें वीरयीन ठायींचें ठायीं.
भाव अभाव न भज़े यये देहीं.
वृत्ति न साहे; ज़ायील; करूं काइ ? ॥ छ ॥

कवण योग सुफळ ज़ाले ; माये ! आत्मा अवधूतु मींचि मातें पाहें वो !
दिगंबराची सांडियेली सोये. तया सोडूनि प्रपंचु मी न पाहें. ॥ २ ॥

(३१३)

चालतां बोलतां तुझें रूप ध्यायीन; तें श्रीमुख ध्याईन.
सुंदर सावळें तें मीं दृष्टी पाहिन.
गर्ज़िन आनंदें; नाम तूझें गाइन. गूण गीतीं गाइन.
प्रेमाचें भरिते हृदयीं नित्य लाहिन. ॥ १ ॥ ध्रु ॥
सखिये ! साज़णी ! मन वेधलें माये ! चित्त गुंतलें माये !
याचेनि वीयोगे माझें मन न राहे. ॥ छ ॥
आसनीं भोजनीं तुझा संदु या मनारे !
तुझा वेधु या मना ! गुणाचें निधान तुं कमळनयना.
सद्गुरू ! दातारा ! भवदुःखहरणा ! तापत्रयहरणा !
दिगंबरा ! भाससी सगुण, निर्गुणा ! ॥ २ ॥

(३१४)

चंचळ—जळ सरिता ज़ाउंनि सागरा मीळे;
तया जळधरा मीळे. न परते पुडती तोय; तेंचि ज़ाहालें.
पूर्व रूप, नाम तें सकळ बुडाले. भेद—स्पंद गळालें.
रथ्यागत सलील आतां कैचें वेगळें ? ॥ १ ॥ ध्रु ॥
ज़ाहालें बा ! तैसें आह्मां तुझेनी बोलें, कृपा योगें प्रबळें.
ब्रह्म तूं चिदात्मा; विश्व कैंचें उरलें ? ॥ छ ॥
काष्टांचे विभेद समर्पिले. पावकीं रे ! अर्पिले पावकीं.
तोचि ते सकळ ऐसी प्रतीति लोकीं.
धुरें नीवडितां नये गंधु पातकी रे ! गंधु पातकी;
दिगंबरा ! तैसें आह्मीं वर्तता लोकीं. ॥ २ ॥

(३१५)

श्रीपादकमळें देवा ! दृष्टी पाहिन रे ! तें मीं ध्यानीं ध्याइन.
होउंनि भ्रमरु तेथें रुंजि करीन.
भोगीन मकरंदु; तें मज़ हा का बंधन; परति मांडो तथ्रानि.
निर्मळ मन माझें; परि मी तेंचि मागेन. ॥ १ ॥ ध्रु ॥

लागलें वो ! ध्यान; मन गुंपलें गुणीं; चित्त यये सगुणीं.
सर्वज्ञाच्या नाथु मज़ भेटवा कव्हणी. ॥ छ ॥
नाम संजीवन तें पीयूषा आगळें, योगधारणा बळें,
मुक्तीचें कारण ऐसें हृदयीं मानलें.
तोचि करीं जपु; सत्वगुणें न च्रळें योगधारणाब्रळें.
दिगंबरा ! परब्रह्म तूं चि संचलें. ॥ २ ॥

॥ चालि भिन्न ॥

(३१६)

विषयो गुणाच्या गुण–संग–हीनू, सगुणु, त्रिगुणु, गुणक्षीणु. ॥१॥धृ॥
बाइये ! तो माझें धन जीवन जीवना तो माझें धन वो ! ॥ छ ॥
स्वजनत्राता तारकु माये ! दिगंबरु मीं मज़ पाहें. ॥ २ ॥

(३१७)

मानसें मन पांच्रही प्राण संगु न धरी निरंजन. ॥ १ ॥ धृ ॥
बायीये ! तें माझें ध्यान दुर्मतिदहन; तें माझें ध्यान वो ! ॥ छ ॥
विलयो मनाच्या करूनि पाहें. दिगंबरु सर्व होये. ॥ २ ॥

(३१८)

चालि भिन्न

अवधूतु आत्मा बुद्धीसि प्राणु सावळा पद्मनयनु. ॥ १ ॥ धृ ॥
बायीये ! तो माझें सुख सकळ. वेदक, तो माझें सुख वो ! ॥ छ ॥
देहीं निराळा असंगु देहीं, दिगंबरु देखिला हृदयीं. ॥ २ ॥

(३१९)

तूं माझें संध्या, जपू, विधान, हृदयगत ध्येय, ध्यान. ॥ १ ॥ धृ ॥
रामा तूं माझें मन रे ! तुं माझें मन;
स्वजन, सुजना ! ॥ छ ॥
तूं माझा बोधू, विषयविहीनू. दिगंबरु तूं मीं आपणु. ॥ २ ॥

(३२०)

देऊ देवाच्रा सुरतरु माये ! हृदयीं कैसा स्थीरु राहे ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता तूं माझा प्राणु स्वजनु, सखया ! तूं माझा प्राणु रे ! ॥ छ ॥
गुणीं गुणाच्रा गुणनिधान दिगंबरु ब्रह्मपूर्ण. ॥ २ ॥

(३२१)

देउ देहिचा भेदासि खाये. श्रीदत्तु आंगीं न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
आतां न धरे मनु मानसकरणा ! न धरे मनु वो ! ॥ छ ॥
गुणी गुणाच्या क्षयो, अगूणू दिगंबरु गुणगणहीनू. ॥ २ ॥

(३२२)

कवणाची करूं आशा ? ज़ळो दुराशा ! धिग्य जन्मु हा माझा ऐसा रे !
स्वभाउ कैसा ? हे जगदीशा ! मी न ये, न ये गर्भवासा.
त्राहि गुरो ! त्राहि महेशा ! अवधूता तूं बापु कैसा ?
शंका वाटे. ज़हाली दुर्दशा रे ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! सखया ! का मज़ सांडीयले ?
गुंति पडली. कांहीं न चले रे ! सखया !
अपराध काये म्यां केले ? येणें ज़ाणें तो मार्गु न कळे.
वाट पाहातां श्रमीत ज़ाले डोळे. ॥ छ ॥
दीनाचें दीन होणें; पाये धरणें; न तुटे मरण परि तेणें रे !
देहचि देणें; पराधीन होणें; करूं नये तें सर्व करणें;
हित वीहीत सांडूनि देणें; ज़ळो जना अधीन ते जीणें !
दिगंबरा ! ते कैसेनि साहाणें ? रे ! सखया ! ॥ २ ॥

(३२३)

कवणाच्या मूळीं पुत्रु ? कवण पाळी ?
एसी हे गति मज़ ज़ाली वो !
आशा ज़ळली, ये भव--ज़ाळी.
मज जीतचि भूली पडली. नाथिलींचि परवश ज़ाली.
उपयोगा न येत गेली. मायेबापें दुरावलीं. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! काये मी करूं ? वो ! कवणी दीशा पाहों ?
कैसी वो ! निश्चळ राहों ? कांहीं न चले उपाउ. ॥ छ ॥
जननी जनकु माये ! अवधूतु न ये.
तेणें सांडिली माझी सोये वो ! दुःख न समाये; स्पंदति आहें.
दिगंबरा ! परतोनि पाहे. अपराधी नेणें सोये.
चूकली करूं काये ? सांडू नेदी; न धरीं सोये. ॥ २ ॥

(३२४)

कवणाची धरूं माया स्वजनजाया ?
स्वप्न, क्षणीक भ्रमु, वायां रे ! अजा अक्रीया नलगे क्रीया.
निजानंदा ! चिदव्यया ! संगु नाहीं गुणाश्रया. ॥ १ ॥ धृ ॥
मन्ना रे ! ध्यासी तें पर काये ? तुझी करणी वायां ज़ाये.
दृश्य भजनें विभ्रमु होये. संगु मांडीं निश्चळ ठाये. ॥ छ ॥
भौतीक सर्व ज़ाण प्रपंचभान. भासे तुझें अज्ञान रे !
तदंग वेद न तें हीं तें ज़ाण. दिगंबर ब्रह्म अगूण
भज मना सनातन. ॥ २ ॥

(३२५)

कवणें केलें वो ! काये ? नेणें माये ! प्राणनाथु हा सेज़े न ये वो !
धरीन पाये; तूं ज़ाये वो ! सैये ! मज़ वियोगदुःख न साहे !
देहीं प्राणाचें काज़ काये ? ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! चंदन आंगीं न साहे ! परिमळ तो वायां जाये !
चंद्रु चांदिणें करी काये ? प्राणनाथु वो ! कैसेंनि ये ? ॥ छ ॥
सखी ह्मणेः—वो काहीं अंतर नाहीं; दृश्य सांडूंनि द्रष्टा पाहीं वो !
तूं तूंचि तुझांठायीं; दुज़ेपण वायी. दिगंबरु आत्मा अदेही.
स्वप्नवियोग मानिसील कायी ? ॥ २ ॥

(३२६)

गुणी गुंपले गुण चित्तचैतन्य. विकळ पडलें माझें मन वो !
नेणें मीं खूण मंत्र विधान. साध्य कैसें तें साधन ?
भूललें वो ! अंतःकरण. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! वो ! वियोगु तापु न साहे. कवणाचे धरूं पाये ?
भेटवा वो ! सद्गुरु माये. आठवण दुःखाची होये. ॥ छ ॥
चित्त चंचळ कैसें योगीं न बैसे ? तेणें विलंबु मज़ भासे वो !
दिगंबर ऐसे कें पां प्रकाशे ? पुनरपि वियोगु न दीसे. ॥ २ ॥

(३२७)

संख्या न कळे; काळ क्रमले; कठिण गुण वेगळा गळे बाण वो !
भव विभ्रमु भेदु भयद भासती; भाव दैव न कळे कोण वो !

दुःख त्रीविध ताप तपती दुस्तर; तेणें बुद्धि ज़ाहाली क्षीण वो !
देह वेच्चलें; भाव ज़ाहाले गळित; आतां नित्य लागलें ध्यान वो ! ॥१॥धृ॥
गे ! बाइये ! बहू मी वंचलियें ! श्रीदत्त विसरलियें वो !
गुणकर्मी विगुंतलियें वो ! बहुकाळ दुरावलियें ! ॥ छ ॥
धन, स्वजन, जन, विजन सोपितां माझें नीत्य व्याकुळ मन वो !
काम क्रोध हे वैरी आंगीं ज़डलें; तेहीं ध्येलें करण–गण वो !
काये करूं मीं ? माझें न च्चळे करणें. वायांवीण ज़ातील प्राण वो !
दिगंबरु वो ! मज़ भेटवा कव्हणी. सुखवृत्ति ज़ाहाली क्षीण वो ! ॥२॥

(३२८)

शास्त्रश्रवणें मद मत्सर ज़ाहालें; अहंकार पावले बळ वो !
कर्मसाधनीं दंभु दर्पु वाटला; तो पै भवभ्रमासि मूळ वो !
योगीं तपसीं सिद्धी नाना क्षोबती; दुःखादुःख केवळ फळ वो !
काये करूं मी ? माझें कांहींचि न चळे !
भवबंधु न तुटे जाळ वो ! ॥ १ ॥ धृ ॥
गे ! बाइये ! कामीं चूकलियें. अवधूतें दुराविलियें वो !
अवैराग्यें भूतलियें वो ! भवभ्रमें व्यथिलियें वो ! ॥ छ ॥
लक्ष ठेवितां गुरुचरणीं चंचळ मन बुद्धी वीसरे मनबोधु वो !
जपू जपतां तेथें सुषुप्ती धरिज़े; तेणेयोगें आगळा खेदु वो !
नामकीर्तनीं त्रासु विरसू संचरे; येरु नित्य आवडे वादु वो !
दिगंबरा वो ! प्रति मातु ज़ाणवा कोण्ही. अती होतुसे बाधु वो ! ॥ २ ॥

(३२९)

दुष्ट, दुःखद, दूरि, दुरुळ, दुस्तर, माये ! नित्य सासूंर मज़ वो !
कामू कल्पना माझें हृदय भंगिती. किती नित्य करणें काज़ वो !
धर्म विकळ; तळमळ वो ! सोपितां माझें सत्व आटलें नीज वो !
पंथू न कळे; माझें मनस पांगुळ; माये ! नित्य आठवीं तूज़ वो ! ॥१॥धृ॥
गे ! बाइये ! केव्हां देखइन मी वो ! आपुलें स्वजन, दत्तु गुणाचें नीधान ?
सकळ श्रमु माझा हरैल, सखिये ! मी केव्हां केव्हां सांगैन ? ॥ छ ॥
वाट पाहातां दीन क्रमलें बहुत; मातें तेंचि लागलें ध्यान वो !
सोये सांडिली; कैसें करूं मी ? सखिये ! माझे क्षीण ज़ाहाले प्राण वो !

दीर्घस्वरें मीं सादु घालूंनि आळवीं; शंकामुक्त ज़ाहालें मन वो !
दिगंबरे ! वो ! येईं; नयन श्रमलें माझे; भाव ज़ाहाले क्षीण वो ! ॥२॥

(३३०)

कनकी कानक कटकादिक मान जीवनीं जीवन ज़ैसें भेदविहीन; ॥१॥धृ॥
तैसे परब्रह्म सगूण. माझें मनाचें तूं सार,
नीरजनयना ! माझें मनिचें तूं सार. ॥ छ ॥
हृदयकमळीं द्वैत भाऊचि नाहीं. दिगंबरा ! सर्व--गतु तुं देहदेहीं. ॥२॥

(३३१)

अनुजीं तनुजीं प्रीति धरूंनि कायी ?
हितासि कारण येथें काहींचि नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
श्रमकर सर्वही देही. माझें मज़ बाधिताहे.
आतां पुरे वेदना. माझें मज़ बाधिताहे. ॥ छ ॥
कमळनयनरूप देखैन कई ?
दिगंबरेविण मज़ गतिचि नाहीं. ॥ २ ॥

(३३२)

नयन श्रमलें; वाट पाहें; गे ! माये !
दिनें दिनु गेला; माझें कोण्हीचि न ये. ॥ १ ॥ धृ ॥
आतां करूं काये ? वो ! सैये ! माझा जीउ हा न राहे.
अरे ! जगजीवना ! नीरजनयना !
मनमोहना ! माझा जीउ हा न राहे. ॥ छ ॥
सद्गुरू माउली माझी येईल कई ?
दिगंबरे ! तुज़वीण येरे मज़ कायी ? ॥ २ ॥

(३३३)

सकळकरणगण भ्रमीत माये !
मानस विकळ माझें स्थीर न राहे. ॥ १ ॥ धृ ॥
हृदयीं वियोगु न साहे. मी वो ! ज़ायीन माहेरा,
हे मज़ वासना, मी वो ज़ायीन माहेरा. ॥ छ ॥
हृदयभुवनीं मातें संतोषु नाहीं.
दिगंबरेवीण माये करणें ऊ ! काई ? ॥ २ ॥

(३३४)

कवण सुकृत पूर्व साधन मांय!
सावळें सुंदर रूप नयनी मीं पाहे! ॥ १ ॥ धृ ॥
मन माझें वेधलें वो! सैये! माझें गुणाचें निधान,
पंकजनयनु, माझें गुणाचें निधान. ॥ छ ॥
न धरीं परति आतां या भवपुरा.
दिगंबरेंवीण मन नेघे उपचारा. ॥ २ ॥

(३३५)

गुणकृतभान वायां हें जनजाळ. मायामय हें सर्व तरुणीचें जळ.
धनद धन हें सर्व दुःखासि मूळ. स्वप्न जैसें जैसें व्योमाचें फळ. ॥१॥धृ॥
कैसेनि माये तें सूख पाहें? मन मानस जेथें विरोनि ज़ाये. ॥ छ ॥
अर्थ साधूनि ध्यान नित्य मनासि. कामु कल्पना वेधु यया जीवासि.
परती नावडे. काये करूं ययासि? दिगंबराची होये कैसेनि दासि? ॥२॥

(३३६)

नानां तपस माझें ज़ालें सुफळ. नयनीं देखिलें रूप शुद्ध श्यामळ.
करणगण हे ज़ाले धर्म-विकळ. सुखें संपूर्ण ज़ालें हृदयकमळ. ॥१॥धृ॥
मी मज्ञ माये! मातें न साहे. नेणवे देह; गेह ज़ाहाले काये? ॥छ॥
ध्यानीं धरितां मन उन्मन ज़ाले. जाणतेपण सर्व विरोनि गेलें.
गगनी गगन राहे, तैसेंचि ठेलें. दिगंबर गुणही गुणी स्फुरलें. ॥ २ ॥

(३३७)

योगी योगज्ञ वेत्ते ज़ाणती सार. शाब्दीकांप्रति नव्हे तत्त्व गोचर.
भक्त प्रेमळ त्यांचें नीवे अंतर. तें रूप नयनीं नीवळे निरंतर.॥ १॥धृ॥
श्रीयोगिराया! लागेन पायां. वेधलें मन माझें; न सोडी तया. ॥ छ ॥
वेद वर्णिती ज़े ब्रह्मपुराण; शास्त्रें करिती वादु; वदती खूण;
देवां दुर्लभ ऐसें गुणनिधान; दिगंबर देखिलें तें नयनी सगूण. ॥ २ ॥

(३३८)

सकळ ही धन जन करूं मी काये? विषयरसाची गोडी जीवा न साहे.
चित्तचैतन्य माझें गुंपलें माये! भेटवा सद्गुरू. याचे पाहीन पाये. ॥१॥धृ॥
आत्मयां! रामा! सुखविश्रामा! श्रीदत्ता! तुझा मंदू लागला आह्मां.॥छ॥

साध्य साधन येर वृत्ति न साहे. हृदयीं गुंतले मन. मी माजि पाहे.
गुणदोष--वीरहीत होऊंनि ज़ाये. दिगंबरीं तन्मयत्व भोगीत आहे. ॥२॥

॥ केदारा ॥

(३३९)

कमळनयनरूप सावळें जीवीं बैसलें. पाहीन कवणें काळें.
मनस चंचळ; परि तें न चळे. गुणी गुंपलें नीवती कईं डोळे? ॥१॥धृ॥
सखिये ! स्वजन धन वाउगें मज़ नलगे. ज़ाइन तया संगें. ॥ छ ॥
शब्द श्रवण बाण लागती हृदयाप्रती वियोगवेग चित्तीं.
विषवीषय अवगमती, आड भासती,
दीगंबर–सूख–प्राप्ती. ॥ २ ॥

(३४०)

हृदयकमळदळकोटर तुझें मंदिर कामें धरिलें बिढार.
क्रोध वेवाहे; अति दुस्तर मदमत्सर ज़ाहाले अति स्थीर. ॥ १ ॥ धृ ॥
येइये ! येइये ! परमात्मयां ! दत्तात्रया ! वेगु करी लवलाह्यां. ॥ छ ॥
योगधारणा स्तंभु पाडिला. ठाऊ मोडिला. आश्रय बोधु नेला.
जीवीं बैसली कर्म–शंकळा. धर्मु नाशला. दिगंबरा ! वेगीं चाला. ॥२॥

(३४१)

आरत जीविचें, भेटी ज़ायीन, सखिये ! मन. निश्चळलें चैतन्य.
वियोगें न करीं योगसाधन, ध्यानधारण. मज़ ज़ाणवे कठीण. ॥१॥धृ॥
येईं रे ! येईं रे ! अत्रिनंदना ! पद्मलोचना ! योगी–हृदय–नीधाना ! ॥छ॥
नयन स्पंदे; स्पंदे बाहुली; वृत्ति लागली; पंथु पाहें येकली.
दिगंबरा ! तूं गुरुमाउली, शांति साउली. मातें जन--भूलि ज़ाली. ॥२॥

(३४२)

नळनीदळगतजळ चळे ढाळे ढळमळे. दळजळेसीं निराळें.
संगु असोनि संगा नातळे. तेवि संचलें गुणीं मन माझें ज़ालें. ॥१॥धृ॥
सखिये ! हृदय ज़ालें निर्मळ. नेणें मी स्थूळ.
स्फूरे गगन विशाळ. ॥ छ ॥
अवनी अनिळा–नळु जीवन नव्हे गगन. भान सकळही क्षीण.
दिगंबरु मी मातें आपण नीरंजन; तेथें नधरे मीपण. ॥ २ ॥

(३४३)

त्रिगुण–विकळ माझें मनस, चंचळ, कामवश, तळमळ बहू करिताहे.
माझें मज़ांचि नाकळे; गुणीं बहिरंग पळे;
हीतविषयीं आंधळें; तया करणें काये ?
येणेंकरूनी चूकली; तुझी तुज़ अंतरली;
दत्ता ! तू माझी माउली; तरि सोडिता नये. ॥ १ ॥ ध्रु ॥
आता पाया लागइन. तुज़ सोडूनी ज़ावया
मन परतेना माघारें. अपराधी मी हें खरें.
मायबापु गुरुदेउ तूं; तरि आता काये भज़ो दूसरें ? ॥ छ ॥
डांगा हाणि–तळें जळ कैसें होइल वेगळे ?
मोडि पाहोनी ज़वळ फळ भेदिजे केवी ?
कार्यकारणीं दूसरें; तर्कु विवेकें न स्फुरे;
भेदु स्मरला वीसरें; सत्य न मने जीवीं.
दिगंबरा ! मीं अज्ञान तुझें पोटिचें;
ह्मणौनि मज़वरि तूं कठिणपण झणें दाखवीं. ॥ २ ॥

(३४४)

बहु जन्म गेले वायां. श्रमु ज़ाला जीवा यया.
गुणीं गुण प्रवर्तले करितां क्रीया. ॥ १ ॥ धृ ॥
अझुणी कां न ये वो ! माये ! काये मीं करूं ?
अवधूत माये ! मातें भेटवा गुरू. ॥ छ ॥
गुण कर्म यये देहीं भज़ता संतोषु नाहीं.
दिगंबराचे मीं पाये पाहिन कई ? सैये ! ॥ २ ॥

(३४५)

शम, दम, योगु, क्रीया गुरुवीण सर्व वायां.
न करीं मीं ते आयास. पाहिन तया सैये ! ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयनु माये ! भेटवा मज़.
साधन योगाची सिद्धि तेंचि सहज़ सैये ! ॥ छ ॥
जप, तपु, अनुष्ठान, दिगंबरू, ध्येय, ध्यान,
सकळ स्वहीत माझें, मूळीचें धन. ॥ २ ॥

(३४६)

आठवसी प्रतिक्षणीं. प्रीति भरली सगूणीं.
आनु! मातें उपदेशु नावडे मनीं बापा! ॥ १ ॥ धृ ॥
येइरे! येइंरे! देवा! घेउंनि ज़ायीं.
तुज़वीण दत्तात्रेया! नावडे कांहीं बापा! ॥ छ ॥
ज्ञान–ज्ञेय–वींचारणा ते मीं न करीं कल्पना.
दिगंबरा! तुझें रूप रूपलें मना. ॥ २ ॥

(३४७)

प्राणधन वोवाळीन; जीउ बळिं मी देईन.
अवधूता! तुझां गुणी गुंपलं मन बापा! ॥ १ ॥ धृ ॥
येकुदां येइं रे देवा! भेट हृदयीं.
परब्रह्म तुज़हूंनी दूसरें नाहीं बापा! ॥ छ ॥
अगुणगुणाच्या दिगंबरा निश्चयेसीं
तूंचि तत्व. सत्य माझी वासना ऐसीं. ॥ २ ॥

(३४८)

तुझें मातें सर्व देयीं; माझें तऱ्हीं सर्व घेईं.
तुंमींपणाचें साज़णें न करीं कहीं; ॥ १ ॥ धृ ॥
देवा! वाउगी तऱ्हीं हे माया घालिसी काई?
तुज़प्रती सत्यरूपा दूसरें वायी. ॥ छ ॥
मीं तूंचि सर्व होयीं. कां तुं मींचि सर्व देहीं.
दिगंबरा! भेद–स्पंदु न स्फुरे कहीं. ॥ २ ॥

(३४९)

जनकु, जननी माये! अवधूतु कोठें आहे?
भेटवा वो! मीं नयनीं पाहिन पाये सैये! ॥ १ ॥ धृ ॥
सांडूनि गेला वो! मातें येकलें वनीं.
पुढें नाहीं कोण्ही मातें गे! पारिखां जनीं. ॥ छ ॥
काम क्रोध साहों कैसी? ज़ालियें तद्गुणीं पीसी.
दिगंबरे! तू जननी; नेणसी कैसी? ॥ २ ॥

(३९०)

आठवले तुझे गूण; वरि वियोगाचे बाण.
भेदलें वो ! मन माझें. ज़ाहाले क्षीण वो ! सैये ! ॥ १ ॥ ध्रु ॥
नयन विकळ ज़ाले; लोटलें जळ; तळमळ ते कित्ती साहों ?
न चले बळ. ॥ छ ॥
कई कई कई येसी ? येइन मीं तुज़पासीं.
दिगंबरे ! तूं नयन–पालवें पुसीं. ॥ २ ॥

(३९१)

कोटिचंद्र गेले लया, पाहोंनि श्रीमुखछाया,
दिनमणि ते हारपले, पावले क्षया ऐसें. ॥ १ ॥ ध्रु ॥
कइ मीं पाहिन डोळां रूप सावळें ?
अवधूता ! तुझें माझे नीवती डोळे. ॥ छ ॥
देवदेवा ! देवेश्वरा ! शिवरूपा ! दिगंबरा !
कमळनयना ! बापा ! त्रिगुणपरा ! ॥ २ ॥

(३९२)

दीपाचा सुढाळपणीं पतंग पडले. तैसी कारितासि कां वर–पडी रे !
आप ज़ाणतां हें दृश्यचि माईक; ज़ळो ज़ळो तुझी खोडि. ॥१॥ ध्रु॥
परोपरि मानसें वोखटीं. आचरती ते क्रिया खोटी. दुःख पावती सेवटीं.
आत्महीत तयां कांहींचि न कळे. वळितां मरमर मोटी.
अवस्था गोचर, भान मायीक, सिवणा सत्य तें कांहींचि नाहीं रे !
दिगंबरु गुरू भज़ कां आल्या ! निवसील तूं तुझां ठायीं. ॥ २ ॥

(३९३)

सदन, धन, जन, जाया भज़तां रूपचि खरतर बाण रे !
काम राग तेथें वैरी नेटक भेदती अंतःकरण. ॥ १ ॥ ध्रु ॥
अतःपर रूप मीं न भज़ें. माज़यीन त्याचेनि माज़ें.
धिग्य ! यौवन हें काये कीज़े ?
सकळ योग धन नाशील येणें. वैराग्य देहीं नुपजे. ॥ छ ॥
चित्रिंचें अळंकरण मृन्मयाचि सकळ. भौतिक ज़ाण हें तैसें रे !
दीगंबर–रूप भज़ कां सन्मय मना ! वृत्ति विनाशे. ॥ २ ॥

(३९४)

आमीष रसें काये भ्रमतासि रे ! मीना ! गळु तया अंतरीं आहे रे !
काळज़ फुटे; परि मुक्त न होसी; सांपडसी अनुपायें. ॥ १ ॥ धृ ॥
परोपरी रसना नाडियलें. कामवेग बळवंत केले.
योग--धन तें वायां गेलें. तत्व--श्रवणीं लागती डोळे.
करणगणमंदें मातले. सकळ दम--शम जीत निमाले. ॥ छ ॥
रसनेचे सुख काये पाहातासि रे ! खरा ! योग--युक्ती अन्न सेवीं रे !
दिगंबरु गुरु कैंचा ? पुनरपि कैंची संपूर्ण पदवी ? ॥ २ ॥

(३९५)

स्वर वेधें वेधला भुजंगु डोले. हरिणु प्राणें निमाला रे !
तंत धन शब्द वितंत सूस्वर लक्षितासि रागमाळा. ॥ १ ॥ धृ ॥
परोपरी श्रवणें नाडियलें. अर्थु न भज़ कांहीं केलें.
नीरूपण हें वायां गेलें. जन तत्काळीं भूललें.
बहिर्मुखु अर्थु ने घेचि प्राणी. दिवसा नागवले. ॥ छ ॥
घारिका भक्षणीं छिद्रांची गणणा ! काये प्रमाण पाहासी गव्हारा रे !
दिगंबर--नामें करि कां गर्जन. लाता हाण संसारा. ॥ २ ॥

(३९६)

सर्प--दंष्ट्रा--स्पर्शें विष--निद्रा आली; तेथ प्राणासि परती चि नाहीं रे !
कामिकासि तैसा कामिणीचा संगु; वज्र--पाशु पडे देहीं. ॥ १ ॥ धृ ॥
परोपरी कामें गोवियलें. विण पापें बंधन केलें.
मंत्र--उपदेशु न चले. मन--मनन--मानव्य गेलें.
रात्रि दिवसु तें चि ध्यान हृदयीं. योग--धन हारपलें. ॥ छ ॥
कंडु निवारणीं सुख विश्रांति काइसी ? परतोनि कां न पाहासी रे ?
दिगंबरेंविण संसार न तुटे. मा हें चि हें नित्य पावसी. ॥ २ ॥

(३९७)

भयद बाधकु भारी मायिकु सिवणा.
भोगुंचि पाहे; परिचेॐ धरीना. ॥ १ ॥ धृ ॥
नाडला हा जनु स्वहित नेणें. भुलला न धरी सोये विपरीत--ज्ञानें. ॥ छ ॥
स्वहित सांडुनि बळें अहित चि ज़ोडी.

मरे मीनु; परि, आमिष न सोडी. ॥ २ ॥
ऐसा स्वभावो जळो! न धरी रे गुणीयां !
अवधूत गुरु सेवी; तरसील माया. ॥ ३ ॥
दिगंबरेंविण नाहीं आन हितकर्ता.
तयाचा होऊंनि सोडीं सगुण देवता. ॥ ४ ॥

॥ चालि भिन्न ॥

(३५८)

माये हें दुःख माझें ज़ाणेल केधवां
प्रतिकारु कवणु य अर्थीं करावा ? ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतु ममता धरी ऐसें होतां.
न देखे सखिये ! येणें मनीं बहू वेथा. ॥ छ ॥
ऐसें हें निष्ठुर मन नाहीं कवणाचें ? जैसें कठिण देवा दिगंबराचें ! ॥२॥

(३५९)

कमळनयना ! हरी दुःखना. तुझा संदु या मना.
भेटि देईं स्वजना. ॥ १ ॥ धृ ॥
विषयीं मति मोहिली. भूलि ज़ाली वरदा ! भ्रमु हरीं तु हा. ॥ छ ॥
आश तुझी बहु रे ! मातें. येईं रे ! सखया ! दिगंबरा !
सांडूंनि साधना, हित पर चिंता, ॥ ० ॥
आणिक काम–ना. तुझे पाये आठवीं. देवा करीं करुणां. ॥ २ ॥

(३६०)

कमळनयना ! अगुण–गूणा ! सकळ--सूख--निधाना रे !
संगविहीना ! सानंदघना !
तुझा वेधु, तुझा स्पंदु, तुझा बोधु, लागो या मना रे ! ॥ १ ॥ धृ ॥
बापा ! तूं माझें धन रे ! योग--मुद्रेचें साधन रे !
ब्रह्म शुद्ध सनातन रे ! तापत्रयाचें छेदन बापा ! ॥ छ ॥
देवा ! देवेंद्रा ! विज्ञान--सारा ! सर्वज्ञ ! स्वामी ! उदारा ! रे !
दिगंबरा ! करुणाकरा ! तुजवांचूनि नेणें दुसरा रे ! बापा ! ॥ २ ॥

(३६१)

शाब्दीक--ज्ञान परहस्त--धन; स्वकीय ऐसें न ह्मण रे !

श्रमासि कारण शांति--विनाशन न भजती सज्ञान रे ! बापा ! ॥१॥धृ॥
सद्गुरू भजिजे; अभिमानातें सांडिजे; शब्द न सरती येथें तुझे.
मन मारूनियां खुण बुझें रे ! बापा! ॥ छ ॥
मन हें माया, मानसें क्रीया, मन मरेवीण योगु वांयां रे!
मनें योगियां पावे तया दिगंबरा अद्वया रे ! बापा ! ॥ २ ॥

(३६२)

कामु कल्पना मानसें नाना, क्रोधु तयां दशगुणा रे !
देहा अधीना वीवेकहीना सद्गति कैं दुर्जना रे ! ॥ १ ॥ धृ ॥
बापा ! वेषें न तरिजे. माजलासि कां गुणमाजें ?
सांडीं माळा पुस्तक वोझें. गुरू सांगतील तें कीजे रे ! बापा ! ॥छ॥
विषयांची गोडी मनें आवडी. ज्ञानवादी यें प्रौढी रे !
ऐसा पाषांडी सूमत खंडी. दिगंबराते न जोडी रे ! बापा ! ॥ २ ॥

(३६३)

आत्मयारामा ! स्वरूपश्यामा ! योगधीमनस--विरामा ! रे !
निःकामकामा ! मंगळधामा ! तुझा संगु सप्रीयु आम्हा रे ! ॥ १॥धृ ॥
सखया ! पाउलें पाहिन. तेणें आनंदें राहीन.
मन प्रेमा गें ! गोवीन. न परतें मीं तेथून. ॥ छ ॥
सुवर्णवर्णा ! योगनिधाना ! आदिगुरो ! गूण--हीना ! रे !
ब्रह्मसंपूर्णा ! असर्वभाना ! दिगंबरा ! सगूणा ! रे ! सखया ! ॥ २ ॥

(३६४)

प्राणासि प्राणू हा कृष्ण-- तनू, परब्रह्म सगूण गे ! माये !
भक्तां अधीनु आनंदघनु. कैसा शोभे पद्मनयनु ? ॥ १ ॥ धृ ॥
गे ! बाइये ! तया मीं वेधलियें. आपें आप स्थिरावलियें वो !
बिंब गीळुंनि राहिलियें वो ! भेद--हीनत्व पावलियें वो ! ॥ छ ॥
चिद्गुण--भासू भेदविनाशू योगिहृदयपरितोषु गे ! माये !
निराभासु, स्वयंप्रकाशु, दिगंबरु, सुरधीशु, बाइ--ये ! ॥ २ ॥

(३६५)

डोळयाचा डोळा अवधूतु पाहिन नयनी.
उतावीळ मन माझें वेधलें गुणीं. ॥ १ ॥ ॥ धृ ॥

संगें संगें संगें रमइन गुरुचरणीं. दुजें नाहीं मना सुखकर केवळ जनीं.॥छ॥
देहिचा देखणा गुणगणसंगविरहीतु दीगंबरु दीनत्राता भेदवर्जितू. ॥२॥

(३६६)

पाहातां वदन येणें मन हरिलें गे ! माये !
परती न धरी देहीं. आतां करणें काये ? ॥ १ ॥ ध्रु ॥
संगें संगें संगें येणें मज गुणीं गोविलें.
विसरली संसारिक मीं. हें देह न कळे. ॥ छ ॥
देहचि अदेह मजप्रति जाणवे विवेकें.
दिगंबरीं तन्मय मीं रंगली सुखें. ॥ २ ॥

(३६७)

पाहातां पाहातां परवृत्ती पाहाणें बुडालें.
न पाहातां दीसे सखिये ! तें रूप न कळे. ॥ १ ॥ ध्रु ॥
ऐसें कैसें कैसें विपरित घडलें ? माये !
देहीं देह हारपलें; आकृती नये.
जन कीं वीजन सखिये ! भावना गळाली.
दिगंबरें निद्रा नव्हे; परि जागृती नेली. ॥ २ ॥

(३६८)

जागृति ना स्वप्न सखिये ! वो ! मनस विरालें.
सुषुप्ति ना तुरीया ऐसें काय वो ! ज्ञालें ? ॥ १ ॥ ध्रु ॥
ऐसें कैसें कैसें सखिये ! वो ! याचें साजणें ?
आप पर पारूपलें रूपीं देखणें ! ॥ छ ॥
अगुणाचा गूणू तो मज लागला गे ! माये !
दिगंबरु मीचि: मीं पर दुसरें काये ? ॥ २ ॥

(३६९)

बहुतां जन्माचा जिवलगु जीविचा विसावा
अवधूता ! तूं माउली; भेटसी केव्हां ? ॥ १ ॥ ध्रु ॥
पाहें, पाहें, पाहे, प्रतिक्षणीं तुझी वाटुली.
जगजनका सत्यमूर्ती चेतने मूळीं. ॥ छ ॥
अगुणु गुणात्मा गुणगणवर्जनु विसावा

दिगंबरा ! तुझा संगू आवडे जिवा. ॥ २ ॥

(३७०)

ध्यान करूं कैसा ? बहु मन चंचळ विकारी.
विषयांची चिंता, अवगुणू लागला वरी. ॥ १ ॥ धृ ॥
कैसें करणें ? मन माझे सोये न धरी.
हृदयींच्या द्रष्टा, तुजप्रति काइसी चोरी ? ॥ छ ॥
अवधूता ! आतां निजहित कवण करावें ?
दिगंबरा ! तुझें स्मरण धरिलें जिवें. ॥ २ ॥

(३७१)

काम–प्रकोप कोपा गुण–करणी गुण–करणी हराशु नोहे रे ! ॥१॥धृ॥
रे ! भ्रमिका ! भ्रमी तें कैसेंनि सोडिजे ? भ्रमणें विभ्रमु भोगिजे. ॥छ॥
दिगंबरा ! देवा ! श्रीचरणीं श्रीचरणी विक्षेपु होये रे ! ॥ २ ॥

(३७२)

योग–विक्षेप–ताप विष–हरणी विषहरणीं उपाऊ नव्हे रे ! ॥१॥धृ॥
रे मनसा शीतळ चंदन नमने. चांदु तपे, खरतर चांदिणें. ॥ छ ॥
दिगंबर–गुरु–भजनीं गुरुभजनीं विश्वासु नोहे रे ! ॥ २ ॥

(३७३)

येका सद्गुरूवीण बहु भजनीं बहु भजनी विश्वासु वायां रे ! ॥१॥धृ॥
रे ! मनसा ! श्रवणें मननें भजिजे. निदध्यासें पद पाविजे. ॥ छ ॥
दिगंबरीं चित्त सम करूनी सम करूनि विश्रांती पाहीं रे ! ॥ २ ॥

(३७४)

दृष्ट अदृष्ट भान गुणकरणी गुणकरणीं आभासु दीसे रे ! ॥ १॥धृ ॥
रे ! हरणा ! तरणींचें जळ न भजे. मायामय मनां हें मानिजे. ॥ छ ॥
दिगंबरे खूण भवहरणी भवहरणीं विश्रांति लाहिजे. ॥ २ ॥

(३७५)

श्रमतां आयासपंथें गुणकरणीं गुणकरणीं विश्रांति नाहीं रे ! ॥१॥धृ॥
रे ! मनसा सहज विश्रांति भोगिजे. नीज--निष्ठा निश्चळ राहिजे.॥छ॥
दीगंबरू आत्मा गुणहरणी गुणहरणी निश्चळ आहे रे ! ॥ २ ॥

(३७६)

नदियाकल्लोळ–जळें बहु धरणी बहुधरणी संप्लुत झाली रे ! ॥१॥धृ॥
रे ! चातका ! गगनीं जीवन झालिलें. महिगत सलील न भजें. ॥छ॥
दिगंबरेंवीण बहुभजनी बहुभजनीं विश्वासु नेघे रे ! ॥ २ ॥

(३७७)

आदितत्वगुणवर्जित निर्गुणपर निरंजन नीरंजनपर नीरंजन रूप.
ज्ञानगम्य गुणसाम्य सनातन परमानंदस्वरूपा ! ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतरूपदया ! शिवशंकरवर सच्चित्पर—सार
कृष्ण श्याम–रूप राजीव–लोचन सेवीन मी निरंतर. ॥ छ ॥
बंध--मोक्ष--हीन शुद्ध–सनातन पद सचिद्घन माये !
दिगंबर दीनजन–दयाकर हृदयीं भासत आहे. ॥ २ ॥

(३७८)

योगिराज--रूप ज्ञान--दयाकर वर--माये ! पर--माये !
मनस विगुंतलें त्याचां सेवनीं. तेथूंनि परति न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
अभिनवरूपगुणान्वित निर्गुण गुण–संजीवन माये !
देवदेव दीन--दया--मंदिर देखइन कयीं पायें ? ॥ छ ॥
गुणगणधर्म, विकर्मविनाशन. गुणवीवर्जन--रूप,
दीगंबर परब्रह्म, गुणार्णव, केवळ--मोक्ष--स्वरूप. ॥ २ ॥

(३७९)

ज्ञानसारपरविवर्जित, पद सदोदिन ब्रह्म.
देशकालवस्तुत्रया परिछिन्नतत्व अरूप अनाम. ॥ १ ॥ धृ ॥
श्यामळसुंदर, रूपविराजित, गुणमायातीत, माये !
चित्किर्तिभूषण, भेदविनाशन हृदयीं प्रकाशत आहे. ॥ छ ॥
आत्मब्रह्मज्ञान गुण–दिवाकरपर विश्वंभर--रूप
दिगंबर सुर--मानव--पूजित सेवित गुप्तस्वरूप. ॥ २ ॥

(३८०)

अवधूत रूप दयार्णव शंकर पर विश्वंभर माये !
परब्रह्म शुद्ध सनातन हृदयीं स्थीर न राहे ! ॥ १ ॥ धृ ॥
चंचळ हें चित्त, नित्य गुणात्मक, गुणसंपादक माझें.

योग–युक्ति नेणें तत्वाची खुण; भ्रामति विषयरस माझें. ॥ छ ॥
रजोगुणदोष विशेष विकंपित चळ चंचळ चित्त माये !
दिगंबरेंवीण माझें हें मन सहसा निश्चळ नोहे. ॥ २ ॥

(३८१)

भावविनाशन, भवमतिखंडन, गुणसंछेदन, नाम.
दुःख–दोष ज़ेणें ज़ाति विनाशोंनि. हृदयीं न संवरे प्रेम. ॥ १ ॥ धृ ॥
तें माझें जीवन परम—सनातन गुणसंकीर्तन तूझें.
येर ज्ञान ध्यान योगादिसाधन करितां हें मन लाज़े. ॥ छ ॥
भेदविनाशक स्वानंददायक निजसंपादक सार.
दिगंबरा ! तुझें नामचि साधन साधीन मी निरंतर. ॥ २ ॥

(३८२)

अगणित चंद्र मुखावरि वारिन, बलि संपादीन माये !
आदिगुरुरूप कैसेंनि वर्णवे ? उपमा न जें मन साहे. ॥ १ ॥ धृ ॥
सुर–नर–सिद्ध–निरंतर–सेवित गणसंपूजित माये !
ज्ञान, योग ज़ेथ विश्रांती पावले; तैं तया कारण होये. ॥ छ ॥
मणिगणमंडित कीरिट–कुंडल–युक्त सुशोभित कैसें ?
दिगंबरमुख मायावार्जित ब्रह्मचि केवळ ज़ैसे. ॥ २ ॥

(३८३)

पीत वस्त्र, पीत कानक भूषण, भाळीं चंदन शोभे;
अवधूतरूप सींहासनीं; पुढें मागें सूभक्त उभे. ॥ १ ॥ धृ ॥
श्यामळ वो ! नीरजाकृत लोचन सखिये ! पाहिन डोळां.
रूपलें हें मन; परति न धरी; आनंदी जीउ निमाला. ॥ छ ॥
अधर सुरंगीत; तांबूल बरवत; प्रभा दशनज फाके.
दिगंबरे विश्व मायिक सकळ येणेंचि लोपलें येकें. ॥ २ ॥

(३८४)

सुव्रत हेंचि माझें:– करीन स्मरणा. तुज़वीण न करी कल्पना. ॥१॥धृ॥
मीं राहिन तुज़ पां ! सुव्रतफळ सेवना. ॥ छ ॥
मनस गुंतलें माझें नीरंतर. नेघे आपुली संभावना.
दिगंबरा ! तूंचि सनातन तत्व तें. आणीक न धरीं मीं वासना. ॥२॥

(३८५)

सानंदपद माये ! श्रीदत्तू देखणा. तेणें माझी हरिली चेतना. ॥ १ ॥ धृ ॥
मीं कइसे करूं वो ! कुंठली देह—भावना. ॥ छ ॥
करणें निमालीं. ज्ञालीं मी मत्पर. अतिक्षिण गुणवासना.
दिगंबर सारभूत सत्य निर्गुण द्वैताची नुरवी संभावना. ॥ २ ॥

(३८६)

परमानंदु, माये ! सुरधीहरणु, गुणहीनु, माये ! हा अगूणु, ॥ १ ॥ धृ ॥
मीं पाहिन नयनीं. हा मज्ञ बैसला न मनी. ॥ छ ॥
परती निमाली; ठेली तदधीन. नेघे मन दूजी वासना.
दिगंबर परब्रह्म भेदशून्य हें. येणें हरिली माझी कामना. ॥ २ ॥

(३८७)

सगुण रूप तुझें हृदयीं गमेना. मन माझें पाहातां उरेना. ॥ १ ॥ धृ ॥
म्या काये वो ! करणें ? मीं मज्ञ चोरिलें येणें. ॥ छ ॥
शुन्यता ज्ञालीं भावीं निरंतर. भेदाची काइसी कल्पना ?
दिगंबर पारमुक्त निरंजन वो ! मी मज्ञ पाहातीसें आपणां. ॥ २ ॥

(३८८)

पढतमूर्ख ज्ञो कीं न धरी स्वमना; गुणहीन स्वरूप भज्ञेना. ॥१ ॥ धृ ॥
मीं कायें वो ! मीकाई ? अहंमानें नाडले बहु. ॥ छ ॥
मनोवृत्ति ज्याची नित्य कामातुर, तेणें आत्मतत्वभावना.
दिगंबर-भाव-मुक्तां गतिचि न दिसे. बद्ध ते ; ज़ळो त्यांची कामना ! ॥२॥

(३८९)

नये वो ! नये वो ! गूणा नयन लेंधले ध्याना.
गुणवेधु साहेना. अगूणा गुणात्मकु ॥ १ ॥ धृ ॥
कैं देखैन नयनीं माझें आरत. ॥ छ ॥
न सोडी, न सोडी ध्यान. पाहिन ययाची खूण.
दिगंबर निर्गूण, गुणगणान्वित. ॥ २ ॥

(३९०)

नयन श्रमले माये ! दुरूनि वाटुली पाहें.
येतां न देखें. काये करूं मीं वो ! आरत ? ॥ १ ॥ धृ ॥

दुरि घ्येलें वो ! सखिये ! मज येथूनी. ॥ छ ॥
कवण करील भेटी ? आस्थां लागली मोटी.
दिगंबरु ये दृष्टी पाहीन मी आरुप. ॥ २ ॥

(३९१)

कमळ नयनूं माये ! नये चि; करूं मी कायें ?
मन माझें न राहे; जालेंसे भ्रमित. ॥ १ ॥ धृ ॥
न जियें वो ! मी. सखिये ! बहु आरत. ॥ छ ॥
दाउँनि गेला वो ! रूप. त्रयासि लागलें माप.
दिगंबर स्वरूप कें मी देखइन ? ॥ २ ॥

(३९२)

श्रवण श्रवणगुणीं रूपीं नयन दोन्ही
मन जडलें ध्यानीं तुझां निरंतर ॥ १ ॥ धृ ॥
परतेना रे मनस माझें तेथूनि ॥ छ ॥
हृदय भरलें प्रेमें वाचा घेतली नामें
दिगंबरा संभ्रमें नाचे हें मनस. ॥ २ ॥

(३९३)

कवण सुकृत माझें ! स्वरूप देखिलें तुझें !
देवराया आरजें, साधनें वांचूनीं. ॥ १ धृ ॥
कइं नेसी ? मी येइन तुज सांगातें. ॥ छ ॥
न सोडीं, न सोडीं आतां. भेटसी कें मागुता ?
दिगंबरा भवेवथा बहू अनुभविली ! ॥ २ ॥

(३९४)

कानडा

स्व–पर–जनीं तुज वांचूनि नेणें मी विपरीत.
मनस तें हीं तुझांचि ठायीं; माझें नूपडे चित्त. ॥ १ ॥ धृ ॥
तूं ये रे ! गुणनिधान ! माझां बैस हृदयीं.
तुजवीण न स्मरो कांहीं. थिरो मन तुझांचि ठायीं.
दत्ता ! रे ! सत्य जाणयीं. ॥ छ ॥
कर्मसाधनीं सूटिका जनी न पविजे पर पारु.

दिगंबरा ! तूं बोल पां ! मातू; धरीन तोचि विचारु. ॥ २ ॥

(३९५)

डोळ्यां डोळा जीवनकळा, सुखाचें सुखसार,
आठवे. देहीं वीसरूं नाहीं. दत्ता ! तूंचि माहेरा. ॥ १ ॥ धृ ॥
मी नेणें मंत्र विधान. नेणें, बोलों मी कांहीं ?
मन माझें गुंतलें, पाहीं, श्रीदत्ता ! तुझाचि ठायीं.
पुनरपि भेटसी कयीं ? ॥ छ ॥
तुजवांचून हें परजन माने थोर निदान.
दिगंबरा ! तूं जीवन. हेतुमातु न कळे आन. ॥ २ ॥

(३९६)

रूप ना छाया, गुणु ना माया, क्रीया कर्म विहीन,
शून्य, अशून्य लोपलें ज्ञान. मना नेणवे खूण. ॥ १ ॥ धृ ॥
तूं रे ! निरंजन जीवा कां घेतासि धावा ?
वायांवीण भरसी हांवा. पाहे पां ! मूळिच्या ठेवा.
कवणु रे ! देउनि दैवा, करी पा ! सद्गुरू सेवा.
बोधु तो पडेल ठावा. ॥ छ ॥
देउ तो देही दूसरा नाहीं. कहीं देउ देवास ?
दिगंबरातें ज्ञाण स्वमतें; सांडीं सर्व साभास. ॥ २ ॥

(३९७)

अगुण गुणी गुणनिदानी ध्यानीं मीपण खाये.
अभासु तोही न गमे; कांहीं देहीं विसरू होये. ॥ १ ॥ धृ ॥
गुणा गुणी नलगे वारा. परात्पर मी ज्ञाली.
चंचळ चळें मानसें मेलीं ॥ छ ॥
चित्त निमालें; चेतन ठेलें; मेलें द्वैत सकळ.
दिगंबरेसी मिळणी: ऐसी माया हे मृगजळ. ॥ २ ॥

(३९८)

दृश्य विनाशें दर्शन प्रासें. कैसें देखणें होये ?
द्रष्टत्व वायां सांडुनि तया माया रहितु ठाये. ॥ १ ॥ धृ ॥
तूं घे स्वरूप विचार. येर साधन वायां.

निश्चळपणें राहिजे ठाईं. गुणी गुण पाहासी कायी ?
तुजवीण काहींचि नाहीं. आतमयां निश्चळु होयीं. ॥ छ ॥
अवस्था च्यान्ही करूनी दूरी, धरीं सहज ध्यान.
दिगंबराचें बोलणें ऐसें. मिथ्या येर साधन. ॥ २ ॥

(३९९)

देखोनि चिन्ह रूपलें मन; ध्यानचि लागलें माये !
परति नाहीं करणें कायी ? देहीं भोगु न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
हां वो ! गुण–कृत–सार अनुस्पंदु न करा.
चंचळ मन न चळे सैरा. न धरी बुद्धि विचारा.
ज्ञाणपण सारा, सारा. ॥ छ ॥
त्रिगुण–क्रिया गेली विलया. माया मान अमान.
दिगंबरातें देखिलें; तेथें गुणीं गुंपलें मन. ॥ २ ॥

(४००)

सद्गुरूवीण बोलणें, ज्ञान, ध्यान तें वायां जाये.
कर्म सेवया न तुटे माया; वायां ज्ञाति उपाये. ॥ १ ॥ धृ ॥
तूं दे रे ! दर्शन देवा ! श्री–दत्ता ! राया !
तुजवीण न तुटे माया. योग–धर्मु जातुसे वायां.
न वचें मी आणि–का ठाया. येईं वा ! श्री–योगिराया ! ॥ छ ॥
येक ते मौनी; येक ते ध्यानी; ज्ञानी; येक वाचाळ.
दिगंबरेंवीण चूकले प्राणी; करित्ती तळमळ. ॥ २ ॥

(४०१)

मनुजा रे ! वीण श्रीगुरुनाथें वायांचि धांवासी योगपंथें. ॥ १ ॥ धृ ॥
तैसें नव्हे आन सुखा; हें तुं पै ज़ाण. नोहे दुःखाचें हरण. ॥ छ ॥
देहीं नाहीं तरी नाशी; तयांचा गुरुविण सुखा ठाउ कैंचा ?
मनसीं दिगंबरु संचरे; जें देउ चि होणें; तई येर काई ? ॥ २ ॥

(४०२)

॥ भिन्न चाली ॥

मन गुण चारी चले चंचल अहितपर.
वेदना हृदय विदारी. वेदना भयद निवारी.

आतां संगु सखया ! दे. ॥ १ ॥ धृ ॥
सांग देवा, कयीं येसी ? मातें भेदु न साहे.
छेदी समळ भवद हें. हरीं समळ ॥ ० ॥ छ ॥
जन, धन, जाया, माया—बंधन, बाधक—गुण.
निरसी जनन येथूनी. देवा ! दिगंबरा ! तूं ये. ॥ २ ॥

(४०३)

॥ भिन्न चालि ॥

सकळ सुंदर रूप आठवितां मनीं वियोगवेथा. ॥ १ ॥ धृ ॥
सैये ! कामना कामना पूरवी. तेणेंसीं करा भेटी. ॥ छ ॥
देव दिगंबर स्मरतांचि माये ! मीपण विरोनि जाये. ॥ २ ॥

॥ भिन्न चालि ॥

(४०४)

परम शंकर शिवरूप माये ! दृष्टी केवि मीं पाहें ? ॥ १ ॥ धृ ॥
सैये ! देखणें येथूनि नुरवी. शरीरें साही न तूटी. ॥ छ ॥
देव–दिगंबरीं आतां भेटी—लागि आत्मत्व न धरीं आंगीं. ॥ २ ॥

॥ भिन्न ॥

(४०५)

नको मनसा विषयांची कामना. भारी बाधकु संसार सिवणा. ॥१ ॥धृ॥
वंचली हीता; ज़ाहाली हारी; मीं कैसें करूं ? हें दुराचारीं. ॥ छ ॥
गुणगणवैरी ययां हातीं पडली मज़ नुमजे करणी.
काये करीं ? दिगंबरु देउ स्मरें अखंड.
तया वांचूंनी नाहीं वो ! सुखकारी. ॥ २ ॥

॥ काफी ॥

(४०६)

नको करूं रे ! दूरी आतां. बहु श्रमलें मन
नेणों दुसरें मानसें देवा ! दत्ता ! तुज़वीण न दिसे सुखद. ॥ १ ॥ धृ ॥
प्राण—सखया ! तुविण निरसी दुःख कवण ? ॥ छ ॥
देइ वर—दा हातु मागें.
भयद दिसे भाम; येथें न भजे आणिकां. देवा !

देवा ! दिगंबरा ! न करीं कठीण. ॥ २ ॥

(४०७)

दत्तू कव्हणीं दावा डोळा. रति गुंतलें मन.
काय चुकलीं ? नेणवे सैये ! गेला अवधुतु विजनीं सांडुन. ॥ १ ॥ धृ ॥
योगवरदा वांचूंन, हां वो ! ज्ञानवरदा ०, ॥
योगवरदा ०, ॥ ज्ञातिल विकळ प्राण. ॥ छ ॥
दीर्घे आळवीं; सादु घालीं; न ये अश्रुणीं माये !
कोठें न कळे गुंतला ! सैये !
देउ॰ दिगंबरु नव्हे वो ! निष्ठुरु. ॥ २ ॥

(४०८)

सुर तेरी लाल पियारी
ज्याउंगी बलि हारी हारी, पिरत लगी तेरी.
सुध बिसारी बादी लाल तुह्मारी हो ! ॥ १ ॥ धृ ॥
लाल देखुं केउं नही ? मेरे मेरे ये लाल देखुं केउं नहीं ? ॥ छ ॥
दील सुच्चोरी खासत तेरी.
ज्याउंगी, ज्याउंगी, बलि हारि रे ! ॥ २ ॥
सार दुराई सारी सारी.
दिगंबर ! तेरी कैसी यारी ? ॥ ३ ॥

॥ तोडी ॥

(४०९)

कीती सीकवाल मातें ? ज़ाइन मीं तेण पंथें.
अवधूती रती; चीत्त न सोडी तयातें. ॥ १ ॥ धृ ॥
वेधु लागला वो ! साज़णी ! आतां रंगलीयें त्याचा गुणी.
नाइकें मीं सीकवण. न बोला कव्हणी.
देहे बुद्धी हारपलीं शंका सांडिली वो येणें.
दिगंबरें येणें हरिली वो ! ॥ २ ॥

॥ भिन्न ॥

(४१०)

अति प्रीति न सुटे मज़. काये करूं ? कठीण हे !

मन नव्हे! न संडी ममता! ॥ १ ॥ धृ ॥
बोलिज्ञा वो! बोलिज्ञा माये प्रति माझा.
श्रमु बाइये! साजणी! करि. ज्ञा, वेगा. ॥ छ ॥
विसरु न पडे क्षणुही. पडिला वो! मनी मज़.
दिगंबरु देउ ते न सुटे. ॥ २ ॥

(४११)

गुणवृत्ती ज़ाली क्षीण भासे दुरी शरीर हें.
मन मरे. निमाली ममता. ॥ १ ॥ धृ ॥
देखिला देउ, देखिला हा अवधूतु डोळां.
श्रमु बाइये! येथूंनि अवघा निमाला. ॥ छ ॥
अविसरु आठउ गेला. भेदस्पंदु हारपला.
दिगंबरु देउ हा देखिला. ॥ २ ॥

॥ भिन्न ॥

(४१२)

संसारीं ये तुंवीण माये! मीं केवि धरूंनि धैर्य राहें? ॥ १ ॥ धृ ॥
ये; ये; हृदयीं स्थीरु राहें, श्रीदत्ता! हेंचि विनवीं तुतें मीं सर्वथा. ॥छ॥
विण तुवां येथें आप नाहीं कव्हणीं. दूरि होसी ते वेळीं काये गती?
देवा! दिगंबरा! कमळनयना! संसारीं सांडूंनि मातें न ज़ावें. ॥२॥

॥ भिन्न ॥

(४१३)

कवण करील भेटी? पाहिन पाउलें दृष्टी.
ज़ाहालें मनस कष्टी. कर्म लागलें पाठीं. श्रमली भारी वो! माये!
दत्तेसीं पडली तूटी. ॥ १ ॥ धृ ॥
येइं रे! येइं कमळनयना! आत्मयां!
वाचूंनि तुज़ न भज़े मीं दूसरी क्रिया. ॥ छ ॥
दिगंबरा! होसी माये. पाहासी निदान काये?
येकुदां पाहीन पाये. मग मी पुडती देवराया!
तुज़ सोडूंनि न ये. ॥ २ ॥

॥ भिन्न ॥

(४१४)

वय गेलें हें क्षीण बहू गूण. नेणवे स्वहित--सोये या मना.
देवा येई रे! सुखनिधान! ॥ १ ॥ धृ ॥
न सोडीं येथूंनि पाये. मनीं भेदु न साहे.
मंगळ! गुणनिधान! ॥ छ ॥
योगधन तूं माझें दिगंबरा! आत्मया! तुंविण नेणें दुसरा.
देवा! निवारी या संसारा. ॥ २ ॥

(४१५)

आशा धरूनी मनीं वाट पाहें. ज्ञाला उशीरु; दत्तु कां नये.
आतां न ज़िये येथुंनि माये! ॥ १ ॥ धृ ॥
सांडिळी सोये. कां येणें सांडिली सोये? आतां करूं मीं काये?
पाहिन पद्मनयना ॥ छ ॥
दयासागरा! गुरो! दिगंबरा! मुख आठवे तुझें माहेरा!
देवा न दवी या संसारा. ॥ २ ॥

॥ कानडा ॥

(४१६)

निर्मळ कैसें हो चांदिणें स्फुरताहे मनें.
चंद्रबिंबेवांचूंनि तेणे अरूपगुणें ॥ १ ॥ धृ ॥
न कळे, न कळे, माये! नयनीं तयाची सोये. ॥ छ ॥
निर्मळ मतीचें देखणें निमालेपणें
दिगंबरें दावीलें येणें कैसें मीं नेणें? ॥ २ ॥

(४१७)

केवळ दृष्टीचें देखणें हरिलें वो! येणें
स्थूळ--देहा--भासु मीं नेणें याचेनी गुणें. ॥ १ ॥ धृ ॥
वारलें, वारलें, माये! भान. तें आयासि न ये. ॥ छे ॥
अगुणगूणें वो! गुंपली; आसक्त ज्ञाली;
दिगंबरें प्रबोधली; मीं चि मीं ज्ञाली. ॥ २ ॥

॥ कानडा ॥

(४१८)

श्रीमुख पाहातां सगूण हरिताहे गूण.
पारुषलें माझें हें मन; लागलें ध्यान. ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! माये ! ययाचें दर्शन आहे. ॥ छ ॥
भद्रपपणें दीसे भेदु; कुंठे अनुवादू; दिगंबर गुणवेधु हरी विभेदु. ॥ २ ॥

(४१९)

पद्मनयनाची दासी ज्ञायीन पासीं;
आडीन श्रीचिरण केंसीं; आवडि ऐसी. ॥ १ ॥ धृ ॥
न ये वो ! न ये वो ! माये ! पुडती संसारा न यें ! ॥ छ ॥
आंगण आडीन शरीरें येणें साकारें. विसरैन दीगंबरें भान दूसरें. ॥ २ ॥

(४२०)

चंचळ मन माझें माये ! स्थीर न राहे.
याचे धरितां जीवीं पाये विक्षेपु होये. ॥ १ ॥ धृ ॥
नवल ! नवल ! रे ! मना ! धरूनि श्रीदत्तचरणा. ॥ छ ॥
स्वरूप सिद्धीचें पाहणें हरिलें वो ! येणें.
दिगंबरें निर्गुणगुणें गोविलीं मनें. ॥ २ ॥

(४२१)

स्वगुणीं केवळ मन ठेवितां अखंड
निरंतरीं राहिली मी. तेणेंविण पर नेणें. ॥ १ ॥ धृ ॥
मंत्रसारपद तयी मुख आठवे. परम निधान,
पावेनि विश्रम, वदनीं गुंपलें मन. ॥ छ ॥
प्रकाशकपर---परब्रह्म न भजे लाभा. हेतु ही निर्मळ पादविना.
अरेरे ! गुणशीळा ! दिगंबरा ! देईं तें क्रीयेचें निवर्त्तन.
ध्यानीं मीं ध्यायिन तुझें रूप गुणपूर्ण. ॥ २ ॥

(४२२)

गगनी पातळपणें न धरे प्रचंड निरंतर.
निर्गुण मी प्र... अनुभवें जाणें. ॥ १ ॥ धृ ॥
सत्यसार सुखमयी स्थिति लागली. निवळलें सार.

न पवे मी श्रमा. गुणीक ज्ञालें क्षर. ॥ छ ॥
विवेदक परम त्रिकंप निरंतर प्रभा तात्विकी निर्मळें सत्वगुणें
मति चंचळ ते खाये. दिगंबरु देहीं तया कैचें बंधन ?
ध्यान कें साधन ? ऐसें मीची मज ज्ञाणें. ॥ २ ॥

॥ काफी ॥

(४२३)

त्रिविध—तापु तपे तपनु हा वो ! परम भय दिसे आह्मां.
कवण दुरित—फळ ? वियोगु मि नेणें. कोण भेटविल आह्मां ? ॥ १ ॥ धृ ॥
श्यामळ दावा वो! सुंदर दावा! ॥ छ ॥
जननि हा वो! जनकु हा वो! येणेंविण नाहीं आह्मां.
चरण धरिन आतां. न सोडि मिं सहसां. निजपद ठेविजे आह्मां.
देवा! दिगंबर! दासदयाकर! सत्वर पावेल आह्मां. ॥ २ ॥ छ ॥

(४२४)

भवसागरीं बुडतां कवण पावइल?
सत्य सांग अवधूता! जरी वो! संडिसील.
आश करूं मीं कवणाची ? कवण सोडवील ?
नको नको ऐसें करूं. प्राण वेच्चतील. ॥ १ ॥ धृ ॥
येइ; येइं रे! येइं रे! येउंनि भेटी देयीं. अद्वयानंदकंदा! तुझा वेधु देही.
माये बापु तू श्रीदत्ता! तुज्ञवीण आनु नाहीं.
अंतकाळिच्चा सोयरा. आळंगीन बाहीं. ॥ छ ॥
दुःख करितां सोषोनि शरीर कोळ ज्ञालें.
कर्मवेगें जन्मकूपीं ज्ञाउंनि पडिनलें.
मार्ग न कळे यावया. भ्रमित चित्त ठेलें.
दिगंबरा! तुझें दीन कां मज्ञ सांडियेलें. ॥ २ ॥ छ॥

(४२५)

जन--स्वजन--वीजन--वन मी भ्रमताहें.
सोये न कळे दातारा! तुझी. करूं काये!
छाया, जीवन, विश्रांति येथें ते न पाहे.
भय उपजे मानसीं तें दुस्तर माये! ॥ १ ॥ धृ ॥

येईं; येईं रे ! येईं रे ! चिदानंदभाना !
परब्रह्म तूं सावळें दत्ता ! परिपूर्णा.
कृपापीयूषजळधारा ! अगुणगूणगूणा !
सर्व सुखाचें निधान तुझा वेधु मना. ॥ छ ॥
कामक्रोधाच्या अडसरीं पाउल न धरवे.
नव्हे, नव्हे तो सूपंथु. मी ज्ञाइन जीवें.
अहं-सींहाची गर्जना. कुंजर मदु पावे.
दीगंबरा ! तुझी आशा घ्येली येणें जीवें. ॥ २ ॥

(४२६)

वय वेचलें सकळ. निदान वरि आलें.
देहभावावीगळीत स्वजनीं सांडियेलें.
वातापित्तकफ तिन्ही येक वाट ज्ञाली.
बुद्धि विभ्रमें व्यापीली प्राण-प्रयाण-काळें. ॥ १ ॥ ध्रु ॥
येईं; येईं रे ! येयिंरे ! सद्गुरू ! योगिराया !
भक्तजन-सुरतरू ! अमीत- गुणवीर्या !
अपराधी मी केवळ लागयीन पाया.
माये बापु तूं आमुची; झणें सांडिसी मायां. ॥ छ ॥
प्राण करिती स्पंदन; चैतन्य पारुषलें.
आठवणेचा हरासीं मन हें पांगुळलें.
तंद्रिकेच्या समारंभू त्यावरि काये चाले !
दिगंबरा ! ययाल्यागी आतांचि आठवीलें. ॥ २ ॥

(४२७)

अवस्था चौवीज्ञणी बोलती अंगना वो !
अनसूये ! तुझा पुत्रु तो न राहे पाळणा वो !
यावया झेंप घाली ! न रंजे खेळणा वो !
यया स्वरसें सांतवी ! जे हे मनीं वासना वो ! ॥ १ ॥ ध्रु ॥
येईं; येईं रे ! येईं रे बाळा ! कृष्णवर्णा !
तुझें पाहातां वदन दाटिताहे पान्हा.
करीं स्वरस प्राशन. विश्रांति पावे मना.

आलिंगण देती बाळा तया गुणहीना. ॥ छ ॥
अनसूया बोले सती तुझी वो ! रस नाना
सेवा. इच्छेचें रसीक माझा बाळु ताना.
यया अपथ्य होयिल गुणी वो ! गुणहीना.
रसु न साहे परावा; यया देयि ज्ञाना. ॥ २ ॥
येरि बोलती सुंदरा अभ्यासु न लवी वो !
सकळ ही रस सम हे स्थिति बरवी वो !
मुखीं घालुंनि स्तनातें झांकिती पालवीं वो !
येरु करी तद्रसपान; भेदासि नुरवी वो ! ॥ ३ ॥
अवधूतसंगें बाळा भेदु विसरली-या
अवृत्तीचें देखणें तन्मय पातली-या.
अवस्थांच्या भेदु नाहीं स्ववृत्ती योगिराया.
दीगंबरें वीतूळलें तपस, भेदु, माया. ॥ ४ ॥

(४२८)

येकि बोलती अवस्था मीपण पारुषलें.
देह गेह सर्व भान नेणवे; काये ज्ञालें ?
वेग मोडले गुणाचे; मनस पांगुळलें.
व्यवहारीक न कळे. ऐसें वो ! येणें केले ! ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ! रामा ! रामा ! राम विराम रामा !
तुझा संगु न साहावे वीषयकामकामा !
अद्वयानंदानंतानंतपुरैकधामा। !
भवबंधमोचना ! दत्ता ! शुद्ध श्यामा ! ॥ छ ॥
येकी बोलतां बोलणें बोलु विसरलीया.
निर्विकल्पीं अखंडता पूर्णत्व पावलीया.
येकि चालती शरीरें करवीति क्रिया.
परतंत्रे व्यवहारु; गेला जन्मु वायां. ॥ २ ॥
येकी अन्वयें तन्मय भान निबोधलीया.
व्यवहारी समाधान स्वरूप पातलीया.
दृश्य सकळ चिन्मय व्यवहारु क्रीया.

दिगंबरें ऐसें केलें छेदिली मूळ माया. ॥ ३ ॥ छ ॥

(४२९)

हातीं धरूंनि स्वसुत्र नीजानंद पदीं
नीज्ञऊंनी दत्तात्रेया, माता तत्व बोधी.
येरु न रंजे; तीचें निवृत्तिसि मानु नेंदी.
तयां दोघांच्या संवादीं पारुषे मन बुद्धी. ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञो, ज्ञो, ज्ञो, रे ! तुं नीज्ञ बाळा ! अवधूता !
मनीं मानस घालूंनी डोळा लावि आतां.
अवस्थेच्या संगु सोडीं स्वसुख सिद्ध घेतां.
गुणवृत्तीचें रंजन पुरे करि आतां. ॥ छ ॥
कर्मयोगी दुरावले; तयांसि नीज्ञ नाहीं.
हटयोगियां लागला मुद्राबंधु देहीं.
गोष्टि कायिसी येरांची ज्ञे व्रहु नित्य देहीं !
दिगंबरा ! नीजरूपीं निश्चळु स्थीरु होयीं. ॥ २ ॥

(४३०)

सखी बोले::— वो ! ययासी नाहीं वो ! नीज्ञ नाहीं.
मायावी याचें रूप; क्रीडा बोधु देहीं.
सावधानु हा; ययासी नीदवीसि कायी ?
अनसूया ह्मणे::—तुह्मीं सीकवा यासि काहीं. ॥ १ ॥ धृ ॥
नीज्ञ, नीज्ञ रे ! नीज्ञ रे ! नीज्ञ, नीज्ञ, बाळा !
नीज्ञ वृत्ती नीजानंदी दत्ता ! लावि डोळा.
स्पंदु न करीं. गुणाच्या बागुलु येईल काळा.
पंचवदनु पंचात्मा प्रपंचु तात वेळा. ॥ छ ॥
येरु बोले::—वो ! सर्वथा नीजासि नीज्ञ नाहीं;
नीजरूप सर्व माझें; प्रपंचु येथ काई ?
नीजवृत्तीचें नीज्ञणें आतां कवणें ठायीं ?
दीगंबरु सर्व नीज देहात्मकु देही. ॥ २ ॥

(४३१)

माये ! बापा ! श्रीसद्गुरू ! येऊंनि भेटि देयीं.

माझें मन उतावीळ; तुझा वेधु देही.
योगु न करीं. साधन तें नलगे काहीं.
पाये पाहोनि निश्चळु होयीन तये ठायीं. ॥ १ ॥ धृ॥
अवधूता ! दतात्रिया ! सद्गुरू ! देवदेवा !
तुझें नामानुस्मरण प्रेम प्रीय जीवा.
अळवीन वेळोवेळां आत्मयां पूर्णभावा.
नीजभक्तचिंतामणी पावसील केव्हां ? ॥ छ ॥
ज्ञानसागरा ! सर्वज्ञस्वामी ! योगिराया !
सिद्धराजा ! मंत्रमूर्ती ! नीवारीं भेदुमाया.
नमो कालाग्निशमना ! दत्ता ! गूणवीर्या !
दिगंबरा ! कृष्णरूपा ! लागयीन पायां. ॥ २ ॥

(४३२)

देहदेवालय आउठ हात ज्ञेय पंचभूतमय आकृती आलें.
येथें प्राणाचा आधारू; या मनाचा व्यापारू;
गुणकरण विकारु नवहि द्वारें. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ईश्वरा प्रबोधु तो पुजारा. योगिया अवसरा जाणोनि आलें. ॥छ॥
धरणी ना जीवन; वायो ना गगन दहना नाहीं स्थान निरालंबी.
अभावाची शोभा, चिद्वस्तूची प्रभा, बैसला ना उभा आत्मारामू. ॥२॥
स्वस्थिती आसन; चिद्वस्त्र परिधान; सन्मय निर्गुण बरवतसे.
निर्मळता चंदन; सुमन शुद्धमन; कामक्रोध गूण धूपियेले. ॥ ३ ॥
स्वानंदु उपहारु; मंत्रू ना उच्चारू; गुरुमुद्रा प्रकारु; तो सर्व होये.
अंतु नाहीं पारू; वर्णु नां आकारू;
ऐसा दिगंबरु प्रकटु जाला. ॥ ४ ॥

(४३३)

सुरतरु चिंतामणीयें जाली ठेंगणीं. दत्ता तुझां गुणी दृष्टांतु नाहीं.
मंत्रबीजसार, अर्थाचें अंतर, गुणाचें मंदीर, कैं देखयीन ? ॥ १ ॥ धृ ॥
सिणलिये दातारा; मीं न करिं येरधारा; येउंनि माहेरा; मज भेट देयीं. ॥छ॥
मोक्षाचें कारण; तूं जीवाचें जीवन; योगसारधन देवाधिदेवा !
डोळ्यांचा डोळा; तु ज्ञेय—ज्ञानकळा;

अवधारीं श्यामळा ! श्री—दिगंबरा ! ॥ २ ॥

(४३४)

मोतियाचें पाणी माये ! लोटलें आंगणीं;
कारण—गणगुणी गुणासि आलें.
कांडणीं उधळा कर्पुरु गंधु गेला; तयाच्या लागलावेधु मज. ॥१॥ध्रु॥
गुणवृत्ती बोधन माये ! बगळलें चैतन्य.
या कां वो ! मीपण मी पारुषली. ॥ छ ॥
सुमनाची कळा; मज नाणावो आडला;
माये ! मीं परिमळा गुंफयेनि.
व्योमाची चाळणी; मी चाळीन त्याचा गुणीं;
मीपण वो ! मधुमीं विसार पाहें. ॥ २ ॥
मायेचें मापटें वो ! अनुमेयासि खोटें;
भरीन मीं आतुटें हृदयामाजी.
दिगंबरगुणीं गुंपलें साजणीं ! मन माझें परतोंनी ठायासि न ये. ॥३॥

॥ श्रीराग ॥

(४३५)

ऋषि—पुत्रांतें घेउंनी भ्रमतां विषयवनीं
अवधूतु हा तेथूंनि अदृष्ट जाला. वनफळाचें सेवन,
विषय माजीर, गुण भयद, सकळां भान भासतें जालें. ॥ १ ॥ ध्रु ॥
श्रीदत्ता ! आरे ! दत्ता ! ये दत्ता ! ये रे ! दत्ता !
विष–वीषय–सेवनी भ्रमलों विभ्रमें गुणी.
सोडविता तुजहूंनी न दिसे येथें. ॥ छ ॥
आमृ ह्मणौनीं सेविला; पंचाननु तोचि
जाला; व्याळ—रूपें परतला; व्याळुही नव्हे.
काये होयील ? न कळे; लागले आमुचे डोळे;
चित्त भ्रमातें पावलें; कुंठलें जीणें. ॥ २ ॥
खरतरु प्रज्वळला वन्ही ऐसा दीसे डोळां.
क्षणां येकाचि सकळां सुखदु गमे.
ऐसी करितां सोसणी; विश्रांति न दिसे मनीं.

ऋषिपुत्र परतोनि पाहाती दत्ता ! ॥ ३ ॥
येक करिती स्मरण; येकांतें लागलें ध्यान;
येक दुःखें आक्रंदन तेंचि ज्ञाणती.
स्वजन करुणाकरू पावला श्री दिगंबरु.
हेला—मात्रेंचि संसारु वेगळा केला. ॥ ४ ॥

(४३६)

वनक्रीडा संपादूनी बाळक गोविले गुणी;
दीपें आपुलां दर्शनीं पतंगु जैसे.
तयां सहीत मागुते चालतां दक्षिणापंथें,
जळधरीं प्रवेशते ज्ञाले श्रीगुरू. ॥ १ ॥ ध्रु ॥
ये दत्ता ! ये रे दत्ता ! श्रीदत्ता ! ये रे ! दत्ता !
भवचक्रें हें भ्रमतां सकळ पावलो वेथा.
न तरवे हे सरिता तूज्ञवांचूंनी. ॥ छ ॥
सागरु तो हा संसारु. नव्हे लौकीक जळधरू.
तरे , तारी तो सद्गुरु प्रगुप्त असे.
तेणेंवीण न तरवे; निश्चयो ज्ञाहाला जीवें.
परतले ते अवघे कवणे हेतू ? ॥ २ ॥
शास्त्रावादी वादमुखें, कर्मे दांभीक दांभीकें,
योगत्रासु अवेदकें प्रकट ज्ञाला.
आले ते तैसेचि ज्ञाती; गेले ते न परतती;
योगु हा लोपैल क्षीती ऐसें ज्ञाणोंनी. ॥ ३ ॥
नाभिप्रमीतु संसारु दावीतु ठाकला गुरू.
नग्न रूपीं अवतारु धरिला देवें. स्वर ! सुयोग ! युक्ती
धरूनि दोन्हीं हातीं या रे ! सांडा येथ भीति; बोलता ज्ञाला. ॥ ४ ॥
निश्चयिकां भक्ताप्रति प्रकाशी आपुली स्थिती;
भवभयाची नीवृत्ती केली तत्कालें.
गुणीं गुंपलें चैतन्य. तेंचि तें स्वरूप ज्ञान.
दिगंबरें स्वबेदन प्रकट केलें. ॥ ५ ॥

(४३७)

समळ हें दूरि करि; त्रिविधताप संहरि; मन माझें चरण दृढ धरीं.
तुजविण संसारिं कवण पां ! आह्मां तारि ?
कठिण न करीं; गुरो ! दया करिं. ॥ १ ॥ धृ ॥
शरण मीं असें नानापरीं. उचित तें मज करिं दीनु जरी. ॥ छ ॥
बाळक मि तुं जननी. उदास न करि मनीं.
भय वाटे ये विजनी. पाहे नयनी.
निदान न करि मनी. कवणा लागों चरणी ?
दिगंबर निरंतर येई ध्यानी. ॥ २ ॥

॥ श्रीराग ॥

(४३८)

सकळ-तीर्थ-- अवगाहन गूण-कीर्तन भवतम-संहरण वो !
क्षेतसेवनाहूंनि आगळें; पारु न कळें; ऐसें नामस्मरण वो !
प्रेम—परमपद—प्रापक, तत्व—वेदक, अनश्वर, योगधन वो !
भक्त-प्रेमळ अनुवाद; ते संत परिसते;
तेंचि अविद्यादहन वो ! ॥ १ ॥ धृ ॥
न्या कां मज वो ! तया संगमा ! चिद्घनोपमा मळ हरतीत्रिगुण वो !
येर मृन्मय क्षेत्र; सगुणतीर्थ-जीवन; तेथें न रमे हें मन वो ! ॥छ॥
काशी द्वारकादीकें जळ जलना स्थळ स्थळ पानीय केवळ वो !
काम कल्पनांकुर आगळे; क्रोध पीकले; पोषे दंभाचे मूळ वो !
दिगंबराचें गुण—गायन तेथें जायीन; दोष हरती सकळ वो ! ॥२॥

(४३९)

करितां ययाचें गुणश्रवण--संकीर्त्तन भेदु विसरलें मन वो !
गुणी गुंपलें चित्त नूपडे; आन नावडे मातें, योगसाधन वो !
क्रीया कर्म हें अनुबंधन श्रमवर्धन; तें मीं न करीं सेवन वो !
तेथेंचि वीरोनि जाइन मने; येणें मीपणें वायां बोला दूषण वो ! ॥ १ ॥धृ॥
याति कूळ वो मातें न पूसा; अपरवशा तुह्मीं जा, जा येथूनि वो !
अवधूतगुणीं मी वो ! गुंपली; मती रातली; कुटिलवदा पापिणी वो ! ॥छ॥
जनवादू तो मज न कळे; मन मातलें; आपपर वीसरलें वो !

गुणकरण--- गण सकळ धर्म वीकळ तनुत्रय वीतुळलें वो !
विषम , समत्व , सम , साम्यता , अहं, ममता, दोषु देहीं नाडळे वो !
दिगंबरेंसीं ऐसें घडलें; द्वैत नाशलें; माझें मज़चि नाकळे वो ! ॥२॥

(४४०)

करितां ययाचें गुणगायन वो ! प्रीतिश्रवण वो ? प्रेमें नर्त्तन वो !
वेधलें तदंग चित्त चेतन वो ! गुणकरण वो ! लागलें ध्यान वो !
न भज़ें आणीक मंत्रसाधन वो ! योगसेवश्रमन वो ! कारण वो ! ॥१॥धृ॥
केधवां पाहीन मन--मोहनु ! करुणेक्षणु वो ! अब्जलोचनु वो !
श्रीदत्तु सावळां सुखवर्धनु वो ! गुणी अगुणु वो ! ब्रह्मसगूणु वो ! ॥छ॥
कयी कयी मीं दृष्टी पाहीन ? वो ! भेटि लाहीन वो ! सर्वे ज़ायीन वो !
चरणजजळ मळमोचन वो ! सुखवर्धन वो ! तें मीं सेवीन वो !
मुखिच्चा उगाळु हातीं मागैन वो ! मुखीं घेईन वो ! श्रमु सांगैन वो !
दिगंबरु हा माझें जीवन वो ! सत्वसगूण वो ! वेधलें मन वो ! ॥२॥

(४४१)

प्रतिक्षणीं क्षीण क्षणभंगुर वो ! स्थूळ शरीर वो ! हें साकार वो !
अवस्थाजनीत भानगोचर वो ! भासे अस्थीर वो ! तें हीं नश्वर वो !
तापत्रय हें अतिदुस्तर वो ! पोळे अंतर वो ! नव्हे विज्वर हो !
चित्त चंचळ चळे पामर वो ! न भज़े सार वो ! तें माजि वो ! ॥१॥धृ॥
काये करू मी वायां भुललियें ! धिग्य नाशलियें ! अर्थी गुंतालियें !
श्रीदत्तें सद्गुरुरायें सांडीलियें भ्रमें भृतलियें; हीत चूकलियें. ॥ छ ॥
कर्मकरी तें गुणीं बाधक वो ! श्रमकारक वो ! नव्हे मोचक वो !
नीचाचें नीचकरी सेवक वो ! जन्मदायक वो ! फळें भ्रामक वो !
कवण सांगों मी जिवींचें दुःख वो ? जन मायीक वो ! अतद्वादक वो !
दिगंबर परब्रह्म व्यापक वो ! निर्विकल्पक वो ! नेणें हें दुःख वो ! ॥२॥छ॥

श्रीराग.

(४४२)

श्रमहर वो ! श्रद्धाकर वो ! संकीर्त्तन गुण--संकीर्त्तन
श्रवणीं घेईन माये ! येर शब्द मीं नाइकें.
अवो ! जन---प्रलाप नाइकें. वो ! सैये ! मानस भ्रमीत होये. ॥ १ ॥ धृ ॥

धृती न धरे; स्मृती न धरे. अनुगायन, याचें गायन,
संकीर्तन, प्रेम--स्पंदन, हृदय भरलें सये! ॥ छ ॥
गुणश्रवणें, तत्वश्रवणें, भ्रमनाशन, भ्रांतिनाशन.
विषद ज़ाहलें माये! दिगंबरें, श्रीशंकरें.
अवो! ईश्वरें, जगदीश्वरें, ॥ ० ॥
वो! सये! मीपण विरोनि ज़ाये. ॥ २ ॥

(४४३)

द्वैतहीन वो! भेदक्षीण वो! आलिंगन, याचें स्पर्शन,
हृदयीं झेलीन माये! येर अर्थ नावडती.
अवो! स्पर्शु दुःखातें करिती. वो! सैये!
ते सर्व करूं मीं काये? ॥ १ ॥ धृ ॥
चंदन मनें; चंदन न मनें. सरसुमन, माला--सुमन,
दहनु कैसेनी साहें? ॥ छ ॥
अळंकारणें, नाना--भरणें, सर--सरकती, बाण लागती;
बाइये! मज़ बाण लागती. ॥ ० ॥
हृदयमे दत्त आहे. भेटवा वो! दीगंबरु.
अवो! भेटवा वो! सर्वेश्वरु, ॥ ० ॥
शंकरु. विभ्रम हरेल माये! ॥ २ ॥

(४४४)

कृष्णतनु वो! करुणेक्षणु वो! पद्मनयनु, पंकजनयनु,
पाहीन नयनीं माये! येर रूप खरतर;
अवो! येर रूप खरतर; बाइये! बाधक बाधीत आहे. ॥ १ ॥ धृ ॥
जन धन वो! वन सदन वो! मनोरंजन, चित्तरंजन,
विचित्र पाहोनि काये? अवधूताचें दर्शन,
अवो! श्रीदत्ताचें दर्शन, स्मरण परम--पदद माये! ॥ छ ॥
योगधन वो! विद्याधन वो! सुखसाधन, सत्यबोधन,
सुखी--जीवन माये! दिगंबराचें दर्शन,
अवो! देवदेवाचें दर्शन, स्पर्शन मुक्तीसि कारण होये! ॥ २ ॥

(४४५)

पादजळ वो ! विनिर्मळ वो ! अतिपावन ! पुण्यपावन !
रसु मीं सेवीन माये ! येर रस विभ्रामक,
अवो ! कुरस सकळैव, सर्व ही; मार्जीर शरीर होये. ॥ १ ॥ धृ ॥
पीयूष तें ही विष वो ! विषयादिक विक्षेपात्मक,
न भजें, न भजें माये ! विषपंचामृतादिक,
अवो ! शेष ही न सकळैक, बाधक. म्हणें तें नयनीं पाहें. ॥ छ ॥
अन्नरस वो ! मूखशेष वो ! भवनाशन, भेदनाशन,
सेवीन सकळ माये ! दिगंबराचें सर्वदा,
अवो ! देवदेवाचें सर्वदा, सर्वही सेषाचि तारक होये ! ॥ २ ॥

(४४६)

अरे ! मनसा ! रे ! रे ! मनसा ! काये भ्रमसी ? काह्या भ्रमसी ?
भ्रमरु होउंनि राहीं. अवधूत–पदांबुज
अरे ! श्रीदत्त–पादांबुज सहज. सुगंधु तेथिचा घेई. ॥ १ ॥ धृ ॥
पादतळ वो ! रातोत्पळ वो ! गुणअन्वित, गुणसंसेवित,
संभावित, सुरसंपूजित, नित्य सेवीन माये ! ॥ छ ॥
गंध तुळसी--पुष्पीं रमसी. कइ कइ मना चंचळ नव्हसी ?
श्रीचरणीं चंचळ नव्हसी ? ज्ञाणोंनि स्वहीत--सोये
दिगंबरें येकेंवीण, अरे ! श्रीदत्तें येकेंवीण,
सर्वथा व्यर्थचि सकळ होये ! ॥ २ ॥

(४४७)

चंद्रानेक—गुणैक—सशितळ, विमळ, सकल–मळहारी,
दत्ताचें रूप ब्रह्मसनातन देखयीन कयीं संसारीं ? ॥ १ ॥ धृ ॥
मानस मोहियेलें. देवाधिदेवें दत्तात्रयें
श्रीयोगिराजें निजगुणीं गोवियलें. ॥ छ ॥
विश्वाकार विकारविनाशन, स्वजन—जीवन, गुणधारी,
दिगंबर सुखभान सनातन गुणकृतभेद निवारी. ॥ २ ॥

(४४८)

ब्रह्मेंद्रादि—प्रजेंद्र—प्रभाकर—-भ्रमर भ्रमती गुणचारी.

तें पादांबुज चंदनचर्चित देखयीन कयी अविकारी ? ॥ १ ॥ धृ ॥
मन माझें मोहियेलें. वरदरूपें दत्तात्रेयें
श्रीगुरुनाथें रूपें रूप चोरीयेलें. ॥ छ ॥
मुनिजन--ध्यान--विधान, गुणान्वित, अमित--सुकृत--फळकारी,
दीगंबर दीनार्ति--विनाशन, पादकमळ--दळ--थोरी. ॥ २ ॥

(४४९)

सिद्धानेक--सहस्र समाहित भज़ती चरणमहिमान.
तें पादोदक मुक्तिपददायक देयीं मज़ परमनिधान. ॥ १ ॥ धृ ॥
स्वजनु तारीयेला. दत्तात्रयें अवधूतें श्रीदेवरायें द्वैत भाऊ छेदियेला. ॥छ॥
योगातीत, वियोग--विनाशन, जनन--मरण--भय--हारी,
दीगंबर, गुरुगम्य, पुरातन, ब्रह्म, अमळ, अविकारी. ॥ २ ॥

(४५०)

आदिरूप, निगमागम--पूजित, सकळ--विमळ--गुणस्थान,
द्वैताद्वैत--विकल्प--विवर्जित, ब्रह्म, विमळ, परिपूर्ण. ॥ १ ॥ धृ ॥
श्यामळ देखियलें, स्वरूप माये ! डोळस माये !
नयनीं रूप. मन माझें पारुषलें. ॥ छ ॥
कार्तवीर्य--वरदैक--सनातन, ब्रह्म, अगूण, गुणधारी,
दीगंबर--रूप राजीव--लोचन माया--तमस निवारी. ॥ २ ॥

(४५१)

सकळ सुव्रत व्रती जें पद नेणती, ज़ाणती तें ज़ेथ माया,
तें नीरंजन गुणमती--खंडन कैसेनि भजिज़े माये ! तया ? ॥ १ ॥ धृ ॥
मानस पारूषलें, भजनें येणें, अगूण गुणें,
निर्मळपणें. मीपण वीतूळलें. ॥ छ ॥
सकळ अमरगण कुंठित--साधन मुनीजन वीरमाति ठायीं.
तें दीगंबर, गुणमय, शंकर, नयनीं देखिज़े रूप दोहीं. ॥ २ ॥

॥चालि भिन्न॥

(४५२)

गुणी ही गुणु नाहीं. सेखीं येथ आकृति तेही.
परम सुख ज़ालें हृदयीं. शरीर नेणें; ज़ाहालें कायी ? ॥ १ ॥ धृ ॥

कायें मी करूं ? वो ! सखिये ! अनुभउ आया न ये ! ॥ छ ॥
भवमान हृदयीं सैये ! नेणें. ज़ाहालें कायी ?
करणगण–भावना नाहीं. दीगंबरु भेटला देहीं ! ॥ २ ॥

(४९३)

॥ श्रीरागु ॥

सजळ नयन दोन्हीं आठवसी प्रतिक्षणीं.
माये ! बापा ! श्रीसद्गुरू ! उपेक्षीं झणीं. ॥ १ ॥ धृ ॥
कयी नेसी स्वपुराप्रति ? केधवां नेसी ?
कईं येसी ? केव्हां नेसी ? सांग आह्मांसी.
श्रीगुरुराया ! सांग आह्मांसीं. ॥ छ ॥
वीनटले गुणीं गुण; अचळ लागलें ध्यान.
दिगंबरा ! तुझें रूप माझें जीवन. ॥ २ ॥

(४९४)

गुणीं गुंपलें चेतन करितां तदंग ध्यान.
मीतूंपण वीतूळलें. गूणी गूण. ॥ १ ॥ धृ ॥
कांहीं नेणें; याहूंनि पर कांहीं नेणें;
कांहीं नेणें; हेंहीं नेणें केवळपणें.
मीं मज़ नेणें केवळपणें. ॥ छ ॥
देहत्रय वितूळलें. भान अभान आतलें.
दिगंबर ! मींचि मातें ज़ाणवों आलें. ॥ २ ॥

(४९५)

आठवीन तेव्हां येयीं बोलवीतांचि बोलयीं.
ललेवड मीं धाकुलें; लोटिसी कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
ज़ळो जीणें ! येथूंनि माझें धिग्य जीणें !
ज़ळो ! ज़ळो ! धिग्य जीणें ! काये करणें ?
सद्गुरुराया ! काये करणें ? ॥ छ ॥
अर्थु न मगें दुसरा. भेटि देयीं दिगंबरा !
अंतकाळिच्या सांगाती मातें सोयेरा. ॥ २ ॥

(४९६)

निडुळीं ठेउनी बाहे बाटुली पाहें गे ! माये !
पंथु चालतां कव्हणीं ज़ाणवों नये ? ॥ १ ॥ धृ ॥
दूर–देशीं काये मीं करूं अंतरवासी ? दूरदेशीं दूरवासी सांगों कोणासी ?
मी पाठउं कोणासी ? ॥ छ ॥
हृदयें मांडिली त्वरा; नयनीं लोटती धारा;
दिगंबरु कई माये ! येईल वरा ? ॥ २ ॥

(४९७)

मूळिचा मीं तुझा पुत्रु. मज़ काइसा संसारू ?
नको, नको, अवधूता ! अइसें करूं. ॥ १ ॥ धृ ॥
कयीं देसीं सानिध्यपद ? केधवां देसी ?
कयीं देसी ? केव्हां देसी ? सांग आह्मांसी;
श्रीदत्तराया ! सांग आह्मासी. ॥ छ ॥
जननी, जनकू, गुरू मज़ तूं श्रीदिगंबरू.
सत्य सर्वज्ञु सारथी, ऐसा निर्द्धारू. ॥ २ ॥

(४९८)

॥ चालि भिन्न ॥

सिद्धीचें कारण तें तुं सिद्धीच ज़री;
सिद्धेशा ! सद्गुरू! सिद्धिराजा ! अवधारी.
पर, सिद्धि हारिज़े; ऐसी कवण हे थोरी ?
ब्रह्म तूं निर्गुण. अवंच आत बाहेरी. ॥ १ ॥ धृ ॥
करि रे ! करि रे ! होये तें करि रे ! ॥ छ ॥
शक्रारिमर्दनु ! तुज़ हे काइसी कूटि ?
माया प्रधान स्वरूप तूं; हे आगल्या हीं खोटी.
दिगंबरु चिन्मात्र ब्रह्मगुणा मेवटीं
योग–मती–लय–स्थान कयीं पाहीन दृष्टी ? ॥ २ ॥

(४९९)

अत्रीचा तपसु कवण तयाची थोरी ?
मायारहित सन्मात्र जें धरिलें उदरीं.

उपकारु केसणा प्रकट केलें बाहेरी.
अवधूत परब्रह्म धरा हृदया माझारी. ॥ १ ॥ धृ ॥
दुरि रे ! दुरि रे ! न धरा दुरि रे ! ॥ छ ॥
कपिलु धाकुळा धन्य अनसुया सती.
अवधूता ! ऐसें रत्न पडलें जियेचां हातीं.
धन्य रूषीपुत्र ज्ञे तयाच्ने सांगाती.
दिगंबरें धन्य ! धन्य ! अवघी जगती. ॥ २ ॥

(४६०)

योगाच्नें कारण, सार तूंचि तूं ज़री;
परब्रह्म अखंडीत विश्वा आंतु बाहेरी;
योगु तो कासया संपादी शरीरीं ?
परार्थ सकळ तुझें ययाचि परी. ॥ १ ॥ धृ ॥
नाहीं रे ! नाहीं रे ! नाहीं रे ! तुज़ तें नाहीं रे ! ॥ छ ॥
अवघेंचि तूं; तरि त्यागु काइसा तुंते ?
अवघें न होसि तरी तो कवणे मतें ?
दिगंबरा ! सत्य येक ज़ाणवे येथें:--
न करणें, नाकरणें, गुणी गुण कर्म तें तें. ॥ २ ॥

(४६१)

नलगे तें ज्ञान; आह्मा भजन देयीं.
मन आसक्त ज़ाहालें असे तुझाचि ठायीं.
न वसो अवधूता तूं विण माझां हृदयीं.
मन बहू उतावीळ; आतां भेटसी कयीं ? ॥ १ ॥ धृ ॥
येईं रे ! येईं रे ! येइ रे ! येकुदां येईं रे ! ॥ छ ॥
मुक्तीच्नें कारण दत्ता ! तूंचि तूं ज़री.
वायांवीण यें साधनें आह्मा करविसी तरी !
न घालूं मन हें आणिकावरी. दिगंबर परब्रह्मसार भजों अंतरीं. ॥२॥

॥ श्रीराग ॥

(४६२)

निदान, निर्गुण, केवळ, वो ! निरामय, निरंजन, केवळ वो ! ॥१॥धृ॥

डोळां तें रूप पाहिन वो ! अवधूत हृदयीं मीं कवळिन वो ! ।। छ ।।
अप्रमीत, सुखसार, सगुण, वो ! दिगंबर, त्रीपुर–पावन, वो ! ।।२।।

।। ४६३ ।।

पुराण, पावन, कारण वो ! भव–तम–दुरीत–दहन वो ! ।।१।।धृ।।
निरामय पद लाहीन वो ! अवधूत परब्रह्म पाहिन वो ! ।। छ ।।
अनुपम्य गुण–पार–वर्जित वो ! दिगंबर ब्रह्म सदोदीत वो ! ।। २ ।।

(४६४)

प्रमाण–वर्जित प्रसिद्ध वो ! पंकजलोचन प्रसिद्ध वो ! ।। १ ।। धृ ।।
चिरंतन जन–विरहित वो ! निराश्रय, निजरूप, सर्वगत वो ! ।।छ।।
सगुण, निर्गुण, गुणगहन वो ! दिगंबर ब्रह्म सनातन वो ! ।। २ ।।

(४६५)

सुरारिमर्दन चिद्घन वो ! गुणीक त्रिदोष–विनाशन वो ! ।। १ ।। धृ ।।
परब्रह्म दृष्टी पाहीन वो ! अवधूत हृदयीं मीं ध्यायीन वो ! ।। छ ।।
अगणीत–सुखपार–कारण वो ! दिगंबर दुरीत–निवारण वो ! ।।२।।

(४६६)

सुरादिवंदित–वंदित वो ! चिद्व्यय ब्रह्म निरावृत वो ! ।। १ ।। धृ ।।
निरंजन जनविरहीत वो ! निरामय पूर्ण गुणातीत वो ! ।। छ ।।
तनुत्रय धर्महर वरद वो ! दिगंबर स्वरूपसिद्ध अवो ! ।। २ ।।

(४६७)

गुणान्वयातीत मुक्त अवो ! परब्रह्मशुद्ध सदोदीत वो ! ।। १ ।। धृ ।।
सनातन–पद सुखरूप वो ! पाहीन नयनीं कृष्णस्वरूप वो ! ।। छ ।।
अवधूत मुक्तसार गुण–गुप्त वो ! दिगंबर नीत्य नीरावृत वो ! ।।२।।

(४६८)

मनासि मारूनि काज नसे. दमूनि करण—गण काज नसे.।।१।।धृ।।
तुझें चिंतन मज हृदयीं असे. निवइल तेणें मन ब्रह्मरसें. ।। छ ।।
अविहीत युक्तिजाळ सांडियेलें. दिगंबरीं मनस हें ठेवियेलें. ।। २ ।।

(४६९)

।। चालि भिन्न ।।

शुद्ध श्यामळा वासु पीवळा; पीतवर्ण कैसा शोभे टीळा ! वा ! ।।१।।धृ।।

अवो ! माये ! आत्मा सगूण वो ! नीरजलोचनु वो !
माये ! प्राणाच्चा प्राणु वो ! जीउ जीवीं जीवनु वो !
परब्रह्म अगूण वो ! ॥ छ ॥
स्वजन तू सूख—भरीतू दिगंबरु यो—ज्ञान—हेतु वो ! ॥ २ ॥

(४७०)

सुपुष्पमाळा भक्तीं पूजिला; एसा दत्तु मज दाक्ष डोळां वो ! ॥१॥धृ॥
अवो ! माये ! सुखा स्वजन वो ! परमात्मा सगूण वो !
नीजानंद तनु वो ! पतीत पावनु वो ! कमळ नयंनु वो ! ॥ छ ॥
वरदहस्तू माया मुक्तु दिगंबरु अक्रीयावंतु वो ! ॥ २ ॥

(४७१)

पादकमळीं आसक्त ज़ाली. सकळ वृत्ति माझी ठायीं निमाली वो ! ॥१॥धृ॥
अवो ! माये ! काये मीं करूं ? वो ! देह ज़ाहालें भारु वो !
नेघे याच्चा आधारु वो ! अर्थु न साहे परु वो !
दाखवा कां सद्गुरु ? वो ! ॥ छ ॥
परति नाहीं प्रपंचु तोही. दिगंबरु मज्ज भरला देहीं वो ! ॥ २ ॥

(४७२)

पतंगु ज्वाळा झें गीतु आला; नीज कर्में ज़ैसा प्राणें निमाला वो ! ॥१॥धृ॥
अवो ! माये ! तैसें हें मन वो ! वीषयीक अज्ञान वो !
भ्रमभूत सगूण वो ! नव्हे स्ववृत्ती क्षीण वो ! ॥ छ ॥
योगें सूटल; दुःखें भूतलें; दीगंबरेंवीण आलें, गेलें वो ! ॥ २ ॥

(४७३)

तूं माझें ध्यान, तूं माझें ज्ञान, जिवनसार, योगु, योगनिधान, रे ! ॥१॥धृ॥
अरेरे ! तूं माझा प्राणु रे ! गुणद्रष्टा आपणु रे !
आत्मा सनातनु रे ! देहभाव—दमनु रे !
अवधूता स्वजनु रे ! ॥ छ ॥
तूं माझें हीत सर्व—विहीत दिगंबरा सार मायातीत रे ! ॥ २ ॥

(४७४)

भवनदी ज़ातुसें पूरें. तोडिती गुण जळचरें.
विपरित कामना वारें. माझें मज्ज कांहीं न स्मरे. ॥ १ ॥ धृ ॥

दत्ता रे ! घालि कां उडी ? मज़सवें देयीज़ो बुडी.
तुझी मी कास न सोडी. पाववीं तूं पैल थडी. ॥ छ ॥
कामाची न तुटे धार. रोषाचे आत्रात थोरं.
चाले वो—साण शरीर. दीगंबरा ! दुःख अपार. ॥ २ ॥

(४७५)

भव—वन निर्जन देवा ! बहू भय होतसे जीवा.
न दीसे येथ विसावां. च़हूकडे घेतसें धांवां. ॥ १ ॥ धृ ॥
कें पाहों आत्मयां तूतें? भूललों दर्शन पंथें.
श्रीदत्ता! ज़ाणवीं मातें. बहू जन चूकती येथें. ॥ छ ॥
दीशा—चतुष्टय तें शून्य. वरि पोकळ गगन.
पृथ्वीचें रूप कठीण. दिगंबरा ! न कळे खूण. ॥ २ ॥

(४७६)

तनु, धन, स्वजन, जाया, ययांची वाउगी माया.
माप तवं लागलें वया. अरे ! मना ! भूलसी का—ह्या ? ॥ १ ॥ धृ ॥
गेलें वो ! हातिचें धन, श्रीगुरूचें संन्निधान;
करितां विषयध्यान, हृदयीं पडलें खान. ॥ छ ॥
स्वप्नसुख भोगिसी कायी ? वेउअ्थरीं काहीं चि नाहीं.
दिगंबरु सद्गुरू ध्यायीं. राही उसु आपुलां ठायीं. ॥ २ ॥ छ ॥

(४७७)

भवपुरी भरली सात. क्रियाफळ लाहिज़े तेथ.
दैवगती आपुलें हीत ठावलें ज्ञान निश्चीत. ॥ १ ॥ धृ ॥
गेलें वो! हातिचें गेलें. तस्करीं सर्व हरीलें.
अंतरी च़ोर लपाले. काम क्रोध संचित्ती मूळें. ॥ छ ॥
घरोघरीं वरटि बोहरी, शब्द ज्ञान बरवयापरी.
च़ोरटे नित्य अंतरीं दिगंबरा कवण धरी ? ॥ २ ॥

(४७८)

प्रेमहीना काइसी भक्ती ? अभिमानें घानली माती.
दंभू तो सर्वदा चित्तीं. दीनें दीनु आगळी भ्रांती. ॥ १ ॥ धृ ॥
काइसी स्मरणी माळा? मणिगण च़ाळिता च़ाळा.

अंतरीं क्रोधु भरला. कुकर्मै थारा केला. ॥ छ ॥
प्रलपनीं सिरकली परा. ते वीची अपरा येरा.
मांडु बहू सांडि गव्हारा. प्रेमें भज श्रीदिगंबरा. ॥ २ ॥

(४७९)

॥ चालि भिन्न ॥

आदिरूप विकार--हीनु, ब्रह्म केवळ चिद्घनु.
परु, निरंजनु, पंकजनयनु. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन नयनी, पाहिन नयनी.
नयनी वो ! प्रीति योगिराया, अव्यया परमात्मयां,
सद्गुण आश्रया, या दत्तात्रया. ॥ छ ॥
सत्य--तत्त्व--प्रकाशभानु, छांदमां प्रति पावनू,
तमस---विनाशनु, दिगंबर सगुणु. ॥ २ ॥

(४८०)

काम, राग, विकार सांडुनि मानसें परिवर्जुनि,
मीपण सोडुनी, तनुत्रय भेदुनी, ॥ १ ॥ धृ ॥
हें मन; ॥ ० ॥ वेधलें वो ! गुणी परानंदा, ब्रह्मरूपा चित्परा,
अभय वरदा मुनिजन हर्षदा, ॥ छ ॥
आत्मतत्व---विचार---सारा, केवळा, अविनश्वरा,
परम---दिगंबरा, ज्ञान---गुण---सागरा. ॥ २ ॥

(४८१)

छेदिला भवपाशु जेणें, ज्ञान---योग---विवर्द्धनें,
पंकजलोचनें, अनसूयानंदनें; ॥ १ ॥ धृ ॥
हें मन मोहिलें, हें मन. ॥ ० ॥
मोहिलें निज रूप दाउनि गुणा---गुण मति सगुणी,
सुख वर्द्धनी, श्रीगुरुचरणीं; ॥ छ ॥
अव्यया द्वय योग धीरें सर्वदा गुण यीश्वरें,
श्रीदिगंबरें, स्वजन दयाकरें. ॥ २ ॥

(४८२)

दत्तु हा प्राणासि प्राणु, आत्मसुख विवर्द्धनु,

सगुण निर्गुणू, भवभय मर्दनु. ॥ १ ॥ धृ ॥
येर्णेसीं रातली येर्णेसी रा. ॥ ० ॥
रातली योगिराया, चिन्मया, परमाव्यया,
दत्तात्रया, बहुजनआश्रया. ॥ छ ॥
सावळें रूप व्यक्त पाहोनि प्रीति गुंतली ये मनी,
दिगंबरचरर्णी, देह गेह सांडूनी. ॥ २ ॥

(४८३)

योगियां गुण–कामधेनु, दत्तु मधु सनातनु,
ज्ञान—विवर्द्धनु, पतितपावनू. ॥ १ ॥ धृ ॥
तो मज्ञ दाखा, तो मज्ञ. ॥ ० ॥
दाखवा वो ! मज्ञ ध्यान सेवनी, समळ मीपण सारूनी,
तत्व प्रकाशुनी, श्रीदत्तु ये मनी. ॥ छ ॥
भेद—भान—विकार—हीनू, कामक्रोधविनाशनू,
दिगंबरु निर्गुणू, ब्रह्म सनातनू. ॥ २ ॥

(४८४)

संसारीं भय भारी; मज्ञ तारीं स्या! श्रमु हरीं; सुख करीं; नीवारीं क्रीया.
श्रमु वैरी मज्ञवरी; तूं मारीं यया.
अधिकारी न विचारीं; मज्ञ करीं दया. ॥ १ ॥ धृ ॥
स्वरामा ! निष्कामा ! तुं क्षमा करीं;
परमात्मा सर्वात्मा तूं आत्मा ज़री. ॥ छ ॥
अवधूता ! गुणयुक्ता ! वीमुक्ता ! येईं.
संत्राता, गुणभर्ता तूं कर्त्ता देहीं.
दिगंबरा ! गुणधी ! अविकारा ! गुणधीरा ! पाहीं.
संसाराभयहरा ! सुविचारा देयीं. ॥ २ ॥

(४८९)

गुरुराया तव माया गुणक्रीया करीं;
सुरवर्या ! मितवीर्या ! दुर्जया ज़री.
भवभाना गूणीगूणा प्रेरणा करीं.
तरि आह्मा तूं आत्मा कां घालिसी वरी ? ॥ १ ॥ धृ ॥

समर्था ! गुणवंता ! तुं दत्तात्रेया.
तूं माता, तूं पीता समस्तां यया. ॥ छ ॥
निःकामा तूं आत्मा परमात्मा देहीं. तुजवीण पद आन भवभान नाहीं.
दिगंबरा सुखसारा गुणपरा कयी ? भवबंधु गुणभेदु अनुबंधु तयीं. ॥ २ ॥

(४८६)

गुणलेशू, गुणदोषू, गुणपाशू, गुणीं;
गुणमाया—भ्रमु वायां, प्रतिछाया मनी;
गुणभासू आभासू त्रीदोषु जनी;
स्वस्थिती प्रतीती ते स्फूर्त्ती गुणी. ॥ १ ॥ धृ ॥
अहमात्मा, चीदात्मा, सर्वात्मा सैये !
गुणचारी, गुणहारी, संसारी यये. ॥ छ ॥
गुणवादीं, गुणभेदीं, अनुबंधी नव्हे.
गुणकर्त्ता, गुणभर्त्ता, गुणगोप्ता जीवें.
दिगंबरू, स्वस्थीरू, श्रीगुरु सवें.
मज़ कांहीं भय नाहीं ये ठायीं शिवें. ॥ २ ॥

(४८७)

॥ चालि भिन्न ॥

जनकजगजननीजंनका ! तूं आत्मयां ! रामां !
रमणशिळ वीसांवलें; तुझी पावले सीमा.
श्रमद भव—भवन कैंचें तयां शुद्धानिःकामा ?
चळनहिन गगन ज़ेवी ऐसी पावले क्षमा. ॥ १ ॥ धृ ॥
जय गुरो ! कमळनयना ! गुणागुणगणविमथना !
मंत्रविद्यंत्रवासा ! शुभाशुभद ! पविहरणां ! ॥ छ ॥
चरणगुण श्रवण करितां मनी मन न मरे वक्तां.
वादु प्रत्यक्ष ब्रह्म भ्रम श्रम नुरवी श्रोतां.
भजन जन—भय निवारी तुझें श्रीअवधूता !
झडकरूनि दीगंबरा ! मज़ देइज़े तें आतां. ॥ २ ॥

(४८८)

श्रमदु मदु विषयसरिता कामु—कल्पना—धार

द्रवती गुण; गहन करणी; ओघ—वेग अपार !
प्रवळ बळ खळखळाळ; वाद—वचन—विस्तार;
सहज्ञ मज्ञ पतन आलें; कर्मघालणी थोर ! ॥ १ ॥ धृ ॥
जय ! गुरो ! दत्तात्रया ! शिवा ! अमितगुणवीर्या !
स्वजनजनवरदमुर्त्ती ! निवारि हे माया. ॥ छ ॥
धनज—धन—धनद—भज्ञनीं मन मनहिंन ज्ञालें.
स्वजन—जन—जनक—तनुज़े चित्त धरूनि ठेलें.
स्वपरपर परती न चरे; आंगें आंग लोटलें.
अडकरूनि दीगंवरा ! कधीं करिसी वेगळें ? ॥ १ ॥ धृ ॥

(४८९)

सिमिसिमित हृदय कोण ! लाभु ज़ाहला भारी !
स्वजन, धन, जननीजनकें ही पावलीं दूरी.
दुरितकर प्रखर परम सासुरें हें भारी.
कवण गुण ? कवण कर्म ? मीं पडलें घरीं. ॥ १ ॥ धृ ॥
कवण ते परम सखी भेटि करील दत्तेंसीं ?
प्राण मी वोवाळिन; चरण झाडीन केसीं. ॥ छ ॥
शरीर, कर, चरण तपती; प्रज्वलती ज्वाला.
नयन—जळधर—द्रवांशें संप्राशिती कळा.
किं विकळ चळचळती प्राण; मुख—स्पंदु लागला.
तुज्ञ कैसें दिगंवरा ! ऐसें देखवे डोळा ? ॥ २ ॥

(४९०)

जनवंधो ! निर्गुण—तत्व—प्रकाशका ! सिमा तुझी अपरां
गुण गण चरां. विपरीतुचि प्रकट गुरू.
गुणत्रयवंतासि न कळे पारू. परब्रह्म तुं गुणरहितु परू ॥ १ ॥ धृ ॥
राजिवा ! राजिवा ! वृत—वहु—गुण—लोचन स्वरूप तुझें.
ध्यान गुणयोगें प्रकटसी केवीं ? सुहृदवंधु !
ज्ञान—योग—युक्तां अचळ जो बोधू.
अन्यगुणभावीं मीं नव्हें सावधू. ॥ छ ॥
गुणकर्मछेदनज्ञानप्रभाकरा ! सुभक्तहीतपरा !

सुरगणधीरा ! वीषइक दुर्जन वीचारू
नुमजती; ते नेणती तुझा पारू.
दिगंबरा ! तुझंहूंनि न दिसे थोरू. ॥ २ ॥

(४९१)

गुणकृत–ध्यान–विधान–गुणात्मक–छेदन–योग–परा !
सुरगणसिद्धा ! वीजन कां सेविसी गुरू.
तुझहूंनि आणिकू न दिसे थोरू.
मनस माल्वे तीये चैतने परू. ॥ १ ॥ धृ ॥
भार्गव भार्गवप्रीय ! परम–दयाकर ! सगुण तुझें रूप न गणवे;
प्रकटचि ज़ेथवां नुरवी भेदू. ज्ञान–योग–योगें विषय–प्रमादु
मायामय–भेदु नुरवी त्रीविधू. ॥ छ ॥
गुणीगुणभाननिदान–गुणांतक–भेदक–योगपरा
भुवनवीषयद भजन विस्तारु. न संगसी मूळपद दाता गुरू.
दिगंबरा ! हरि–जसु भ्रमु गोचरू. ॥ २ ॥

(४९२)

श्रीराग उजु

(चालि भिन्न)

अगम्य वेदन गुणीं चित्त चंचळ ज़ालें.
न चले साधन ज़ाण वो ! आत्मवीषयीं भ्रमु
भेदु सर्वत्रु हा. विषय बोधु सहये ! ॥ १ ॥ धृ ॥
अनुभूय सकळा करणीं वो ! अनर्थकर परि नेणवो ! ॥ छ ॥
अनित्य नीत्य हें वस्तु—ज्ञान कुंठित ज़ालें. असंगासंग विधान वो !
दिगंबरु वो ! नित्य मुक्तु सद्गुरु हा. आनंदप्रदु कइये ? ॥ २ ॥

(४९३)

गुणकारी गुणभासु बा ! रे ! चिद्गुणें परिस्फुल्लतु रे !
खेळतु, झळतु रे ! जनमोहनु, गुणरंजनु,
गमितां रे ! दीगंबर आश्रइतां रे ! चिन्मय भजन बरवें ! ॥ छ ॥

(४९४)

देहत्व फेडी; गुणकंपा गीळी; ध्यान ध्येय नेणें.

न विच्चले योगी. चेतना मुळीं घे. गुरूखूण बोधला रे ! ॥ १ ॥
न धरवे स्वाश्रिता तन्मूळीं मननी शंकरु नेणवे. ॥ छ ॥
ममत्व मोडी. अनुमाना वाळी. दिगंबरु वो ! बाइये !
ज्यीं मिळे वो ! योगी, साधनी सेविजे. न उरवी तो दुसरें. ॥ २ ॥

(४९५)

अगुणें, अवधूतें, चित्त मोहिलें, योगिरायानें. ॥ १ ॥ धृ ॥
श्रीशिवा मानस वेधलें, रातलें तया, वेधलें अतिमानें. ॥ छ ॥
कइं रे ! कइं येसी? दिगंबरा रे ! देवरायां रे ! ॥ २ ॥
ज्ञाति निवारी माया हे गुणक्रिया; निवारी माया हे. ॥ छ ॥

॥ खंड ॥ प्रबंध ॥

(४९६)

आतुरपण बहु ! देखइन साजणी !
भवभयांतकु कइं आदिगुरु ? विषयविष सेवितां भ्रमली भारी माये !
तरि तया आणूनि चरण दाखवीं. ॥ १ ॥
हां वो ! जन--धन-- ममता.
याची न धरी वो ! संगति वेच्चली वयसा. ॥ छ ॥
अरे तिया ईयं वैय्ये अय्याइ येइ या
नियाइ याइ याइ याइ अय्या इये इया
आइये इइयम् वो इया इया. ॥ छ ॥

(४९७)

तो एक, सुरेशु, स्वानंद--सागरु, पाहीन मी नयनी श्रमहरु,
परमसुखदायकु, देउ दिगंबरु.
देखिला, मग पुरे, पाये न सोडी. ॥ २ ॥

चिंद श्रीराग

(४९८)

देवा येईं; दर्शन देईं; दीनु मि तुझा बहुभावें; अय्या !
पायां तुमचिया लागों; देवाधिदेवा ! दया करा.
स्वामि ! दावाजि पाया. ॥ १ ॥ धृ ॥
श्यामळा ! करा दया वो ! दया ! श्यामळा ! ॥ छ ॥

ये हाँ हा ! योगिया ! देवराया ! मनमोहना !
दिगंबरा ! करि करुणा रे ! ॥ २ ॥

(४९९)

॥ नामावली ॥

स्वानंदपदसार, भवभयहरणु, योगिजनमोहनु,
अगुणगुणांतकु, अवधूतु, दीननाथु,
तथोम् थोम् थोम् थोम् थोम् परात्पर स्वरूपा ॥ १ ॥ धृ ॥
परमयाकर कइं पाहें ? तेणेंवीण मन हें क्षणु न राहे. ॥ छ ॥
वरदु, गुणेश्वरु, जगनगजीवनु,
मायातमोनाशनु, परमसुखंकरु, सुरनरमतीहरु,
तथोम् थोम् थोम् थोम् शिवदेव दिगंबरु. ॥ २ ॥

॥ भिन्न ॥

(५००)

बाधकु भारी हा संगु; शरीरीं वियोगुतापु न साहावे.
नये, कां नये कमळलोचनु? घेलें कठीण; करूं काये ? सैये ! ॥१॥धृ॥
दाखवा मुख; लागेन पायां. दाखवा मुख; लागेन पायां. ॥ छ ॥
दूरि न धरीं; उदास न करीं. येउनियां श्रमु हरीं.
कइं मीं, कइं पाहीन आत्मयां ? दिगंबर, देवराया, रैया ! ॥ २ ॥

॥ वैराटिका ॥

(५०१)

आळवीसी, तरि येइन. बोल ह्मणसील, तरि बोलैन. ॥ १ ॥ धृ ॥
नातरि उगलाचि असेन पासीं. नव्हे इतुलेनि मी परदेसी. ॥ छ ॥
पाहे ह्मणसील, तरि पाहीन. दिगंबरा ! तुझी आण ! ॥ २ ॥

(५०२)

हात उचलीसी, तरि मागेन. पाये दाविसी, तरि लागेन. ॥ १ ॥ धृ ॥
नातरि उगलाचि पाहिन वदन. देवा ! सलगी न करीं बहु, जाण. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूझपासीं नित्य असता, नव्हे परदेशी. ॥ २ ॥

(५०३)

माग ह्मणतिलया काय मागों ? सांग ह्मणतिलया काय सांगों ? ॥ १ ॥ धृ ॥

दत्ता ! केवळ मी अज्ञान. पासीं उगाचि उगिया असेन. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझी आण. मानें इतुलाचि विषयों हाणेंान. ॥ २ ॥

(१०४)

दृष्टि करिसील, तरि धायीन. दोन्ही चरण अवलोकीन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! इतुलेंचि मातें पुरे. पासीं असेन मी अंतेर. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं सर्वज्ञु. कइं हरसील माझा सीणु ? ॥ २ ॥

(१०५)

माग ह्मणसील, तरि मी नेघें. सांग ह्मणसील, तरि न संगें. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! उगलाचि असैन पासीं, तुझा ह्मणउनिया, परियेसीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! सत्य ज्ञाणः:— आन विषयोंचि न धरी मन. ॥ २ ॥

(१०६)

ये ह्मणसील, तरि धांवेन. जाय ह्मणसील, तरी मरेंन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! परतोनि नाहीं पाहाणें रे ! तुज वांचूनि दूसरें नेणें ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझा ठायीं मन दीपलेंचि; परति नाहीं. ॥ २ ॥

(१०७)

लक्ष ठेउनि तुझा वदनीं ठेलों पाहातु मी दूरूनी. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! आळविसी केधवा ? श्रमु हरैल तेणें अधवा. ॥ छ ॥
दिगंबरा ! मी पैं दीन. माझें झणें पडो विस्मरण. ॥ २ ॥

(१०८)

दीन किंकर, मी सेवक, अति दुर्बळ, तुझें रंक. ॥ १ ॥ धृ ॥
माझें न करीं रे ! विस्मरण. वरि पडैल परम निर्वाण. ॥ छ ॥
अवधारीं दीगंबरा ! तुजवांचूनि नेणें दुसरा. ॥ २ ॥

(१०९)

धणी असोनीं परदेशी, मांगों मी कवणापासी ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्तें कठिण केलें माये ! अझुणीं हा प्राणु न जाये ! ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं लेंकरूं. मज लागला वैश्वानरू. ॥ २ ॥

(११०)

योगिराजु माउली मातें वनीं सांडूनि गेली. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें ललाट माझें उणें ! काय कैसें आता करणें ? ॥ छ ॥

दिगंबरा ! तूं निष्ठूरू. आतां कवणासि घालुं भारु ? ॥ २ ॥

(५११

भाते लागले शरीरीं. लोटती नयनीं धारा. ॥ १ ॥ धृ ॥
मातें बुझावी कवण ? देवें मन केलें कठीण. ॥ छ ॥
दिगंबरा ! सत्य जाणें ::-- प्राणु देयीन मी स्मरणें. ॥ २ ॥

(५१२)

पाहेपां ! गा ! वीचारूनी; आह्मा कवणु दुसरा धणी ? ॥ १ ॥ धृ ॥
कष्टा वीसरु पडला कैसा ? ज़ाहाली परम निराशा. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं सर्वज्ञु. तुतें उपदेशी कवणु ? ॥ २ ॥

(५१३)

पंथु पाहातां गेले डोळे. दुःखे ह्रदय प्रज्वळलें ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें कैसें कठिण मन ? अवधूता ! करिसी निदान. ॥ छ ॥
दिगंबरा ! चिंता नाहीं. आतां सुविष देऊंनि ज़ायी. ॥ २ ॥

(५१४)

कैं देखैन तुझें पाये ? आणिकांच्चा हातु न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
माझी माये तूं श्रीदत्ता ! जन्मु गेला वाट पाहातां. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें ध्यान येणें वेच्चती माझे प्राण. ॥ २ ॥

(५१५)

तूं बा पूर्वीचा सांगाती. देतासि कवणा हातीं ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! न करीं रे ! निर्वाण. तूज़ वांचूनि कवणाचें कवण ? ॥ छ ॥
दिगंबरा! तूं इश्वरू. आह्मी तुझा अंश विस्तारू. ॥ २ ॥

(५१६)

तूं बा बहुतांच्चा सोयेरा. मातें मीं येकु, तूं दूसरा. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! कैसें घडलें, पाहे. येथें ममता प्रसंगु काये ? ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं अज्ञान. तूं ज्ञानाच्चें कारण. ॥ २ ॥

(५१७)

भेटि देसील, तरि तूं येइं. नाहिं तरि ठाइं का राहीं ? ॥ १ ॥ धृ ॥
तुझी लपणी कळली आह्मासि. आत्मयां केउता गेलासी ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं सर्वही. आड करिज़ेसें काहींचि नाहीं. ॥ २ ॥

(९१८)

घाट पाहतां लाजिरवाणें. कांहीं घेणें ना मागणें. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता! नाम अमृतसार. तेणें प्रेमें पूर्ण शरीर. ॥ छ ॥
दिगंबरा! न करीं आशा. भेटि अरिष्ट या प्रेमरसा. ॥ २ ॥

(९१९)

नित्य करितां गुण कीर्तन, तेथें पांगुळ ज़ालें मन. ॥ १ ॥ धृ ॥
आतां उठवावें कवणें ? देवा! तुझें ही न चले करणें. ॥ छ ॥
दिगंबरा! न मगें भेटी. ह्मणे होइल तयासि तूटी. ॥ २ ॥

(९२०)

बहु जन्माचें साधन प्रेम संपडलें निधान. ॥ १ ॥ धृ ॥
ज़े यत्नें ठेविन ठेवा. नाम तूझें श्रीदेवदेवा! ॥ छ ॥
दिगंबरा! कष्टी न करीं. ह्मणे भोंवैल तया बाहेरी. ॥ २ ॥

(९२१)

गुरुचरणीं हारपलें, तें म्यां वियोगें देखिलें. ॥ १ ॥ धृ ॥
प्रेम श्रीपादकमळांचें, तेणें आनंदें मन हें नाचे. ॥ छ ॥
दिगंबरा! तुझी भेटि यया उपरी आतां खोटी. ॥ २ ॥

(९२२)

निर्गुणीं दुर्लभ गुण, तरि भज़ैयीन सगूण. ॥ १ ॥ धृ ॥
देवा! न करीं रे! विक्षेपू. स्ववृत्ती परवृत्ती लोपु. ॥ छ ॥
दिगंबरा! तज़हीहूंन तव प्रेमीं मधुपण. ॥ २ ॥

(९२३)

भेटि ज़ालियां जन्मूचि नाहीं. आतां भजन तें ययेचि देहीं. ॥१॥धृ॥
कष्टा दुर्लभ ज़ाणें जीणें. नाम कैसें जतन करणें ? ॥ छ ॥
दिगंबरा! तुझी भेटी भक्तियोगातें वो! खरी. ॥ २ ॥

(९२४)

क्षीरसागरीं पडली मासी. विषयोचि मरण तियेसि. ॥ १ ॥ धृ ॥
कष्टा ऐसें मज़ पैं ज़ालें. भेटी भेटणें बुडालें. ॥ छ ॥
दिगंबरा! तैसी भेटी. आह्मी न करूं तीची गोठि. ॥ २ ॥

(९२५)

दीपु देखोनि तेजाळा पतंगु झेंपी ज्वाळा. ॥ १ ॥ धृ ॥
तेसें खरतर दर्शन तुझें. कांहीं नुरवीचि मीपण माझें. ॥ छ ॥
दिगंबरा ! प्रेमामृतें आह्मां उठवीं भजनपंथें. ॥ २ ॥

(९२६)

कर्म-योगाची काहाणी मातें न रुचे अंतःकरणीं. ॥ १ ॥ धृ ॥
मी वो ! रंगली आनंदें, अवधूतें परमानंदें. ॥ छ ॥
दिगंबरेंवीण माये ! कांहीं क्रियाचि आंगीं न साहे. ॥ २ ॥

(९२७)

योगवार्तेचें श्रवण तेथें न रिघे माझें मन. ॥ १ ॥ धृ ॥
मति गुंतली दत्तेंसीं. मीं ज़ाइन तयाचि सरिसी, ॥ छ ॥
वो ! दिगंबरेंवीण कांहीं मनें धरिज़े, ऐसें नाहीं. ॥ २ ॥

(९२८)

तीर्थयात्रेचें महिमान करी श्रवण, तरि मज़ आण. ॥ १ ॥ धृ ॥
नाम-घोषें गर्जन करितां प्रतिपदीं यात्रा बहुता. ॥ छ ॥
दिगंबराचें स्मरण तेणें तीर्थांसि पवित्रपण. ॥ २ ॥

(९२९)

पुराण कथया पुरे. मज़ नावडे दूसरें. ॥ १ ॥ धृ ॥
चित्त गुंतलें श्रीदत्तीं. आठवे तो पुडते पुडती. ॥ छ ॥
दिगंबराचें स्मरण ब्रह्म विद्येसीं समान. ॥ २ ॥

(९३०)

देवीं भरलें त्रीभूवन. तेथें न रिघे माझें मन. ॥ १ ॥ धृ ॥
मी वो ! वेघली श्रीदत्तीं. अन्य भजन विसरली भ्रांती. ॥ छ ॥
दिगंबरु, आत्मा, गुरू, परमात्मा, निराकारू. ॥ २ ॥

(९३१)

साधु-महिमा असो; तैसी मीं न भजें आणिकासि. ॥ १ ॥ धृ ॥
माझा दत्तु पाहीन नयनी. समर्पीन त्यांचा चरणीं. ॥ छ ॥
दिगंबरु, आत्मा, गुरू. येरु संघातु; मीं काये करूं ? ॥ २ ॥

(६३२)

यज्ञ, दान, तप, सुव्रत, श्रम—करचि माने समस्त. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तनाम ध्या ध्या ध्या रे ! प्रेम अमृतसार दुसरें. ॥ छ ॥
दिगंबराचें स्मरण न तृके येणेंसीं आन. ॥ २ ॥

(६३३)

पतिव्रते येकुचि भर्त्ता. केवि अनुसरों या दत्ता ? ॥ १ ॥ धृ ॥
देऊ न ह्मणें आणिकातें. या जीवा हो का भलतें. ॥ छ ॥
दिगंबरेंवीण आन न करीं देवस्मरण.

(६३४)

शिर्वी वाइलें सुमन, तें घेता नये परतोन. ॥ १ ॥ धृ ॥
तेंसें मज्ञ म्यां दीधलें दत्ता ! केंसें काढुनी वेइजे आतां ? ॥ छ ॥
आता मीं हें मासें नव्हे. कवणाचें स्मरण करोंव ?
दिगंबराचें मानस आन स्मरण न घडे तयास. ॥ २ ॥

(६३५)

गति कुंठली भव-पुर तरतां, वीष-विषय—शरीर—सुख—सरिता. ॥१॥धृ॥
रे ! देई कास सद्गुरुराया ! देवा अकळ न कळे तुझी माया. ॥ छ ॥
दिगंबरा ! मी धरीन हातु. येरु न लगे; न कळे परमार्थु. ॥ २ ॥

(६३६)

मार्गु न कळे भवकूपतमसीं. देवा ! त्रिगुणकर्णी तुज्ञ गिवसीं. ॥ १ ॥धृ॥
रे ! देइ हातु श्री-गुरुराया ! मन परति न धरी दत्तात्रेया ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तू समर्थु, योगविषयीं परम पुरुषार्थ. ॥ २ ॥

(६३७)

मन श्रमलें स्वजन वन भ्रमता. गति न चले शरीर सुख भजता. ॥१॥धृ॥
हें निदान पडताहे वरी. जन स्वजन तें कवण निवारी ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुजवीण छाया . दुःखकर चि सकळ योगिराया ! ॥ २ ॥

(६३८)

झरझरित सजळ झरे घटिका. निर न धरे, न धरे, क्षणा येका. ॥१॥धृ॥
रे ! त्रुटि तृटि पळ पळ वय चळलें. येर अवघेंचि वायां गेलें. ॥ छ ॥
दिगंबरेंवीण बहु दिन जीणें. तें हीं सकळ सुक्षिण क्षण क्षणें. ॥ २ ॥

(९३९)

धन, धनद, सदन, जन, जाया,
नित्य भज़तां शरीर गेलें वायां. ।। १ ।। धृ ।।
रे ! अवकाश न दिसे विचारा. तापत्रय मज़ करितें उबारा. ।। छ ।।
दिगंबरा ! तुझें स्मरण निदानी सोडविल; ऐसी धृति अंतःकरणीं. ।।२।।

(९४०)

क्षितितळ हें सकळ जळमाळित. नेघे चातकु जळ भूमिगत. ।। १ ।।धृ।।
कैसा आळवितो नीर्जनी ? माधवा ! पाव निदानी. ।। छ ।।
दिगंबरा ! तैसा मीं तूतें. दीर्घ आळवीं; पावसी कयीं मातें ? ।।२ ।।

(९४१)

वायां दुःखाचें करितासी हळाहळ. जळ-धरीं पेळितासी. ।। १ ।।धृ।।
ऐसें न करीं रे ! निर्वाण. भवविभ्रमें भ्रमित ज़ालें मन. ।। छ ।।
दिगंबरा ! तूज़ संसारू नाहीं. माझा अनुभउ ज़ाणतासि काहीं. ।। २ ।।

(९४२)

भय-जनकु होउंनि प्रकटसी; तरि कवणा सांगिजे ? परियेसीं. ।।१।। धृ ।।
देवा ! न करी रे ! वेदना, भवजनित-सकळ-दुःखदळना ! ।। छं ।।
दिगंबरा तूं सद्गुरू. आतां उतरीज़ा विषयविखारु. ।। २ ।।

(९४३)

रूपें सावळा डोळसू; पीवळासा वरि वासु; ।। १ ।। धृ ।।
ऐसा कैं देखैन येतां ? बाहुली लोडवीतां. ।। छ ।।
दिगंबरीं अत्यासक्त ज़ाहालें माझें चित्त. ।। २ ।।

(९४४)

आंगीं चंदनाची उटी; पीत मळिवटु लल्लाटीं; ।। १ ।। धृ ।।
ऐसा पाहिन कैं मीं डोळां ? अवधूतु भेटी आला. ।। छ ।।
दिगंबराचें दर्शन मातें वो ! अमृतपान. ।। २ ।।

(९४५)

उचलूंनि दोन्हीं भूजा मायेबापु आत्मा माझा, ।। १ ।। धृ ।।
येतां कैं मी पाहिन नयनीं ? मस्तकु ठेवीन चरणीं ? ।। छ ।।
दिगंबराचें मज़ ध्यान. कई होइल दर्शन ? ।। २ ।।

(५४६)

ना भि, ह्मणौनि सत्वरु उचलूनि दक्षिण करु, ॥ १ ॥ धृ ॥
येता कै मी पाहिन ? माये! अवधुत. धरीन पाये. ॥ छ ॥
दिगंबराचें भेटणें मोक्षासि आणी उणें. ॥ २ ॥

(५४७)

पुढें धावतां सत्वरू मागें भक्तांचा परिवारू; ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा येतां कैं देखैन ? अवधूतीं लागलें मन. ॥ छ ॥
ब्रह्मविद्येचा सागरु. अवधूत दीगंबरू. ॥ २ ॥

(५४८)

चाली चालतां डूल्तू. आनंदें सबरा भरितू; ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा देखैन कैं मी देवा ! अवधूतु प्राणविसावा. ॥ छ ॥
योगमायेसीं सहीतू दिगंबरु बरवतु. ॥ २ ॥

(५४९)

काळु मांडला कठीणु ! आता मग ज़ाईल प्राणू ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्तु कैं देखैन येता ? संकटीं सोडवींता. ॥ छ ॥
दिगंबरा ! हा संसारू अति तापनु, खरतरू. ॥ २ ॥

(५५०)

वीसरली बाळक वनीं. कैसी धांवतिसे जननी ? ॥ १ ॥ धृ ॥
तैसा कैं येसील माहेरा ? दत्ता ! कृपांबुसागरा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तूतें मोहो लावावा कवणें स्नेहो ? ॥ २ ॥

(५५१)

मायेबापाचें लेकरू मी कवणाची आश करूं ? ॥ १ ॥ धृ ॥
माझा श्रीदत्तु दावा नयनीं. आळंगीन हृदयभुवनीं. ॥ छ ॥
दिगंबराचें आळिवें मातें उपजत त्याची सेवे. ॥ २ ॥

(५५२)

काये पाहों मागें पुढें ? माझा श्रीदत्तु कवणीकडे ? ॥ १ ॥ धृ ॥
मातें गेला वो ! साडूनी. वोळले जळधर नयनीं. ॥ छ ॥
दिगंबरु दीनत्राता सुखसागरु हा सर्वथा. ॥ २ ॥

(५५३)

अवधूते कुरंगिणी ! तुझें बाळक धरिलें वनीं. ॥ १ ॥ धृ ॥

आतां सांडि भूतृणच्चारा. धांव घेई सैरवैरा. ॥ छ ॥
दिगंबरा ! वेगें आली. मीं वो ! सिंगारी घाली. ॥ २ ॥

(९९४)

अवधूते वो ! पक्षिणी ! कणुं वेंचीं झडकरूनी. ॥ १ ॥ धृ ॥
तुझें बाळक पाडिलें फांसां. कवणाची करिल आशा ? ॥ छ ॥
दिगंबरा ! वेगें आली. मन्मूखीं मूख घाली. ॥ २ ॥

(९९५)

दुबळांची मीं नव्हे. मातें गांजिताति अघवे. ॥ १ ॥ धृ ॥
माझा श्रीदत्तु केवो आहे ? बोलवा, धरीन पाये. ॥ छ ॥
दिगंबरु माझी माये. आणिकांच्या शब्दु न साहे. ॥ २ ॥

(९९६)

अवधृता ! रे ! जळधरा ! कइं वोळसी अमृतधारा ? ॥ १ ॥ धृ ।
तुझें चातकु मीं पांखीरूं; कवणाची आशा करूं ? ॥ छ ॥
दिगंबरेंवीण आन न करीं अमृतपान. ॥ २ ॥

(९९७)

मायेबापें वो ! सांडिलें ! आकाश येउनि पाडिलें ! ॥ १ ॥ धृ ॥
दुःख सांगावें ते कित्ती ? सखिये ! पुडतो पुडती. ॥ छ ॥
दिगंबर या–वांचून मीं ऐसेंचि देईन प्राण. ॥ २ ॥

(९९८)

तुझा होउनि तरला जनु. म्यां अपराधु केला कवणू ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! आळवितां न येसी. अपराधी होइन दासी. ॥ छ ॥
दिगंबरा ! बोलें गोठीः–कां लावितासि चटपटी. ॥ २ ॥

(९९९)

आठवीतां तुझे गूण दोन्ही सजळ ज्ञाले नयन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता कैं येसील भेटी ? प्राणपंचक धरिले कंठीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझे ध्यान होये दुःखाचें कारण. ॥ २ ॥

(९६०)

नामघोषाचें गर्जन तेथें वियोगु आठवी मन. ॥ १ ॥ धृ ॥
ते बा ! खरतर सायक साहों. कैसा मी निश्चळ राहो ? ॥ छ ॥

दिगंबरा ! तुझें नाम तेंचि वियोगदुःख परम. ॥ २ ॥

(९६१)

गुणकीर्तन श्रवण करितां रूप आठवलें श्रीदत्ता ! ॥ १ ॥ धृ ॥
भारी तळमळ लागली जीवा. भेटि होइल केव्हां केव्हां ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझे गूण वियोगें दुःखद, ज्ञाण. ॥ २ ॥

(९६२)

मीनु पडिलासे थडिये. त्याचा सहसा प्राणु न जाये ! ॥ १ ॥ धृ ॥
तैसें तुजवीण मातें ज्ञालें. प्राण न धरिती काहीं केलें ! ॥ छ ॥
दिगंबरा ! प्राणभूली नीदानी जेवि कवळी. ॥ २ ॥

(९६३)

गुरू चूकलें खिरारां; दश दीशा धांवे सैरा. ॥ १ ॥ धृ ॥
तैसे तुजवीण माझें मन. श्रमलें ही करी भ्रमण. ॥ छ ॥
दिगंबरा ! ये ! गा ! ह्मणतां कइं पावसील अवचीता ? ॥ २ ॥

(९६४)

कवणाची वास पाहों ? कैसा निश्चळ उगला राहों ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! सांडूंनि जकेळीं ज्ञासी, आळवितां ही न येसी. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझा पुत्रु. कवणाचा पलउ धरूं ? ॥ २ ॥

(९६५)

आठवसी प्रतिक्षणी. तुझा वीसरु न पडे मनीं. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! कैसे रे ! करावें ? तुज सोडूंनि भिन्न न सावे. ॥ छ ॥
दिगंबरा ! सत्य ज्ञाणः:— तुझा वियोगु मातें मरण. ॥ २ ॥

(९६६)

हातीं घेऊनियां खांडें करीं शरीर खंडे खंडे. ॥ १ ॥ धृ ॥
मग तूं पासूंनि होइं परुता योगिराया ! श्रीअवधूता ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुजवीण बहु होत असे कठीण ! ॥ २ ॥

(९६७)

कवळीन दोहीं बाहीं; ऐसी आवाडि होतसे देहीं. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! नीरास करिसी काह्या ? परमात्मया ! योगिराया ! ॥ छ ॥
दिगंबरा ! दर्शन देईं. प्रेम दाटीतसे हृदईं. ॥ २ ॥

(९६८)

गुणीं गुंपलें नुगवे मन. काये करिमील? तें साहीन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता! न वंच रे! परुता. न साहे वियोग वेथा. ॥ छ ॥
दिगंबरा! तुझां ठाँई गुंपल्यां विवाडु नाहीं. ॥ २॥

(९६९)

नेत्रकमलीं करणें पूजा, ऐसा हा संकल्पु माझा. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता! कैसा पडसी दृष्टी? रूप घालीन मनसापोटीं. ॥ छ ॥
दिगंबरा! गुणनिधाना! विधें तुझें विधरिलें मना. ॥ २ ॥

(९७०)

रूप भरलेंसे अंतरीं. देह नृत्य करी बाहेरी. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता! न धरिं रे! आतंका. मी न मनीं यया लोका. ॥ छ ॥
दीगंबरा! तुझें रूप प्रेमवर्धन सुखस्वरूप. ॥ २ ॥

(९७१)

मन परतउं माघोरं तुजपासुनि कवणें विचारें? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता! तुं माझें जीवन, जीउ, आत्मा, पांचही प्राण. ॥ छ ॥
दिगंबरा! तुजवीण कांहीं हीत वीहीत दुसरें नाहीं. ॥ २ ॥

(९७२)

मन करितासी कठीण; तरि तूं माझें जीवन. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कवणा पैं सांगावें? नव्हे, नव्हे, तैसें नव्हे. ॥ छ ॥
दिगंबरा! तुं पैं माये! येथें बुझावितें कोण आहे? ॥ २ ॥

(९७३)

मायेबापु तुं सद्गुरू. घालुं कवणावरी मी भारू? ॥ १ ॥ धृ ॥
आतां कठीण मन न करावे. भवबंधन हें छेदावें. ॥ छ ॥
दिगंबरा! तुं सारथी, अंकाकाळिचा सांगाती. ॥ २ ॥

(९७४)

जननी चि लांव होये. तइ कवणा पै सांगोनि काये? ॥ १ ॥ धृ ॥
तैसें मज कां करिसी? देवा! देवा! दावितासि प्रपंचु मावा. ॥ छ ॥
दिगंबरा! तुझां ठाँईं दुःखदातें कांहीं चि नाहीं. ॥ २ ॥

(९७५)

तुतें नाहीं माया ममता. आह्मी कैसेन जीजे आतां ? ॥ १ ॥ धृ ॥
मायेबापु तुं जनेशा. बहु धरिली तुझी आशा. ॥ छ ॥
दिगंबरा ! मी अज्ञानृ. तुतें हांसइल परजनु. ॥ २ ॥

(९७६)

वासनेचे पर्वत ज़ाले. दुःखे हृदय भरलें. ॥ १ ॥ धृ ॥
तें सांगोंनि कवणा काई ? तुज़ वांचुंनि स्वकीय नाहीं. ॥ छ ॥
कइ भेटसी ? दीगंबरा ! श्रमु सांगेन माहेरा. ॥ २ ॥

(९७७)

तुं गुणाचें निधान; योगभुमिके प्रगुम धन. ॥ १ ॥ धृ ॥
दैवें सांपडलासी देवा ! हृदई ठेविन ठेवा. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुं सुरतरु, स्वभक्त, करुणाकरु. ॥ २ ॥

(९७८)

बहु जन्म गेले वाया. आजी देखिलें श्रीगुरूराया. ॥ १ ॥ धृ ॥
आतां प्राणू वोवाळीन. मन मारूनि रूप धरीन. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुं तारकु. नेणें परमार्थु मी आणिकु. ॥ २ ॥

(९७९)

भवचक्रीं भ्रमण करितां नाहीं विश्रांति बा ! श्रीदत्ता ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां झडकरी यावे भेटी. मन होताहे परम कष्टी. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुं विसांवां. ऐसा भेटसील केधवा. ॥ २ ॥

(९८०)

भवसमुद्रीं तुं तारुं; मायेबापा ! श्रीसद्गुरू ! ॥ १ ॥ धृ ॥
कैसा पासूंनि होसी परुता? जीउप्राणु तुं अवधुता ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं तरि जीणें. आतां वियोगे न राहाणें. ॥ २ ॥

(९८१)

अर्थलाभाचिया कोटीं न पाहे त्या मी दृष्टी. ॥ १ ॥ धृ ॥
तुझें प्रेम दे, दातारा ! अवधूता ! जी ! माहेरा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुज़वीण न करी दुजें ध्यान. ॥ २ ॥

(९८२)

न करीं दुसरी गोष्टी. एकुवेळ देइजे भेटी. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! चाळा कां लावीसी ? पूर्वीच वीसरलासी ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझे आह्मी. तुज नेणोंनि ज़ालों कर्मी. ॥ २ ॥

(९८३)

देहीं कर्म तें गूणाचें वीवर्तु गुणमायेचें. ॥ १ ॥ धृ ॥
आतां सांडावें तें काई ? सांडी माडी कारण नाहीं. ॥ छ ॥
दिगंबर सर्व–सम गुणसहित निर्गुण ब्रह्म. ॥ २ ॥

(९८४)

कर्म अकर्म निष्ठा देहीं. तया देहासि ठाऊ चि नाहीं. ॥ धृ ॥
आतां कर्म ना अकर्म. नीज रूप अवघें सम. ॥ छ ॥
दिगंबरी पालटु नाहीं. अभिमानु कवणें ठाई ? ॥ २ ॥

(९८५)

देह वेद्य; देही वेत्ता; दोहींचे अंतर पाहातां; ॥ १ ॥ धृ ॥
तेथें बुडालें शरीर; प्रपंच भाव समग्र. ॥ छ ॥
आत्मया देह–संगु नाहीं. आतां विटाळ कवणे ठाई ? ॥ २ ॥
दिगंबरे मन सोवीळें. न लोपे गुण विटाळे. ॥ ३ ॥

(९८६)

आंगीं नलगे अवस्था. मी असैन चहूं परुता. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें भान कैचें काये ? असंगा संगु न साहे. ॥ छ ॥
दिगंबरें मी असंगु. आह्मा करणें नलगे त्यागु. ॥ २ ॥

(९८७)

देवीं देवो समर्पिला. होमु हवनी हविला. ॥ १ ॥ धृ ॥
आह्मी ज़ालो गा ! रीकामे. सुटलें रूपें नामें. ॥ छ ॥
दिगंबरीं क्रीया नाहीं. गुण गळाले सर्वही. ॥ २ ॥

(९८८)

पाकावरि कें पेशन ? दग्ध ज़ाल्या पुनरपि दहन ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां योगें ज़ालें पूरें. फीटले कर्मद वारे. ॥ छ ॥
दिगंबरू आत्मा देहीं. गुण क्रीया मुक्ता नाहीं. ॥ २ ॥

(९८९)

मुक्तासि बंधन नाहीं. कां बोलो पुडता पुडती ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां खंडलें, खंडलें. आह्मी न करूं सांगीतलें. ॥ छ ॥
दिगंबरू आत्मा ब्रह्म. योग्य नव्हे ययाप्रति कर्म. ॥ २ ॥

(९९०)

देह नाहीं, तैसें आहे. निर्धारु आंगीं न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कवणें घेइजे भारू ? आत्मा मी निराकारू. ॥ छ ॥
दिगंबरीं देह विवर्त्तु. यया पुडती कें परमार्थु ? ॥ २ ॥

(९९१)

मोक्षावरि उरलें कर्म. सद्गुरू तुमचें नाम. ॥ १ ॥ धृ ॥
हातीं घेतली जपमाळा. उच्चारिन वेळोवेळा. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें नाम मोक्षाहुंनि प्रीय परम. ॥ २ ॥

(९९२)

भेदु सर्वत्र हारपला. तो म्या गुरुचरणीं देखिला. ॥ १ ॥ धृ ॥
तया सांडूंनि न वचे मन. जेवि दुर्बळ लोभी धन. ॥ छ ॥
दिगंबरीं भजतां भेदु. तेथ न रूचे ब्रह्मानंदु. ॥ २ ॥

(९९३)

व्योमासि पल्लव ज़ाले. तैसें मन माझें परतलें. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! सगुण ज़ालें पुडती. गुणीं गुंपलें आसक्ती. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझी व्यक्ती. मन पडलें येतीरूती. ॥ २ ॥

(९९४)

योगसाधनें सोषिता विश्रांति न वटे चित्ता. ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! विक्षेपु करिसी वायां. माझी समाधि तुं योगिराया ! ॥ छ ॥
दिगंबरा ! सत्य ज़ाणः:— तुझें हो का मज़ बंधन. ॥ २ ॥

(९९५)

तृप्ति होऊंनि क्षुधा उरली. हे अपूर्व नव्हे बोली. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! कवळी रे अमुर्त. आता भुलविसी कवणें मतें ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुं अव्ययो. मुक्तातें होसि विषयो. ॥ २ ॥

(९९६)

पूर्ण ही अपूर्ण ज़ालें. माझें मन कां गा ! परतलें ? ॥ १ ॥ धृ ॥

दत्ता! वेध कवण तुझपासी? सोडिलाही न सूटसी. ॥ छ ॥
दिगंबरा! तुझें ध्यान. न परते तेथुंनि मन. ॥ २ ॥

(५९७)

ज्ञान मतींचें देखणें, मानलें ही मा तें नमनें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसी कवण याति मनाची? आवडी हृदईं तुझीचि. ॥ छ ॥
दिगंबरा! तुझां पाईं हित समर्पिलें सर्व ही. ॥ २ ॥

(५९८)

परद्वीपासि माणिक नेलें! तेथ पारखी अंध मिळाले!
तयां न कळे पिवळें काळें! पारखीविण हळवट ज्ञालें! ॥ १ ॥ धृ॥
आतां ज्ञाणोंनि बोलतां बरवें! ऐसें घेतलें माझेन जीवें! ॥ छ ॥
अर्थु न कळे तें श्रव श्रवण! दुःख जनक मानें कठिण!
दिगंबरी न रमे मन! वायां ज्ञातसें चतुरपण! ॥ २ ॥ छ ॥

(५९९)

चोरा न सहि चंद्रमा! कुष्टीया आंगीं उपमा!
अभक्तास गुण महिमा! पापी तो भजे कर्मी! ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें ज्ञाणीतलें गा! देवा! मीनले बहु जन मावा! ॥ छ ॥
शीर--शूळातें गायन! स्लेष्मंला शीर--स्राव!
दिगंबरा! तुझें ज्ञान वीष वीषइकां लगूंन. ॥ २ ॥

(६००)

शांति नावडे तोंडाळा. नाइकवे पर--गुणु खळा.
हातु न वाहावे व्याळा. परमार्थु तेवि कुश्चीळा. ॥ १ धृ ॥
आतां वर्त्तावें तें कैसें? जन येकुाचें बहुविध असे. ॥ छ ॥
कुज्ञरातें तत्वबोधु नाइकवे श्रवणीं शब्दु.
दिगंबरेसी अभेदु. सत्य गमिती ते साधु. ॥ २ ॥

(६०१)

ज्वरें वदन विटाळलें; पय पानीय कडुवट ज्ञालें.
तमोगूणे शरीर ज्ञळे; तयां न साहाती सोहोळे. ॥ १ ॥ धृ ॥
माळा तोडिली गळांची. कैसा धावतुसे उघड ाचि? ॥ छ ॥
उपदेशु वैरी होये. शब्दमात्र न साहे.

दिगंबरा! करणें काये? तो चूकला तुम्ही सोये. ॥ २ ॥

(६०२)

कां गा करितासी खरखरा? गुरु येक कीं ते तेरा?
तैसा स्मरैन दिगंबरा. मी न स्मरे दूसरा. ॥ १ ॥ धृ ॥
आतां निंदा करिसील काह्या? देऊ येक. येर ते माया. ॥ छ ॥
प्रिय येकू कीं दूसरा? सती भज्रे प्राणेश्वरा.
आळवीतां दीगंबरा, कोण्हीं न करावा खरखरा. ॥ २ ॥

(६०३)

शिवगणीं पूजिला विष्णु वैष्णवीं त्रीनयनु.
पाहा येणें भेटती आनु. दाहां देवांचा कवणु गणू? ॥ १ ॥ धृ ॥
जना सांडीं रे! ते युक्ती. "एको देव" ऐसी श्रुति. ॥ छ ॥
ज्रेथें भज्रिज्रे तेथें एक देओ. दुजा नाहीं आणीकु.
दिगंबरु येकानेकु; जना! न करी रे! कुतर्कु. ॥ २ ॥

(६०४)

संसार भरली सांत. जन बहुविध मिनलें तेथ.
क्रियाफळ कणें भरिलें वित्त. हीत वेचूंनि अहित समस्त. ॥ १ ॥ धृ ॥
अर्थलाभु मुदलाचि तुटी. धनें धनिक ज्राहाले जन कष्टी. ॥ छ ॥
नाना योनी ठेविले ठेवो सुख दुःख न चि बघवे.
दिगंबरेंसीं अंतर वरवें. धूर होतां तयां तेंचि फावे. ॥ २ ॥

(६०५)

संसारवाणिज्रे निघाला; हितसंग्रहो घरीं विसरला;
आयुष्याचा विकरा केला; अर्थु अनर्थु ज्रोडी ज्रोडला. ॥ १ ॥ धृ ॥
आतां लाभु भज्र रे सुज्राणा! येकां आयुष्य वेच्रणें पुरेच्र ना. ॥ छ ॥
आत्मपणी भेटिला अर्थु, एसा बोलतां कवण पुरुषार्थु?
दिगंबराचा मोडला पंथु. कोण्ही विकरां न भज्रे परमार्थु. ॥ २ ॥

(६०६)

विषय-विषय-विषम-गुण-सरिता संसारु भरला चि रीता.
ज्रळमळीत नीतळ जळ पाहातां मृगजळ काये येइल हातां? ॥ १ ॥ धृ ॥
तेथें काये तरसी? सुज्रणा! ज्राणवलियां ज्रागरीं ज्रेविं सिंवणा ॥ छ ॥

सन्निपाताची दृष्टीचि भरली. भाग्य ह्मणिज़े ते अवघीचि भूली.
दिगंबराची सोये चूकली. लाभु लटिका ते हाणीचि ज़ाली. ॥ २ ॥

(६०७)

धन, कनक, सदन, जन, जाया क्षणक्षणा पाहातासि वाया !
माप लागलें मनुज—देह—वया.
पाहे स्वहीत. काये म्यां केली क्रीया ? ॥ १ ॥ धृ ॥
जन्ना सांडि रे ! दुराशा. बोले भय देहवय आले कळसा. ॥ छ ॥
काये यौवन पाहासी शरीरीं ? लेणें कनक कानक वरि वरि.
स्थिर आयुष्य न दिसे संसारीं. काळु ज़वळि पावला. सोये धरी. ॥२॥
कीट, भस्म ययाचें अवसान. अन्नमय हें घातुक, सत्य ज़ाण.
दिगंबराप्रति रिघपां ! शरण. देहा सेवटीं अचूक आहे मरण. ॥३॥

(६०८)

घ्राण छेंदूनि मोतीं सुपाणी, कर्ण खांडूंनि कुंडलें दोन्ही,
घालावीं कवणे स्थानीं ? मी बरी ज़ाली दिसताहे जनीं. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! वय गेलें; अर्थु मिळाला. भोगा न ये + + + + प्रति गेला.
डोळे फोडूनि दर्प + घेइज़ें. आतां स्वमुख कासेन विलोकिजे ?
दिगंबरेंवीण ज़ें ज़ें कीज़े, तेणें आपुलें स्वहीत न मनिज़े. ॥ २ ॥

(६०९)

मळ मूत्रांच्ना देह पेटारा. क्रीम कीटक खाती धरधरा.
माजि रिघोनि धरिसी अहकारा !
आप विसरोनि भुलसी गव्हारा ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! आतां सोये धरी लवलाहे ! देह नरक नरकप्रद आहे. ॥ छ ॥
मळपात्रचि ज़ाहालासि काह्या ? मळपदप्रद करितासि क्रीया.
दिगंबरेंवीण न भज़े विषयां. मळ पंवूचि भोगिसी कासया ? ॥ २ ॥

(६१०)

मळ मूत्र आतुलां शरीरीं. स्त्रीसंयोगु तयाचि परी.
तुज़ाचें घेतासि वरी. कर्म करिसी ते नरक सामग्री. ॥ १ ॥ धृ ॥
जना वीवेकु धरि कां मनीं. वाया श्रमसी आयागमनी. ॥ छ ॥
ज़ो देंदा तो ऐसाचि ज़ाये. जे क्रिया ते तेंचि ते आहे.

पुढें आवधीं मी न पाहे. दिगंबरेंविण भ्रमातासि काये ? ॥ २ ॥

(६११)

हीत ह्मणौनि धन ज़ोडिलें. आड प्राचीनं भोगासि आले;
तें कैसेनि ह्मणिज़े आपुलें ? क्रियमाण चि खोटें घडलें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा अर्थे अनर्थु जाला ! वीण पारखी जनु ठकला ! ॥ छ ॥
अर्थु ना ते क्रीयमाण. तणे घडताहे दुष्टाचरण.
द्रव्य दुःखाचें कारण. ऐसें नेणती चि अज्ञान. ॥ २ ॥
अर्थसाधनी दुःख चि साधे. संरक्षणीं दुःखचि नांदे.
व्ययीं दुःख उरे न--सुखें. दिगंबरु न कळे प्रमोदें. ॥ ३ ॥

(६१२)

आदि गुरूवीण संदेहो न तुटे. आदि गुरूवीण तत्व न प्रकटे.
दुर्ज़ दैवत न घंटे, न घंटे. आदि गुरूवीण माया न निवटे. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसी गुरु देवता पुज़ावी; जपावी; हृदयीं धरावी. ॥ छ ॥
आदि गुरूवीण न पविज़े पारु. आदि गुरूवीण न कळे विचारु.
आदि गुरू हा मज़ दीगंबरु; ज़या स्मरतां नेणिज़े संसारु. ॥ २ ॥

(६१३)

गुरु सांडूनि तीर्थां ज़ाणें; तयीं परतोनि का मग येणें ?
दावितां मुख लाजिरवाणें! विभचारिणीचें ज़ळो जीणें! ॥ १ ॥ धृ ॥
क्षोभु न करीं रे ! सुज़ाणा! भानु देयीं माझ्या वचना. ॥ छ ॥
आन मोक्षासि द्वाराचि नाहीं. बहु देवतें भज़ोंनि काज़ कांहीं? ॥ छ ॥
ज़ाली असतां प्रतिती हृदयीं, दिगंबरेंवीण अतःपर कायी ? ॥ २ ॥

(६१४)

ग्राम निर्गमा येक चि द्वार. चुके तें; तयीं बहु मर मर रे !
श्रमु भ्रमतां भ्रमतां निरंतर. सेखीं गति ते न दिसे अतःपर. ॥ १ ॥ धृ ॥
तैसी गुरूवीण सुटिका नाहीं. देव इतर भज़ोंनि काज़ कायी ? ॥ छ ॥
काळीं पवित्र षड्रस मिळे अन्न; जेवणारासि न कळे वदन रे !
येरां करणातें चि स्वकरून अर्थु कवण वायां श्रमकरण ? ॥ २ ॥
तैसें गुरुवीण येकें ज़ालें. काये करिती देव मिळाले ?
योग तपस वायां गेले. दिगंबराची महिमा ते नकळे. ॥ ३ ॥

(६१५)

दुज्ञा कवणु गणिज़े दीनवाना ? सूर्ये वांचूनि निसिमान हर्त्ता ?
आदिगुरू अगुण गुण भर्त्ता, त्याचें महिम्न न वर्णवे आतां. ॥ १ ॥ धृ॥
ऐसा भजनीं भजिज़े आदिगुरू. तेणें उतरिज़े भव--पर-- पारू. ॥छ॥
देवदेवाचें सामर्थ्य तें हीं गुरूप्रति ज़ना ! न चले चि कांहीं.
सत्यावरि तपे असत्य काई ? ऐसा दिगंबरु धेला हृदयीं. ॥ २ ॥

(६१६)

कृपेवाचूंनि शब्दे न तरिज़े. पोथी पुस्तकें तें कर्म नुमज़े रे !
अभिमानु तो कासया धरिज़े ? शंका सांडुंनि श्रीगुरु भजिज़े.॥१॥धृ॥
जनां याहुंनि बोलणें नाहीं. गुरुवाचूंनि कवणीं भरी दोहीं ? ॥ छ ॥
वाड निबिड जीणें चतुर तें सांडि; ज़ाणिव भज़ सद्गुरूतें.
युक्तिवादु न सेरे ज्ञाण येथें. दिगंबराप्रति अवघें विसरतें. ॥ २ ॥

(६१७)

खदिरारंण्य बदरीज़ोगें अरिसवज़डें सहज़ प्रसंगें.
तेथें चंदनु कव्हणे योगें उगवला संगति—लागें ? ॥ १ ॥ धृ ॥
परि तो न धरी परगूणातें. तैसें माणुस कैं पाहिन तें ? ॥ छ ॥
तया सीलेसी पडली गांठी. येतां—ही—अंगा तूटी;
पर गुणू न धरी पोटीं; ज़ाळिला ही परि सेवटीं. ॥ २ ॥
संगु हो कां भलयातैसा; परि न चळे ज़ो विश्वासा.
दिगंबरीं अद्वय—रसा तो साधु; नव्हे तरि कैसा ? ॥ ३ ॥

(६१८)

दिव्य कर्पुरू कस्तुरि चोवा केतकी दळ चंपकु मुरवा रे !
चंदनाचा करूंनि मेळावा, किज़ेल सणाचा माझारि ठेवा. ॥ १ ॥ धृ ॥
परि तो नेघे परगूणाते; स्व—गूणें वेधी इरातें. ॥ छ ॥
ऐसें माणुस पुरेगा ! देवा ! ज़े न धरी गूणु परा—चा, स्वगूणें वेधी सर्वां. ॥२॥
क्रोधियाचें वदन पाहातां हरे साधूची साधुता.
दिगंबरा पुरे आतां संगु तयाचा सर्वथा. ॥ ३ ॥

(६१९)

सुगरणी केलीं अन्नें. षड्सें भरलें भाणें.

वरि विटाळलें वमनें. सेवावें आतां कवणें ? ॥ १ ॥ धृ ॥
तैसें क्रोधें जी ! देवराया ! ज्ञाणपण ज़ातसे वाया.
करीं दंड, कुमंडलु, माळा; ललाटीं त्रिपुंड्रू टीळा;
सन्यासी योगी ज़ाला; क्रोधवंतु वायां गेला. ॥ २ ॥
वर्ण, वेषें न तरि–ज़ो. नाट्य, नट्टु, नटी तद्वतु बुझे रे !
दिगंबरा ! कळलें; तुझें नित्य भजन गुणीक न पविजे. ॥ ३ ॥

(६२०)

क्रोधाच्या हृदयीं सांटा; जपु करीतसे करंटा रे !
मन धावे बारा बारा वाटा. ऐसा जन्मु तो वोखटा ! ॥ १ ॥ धृ ॥
कष्टा याहूनि मरणें भलें. देह जितचि वायां गेलें. ॥ छ ॥
कल्पनेच्या वाहे पुरीं. सुप्तुप्ति हृदय भरी.
जपु ध्यान ऐसिया वरि. तें न सरे दीगंबरीं. ॥ २ ॥

(६२१)

दंभ, दर्प, देहगत्त मद–मत्सरें हृदय लिप्त.
आशा धरूनि भ्रमे चित्त. तया साधन नव्हे उचीत. ॥ १ ॥ धृ ॥
जना ! न करीं रे ! आयासू. तेणें योगें चि पावसी नाशु. ॥ छ ॥
पात्रशुद्धीविण साधन, योग तप सुक्रिया ज्ञान,
होय अनर्था कारण. दिगंबराचें नलगे ध्यान. ॥ २ ॥

(६२२)

हर्ष विषाद भरलें मनीं. संपादी वैराग्य वचनीं.
जन मोहक वर्ते जनीं ज़ळो ! ज़ळो ! ज़ळो ! तयाची करणी. ॥१॥धृ॥
आतां कैसें पद पाविजे ? साधनीं आघातु वाजे. ॥ छ ॥
दीपु न धरे वाव घणी. ज्ञान चंचल गुण वारणी.
फळ काये त्याचा वचनीं ; दिगंबर प्राप्ती वांचूनी. ॥ २ ॥

(६२३)

योगहीन करचरण, प्राण, शरीर, श्रवण, नयन,
ऐसया आलें मरण. झणें घेतु तया श्वान. ॥ १ ॥ धृ ॥
धीग्य शरीर तयाचें. श्वाना हीन करी सुखाचें. ॥ छ ॥
कडू तुंबा; वरि नाशला; श्वानाच्या वमनीं पडिला.

तैसा तो येकू वायां गेला. दिगंबरातें चूकला. ॥ २ ॥

(६२४)

श्रमु न मनी भ्रमतां; नीचाची सेवा करितां.
मन गुणहीन करितां वेथा, मानी तो येथ सर्वथा. ॥ १ ॥ धृ ॥
देवा न पाहे मीं पृष्टी. झगें होयील तुज्ञमीं तूटी. ॥छ ॥
नेणे पापाच्चा कांटाळा. बहु ग्रामर्णीच चाळा.
शांति न धरी चांडाळा जळो ! जळो ! त्याची कळा. ॥ २ ॥
वेषु दंभाचि कारणें. धूपो हृदय निखळ तमोगुणें.
दिगंबरा ! सत्य ज्ञाणे::-- त्याचें वदन नाहीं पाहाणें. ॥ ३ ॥

(६२५)

चाऱ्ही वाच्चा गळती घाणा. ज्ञाला शब्दाच्चा उगाणा.
आतां बोलैन मनिचीया खुणा. क्षणें आडलु होये श्रवणा. ॥१॥धृ॥
ऐसें विनवीं मीं साधूतें. भरले ते रीते भरितें. ॥ छ ॥
गगनाहूंनि पातळ आहे. परिशून्यत्व आंगीं न साहे.
देखणया मारूनि पाहे. दिगंबराचें दुसुर खाये. ॥ २ ॥

(६२६)

गगनाची परतली दृष्टी. पाहे ब्रह्मांडाचिया कोटी.
देहाची काइसी गोष्टी ? प्रपंचु कवणे कपाटीं ? ॥ १ ॥ धृ ॥
माझें मीपण उरले तेथें. तें सेरल माझेनि हातें. ॥ छ ॥
मूळ पाहातां कांहीं चि नाहीं. येथ पुरुषार्थु प्रलपन कायी ?
दिगंबरीं वीवर्तु वायी. शुद्ध ब्रह्म सकळ अदेही. ॥ २ ॥

(६२७)

गगनाचें फळ तोडीलें! आंधारें धरूनी पिळिलें!
वंध्येचें बाळ वधिलें! मृगजळ निर्देव केलें! ॥ १ ॥ धृ ॥
तैसें अविद्या–गुण—भान बोलों नीराकरण! ॥ छ ॥
छायेचा केला वधू! सर्प नव्हे फरकटि छेदु!
दिगंबरी द्वैतोच्छेदु. बोलिलों मिथ्या—वादु. ॥ २ ॥

(६२८)

प्रळयार्णव; आलें भरितें. व्योम भरींव; परी तें रीतें.

नीरस छिद्र; नीरंतर तें. वाॐ नेदी निजगुणातें. ॥ १ ॥ धृ ॥
जन बुडालें! बुडालें! जीत, जीवत्व ठायीं निमालें! ॥ छ ॥
ज्ञाणवलें ज्ञाणीव खाये. नेणीवा ज्ञाणवत आहे.
ज्ञाणों, नेणु, ज्ञाणे काये? नेणों ज्ञाणे, तो रूप न लाहे. ॥ २ ॥
ज्ञाणवलें तरि ते नोहे. नेणवे तै बोलणे काये?
दीगंबरीं मन न राहे. ते ज्ञाणत ज्ञाणणें न साहे. ॥ ३ ॥

(६२९)

युक्ति करितां निर्वीकल्पी, स्फूरे तें आपुलां लोपी.
लोपेना सच्चिद्रूपीं. प्रकाशेना प्रलापीं. ॥ १ ॥ धृ ॥
आतां बोलावे ते कायी? संकल्पा ऊरिचि नाहीं. ॥ छ ॥
बोलणें चि अबोलणें. अबोलें बोलु बोलणें.
दिगंबराचें करणें आकाश पालवीं भरणें. ॥ २ ॥

(६३०)

ज्ञया कारणें सकळ विषय; जया कारणें जन, धन प्रीय रे!
वेद वैदीक सकळ ही कार्य, तत्वज्ञान आणि ब्रह्मज्ञेय; ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा आत्मा तो देखावा, आइकावा, मननीं भज्ञावा. ॥ छ ॥
ज्ञया कारणें भजिज्ञे गुरू; नित्य अनित्य वस्तु विचारू;
आराधावा दीगंबरु; ज्ञयाहुनि नाहीं परु प्रियतरु. ॥ २ ॥

(६३१)

आत्मा देखिज्ञे; हें बोलणें बोलावें. जना अभिमुख मात्र करावें.
परि देखिज्ञे ऐसा नव्हे. दृश्यमान तें प्रपंच अघवे. ॥ १ ॥ धृ ॥
सर, सर, रे! सर, पामरा! लक्ष तुझें नव्हे; काइसी मुद्रा? ॥ छ ॥
दृश्य, दर्शन साक्षी ज्ञाणेः:— आत्मा तो कासेनि पाहाणें?
दीगंबरा सुचरु ह्मणे. डोळा पाहाती तीं अज्ञानें. ॥ २ ॥

(६३२)

दर्शनाचें खंडन करितां, साक्षात्कारु नये प्रळपता.
रे! संप्राप्ति कैसी आतां? येथ विषयीं श्रवण कीज़े श्रोतां. ॥१॥धृ॥
दे ॐ तो के नयनीं प्रकाशे. देखावा ह्रदयीं सुमनसें.
देहादि दृश्य निरासे. मनें आत्मा मननीं प्रकाशे.

मना वांचूनि देखणें चि नसे. दिगंबरें वर्म उपदिष्ट ऐसें. ॥ २ ॥

(६३३)

मन गुणीक, सगुण, गुण—कार्य. तयानिर्गुण--पद कैसें ज्ञेय ?
यया बोलाचें तात्पर्य; इंद्रियातीत पद सेवनीय; ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञेये परतलें मन वाचेंसी; गुणी नेणत परम पदासी. ॥ छ ॥
इंद्रियाचें निसुटलें संगें मन मननी भरे अंतरंगे.
मति विराली तेणेचि अंगें. दिगंबर मग सहज्ञचि अवघें. ॥ २ ॥

(६३४)

मन मारूनि तत्व बुझावें. स्वसंवेद्य तत्व भज्ञावें.
ऐसेंही प्रलपन नव्हे. येक येकपणें ज्ञाणतचि नेणवे. ॥ १ ॥ धृ ॥
गुंति पडली कवणा पुसावें ? सद्गुरूप्राति शरण रिघावें. ॥ छ ॥
एकत्वें जाणणें न घडे. चिन्मयत्वें नेणपण उडे,
येणें वचनें संदेहो पडे. दिगंबरेंविण तो न खडे. ॥ २ ॥

(६३५)

गुरुकृपेसि अंकुरु ज्ञाला. तेणें देहात्म भाऊ गळाला.
प्रपंचा भासु निमाला. आधीं प्रबोधु इतुलाचि ज्ञाला. ॥ १ ॥ धृ ॥
आतां दिवसा दिनमान सरलें. शशिसूर्य, नेणें, काये ज्ञाहाले ? ॥ छ ॥
अवनी, जळ, वायो, ना गगन, दहनाचें ही ज्ञालें दहन.
दिगंबराचें ऐसे वचन अनुभवाची यावरि खूण. ॥ २ ॥

(६३६)

देहीं टकमक ज्ञाली करणा. धर्मु कव्हणातें स्फुरेना.
नीमाली गुण—चेतना. भज्ञे भजनी मनस नीज्ञ मरणा ॥ १ ॥ धृ ॥
आतां उघडूनिं कित्ती वदावें ? प्रळयाचेंचि मान अघवे. ॥ छ ॥
शून्य लागे शून्यांपाठीं; आभासु घालूनि पोटीं,
दिगंबराची ये भेटी. अविसरु नाविसरु ऐसी गोष्टी. ॥ २ ॥

(६३७)

डोळां होतें तें देखणें नेलें चोरी. तेथ टकमक पडली बाहेरी.
बुद्धी परुते आपुला गुण करी. नेघे परि तें चतुरु आंगावरी. ॥१॥धृ॥

ऐसें प्रकटचि बोलताहे वचन. खुण ज़ाणती चतुर महाजन. ॥ छ ॥
जीत जीवासि अंतर पडिलें. मन मरोनि मनचि सर्व भरलें रे !
दिगंबरे हे कैसें केलें ? गोवी उगऊनि उगवीं गोविलें. ॥ २ ॥

(६३८)

ज़ागतां मज़ जागृति नाहीं. स्वप्न निवटलें ठाइंकें ठायीं.
ज़ाली सुषुप्ति; नेणवे कायी ऐसी तुरीया; नुमटे चि हे ही. ॥ १ ॥धृ॥
परि मी आनंदु कवणां सांगों. मीपण मेलें; कवणा मागों. ॥ छ ॥
मी आहें; तेथ मज़ मी नाहीं. मी नाहीं; तेथ ठाइंच्या ठायीं.
दिगंबरा पडले ठायीं. बोलावया अवकाशु नाहीं. ॥ २ ॥

(६३९)

कैसा तपणी तपला अंधकारू ; तेणें लोपिला शशि—दीनकरू.
पाहे तयाचीला वृत्ति—चोरू. ऐसा वैरी तो आमुचा मित्रु. ॥१॥धृ॥
आतां कैसें जी बोलावें ? गगनातें पदरीं भरावें. ॥ छ ॥
तमसाची वळिली वाती. ते ज़ालियेली स्वज्योती.
दिगंबरातें आरती समर्पीली स्वसंवित्ति. ॥ २ ॥

(६४०)

प्रपंचु ना जीवन देह न दिसे सगूण. आप ज़ाणोनि कैसें स्नान करावें अघमर्षण ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां असावें स्वस्थिति. क्रियेची न चले युक्ती. ॥ छ ॥
अन्वयें निर्विकल्पीं बूडालें गांग स्वरूपी.
दिगंबरु न भिज़े आपीं. स्फुरे तो गंगालोपीं. ॥ २ ॥

(६४१)

गगना चि ऐसा आहे. दुज़ें वस्त्र मातें न साहे.
नेसवावें कैसें काये ? तया पुरेसें काय आहे ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां असावे स्वस्थिती, वस्त्राची सांडूनि भ्रांति. ॥ छ ॥
आछनें नाछादे, आछादन रूपीं छादे,
अवघा चि पूर्णानंदें, दिगंबरु वस्त्रा भेदें. ॥ २ ॥

(६४२)

देश—काल—वस्तु—त्रय—माजि ज़या वर्ते ज्ञेय;

पूर्ण पद निरामय अवघें चि मीं अद्वय. ॥ १ ॥ धृ ॥
आतां सोंविळें कैसें बैसावें निराभासें ? ॥ छ ॥
गुण छेदले अनुपायें. स्पर्शु मायेचा न साहे.
दिगंबरा ! व्यक्ती न ये. तया सोंविळें ते काये ? ॥ २ ॥

(६४३)

मंडल न दिसे ज्ञेय. लोपलें कालत्रय.
ब्रह्म अवघे अद्वय, स्व—स्वरूप, अव्यय. ॥ १ ॥ धृ ॥
आतां करणें कैसी संध्या ? मातें विद्या, नां अविद्या ! ॥ छ ॥
गुण क्रियेचां संलोपीं, स्थिती असतां निर्विकल्पीं,
संध्याचि गेली लोपीं, दिगंबरीं आप रूपीं. ॥ २ ॥

(६४४)

निरवैव, गुणातीतू, अवघाचि सदोदीतु.
दृश्य छेदिलें वीवर्त्तु. यज्ञाची काइसी मातु ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां असावें स्वस्थिति, क्रीयेची करूंनि विभूती. ॥ छ ॥
हव्य, होतां, ना आचरण. अग्निमंत्रु, ना वीधान.
ब्रह्माग्नी करितां हवन, हेंचि केलें म्या अवदान. ॥ २ ॥
अन्वयें न थरे भाऊ. व्यक्तिरेकें सर्व अभाऊ.
दिगंबरु ठायें ठाऊ. यज्ञु भोक्ता कर्त्ता देऊ. ॥ ३ ॥

(६४५)

देऊ ह्मणौनि आलों पासीं, मूळ आठवे मनासी.
तेंथें देऊ पडला ग्रासीं. वाऊ न दिसे क्रियेसी. ॥ १ ॥ धृ ॥
आतां पूजावें कां देवा ? वीसरलें भिन्न स्वभावा. ॥ छ ॥
देऊ भक्तु ना वीधान. पदार्थ कैचें आन ?
स्वस्थीतीचें पूजन. दिगंबरीं निश्चळपण. ॥ २ ॥

(६४६)

नित्य चंचळ जळ वाहे सरिता. क्षण क्षणा वय दिसताहे सरतां.
तद्विषयीची न करिसी चिंता. प्राणु देतासि, अर्थु वो सरतां. ॥१॥धृ॥
जन ठकलें ये संसारीं. लाभु थोडा; हानीचि भारी. ॥ छ ॥
अर्थ वेंचितां आपार कोटी. गेलें आयुष्य; न पडे दृष्टी.

दिगंबराची कासेनि भेटी ? प्रति जन्मीं तूं ऐसाचि कष्टी ! ॥ २ ॥

(६४७)

अस्थी हाणिजे जैसें श्वान; ते अस्थि चि ज्ञाये घेउंन ?
तैसें पापे देह निर्माण; तें चि धरूनि बैसताहे जन ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां दंडावें ते कैसें ? अवकाशु दंडा न दिसे. ॥ छ ॥
मळपंकाहूनि काहीं आतां दंडु उरला नाहीं.
देहीं आसक्तु होता देही, दिगंबरु न पडे ठायीं. ॥ २ ॥

(६४८)

वय ज्ञातसे सरसरां. आंगीं संलग्न ज्ञाली जरा.
तापत्रयाच्या उभारा. मनें सांडियेलें विचारा. ॥ १ ॥ धृ ॥
जना काये पाहातासि आंग ? कुंठले च्या-ऱ्ही मार्ग. ॥ छ ॥
काम–क्रोध नित्य वैरी. अहं ममता भत शरीरीं.
तरसील कवणे परीं ? रीघ शरण दिगंबरीं. ॥ २ ॥

(६४९)

मन चचळ, भ्रमित, विकारी, हीताची सोये न धरी.
अविवेकु तयावरी काम–क्रोध हे भ्रामक वैरी. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसी अडचणि ज्ञाली जीवा. वायां गेला जन्मु अघवा. ॥ छ ॥
देह प्रारब्धा अधीन. वरि लौकीक पाश गहन.
देह गेलें वायां वीण. दिगंबराचें नटके ध्यान. ॥ २ ॥

(६५०)

विषयांचें करितां ध्यान, जन्म गेले वायां वीण.
पुढें परति न धरी मन. दुःखा न दिसे अवसान. ॥ १ ॥ धृ ॥
कष्टा मर! मर! रे! अज्ञाना ! किती भोगिसी जन्म–मरणा ? ॥ छ ॥
पुर्वीचें कोठें आतां ? आताचें तैसे पाहातां, ॥ रे ! ॥
येकला तूं येतां ज्ञातां. दिगंबरु स्मरें भ्रमीता. ॥ २ ॥

(६५१)

चर्म रोमाचें आवर्ण; मासाचें परिपुष्टपण;
उभयात्मक सुंदरपण; अस्थि लाउंनि केले कठिण ॥ १ ॥ धृ ॥
याच्या भीतरु पाहें पां कैसा ? काये पाहातासी आरिसों ? ॥ छ ॥

द्वारें नव ही द्रवती मळ. रक्तमय चि सकळ.
पाकीं द्रवे परम कुश्चीळ. नाम, रूप मिरविति बरळ. ॥ २ ॥
प्राणसंगें चंचळपण तेथें घातलें तुतें जाण.
देह येणें रूपें पतन. दिगंबरा प्रति रिघ कां शरण. ॥ ३ ॥

(६५२)

देह कुश्चिळ तुझा ठायीं. तें बा ! जीवेंसीं धरितासि कायी ?
हासे; तयासि बोलूंचि नाहीं. क्रोधु येतुसे हें भांडायी. ॥ १ ॥ धृ ॥
आतां हासावें तें कित्ती ? तुझी तुज आंगी न कळे प्रतीती ! ॥ छ ॥
कर्म करितांसि, तें सर्व खोटें. काम–क्रोध नरकप्रद मोटें.
दिगंबरु तुजप्रति कोठें ? धिग्य ! ह्मणतां, परम दुःख वाटे ! ॥ २ ॥

(६५३)

सिमुरा प्रति दर्पणु नेला. तेणें पाहावा ही अवगुणु आपला.
तया क्रोधु कां तेथें आला. तैसा उपदेशु न रुचे खला. ॥ १ ॥ धृ ॥
आतां हासावे तें कित्ती देवराया ! पुडतो पुडती ? ॥ छ ॥
अवगूणु तो आपुलां ठायीं. तेथें दर्पणें केलें कायी ?
दिगंबरा ! कळलें ये देहीं:— ऐस्या मनुजासि लाजचि नाहीं ! ॥ २ ॥

(६५४)

कंठु हरणीं वस्त्र गळालें ! तेथ पाहाणारीं काये केलें ?
वर्म–वार्दे आपणूं चि बोले. ध्यानी निद्रया तैसेंचि घडलें. ॥ १ ॥ धृ ॥
आतां हासावें तें कित्ती ? डोळे ध्यानी उन्मत्तु हस्ती. ॥ छ ॥
अवगूणु आपलां आंगीं. तरि साहावी मरमर अवघी.
क्रोधु काइसा ते प्रसंगीं ? दिगंबरा ! हें देखिलें जगीं. ॥ २ ॥

(६५५)

कथा पुराणीं लागे डोळा. कैसा हालुतसे हिंदोळा ?
बैसलीया अमृतकळा, तत्व न घोटे सांडाळा. ॥ १ ॥ धृ ॥
तया उपदेशु कीजे कैसा ? ह्मणे येईल रोषावेषा. ॥ छ ॥
दुर्लभ मनुज–शरीर; तेथें आरोग्य तें ही थोर;
वरि पडलें श्रवणसार; कैसे वंचताति पामर ? ॥ २ ॥
तुज कैचा रे ! सत्संगु ? दैवें सांपडला सूमार्गू !

बाधा ज्ञातसे अवघा योगू ! दिगंबरेंसीं न तुटे वियोगु. ॥ ३ ॥

(६५६)

विषनिद्रे सुखकर शिवणां ! काये भजतासि परम अज्ञाना !
पाळासि, ज्ञाण, निदाना. ॥ १ ॥ धृ ॥
रे विषविषयांचें सेवन प्रीति—रसीं सिके अंतःकरण. ॥ छ ॥
संसार, सुखदुःख, सकळ रस, रागु, रमण, तळमळ,
भ्रमु बाधकु मायाजाळ, दिगंबरेंवीण दुःखासि मूळ. ॥ २ ॥

(६५७)

ग्रह ज्ञळे; तेथ सार विसरा कां ठेवितासि ! रे ! गव्हारा !
क्षीण ज्ञातसे वय सरसरा. येथ काइसें सोसणें उपचारां ? ॥ १ ॥ धृ ॥
जना ! तूं कां रे ! नीदसूरा ? धरीं परति न धरीं अविचारा. ॥ छ ॥
जीर्णे परमीत; देह ज़ाइज़णें. येथ ममता वोखटी लाहो करणें.
दिगंबरु गुरू साधे येणें जरि; तरींचि कृतकृत्य जीणें ! ॥ २ ॥

(६५८)

रिक्त भरे झरे; भरली उमरे. नाहीं उसंतु तेचि ते विच्चरे रे !
राहाटी जैसी घटिका वा ! रे ! कर्म—भोगें तद्वतें देहांतरें. ॥१॥धृ॥
जना विश्रांति पावसी केघवां ? जन्म, मरण न सुटे यया जीवा. ॥छ॥
देह कर्मज़, कायज. कर्म— माजि सुखदुःख भोग परम.
तेणें बळवंत परतले काम. जन्म कर्मद प्रसवती धर्म. ॥ २ ॥
ऐसे बद्ध ज़ाहाले जन सकळ. जीवा कित्ती करिसी तळमळ ?
दिगंबरेंवीण दुःखासि मूळ तुझें तुज़ चि कर्म सकळ. ॥ ३ ॥

(६५९)

तारुं बुडताहे भव नद सरसीं ! येथ कवण तारक माया तमसीं ?
त्याची सोय न कळे; भ्रमु मनसीं !
जना ! जन, धन वायां कवळींसि ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! जन बुडालें ! बुडालें ! गुरु चरण न धरी ; काहीं केलें ! ! ! ॥ छ ॥
जडु जडपणें वैसे तळीं क्रियापरजनु पडला ढाळीं.
दुर्जनाची गति काये ज़ाली ! तें न कळे ! कवणें भरी भरली ? ॥ २ ॥
काम तळपती जळीं जळचरें ! आघातु. गुणवेग मुर रे !

येथें न तरिजे विण दिगंबरें . जना ! न कळे वीहित ; हीत विसरें. ॥ ३ ॥

(६६०)

कोलिसांचें न सरे काळें; तैसें भरलें देह विटाळें .
तया काइसें वरि सोविळें ? आस्थि–मास–चर्मज वोळें ! ॥१॥ धृ ॥
जनां धरि कां रे ! कांटाळा ? देह सोडूंनि होईं निराळा. ॥ छ ॥
नानां देहिंचें क्रियमाण संचीत पातक, ज़ाण;
तेणें प्रलिप्त ज़ालें मन. काये करितासि वरि वरि स्नान ? ॥ २ ॥
पापवासना न धुपे जळें. केवि सुटसी तूं कर्ममळें ?
दिगंबरें मन सोवीळें आतां होयिल कवणें काळें ? ॥ ३ ॥

(६६१)

स्वयं पाकें पचिलें अन्न. भाणा बैसलें तेथें श्वान रे !
अन्नाचें पवित्रपण तें चि पळालें तेथून. ॥ १ ॥ धृ ॥
तैसें मन हें दुराचारी. स्वयंपाकु तो वरि वरी. ॥ छ ॥
यातीपासूंनि अंतरला; तो अन्नें कैसा सोवीळा ?
दिगंबराचें चूकला; शुद्धि नाहीं त्या चांडाला. ॥ २ ॥

(६६२)

ब्रह्म–इत्यादि दारूणें सजीली पापें ज़ेणें;
कांटाळा ऐसा नेणें; तो क्रोधु धरिला मनें. ॥ १ ॥ धृ ॥
आतां वरि वरि पवित्रपण. बुडालें तीर्थीं श्वान. ॥ छ ॥
मन भ्रमे कुश्चिळ ठायें. वासना तेथें ज़ाये.
दिगंबरीं विरति न धाये. त्याचें पवित्रपण तें काये ? ॥ २ ॥

(६६३)

देह सर्वथा अपवित्र; कर्मयोगें ज़ालें पवित्र रे !
तेंही कर्मगुणव्यापार जीउ कर्त्ता नीरंतर. ॥ १ ॥ धृ ॥
आतां तयाची निर्मळता कर्मातें पवित्रता. ॥ छ ॥
कामक्रोधाचे वीटाळ जीवें धरिले असतां मळ;
कर्म निपजे अनिर्मळ दिगंबरातें सकळ. ॥ २ ॥

(६६४)

केलें शूद्रें वेदाध्ययन; चांडाळें देवार्चन;

रजस्वला पाची अन्न; तें केवि होये पावन ? ॥ १ ॥ धृ ॥
तैसें, ज्ञाणा रे ! प्रसिद्ध ::– स्वशुद्धी सकळ शुद्ध. ॥ छ ॥
आत्मशुद्धीचें सोवीळें. न विटाले; गुण विटाळें.
दिगंबरेंसी येकत्व ज्ञालें. विश्वाचें दुरित पळालें. ॥ २ ॥

(६६५)

पाषाणु उदकीं बुडाला. त्याचा भीतरु नव्हेचि वोला.
उपदेशु वायां गेला. खलु न वळे, न वळे,काहीं केला ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां बोधोनि काज्ञ कायी ? गुणबद्धासि वितरागु नाहीं. ॥ छ ।'
बोलिलें चि कित्ती बोलावें मुंडले ते कित्ती मुंडावें ?
दिगंबरातें असो अघवें. पुढें विषयिका न दिसे बरवें. ॥ २ ॥

(६६६)

शब्दें ज्ञेणें पर्वत द्रवती; शशिसूर्य गति विसरती रे !
ते बा ! न चलती मूर्खांप्रति ! तया वैराग्य नुपज्ञे चित्तीं. ॥ १ ॥ धृ॥
आतां हारवि रें ! सुज्ञाणा ! कां श्रमविसी या अंतःकरणा ? ॥ छ ॥
शब्दें थरथरिली मेदिनी. ज्ञाले तन्मय लोक तीन्ही.
तो न धेरे चि मूर्खी मनीं. दिगंबरा ! येथ न चले करणी. ॥ २ ॥

(६६७)

शब्दें पावकु तो ही निवाला; अकाळीं घनु वर्षला;
साधु जनांसि आनंदु ज्ञाला; तो मूर्खा न कळे; काहीं केला ! ॥ १॥धृ॥
आतां जळो तयाचें जीणें ! देवा श्रमलों मीं सन्निधानें ! ॥ छ ॥
गति कुंठित ज्ञाली पावना ! शब्दु माझा हो ऐसा येसणा !
मूर्खातें नये चि मना ! काहीं केल्या त्यागु स्फुरेना ! ॥ २ ॥
सप्तसागर मिळे क्षीतीं. शब्दु आइकोनि येकत्व होती.
दिगंबरा तो मूर्खाप्रती शब्दु न चले. कुंठली माझी मति ! ॥ ३ ॥

(६६८)

वरपडि कीरती वमना. कांटाळा कैंचा श्वाना ?
प्रेतदुर्गंधु आवडे मना. तैसें विषयींक विषयो सोडीना. ॥ १ ॥ धृ ॥
आतां मर मर किती करणें ? बोल तया लाजीरवाणें ! ॥ छ ॥
सेंबुडावरि बैसे मासी. क्षीरसागरु मातांसि.

तेथ्नि बंधन होये तियेसी. प्राणु दे, मरे गुंतोनि जैसी ! ॥ २॥
विषयीं कां तैसेंचि ज्ञालें ! मन विषयरसीं गुंपलें.
दिगंबरेसी अंतर ठेलें. संसारीं आसक्त पडिलें. ॥ ३ ॥

(६६९)

आत्मा तूं येकूचि देहीं. दुजेपणाच्या न पडे संदेहीं.
तया ज्ञाणतां आपुलां ठायीं. भेदु कल्पितु कोठेंचि नाहीं. ॥१॥ध्रु॥
कैच्या जीउ ? कें ईश्वरु ? प्रपंचु भेद विस्तारु ? ॥ छ ॥
अयमात्मा ब्रह्म, हे श्रुति– वरि अनुभउ आला प्रतीतीं.
दिगंबराची हे अनुभूति. येथ शाब्दिक वाद न सरती. ॥ २ ॥

(६७०)

दृश्य सांडूंनि द्रष्टा पाहातां, तोन्चि ब्रह्म गुणातीतु होता.
परमात्मा त्याप्रति वृथा. भेदु भावितासि कायें भ्रांता ? ॥ १ ॥ ध्रु ॥
रे ! येथें कुयुक्ति सांडूंनि देयीं. अनुभवीं निश्चळु राहीं. ॥ छ ॥
नान्योस्ति द्राष्टा, हे श्रुति सिद्ध आली सद्यःप्रतीति.
शाब्दिकांची कायीसी युक्ती ? दिगंबरें तुटली सर्व भ्रांति. ॥ २ ॥

(६७१)

औपाधीक सत्यचि होतें. सत्यज्ञानें तरि तें उरतें रे !
सत्य गमितां ज्ञेथिच्नें तेथें, सत्य कोठें चि दुसरें न वर्ते. ॥ १ ॥ ध्रु ॥
जनां वायां भजसी कुमती. सर्व ब्रह्म, हे वैदीक उक्ती. ॥ छ ॥
सत्या प्रतियोगी असत्य. सहज चि मिथ्याभूत.
भेदु भजिजे, हें कवण मत ? दिगंबरीं ते अघट मायाकृत. ॥ २ ॥

(६७२)

जीवशिवासि अंतर करिती. येथ युक्तीचि आन कांहीं नाथी.
अनुभवें होतां प्रतीति. वरि मस्तकु केवि उचलिती. ॥ १ ॥ ध्रु ॥
सांगें, तूंचि तूं, आधीं कवणु ? यये अर्थी काइसा अनुमानु ? ॥ छ ॥
आप ज्ञाणतां चिन्मय गूणें, न सरती च्या–न्ही प्रमाणें.
दिगंबरातें कैसें माने ? होये रोकडी प्रतीति ज्ञेणें. ॥ २ ॥

(६७३)

दीपु लाउंनि नयनु पाहासी. भूमि वायां कां चाळितोसी ?

तूंचि आत्मा; उपलब्धि ऐसी. सिद्ध नेणोंनि, अनुमानु करिसी. ॥१॥धृ॥
जनां सांडि रे ! अनुवादू. आप ज़ाणोंनि करीं शब्दू. ॥ छ ॥
तमेव धीरो विज्ञाय; ऐसें वेदीक वचन आहे.
आप ज़ाणोंनि युक्तीसि लाहें. दिगंबरपद भज़ अनुपायें. ॥ २ ॥

(६७६)

पंक्ती बैसलों भोजना. तेथें भाणें दृष्टी दिसेना,
आभाउ॰ देहादिकरणा कोठें घालावें अवदाना ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां प्रसादु वायां गेला. वीण भोजनें आत्मा धाला. ॥ छ ॥
उभा ना बैठा ठायीं. ठायाचें भान चि नाहीं.
जेवावे कैसें काई ? दिगंबरा ! वृत्तिविलयीं. ॥ २ ॥

(६७७)

पर्यंकु तो भूतळीं . नीज़णें बुध्दीमूळीं .
तेथ सगळी सेज़ चि गिळी. आंग घातलें पोकळीं . ॥ १ ॥ धृ ॥
ऐसी विश्रांति करणें आह्मा सांडुनि कर्माकर्मा. ॥ छ ॥
अवस्थांच्या संचारु नाहीं. नीजीं नीज वर्ते ठायीं.
दिगंबरु आत्मां देही. आता नीज तयातें कायी ? ॥ २ ॥

(६७८)

स्थिति राहोंनि कर्में करितां स्फुरे कर्मीं अकर्मता रे !
तेही न सरे गुणातीता सहज़ाची सहज़ावस्था. ॥ १ ॥ धृ ॥
आता कर्म होतां गुणीं करावा कां सांडणी ? ॥ छ ॥
मृगजळाच्येनि पुरें न वाहावती चतुरें.
गुणमुक्तें दीगंबरें गुणमुक्त चि सकळ खरें ! ॥ २ ॥

(६७९)

करितां हीं करणें नाहीं; न करितां अकर्म तें ही
निर्विकारु ठाइंच्या ठाईं. देह सहीतु आत्मा अदेही. ॥ १ ॥ धृ ॥
रे चंचळ ही तें नीश्चळ कैसें वाहातसे मृगजळ ? ॥ छ ॥
कर्म अकर्म दोन्ही वाउ॰. समतेच्या सहज़ भाउ॰.
तोही तेथूंनि माझा ज़ाउ॰. मीं असैन ठाये ठाउ॰. ॥ २ ॥
अवकाशु नाहीं बोला. वृत्ति न साहे निर्मळा.

दिगंबराची हे कळा जाणवेना विज्ञान शीळा. ॥ २ ॥

(६८०)

गुण रहीत सहीत अवघे, अक्रीया क्रीयाभावें,
सहज्जाचा पालटु नव्हे. तरि संकोच कां मानावें ? ॥ १ ॥ धृ ॥
बोल बोले रे ! सुज्ञाणा ! नाहीं पालटु या निर्गुणा. ॥ छ ॥
काये पाहाणें चढु, ऊतारु ! मृगजळाचा हा पूरू ?
निजगूणें दीगंबरू नेणे पालटु ! न धरी विकारू. ॥ २ ॥

(६८१)

जपु करिता देह न दीसे. भूतशुद्धि सहजसि असे.
करावे न्यास कैसे. अंग येक हीन असे. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा ठक चि ठेलों देवा ! जपु कैसा जी करावा ? ॥ छ ॥
सर्वगत संपूर्णपण. कें घालावें आसन ?
दिगंबरीं मूर्ति ध्यान. तें रूपातें विस्मरण. ॥ २ ॥

(६८२)

आत्मयांप्रति आन तें द्वैत मिथ्या भान; ऐसि प्रतीति जाणे मन.
तें स्मरैल दैवत कवण ? ॥ १ ॥ धृ ॥
हातीं राहिली स्मरणीं; चाळावे कैसे मणी ? ॥ छ ॥
देउ आत्मा सर्वहीं; तया दुसरा देउ चि नाहीं.
स्मरावा कवणु कायी ? दिगंबरा ! हें सांगायीं. ॥ २ ॥

(६८३)

देवा ! ह्मणौनि बोबायें; तो निर्दैव कवणु राहे ?
पाहतां त्याची सोये, तया दुसरा देउ न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
आतां गर्जावें कवणें ? घोषु करितां लाजीरवाणे ! ॥ छ ॥
आत्माचि तो ईश्वरु. देउ कवणु तया परु ?
निर्मळु दिगंबरु कां करावा चारु ? ॥ २ ॥

(६८४)

कीर्त्तनीं ठेवीला भाउ, तेथ वक्ताचि आत्मा देउ.
श्रोतया न दिसे ठाउ. दृश्याचा सम अभाउ. ॥ १ ॥ धृ ॥
आतां कीर्त्तन कैसें करणें ? आशंका धरिली मनें. ॥ छ ॥

श्रवणीं भजतां श्रूय तें केवळ अचिन्मय.
गुण कार्य मिथ्या ज्ञेय स्वस्वरूप चिन्मय. ॥ २ ॥
प्रेम नूपजे गायनीं, विवेकु घेतां श्रवणीं.
दिगंबराच्या अज्ञानी प्रेमाची असे खाणी. ॥३ ॥

(६८५)

देवपण प्रकल्पावें. गुण तयाचें स्मरावें.
वियोगदुःखें ध्यावें. पाठीं हृदय फोडावें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें प्रेम नलगे देवा. अज्ञान रडती मावा. ॥ छ ॥
कल्पनेचा देऊ पीता. सूतु आपणू नेणता.
उभयांचे धर्म गमितां प्रतिबिंबें वियोग वेथा. ॥ २ ॥
ऐसें आपुलें अज्ञान ! देव भक्त रूपें ज़ाण.
होयें प्रेमाचें कारण. दिगंबरा ! कळली खूण. ॥ ३ ॥

(६८६)

देऊ कवणे दीशे पाहों? मीं केउता उभा राहों?
संताचा धरीन पाऊ. माझा तोडा जी ! संदेहो. ॥ १ ॥ धृ ॥
आतां प्रतीति आच्छादावी. पूर्णता कें लपवावी? ॥ छ ॥
प्रेम कैसें लाहे मन. सजळ होतीं नयन.
दिगंबरा ! भेदस्फुरण. नये तयाचें विस्मरण. ॥ २ ॥

(६८७)

जाणोंनि भाउं देवा? कीं नेणोंनि करूं सेवा?
मीं मज असतां ठावा, बोधु कैसा आच्छादावा? ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें सांगावें सुज्ञाणीं. नूमजें मातें करणी. ॥ छ ॥
डोळे उघडूनि काये पाहावें? डोळे झाकूंनि कवणा ध्यावें?
दिगंबरु आत्मा जीवें ज्ञाणिलें असतां बरवें! ॥ २ ॥

(६८८)

अज्ञानें केलें कर्म; तें ज्ञाना करितां विषम.
जेवि ज्ञानाचे निजधर्म. अज्ञान आति दुर्गम. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें ज़ाणावें सुज्ञाणीं::— अधिकारा अधीन करणी. ॥ छ ॥
तमसांतें आलोकु नाहीं. दीनकरु तम नेणे कहीं.

आतां निर्द्धारु हा हृदयीं::— दीगंबरीं दुसरें तें वायी. ॥ २ ॥

(६८९)

बहु प्रलपन नलगे करावें. आप जाणोनि उगलें असावें.
पाठा करिजैल, तें ही बरवें. ऐसें अनुभवमत स्वभावें. ॥ १ ॥ धृ ॥
बहु काये गुरुमुख करिसी ? जें होती, तेंचि आहासी रे ! ॥ छ ॥
नाहीं पाहाणें, देणें, घेणें. स्वस्थिती निश्चळ असणें.
दिगंबरुआत्मा भजणें. योगसार याहूनि न मने. ॥ २ ॥

(६९०)

योगसेवया श्रमतासि वायां. प्राणपंचक दमितासि काया ?
गुणीं असंगु तूं अव्यया. आत्मयां नलगे क्रिया. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! सहज चि साधन आहे. साध्य भजैल, तो न लाहे. ॥ छ ॥
मन धरिजे तें बंधन मनसा. मन सोडितां नये योगु कळसा.
आत्मयां तूं; जैसा तैसा राहें सहज; नलगे गुणदोषा. ॥ २ ॥
इंद्रिया दमु वायां करणें. निजें निजचि जाणोनि असणें.
दिगंबरें मीं मज नुरणें. स्वस्थिती विरोनि जाणें. ॥ ३ ॥

(६९१)

थाटु, मांडु, माव, दृश्य पसारा, जाण, तयांप्रति नव्हे चि विकरा. ॥१॥धृ॥
केणें मतुळलें; ग्राहक नाहीं; ऐसीं कैसी पेठ ? हाणती डोयी ! ॥ छ ॥
दिगंबरेंवीण न खपे आन. भूसांच्या विकरा केउतें कण ? ॥ २ ॥

(६९२)

बाह्य मौनी; जडु अंतरीं बोले ! मनस चंचळ; लाविती डोळे ! ॥१॥धृ॥
वेष देखोनियां वेधलें जन ! अंतरीचें ज्ञान कवणु जाणे ? ॥ छ ॥
आत्मा दीगंबरु न पडे ठायीं ! ऐसिया मूर्खाची क्रिया ते कायी ?॥२॥

(६९३)

महां नदीचां बैसलां तीरीं; बकु नां साधकु; तयाची परी:: ॥१॥ धृ ॥
अंतरीं निर्मळ नाहीं गा ! देवा ! जनचि हें मात्रा रंजवावें ! ॥ छ ॥
आत्मा दीगंबरु जाणोनि आता, मायीक सकळ न मने चित्ता ! ॥२॥

(६९४)

नात्रे माजिच्या निद्रितु जैसा, दूजा जाग्रुत तया सरिसा; ॥ १ ॥ धृ ॥

तेंवि तुंचि तारकु देवा ! बोधु, अबोधु काय करावा ? ॥ छ ॥
पाय धरूनि आन मि नेणें. दिगंबरा ! सर्वहि जाणें. ॥ २ ॥

(६९५)

शिष्य नव्हे; सेवकु नव्हे; पोटीं जन्मलो; ऐसें जाणावे. ॥ १ ॥ छ॥
मातें काय श्रमवितासि? भज्यभजकु कासया ह्मणविसी? ॥ छ ॥
देवा ! पूर्विला आमुते ऐसें करीः:— दिगंबरा घालि उदरीं. ॥ २ ॥

(६९६)

काळाग्निशमना ! सुखदमूर्त्ती ! योगिराया ! गुरो ! अगम्यकीर्त्ती ! ॥१॥धृ॥
तुझें नाम माझां पडो श्रवणीं. निवारती भवसंताप तीन्हीं. ॥ छ ॥
दिगंबरा ! जया ! विज्ञानासिंधो ! सिद्धेशामरपती ! अनाथबंधो ! ॥२॥

(६९७)

भक्तचिंतामणी ! आत्मयारामा ! राजीवलोचना ! मंगळधामा ! ॥१॥धृ॥
तुझा वेधु मज लागो कां मनीं ! मनस चंचळ निवटो ध्यानीं ! ॥ छ॥
सुभक्तवरदा ! योगनिधाना ! दिगंबरा ! परब्रह्म ! सगुणा ! ॥ २ ॥

(६९८)

लीलाविश्वंभरा ! श्रीदेवदेवा ! देवगुरो ! सर्वअसर्वसर्वा ! ॥ १ ॥ धृ ॥
तुझें ध्यान मज लागो नित्यशा. शुद्ध ! श्यामा ! गुरो ! परम ! पुरुषा ! ॥छ॥
मायाविवर्जित ! विज्ञानसारा ! माययुक्ता ! शिवा ! श्रीदिगंबरा ! ॥ २ ॥

(६९९)

विश्वंभरा ! विश्वकारणरूपा ! दत्ता ! निर्विकल्पा ! आपस्वरूपा ! ॥१॥धृ॥
तुझा बोधु मातें सर्वदा राहो. मानसी वियोग नित्य न साहो. ॥ छ ॥
दिगंबरा ! योगिजनवल्लभा ! वरदमूर्त्ती ! सत्य ! स्वयंभा ! ॥ २ ॥

(७००)

जगद्गुरो ! जनबंधविच्छेदा ! आत्मयां ! निर्गुणा ! पूर्ण ! अगाधा ! ॥१॥धृ॥
तुझें संकीर्तन प्रीय बा ! आह्मा; मोक्षासि हेतुक पुरुषोत्तमा ! ॥ छ ॥
दीगंबरा ! दीनु संसारहरणा ! कृष्णा ! श्यामा ! देवा ! कमळनयना ! ॥१॥

(७०१)

दत्तात्रेया ! देवा ! मंगळमूर्त्ती ! मंत्रस्वामी ! वर्ण सुवर्ण ज्योती ! ॥१॥धृ॥
तुझा प्रकाशु प्रकाशु मातें; गुणाभासु जेथें आथीचिना. ॥ छ ॥

दिगंबरा ! ज्ञानविज्ञानसारा ! सार तें तूं सर्व प्रकृतीपरा ! ॥ २ ॥

(७०२)

अंतरीं कुश्चीळु; बाह्य कांटाळे; वमन मूर्खी; कैसा लावि तो डोळे? ॥१॥धृ॥
ऐसें वेडेपण लागलें जना. परकर्मदूषणा प्रवर्त्तले. ॥ छ ॥
आत्मा दीगंबरु हे खूण नाहीं. बाह्य कुशळत्व दाविसी कायी? ॥२॥

(७०३)

आत्मां परब्रह्म अंतरीं आहे. भूलला हा जनु बाहेरि पाहे. ॥१॥ धृ ॥
पावें गा ! देवा ! पावें गा ! देवा ! चुकलो तूझी सेवा; करुणा करीं. ॥छ॥
दिगंबरा ! ऐसें भूललें जग. देवो ज़ाणवे; तें चूकलें अंग. ॥ २ ॥

(७०४)

निरुमुक्ता ! तुतें बंधूचि नाहीं.
लटिका तो मोक्षु ! मागसी कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
बंधु तो कवणु ? मोक्षु तो कवणु ?
मागसी ज़ेया, तो देऊ चि कवणु ? ॥ छ ॥
जाणोंनि पाहातां लटकी तीन्हीं ! आत्मा दिगंबरु सत्य निर्वाणी ! ॥ २ ॥

(७०५)

आपणा ज़ाणोनि देवासि पाहीं.
तूंचि देऊ. उगा. ठाइ कां राही ? ॥ १ ॥ धृ ॥
नेणोनि तळमण करितासि काह्या ?
द्रष्टा देऊ; येर अवघें चि माया ! ॥ छ ॥
आत्मा दिगंबरु सांडूंनि देवो, देवो नाहीं तेथ धरितासि भवो ! ॥२॥

(७०६)

देऊ नाहीं, ऐसा ठाऊ चि नाहीं.
उंगाचि टकमका पाहासी कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
खूणेचें देखणें वेगळेंचि आहे. आपणां नेणोंनि ज़ाणतां नये. ॥ छ ॥
आत्मदृष्टी जग ब्रह्म निर्गुण; दिगंबर सत्य चैतन्यघन. ॥ २ ॥

(७०७)

मत्रपुरीं सांते वरपडि ज़ाली. हातिची मुद्रा गळोनि पडली. ॥१॥धृ॥

नाम मुद्रिका दे कां ? गा ! देवा ! करीन तुझी सेवा निरंतर. ॥छ॥
दिगंबरनाम बहुगुणमुद्रा संसारविखारा उतरिती. ॥ २ ॥

(७०८)

पथिची सिदोरी; विटाळ झाला. अहंकारु भजनीं दोषु लागला. ॥ १ ॥धृ॥
आतां कैसें काये करूं ? गा ! देवा ! नेणें पापी केव्हां आतळला ? ॥छ॥
दिगंबर नित्य लागला संगीं. तुजवीण नाहीं छेदिता जगीं. ॥ २ ॥

(७०९)

दीनु माळवळा; धुंजूर जालें; डोळा चुकउंनि चोरटें आलें. ॥१॥ धृ ॥
चिद्रत्न माझें नेलें वो ! तेणें. येणें तमोगुणें नाग्रवीलें. ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं लागैन पायीं. चोरटें मारूंनि चिद्रत्न देयीं. ॥ २ ॥

(७१०)

दृश्य ग्राळवण खादलें गायी. गाये वारूगळ ! कवणाची कायी ? ॥१॥धृ॥
ईसि धणी नाहीं! ईसि धणी नाहीं ! ओढूंनि हृदयीं बांधिलीसे ! ॥छ॥
दिगंबरनामें सगुण गाये ! तीचे महिमान बोलतां नये ! ॥ २ ॥

(७११)

सविषविषमविषयनदीं बुडतांहें निजतत्वअबोधीं. ॥ १ ॥ धृ ॥
येथें कवणा कास मागों ? गा ! देवा ! जनू चि अघवा बुडतसे. ॥ छ ॥
दिगंबरें मज ढिधला हातु. तेणें परपार पावलों पंथु. ॥ २ ॥

(७१२)

दृश्य मृगजळ. धांवसी काह्या ? पाणी पाणी नव्हे; अवघी माया. ॥ १ ॥ धृ ॥
आशेचे डोंगर ज़ाले गा ! देवा ! जिव हे जिवनभावा न पवती. ॥ छ ॥
दिगंबरेवीण तृष्णा न तुटे. सागरु प्राशिजे येकें चि घोटें ! ॥ २ ॥

(७१३)

संसारसागरीं मानव्यतारूं; स्वमती सुवायें पावैन पारू. ॥ १ ॥ धृ ॥
पूर्वकर्में कैसें तारूं बुडालें ? मागें पुढें देवा ! अंतर पडलें ! ॥ छ ॥
दिगंबरा ! येथ तूं येक तारूं ! तुजवरी आतां घातला भारू ! ॥ २ ॥

(७१४)

डोळे गेले; माझी मोडली काठी. कवण करील भेटि सद्गुरूसीं ? ॥१॥धृ॥
मनाचा पेंधा वलखा गा ! देवा ! चरणस्मरणसेवा अंतरली. ॥ छ ॥

योग ते काठी; विज्ञान डोळे; दिगंबरु दोहीं पांसाव कळे. ॥ २ ॥

(७१५)

पंथु निडाळितां श्रमले डोळे. मानसें चंचळें पंथु न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
कयीं तूझें रूप देखैन ? देवा ! जीवाचीया जीवा ! योगिरावा ! ॥छ॥
दिगंबरा ! माझें मन वोढाळ; आपुलें चि मूळ वीसरलें. ॥ २ ॥

(७१६)

अमृताचें विष केलें वो ! येणें. याचें दीजे कव्हणाप्रति गाऱ्हाणें ? ॥१॥धृ॥
मन हें धरूनि ध्या का वो ! कव्हणी ? मातें याची करणी गुणु नेंदी ॥छ॥
दिगंबरीं येक मन चि माया; न मरे; हें तंव नेणिजे ठाया. ॥ २ ॥

(७१७)

मुद्राबंधु देहीं तैसाचि आहे. मन गेलें काये कवणे वाटा ? ॥ १ ॥ धृ ॥
चोरटें हें मन धरा, वो ! धरा. मतीसि विसरां पाडियेलें. ॥ छ ॥
दिगंबरीं ध्येलें मनस पुरे. साधन कासया तेथ दुसरें ? ॥ २ ॥

(७१८)

मन न धरितां योगूचि वायां. मन पाहे; तेणें खांडिली छाया. ॥१॥ धृ ॥
अतःपर कैसें करणें ? गा ! देवा ! गुंति हे उगवा झडकरूनी. ॥ छ ॥
दिगंबरीं मन पाहातां चि वावो. योगुवियोगु हा कल्पीत भावो. ॥२॥

(७१९)

मन हारपलें; देह न दीसे. पाहातां आपणा ज्ञालें ऐसें. ॥ १ ॥ धृ ॥
सेखीनें मीपण कोठें चि नाहीं. पाहातेपण ही पारुषलें. ॥ छ ॥
दीगंबरीं पाहों; नेणे तो बद्धु. पाहों प्रवर्ते, तो परम अंधु. ॥ २ ॥

(७२०)

लक्षाच्या लाभु ते मुदलाची तूटी. हाणि ते बळकट बांधिली गांठी. ॥१॥धृ॥
आतां कैसी बुद्धि करणें ? गा ! देवा ! आठवें आंठवा ग्रासियेलें. ॥छ॥
दिगंबरीं लक्ष समूळ खोटें. अर्थाचें स्फुरण वरि वोखटे. ॥ २ ॥

(७२१)

अर्थवेग बहु खरतर बाण. प्रखर मांडलें येथ संधान. ॥ १ ॥ धृ ॥
आला वृत्तिवेगु; निवारूं ज्ञाणे. आपणां मारूनि यशस्वी होणे. ॥छ॥
आत्मा दिगंबरु धरूनि वर्म, जिंकिलें सन्मात्रचित्परब्रह्म. ॥ २ ॥

(७२२)

देह तें पासीं गेला तो कवणु ? त्याचें नाम नेणा, रूप, नाँ गूणू.॥१॥धृ॥
वायां वीण दुःख करिसी गव्हारा ! वेषु देखोनियां झोंबसी सैरा. ॥छ॥
दिगंबरु आत्मा वोळखि. पाहेः:—जैसा तैसा विश्व व्यापूनि आहे.॥२॥

(७२३)

आधीं तो कवणु ? मग तो तुझा; हा येकु संदेहो फेडि कां माझा. ॥१॥धृ॥
असत्य तें; लाभु हानि ते कायी ? सत्या नाशु नाहीं. भूल झणें.॥छ॥
आत्मा दीगंबरु तुं जगब्रह्म सांडीं. दुःख; सुख लाहे पर. ॥ २ ॥

(७२४)

नाना देशिचीं मीनलीं सांतें तीं काये झोंबती येकमेकांतें ? ॥ १ ॥धृ॥
वायां वीण जग मेहुणें करिसी. रूपें तें सांडूनि भलतया धरिसी.॥ छ ॥
दिगंबरु आत्मा तयासि पाहे. नरकाचें मोटाळें झोंबसी काये ? ॥२॥

(७२५)

कवणाच्या देवा ! मी ? येथें कां आलों ? मूळ चुकलों; भ्रमतुसें. ॥१॥धृ॥
मर, मर, कर्मा. हें काये ज़ालें ? मूळ मीं आपुलें केवि लाहें ? ॥छ॥
दिगंबरेंवीण स्वप्न हें मृषा. ये गा ! परमपुरुषा ! भेटि देयीं. ॥२॥

(७२६)

चित्रिचिया देवा वळितांहे गायीं.
हा ! हा ! मातें काइ भ्रमु ज़ाला ? ॥ १ ॥ धृ ॥
पावें गा ! देवा ! गुणमतीहरणा !
तुझी माया कवणा दूरि करवे ? ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं जवळूनि चूकला. कर्माधीन ज़ाला; भ्रमतुसें. ॥ २ ॥

(७२७)

स्वप्नीच्या ठेवा करितां हे खनन. अवस्थाजनीत लटिकें हें भान.॥१॥धृ॥
लाजीरवाणें ज़ालें समर्था ! त्राही श्रीअवधूता ! कृपाळुवा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! आतां इतुलेनि पुरे. वाया मायापुरें लोटितासि. ॥ २ ॥

(७२८)

कवणाची जननी ? कवणाचा जनकु ?
कवणाची तनुजें ? मीं मुळिचा येकु. ॥ १ ॥ धृ ॥

कैसें माझें जीणें ज़ालें ? गा ! देवा !
करिता हें जनसेवा कवणे हेतूं ? ॥ छ ॥
दिगंबरा ! आतां येतुसे शरण. पुरे जन्म मरण; कृपा कीज़े. ॥ २ ॥

(७२९)

द्राष्टादृश्य ज़ेथें देखणें वाउ; शुद्ध निरंजन ठाइकें ठाउ. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें माझें मन लागो गा ! देवा ! यया भेद भावा सांडूनियां. ॥ छ ॥
दिगंबर परब्रह्म, निर्गुण, सत्य, सर्वगत, चैतन्यघन. ॥ २ ॥

(७३०)

ज्ञाताज्ञानज्ञेय त्रिपुटी नाहीं. ज्ञेय तें संचलें मी माजि देहीं. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें माझें रूप अरूप आहे. गुणाची प्रवृत्ति आंगीं न साहे. ॥ छ ॥
दिगंबर निजत्व, निर्वाण, निःशब्द, केवळ, आनंदघन. ॥ २ ॥

(७३१)

स्थूळसूक्ष्म ज़ेथें कारण वाउ; महाकारणासी न दिसे ठाउ; ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें माझें रूप मी चि मीं ज़ाणें. ज़ाणतें जाणणें जाणोंनि नेणें. ॥ छ ॥
दिगंबर निराभास, चिन्मय, सत्य, सदोदीत, पूर्ण, अव्यय. ॥ २ ॥

(७३२)

जागृति ना स्वप्न, सुषुप्ति तुरीया;
कार्य ना कारण, अविद्या, माया; ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें माझें रूप निर्मळ ज़ाणा.
ज़ाणतां चि ठाउ नाहीं मींपणा. ॥ छ ॥
दिगंबर परब्रह्म, अव्यय, तत्व, निरंजन, अज्ञेय, ज्ञेय. ॥ २ ॥

(७३३)

सत्व, रज, तम, ना शुद्ध सत्व;
पूर्ण, गुणातीत, विमळ, तत्व; ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें माझें रूप ज़ाणोंनि पाहातां, पाहाणें सर्वथा पारूषलें. ॥ छ ॥
दिगंबर गुणरहीत, ब्रह्म, सर्वगत, शिव, विषमी सम. ॥ २ ॥

(७३४)

बहिरवी

सुन रे ! गुणिया ! हामकी बात.

धन जोबन कोई न आवे संगात. ॥ १ ॥
किसकी दुनिया ? किसकी मवेसी ?
दिन दो रहिंगे; फीर उठ, चले परदेशी. ॥ २ ॥
आये सो न रहिंगे; गये सो और आवे.
मेरा मेरा कहे; भुली हात झार ज़ावे. ॥ ३ ॥
कहां भीम, अर्जुन, कृष्ण, रावण, साई !
कोई न छुडावे तन. भुलां मेरे भाई ! ॥ ४ ॥
दिगंबर ! कहियो एक विचार.
उनके चरणीं हमे दियो है शरिर. ॥ ५ ॥

(७३५)

सखया ! सादु घालितां बहु श्रमली. अझुणी न येसी.
विकळ माझी मति ज़ाहाली. सखया ! कवण, काये, नेणें चूकली ?
कठिण धेलें. दूरि बहू दिवस पडली. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ! येकु वेळा पाये दाखवीं.
वियोग तापु हरूनि माझा जीउ जीववीं. ॥ छ ॥
सखया ! हें चि आरत बहू मानीसीं::— पाहिन पाये.
स्वरूप आपुलें कयीं दाविसी ?
सखया ! करुणा मेघु केव्हां वोळसी ? संतापु देवा !
दिगंबरा ! दूरि करिसी ? ॥ २ ॥

(७३६)

कमळनयनरूप आठवे; मनीं आठवे; रूप आठवे. पाहिन माये;
पाहिन पाये केधवां ? सैये! कवण दुरित माझें नेणवे; वो ! माझें नेणवे;
माझें नेणवे. न देखें पाये. करूं काये ? वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतेंवीण क्षणु न गमे; वो वीण न गमे;
वीण न गमे. विजन माने साच्च ज़ाणें वो ! ॥ छ ॥
अतिक्षीण डोळे बहु सीणले; बहू सीणले;
हे सीणले. श्रीदत्तु न ये. वाट पाहें वो !
दिगंबरा ! तुझा पंथ न कळे; देवा ! न कळे;
तो न कळे. दाखवीं सोये; दाखवीं सोये; सादु देईं रे ! ॥ २ ॥

(७३७)

मायाअविद्या हें उपाधिद्वय अतिक्षीण जेथें विवर्तमय, ॥ १ ॥ धृ ॥
तें मीं परब्रह्म सहज अदेही; संचलें निर्गुण ठाइंचें ठायीं. ॥ छ ॥
दिगंबर सर्व अतीत गुणा, देवत्रय, जेथें नुरे कल्पना. ॥ २ ॥

(७३८)

उत्पत्ति नां जेथ स्थिती, प्रळयो; पारविवर्जीत, पूर्ण, अव्ययो; ॥१॥धृ॥
तो मीं परब्रह्म आत्मा अदेही, अवघा चि प्रपंचु ज्याप्रति नाहीं. ॥ छ ॥
दिगंबरु निराधारु, निःकामू, सर्वरूपीं देऊ, सहजसमु. ॥ २ ॥

(७३९)

योगुवियोगु हा प्रसंगु जेथें न वर्ते निर्गुणीं निर्गुण मतें; ॥ १ ॥ धृ ॥
ते मीं निजानंदघन चैतन्य, पूर्ण, अखंडितपद, निर्गूण. ॥ छ ॥
दिगंबर सारविसार, ऐसें जेथें निरस्तही भान संग्रसे. ॥ २ ॥

(७४०)

अंधाचें पाउल मघांचि कळे. जन हांसती, तें तया न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
नाहीं अनुभउ; बोलसी काह्या ? डोळां काजव धरेंव; धांवसी वायां. ॥छ॥
येकाच्या आधारु धरिसी कायी ? आत्मां दीगंबरु, ज्ञाण, ये देहीं. ॥२॥

(७४१)

द्रष्टा तो कवणु ? तूं तुझां ठायीं. पाहासी बोलाच्या आश्रयो कायी ? ॥१॥धृ॥
प्रत्यक्षासि नाहीं प्रमाण दूजें. तीचेनि मूळें आपण बुझें. ॥ छ ॥
आत्मा दीगंबरु असतां सिद्धा. युक्ति प्रयुक्ति काइसे वाहा ? ॥ २ ॥

(७४२)

अप्रमेय ज्ञेय दुसरें नाहीं; प्रमाण वारलें; बोलसी कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
गुरु गाय ते वेगळी खूण. येथ अनुभउ सिद्ध प्रमाण. ॥ छ ॥
दिगंबरीं बोल न सरती काहीं. ज्ञाणोनि राहिजे ठाइंचे ठायीं. ॥ २ ॥

(७४३)

दृष्टीचें देखणें लागलें नभा. नभ चोप सांडी; उरला गाभा. ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञाणते ! हो ! खुण ज्ञाणोनि पाहा. पाहाणें सांडूनी ठाइं के राहा ? ॥छ॥
दिगंबरीं नभ उभें चि विरे. वरि तया सुख अवघें भरे. ॥ २ ॥

(७४४)

प्रळयाची खुण पाहोंनि डोळां, डोळाचें देखणें लाविलें मूळा. ॥१॥धृ॥
मूळ तें समूळ निर्मूळ ज़ालें. जळ जळाप्रति आटोनि ठेलें. ॥ छ ॥
दिगंबरीं ऐसे असें निभान. भानेंसी अवघे भानअभान. ॥ २ ॥

(७४५)

व्यक्तीच्या कंचूक उडोनि गेला.
अभावाच्या भाउ स्वभाउ ज़ाला. ॥ १ ॥ धृ ॥
शून्येंसीं ज़ाणणें न करीं गे ! माये !
शून्य शून्यतया शून्य न साहे. ॥ छ ॥
दिगंबरीं शून्यअशून्य नाहीं. स्वरूप संचलें ठाइंचें ठांई. ॥ २ ॥

(७४६)

बाह्य ना अंतर अंतरें ज़ालें. ब्रह्म सदोदीत सर्व आतलें. ॥१॥ धृ ॥
तें वर्म बोलतां नये. बोलु बोले तया बोलविताहे. ॥ छ ॥
दिगंबर परब्रह्म, अगुण, प्रत्यक्ष ज़ाणतां आपुली खूण. ॥ २ ॥

(७४७)

सन्मय सागरीं विश्व बुडालें तरीं ज़ाणे ते जीत चि मेलें. ॥ १ ॥ धृ ॥
तयाच्या मीं संगु न धरीं देवा भ्रमु, भ्रमु जीवा लागइला. ॥ छ ॥
दिगंबरीं विरे तरंगु जैसा, अवघाचि मग तें तो होये आपैसा. ॥ २ ॥

(७४८)

दृश्य हें विवर्त्तु दर्शना पोटीं. द्रष्टा तो आश्रयो, ऐसी त्रीपुटी. ॥ १ ॥ धृ ॥
येक चि मींपण सोडितां सूटे. नीजानंदघन सहज़ प्रकटे. ॥ छ ॥
दिगंबरीं सर्व कल्पीत भान. कैंची त्रीपुटी? कैंचें मींपण? ॥ २ ॥

(७४९)

ज्ञेय हा प्रपंचुविवर्त्तु ज्ञानींज्ञानगुणकृत माझा चि स्थानी. ॥१॥ धृ ॥
अज्ञानाच्या संगु फळला हा मातें. स्वप्न येणें मतें देखतुसें. ॥ छ ॥
दिगंबरीं ज्ञानें जागृति ज़ाली. अतत्वभावना पदीं निमाली. ॥ २ ॥

(७५०)

त्रिमिराची दृष्टि द्वैतची खाणी; येक पाहे तेथें दीसती दोनि. ॥१ ॥धृ॥
जीवईश्वर हे कल्पना माझी; वृत्तीचा वीलयीं नीमालीं सहजीं. ॥ छ ॥

दिगंबर वृत्तिरहीत ज़ालों. जीवें ईश्वरेंसीं सहीत ठेलों. ॥ २ ॥

(७५१)

मी मातें ज़ाणतां अवृत्ति ज़ाली. प्रवृत्ति तीचेनि अंगें उठिली. ॥१॥धृ॥
भानाची उत्पत्ति ज़ाली गे! माये!
निद्धारीतां माझा मीं चि मीं आहे. ॥ छ ॥
दिगंबरु येक सबळ भान, नामरूपगुणधर्मविहीन. ॥ २ ॥

(७५२)

सूर्याचा किरणीं आभासु ज़ाला. तेणें मृगजळें कवणु धाला? ॥ १ ॥ धृ ॥
तैसा हा प्रपंचु मज़ माजि भासे. भज़सीं आनु नसे निद्धारितां. ॥ छ ॥
दिगंबर सत्य, येक, अद्वया, प्रपंचाचें भान ग्रासुंनि ज्ञेया. ॥ २ ॥

(७५३)

आत्माविश्व ब्रह्म प्रतीति ज़ाली. भेदा वीसंवित्ति नाशोंनि गेली. ॥१॥ धृ ॥
आतां पुनरपि न भूलें देवा! देवभक्त भावा ज़ाणीतलें. ॥ छ ॥
दिगंबरीं द्वैतअद्वैत सिद्धा! ज़ाणती तत्त्वज्ञ तत्त्वप्रबुद्धा! ॥ २ ॥

(७५४)

वायांगुणस्पंदु अनुभउ बोलों.
कवणु कैसा हो? तें काये मीं ज़ालों? ॥ १ ॥ धृ ॥
ज़ें जैसें होतें, तें तैसें आहे. सांगतां, बोलतां, परिसतां नेये. ॥ छ ॥
दिगंबर शिव, सहज़, सम, सर्व, खलु, जग केवळ ब्रह्म. ॥ २ ॥

(७५५)

सरळ, बरळ, करळ, सैराळ भांडे.
नाचती वाकुडे, वेडे, बागुडे. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें कान काये देउंनि करणें? देखलयाप्रति लाजीरवाणें! ॥ छ ॥
दिगंबरेंवीण ऐसेचि सर्व. नीच नवें; परि नव्हे अपूर्व. ॥ २ ॥

वैराटिका.

(७५६)

दृष्टीचा विषयो अवघा चि खोटा.
दर्शनाचा वेधु तेथें वोखटा. ॥ १ ॥ धृ ॥
कासया तळमळ करितासि जन. सत्य निरंतर ज़ाण पां! खुण. ॥ छ ॥

आत्मा दीगंबरु सत्यस्वरूप. तेणेंवीण सर्व भजतां पाप. ॥ २ ॥

(७५७)

पासीं चि अमृत; लागला थानीं!
गोचिडा रक्ताची होतसे धणी. ॥ १ ॥ धृ ॥
जवळी चि निधान; जन चूकलें! आत्मया नेणोनि विषयी जाले. ॥ छ ॥
दिगंबरा! ऐसें तुझ चि पासीं असतां, हें जन विषय सोषी! ॥ २ ॥

(७५७ अ)

आडिचें शरीर करूनि परुते,
कवणु आहासि? तें सांग, पां मातें. ॥ १ ॥ धृ ॥
बहु वाग्जाळ उसपासी काह्या? तूं चि ब्रह्म; येर सकळ माया. ॥ छ ॥
देहीं दिगंबरु येकू चि द्रष्टा; द्रष्टात्वाच्या भाऊ सांडूनि खोटा. ॥ २ ॥

(७५८)

हंसाचिये गती वायसु जाले; परि तो हसुं हें जनु न बोले. ॥ १ ॥ धृ ॥
तैसें जाणपण आणिसी काह्या? अंतरीं अज्ञान; बाहेरी माया! ॥ छ ॥
दिगंबरेंवीण साधुता नये. मूढें केलें कर्म वाया चि जाये. ॥ २ ॥

(७५९)

कोकीळ काळी; वायसु काळा. वसंतीं दोघांच्या निवाडु जाला! ॥ १ ॥ धृ ॥
शब्दाची पारखि जाणता जाणे. साम्यदृष्टी न मनें जाणतया. ॥ छ ॥
दिगंबरेंवीण साधुता नाहीं. वेपु कवणे ठायीं मीरवैल. ॥ २ ॥

(७६०)

कोळिसांचें धन उजळिसी काह्या?
दीधले ते रंग जाती वाया. ॥ १ ॥ धृ ॥
खलेंसीं संवादु न करीं सुजाणा! खळु खळपणा केवि सांडी? ॥ छ ॥
दिगंबरें येणें सांडिला खळु, निंदकु, पातकी आणि तोंडाळु. ॥ २ ॥

(७६० अ)

खरु सोंवळ, हे अघट बोली. महिमा तीर्थाची ते चि भ्रंशली. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा मातें संगु न लगो गा! देवा!
श्रमु भारी जीवा होतु आहे. ॥ छ ॥
दिगंबरीं क्रोधी कामी न सरे. तेणेंसीं बोलता लागेल वारे. ॥ २ ॥

(७६१)

वमनाचें अन्न; कायसी शुद्धि ? प्राणी सुटल्यां न सुटे व्याधि. ॥१॥धृ॥
भूतशुद्धि वायां करितासि जना ! रजस्तमोमय अरे ! अज्ञाना ! ॥ छ ॥
दिगंबरेंवीण शुद्धि न दिसे. शरण ज़ायीं तया मनोमानसें. ॥ २ ॥

(७६२)

आला तैसा गेला येकला येकु.
वायां पाठिलागा होतुसे लोकु. ॥ १ ॥ धृ ॥
तुह्मी कवणें ? मी कवणाच्या कायी ?
मूळीं वोळखीसि ठायो चि नाहीं. ॥ छ ॥
दिगंबरु येकु सोयेरा जनीं. जन झोंबताति तयां सोडूनी. ॥ २ ॥

(७६३)

शरीरा आडूनि बोले तो कवणु ?
वोळखींवरि कां नठवा मनु ? ॥ १ ॥ धृ ॥
वायां वीण येकें येकासि झोंबा, स्वरूपार्थलाभा सांडूनियां. ॥ छ ॥
दिगंबरु सर्वजनु सोइरा. कां तयां न धरा दुर्जन ! हो. ॥ २ ॥

(७६४)

आपणां नेणोंनि पर भूलले. जन जनाप्रति झोंबत ठेलें. ॥ १ ॥ धृ ॥
हीतवीहीत पडलें माघारें. देहो पडे; परि झोंबी न सरे. ॥ छ ॥
दिगंबरें ये कौतूक केलें. आपुलिया माया जन मोहीलें. ॥ २ ॥

(७६५)

दर्श्येंसीं आपणु द्रष्टा वीलक्षणु; हें वर्म बोलसी कांह्या ?
स्वप्निचें समग्र जागृती गोचर देहादि केउतें द्रष्टया !
पवित्र तें तूं चि; दुसरें तुज नाहीं चि जाणतां चिदात्मया !
नरकाचा सागरीं निर्मळ पाहासी लहरी;
ऐसा गुणु शरीरीं सांडीं तया. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! कां भजसी पाल्हाळ ? सांडि तें सकळ कल्पनेच्ने जाळ; विस्तारिसी.
नीजज्ञानें धीरु असतां पवितृ; वायां अपवितृ बळें होसी. ॥ छ ॥
कवळांचिये दृष्टी शंखु ही पीवळा; ऐसी ज़ाली तुतें परी.
दोषाचीये दृष्टी आभासु भासला; तया कवणु परिहारी ?

अज्ञानाचें कार्य स्वप्नाचि सारिखें; सकळ मिथ्या अधाधारी.
दिगंबरु आत्मां ब्रह्म सनातन; मायेसि न दिसे सत्य उरि. ॥ २ ॥

(७६६)

दृश्य देखोंनियां भूललें हें जन; आत्मा चि मानीती देहो !
अर्थस्वार्थदीपीं दीपले पतंग; वायां वाढवित्ती स्नेहो !
प्रमीत हें जीर्णे; वीनाशु न चुके; वाया पुत्रादींकीं मोहो !
नीदान पावता येकला चि ज़ाये; मग पडे थोर संदेहो ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मना ! नको हा सत्संगु ज़ोणोंनि सोडूं; होयील येथ निवाडु !
हातिचें पीयूषपात्र विसर्जूनि, कांजी कां ह्मणतासि गोडु ? ॥ छ ॥
द्रव्य सांचे; परि वय तें वेचलें; हानि कीं लाभु, विचारीं ?
आतां पाहें ज़ासी::— निमीष न लगता जन्मसी इतरां घरीं.
तैं हें तुझें तेथें काहीं होये ? आतां ऐसी कां भज़तासि हारी ?
दिगंबरें वीण आपुलें कव्हणी नव्हे ? कवणु तूं हा संसारी ? ॥ २ ॥

(७६७)

अस्थिमांसत्वचानाडीरोमादीक शरीरीं धातु सप्तक.
वीटाळाची मूस, मळपंकमांदुस; अंतरीं क्रीमकीटक.
शुक्रीतें शोणितें रचनेप्रति आलें; ते ही ते येक नरक !
पापाचें निर्माण, पापाचें चि स्थान, शरीर पापजनक. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! जना ! न धरीं याचा संगु;
भज़, भज़, कां वीयोगु येणेंसीं ? तुज़ शुद्धि नाहीं!
देवातें संस्पर्शु क्षणें क्षणें करिसी. नाना कर्में तुझां ठायीं रे! ॥ छ॥
शुद्ध श्वेत वरी तीर्थीं प्रक्षाळिलें श्वान, तें पवित्र नोहे!
वरि वरि करूनि स्नान मृत्तिकामर्द्दन चांडाळु पवितृ काये?
कांटाळा धरिसी; तरि सर्व ही कुश्चिळ कर्में चि पवितृ आहे!
सांडुनि आपसंदु, सांगितलें करिता, दीगंबरप्राप्ति होयेरे! ॥ २॥

(७६८)

भूतांचें कारण; पृथ्वी लयस्थान; भूतें तीं तें, ज़ाण, कुश्चिळ करिसी.
ती पासाव धान्य जीवरूप ते कण; करूंनि त्याचें पचन अन्नें ह्मणती.
जळचरीं व्यापिलें सलील कुश्चिळ; केलें मळमूत्र आपुलें; ते कोठें द्रवती ?

विचारितां देह परम कुश्चिळु; ज्ञेय, मळमूत्रआमय जेथें असती. ॥१॥धृ॥
रे ! करितां देवार्चन कांटाळलें मन; संदेहा छेदन नव्हे पुढती.
पृथ्वीनां जीवन देहीं पवित्रपण; देव ते पाषाण अस्थि याती. ॥ छ ॥
तीर्थे दानें तपें व्रतें पुण्यरूपें वासना पवित्र कीजे.
वैदीक सकळ; कर्मांग पाल्हाळ; येणें चि निर्मळ येक दूजे.
योगाचें सेवन तेणें पवित्रपण; ऐसेपरिचें ज्ञान येकां उपजे.
देहेंसीं इतरु आत्मा दिगंबरु; ऐसा साक्षात्कारु जरि कां नुपजे ? ॥२॥

(७६९)

विविक्तात्मज्ञानविचार वर्जीतु वासन या बहु देहीं.
देहो चि आत्मा, हें सिद्ध प्रतिपादी पापरूपु संदेहीं.
वीतरागवृत्ति नुपजे हृदयीं; कल्पनेतें पारु नाहीं.
वेदशात्रवादप्रमाण न मनीं; पडला तो संसारडोहीं. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! मना ! नको सद्‌गुरुसंगु सर्वथा सोडूं; दिवसें दिवसें होसिल वाडू.
ब्रह्मानंदकंदु सेवितां श्रीदत्तु पीयूषाहीहूनि गोडू. ॥ छ ॥
देहश्रमें जन बहूत नाशले अवलोकूनि पुडतो पुडती.
अधिकारी सुजन श्रीदत्त ह्मणती. कांटाळा उपजला चित्तीं.
सद्‌गुरुवाचोंनि न भजनीं दूसरें; अखंड जाले तदवृत्ती.
दिगंबरेंवीण सूटिका न दिसे. काइसा भ्रमु ये अर्थीं ? ॥ २ ॥

(७७०)

विषयाची आसक्ति; वरि न दिसे विश्रांति; प्रवृत्ति आगळी देहीं.
माझें तुझें ह्मणौनि करितासी सोसणी; ब्रह्मज्ञान वदसी काई ?
मनस चंचळ; सकळकरणस्थीरता ते तेथ नाहीं.
हंसाचीया गती वायसु च्रमके. माळा गे ! गुणु तयातें काहीं ? ॥१॥धृ॥
रे ! बापा ! गुरुविण ब्रह्मज्ञान सर्वथा नाथी. कां लटिकी करिसी आधावती ?
अपरोक्ष ब्रह्मसायुज्य पावणें. रोकडी सद्यप्रतीतिं. ॥ छ ॥
दृष्टीचें देखणें दृश्याचा आभासु; देहसहीत सकळ माया.
मनसें भजसी; तरि कल्पना अवघी; स्वप्न जैसें देख तया.
बुद्धीहूंनि पर बुद्धीचें अंतर; द्रष्टा केप्रति द्रष्टया ?
दिगंबरे वीण सिधांतु नेणसी; शरण जायी योगीराया. ॥ २ ॥

(७७१)

डाळुकाचें पाणि मूळीं केंसरें सारणी
सुख तें राजणीं कांहीं चि नाहीं.
पाहातां तरणी बाष्प लागलें नयनीं;
तेथें धावो मा सांडणी त्या भाळ्याच्या ॥ १ ॥ धृ ॥
माये ! वासुवोस तरणें, प्रकाश मालवणें.
उभयत्वें लेणें लेउनि वाड. ॥ छ ॥
तेथें ज्ञाये ते जगाति; जलाशय ते फांकति;
भोगा भोग्य गति हे मनोरथा.
तेथें अंगना तो दोरु; फणिकेंसरें आदरु;
न भासे तें मारूं काय मीं तेथें ? ॥ २ ॥
चांदुवो चांदिणें गुणिकें येसणें कें झंपवेल ?
तेथें श्रुति ते सांडणीं; गुण अगुण आटणि;
शिव ! शिव ! मन लागणी तें दिगंबरीं. ॥ ३ ॥

(७७२)

मोतियांचें पाणी मीं भरीन ये रांजणीं; विमळे गगनीं घालीन सडा.
आभासु येकला; वीचित्र रंगमाळा;
दोहींच्या मंडळा येथूनि काढा. ॥ १ ॥ धृ ॥
माये पाहूणा शंकरु येइल आदिगुरू, गुणाच्या विस्तारु येथूंनि सारा.
अवस्था लागली; माझी मति पांगूळली;
मूळ मीं चूकली; मज़ भेटि करा. ॥ छ ॥
पारखी नाडले, तें चिद्रत्न पाज़ळे; आश्रया वेंगळे वो आश्रयत्व.
दिगंबरीं भेटी माये ! मीपणा शेवटीं. भेदाचीया तूटी संपूर्ण तत्व. ॥२॥

(७७३)

वाघाचा गोठणीं मज़ ठेविलें वो ! गुप्तीं. आपणु निदानीं सांडूंनि गेला.
वाटुली पाहातां, भूलि पडली ज़ाणतां,
मना ही परुता वो ! अंतरला. ॥ १ ॥ धृ ॥
माये ! कयी मीं लाहीन ? मुख नयनीं पाहीन?
गुणी गुणगण गुंपोनि गेले. केलियासारिखा नव्हे नव्हे वो ! पारिखा.

भेटीचिया सुखा प्राशन केलें. ॥ छ ॥
गुणाची लावणी माये ! केली वो ! आंगणीं.
सडींचां कांडणीं के कणु आहे ?
अंतर भोगितां मज़ लागली अवस्था; दिगंबरें द्वैतां कें ठाउ ? माये ! ॥ २॥

(७७४)

सोनयांची वानी मीं घेईन पीळूंनी. मोतियांचें पाणी मज़ आणिज़ा कां !
गगनाचें बीज मनीं रूपलें वो ! मज़;
सांडणी सहज़ करीन माये ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! गुणिया ! स्वजना ! तूं परिस रे ! सुज़ाणा !
मुळीच्ना मीपणा वीटाळु ज़ाला.
तें पाहोंनी वाळिलें; वावधाण उपणिलें;
सद्गुरूच्नेनि बोलें पालटु ज़ाला. ॥ छ ॥
डोळांच्नी बाहुली म्यां नयनीं देखिली; देहें वोत्राळिली; परि आवडेना.
आंग हें च्नालणी मीं च्नळली यें गुणीं.
दिगंबरध्यानीं विश्रांति ज़ाली. ॥ २ ॥

(७७५)

॥ चालि भिन्न ॥

करितां वो ! गुणश्रवण माझें वेधलें हें मन.
वियोगवृत्तीबाण मज़ बाधिताती. ॥ १ ॥ धृ ॥
मज़ न साहे चंदन, माये ! चंपकसूमन.
सुरस हीं गायन कठीण लागे. ॥ छ ॥
हा वो ! डोळयांच्ना डोळा माये ! जीवाच्ना जीवाळा
दिगंबरू येकु वेळां कैं देखईन ? ॥ २ ॥

(७७६)

कामाच्ना अतिवेगु; मज़ न साहे वियोगू.
झणें हा मनोभंगु करील माये ! ॥ १ ॥ धृ ॥
तुह्मीं ज़ा, ज़ा वो ! झडकरूंनि; त्यासि येइ ज़ा घेऊंनी.
मग त्याच्ना गुणीं आसक्त ज़ालें. ॥ छ ॥
हा वो ! मनाचें नीजमन माये ! प्राणाचें ही प्राण.

दिगंबराच्रे चरण कैं देखयीन ? ॥ २ ॥

(७७७)

योगियाचें ध्येय, हा वो ! सत्यतत्त्वज्ञेय,
ब्रह्म सच्चिन्मय भासे अवधूतु. ॥ १ ॥ धृ ॥
येणें हरिलें वो ! मन माझें; मज आपपर नूमजे;
करणगण सहजें ते पांगुळलें. ॥ छ ॥
हा वो ! विश्वाचें कारण; माये ! स्ववृत्तीचें धन;
दिगंबरु निधान कैं सांपडैल ? ॥ २ ॥

(७७८)

निजमायेचा गुणी गुणगुप्त वो ! साजणी !
श्रीदत्तु लावणी या स्वसुखाची. ॥ १ ॥ धृ ॥
हा न दिसे वो ! गुणकरणी. मीं काये करूं साजणी ?
पाहीन यातें नयनीं कैसेनि आतां ? ॥ छ ॥
हा वो ! बुद्धीचें कारण; माये ! ब्रह्म सनातन.
दिगंबरू निर्गुण सगूण ज्ञालें. ॥ २ ॥

(७७९)

निडळीं ठेउंनि बांह मीं पंथु याचा पाहे;
न दिसे येतां; माये ! मीं काये करूं? ॥ १ ॥ धृ ॥
माये ! न धरी वो ! हे प्राण; माझे तपती करचरण;
वियोगाचे बाण बहु वेधिताती. ॥ छ ॥
करा वो! उपकारू; या शब्दाचा आधारू;
मज तो दीगंबरु भेटीसि आणा. ॥ २ ॥

(वैराटिका)

हा वो ! जीवाचा जीवनु; माये ! प्राणाचा ही प्राणू;
परब्रह्म तनु श्रीदत्तु माये ! ॥ १ ॥ धृ ॥
येणें भरलें वो ! अंतर; मज नलगे आपपर;
आपुलें शरीर विसरली माये ! ॥ छ ॥
हा गुणाचें कारण; या मनाचें ही मन; दिगंबर चैतन्यस्वरूप माये ! ॥ २ ॥

(७८०)

हा वो ! प्रकाशाची खाणी; चिद्दीपु वो ! दिनमणी;
मायातमोहरणीं उदीतु ज्ञाला. ॥ १ ॥ धृ ॥
येणें हरिलें वो गुणभान; माये सगूण हें मीपण;
आतां द्वैतभान दुर्लभ माये ! ॥ छ ॥
आत्मा निर्विकारू, परमात्मा वो ! श्रीगूरू,
योगी, दिगंबरू, श्रीदत्तु माये ! ॥ २ ॥

(७८१)

हा वो ! गुणांचें भाजन माये ! योगियांचें धन;
दोषांचें दहन हा योगिराजू. १ ॥ धृ ॥
माये ! धरीन वो ! अंतरीं; न विसंबे क्षणुभरी;
हृदयाचा सेज़ारी करीन सेज़. ॥ छ ॥
हा देवांचा ही देउ; निजमायेचा अभाउ;
आनंदाचा ठाउ श्रीदिगंबरु. ॥ २ ॥

(७८२)

लीलाविश्वंभरा ! अरे ! विज्ञानसागरा !
सद्गुरो ! दातारा ! करुणामूर्ति ! ॥ १ ॥ धृ ॥
येइं येइं रे ! झडकरूनी; तुझा विषयो माझा मनीं;
प्रीतिं अंतःकरणीं ते मात्रे ना. ॥ छ ॥
स्वमायया गुणगुप्ता ! अरे ! मायाविवर्जिता !
परमानंदभरिता ! श्रीदिगंबरा ! ॥ २ ॥

(७८३)

हा वो ! सावळा, सुंदरू, स्वभक्तकल्पतरू,
योगियातें गुरू, माये ! देवदेउ. ॥ १ ॥ धृ ॥
म्यां देखिला वो ! नयनीं; माये ! भरला अंतःकरणीं;
गुणगण याचा गुणीं तल्लीन ज़ालें. ॥ छ ॥
मन नेणें; परती गुंतलें आसक्ती; भेदाची अस्फूर्ति ते दिगंबरीं. ॥२

(७८४)

सुरतरुचिंतामणी ज़रि वरि पडती येउनी;

तऱ्ही परि मी त्याहूनी न धरीं माये ! ॥ १ ॥ धृ ॥
मज्ज न करावें सिकवण; माझें वेधलें हें मन;
संगें मी जायीन तया चि मागें. ॥ छ ॥
मोक्षाचें मज्ज नाहीं; गुणकृत येर तें काई ?
दिगंबराचा पाई मज्ज भेटि करा. ॥ २ ॥

(७८९)

न साहे गुणतर्कु; म्यां सांडिला विवेकु;
काइसा हा लौकिकु ? तो दूरि करा. ॥ १ ॥ धृ ॥
माये कैं कैं वो ! कैं डोळां मी पाहीन ? श्यामळा !
सुरनरगणपाळा ! श्रीअवधूता ! ॥ छ ॥
निर्गुण वो ! गुणवंत माये ! ब्रह्म सदोदीत,
दिगंबर अव्यक्त व्यक्तीसि आलें. ॥ २ ॥

(७८९अ)

प्राणाच्या वो प्राणु माये ! पंकजलोचनू ;
कैं माये सगूणूं मी देखयीन ? ॥ १ ॥ धृ ॥
मज्ज भरला वो ! अंतरीं माये ! जीवाच्या जिव्हारीं.
तैसा कैं बाहेरी पाहिन माये ! ॥ छ ॥
जनधनयौवनकाया मी नाश्रयीं हे माया.
दिगंबरेंविण वायां सर्व ही माये ! ॥ २ ॥

(७९६)

बहु दिन जाले भेटीं; भेटि न दिसे वो ! ललाटीं;
वियोगदुःख पोटीं भरितें आलें. ॥ १ ॥ धृ ॥
माये ! जळधरू वो ! नयनीं;
बहु द्रवताति जीवन; शोके आक्रंदन गर्जन तेथें. ॥ छ ॥
आजि दर्शनाच्या भासू; तो विजूंचा प्रकाशू;
सुखाच्या विनाशू प्रळयो माये ! ॥ २ ॥
वोसरु वोसरला; माये ! न दिसे जीवनकला;
दिगंबरेंवीण ज्ञाला दुःखासि येगु. ॥ ३ ॥

(७८७)

चरतर चंचल मन माये ! नाश्रयी कारणा;
परमार्थ हीन प्रलाप करी. ॥ १ ॥ धृ ॥
येणें नाशिलें श्रमहरण गुण रहीत योगधन;
वनजनसदनधन धरूनि ठेलें. ॥ छ ॥
गुणकरणें चळबळिती; तेणें तगबग होत आथी;
दिगंबरेवीण स्थिति मी केवि पावे? ॥ २ ॥

(७८७ अ)

येणें जाणें मज्ञ नाहीं गे ! मन कुंठलें परति नाहीं;
या जीवासि परति नाहीं. ॥ छ ॥
पुडती भेटणें केउतें ? कवळिन दोहीं बाहीं;
रूप आळंगीन दोहीं बाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
केव्हां देखइन ? माये ! वो ! धरीन मीं दोन्ही पायें ?
कवळीन दोन्हीं पायें ? ॥ छ ॥
कमळनयनु भेटवा. वियोगु मनीं न साहे.
हृदयीं भेदु न साहे. ॥ छ ॥
येणें जीवें काज्ञ नाहीं वो ! हितें विहितें ही चाडु नाहीं.
साधनयोगें चाड नाहीं. दिगंबरें वीण सखिये !
मीं नेणें परमार्थ देहीं. पुरुषार्थु न मनी काहीं. ॥ २ ॥

(७८८)

विण जळें तळमळी वो ! मीनु पडला महिमंडळीं.
हा मत्स्य ये भूमंडळीं. तैसी गति मज्ञ सखिये !
मीं वियोगें व्याकुळ ज्ञाली. अवधूतेविण वायां गेली. ॥ १ ॥ धृ ॥
केधवां ज्ञायीन तेथें वो ! माझी माये अवधूतु ज्ञेथं;
सखा श्रीदत्तु ज्ञेथें; आळंगीन निजहृदयीं.
सुख होईल तेणें मनातें. विश्रांति लाहीन चित्तें.
पाडस चूकलें वनीं वो ! कोठें गेली कुरंगिणी ?
तें कें गेली हरीणी ? दिगंबरें मज्ञ तद्वत
सांडिलें भवानिर्वाणीं. प्राणासि होतसे हानी. ॥ २ ॥

(७८९)

भवनदी बुडताहें वो ! गति पांगुळली येथ माये !
बहु भागलीयें. करूं काये ? अत्रसूता ! कयी पावसी ?
आणिकाच्या हातु न साहे. मज पराची कास न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
आतां दृढ करूं काये वो ! माझें हृदय दुभागताहें.
अंतरभू फूटताहे. श्रीदत्तु नयनीं न दिसे.
आश करूनि वाटुली पाहे; नयनीं वाटुली पाहे. ॥ छ ॥
दीर्घस्वरें आळवीन वो ! श्रीदत्ता ! ये ह्मणउंन;
अवधूता ये ह्मणउंन. दिगंबरा तुजवांचूनी येथ
सोडवी न कवण; वरि पडतां हे निर्वाण. ॥ २ ॥

(७९०)

॥ चाली भिन्न. ॥ चंद्रावळीची ॥

कृष्ण ! स्यामा ! कमळनयना ! निर्गुणगुणा ! योगयुक्तचित्तभूषणा !
परब्रह्म ! आनंदघना ! पूर्णवेदना ! तुझा नित्य विषयो मना. ॥१॥धृ॥
येईं, येईं, येईं स्वस्थाना, हृदयस्थाना, योगिराया ! तमोहरणा ! ॥छ॥
कार्त्तवीर्य ! वरदमूर्ती ! कमलापती ! गुणत्रयगळीतमती !
दिगंबरा ! स्वरूपज्योती ! अगम्यगती ! तुझा ठायीं विरामो वृत्ती. ॥२॥

(७९१)

भवभ्रमश्रमदहना ! प्रवृत्तिक्षीणा ! अनंतगुणभाजना !
सुवर्णवर्णा ! देखयीन कयीं सगुणा ? ॥ १ ॥ धृ ॥
येईं, येईं, अब्जलोचना. पाहूनि चरणा भीन्न न करी स्वजना. ॥ छ ॥
योगिराया ! अत्रिवरदा ! संपूर्णपदा ! गुरो ! नीरसीं प्रमादा.
दिगंबरा ! सहजसिद्धा ! चित्सुखप्रदा ! दूरि करीं भेदा त्रिविधा. ॥२॥

(७९२)

आंगीं चंदन चर्चिलें; शोभीत ज़ालें.
भाळीं सुरंग पीवळें; वस्त्र सुवर्णा आगळें;
प्रावरण केलें. धूपें शरीर धूपिलें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा कइं मी देखेन ? निवेल मन. कुंडलीं शोभती श्रवण. ॥ छ ॥
किरीटु अनिशये शोभला सुमनमाळा.

दत्तु डोळसु सावळा सुभक्तसंगें मीरवला.
आनंदु केला. दिगंबरें स्वजनु तारियेला. ॥ २ ॥

(७९३)

चरणकमळजळमळमोचन ! प्रवृत्ति हरण !
घेईन प्रेमवर्धन. सकळनिश्चलशिळकरण गण
ऐसी होईन. करीन मीं हृदयीं ध्यान. ॥ १ ॥ धृ ॥
दत्താचें मुख आठविन. वेधलें मन.
तेणेंवीण न स्मरे आन. ॥ छ ॥
सदन, स्वजन, धन, धनद, माये !
करूं मीं काये ? मायामय स्थीर न राहे.
हातूंनि सूटला सैये ! मग मागुता नये.
परमोपायें दीगंबरु आजि प्रतिभासला आहे. ॥ २ ॥

(७९४)

सद्गुरूचा संगु दैवें जोडला, वो ! दैवें जोडला
बहुतां जन्माची हे भेटि वो !
येथें अंतर पडतां पडैन कवणें कपाटीं ? वो !
सहसा ठायासि न ये. मग मीं कें पाहों या दृष्टी ? वो !
मन चंचळ भारी; करिताहे परम कष्टी वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! अवो ! सुंदरे वो ! अवो ! सुंदरे ! वो !
उपदेशु करि कां काहीं वो ! चित्त दुश्चित माझें
उमज्ञा प्रति न ये काहीं वो ! ॥ छ ॥
काम क्रोध वैरी वैर साधिती, वो ! वैर साधिती वो !
आशा, ममता, तृष्णा भारी वो ! यांचे आघात मोठे.
कैसे पाहों कवणे परी वो ! हीता विसंच पडतां
न दिसे निमिष ही भरी वो ! म्हणें अंतर माये ! पडैल ये दिगंबरीं वो ! ॥२॥

(७९५)

मायेबापु माझें कूळ समर्थ, वो ! कूळ समर्थ वो !
दीधली ये दूर देशीं वो ! पुडती परती नाहीं.
कठिणता ऐसी कैसी वो ! दुःखें हृदय फूटे !

सांगों मी कवणापासी वो ? पंथु पाहात ठेली.
त्याची खंति वाटे जीवासी वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! अवो ! सुंदरे ! वो !
अवो ! सुंदरे ! वो ! अवो ! सुंदरे ! वो ! ज्ञाणवी माये ! ते मातु वो !
प्राण ज्ञातील वार्या ! करीन मीं आत्मघातु वो ! ॥ छ ॥
कामक्रोध मातें मुळीं बैसले वो !
मुळीं बैसले वो ! दंभ दर्प वैर करिती वो !
मदमत्सर दूज़े पडला जीउ अतिभ्रांतीं वो !
यत्नु न चले चि कांहीं योगातें लाविली ख्याती वो !
वेगी झडकरि ज़ायीं. ज्ञाणवी दिगंबराप्रति वो ! ॥ २ ॥

(७९६)

दत्ते धेनूचें मीं वत्स धाकुलें वो ! वत्स धाकुलें वो !
मागुतांहि येकु पान्हा वो ! कैसी देउं निघाली ?
लागो नेदी मज़ थाना वो ! कैसें लल्लाट माझें !
बोलु मी ठेउ हा कवणा ? वो ! मीं पोटिचें बाळ.
आहे नाहीं कळेना वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! अवो ! सुंदरे ! वो !
अवो ! सुंदरे ! वो ! अवो ! सुंदरे ! वो ! हृदय उल्लाहे माझें वो !
दुःख कवणासि सांगों ? आहारु दूज़ा नेणिज़े वो ! ॥ छ ॥
नव मास पोटीं होतियें कैसी वो ! होतियें कैसी वो !
तुझेनि स्वरसें धाली वो ! जन्मु कां मज़ दिधला ?
उपेक्षा कासया केली ? वो ! आतां येथूनि तन्हीं ज़ेथिची तेथें मज़ घाली वो!
दिगंबरे ! माये ! भारी होती आशा केली वो !

(७९७)

दिगंबराचें मीं बाळ धाकुलें वो ! बाळ धाकुलें वो.
मांडियेवरि ठावो मागें वो ! मातें लोटूनि घाली; कवणा पाहो पुढें मागें वो !
नयनीं आंसुवें गळती. तूटि पडली कवणें अंगें ? वो !
दूज़ा ठाउ चि नाहीं. लागो मी कवणा मागें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! अवो ! सुंदरे ! वो ! अवो ! सुंदरे ! वो ! अवो ! सुंदरे ! वो !

ऐसें जीणें काये करूं ? वो ! आतां मरण चि भलें !
मोडला माझा आधारु वो ! ॥ छ ॥
हडनिया दृष्टी पाये पाहीन वो ! पाये पाहीन वो !
कैसी पाहीं याचें वदन वो ! येणें नीरास केली.
आतां मग ज़ाती प्राण वो ! देवें ज़ाणोंनि ऐसें
दिधलें मज़ आलिंगन वो ! तेणें सर्वांग धालें दिगंबरें अमृतपान वो ! ॥२॥

(७९८)

शुद्ध श्याम रूप देखिलें शिवणा वो ! देखिलें देखिला शिवणा वो !
तो चि वेधु धरिला मनें वो !
कैस्या आठवती भूजा कटकांगद भूषणें वो !
वस्त्रें सुवर्णवर्णें; सूटलीं तीं उपमानें वो ! पीत चंदन भाळीं.
उटिलें श्वेत चंदनें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! अवो सुंदरे वो ! अवो सुंदरे वो ! अवो सुंदरे वो !
उसंतु न दिसे मना वो ! चित्त आसक्त ज़ालें.
पाहीन कमळनयना वो ! ॥ छ ॥
किरीटकुडलांचें तेज फांकलें वो ! तेज फांकलें वो !
तें जीणें चंद्रसूर्यासी वो ! मुखीं तांबोळु बरवे;
दृष्टांतु न दिसे तयासी वो !
चरणीं विश्वासिगति; धन्य अनसूयेची कूंसि वो !
दिगंबरु परब्रह्म होतें तीचा गर्भवासीं वो ! ॥ २ ॥

(७९९)

दृष्टादृष्ट दृष्टी पुष्टि न मनीं वो ! पुष्टि न मनीं वो !
कष्टी मीं ज़ालीयें भारी वो ! येणें संसारपंथें
स्वहीत तें पडलें दूरी वो ! बोलु कवणासि ठेउं ?
मनस हें मज़ माझें वैरी वो ! ज़ालें भ्रमीत गुणी.
स्थिर नव्हे कव्हणियें परी वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! भूललीं मी अविचारें वो !
भेटी श्रीदत्तु आणी; निवारील माझें भुरें वो ! ॥ छ ॥
देह गेह स्नेह हेय सकळ वो ! हे हेय सकळ वो !

दुःखजनक हें भान वो ! याची प्रतीति नलगे.
समाधी पडैल सिरिं वो !
हींत नाशैल माये ! अनुबंधा लाहेल मन वो !
मातें कांहीं चि नलगे दिगंबर येकु वीण वो ! ॥ २ ॥

(८००)

नित्यानित्यवस्तुसिद्धवेदन वो ! सिद्धा वेदन वो ! सद्गुरूवांचूंनि नाहीं वो !
ग्रंथ बहुसाल वायां पाहोंनियां काज कायी वो !
तेणें श्रमू चि वाढे; अहंकारु उपजे देहीं वो !
तरि तें पाल्हाळ सर्व संडावें अद्धुर्धें डोहीं वो ! ॥ १ ॥ ध्रु ॥
अवो ! अवो ! सुंदरे ! गुरुचरणीं हें मन भरे वो !
मज ऐसें चि करि कां ? नावेरे जीवा दुसरें वो ! ॥ छ ॥
यज्ञदानतपव्रत वैदीक वो ! व्रत वैदीक वो ! मोक्षासि नव्हे कारण वो !
फळें आपुलेनि फळे तें चि तें कर्मबंधन वो !
संत जाणती; साधू सेवीती श्रीगुरुचरण वो !
तरि मी सांडूंनि सर्व दिगंबरातें पाहीन वो ! ॥ २ ॥

(८०१)

वैराटिका. धावा.

बंधीं पडे बाळक; स्मरे जनका प्राण वेचले; जाइल क्षण एका.
तयावांचूंनि करुणा नये आणिका.
तैसि गति बा ! जाहली मज एका. ॥ १ ॥ घृ ॥
दत्ता धाव रे ! धाव रे ! धावगया मायबापा ! सांडिसी श्रणें माया.
तुजवांचूंनि न स्मरे योगिराया ! भवबंधनीं पडलों गुणक्रीया. ॥ छ ॥
केवि राहों ? कवणे दिशा पाहों ? पंथु न कळे केउता आतां जावों !
श्रमु जाहाला; न शके प्राणु राहो. दिगंबरा आठवे पूर्वस्नेहो. ॥ २ ॥

(८०२)

वन्ही लागला; तपती करचरण. ज्वाळा कोळ पोळलें माझें मन.
कई वोळसी ? होईल तापशमन ?
किती पाहामी निदान ? केवळ मरण ! ॥ १ ॥ धृ ॥
येईं, येईं, रे ! सद्गुरुराया ! येईं.

मुख पाहिन नावेक; नावेक निश्चळु राही.
मायबापा ! घेउंनि मातें ज्राई. वेळों वेळां लागत आसे घाई. ॥ छ ॥
कई वोळसी अमृतज़लधरा ? जनवत्सला ! स्वभक्तकरुणाकरा !
दीर्घ आळवी; पावई दिगंबरा ! मायबापु, स्वजन तुं सोयेरा ! ॥ २ ॥

(८०३)

दोन्ही नयनजळधर जळ द्रवती. देह पडले; वणवां अंगें जळती.
तुझा वियोग साहणें दुःख कीती ? मंत्रराज़ा ! सद्‌गुरो ! मंगळमूर्ति ! ॥ १ ॥
दत्ता ! येई रे ! येई रे ! जगजनका ! हृदयीं पेटली दीपकळिका.
कई पाहिन नयेनीं तुज़ येका ? देह न धरी तुज़विण पळघटिका. ॥ छ ॥
धर्म राहिले, कुंटले पंचप्राण. भ्रमु आकळी; कवणाची वावो आण !
दोन्ही पाये मी करीन प्रणाम. दिगंबरा ! न करी कठीण मन. ॥ २ ॥

(८०४)

बहु काळ ज़ाहाले; भेटी नाहीं. तुझें वदन नाठवे देवा ! हृदईं.
ऐसें कां बा ! करितासि ? परति घेईं.
होसी कठीणु; तरि म्यां कीज़े काई ? ॥ १ ॥ धृ ॥
येई, येई रे ! येई रे ! कमळनयना ! कृष्ण ! शामा ! सूरारिकुलमथना !
अवधूता ! स्वभक्तजनजीवना ! दयामंदिरा ! वियोगतापशमना ! ॥ छ ॥
कर्मयोग साहिले; नेणों किती शमदमादि साधन पुडतोपुडती ?
दिगंबरा ! न येसी मातें व्यक्ती. दृष्टी पाहीन अव्यया ! तुझी मूर्ती. ॥ २ ॥

(८०५)

योगिराया ! राजया ! वरदमूर्ती ! कृष्णशामा ! सुंदरा ! पूर्णकीर्ती !
ज्ञानसागरा ! श्रीगुरो ! स्वजनपती ! हें चि नाम स्मरेन दिवाराती. ॥ १ ॥ धृ ॥
येइं ! येईरे ! आत्मया ! पूर्णकामा ! दत्त मूर्ती ! अगम्य तुझा महिमा !
काळानळसंग्रासना ! सुनिःकामा !
मायामुक्ता ! भेटसी कईं आझां ? ॥ छ ॥
सिद्धराजा ! राजिवाकृतनयना ! मायामुक्ता ! वीमळगुणस्थाना !
ऐसीं नामें स्मरेन तुझीं नाना ! दिगंबरा ! परब्रह्म ! निरंजना ! ॥ २ ॥

(८०६)

तुझा वियोगु तपिया तपे भानु. सर्व शरीरीं पेटे हुताशनु.

भोगु कवणु ? न वचे कैसा प्राणु ?
अवधूता ! कई हरिसील सीणु. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां रे ! वेगीं येउनि भेटि देयी. तुजवांचूनि दुसरें मज नाहीं.
आणिकाचा न साहे हातु देहीं. ताप तीन्ही येक ज़ाहाले हृदयीं. ॥छ॥
मीनु थडिये पडला तळमळी; कीं तो काळिजीं गुंपोंनि गेला गळीं;
तैसी अवस्था तुजवीण मज ज़ाली. दिगंबरा ! माझा बापु तुं माउली.॥२॥

(८०७)

वाट पाहातां सीणले माझे डोळे. रूपिं आसक्त मनस मांगूळलें.
अवधूतु देखैन कवणे काळें ? धिग्य ! सकळ शरीर वायां गेलें ! ॥१॥धृ॥
बाइ ! येवो पद्मनयनरूप डोळां. कैं देखैन श्रीदत्तु सावळा !
माझा मनीं आठवे वेळोवेळां. आदिगुरु माये जीविचा जीवाळा. ॥ छ ॥
गुणीं गुंपलें नूपडे माझें मन. आर्ति बहु प्रीती वेधले चेतन.
देह वीकळ ज़ाहाले धर्मक्षीण. दिगंबरेंसीं करा वो समाधान. ॥ २॥

(८०८)

तपे तापिया त्रिपुरनयनु. तेथें थिल्लर आटतां नलगे क्षणु.
आश धरूनी धरूनीं मरे मीनु. तैसें संसारसंभ्रमें धनीकु जनु. ॥१॥धृ॥
पामरा ! रे ! कां वायां करिसी आयासु ? वया माप लागलें रात्रिदिवसू.
सर्ले होईल येके चि क्षणें कळसू. सोडी धनमदु मायामोहपाशू. ॥ छ ॥
स्वप्नराज्य भोगूनि काज़ कायी ? चेईलियांवरि काहीं चि नाहीं.
हातु झाडूनि उरसी गेलां देहीं. दिगंबरेंवीण पडसी संदेहीं. ॥ २ ॥

(८०९)

गुणश्रवणीं वेधलें माझें मन रे ! तेंचि हृदयीं लागलें नित्यध्यान.
वृत्ति वळितां हीं न वळे तेथूंन. कयी कयी तुझें होईल दर्शन ? ॥१॥धृ॥
आत्मयां रे ! कां दुःख बळें दुणावीसी ? प्रीति लाउनी वियोगें हाणतासी ?
अप्रीवीण जीवा संतृप्त करिसी ? तुझी आसक्ति न सुटे या जीवासी. ॥छ॥
दोन्ही डोळुले नेघती रूप आन. देहा सोडूंनि जावया करिती प्राण.
हीतविहीत विसरलें माझें मन. दिगंबरा ! आतां कीजो समाधान. ॥२॥

(८१०)

अनृजाग्रजतनुजजनजाया सकळें सुखाचीं सोयेरीं योगिराया !

काज्ञा न येति निर्वाण पावल्यां. व्यर्थ तयांची धरूनि काये माया? ॥१॥धृ॥
सखया! रे! तूं माझा स्वजनु सांगाती. अवधूता! आत्मया! मंगळमूर्ती!
तुझें स्मरण करीन दीवाराती. भेटि देइजो आमुतें पुडतो पुडती. ॥छ॥
प्रतिजन्मी सुहृदें ज्ञालीं नाना. परि तूं तो तूं चि; दुसरा असेना.
भूलि पडली; न कळे यया मना. दिगंबरा! पुरे हे भववेदना. ॥२॥

(८११)

चंद्र कवणें अमृतें नीववावा? क्षीरें क्षीराब्धि संतृप्त करावा?
सूर्यो कवणे दीपकें वोवाळावा? अवधूत भक्ती प्रसन्न करावा? ॥१॥धृ॥
सखिये! वो! चित्त गुंतलें त्याचा ठायीं येरे अर्थें प्रयोजनु मातें नाहीं.
केवि दर्शन लाहीन यये देहीं! कवणेंन रूप तें दोहीं बाहीं? ॥छ॥
व्योम कवणें उपायें बोलवीजे? निर्विकल्पस्वरूप हा सहजें.
दिगंबराप्रति दुसरें नुमजे. यातें सगूण म्यां कैसेनि पाहिजे? ॥ २ ॥

(८१२)

अतिप्रीती बोलता चूकि ज्ञाली वो! येणें प्राणवल्लभें प्रीति सोडिली;
दृष्टि काढिली; कळा वेचिली. ॥ १ ॥ धृ ॥
बायि! वो! प्राणु देईन; भेटि करा. दत्तु न ये हृदयसेज्ञारा. ॥छ॥
आर्त भारी भेटीचें; प्राणु देईन वो! दिगंबरु जीवासि माये जीवन;
माझें चिद्घन ब्रह्म निर्गुण. ॥ २ ॥

(८१३)

भवकृष्णसर्पें माये! दंशिली वो! तेणें वीषें विषयभूलि ज्ञाली हो!
मति कुंठली; गति मोडली. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये! वो! दत्तु भेटवा मंत्रवेधी. निजदर्शनें छेदील आधिव्याधि,
सर्वोपाधि, भेदबुद्धी. ॥ छ ॥
काम वेगळ हरें न निवारती वो! दिगंबरें वांचूनि ज्ञाली दूचिती;
भ्रमें भूलती; मोहो पावती. ॥ २ ॥

(८१४)

निडळीं हातु ठेउंनि पंथु पाहिन वो!
अवधूतु न ये; हें कवण कारण? ॥ १ ॥ धृ ॥
बाइये! वो! नित्य लागलें तें चि ध्यान.
केव्हां पाहीन मी देवाचें वदन? ॥ छ ॥

दिगंबरीं आसक्ति घ्येली मनसें वो ! त्याची भेटि होईल कवणें दिवसें !॥२॥

(८१५)

निज प्राण देईन बळी आपुला वो !
अवधूतु आत्मविषयो ज्राहाला. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! वो ! दत्तें वांचूंनि आन नेणें.
चित्त हेरियेलें येणें कमळनयनें. ॥ छ ॥
अहंभावो सांडीन सखिये ! येथुनी वो !
दिगंबरा ! आडिच्चे गुण तीन्ही. ॥ २ ॥

(८१६)

बहूत काळ क्रमले; भेटि न दिसे वो !
माझें आरत पुरैल कवणें दिवसें ? ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! वो ! दृष्टि पाहीन शुद्र स्यामा,
अवधूता, आत्मयां, पूर्णकामा. ॥ छ ॥
दिगंबेंर वांचूंनि मन न धरे वो !
तेणें वांचूंनि नलगे मज्ज दूसरें. ॥ २ ॥

(८१७)

॥ चाली भिन्न ॥

नये गूणा, अनुमाना, प्रतिध्याना वो !
दत्तु नेणवे मना, मुनिजना वो ! ॥ १ ॥ धृ ॥
न ये धर्म गुणकर्मा, रूपनामा वो !
दिगंबरु महात्मा, जगदात्मा वो ! ॥ २ ॥

(८१८)

न ये स्थाना, अनुमाना, गुणभाना वो !
प्रीति लागली मना; धरवेना वो ! ॥ १ ॥ धृ ॥
करणसिंधू, परमानंदु वो ! ॥ छ ॥
न ये रूपा, न ये जल्पा, गुणकल्पा वो !
दिगंबरु प्रलोपा, न ये कंपा वो ! ॥ २ ॥

[८१९)

जन, जाया, गुण, काया, धन वाया वो !

अर्थ सकळ माया. भजों कां ह्या ? वो ! ॥ १ ॥ धृ ॥
स्वरूपानंदीं न चळे बुद्धी वो ! ॥ छ ॥
जनभान दिसे स्वप्न; क्षणें क्षीण वो !
दिगंबर परिपूर्ण, निरंजन वो ! ॥ २ ॥

(८२०)

अवधृता ! गुणयुक्ता ! जनवंता ! रे !
तूं चि स्वजनशता गुणभर्ता रे ! ॥ १ ॥ धृ ॥
परमानंदा ! अत्रीवरदा रे ! ॥ छ ॥
गुरुराया ! मितवीर्या ! चित्सूर्या ! रे !
दिगंबरा ! आत्मयां ! सुरप्रीया ! रे ! ॥ २ ॥

(८२१)

जनजिवना ! गुणहरणा ! भ्रमदळना ! रे !
द्वैतविषयक्षीणा ! परिपूर्णा ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
सच्चिदानंदा ! परमविशुद्धा ! रे ! ॥ छ ॥
श्रमहरणा ! गुणदमना ! पद्मनयना ! रे !
दिगंबरा ! करि करुणा; देयी स्मरणा रे ! ॥ २ ॥

(८२२)

भवहरणा ! सुखकरणा ! तमोमथना ! रे !
अवधूता ! संपूर्णा ! गुणक्षीणा ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
त्रिगुणातीता ! तुं जनत्राता रे ! ॥ छ ॥
जनसहिता ! गुणरहिता ! श्रमगाळिता ! रे !
दिगंबरा ! तुज़ परुता नाहीं त्राता रे ! ॥ २ ॥

(८२३)

अवधूता ! श्रीदत्ता ! मायामुक्ता ! रे !
प्रियु बहु होसी चित्ता अद्वैता ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
हृदयीं राहीं; स्वसुख देयीं रे ! ॥ छ ॥
निजभक्ता तूं चि माता, स्वयं पीता रे !
दिगंबरा ! पुरे आता भववेधा रे ! ॥ २ ॥

(८२४)

वैराटिका.

गुणपरमित हे माया सखिये ! वो ! आश्रयाची वो !
मूळमतिस्वरूप क्रिया त्रिगुणमयी, सगूण, स्वगुणी अद्वया,
नेणती साधु, स्वरूपें चिन्मर्या, अव्यया. ॥ १ ॥ ध्रु ॥
तें मी पाहिन नयनीं मनुज. श्रमलें मन. बोलैन मी तेणेंसी गूज. ॥छ॥
जन, धन, स्वजन, जाया सखिये ! वो !
काये मी करूं ? मन माझें ने घे वीषया.
चंचळ मग सगूण; मीं नलगें तया.
दिगंबरें मनस माझें न धरी क्रिया. ॥ २ ॥

(८२५)

पळ पळ गेलें वो ! वायां बाईये ! वो !
श्रीगुरुवीण न कळे वो ! विहीत क्रिया.
चंचळ मन सखिये ! अनुसरे वीषयां.
ताप त्रिविध भोगिताहे; चूकलें तया. ॥ १ ॥ ध्रु ॥
तो मी नयनीं पाहिन सखिये !
श्रीदत्तु हा वो ! करूं काये ? अझूणी न ये. ॥ छ ॥
जनवन भ्रमण वायां बाइये ! वो ! सद्गुरुवीण न तुटे हें.
श्रीगुण माया. निश्चळें मनें सखिये ! तें न चले क्रिया.
दिगंबरें वो ! येकेंवीण नेणें दूजया. ॥ २ ॥

(८२६)

तळमळ कीती वो ! करूं ? बाइये ! वो !
नयनी वाटु पाहें; मज न धरे धीरु.
कवण माझें दूरीत ? मीं केवि सावरूं !
तपती ताप; तेणेंवीण नावडे परू. ॥ १ ॥ ध्रु ॥
चांदु, चंदन न साहे गायन.
श्रीदत्तेंवीण सखीये ! वेचती प्राण. ॥ छ ॥
पाहिन पंकजनयना बाईये ! वो !
येणें वो ! वीण रूप येर नावडे मना.

केवळ माझा हृदयीं वो ! हे चि वासना,
दिगंबरचरणीं मन वेधलें गुणा. ॥ २ ॥

(८२७)

असंग, संगवीहीन, असंग, त्रीगुणहीन,
असंग, अरूपु, सैये ! विज्ञानसार.
गुणसंगें वो ! तें सगुण. अवधूत योगिया योगधन.
तत्वसार, सुनीधान, अवो ! सैये ! भावहीन. ॥ १ ॥ धृ ॥
सार्वकाळ करीन मीं सेवन. ॥ छ ॥
अनंत, अद्वयसार, अनंत, सुखदकर, अनंत, अद्वय सैये !
आनंदमय परमात्मयाचें शरिर. दिगंबर, भक्तजीवन, शंकर,
निर्विकार, भावपर, अवो सैये ! अनंतर. ॥ २ ॥

(८२८)

सगुण चंचळ मन, सगूण करणगण सगूणें निर्गुण कैसें सेऊं मी ! माये !
परमाद्वय हें नीर्गुण रूप याचें सद्रूप, सचेतन, आत्मतत्व, नीरंजन,
आदिरूप, अकिंचन. ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं ? पारुषलें मीपण. ॥ छ ॥
अनन्यचेतन ध्यान, अनन्यचेतन ज्ञान,
अनन्यचिंतन सैये ! काये मीं ज़ाणें परमात्मयाचें सेवन ?
दिगंबरीं भेदाचें निर्दळन, सुखरूप, संनिधान, अनंदु तें आरोपण. ॥२॥

(८२९)

सगूणें निर्गुणध्यान; सगूणें येणें वो ! ज्ञान;
सगूणांवांचूंनि मातें प्रीय चि नाहीं.
परब्रह्म हें वो ! सगुण. अमळपणें अविद्येचें दहन.
सार्वकाळ ज्याचें ध्यान आनंदद, प्राणधन. ॥ १ ॥ धृ ॥
भक्तजन ज़ाणती याची खुण. ॥ छ ॥
सगुणें व्यापीले जन. सगूणीं वेधलें मन.
सगूणीं भज़तां सैये ! आयासु नाहीं.
परमानंदाचें कारण अनंतर करीतां संसेवन
दिगंबरें नूर मन; अनवृत्ती आलंबन. ॥ २ ॥

(८३०)

तोंडी

आठवीतां सगूर्णी गुण सगुर्णी वेधलें मन.
सखिये ! कै कै वो ! याचें होईल दर्शन ! ॥ १ ॥ धृ ॥
सखिये ! माझें मन व्याकुळ; भेटी अंतःकरण
ज्ञाहालें मीपण व्याकुळ. ॥ छ ॥
विसरतां बळें स्फुरे; आठवे आठउ नूरे.
दिगंबरीं आसक्ति मातें; नूमज्ञे दुसेंरं. ॥ २ ॥

(८३१)

अनुसरतां न गूणा; परति न कळे मना.
ठायें ठाऊ चित्त थिरे; वीषयो गमेना. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! मीं नेणें भजन यया दत्तांचें
पाहातां पाहाणें खाये; राहातां नुरें गे ! माये !
दिगंबरु आणीतां लक्षा, दूसेंरें न साहे. ॥ २ ॥

(८३२)

प्रतिक्षणीं तूझें ध्यान; न सूटे तेथूंनि मन.
अवधूता ! तुझां रूपीं रूपलें चेतन. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मया ! तुझा संदु लागला;
देवा ! रे ! तुझा वेधू, रूपअवबोधू लागला. ॥ छ ॥
परती न लाहे मन; ज्ञाहालें वीषयक्षीण.
दिगंबरा ! कयीं मातें होईल दर्शन ? ॥ २ ॥

(८३३)

ऐसी कैसी कर्मरेखा ? ज्ञाहालासी पारीखा.
योग कैसे ? ते मीं नेणें. दुःखद भूमिका. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा नको करूं कठिण, देवा ! नको करूं कठिण.
बा ! रे ! बहु वाटे कठिण. पाहीन मीं तूझें वदन. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं जैं आत्मा, तरि काडसा योगु आह्मां !
जाणतां मपिण नूरे. जडलें तें तुह्मां . ॥ २ ॥

(८३४)

योगिराया ! मायातीता ! अवधारी अवधूता !
मायेबापा ! कयी, सांग, भेटसी मागुता ? ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! तुझें ध्यान लागलें; रूपीं माझें मन;
गुणीं अंतःकरण सत्य ! सत्य ! ज़ाण, वेधलें. ॥ छ ॥
कृष्णश्यामा ! अब्जनयना ! सच्चिदानंदघना !
दिगंबरा ! मंत्रराजा ! स्वरूपवेदना ! ॥ २ ॥

(८३५)

चाली भिन्न.

अवधूते ! माये ! येईन मीं तुज़सवें.
न करी कठीण; तुझी लागली वो ! सवे. ॥ १ ॥ धृ ॥
तुझा धरिला गे पदरु; न धरीं मीं आतां धीरू.
तुझेंनि वियोगें दुःख केवि तें सावरूं ? ॥ छ ॥
बहु दीन गेले पाहतां वो ! तुझी सोये.
दिगंबरे आतां तुतें सोडूंनि न राहे. ॥ २ ॥

(८३६)

गुण तुझे माये ! न येति वो ! गणीतां.
आठवसी मनीं, तेणें तपे दुःखसविता. ॥ १ ॥ धृ ॥
भ्रमु लागला वो ! मानसीं धड चि ज़ालिये पीसी.
आळवीन परोपरी. रंगली जीवेंसीं संदु. ॥ छ ॥
नयन सजळ; माझें हियें फूटताहे.
दिगंबरे ! तुज़वीण, राहिलें, न ज़ाये. ॥ २ ॥

(८३७)

ज़वळी निधान; मना ! भ्रमशील कायी ?
श्रीदत्तु आत्मा; यातें ज़ाणपां हृदयीं. ॥ १ ॥ धृ ॥
स्पंदु न करी रे ! मनसा. नको भ्रमो दश दिशा.
ज़ाण तें ज़ाणतां मोक्षु लाधला वीदूषां. ॥ छ ॥
मायामय हें भान तुज़प्रति नाहीं. दिगंबर परब्रह्म तूंचि तूं अदेही. ॥२॥

(८३८)

मायामय मन, मायामय भान, मायामय हें सर्व योगसेवन. ॥ १ ॥ध्रु ॥
मन्ना न करी रे ! मानसें; सांडिं तें सकळ पीसें.
अनुभवें तुझा तूं; तैं करणें कायीसें? ॥ छ ॥
मृगजळ वाऊ; धरिजे तेथें भाऊ.
दिगंबरु तूंचि; येथें काइसा उपाऊ? ॥ २ ॥

(८३९)

श्रवण करितां मन विगुंतलें गूणी.
गुण ते सकळ, तेणें सांडिली करणी. ॥ १ ॥ धृ ॥
शब्दु न करी रे ! मनसा ! न धरीं या गुणभासा.
आपेंआप निवळैल बोधु तो आइसा. ॥ छ ॥
दिगंबरगूणें मीं दिगंबरु ज्ञाली.
मीतूंपणाची अवघी वृत्ति हरली. ॥ २ ॥

(८४०)

तोंडी

कवण सुकृत ? दैव कवण ? वो ! बाइये !
श्रीदत्तासारिखें रत्न सांपडलें गोरिये ! ॥ १ ॥ धृ ॥
प्राणधन माझें, अवो ! प्राणधन माझें,
करीन जतन; दत्तु प्राणधन माझें. ॥ छ ॥
परती न धरी मन अवृत्ती पाहातां.
दिगंबरीं सखिये ! मीं पावलीयें स्थीरता. ॥ २ ॥

(८४१)

कवण साधन, पुण्य पूर्वकृत ? न कळे
श्रीदत्ताचें रूप; मन माझें तेथ मीसळे. ॥ १ ॥ धृ ॥
योगधन माझें, अवो ! योगधन माझें,
श्रीदत्तासारिखें रत्न ! योगधन माझें. ॥ छ ॥
नावडे सखिये ! मज देह, गेह सकळ.
दिगंबरीं मन माझें वेधलें केवळ. ॥ २ ॥

(८४२)

सदन, स्वजन माये ! बहुगुणवेथा.
श्रीदत्तेंवांचूंनि अर्थु दुःखाची सरिता. ॥ १ ॥ धृ ॥
दिनें दीनु क्षीणू, अवो ! दिनें दीनु क्षीणू,
माप लागलें वया, दिनें दीनु क्षीणू. ॥ छ ॥
स्वप्नासारिखें माये ! सुखदुःख सकळ.
दिगंबरें वीण मृगजळभान केवळ. ॥ २ ॥

(८४३)

कवण स्वजन मज्ञ ? मी कवणाचा कवणू ?
येतां ज्ञातां दुज्ने नाहीं; येकला मी आपणू. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! अरे ! मनसा अरे ! अरे ! अरे ! मनसा !
विषयसंभ्रमें काये करितासि वयसा ? ॥ छ ॥
मागिल गेलें तें कोठें ? पुढिलाचा सोसू !
दिगंबरेंविण सकल सांडिपां आयासु. ॥ २ ॥

(८४४)

निदान पावलें; जरा संचरली देहीं.
देह चि ज्ञाईल; मग, येर कवणें ठायीं ? ॥ १ ॥ धृ ॥
सावधानु होइं रे ? अरे ! सावधानु होयीं;
कां तुं निदसुरा ? मना ! सावधानु होइं रे ! ॥ छ ॥
वन्हि लागला घरा करिसी कां सोसु ? रे !
दिगंबरा स्मरें आतां; मांडला विनाशु रे ! ॥ २ ॥

(८४५)

चाली भिन्न.

धन, धनद, कनक, वनिता, दुःखद रे ! अरे श्रीदत्ता !
तुज्ञवीण मीं न भजें दुसरें; मायावी सर्वथा. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! प्राणा ! अरे प्राणा ! अरे ! प्राणा ! अरे ! प्राणा !
तुझा ठायीं गुंपली वासना. ॥ छ ॥
भयभयदभान भज्ञतां श्रमभ्रमु ज्ञाला चित्ता.
दिगंबरा ! भवतमहरणा ! निवारीं ते वेथा. ॥ २ ॥

(८४६)

जळ चंचळ झाले सरिता; वोसरेल ते मुहूर्ती.
क्षणक्षणां क्षिण क्षणभंगुर हें शरीर सर्वथा. ॥ १ ॥ धृ ॥
अरे मना ! अरे मना ! अरे मना ! अरे मना ! न करी कल्पना.॥ छ ॥
मन कामाकुळ न धरी स्थिरता; दमनीं परम वेथा;
दिगंबरा ! तव चरणस्मरणें नयें मीं मागुता. ॥ २ ॥

(८४७)

गुणचंद्रामृतधारा द्रवती अपरांपरा.
चरणीं मोक्षद चिन्ह विज्ञानसागरा ! ॥ १ ॥ धृ ॥
क्षणक्षणा, क्षणक्षणा, क्षणक्षणा, क्षणक्षणा,
क्षणक्षणा, क्षणक्षणा, पाहीन चरणा. ॥ छ ॥
चरणजजळसार मोक्षबीज निरंतर
दिगंबरा ! मागताहे; देयीं निरंतर. ॥ २ ॥

(८४८)

परिपूर्णसुखमाना ! अरे ! कमळनयना !
पाहिन श्रीमुख तुझें; पूरवीं कामनां. ॥ १ ॥ धृ ॥
प्राणु प्राणा, प्राणु प्राणा, प्राणु प्राणा, प्राणु प्राणा,
अवधूता ! परमनीधाना ! ॥ छ ॥
अनुसूयागर्भरत्ना ! योगीमनसरंजना !
दिगंबरा ! भेटि देयीं स्वरूपें सगुणा. ॥ २ ॥

(८४९)

अनुभवितां मुखशेष माया हरले तमस.
पुडती संसारु नाहीं शरीरें. ॥ १ ॥ धृ ॥
आन नेणें, आन नेणें, आन नेणें, आन नेणें,
आन नेणें, अवधूतेंवीण मी साधनें. ॥ छ ॥
मुखशेष मागें द्वारीं; दिगंबरा ! मीं भीकारी.
म्हणे कठीण बोलसी; क्षुधीतु मीं भारी. ॥ २ ॥

(८५०)

तुंडी.

आत्मया केवि जासील तुं मज सोडूनी दूरी?

ज्ञेथ तेथ चि मी धरीन; तुझी कळली चोरी. ॥ १ ॥ धृ ॥
येइं रे! भेटि देइं रे! देवा! देवा! म्हणें मोहिसी भावा.
भावा! तुझी न करी सेवा, सेवा. भेद नाशना! ॥ छ ॥
भान सत्येंवीण न स्फुरे; तरि तुं चि सकळ.
दिगंबरा! परब्रह्म तूं; येर हें मृगजळ! ॥ २ ॥

(८९१)

आपुला ना मज़ पारिखा, तूं मीं चि मीं ज़री.
त्रिपुटीचें रूप पारिखें, तें राहिलें दूरी. ॥ १ ॥ धृ ॥
मोहिसी मज़ कासया कामें? कामें गुण गुंपती कर्में;
कर्में भवसागरीं श्रमे; श्रमें तुझें रूप न गमे. ॥ छ ॥
हातिचें हरूंनि चिद्‌घन, काये लाविसी चाळां?
येकु वेळ दिगंबरा! तुज़ पाहिन डोळां!

(८९२)

कमळनयनु सावळा दत्तु पाहीन डोळां.
मन माझें उताविळ; तेणें हर्षु वो ध्येला. ॥ १ ॥ धृ ॥
सखिये! मज़ नेइं गे! माये! माये! वो! तुझे धरिन पाये.
पाये ते मज़ ज़ोडती काये? काये मीं करूं? मन न राहे. ॥ छ ॥
दिगंबरा प्रति ज़ाइन; मी वो! दासी होयीन.
दुर देशीं मज़ न सवे; माझें व्याकुळ मन. ॥ २ ॥

(८९३)

अरे! अरे! परमात्मया! तुझी कळली माया!
चातकु तूं गुणां अंतरीं आह्मां लाविसी क्रिया. ॥ १ ॥ धृ ॥
राहीं रे! देवा! उगला राहीं; राहीं. तूं निज़ आपुलां ठायीं;
ठायींचा तूं सकळ देहीं; देहिचा गुणु लाविसी कायी? ॥ छ ॥
अरे! अरे! दिगंबरा! तुझें कळलें आह्मां. अज्ञानें मोहिसी मायया.
येरा न चले तें मा. ऐसा लाघवी तुं मा.
आतां तें न लवी गा! मा. ॥ २ ॥

(८९४)

चाली भिन्न तुंडी.

गुणश्रवणें ज़ाली सिराणी; ऐसा संगु वडला ज़नीं.

सुखकर कांहीं न दिसे नयनीं. पुरे संसारु दत्तें वांचुनी. ॥ १ ॥ धृ॥
अवो ! मज्ज वीषाच्या मेघुळा; येणें दत्तवीण योगधर्म गेला. ॥ छ ॥
संसारु हा भुजंगु माये ! मज्ज लागला; वीष न साहे.
दिगंबरु कव्हणीं आणा उपायें; तेणेंवीण मज्ज राहिलें न ज्ञाये. ॥२॥

(८९५)

भवदुःख हें सागर; माये ! पडलियें; अंतु न पाहे.
दुःख बहूत केसेनि साहे ? पुरे, पुरे, देवा ! धरीन पाये. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! मज्ज पायाचें पायवणी देयीं; देवा ! मज्ज सोडवी येथूनी. ॥छ॥
कर्मवेगु हा लोटीतु आहे; येथें तारक दृष्टी न पाहें.
दिगंबरा ! तुझी अंतरली सोये; आणिकाची वास न पाहें. ॥ २ ॥

(८९६)

पूर्वकर्म कवण ? मीं नेणें. बोलता ही लाजीरवाणें !
मन माझें स्थीर नव्हे येणें ध्यानें;
त्यातें निग्रहितां त्रासू चि माने. ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! तुझें काये पां मीं चूकली ? अपराधें तेणें तुज्ज अंतरली. ॥ छ ॥
शब्दजातें बाधिती बाण; काये करूं शास्त्रश्रवण ?
स्थीर करिज्जे केवि चंचल मन ? दिगंबरा ! किती पाहसी निदान ? ॥२॥

(८९७)

शब्दवाद मीं नेघें श्रवणीं, रूपगूणू दोहीं नयनीं.
तुझा वेधु मज्ज अंतःकरणीं; येरा अर्थाची मी करीन सांडणी. ॥१॥धृ॥
अरे ! तव नामाची जपमाळामणी चाळीन ह्रदयीं वेळोवेळां.
दुजनाची साहीन वाणी. पुण्य पाप येथ न मनीं.
संकीर्तन तुझें घेइन कानीं. दिगंबरा ! नित्य नाचेन रंगणीं. ॥ २ ॥

(८९८)

चालतां पंथु वीसली रे ! बोलु बोलता माये !
देहगेहभान सकळ येणें ज्ञाहालें काये ?
मन माझें गुणीं वेच्चलें, तें मानसें खाये.
हें चि निमित्य वो ! आठवे; याचे पाहिले पाये. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! रे ! कमळनयना ! तुझी न कळे माया.

मज्ञ माझेपण नाडले; गुणी राहिली क्रिया. ॥ छ ॥
चंद्र, सूर्य दोन्ही लोपले; मज़ न कळे काहीं.
भूतपंचक हें सखिये ! नेणें; न पडे ठायीं.
योगवियोग हे कल्पना मन न धरी तें ही.
दिगंबरें येणें मोहिलें; आतां करणें कायी ? ॥ २ ॥

(८९९)

शब्दु न साहावे श्रवणीं मज़ नयनीं रूप.
बोलतां कुंठली वैखरी; नेणें पुण्य कीं पाप.
देखणा तो कवणु ? न कळे; अवघे चि चिद्रूप. ॥ १ ॥ धृ ॥
काये, नेणों, मज़ ज़ाहालें ? पालटली काया.
गुणाचें मुख मीं ने देखें; ऐसी कवण माया ? ॥ छ ॥
पुसतील मज़ बाइया, हें वो ! ज़ाहालें काये ?
सांगतां हां पडे वीसरू; खुण बोलतां न ये.
दिगंबराचे वो ! येकुदां होते देखिले पाये. ॥ २ ॥

(८६०)

लक्षितां लक्षणें गोमटीं तुझा चरणीं आरे !
काये, नेणों, मज़ ज़ाहालें ? संचरलें वारें !
पूर्णपणें वावो न दिसे; अवघी चि मीं स्फुरे. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! अरे ! गुणगोवळा ! तुझी न कळे कळा.
दाउनीयां जग मोहिसी; ऐसा सांडीं हा चाळा. ॥ छ ॥
भान तें सर्व अभावलें; कैसें ज़ाहालें ? माये !
मीपण नाडळे सर्वथा; आतां करणें काये ?
दिगंबराचे कवण आतां पाहिल पाये ? ॥ २ ॥

(८६१)

वियोगदुःखदावानळें मन पालटलें माये !
कयी कयी भेटि होइल ? वियोगु न साहे.
सावळें रूप आठवतां जळ नयनीं वाहे. ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! मज़ बाइये ! चंदन न साहे.
नव्हे तापु तेणें शमनू; देह ज़ळत आहे. ॥ छ ॥

चंद्र तो ही तपे तापिया खरतरु निदानीं.
प्रतिक्षणीं मज्ज आठवे, रूप बैसलें मनीं.
दिगंबरु कयी येईल? पाहीन नयनीं. ॥ २ ॥

(८६२)

भिन्न.

आनंदमयू अगुणगुणी ज्ञानयोगवासरमणी. ॥ १ ॥ धृ ॥
तो आजि पाहुणा साज़णी! अवधूतु बोलैल आंगणी. ॥ छ ॥
दिगंबरु आत्मा स्वसुखदानी आजि देखैन सुदीनीं. ॥ २ ॥

(८६३)

नये अभिव्यक्ती अवधूतु गुणी. शब्द राहिले नीर्वाणी. ॥ १ ॥ धृ ॥
तो भज्जों कैसा मी श्रवणीं? केवि पाहों स्वरूप नयनी? ॥ छ ॥
दिगंबरु ध्यानीं ध्यातां निर्वाणीं मन माझें वेच्चलें मीळणी. ॥ २ ॥

(८६४)

गुणाचे निधान अवधूतु माये! अनुभवें लक्षा न ये. ॥ १ ॥ धृ ॥
तो आजि सावळा सुंदरु देखइन विज्ञानसागरू. ॥ छ ॥
दिगंबरें येणें मनस वेधीलें; भेदु नेणें, ऐसें ज़ालें! ॥ २ ॥

(८६५)

जपध्यानमुद्रा न कळे वो! ध्यान.
येणें हरिलें माझें मन. ॥ १ ॥ धृ ॥
तेणेंसि राहिन येकली. अवधूतें भिन्नता मोडिली. ॥ छ ॥
दिगंबरु आत्मा स्ववृत्ती पोह. पाहणयां मुळीं वो! सखिये! ॥ २ ॥

(८६६)

ज़ाणिवेची स्फूर्ति हरिली वो! येणें अवधूतें निजगुणें. ॥ १ ॥ धृ ॥
तो मज़ नयनीं दाखवा; भिन्नपण मारूनी भेटवा. ॥ छ ॥
दिगंबरु माये! निजरूपदानीं तेणें मज्ज गोविलें सगुणी. ॥ २ ॥

(८६७)

तुंडी.

सजळ ही जळस्थळ हें निर्जळ चातका क्षितितळ वो!
जिवनेंविण बहु श्रमला; मनसें भ्रमतुसे अंत्राळी वो!

विण माधवें न करीं आशा; शोषिताहे तळमळ वो !
तयाची करुणा न धरे; धरितां वर्षे जळधरु जळ वो ! ॥ १ ॥ धृ ॥
तैसी परि मज्ञ हो कां ? ब्राइये ! आळविन अवधुता वो !
करुणावचनीं सादु घालीं; कयीं देखईन येता ? वो ! ॥ छ ॥
धेनु वनीं तृण चारू चरतां, बव्ह बाळक घरीं वो !
क्षुधित ज्ञाहालें; न कळे पंथु; विकळपणें शब्दु करी वो !
ज्ञाणोंनि अवसरु सुरभि धावे; वोळली अमृत धारीं वो !
दिगंबराचा पंथु पाहे मि वो ! बांधलियें संसारीं वो ! ॥ २ ॥

(८९८)

बाटुली पाहातां कुठली गति; मज्ञ येकलें न सवे वो !
मुळापासुनि नेणसी काये मा ? मातें तुझी च सवे वो !
सांडूंनि गेलिसि विजनीं स्तनपा; धेली तळमळ जिवें वो !
कवणीकडे वास पाहों ? तुझा पंथु नेणवे वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अम्मा, अहं मम सादु घाली; श्रमा श्रमु चि निदान वो !
येतियां ज्ञातियां पुसों नेणें; बाळ मीं अज्ञान वो ! ॥ छ ॥
नाना योनिचे लागती पालव; ऐसें कां मज्ञ केलें ? वो !
कामु तपिया तपे खरतरु; शरीर बाळोंनि गेलें वो !
वनचेंर बहू मानसें खेदिंति; भय बहु उपज्ञलें वो !
दिगंबरे ! तुवां जित चि सांडिलें; कवण कर्म फळलें ? वो ! ॥ २ ॥

(८९९)

जळे सुटलिया अरे ! मीना ! वायां तळमळितासि रे !
पूर्वकर्म भोगा आलें; बोलु हा कवणासी ? रे !
अवधुतें मज्ञ सांडिलें आहे; प्रेत्नु काये ययासि ? रे !
क्षितितळीं ज्ञळो निडळ हाणों; न धरे धीरु जिवासि रे ! ॥ १ ॥धृ॥
सिमिसिमीसिमि अममममा स्पंदती अधरोष्ट्र रें !
स्मरण करितां दिवा रात्रौ कोळ ज्ञालें शरीर रे ! ॥ छ ॥
तृण चारु काये चरसी ? हरिणा ! पावकें परिस्तृता रे !
अकाळीं मेघु कैंची सरिता ? वायां गेलासि वृथा रे !
दिगंबरें मज्ञ तैसें केलें; न साहे संसारवेधा रे !

वाट पाहें; परति न करी; काये करणें आतां ? रे ! ॥ २ ॥

(८७०)

माझा विषयो न पुरे स्मरणें, न पुरे ब्रह्मज्ञानें रे !
ध्यानयोगें कारण नाहीं; काये करूं साधनें ? रे !
मोक्षु तो ही न धरी मनस; तपसु थोरु न मने रे !
अवधुता ! तुझी भेटी दुर्लभ; असइन सन्निधानें रे ! ॥ १ ॥ धृ ॥
कृष्णवर्णा ! कमळनयना ! सांग येसील कयी ? रे !
निडळीं बाहे पथु पाहें; मातें घेउनि जाये रे ! ॥ छ ॥
स्वजनजनधनवनिताभ्रमु घालिसी काये ? रे !
बहुत काळ तें चि ज़ाहालें; आतां दाखवीं पाये रे !
हितविहित नेणें कांहीं; वियोगू न साहे रे !
दिगंबरा ! तुझें स्मरण करितां हृदय फूटत आहे रे ! ॥ २ ॥

(८७१)

वसंतु

श्रमला वीषयवृत्ती न पवे विरक्ती.
अर्थु सोषीं पूडती; दुःखा न दिसे मिति.
ऐसिया प्रतीती खेदु न धरी चित्तीं. ॥ १ ॥ धृ ॥
आपणा नेणोंनि भ्रमसी गव्हारा ! सांडी आत्मवीसरा. ॥ छ ॥
स्वजन ज़ाहाले कित्ती शरीराभिव्यक्ती ? पुढें हीं तेचि गती.
आपुलें कवण आथी ? पडसी कां भ्रांती ? दिगंबरीं पावें रती. ॥२॥

(८७२)

सकळ स्वहित माझें येणें योगिराजें.
ऐसें मनसा मानिज़े. आणिक न स्मरे दुजें.
अवृत्ती भज़े. प्रेमें नांवसी सहजें. ॥ १ ॥ धृ ॥
कामना करूनि भ्रमिजत आहे; सत्य वीचारूनि पाहे. ॥ छ ॥
आत्मा हृदयगतु, देहीं अवधूतू, द्वैतभावरहितू, केवळ गुणातीतु,
ज़ाण, पां ! सिद्धांतू दिगंबरु अनंतू. ॥ २ ॥

(८७३)

येकुदां येईन भेटी. बोल, कां वो ! गोष्टी ?

कर्मे ज्ञाहालीं हिंपुटी, प्रतिक्षणीं बैसें उठीं.
सुख नाहीं पोटीं. जीत चि पडली तूटी. ॥ १ ॥ धृ ॥
पंथू पाहीन, येसील कयी ? दुःख न धरवें ये ह्रदयीं. ॥ छ ॥
स्वरूप आठवे पोटीं. मन घालीं मीठी.
वियोगें वेदना उठी. कवण करील भेटी ?
माये ! उठाउठीं दिगंबरे आश बोखटी. ॥ २ ॥

(८७४)

पडलें मनस भ्रांती; न ये रूपव्यक्ती;
बुडाली भेदमती; आटली अहंकृति;
माझी संवित्ती. कैसी हे तुझी रीति ? ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञाणिजे कैसें ? रे ! कमळनयना ! गुणवंतु न येसि गुणा. ॥ छ ॥
देहादि न दिसे भान निरालंबस्थान.
मीतुंपणा प्रसन. सेवटीं कळली खुण.
कळलें नवीणः:—दिगंबरा तुं चिद्घन. ॥ २ ॥

(८७५)

कवण ज्ञाणे हे माया ! मोहितासि काह्या ?
आत्मा तुं दत्तात्रेया. पाहिजे तें दृश्य वायाँ.
गुणभेदक्रीया अवस्था अव्यया. ॥ १ ॥ धृ ॥
आपणा ज्ञाणोंनि लागला चि आहे.
येर भजन न साहे. ॥ छ ॥
अवस्थे अवस्था क्षीण. तदंग कें भान ?
तुरीयातीत, निर्गुण, स्वरूप सनातन,
आत्मचैतन्य दिगंबरा ! तूं कारण. ॥ २ ॥

(८७६)

चाली भिन्न.

तपसें तापसु अत्री प्रतप्तु ज्ञाहालारे !
संतापें तो वन्ही क्षोभह्ला रे !
मूर्धा भेदुंनि प्रकटती ज्वालमाला; तो चि गगनभीतु भरह्ला रे !
संहारकु ऐसा ज्ञाणोंनियां वेगें

गुणातीतु गुणीं मिसळल्हा रे ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! दत्त प्रकटल्हा चिदानंदशिवंकरू. जनदयामृतसारें पूर्ण हा.
प्रळयवन्हिकुळां प्रशमीत ज्वाळा
काळाग्निशमनु अवतरल्हा रे ! ॥ छ ॥
स्वजनसहितु मग तो क्रिडता ज्ञाहाला रे ! उदधिमाजि प्रवेशल्हा रे !
भक्तचित्त निश्चळ कैसें ? पाहे. सदृढांप्रति व्यक्त भासल्हा रे !
मायाकृत रूप दाउंनियां दृष्टी स्वजनु दिगंबरें तारिल्हा रे ! ॥ २ ॥

(८७७)

हृदयकमळीं व्यक्तु श्रीदत्तु देखिल्हा रे ! गुणकृत भेदु लोपल्हा रे !
शब्दातीतु चंचळचित्तग्रासी प्रळयोदधि जैसा भरल्हा रे !
आदि, मध्यु तया अवसान नाथी; मायाभ्रमु ज्ञेणें नीवटिल्हा रे ! ॥१॥धृ ॥
दत्तु प्रकटल्हा रे ! सत्यानंतु, सुखात्मकु, अनुमानेंविण ज्ञानें वेधु हा.
निर्वाण योगधीर बुझती समग्र; येर नेणती खर नर पामरा ! ॥ छ ॥
प्रकटु अन्वयें गुणी सगटु शोभल्हा रे ! पृथग सन्मय भानें स्फुरल्हा रे !
सर्वातीतु, सर्वसहितु, चिदात्मा, भेदस्पंदु तेणें हरल्हा रे !
नित्यमुक्त युक्त जग दीसे; दृष्टी दिगंबरू अवघेंचि ज्ञाहाल्हा रे ! ॥२॥

(८७८)

मल्हार.

सुंदरु आणि सावळा भाळीं टीळकु पीवळा;
पांघुरला सोनेसळा; कंठीं माळा सुमनाची. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा कैं येसी ? सांग, पां ! कमळनयना ! बापा ! ॥ छ ॥
किरीटकुंडलांची झळाळ, लोपे दिनकराचें मंडळ.
बोलतां शब्द मृद मंजुळ दंशनी कीळ फांकती. ॥ २ ॥
स्वभक्तजनीं प्रपुजीला; पुडती तेहीं चि परिवारला
परब्रह्म गुणपुतळा; अतिकृपाळा ! दिगंबरा! ॥ ३ ॥

(८७९)

वरदहस्ता ! वरदमूर्ति ! मंत्रवीर्या ! पुण्यकीर्ती
नमन तुतें पुडतो पुडतीं; वरि वीनती करीतुसें. ॥ १ ॥ धृ ॥
कैं येसी ? कैं येसी ? सिणलों गर्भवासीं दत्ता ! ॥ छ ॥

स्वभक्तजनचिंतामणी ! देवेशा ! देवशिरोमणी !
दिगंबरा ! अमृतवाणी मज्ज निर्वाणी बोलपां ! ।। २ ।।

(८८०)

पितांबरु रूळे मागां; न संवरीतु आंगें आंगा.
गणसमुदाओ सोडूंनी अवघा पुढें चि वेगां धांवतुं. ।। १ ।। धृ ।।
ऐसा कै मी पाहिन येतां मज्ज लागून ?
हृदयीं आळंगीन ? प्राणु. वोवाळीन ? माझें योगधन, श्रीदत्तु निधान,
पाया लागइन, येतां मज्ज लागून. ।। छ ।।
नाभिवचनीं गर्जतु उच्चलूंनि दक्षिण हस्तु.
ह्मणे, मीं आलों रे ! समर्थु श्रीअवधूतु दिगंबरु. ।। २ ।।

(८८१)

माता करी उदासीन; तरी बाळ जीतें कैसेन ?
तैसें मज्ज देवा ! सत्य, ज्ञाण तुझी आण सर्वथा. ।। १ ।। धृ ।।
हृदय कैं बा ! ज्ञाणसी ? सांगों कवणापाशीं माझें ? ।। छ ।।
रुदनवंता संबोखणें उचीत जनीं तें चि कारणें.
तैसीं कांहीं बोल पां वचने, निवइन ज्ञेणें दिगंबरा ! ।। २ ।।

(८८२)

मातें सांडूंनिया वनीं माझी ज्ञातसे जननी;
आळवीताहें करुणावचनीं; अशूभ नयनी जळ च्चाले. ।। १ ।। धृ ।।
तुझें बाळक बोबडें पाहें मागें पुढें;
तोंड करी वांकुडें; तुज्ञविण ज़ाले वेडें.
हळु हळु च्चाले पुढें कर्म हें केवढें ?
मुळिचें आणि फेंगडें ज़ावें कवणीकडे ? ।। छ ।।
शब्द पडतां चि श्रवणी कैसी परतली हांसोनीं ?
दिगंबरा ! घे उच्चलूंनि; वदन वदनीं मेळवी. ।। २ ।।

(८८३)

वियोगदुःखाचे बाण मज़वरि करितासि संधान.
अवधूता ! सत्य ज्ञाण, माझे प्राण ज़ातील. ।। १ ।। धृ ।।
आतां काये वो ! आड करणें ? विसरु नये मनें. तुझीं आठवती भूषणें

बाहीं, बाहिवटे कंकणें, करीटकुंडळ जटीत लेणें.
कैसीं अमृतवचनें ! विसरु न पडे देवा ! मनें. ॥ छ ॥
आपणासीं समानता कां करितासि ? अवधूता !
तुझसीं आह्मां पृथक् सत्ता नाहीं सर्वथा दिगंबरा ! ॥ २ ॥

(८८४)

वियोगदुःखमहार्णवीं देवा ! पडलों अधवीं.
गति कुंठली; प्राणा नुरवी; स्मरण जीवीं करीतुसें. ॥ १ ॥ ध्रु ॥
आतां पाव गा ! अवधूता ! तुं माता, तुं पीता,
आदिगुरू संत्राता, श्रीदत्ता ! श्रीदत्ता !
मायागुणवीमुक्ता ! अपार ज्ञाली वेथा.
कामादि जळचरें प्रखरें क्रोधाविषगुणविखारें
दिगंबरा ! मी संसारें येणें मगरें भेदिला. ॥ २ ॥

(८८५)

समर्थाची अंतीरी अरूप ज्ञाली जऱ्हीं,
तऱ्हीं परावा दृष्टी करी, तरि संसारीं का जीणें ? ॥ १ ॥ ध्रु ॥
तैसें तुज्ञ ज्ञालें दातारा ! मुललों मी संसारा;
लागलों व्यभिचारा, सांडुनि तुज्ञ भर्तारा. कां न धरिसी विचारा ? ॥ छ ॥
समर्थपणाचें चिन्ह हें चि येक सुलक्षणः:—
आपुलें तें सांभाळावें दिगंबरा ! सत्य, ज्ञाण. ॥ २ ॥

(८८६)

सर्वाभास ! निराभासा ! सर्वत्र सर्वदा उदासा !
सर्वसाक्षी ! संपूर्णपुरुषा ! रे ! आणिकाची न करी आशा रे !
अंतकाळीं पाव महेशा रे ! बापा ! ॥ १ ॥ ध्रु ॥
न मगें मी आणिक कांहीं; स्वस्थानाप्रति मज्ञ नेयीं रे ! बापा ! ॥ छ ॥
संपूर्णानंदसागरा ! स्वस्वरूपदानी उदारा !
श्रीलीलाविश्वंभरा ! रे ! तुज्ञविण दिगंबरा !
अर्थु न मगें मी दूसरा रे ! बापा ! ॥ २ ॥

(८८७)

अनंतगुणनिधाना ! गुणगोतया ! सनातना ! रे !

योगिराया ! आनंदघना ! रे !
गुणवर्जिता ! निर्गुणा ! पूर्णपुरुषा ! पुरातना ! रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तुजवीण नेणें. मन रंगलें तुझेनि स्मरणे रेया ! ॥ छ ॥
करुणापीयूषजळधरा ! पूर्णविज्ञानसागरा !
अवधूत ! विश्वंभरा ! रे ! आत्मया ! दिगंबरा !
तुं परब्रह्म अवतारा रेया ! ॥ २ ॥

(८८८)

कल्याणगुणभाजना ! अनंतलक्षणसंर्णा !
कृष्णश्यामां ! कमळनयना ! रे ! देवदेवा ! दीनोद्धरणा !
आत्रिया ! गुणनीधाना ! रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तूं चिद्घन परब्रह्म शिव संपूर्ण रेया ! ॥ छ ॥
स्वमायया नित्य, गुप्त, मायायुक्त, विमुक्त.
दिगंबरा ! श्रीअवधूता ! रे ! तुजवांचूंनि नाहीं त्राता.
कइ पावसी करुणावंता ? रेया ! ॥ २ ॥

(८८९)

ज्ञानविज्ञानदिनमणी ! स्वभक्तजनचिंतामणी !
कइ देखैन तुते नयनीं ? रे ! चिंतिताहे ध्यानींमनीं रे !
आत्मा तूं मीं चि ह्मणौनि रेया ! ॥ १ ॥
ह्मणें अंतर धरीसी; अवधूता ! मीं परदेशी रे ! बापा ! ॥ छ ॥
तुजसी स्वतंत्रपण, समान गुणदर्शन,
आत्मत्वें तें मज मरण, रे ! दिगंबरा !
सत्य जाण. आह्मी समर्पिलें मीपण रेया ! ॥ २ ॥

(८९०)

सत्यात्मतत्व तुं तत्वता. नव्हे देवा ! हें अन्यथा.
तरि सत्येंसीं भेदें भजतां रे !
आंगा आली असंतता. मग आह्मीं कवण अवधूता ? रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
भजनें भेदु निमाला; ऐसा नवलाउ येथें घडला रेया ! ॥ छ ॥
तुं सत्यतत्व सनातन; सत्यात्मत्वें करितां भजन,
सत्य सत्येंसीं सहज अभिन्न रे !

दिगंबरा ! ऐसें ज्ञाणः:--भक्तु नेणे भजनाची खूण रेया ! ॥ २ ॥

(८९१)

असता आंगीं मिथ्यात्व संता संता कें भिन्नत्व ?
आतां भक्तासि के पृथक्त्व ? रे !
ऐसें केवळ अद्वयत्व न ये भजतां परम शिवत्व रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
कैसें दासत्व करणें ? रे ! भेदु न दिसे तुझेनि गुणें रे ! देवा ! ॥छ॥
सर्वात्मयां ! सत्यरूपा ! द्वैतात्मशून्यस्वरूपा ! दिगंबरा ! निर्विकल्पा ! रे !
भक्तु साहेना निर्लेपा; यालागि उघडा चि पाहा पां रेया ! ॥ २ ॥

(८९२)

स्वजातीय, विजातीय, स्वगत, भेदत्रिगताद्वय, अखंडित्त,
भान तेणेंसी पृथग संतरे. अवघें चि शिव सदोदीत,
तेथ कवण देव आणि भक्त ? रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
जना ! सत्य विचारीं. व्यवहारु वृथा न करीं रेया ! ॥ छ ॥
अवस्था गुणीं आछादलें निर्मळ स्वरूप आपुलें
पाहें सद्गुरूचेनि बोलें रे !
मग सत्य तें सहज़ चि कळे; दिगंबरतत्वें निवळे रेया ! ॥ २ ॥

(८९३)

भ्रमूं चि उपजलीयां पाठी मग काये काये न पडे दृष्टी ?
तेवि प्रपंचु अवस्थे पोटीं रे !
वा ! उगा चि होतासि कष्टी ! बंधमोक्ष हे माईक गोष्टी रेया ! ॥१॥ धृ॥
जना स्वस्थिती राहीं गुण सांडूनि निज़े नीज पाहीं रेया ! ॥ छ ॥
दृश्याचेनि परिज्ञानें ज़ाणोनि द्रष्टत्व ही सांडणें;
सिद्ध स्वरूप तें अनुभवणें रे !
विण दिगंबरवचनें ज़वळी चि परि जन नेणें रेया ! ॥ २ ॥

(८९४)

बाळपणीं मीं अज्ञानु अवगुणु मानी गुणू.
वयें तितुला चि ज़ालों क्षीणु. तया पाठीं ज़ालों तरुणू. ॥ १ ॥ धृ ॥
देवा संसारु कें सुखाचा ? ज़या नाहीं तो दैवांचा. ॥ छ ॥
धनस्वजनयौवनजाया गेलें तारुण्य येही वांया.

आधिव्याधिममतामाया तइ न चले चि साधनाक्रिया. ॥ २ ॥
पापसंग्रहो करितां ऐसा अतिक्रमली तारुण्यवयसा.
पुढें वार्धक्य आलें काळसा; नाहीं देहाच्चा भरवसा रेया ! ॥ ३ ॥
क्षीणपणें गेली ज्ञरा; अवधारीं दिगंबरा.
नरदेहाच्चा मातेरा ज्ञाला जी ! विश्वंभरा ! ॥ ४ ॥

(८९५)

अन्नमयत्वें नश्वर, मळमूत्राचें भांडार,
पापजनक, अपवित्र, पापरूपाचें मंदीर, ॥ १ ॥ धृ ॥
रे ! याच्चा अभिमानु धरिसी काह्या ? हें सहज्ज चि ज्ञायील वांया रे ! ॥छ॥
आदरें संरक्षण कित्ती ? अवसानीं होईल माती !
कीट अथवा श्वानें खाती ! भाग्य असैल तरि विभूति रे ! ॥ २ ॥
देवां पितरां येणें वैर, आणि लौकिकीं मरमर.
देह मोटें अनर्थकर, कामक्रोधाचें भांडार. ॥ ३ ॥
माझें ह्मणतां शंका नाहीं; मी ह्मणतासि तेथें कायी ?
दिगंबरु हृदयीं ध्यायीं; देह सोडूंनि वेगळा होयीं. ॥ ४ ॥

(८९६)

देह धरूंनि काइसें ध्यान, देह धरूंनि ? ब्रह्मज्ञान,
योग, सेवा, अनुष्ठान, निरसनें याच्चेनि, ज्ञाण. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें देह अपवित्र; अवगूण येथ अपार. ॥ छ ॥
कामु ज्ञाला याच्चेनि अंगें; क्रोधु तो ही तया चि मार्गें;
मद, मत्सर, दंभ अवघे स्थूळ शरीच्चेनि संगें. ॥ २ ॥
वीण पापें न संभवे; वीण पापें न रक्षवे ;
रक्षिलें हें पापा प्रसवे; देह नाशैल; तें न नशवे. ॥ ३ ॥
देहवंतां काइसें पर ? ज्ञाणिवेचें डंब अपार !
काय करील पां ! सत्छास्त्र दिगंबरें वीण समग्र ? ॥ ४ ॥

(८९७)

प्रपंचाकारनिराकारा ! प्रपंचगुणसाकारा
आत्मयां ! निर्विकारा ! अवधूता ! विश्वंभरा ! ॥ १ ॥ धृ ॥
तूं जीवन जीवाचें, गुप्त धन त्यागशिलांचें, ॥ छ ॥

योगपंथिची सिदोरी, नाम सर्वस्व सामग्री.
दिगंबरा ! अवधारीं, यत्नें राखों कवणे परी ? ॥ २ ॥

(८९८)

कर्मवासनया बांधला; कामक्रोधा अधीनु झाला;
दाही ठार्यी विभागिला; ऐसा अपराधु काये म्यां केला ? ॥ १ ॥ धृ॥
आतां करिसील तें तूं बरवें. तुतें कवणें जी ! नीरवावें ? ॥ छ ॥
अविद्या कवणें केली ? आह्मां माया का लाविली ?
आह्मी कैसे होतों मुळीं ? दिगंबरा ! हे गति झाली ? ॥ २ ॥

(८९९)

कर्में माझेन मी गुंतला; काम कल्पनया पीटला;
संसारीं आला गेला; बहु काळ भिन्न पडीला. ॥ १ ॥ धृ ॥
बापा वीसरु पडिला काये ? साच्च लटिकें येऊंनि पाहे. ॥ छ ॥
गुण माझे ते मज्ज वैरी; साहावे कवणे परी ?
दिगंबरा ! ये संसारीं नाहीं संतोषु परोपरी. ॥ २ ॥

(९००)

वय चंचळ वाहे सरिता, क्षणा येका पडेन रीता.
आंगी वाजैल मरणावस्था, तरि काये करूं ? अवधूता ! ॥ १ ॥धृ॥
आतां झडकरी भेटी यावें; पुढें न दिसे कांहीं बरवें. ॥ छ ॥
दोषत्रय नित्य वैरी; ममतेच्चा आघातु भारी;
तर्यी मतीसि होईल हारी; दिगंबरा न वच्चें दूरी. ॥ २ ॥

(९०१)

विष ही घेतां परि मातें भय नाहीं तुझेनि हातें.
देवा ! अमृत ही परहस्तें तें अनर्थ करील येथें. ॥ १ ॥ धृ ॥
तरि तूं पासूनी न वच्चे परुता देवराया ! श्रीअवधूता ! ॥ छ ॥
अवगामितां पुडतो पुडती मज्ज नाहीं दुसरी गती.
दिगंबरा ! मंत्रमूर्ती ! अतिशीघ्र करीं परति. ॥ २ ॥

(९०२)

दिसे तें नव्हे साच्चार, भान अवस्था गुणगोच्चर
स्वप्न प्रत्यक्ष साकार पाहतां जैसें; तैसें सकळ मायिक; वायां करितासि

दुःख; बंधमोक्ष लटिक; तें कां स्मरतासि ? ॥ १ ॥ धृ ॥
जना ! होईं रे ! सावधानु. आत्मा तुं उपाधिविहीनू.
गुण मतीचे देखणें सर्व विसरलेपणें.
शुद्धस्वरूपवेदनें तुं चि परिपूर्णू. ॥ छ ॥
नेणसी तवं हा संसारु. ज़ाणतां तूं चि निराकारु.
पृथगसंतु हा साकारु प्रपंचमृगजळें.
येथें काइसें तरणें ? योगसेवया श्रमणें ?
दिगंबर उमज़णें अज, निज, निश्चळ. ॥ २ ॥

(९०३)

तक्र निसार, सत्य ज़ाण; कां करितासि अतिमथन ?
दृश्य विवर्त्तु, प्रपंचभान दिसे मृगजळापरी.
येथें देवो तो कवणु द्रष्टेनसीं विलक्षणु ?
चित्र पाहोंनि रावणु कां रे ! सत्य मानिसी ? ॥ १ ॥ धृ ॥
शिउ थोर कीं विष्णू ? शक्ति कीं कमळासनु ?
मूढमतीच्या वितर्कु; जनु न मनी तात्विकु.
सत्यद्रष्टा आणिकु नाहीं दुसरा तया. ॥ छ ॥
नान्योस्ति द्रष्टा, हें वचन; तत्केन किं पश्येतु, ह्मणौन
वाक्य वैदीक, ज़ाण, प्रमाण येथें.
दिगंबराचें बोलणें आलें अनुभव खुणे.
आतां बळ तें केसणें मूढमतीचें तेथें ? ॥ २ ॥

(९०४)

तत्वमस्यादि वाक्यविचारें पदार्थशोधन पुरस्कारें
तत्व उपपादिती चतुरें मनुजें बापा !
तर्‍ही परंतु सद्गुरू याचा नेणवे चि पारु.
योगी ज़ाणोंनि निर्धारु अनुसरती तया. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! सद्गुरुराया ! परब्रह्म तूं अव्यया !
तुझें चरणस्मरण तें चि तत्ववेदन;
ऐसी कळलीसे खूण मज़ हृदयीं रेया ! ॥ छ ॥
अवस्थेविण अवस्थान, देखणें दृष्टीवांचूंन,

ज्ञेथें वितूळलें भान, तुटी प्रपंचु कहीं.
आत्मा ब्रह्मदर्शन आंगीं प्रकटवी खुण.
दिगंबराचें वचन ऐसें दुसरें नाहीं. ॥ २ ॥

(९०५)

दृश्य स्वप्न तें देखणा चि, साकारता निराकाराची,
स्वप्न दृष्टी येथीची प्रतीति अना.-
शरीरेंसीं विलक्षणता रोकडी प्रतीति नसतां
बहुसाल ज्ञानवार्ता सांगे गुरू.
तैसें करितां श्रवण नव्हे भवछेदन;
व्यर्थ भजती अज्ञान; तैसा नव्हे सद्गुरू. ॥ १ ॥ धृ ॥
आधीं सिद्ध प्रतीति पाहे, देहव्यतिरेकें देखणें आहे;
द्रष्टा दृश्य ज्ञेथें दर्शन न दिसे; मा तें चि होउनिया राहे रे ! ॥ छ ॥
योक्तयाचें नाहीं ज्ञान, ज्ञो विज्ञाना जन्मस्थान,
करी मुद्राबंधन, लक्ष पाहे डोळां.
तें बा ! अवघे कुमत; नव्हे वेदविहित;
दिगंबरीं अनुचित; ते वेगळी कळा. ॥ २ ॥

(९०६)

देहेंसीं विलक्षणपण, तरि कां योगाचें सेवन ?
बाहीं बांधोनि पाषाण, कां रे ! तरतासि ?
आधीं आपणा ज्ञाणयीं. तेथें अयोगू चि नाहीं.
यागु ह्मणिजे तो कायी भेदत्रिगतासि ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां काये धरितासि वायो ? तद्द्रष्टा तूं अव्ययो.
सहज्ञमुक्तु तें बंधन असतां, पाहातासि मोक्षाश्रयो रे ! ॥ छ ॥
जें देह, ज्ञे ज्ञे अवस्था तेथ दृष्टत्वें चि विलक्षणता.
सिद्ध सहज्ञ जाणतां आयासु नाथी.
ऐसी न कळत खुण, वाया भ्रमतासि वन.
दिगंबराचे चरण दृढ धरीं चित्तीं. ॥ २ ॥

(९०७)

ज्ञाणिवेचेनि आगळेपणें सैर बोलतासि वचनें.

तरि ज़ाणू तो ज़ाणवेपणें जाणवेना.
ज़ेथें परा कुंठली; अहंमति वितूळली;
स्थिति सहज़ उरली; तेथें ज़ाणणें कैसें? ॥ १ ॥ धृ ॥
सांग रे! सज्ञाना! ज़ेथें न धरवे मनत्व मना;
तेथें खुणेचें ज़ाणणें, वृत्ति मारूनि असणें,
ज़ैसें गगन गगनें दूरि धरवेना. ॥ छ ॥
आतां दृश्यदर्शननिरासें आणि स्वरूप ज़वं प्रकाशे,
तवं माजिचें देखणें कैसें? सांग, बापा!

(९०८)

चालतां चंचळ चरण चळती निश्चळ मन
मनंनी मानसगुण सांडूनिया.
श्रेयश्रावकश्रवण मति न कळे ते खुण;
रूपी मिसळलें वेदन; मनं न धरी क्रिया.
व्यक्ती करितां भजन; टकमाकिती लोचन;
द्रष्टा गिळुंनी दर्शन तो वसवी आश्रया.
तेथें वाचा राहिली; गुणकरणें सूटली;
भेदवासना तूटली; ठेली स्थिति अव्यया. ॥ १ ॥ धृ ॥
आतां काये करणें? कैसें कारणें?
ज़ाणती विषयो मनें ज़ाणवे चि ना.
अवधूतें वो! बोधन माझें हरिलें सगुण.
रूप आपूलें करूंन आतां वागवी तया. ॥ छ ॥
आंगीं स्पर्शु आडले; तो ही न कळे, न कळे.
कळे कळणें विगळें मूळें सूटलें माये!
अहंममता राहिली; भावा अभावो कवळी;
तया बैसलासे मूळीं; आतां करणें काये?
मति ज़ाहाली निर्मुळ; नाहीं, नाहीं आश्रयबळ;
चित्त गळित व्याकुळ माझें प्रशमेताहे.
दिगंबरें विमोहिलें रूप दाउंनि आपलें;
माझें मज़ मी न कळे; ऐसें घडलें सये! ॥ २ ॥

(९०९)

रूप दाऊंनि सगुण करी गुणग्रहरण;
हे चि ज्ञाणीतली खुण गुणरहिताची.
दृष्टी पाहातां लक्षणें भेदत्रयेंसी नूरणें;
चिन्हें ज्ञाणवती खुणे भेदविगताची.
क्रीया क्रियेंतें नूरवी; वृत्ति स्वरूपीं जीरवी;
क्रिया घडते बरवी कर्मगलिताची.
रूप आठवे सावळें; देहत्रय तेणें गळें;
नीज रूप निवळे; तरि तें हीं तें ची. ॥ १ ॥धृ ॥
परब्रह्म गुणवंत ज्ञालें; तें चि तद्गुणीं उमज्ञा आलें;
कृष्णश्यामरूप राजीवलोचन देखोनि हृदय निवालें वो! ॥ छ ॥
रूपीं ठेवितां चेतन तेथें नुरे भिन्नपण;
उपादान तें ह्मणौन, ऐसी खुण आली.
ज्ञानें गमितां अज्ञेय; ज्ञाना नुरउंनि ज्ञेय:
स्वसंवेद्य सनाथ प्रतिति ज्ञाली.
योगी ह्मणती निर्गुण; आह्मीं भज्ञों तें सगुण;
दत्तु ब्रह्म चिद्घन वासने मूळीं.
निध्रे भज्ञती अभेदु; भेद छेदे तो भेदु;
आह्मां ज्ञाणवे अभेदु दिगंबरस्थळीं. ॥ २ ॥

(९१०)

सुनेत्रकमळ विशाळ, कंठीं सुमनाची माळ.
स्वरूप सुंदर शामळ कैसें बरवें !
किरीटु शिरसस्थानीं, कुंडलमणि श्रवणीं,
ज्ञटितें तेणें करूनि दिनमणि शोभे. ॥ १ ॥ धृ ॥
माये अवधूतयोगें सुरगण शोभती; संगें निजगण
पुढें मागें बरवताती. ॥ छ ॥
सुवर्ण वर्णें वस्त्रें देवांगें पवित्रें मंत्रवीजाक्षरें मिरवताति.
चंदनें डवरिला. भक्तीं आराधिला. दिगंबरू देखिला सहज स्थिती.॥२॥

(९११)

सुरतरुचिंतामणीयीं ज्ञालीं ठेगणीं. दत्ता! तुझां स्मरणीं अगणित महिमा.

नरसुरमानवगण, ज़े करिती स्मरण, तयां भवबंधन स्वप्नीं कें ! गा !
योगी लांचावले, ज़े तत्वीं गुंतले, नुपडाति काहीं केलें, न पवाति श्रम.
अवधूता ! मीं, ज़ाण, न मगें काहीं आन;
वेधलें माझें मन तुझया नामा बा ! ॥ १ ॥ धृ ॥
तुझें नामस्मरण तें मज़ संज़ीवन; निश्चळ करीन मन तये ठायीं बा ! ॥छ॥
मानस ठेऊंनि स्मरणीं, विसरु करितां गुणी,
स्मरणास्मरणस्मरणीं पारुषलें बा !
वरि पडलें निर्वाण; नुरे चि कर्तेपण; आज्ञानेंसीं ज्ञान गुण च रमेलें.
मीपण होतां क्षर; तेथें तूं चि सार; तैं तें मन येकत्र मिळोनि गेलें.
दिगंबरा ! ज़ाण, ऐसें तुझें स्मरण. ब्रह्म सनातन स्थीती आलें बा ! ॥२॥

(९१२)

आनंदाचें स्थान हृदय नंदनवन; तेथें तूं येऊंनि क्रीडा करिपां !
प्रेम अमृतपान मज़ परुतें जीवन; निजसुखसंवेदन तूं हीं घेपां !
विहितें क्रियाफळें मग मागिती रसाळें; सांडुंनि तीं वनफळें ज़ासी कां ! पां !
योगद्रुमातलि विश्रांतीसाउली पूजिन
मानसकमळीं अरूपरूपा ! ॥ १ ॥ धृ ॥
तुझेनि संगें मुनिजन रंगति रंगें;
सद्भावप्रसंगें निश्चळ होती बा ! ॥ छ ॥
कामक्रोध जन कुश्चित करिती, ज़ाण, तुझें क्रीडावन परमपुरुषा.
श्रवणावरि येकांतु, ऐसा तो वसंतु, कैसीं सुमनें ; रुतु बरवा कैसा !
ऐसा ज़ाईल पुढती; वनवैरी भ्रंशिती;
भुमि का चाळुनि नेती अवघी वयसा.
दिगंबरा ज़ाणें. काये कित्ती सांगणें ?
उचित तैसें करणें, जें प्रिय मनसा. ॥ २ ॥

(९१३)

सद्गुरुमूर्तिध्यान मोक्षाचें साधन योगामृतसेवन चरणस्मरणें.
पाहातां न दिसे आन तेणेंसी समान,
ब्रह्मात्मविज्ञान प्रतीति ज़ेणें बा ! ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्तु निर्वाण योगामृतसेवन.

वरि न पडे संसरण त्याचेंनि स्मरणें बा ! ॥ छ ॥
नेणोंनि अज्ञान भजती पाषाण, मृत्तिका, जीवन; तें मज्ञ न मने.
काइसे योगज्ञ, योगांगसाधन सांडूंनि श्रीगुरुसेवन आणीक करणें ! ॥२॥
गुरुप्रेम सुखकर ब्रह्मैक्यसाकार भजती सुरगणनर मोक्षहेतु.
सद्गुरुवचनामृत ब्रह्मानंदाकृत निरसी द्वैताद्वैत, दावी वस्तु. ॥ ३ ॥
नानासाधनफळ गुरुवाक्य चि केवळ; तणेंवीण बरळते चुकती पंथु.
ऐसा दिगंबरु वोळगतां सद्गुरु. वरि न पडे संसारु गुणवीवर्तु बा ! ॥४॥

(९१४)

नलनीदलगतजळ चंचळ, चल, चपळ; चळतां तें केवळ विलंबु नाथी.
सरितेचा पुरु सरे, वय तैसें वोसरे;
मग मरणीं संचरे शरीरव्यक्ती. ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्तु चिद्घन हृदयीं करिं जतन;
ब्रह्म सनातन स्वयें चि होसी बा ! ॥ छ ॥
जन, धन, यौवन, जाया क्षणीक क्षीण आत्मयां !
गुणगण चिदव्यया ! कैंचे पुडती ?
वणवण करिसी काह्या ? मर मनसा अद्वया,
सांडूनि दत्तात्रेया पुडतोपुडती ? ॥ २ ॥
झरझर झरती धारा वोलल्या जलधरा,
परि गुणु तो अंबरा न लगे जैसा; गगनीं चंचळपणें चळतां हीं निजगुणें
पर्वतु जेणें पवनें डोले जैसा; ॥ ३ ॥
गुणकरणव्यापारें हर्षामर्षभरें न चळे गुणव्यापारें आत्मा जैसा;
जाणोनि राहीं स्थिति न लगतां गुणवृत्ती. दिगंबरसंप्राप्ति ते हे मनसा.॥४॥

(९१५)

भिन्न चाली

देवा ! दुरितहरचरणा ! भ्रम मद भव हरणा !
आत्मयां ! गुणनिधाना ! तुझा वेधू या मना.
हृदयपुररमणा ! भेटी देयीं सगूणा ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! श्रीयोगिराया ! अमितगुणवीर्या !
हे गुरो ! बा ! रे ! श्रीगुरो ! दत्तात्रया ! ॥ छ ॥

परमात्मयां ! रामा ! परिपूर्णकामा ! सच्चिदानंदधामा ! हरी संसारश्रमा,
सुरगुरो ! रामा ! दिगंबरा ! अनामा ! बापा ! श्रीदीगंबरा ! अनामा ! ॥२॥

(९१६)

बा ! रे ! विज्ञानसारा ! परिपूर्णपारा !
पारमुक्ता ! अपारा ! देवा ! योगांगधीरा !
पूर्णअवतारा ! श्रीदत्तमूर्ती ! उदारा ! ॥ १ ॥ धृ ॥
मज भेटसी कयी ? वचन बोलवी. बहुकाळ भेटि नाहीं. ॥ छ ॥
अरे ! श्रीसिद्धराजा ! मंत्रार्थबीजा !
ब्रह्मचित्सारसहजा ! मनीं विश्वासु तूझा.
प्राणु तूं माझा दीगंबरात्मतेजा ! ॥ २ ॥
बापा ! श्रीदीगंबरात्मतेजा !

(९१७)

देवा ! विषयसुखसरिता पडलीयें दत्ता !
होतिसे थोर वेथा; तूं स्वजनसुखदाता.
श्रीअवधूता ! तुजवीण कवण त्राता ? ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! कमळनयना ! कै करिसी करुणा ? करितसें नित्य स्मरणा. ॥छ॥
अहर्षहर्षलहरी पीटलियें भारी. चंचलां गुणविकारीं तीर बहुसाल दूरी.
ये भवपूरीं दीगंबरा ! सावरीं. ॥ २ ॥

(९१८)

येणें संसारसर्पे विलयविक्षेपें दंशिलें.
कैसें दंशिलें पापरूपें ? भ्रमु लागला जल्पें.
अमितगुणकल्पे उरि नाहीं स्वरूपें. ॥ १ ॥ धृ ॥
कयी पावसी ? गरुडनाथा ! कृपामंदिरा ! अवधूता ! ॥ छ ॥ धृ ॥२॥
कयी पावसी ? गरुडनाथा ! कृपामंदिरा ! दत्ता !
आरत पुरवीं जिवींचें; भेटि दे अवधूता ! ॥ छ ॥
येणें अवृत्तिपापें, तमसगुणकल्पें,
भेटला हा स्वरूपें. देवा ! त्रिगुणकृतलोपें,
चळलिये कंपें, दीगंबरा प्रकोपें. ॥ २ ॥

(९१९)

चाली भिन्न.

ज्ञानविवर्जित बोले; अंगचारें मायीकु डोले.
बकु जैसा निश्चळु न चळे; तैसा लावीना उघडी डोळे.
विषयो जे चित्ता न मिळे, कामवेगे हृदय डहुळे;
क्रोधगुणें उचंबळे. ऐसा माइकु कैसा न कळे ? ॥ १ ॥ ध्रु ॥
विश्वासु कैसा मीं धरूं ? तें श्रवण कैसें सांग करूं ?
न ये भानु तो सद्गुरू. मंदमतीच्या व्यवहारू. ॥ छ ॥
परअर्थी घाली दृष्टी. कामना दृढतर पोटीं.
करी क्रिया ते ते खोटी, मनोवासना जरि वोखटी.
तेणेंसीं न हो भेटी, सर्वस्वा होईल तूटी.
न करी दिगंबरा ! कष्टी; आतां झडकरी यावें भेटी. ॥ २ ॥

(९२०)

कामवासनेचें बळ, माझें मन चंचळ. पूर्वकर्म केवळ मीं वो ! भोगिताहें.
गुणीं करणें गुंपलीं; अर्थपरें वखिूरलीं.
भ्रमु मतीतें झाकळी; यत्नु करितां न ये.
काम क्रोध हे प्रबळ; मद मत्सर वोखळ;
वृत्तिवेग पाल्हाळ; तें हीं गुंपलियें.
वैरीसंगु वो ! वोखटा मातें घडलासे कटा.
पंथु सांडूनि आणिके वाटा भरलियें. ॥ १ ॥ ध्रु ॥
आतां काये करणें ? गे ! माय ! माते उपदेशु आंगीं न साहे.
बोलु ठेविजे कवणा वैर साधितां आपणां ?
आंगि जडली वेदना; जना सांगतां नये. ॥ छ ॥
कांहीं करितां श्रवण, माझें विपर्यीक मन
भावो न धरी; भ्रमण अर्थी करित आहे.
दुःख धरूनि हृदयीं, योगचळें तें निग्रहीं;
तव खुपुतीच्या डोहीं तें बुडोनि जाये.
डोले शरीर सगळें, जैसें मदिरा मातलें;
क्षितितळीं उलंडलें; परि स्मरणा नये.

वय वाउगें वेचलें; पासीं मरण पातलें;
जोडी अहीत आपुलें तें चि पडलें माये ! ॥ २ ॥
हित न दिसे कांहीं; बाणु लागे हृदयीं;
वीष प्राशूं मीं काइ ? आइ ! सांग मज.
घालूं शरीर पडणीं; करूं शकलें मीं दोन्हीं;
अवदान देउंनि वन्ही, साधूं नीज.
गुरु करूं मीं सगुणु; मातें न कळे सज्जनु;
आंगीं असे अवगुणु जन्ममरणबीज.
सखी ! सांगे निर्धारु; नाहीं दुसरा विचारु;
नित्य स्मरें दिगंबवरू; पारु पावसी बूझ. ॥ ३ ॥

(९२१)

धन, धनद, साधन नित्य भजताहे;
मन माझें नुपडे तेथूंन; कैसें करूं ? माये !
वन, सदन, स्वजन, जनक, तनुज आन स्वप्न माइक भान भासताहे.
किरणीं किरणजाल ढाळें ढळलें; चळ मृगातें चि मृगजळ सत्य होंये.
ऐसी करितां सोसणी, वय सरलें साज़णी !
जरा घडली येऊंनि ! आतां करणें काये ? ॥ १ ॥ धृ ॥
कट कष्टा मीं भूललिये; येणें शरीरें चाड मज काये ? दूरी.
विषयसूख सर्वदुःखाचें मूळ; लटिका तें कवणें उपायें ? वो ! ॥
जन आपुले चि पर माझा अहितीं तत्पर जैसें,तैसें चि शरीर, येर करण
गुण आपुलाला परी भागु भजतीं अंतरीं;
माझें मींपण शरीरीं मज पारिखें मन.
आतां पुरे हे संगती. जीवें धरिली वीरती;
परि सुटिका कवणे रीती ? न कळे खुण.
करूं तपसु कवणु ? माझा हरे केवि सीणु ?
माये ! बगलला मनु अनुवचनें वीण. ॥ २ ॥
सखी ह्मणेः:—वो ! सावरीं; युक्ती आपुली न करीं;
यत्नें पडसील दुरि वरि अयोगदशे. अनुसूयाकुमरु, ज्ञानगुणजळधरू,
योगीराज, सद्गुरू, धीरु, प्रकटु असे.

तया रीघता शरण, छेदे मायीक सगुण;
भवभयनिरसन होये विण आयासें.
दुज्ञा न करीं विचारु; भजे गुरू दीगंबरु,
भक्तजनसुरतरु; तेणें पाव्रसी दशे. ॥ ३ ॥

(९२२)

अरे ! अरे ! भूमिखडसरा. क्षणें क्षणें ज्ञाशील बाहिरा.
झडझड करी शीतळु वारा बा ! रे ! सकुमारा अवधूता ! ॥ १॥धृ ॥
मृद बोल बोले अनसुया; निति प्रबोधी दत्तात्रया.
येरु न राहे तीचेनियां; मायिक क्रीया दावितुसे. ॥ छ ॥
ती प्रतितिचेनि संकल्पें बाह्य वीचरे आणिकें रूपें.
ऋषिपुत्रहितु साक्षेपें करी योगजल्पें वनक्रीडा. ॥ २ ॥
ऐसें दृष्टी देखोनी समस्ता प्रति अनसूये ऋषिवनिता
बोलों आलिया रोषवंता, तवं अवधूता देखियेलें. ॥ ३ ॥
विस्मयो करीती मानसीं::— अवो ! हे मूर्ति ऐसी कैसी ?
केलें लटिक येणें आह्मासी ! मग अनसूयेसी अनुवदती::— ॥ ४ ॥
अवो ! येणें तुझेनि कूमरें आमुचीं मोहिलीं लेंकुरें.
भ्रमती वनें भयंकरें. योगव्यापारें श्रमवितुसे. ॥ ५ ॥
एकीं घातलें वज्रासन. एक लक्ष ठेवितीं लोचन.
करिती, नेणों, काये तें ध्यान ? ऐसे विंदाण करितुसे. ॥ ६ ॥
ऐसा खेळु नाहीं वो ! आइकिला; आह्मीं नाहीं नयनीं देखिला.
योगमुद्रेच्या काइसा चाळा ? वेधु लागला. हित नेदी. ॥ ७ ॥
तवं अनसुया ह्मणे::— वो ! राहा; प्रत्यक्षु येथें हा दृष्टी पाहा;
गेला नाहीं वो ! बाहीर प्रहा; बचनें दाहा ह्मणें प्रळपा. ॥ ८ ॥
तवं येरि बोलती::— वो ! माये ! प्रत्यक्ष तेथें वैसला आहे;
लटीकु तरी येउँनि पाहे. मग लवलाहें उठलिया. ॥ ९ ॥
अतिशीघ्र गती त्या अंगना सर्वे श्रीदत्तु आलिया वना.
तेथें ही देखती सगुणा, योगनिधाना, अवधूता. ॥ १० ॥
तिया बोलती::— पाहे, वो ! माये ! तवं ते ह्मणे::— हा सर्वे चि आहे;
नवल, नेणें ज्ञाहालें काये ? माझा तो नोहे; ज्ञाउँनि धरा. ॥ ११ ॥

मग सकळैका आलिया पासीं; करीं धरिती अवधूतासी;
तवं तो नाडळे करासी, रूप त्वचेसी विषयो नव्हे ! ॥ १२ ॥
चालितां न चळती बाळकें. तन्मय ज़ालीं तीं सकळैकें.
सांगात्रया अतिकौतुकें आलिया भूमिके आश्रमासी. ॥ १३ ॥
तव तीं सहज़ स्वस्थिती आश्रमीं आपुलाला होतीं.
देखोंनि तया वृत्त पुसती. ते बोलती आह्मीं नेणों. ॥ १४ ॥
नव्हे स्वप्न; नव्हे कल्पना; प्रतीति आली या नयना;
सत्य कीं मिथ्या हें कळेना. इतरां जनां आश्चर्य ! ॥ १५ ॥
तें सत्य मानूं; तरि हीं मुलें ! मिथ्या मानूं ; तरि देखिलें !
सदसत्व युक्ती न मिळे. बोलतां बोलें न बोलवे ! ॥ १६ ॥
वनक्रिया ते मायावी ज़ाणीतली जनी अघवी.
दिगंबरु ऐसा गुणलाघवी स्तविज़े सर्वीं परमात्मां. ॥ १७ ॥

(९२३)

अवो ! प्रीतिवादाचें बोलणें; क्षोभु धरिला याचेनि मनें;
न पाहे, न बोले वचनें; रुसला, नेणें, अवधूत. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! तुझे धरीन पाउलें; सांग, अपराध काये म्या केले ?
दंडिसी साहीन तीतुलें; मज़प्रति बोले अवधूता ! ॥ छ ॥
अरे ! तूं माझा जीउप्राणू; बा ! होतासि अतिकठिणु;
कवणाप्रति सांगणें सीणु ? हृदयीं बाणु कडतर. ॥ २ ॥
देवा ! तुज़ न साहे बोलणें; न साहे दृष्टीचें पाहाणें;
न साहे गुणीक स्तवणें; वेगळेपणें रुसलासी. ॥ ३ ॥
आतां मीं शरीर सांडिन; अवस्था आणि द्रष्टेपण;
देवा ! ते न साहाती गुण; स्वस्फुरण तें न करीं. ॥ ४ ॥
हे दृश्य सारा वो ! सकळ; संदर्शनें ज़ाली विकळ;
द्रष्टेपण करा कां निर्मुळ; शुन्य केवळ दुरि करा. ॥ ५ ॥
आठउ विसरु वेचला; भेदभाउ हा विलया गेला;
दिगंबरू आत्मा प्रकटला; आनंदु ज़ाला मज़ माये ! ॥ ६ ॥

(९२४)

अवो ! माझे जीविंचें आरत, पुरवावें मनोगत.

देईन सर्वस्व उचित; कोण दूरित आड ज़ालें ? ।। १ ॥ धृ ॥
पाहिन कमळनयना, सावळ्या, करुणेक्षणा.
वियोगु न साहे वेधना; हें मन सगुणा विनटलें. ।। छ ।।
सखी बोले::—अवो ! वो ! सुंदरे ! आत्मा पाहीं अभ्यंतरें;
विश्व भरलें दीगंबरें; भेदु संहारे त्रिविधु माये ! ॥ २ ॥

(९२५)

अवो ! मज़ स्वहीतें अचाड योगसेवा हे न लगे गोड.
बोलोनि दावीतसें उघड. न धरी भीड साधूंची. ॥ १ ॥ धृ ॥
मी वो ! पाहीन नयनी अवधूतुराज़ा अवो ! साज़णी !
मन माझें गुंतलें सगुणीं. ते तेथूंनी परते ना. ॥ छ ॥
सखि ह्मणे::—अवो ! अवो ! सखिये ! द्रष्टा द्रष्टया न साहे;
दृश्यदर्शन सांडूंनि लाहें; आत्मा पाहें दिगंबरू. ॥ २ ॥

(९२६)

ह्मणें मज़ सीकवा कव्हणी ? सुख न वटे माये ! वचनीं;
मी रातली याचा गुणीं ; दत्तेवांचूंनी पढिये ना. ।। १ ॥ धृ ।।
अवो ! तयासवें मी ज़ायीन; तें स्थळ नयनीं;
ज़ेथें नांदती सुहृद्गण; दत्तभुवन अनुपम्य ! ।। छ ॥
सखी ह्मणे::—अवो ! वो ! आरजे ! तुं कवणु आधीं बुझें ?
मग साचार द्वैत उमज़े ; आत्मा सहजें दिगंबरू. ।। २ ॥

(९२७)

अवो ! तुह्मी नेणावो ! तें नेणा; गुण अगणीत तया सगुणा;
निर्गुणत्व तद्वेधें ये गुणा; परि तें मना प्रीय नव्हे. ।। १ ॥ धृ ॥
आतां कयी ज़ाइन ? माये ! कै कै पाहीन ते पाये ?
गेल्यावरी पुडती न ये; आठवताहे क्षणक्षणां. ॥ छ ॥
तयावरि वारीन तपस, सकळ योग आणि अभ्यास,
ज्ञान, विज्ञान, कुल साभास. दत्तु जीवास न सोडवे. ।। २ ॥
प्रतिक्षणीं नये वो ! वीसरु. मन न धरी आत्मविचारू.
काये सांगेल मज़ तो गुरू ? मातें दिगंबरू न सोडवे. ।। ३ ।।

(९२८)

सखी ह्मणे::—अवो ! तूं आरज; स्वप्न चि सत्य मानलें तुज;
आवडी पुढें काइसी लाज ? तें तवं तूजप्रति नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
आतां तूं पाहेपां ! आपणा; देखसी त्याची अभावना;
जागृति मुरे जेवि सिवणा; मृगजळभरणां कां भरिसी ? ॥ छ ॥
स्वप्नसुख जऱ्हीं तें अपार, तऱ्हीं परि काळें येकें नश्वर;
सत्य सर्वदा नीराकार; दिगंबर भजयी पां ! ॥ २ ॥

(९२९)

सखी ह्मणे::—नेणा वो ! ते खुण; जो ज्ञानाचें जन्मस्थान
ऐसें कोण बळवंत वेदननिराकरण करीं त्याचें. ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! तें चरणवंदन प्रसवे ब्रह्मात्मविज्ञान.
येणेंसी नव्हे तें समान. कार्यकारण गणिजे ना. ॥ छ ॥
विज्ञानेहतू जें सेविजे; विवेकवंतीं आगविजे;
जें साकार परि सहजें प्रसवे बीजें निर्गुणाची. ॥ २ ॥
अवो ! परब्रह्माचें शोधक, ब्रह्मज्ञान फळदायक,
दिगंबर हें जनतारक. आन अधीक. अधीक बोल ह्मणें. ॥ ३ ॥

(९३०)

सखी ह्मणे::—अवो ! अकूशले ! तरु न सेवीं, सेवितीं फळें
पूर्णानंदघन, रसाळें; सांडीं डोहळे द्वैताचे. ॥ १ ॥ धृ ॥
अवो तूं करीं वो ! श्रवण; फळ तें वृक्षाचें कारण;
शेविजे, सांग, सांग, कवण फळ कीं पान, मूळ, शाखा ? ॥ छ ॥
फळ सेवितां सेविला होये; अंतर्भावीं तरुवरु आहे;
येरु तो स्वादु तयाचा नोहे; ज्ञाणोंनि पाहे अनुभवें. ॥ २ ॥
सगुणीं रस आन आन; परि ते तरूरससमान;
ब्रह्म येकरस, नीरंजन, तेवीं निर्गुण, दिगंबर. ॥ ३ ॥

(९३१)

सखी ह्मणे::—अवो ! तूं नेणती, अमितें फळें जयाप्रती.
छाया, स्वजन, विश्रांती, पुडतोपुडती, स्मरताहे. ॥ १ ॥ धृ ॥
आतां ह्मणें करीं प्रलपन; मज तें न साहे वचन;

अवधूतरायाचें सेवन; ब्रह्मज्ञान काये तेथें ? ॥ छ ॥
न करीं फळाची मीं आशा; माझेंक तया उपदेशा ?
जीउ हा ज़ाहाला वो ! पींसा परमपुरुषाचेनि वेधें. ॥ २ ॥
श्रीदत्तु माझें ब्रह्मज्ञान, योग तपसु आणि चिद्घन;
नो लगे दुजें तेणें वीण; माझें प्राण दिगंबरु. ॥ ३ ॥

(९३२)

मल्हार. सासुरवास.

संसार, दूर देशू, येथ घडला वासु !
दुरळ सासुरें वो ! मज़ वाटे परदेशू !
सर्व संकल्प मूळ; माझी कामना सासू;
सासुरा कामु; माये ! येर जन बहुवसू ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां मीं काये करू ? मज़ न धरे धीरू;
विश्रांति न पवे मीं; नित्य होतसे मारू ! ॥ छ ॥
क्रोधाचे बळ मोठें; लल्लाट वोखटें;
हृदय फूटताहे; आतां ज़ाइजे कोठें ?
सर्वांगीं दीपु लागे; प्रळयानळु पेटे;
अवतरे भूत आंगीं; कर्म करवीं खोटें. ॥ २ ॥
तृष्णा हे नणदुली मज़ लागली मुळीं !
संतृप्त करितां ते अतिक्षीण मीं ज़ाली !
तैसीं चि सकळेंकें येहीं तूटि घातली;
भर्तारु मज़ नेणें; हे गति मज़ ज़ाली ! ॥ ३ ॥
माहेर आठवलें; चंचळ मन ज़ालें;
नयनीं वाट पाहे; तव मूळ हीं आलें !
सर्वज्ञ भायी माझे आंगणीं टाकलें;
मज़ वेगु सावरे ना; द्रवों लागले डोळे ! ॥ ४ ॥
गळ्या झोंबिनली दुःखाची उकळी !
न धरे; स्पंदु आला; ते अवस्था गेली !
कंठासि पैसु ज़ाला; मग, बोलती ज़ाली;
भाइया भागलासी; भली परति केली ! ॥ ५ ॥

क्षेम की माये माझी, बापु श्रीयांगिरा ऊ॰ ?
सकळ बंधुवर्ग ठेवि पाउडा पा ऊ॰ !
येथ विश्रांति नाहीं मज़; लागला क्षेऊ॰ !
दिगंबराची आण; भारी येतुसे भेऊ॰! ॥ ६ ॥

(९३३)

संसार व्याळवण; येथ काइसे स्थान?
व्याघ्र, तरस, रीस, वृक वनिचे श्वान!
विश्रांति न पवे मीं येईल मरण!
कवणासि सादु घालूं अवधुता वांचूंन? ॥ १ ॥ धृ॥
वो! गा! ये! देवराया! मीं ज़ातिसें वायाँ;
माये तूं बापु दत्ता! झणें सांडिसी माया! ॥ छ ॥
संताप शोक वन्ही परीतु पातला;
मनसें भूलि घेली; अंतकाळु मांडला!
कृपापयूष वेगीं वोळ, वोळ चित्कळा;
दीनदयाळु होसी दिगंबरा! कृपाळा! ॥ २ ॥

(९३४)

वियोगदुःख माये! तापु ज़ाणत्रें आंगीं.
विषय, उपचार ते ही आगळी धगी.
विश्रांति न पवे मीं शरीर सयोगीं.
आयासु न करा वो! उपशमने लागीं. ॥ १ ॥ धृ ॥
चांदिणें पोळिता हें; चंदन न साहे.
सकळ अर्थ लाभ आंगीं लागती घाये. ॥ छ ॥
कवण ते प्राणवेसी भेटि करील दत्तेंसीं?
धरीन मी पाये तीचे; झाडीन मी कैंसी.
ज़ा वो! उपाय करा; तुटि पडली कैसी?
वांचूंनि दिगंबरे द्वैत न ये मनासी. ॥ २ ॥

(९३५)

श्रीदत्तु प्राण, धन, योग, सार, नीधान.
चंचळ मन माझें, केवि करूं ज़तन?

ज्ञायील हातिच्चें वो ! मग प्राणु देयीन.
वेच्चले जन्म कोटी; भाग्ये लाधली खुण ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! कमळनयना ! गुणी ! अगूणगुणा !
हृदय पर वसवीं; धरीं माझया मना. ॥ छ ॥
श्रीदत्तु सार माये ! निगमागमीं पाहें
संसारदुःखहानी; योगी सेवि़ती पाये.
भ्रमती वतिरागी; तया आयासि न ये.
दिगंबरु आठवला; स्थीरु कैसेनि होये ? ॥ २ ॥

(९३६)

हृदयीं दत्तु धन, ज़ेणें माझें दर्शन
सुवर्णमय ज़ालें, तेणें सर्व ही भान.
तन्मय भासताहे; गेलें दुर्बळपण;
जनदृष्टीसि न ये; माझें संपूर्णपण. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! चिद्‌घन ! धनदा ! अरे ! अविवरदा !
दत्ता ! कमळनयना ! हें चि पुरे सर्वदा. ॥ छ ॥
गणितां गुणीं न गणें श्रीगुरुच्चें देणें.
श्रमले वेद च्यान्हीं; भाऊ नाहीं गमनें.
ठेवितां वीपरीत सर्व सांडूनि देणें.
चिद्घन दिगंबरीं ठायें ठाऊ असणें. ॥ २ ॥

(९३७)

चंचळ जळ च्चले ज़ैसी सरिता वाहे;
तद्वत् वय ज़ातां हातीं धरिज़े काये ?
यालागि सावधानू सेवीं सद्गुरूपाये.
पुढे प्रकाशु नाहीं. शब्दु लटिका नोहे ! ॥ १ ॥ धृ ॥
शरीर, जन, जाया, धन, धनद, क्रिया,
वायां वीण हें भज़सी; सांडी सकळ माया ! ॥ छ ॥
जना ! स्वजनभजनें काळु घाली पां ! च्चणें.
सदनवनतनुजभ्रमु न धरीं मनें.
जिवन नलनीदळिच्चें चल होई लक्षणें.

आयुष्य तरि सारीं दिगंबरचिंतनें. ॥ २ ॥

(९३८)

शक्रारीजंभमर्दना ! अरे ! अगूणगुणा ! तुतें सगूण ह्मणती यातिधर्मविहिना
तया विवेकु नाहीं. आलें आमुतें मना.
नग्न, कळत्रवंत, नित्य, अपराधीना ! ॥ १ ॥ धृ ॥
वायां चि मोहितासी; मज़ काये तूं देसी ?
रूपें हरलें मनस; नेणें परति कैसी ? ॥ छ ॥
अर्थासि ठाऊ नाहीं; तुं उघडा देहीं.
तैसें चि दिगंबरा मज़ करिसी कायी ?
संसारसुख सकल वायां ज़ायील, पाहीं.
जीवासि उरि न दिसे; द्वैत गेलें सर्व ही. ॥ २ ॥

(९३९)

चातकु, ज़ाण, तुझा शब्दबिंदु मीं मागें.
कैं मेघु बोळसील अवधूता ! प्रसंगें ?
सोषला कंठु माझा; दुःख कवणा सांगें ?
ये गा ! कमळनयना ! पवनाहूंनि वेगें ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! स्वजनजीवना ! मतीहरणा !
कयी पां ! पराति करिसी ? शिवरूपा ! निधाना ! ॥ छ ॥
संसारुसर्पु वाळा दिसे प्रत्यक्ष डोळां !
डोले लाउंनि पाहे, तवं स्वप्नीं देखिला.
त्यावरि विस्मरण; ऐसी चूकलों कळा.
कै येसी ? दिगंबरा ! भक्तजनवत्सला ! ॥ २ ॥

(९४०)

विषम विषयसरिता ढाळीं पडली दत्ता !
सकळ करणगुण हें वोसाण अवधूता ?
ज़डलें न सूटे मनसीं; थोरि मांडली वेथा !
कवणासि भारु घालिज़े तुज़वीण ? समर्था ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! अमरवलुभा ! उडी घालिपां ! उभा.
नयन भ्रमीत ज़ाहाले; कास देयीं हेमगर्भा ! ॥ छ ॥

आधि, मध्य, अवसान येथ न दिसे काहीं !
विकल शरीर ज्ञालें ठाये संसारडोहीं !
कामादि जळचरें तया पारूचि नाहीं !
वेगु करीं दिगंबरा ! प्रकट हृदयीं ! ॥ २ ॥

(९४१)

सासुरवास.

संसारु नित्य वैरी; दूर देशु वो ! भारी !
सासुरें मज्ञ माये ! पडीलियें घरीं.
विश्रांति ते न लाहे; श्रमु होतुसे भारी !
सांगिज्ञे प्रति कवणा ? नाहीं सखी दूसरी. ॥ १ ॥ धृ ॥
ये रे ! अवधूतराया ! माझी सांडली माया !
कां दूरि धरितासि ? पराति करि आत्मया ! ॥ छ ॥
कामु तो सासुरा वो ! माझी कामना सासू !
अनूज क्रोधु तया; माझा करील ग्रासू !
कल्पना नणदुली; तीच्रा नाहीं विश्वासू !
अभिमान देर भावे; ऐसा जनु बव्हसु ! ॥ २ ॥
ज्ञोडितीं कर्मफळें तीं हीं चि सकळें !
पुरुषु धर्महीनू तया कांहीं न कळे !
ज्ञोडि का नव्हे ? माये ! माझे काये वो ! ज्ञाले ?
ज्ञालियें अधीन तयांसी; कर्म भोगी आपुले ! ॥ ३ ॥
याचें विहीत माये! मज्ञ हीत वो ! नोहे !
कामें विकळ पडली; माझे भागले पाये !
तृष्णे अधीन जीणे; तिसी पूर्णता न ये !
काळज्ञ, मनस माझें तीणें फोडिलें आहे ! ॥ ४ ॥
रोषआवेशभावे दर्पु केवि साहावे ?
उभें चि नाच्रवीती, दुःख भोगितां जीवें !
वाळोंनि कोळ ज्ञाली; विश्रांति न पवे !
अग्नीवीण जळतीसें; मज्ञ येथ न सवे ! ॥ ५ ॥
वमनमिश्रित अन्न उछिष्ट भक्षण

माते करवीताती ! केवि करूं प्राशन ?
माने धरूनि पीळिती गर्व; अति दुर्जन !
विषयासक्ति माये ! तीचें ऐसें विंदाण ! ॥ ६ ॥
माहेर आठवलें ! दुःखें हृदय भरलें !
नयनीं अश्रुपात जळधर वोळले ! ! !
तें अन्न सेवितां वो माझें मन कांटाळे !
मातेसि ज़ाणवा कां मज़ ऐसें ज़ाहालें ! ॥ ७ ॥
बापासि लाडिकी वोळलेन वाढली.
त्याचें उच्छिष्ट घेतां पाठिमोरी मीं ज़ाली !
तें चि हें फळ माये ! संसारीं पडली !
आतां न भूले; दत्ता ! थोर चूकि घडली ! ॥ ८ ॥
दत्तेसि येकली मी; काम न करी तीचें !
तैं तें चि गोड ज़ालें हें फळ तयाचें ! ! !
ते मज़ दूरि ज़ाली; मुख पाहिन कैचें ?
मीं कीं श्रीयोगिराया बाळक पोटिचें ! ॥ ९ ॥
सहस्र अपराधी मीं तुमचें दीन !
आतां श्रवणु पीळिला ! न चुके येथून !
माये तूं बापु माझा मज़ दुसरें कोण ?
कवणा शरण ज़ाइज़े तुझें समर्थपण ! ॥ १० ॥
उदरीं वाढवीलें; स्तनपान म्यां केलें !
नेणोंनि अपराध नाहीं कित्ती घडले ?
आतां तें वीसरावें येणें ऐसेनि काळे !
परतोनि मुख दाखवीं येकु वेळ आपुलें !
संसारदुःख भोगितां आली मरणावस्था !
वियोगबाण प्रखर कां हाणसी ? दत्ता !
दुःख दुणावताहे; कवण ज़ाणैल वेथा ?
दर्शनामृतरसें उपचारीं समर्था ! ॥ १२ ॥
ऐसें स्मरण करितां लयविक्षेप आले !
तुझें स्मरण हरूनि मज़ मारूनि नेले !

मावरि प्राणु देईन; नव ज़ाये साहिलें !
परति न करीसी तुं, तरि माझें काये चालें ? ॥ १३ ॥
स्मरणें प्राणु देईन; खड्ग घेतलें करीं !
मोटकें उचलूंनी हाणावे तें उरीं !
तवं नामघोष ज़ाले येकसरें अंबरीं !
नीसाण वाजिनलें ज़ाणवलें अंतरीं ! ॥ १४ ॥
बापु श्रीदत्तु आला; पाहों गेली अवलीला !
दूरूंनि रूप देखिलें सुंदरु सावळा !
मागें स्वजन धांवती; न टके तयांला !
योगी श्रमीत ज़ाले; वेगें ऐसेंनि आला ! ॥ १५ ॥
भाळीं श्रीगंधु पीवळें; चंदनें इवरला !
सुमनसर कंठीं, सुवर्णमयु सेला !
पालउ रूळतसे, न सवरी तयाला !
" नाभी " वचनें वरदू धांव घेतू चि आला ! ॥ १६ ॥
मानसीं धीरु न धरे; धांव घेतली लाहें !
गलया झोंबिनली दत्तु माझी वो ! माये !
दे प्रीती आलिंगन; मीं मोकली धाये !
कंठासि पैसु नाहीं; दुःख बोलता न ये ! ॥ १७ ॥
मज़हुंनि दुःख आगळें पीतयासि वो ! ज़ालें !
ते वृत्ति क्षीण करितां प्रयत्नु न चले !
ऐसी, मिळणी ! सखिये ! दोघां अश्रु चालिले !
प्रसंगु तो चि; मीं वो ! देवदेवेसि बोलें ! ॥ १८ ॥
तुं माझें पांघुरण ज्ञानसागरा, ज़ाण !
हा काळुवरि उघडी; दुःख साहिलें गहन !
आतां उदरीं घेऊंनि मज़ करी जतन !
संसारुदावीं झणें माझे ज़ातील प्राण ! ॥ १९ ॥
मी तुझें वत्स दत्ता ! तूं जननी गाये !
चाटी शरीर माझें आंगाचेनि मोहें !
हुडकीन कास तूझी; क्षुधा लागली आहे !

उपवास बहु घडले; तुझी नेणतां सोये ! ॥ २०॥
पक्षिणी अवधूते; मीं तुझें वो ! पीलें !
पांखी करूंनि दडवी; व्याधा हातिचें गेलें !
झणें वेगळें करिसी; म्यां लाविले डोळे !
संसारुसासुरें वो ! मज़ बहु पीडिलें ! ॥ २१ ॥
बोले श्रीदिगंबरू::—न दवीं संसारु;
श्रमें तुझेनि आह्मा श्रमु होतुसे थोरू !
दोघांसि भेटि ज़ाली; आतां श्रमु अपारू
मज़वरी दृष्टि घालुंनी वीसरे समग्र ! ! ! ॥ २२ ॥

(९४२)

आशा होती केली. निराशा ज़ाहाली.
अवधूता ! सत्य सांग, ऐसी का दूरि ध्येली? ॥ १ ॥ धृ ॥
धिग्य ! जन्मु वायां गेला ! श्रीदत्तु रूसला. ॥ छ ॥
दिगंबरा ज़ाण, अनाथ मीं दीन.
माये बापु तूं सद्गुरू; आतां न करीं कठीण. ॥ २ ॥

(९४३)

येणें मिथ्याचारें ! ज़ाति असें पुरे.
मागें पुढें नाहीं मज़ तुज़वांचुंनि सोयेरें. ॥ १ ॥ ॥ धृ ॥
दत्ता ! कास देयीं मज़; हृदयीं ध्यातिसें तूज़. ॥ छ ॥
कामाकुळ चित्त; ज़ाली अति भ्रांत;
दिगंबरा मायापुरीं गेलें स्वहीत वीहीत. ॥ २ ॥

(९४४)

निडळावरि बाहे; वाटुली मीं पाहें.
न दिसे वो ! अवधूतु ! आतां मोकलीन धाये. ॥ १ ॥ धृ ॥
अश्रुपात न धरती; सखियें ! सावरूं किती ? ॥ छ ॥
येईं दिगंबरा ! माझया माहेरा ! तुज़वीण देवदेवा ! प्राणु सांडील शरीर. ॥ २ ॥

(९४५)

अरे ! योगिराया ! सुरगुरो ! दत्तात्रया !
विज्ञानसागरा ! सिद्धराजा ! अप्रमेया ! ॥ १ ॥ धृ ॥

तूं प्राणधन माझें कैसें विसंविजे ? तो तूं. ॥ छ ॥
अरे ! पूर्णकामा ! आत्मा तूं माहात्मा.
दिगंबरा ! ऐसा केवि पुढती मांडली आह्मा ? ॥ २ ॥

(९४६)

गुणाचें तूं स्थान, गुणमुक्त. सगुण निर्गुण.
परब्रह्म रूप तूझें देखिलें सगुण. ॥ १ ॥ धृ ॥
आतां ठेउं कोठें ठेवा ? जीरे के नी देवा ? ॥ छ ॥
मातें मनस चंचळ, गुणमती विरळ.
दिगंबरा ! धरितां तूज काये चाले बळ ? ॥ २ ॥

(९४७)

वियोगदुःखज्वाळा हृदयीं मी जळाला.
निववितीं कयीं ? पां ! सांग, अवधूताजी ! नृपाळा ! ॥ १ ॥ धृ ॥
उपशांत करीं दुःख दाऊनि स्वमुख माझें. ॥ छ ॥
दीर्घस्वरें देवा ! करितु आहे धावा.
दिगंबरा ! कयीं कृपा वर्षसी ? माधवा ! ॥ २ ॥

(९४८)

तुझें नंदनवन हृदयभुवन.
अवधूता ! क्षणक्षाणा ये; तुं पाहीं सांभाळून . ॥ १ ॥ धृ ॥
आतां अंतरंगु चाले; उमटती पाऊलें. ॥ छ ॥
ज्ञप्तिमूळीं स्थान, करावें आसन.
दिगंबरा ! स्वविश्रांति, तेथें स्वानंदु जीवन. ॥ २ ॥

(९४९)

चिदंशु माझें मन केलें समर्पण.
मीं नणें, जाइल पाइं बांधा आवरून. ॥ १ ॥ धृ ॥
हें बा ! चंचळ भारी; देवा ! आपुलें आवरी. ॥ छ ॥
क्षणें देसी कामा; देवा ! तूं निष्कामा.
दिगंबरा ! सत्य जाण, मग बा ! बोलु नाहीं आह्मा. ॥ २ ॥

(९५०)

बुद्धीचें अंतर तें तुझें मंदीर.

जागृति असावें देवा ! येताति तस्कर. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मज्ञानदीपु लावीं; बोलु न ठेवीं. ॥ छ ॥
लयो माजयील; विक्षेपु येईल;
दिगंबरा ! नाहीं सांगितलें ह्मणसील. ॥ २ ॥

(९९१)

सर्वस्व चिद्घन; दीधलें मीपण;
आतां माझें नव्हे; घेयीं आपलें काढूंन. ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! काये सांग आतां उरलें ? अवधूता ! ॥ छ ॥
घालिसी कर्मांवरी, तरि ते तुझी थोरी!
दिगंबरा ! नावडे, तरि तेथें चि संहारीं. ॥ २ ॥

(९९२)

अवस्था आणि भान, देवा ! कर्तेपण,
मीपणें अन्वीतु; तुझें तूं चि तें ही ज़ाण. ॥ १ ॥ धृ ॥
आतां सावधानु होपां ! विश्वी विश्वरूपा ! ॥ छ ॥
देह विलक्षणु, गुणीं अकिंचनु,
तो ही दिगंबरा ! तुझा ज़ालों मीं आपणु. ॥ २ ॥

(९९३)

देवो दृष्टी पाहें, तवं तया न लहें.
दृश्य अविद्यक आतां पूज़ावें तें काये ? ॥ १ ॥ धृ ॥
देवभ्रमु ज़ाला जीवा; देऊ कें दाखवा ? ॥ छ ॥
दृश्याचें दर्शन आणि तें द्रष्टेपण.
दिगंबरा ! देऊ नव्हे, ज़ो याचें कारण. ॥ २ ॥

(९९४)

त्रीपूटीविलयें मीं मातें जव पाहें,
देवत्वाचें चिन्ह तेथें अवघें भरलें आहे. ॥ १ ॥ धृ ॥
एवं विस्मयो ज़ाला; न बोलें काहीं केला; ॥ छ ॥
भक्ती देऊ नाहीं, मग तो भक्तु कायी ?
दिगंबर ब्रह्म स्फुरे दोहींचा विलयीं. ॥ २ ॥

(९९५)

देउ कैचा ! देवा ! मर, मर, रे ! निर्दैवा !
सांडूनियां पंथु कैसा धेतु आहासि धावां ? ॥ १ ॥ धृ ॥
तूं चि देउ देही; विचारूनि पाहा तें पाहीं. ॥ छ ॥
आत्मव्यतिरेकें भान चि लटिकें !
दिगंबरा ! बाह्यदेउ पाहाताति मूर्खें ! ॥ २ ॥

(९९६)

पाहातां भूल ! पर्वत आणि जळ !
देउ तो कवणु ? ऐसें नेणती बळ. ॥ १ ॥ धृ ॥
बाह्य नामघोष करीं; देउ तो अंतरीं ! ॥ छ ॥
दृष्टा ते चि देउ. दृश्याचा अभाउ.
दिगंबरु भेटे, तर्‍ही नीवटे संदेहो ! ॥ २ ॥

(९९७)

दृश्य पंथें जातां वरि पडसी अनर्था.
द्रश्य चि होसील, मग बापा ! पावसील वेथा. ॥ १ ॥ धृ ॥
कृतकर्म तें चि वैरी; बाधील शरीरीं. ॥ छ ॥
त्रीपूटीचें स्थान सांडी वेद्यमान.
आत्मा दिगंबरु, ऐसी स्वता बूझ खूण. ॥ २ ॥

(९९८)

गुणसन्निपातें, माझलेनि चित्तें,
अवस्थेची दृष्टी देउ पाहाताति भ्रांतें. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें भ्रमु तो चि दीसे; आश्रयो न भासे. ॥ छ ॥
भ्रमभूत ज्ञान जैसें कां तें स्वप्न;
तैसें दीगंबरीं विश्व अन्यथा स्फुरण. ॥ २ ॥

(९९९)

माया नामें मन; देहावस्था गूण;
मन तें सामाउनि, करीं अधिष्ठान ज्ञान. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें बंध, मोक्ष दोन्ही मायीक निर्गुणी. ॥ छ ॥
मनत्व होतां क्षीण मनचि अधिष्ठान,

दिगंबरु भेटे तयीं; प्रकट होये खूण. ॥ २ ॥

(९६०)

पाहाणें न पाहाणें ! न पाहाणें पाहाणें !
पाहे तो सुज्ञाणु आपेंआप निवळपणें ! ॥ १ ॥ धृ ॥
ऐसे अंध मूक ज्ञाले ! योगी वेडावले ! ॥ छ ॥
दिगंबरीं स्थिती सहज़त्वाची वृत्ति.
औपाधीक होये, तीची केली उपशांति. ॥ २ ॥

(९६१)

संगु अवस्थेच्चा योगु तो दुःखांच्चा.
मायावी दुःस्वप्न, ज्ञाण, प्रपंचु गुणाच्चा. ॥ १ ॥ धृ ॥
आतां सांडि, सांडी जना ! गुणसंगु अज्ञाना ! ॥ छ ॥
गुणव्यतिरेकें स्वरूपविवेकें दिगंबर ब्रह्म, ज्ञाण. व्योमाचि सारिखें. ॥२॥

(९६२)

मनत्व नुरलें ठायीं; पाहाणें पुडती कायी ?
स्वरूपें चिन्मयता; पाहाणयां पैसु नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसे डोळस अंध ज्ञाले; पाहों वीसरले. ॥ छ ॥
पाहाणें, न पाहाणें, ज़ाणणें, नेणणें,
दिगंबरीं वाऊ स्थिती सहज़ असणें. ॥ २ ॥

(९६३)

॥ मल्हार ॥

बहु दिवस ज़ाहाले, कृतकर्म नेणें कैसें ?
अवधृताचें दर्शन सोंपे न दिसे. ॥ १ ॥ धृ ॥
तेणेंसी येकुदां मज़ कोण्ही भेटि करा.
पाहीन नयनीं श्रीदत्तु सोयेरा. ॥ छ ॥
तेणेंवीण वो ! न सवे; मन दश दीशा धांवे !
दिगंबरेंसीं अंतर; हा जीउ न धरवे ! ॥ २ ॥

(९६४)

जनवाद वो ! सायक; तयासी मीं मानु नेदीं.
अवधूतीं विनटली माझी मनोबुद्धी. ॥ १ ॥ धृ ॥

न करी आणिक मी अनुस्मरण. अनसूयेच्या नंदनु माझें योगधन. ॥छ॥
जपु, तपसु, साधन अवधूतु ध्येय, ध्यान.
दिगंबरु ब्रह्ममय; येर मायामय भान. ॥ २ ॥

(९६५)

लक्ष ठेविनां चरणीं माझी मति पारुषली;
रूपीं निमाली चेतना; गुणवृत्ति हारपली. ॥ १ ॥ धृ ॥
कासया करूं मी योगधारणा ?
दोहीं नयनीं पाहिन दत्ता गुणपूर्णा. ॥ छ ॥
परब्रह्म हें निर्गुण गुणमय व्यक्त ज़ालें.
दिगंबर निर्धारितां द्वैताद्वैत गेलें. ॥ २ ॥

(९६६)

करचरण जोडुनी विनविन साधुजना::—
अवधूताचें स्वरूप गुणमय न ह्मणा. ॥ १ ॥ धृ ॥
पाहातां नयनीं येणें भेदु वितुळला.
भेदु त्रिविधु वर्जितु बोधु प्रकटला. ॥ छ ॥
नव्हे स्तवन मायिक; सत्य प्रतीति आहे.
दिगंबरातें पावला, तो ज़ाणोनि पाहे. ॥ २ ॥

(९६७)

अवधूता! श्रीसद्गुरू! अरे! योगिजनप्रीया!
कयींकई, सांग, भेटी येसी? देवराया! ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयन मनीं रूप आठवे.
जीउ वियोगें तळमळी! हा! हा! भेटि नव्हे! ॥ छ ॥
बहु दिवस ज़ाहाले; अरे! परिपूर्णकामा!
दिगंबरा! तूझें चित्त कें धरवे आह्मा? ॥ २ ॥

(९६८)

मन भूललें; सखिये अर्थभोगु आवडेना.
अवधूताचा वियोगु खरतर वेदना. ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयनरूप सावळें पाहीन मी; कयां हे नयनीं डोळे ? ॥ छ ॥
वाया जाण हें शरीर क्षणक्षणें ज़ात आहे.

दिगंबरेंसीं अंतर तें मज़ केवि साहे ? ॥ २ ॥

(९६९)

जळस्तूळेंसीं सूटला ज़ैसा मीनु तळमळी;
तैसें मज़ प्रवर्तलें वेदना लागली. ॥ १ ॥ धृ ॥
सावळें रूप वो ! कैसें मज़ वीसरवे ?
अवधूताची सखिये ! बहूत काळ सेवे. ॥ छ ॥
करचरण तपती; ह्रदय दुभाग ज़ाले;
दिगंबराच्या वियोगु; दुरित फळासि आलें ! ॥ २ ॥

(९७०)

गुणकरणें कुंठलीं; वय माझें क्षीण ज़ालें;
आतां कैसेनी ज़ोडती अवधूता ! पाउलें ? ॥ १ ॥ धृ ॥
मनस चंचळ, स्थिर नव्हे; काये करूं ?
अवधूतें वीण माये ! पडला अंधकारू. ॥ छ ॥
यत्न सकळ सांडूनि दीर्घस्वरें सादु घाली.
येइं ! येइं ! दीगंबरा ! तुं माझी माउली. ॥ २ ॥

(९७१)

मायेबापाचें लेंकरूं; नव्हे मीं परदेशी.
सांगयीन अवधूता; मज़ न ह्मणा दासी. ॥ १ ॥ धृ ॥
येइं ! रे ! आत्मयां ! दत्ता ! योगिराया !
जनवादु हा वोखटा; कां सांडिसी माया? ॥ छ ॥
विजातीय, विभेदमुक्त शरीर माझें.
नव्हे दासिरूं; बालक दिगंबरा तुझें! ॥ २ ॥

(९७२)

तुज़ येकेंवीण जनधन काये करूं?
न सोडीं पालउ; मीं तुझें लेंकरूं. ॥ १ ॥ धृ ॥
कडिये घेइं रे ! दत्ता ! मज़ आळिवयां.
ज़ाणीतली खूण; कां घालिसी माया? ॥ छ ॥
श्रीगुरो ! आत्मयां ! तूं ज़ाणोंनि पाहीं.
ह्मी तु सर्वत्र; तरि मज़ मानु देयीं. ॥ २ ॥

बोले दीगंबरू::– आतां पुरे बोल ह्मणे;
गुणमतीचें देखणें काये तें देखणें? ॥ ३ ॥

(९७३)

देवपणेंसीं पारिखें भक्तपण काये करूं?
जरि यातीसीं वेगळा; तरि केंवि पाये धरूं? ॥ १ ॥ धृ ॥
पाहतां स्वरूपें तुज्ञ मज्ञ भेदु नाहीं.
सर्वेसी दुसरें सांग, सांग कायी? ॥ छ ॥
बोलतां बोलतां गुणीं गुण तूटि दीसे.
वर्म प्रकाशूं कासया? मज्ञ ठाउकें असे. ॥ २ ॥
दिगंबरु बोले::– देईन मीं देवपण;
वर्म तूं आमुचें ह्मणें बोल येथून. ॥ ३ ॥

(९७४)

द्विज, ज्योतिषी, पाठक भले भले अनसूयेमंदिरा प्रति आले.
दत्तासनीं समीप बैसवीले. घेऊनि कुमरू अनसूया बोल बोले. ॥ १ ॥ धृ ॥
सती पूसे अनसूया विप्रवर्गा::—जन्मकाळू वर्त्तुनि फळ सांगा;
काये कुमरें चरित केलें मागां? पुढें भविष्य येईल ज्ञे कीं योगा. ॥ छ ॥
विप्र बोलती पाहोंनि पुण्यकाळू::–प्रश्न केला लक्षूंनि तो ही वेळू.
सामुद्रीकें लक्षूंनि दृष्टी बाळू बोलु बोलती कुशलत्वें मवाळू. ॥ २ ॥
योगगम्य, चैतन्य, गुणमुक्त, योगतपसें केवल आराधीत,
योगमायया सगूण गुणान्वीत, योगिराजरूप हें ज्ञालें व्यक्त. ॥ ३ ॥
योगानळु वो ! प्राशिला जन्मा पहिलें. योगहृदयीं वसतिस्थानें केलें.
योगानंदे योक्तया नीववीलें. योगारिष्टदमन हा ज्ञाण वहिलें. ॥ ४ ॥
योगिजनवल्लभु, योगत्राता, बाळु होयील हा काळु विचारीता.
योगी सेवितीं योगिया अवधुता. गुरुत्वाची पदवी येईल दत्ता.
वेळाफळें विज्ञानजळधरू देवदेॐ होईल तुझा कुमरू.
महर्षी ही नेणती याचा पारू. विश्वव्यापी ह्मणती विश्वंभरू. ॥ छ ॥
मूळदकारें होईल स्वपददाता, अब्जलोचनु, सकलुजनत्राता.
दिगंबरु हा कूमरू तुझा आतां परब्रह्म. न करीं कांहीं चिंता. ॥ ७ ॥

(९७५)

काळवेत्ते, नक्षत्रग्रहवादी, जातकर्मी, जातकी तया बुद्धी.
तयांप्रति अनसूया पुसे शब्दीं:—तपोधन हें कुमरु पाहा आधीं. ॥१॥ध्रु॥
याचें भविष्य वर्त्तूनि तुह्मी सांगा, काये चरित असैल केलें मागां.
काळु, अयनु पाहोंनि ग्रहा, योगा येरसम तें बोलता प्रश्ना मागां. ॥छ॥
द्विज बोलती हा मूळिचा अगूणू , मायारहितु, अवशु, रूपहीनू ,
योगतपसें वितरागें साध्यमानू , यातें पाहातां न लगे स्वभाउ आनू. ॥२॥
गुण पाहिजे तैसा तो येथें नाहीं. माया ममता नूपजे याचां देहीं.
हा वो ! अवशु कोण्हाचा नव्हे काहीं.
संगु न धरी, न साहे शब्दु तो ही. ॥ ३ ॥
यया नाहीं स्वपर जनु लाहाणा. माये पाहतां तैसा चि हाही जना.
जनावेगळा वसवील येका राना. अकिंचनु पाहिजैल अकिंचना. ॥४॥
गुणलक्षणें सकळें अपहरलीं. काळानळें पोळला असे मूळीं.
काळु काळा कवणु या आकळी ? कृष्णवर्ण अवगमे नेत्रकमळीं. ॥५॥
दानीं दीधला दैयत्व याचां आंगीं. दत्त अन्न भक्षील हा वो ! जगीं.
महीमंडळी भ्रमैल भिक्षेलागी. भैक्ष्य मागती ययाचे जे कीं संगीं. ॥६॥
अयनफळें होयील धर्मविहिनु. आंगी न धरी आश्रमु यातीगूणु.
नग्न वनिता लागैल अवगूणु. वस्त्र सांडूंनि भ्रमैल तुझा नंदनू. ॥ ७ ॥
हानिकर वो ! ययाचे शब्द श्रवण वो ! दृष्टी पाहातां केवळ जीवा मरण.
संसारि कां संरीं पडे विघ्न. संगु नेघती ययाचा कोण्हीं जन. ॥ ८ ॥
आत्मघातकी पडैल जळधरीं वो ! तेथें वांचला राहील गिरीवरी.
परसिद्धी हरील, चोरासि धरावें. गुरु दुसरा सर्वथा न करी. ॥ ९ ॥
काहीं नाहीं तेणें ययासि धरावें. काहीं नेणें तेणें ययातें पुसावें.
अकिंचनें भजतां हित नव्हे वो ! सर्वशून्य होयील जाण बरवें. ॥१०॥
परित्यागें याचेनि हित आहे. परि सोडितां सर्वथा भिन्नु नोहे.
पूर्वकृत भोगी; वो ! करिसी काये ? दिगंबरु हा लाहाणा ह्मणों न ये. ॥११॥

(९७६)

अवधूतलक्षणें पाहों आले; ते तद्दर्शनें आपुली वीसरले,
भावगळीत वीकळपणें ठेले; ब्रह्मसायुज्य केवळ संपादलें रे ! ॥१॥ध्रु॥

केसी अकळ न कळे देवमाया ! वो ! देवराया वो !
खोडि खावणी ठेविता दत्तात्रेया वो ! काये ज़ाहालें नेणवे द्विजां येयां वो !
तेचि क्रीया सुफळ ज़ाली तया वो ! ॥ छ ॥
होतें तें चि आसन ब्रह्म ज़ालें रे ! पथु कुंठला; वचन विसरलें.
दृश्य न दिसे; देखणें मावळलें. स्तब्ध राहिले; निद्रितपरी डोळे. ॥२॥
देहअवस्था न दिसे दृश्यमान. ब्रह्मीं ऐक्य पावलें समाधान.
अनसूया उतरी निंबलोण. दिगंबरासि देउनि आलि मन. ॥ ३ ॥

(९७७)

धावा

बहु दिवस ज़ाहाले. भेटि नाहीं वो !
अनाति येगें व्याकुळ; करूं कायी ? वो !
दोन्ही स्पंदती बाहिया; दत्ता येइं रे !
भेटि देउनि घेउनी सर्व ज़ायी रे ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! सखया ! सद्गुरु ! देवराया ! रे !
प्रीति लागली; न सूटे दत्तात्रेया रे !
मायेबापा ! सांडिसी ह्मणें माया रे !
तुज़वांचूनि सकळ अर्थु वाया रे !
दाऊं हृदय फोडुनि कवणातें ? दत्तेवाचूनि न सत्रे माये मातें.
भेटि करा वो ! ज़ा तुह्मीं नेणें पंथें वो !
दिगंबरू स्वजनु वसे ज़ेथें. ॥ २ ॥

(९७८)

येक भज़ती. पाल्हाळ. कर्मवादी रे ! कर्मवादी रे !
येक सेविती देवता भेदवादी रे ! येक वादप्रमत्त पदोपदीं रे !
ते हीं काहीं चि नेणिजे गोविंदीं रे ! ॥ १ ॥ धृ ॥
नाहीं नाहीं सद्गुरुवीण गती रे ! नाहीं मुक्ती रे !
वाया करिसी प्राणिया आचावती रे !
आतां पुरे; सांडि ते सकळ मती रे !
सेवीं श्रीगुरुचरण पुढतोंपुढती रे ! ॥ छ ॥
जटी. मुंडी भ्रमती दश दिशा रे !

मौनमुद्रा आसनबंधु ह्मणती दशा ! युक्तीवादें नेणवे परमपुरुषा रे !
जन्म वाउगा दवडीती येक ऐसा रे ! ॥ २ ॥
येकीं सांडिलें केवळ अन्नपान रे ! येक तापस करीती अनुष्ठान रे !
दिगंबरू नेणती मतीहीनु रे ! तया अविद्या निरासु कैंचें ज्ञान रे ! ॥३॥

(९७९)

क्रोधु भरला अंतरीं; वरि स्नान रे !
जपु मुद्रा. देवार्चन खोटें ध्यान रे !
तीर्थीं धूतलें अपवित्र जैसें श्वान रे !
तैसें विहिज जात सेव्यावीण रे ! ॥ १ ॥ धृ ॥
रोषु सांडी रे ! आल्या परोपरीं रे ! जन्मोजन्मीं हा लागला तुझा वैरी रे !
सुख नाहीं याचेनि संसारीं रे ! मोक्षपंथिचा तस्करु मारीं, मारीं रे ! ॥छा॥
क्रोधी करीतो तपसु; जाय वायां रे !
कित्ती संन्यास नाशिले, नेणसि काह्या ? रे !
देवद्रोही येणें होसी करितां क्रीया रे !
गुरुभजनीं अरिष्ट पावावया रे ! ॥ २ ॥
येणें पावला कवणु पारपारू ? रे ! येणें नरकु चूकला कवण नरू ? रे !
वायां जातुसे सकळ यथाचारू रे ! धर्माचारू रे !
भग्न याचेनि संन्यासे दिगंबरू रे ! ॥ ३ ॥

(९८०)

देहीं कामना, कल्पना विषयांची रे. वरि क्रीया रे ! केवळ सात्विकाची रे !
बकु तापसु कवण गति त्याची ? रे !
तैसें मायीक वीफळ अवघें ची रे ! ॥ १ ॥ धृ ॥
सेवीं, सेवीं आल्या ! वीतरागू रे ! तेणेंवीण सकळैक वृथा योगू रे !
गुरु न संगे सांगतां नलगे मागू रे ! कृष्णपटावरि नुमटे रंगू रे ! ॥छा॥
जैसें कुपथ्य भेषजगुण नाशी रे ! मुखीं वमन वरि वरि तोंड पुसीं रे !
कामकामी तयाची गति ऐसी रे !
दिगंबरें निःकामता दुःख नाशी रे ! ॥ २ ॥

(९८१)

मन चंचळ नेणोंनि अधिष्ठान रे ! काये तयाचें सांगसी निश्चळपण ? रे !

मुद्राबंधु आसन वृथा ध्यान रे !
वेषु मायावी धरूनि कवण ज्ञान ? रे ! ॥ १ ॥ धृ ॥
धरीं, धरीं, रे ! आलया ! मनस धरीं रे !
तुझें तुतें जें न मने तें न करीं रे !
दंभु माईकु कासया लोकाचारी ? रे !
येणें बहूत ठकले ये संसारी रे ! ॥ छ ॥
मनें मानिजे तो योगु अतिमान्यू रे ! मनें मानिला वितरागु भजे धन्यू रे !
मोक्षु ह्मणिजे भाऊ; तो मनोजन्यू रे !
दिगंबरू मनीं धरी; तुटैल सीणू रे ! ॥ २ ॥

(९८२)

ऋषिपुत्र निजमनीं करिती विचारू. अपरमीत जळ हा जळधरू.
गति ते कुठली रे ? आमुची मति पांगुळली रे! ॥ छ ॥
गर्जनेचा शब्दु नाइकवे कानीं !
पाहातां चि झापड पडताहे नयनीं ! ॥ २ ॥
जळचरें तळपती भयजनकु ठाऊ !
येकु ह्मणती ::— चला, येतुसे भेऊ ! ॥ ३ ॥
असंगेंसीं संग आमुतें घडला. वनीं दीगंबरू सांडूनि गेला. ॥ ४ ॥

(९८३)

येक ह्मणती ::— आलों अवधूत मेळें!
परतोनि जायया पंथु न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
मायया मोहलों रे! भवसागरीं पडलों रे! ॥ छ ॥
संसारसागरीं सोपान येतां; अत्यंत दुर्मळ येथूनि जातां ! ॥ २ ॥
येकीं निजमनीं निश्चित केलें. दिगंबरें वीणें मार्गु न कळे. ॥ ३ ॥

(९८४)

येक ऋषिनंदन करिती चिंता; काय जालें ऐसे या अवधूता ? ॥ १ ॥ धृ ॥
सागरीं प्रवेशली. सखा जळचरीं विसंचिला. ॥ छ ॥
संसारसागरीं बुडोंनि मेले, कोण जाणे कित्ती जळचरीं नेले ? ॥ २ ॥
उपजला निर्धारु आमुचा देहीं::—दिगंबरें वीण जाणें चि नाहीं. ॥ ३ ॥

(९८५)

येक आठविती श्रीदत्तगुण; दुःखें आक्रंदतीं; करिती रूदन. ॥ १ ॥ धृ ॥

अरे ! संगु कां सोडिला ? रे ! दत्ता ! वेळु का लागला ? रे ! ॥ छ ॥
वियोगदुःख हे प्रखर बाण; येथीं, दीगंबरा ! नीवारीं मरण. ॥ २ ॥

(९८६)

कर्मटांच्या संगु तूज न साहे. निर्धारितां गुणीं ज़ालासि काये ? ॥१॥धृ॥
मानसें कुंठलीं रे ! दत्ता ! मति पांगूळली रे ! ॥ छ ॥
योगमूर्ती ! अरे ! परमनिःकामा ! कवि दिगंबरा ! भेटसी आह्मा ? ॥२॥

(९८७)

दृश्य निर्धारितां तें रूप नाहीं. सुंदर सावळें ज़ाहालें कायी ? ॥१॥धृ॥
मन माझें वेधलें रे ! आत्मयां रूप कां चोरिलें ? रे ! ॥ छ ॥
दृष्टिचें देखणें पांगूळ ज़ालें. दिगंबरा ! तुझें रूप न कळे. ॥ २ ॥

(९८८)

दर्शनामृत गुरो ! द्रव जळधरा.
चातकु निजमनसें न स्मरों परा. ॥ १ ॥ धृ ॥
मार्गु तो न कळे रे ! ज़ालों तुज़वीण आंधळे रे ! ॥ छ ॥
योगमूर्ती ! परब्रह्म ! साकारा ! पाव दिगंबरा ! अनसुयेकुमरा ! ॥२॥

(९८९)

येक आक्रंदती; येक ते उगले;
रूप आठऊंन ध्यानस्थ ठेले: ॥ १ ॥ धृ ॥
शब्द वीसरले; आत्मयां तूज़ वीनटले रे ! ॥ छ ॥
येक ते अज्ञान नेणती कांहीं; ध्याती दिगंबरु लोचनीं दोहीं. ॥ २ ॥

(९९०)

सावळा, सुंदरु, बरवया बरवा
देखिला; मग कोवि सोडवे जीवा ? ॥ १ ॥ धृ ॥
चित्त हें गुंतलें रे ! रूपीं मन पांगूळलें रे ! ॥ छ ॥
योगसेवा आह्मा तुझेनि आंगें. ज़ासि जेथें तेथें येउंन मागें. ॥ २ ॥
दिगंबरें केला तत्वोपदेशु. भक्तासि फळला पूर्ण विश्वासु. ॥ ३ ॥

(९९१)

प्रसन्न ज़ालासि तरि काये देसी ?
क्षोभलासि देवा ! तरि काये नेसी ? ॥ १ ॥ धृ ॥

आत्मतागुंतलों रे ! दत्ता ! मीपणा मूकलों रे ! ॥ छ ॥
चूकलों मीं तरि अपराधु; कवणा
भजतां हीं रूप न दिसे भजना. ॥ २ ॥
दिगंबरा ! तुवां भेदू चि हरिला. पूर्ण विश्वासलों तूझया बोला. ॥ ३ ॥

(९९२)

तुज्ञ मीं ज्ञाणें; तूं ज्ञाणतासि मातें.
सत्य बोलों न ये लौकीकु येथें. ॥ १ ॥ धृ ॥
मौनें चि राहिजसू; दत्ता ! केलें तें साहिजसू. ॥ छ ॥
दिगंबरा ! वर्म कळलें गुह्य. पासूंनि ज्ञातां चि करीन बाह्य. ॥ २ ॥

(९९३)

भक्तजनसुरतरू ! संपूर्णकामा ! देवदेवा ! परमात्मया ! रामा ! ॥ १ ॥ धृ ॥
केधवां भेटि देसी ? सांगपा, विश्रांति पाववींसी ? ॥ छ ॥
भक्तचिंतामणी ! अभयवरदा ! दिगंबरा ! निजानंदअगाधा ! ॥ २ ॥

(९९४)

पवनाची गति न धरवे धरितां.
व्योम नीरवैव न गणवे गणिता. ॥ १ ॥ ॥ धृ ॥
केंवि मीं तूज्ञ पाहों ? रे ! आत्मयां ! निश्चळु केंवि राहों ? ॥ छ ॥
अनंतगुणमय, गुणहीन पुडती केंवि दीगंबरा ! ज्ञाणवे स्वमती ? ॥ २ ॥

(९९५)

आयुष्य चर; वाहे सरसर सरिता; वेगु अवसरु न धरवे धरितां. ॥ १ ॥ धृ ॥
यत्नु तो कुंठला रे ! अवधूता ! वयांतु पातला रे ! ॥ छ ॥
मनस चंचळपणें विश्रांति न पवे. दिगंबरा ! तुझें ध्यान करवे. ॥ २ ॥

(९९६)

शरीर कर्मजगुणें अतिक्षीण ज्ञालें; करणगण पांगूळ; यत्न न चले. ॥ १ ॥ धृ ॥
निर्वाण मांडलें रे ! अवधूता ! वरि दुरित पावलें रे ! ॥ छ ॥
तापत्रय बहु; ज्ञाणवे वेथा. दिगंबरा ! आनां पाव समर्था ! ॥ २ ॥

(९९७)

कवण कर्म कैसें ? विपरीत क्रीया.
ज्ञाणतां, वरि मनस पडतांहे विषयां. ॥ १ ॥ धृ ॥

सद्गुरू ! पाव ! बा ! रे ! आत्मयां ! अवधुता ! पाव. बा ! रे ! ॥छ॥
मातलें गुणरसें मन कोवि धरवे ?
दिगंबरा ! तुझें स्मरण चि बरवें. ॥ २ ॥

(९९८)

विवेकुदिनकरु गुणी अस्तमान; रात्रिकाल वरवें; पडलें खान. ॥१॥धृ॥
हरिलें योगधन; माये ! वो ! व्याकूळ पडलें मन. ॥ छ ॥
मागु पाहे तवं अंतरा आला. दिगंबरें चोरु धरूंनि दिधला. ॥ २ ॥

(९९९)

वाट पाहे तुझी अरे ! कमळनयना !
भेटि देयीं गुरो ! कालाग्निशमना ! ॥ १ ॥ धृ ॥
माये तूं बापु माझा, रे ! आत्मया ! सारथी योगिराजा ! ॥ छ ॥
ऐसे चि अतिक्रमले जन्म अपार.
दिगंबरा ! आतां चुकवीं येरधार. ॥ २ ॥

(१०००)

बापु माझा; तया ज़ायीन पासीं;
अंकदेशें वीण बैसैन कैसी? ॥ १ ॥ धृ ॥
कां मज़ शंकवाल? अवो ! तुह्मी भय कित्ती दाखवाल? ॥ छ ॥
आरत जीविंचें तुह्मीं काये ज़ाणा? दिगंबरु मज़ आलवी खूणा. ॥ २ ॥

(१००१)

माये तूं; तरि तुझें मन काये धरूं?
अवधूते ! सांग, काये मीं करूं? ॥ १ ॥ धृ ॥
कां मज़ दूरि धरिसी; रे ! आत्मयां ! माये तूं बापु होसी. ॥ छ ॥
मनसें मनसाप्रति अंतर नाहीं. दिगंबरा ! वर्म ज़ाणोंनि पाहीं. ॥ २ ॥

(१००२)

परमसुखसागरा ! साधुविश्रामा !
सिद्धराजा ! तुझा न कळे महिमा ! ॥ १ ॥ धृ ॥
ब्रह्म तूं निर्विकार, गुणाविवर्जित, सुखसार. ॥ छ ॥
परमदयार्णवा ! भक्तार्तिहरणा ! दिगंबरा ! मीं लागेन चरणा. ॥ २ ॥

(१००३)

परसिद्धिहरण हा सहज़ गुण तूझा. तेथ कें स्वभाऊ उरैल माझा ? ॥ १ ॥ धृ ॥
मनस गुंतलें रे ! माझें मीपण हरिलें ! ॥ छ ॥
दिनकरें ज्योतिषा प्रलोपु होये; चित्त दीगंबरीं तेवि सामाये. ॥ २ ॥

(१००४)

पूर्ण चैतन्य तूं अरे ! योगिराजा ! राजीवलोचना मी ! काये तुझा ? ॥ १ ॥ धृ ॥
सांग पां ! झडकरूनी. रे ! आत्मयां ! उपज़लें हें चि मनीं. ॥ छ ॥
सर्वदेहीं तुं चि सत्य पुराण. सांग, दीगंबरा ! मी तेथ कवण ? ॥ २ ॥

(१००५)

तूं चि तेथें; सांग, मी दुज़ा कवणु ?
मी चि मी; तेथ तूं कें विलक्षणू ? ॥ १ ॥ धृ ॥
माव ते दूरि करी. रे ! आत्मयां ! सांग पां ! हें चि तर्न्ही. ॥ छ ॥
दिगंबरु ह्मणे, उगला राहीं; कळल्यावरि बोलणें कायी ? ॥ २ ॥

(१००६)

सदन, धन, स्वजन, वनिता, जन्म वेच़ला नित्य स्मरतां.
विषयसुखदुरितसरिता पुरें ज़ातसे. पात्र दत्ता ! ॥ १ ॥ धृ ॥
यत्नु तो कुंठला रे ! मनु माझा गुण मदें जिंकिला रे ! ॥ छ ॥
करणगुण गगनीं गिळती. सेखी तृष्णा ते सहज़ रीती.
स्मरण करी पुडतोपुडती. दिगंबरा ! कैं करिसी परती ? ॥ २ ॥

(१००७)

आत्मयां ! योगिराजा ! मनोमंदिरीं करीन पूजा.
गुणीं गुपला भाऊ माझा. आतां न स्मरे अर्थ दूज़ा. ॥ १ ॥ धृ ॥
मीपणी वाऊ नाहीं. रे ! आत्मया ! स्वस्थिती सर्व होयीं. ॥ छ ॥
अर्पूनि द्वैत सर्व, धूपीं धूपूंनियां असर्व,
दिगंबर निर्वाण; पूर्व प्रिती पूजिलें परम शिव. ॥ २ ॥

(१००८)

देवा ! न गणती मेघधारा; परमाणुवीं ज़ेवि धरा;
तुज्ञ वर्णितां पूर्णपरा ! पारु नेणवे जी ! अपारा ! ॥ १ ॥ धृ ॥
मानसें कुंठली रे ! मति हे तुज़माजि लोपली रे ! ॥ छ ॥

तुझें चरित मीं काये ज़ाणें ? गुणवार्जिताचें करणें !
दिगंबरू हें नाम ज़ाणें. जपु करीन नित्य मनें. ॥ २ ॥

(१००९)

कृपामंदिरा ! स्वजनजिवना ! गुणगोप्तया ! कमळनयना !
तुझा विषयो परमसगुणा ! भक्त ज़ाणती हृदयकळना ! ॥ १ ॥ धृ ॥
कां मज बोधितासी ? नित्य असैन तुज़ चि पासीं. ॥ छ ॥
चळ चंचळ चळित होये; मन स्वस्थिति स्थीर नोहे.
तुझा चरणीं रमत आहे; दिगंबरातें विरोंनि जाये. ॥ २ ॥

(१०१०)

स्वप्नधनखनन करितां, काळु वेचला अर्थु भज़तां.
मनें आपुली सकळ चिंता दूरि सांडिली बा ! समर्था ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां निर्वाण पावलें रे ! दत्ता ! दाखवीं पाउलें रे ! ॥ छ ॥
मृतज़ळें गगन भीरलें; मृग लागट तेथ ज़ालें;
दिगंबरा तेंवि घडलें ! अर्थाधीन हें मनस केलें ! ॥ २ ॥

(१०११)

गगन केंवि गणिज़े ? तुझें रूप अवगमिज़े ?
गुणें न उरे ज़ेथ दूजें, मन मावळलें सहज़ें. ॥ १ ॥ धृ ॥
वेद ते श्रमले रे ! दत्ता तर्क पांगूळले रे ! ॥ छ ॥
बुद्धीसि पैसु नाहीं तुझें पाडितां रूप ठायीं.
अहंममतेचां विलयीं दिगंबरा ! तूं तत्वजयी. ॥ २ ॥

(१०१२)

हृदयाकाश माझें स्थान करीज़ो योगिराज़ें.
मनोभाऊ मीं सहज़ पूजे देवा ! अर्पीन तो घेइज़े. ॥ १ ॥ धृ ॥
न वचें दूरि ! बा ! रे ! तुझे चरण नित्य स्मरें. ॥ छ ॥
मीमाजि पुण्य देशू; देवा ! करिपां ! तेथ वासू.
मनोधर्मु मीं करी नवसू. दिगंबरा ! तूं परमपुरुषु. ॥ २ ॥

(१०१३)

लक्षितां चरणकमळें मन भ्रमरु तेथ ज़ालें;
आसक्त पांगूळलें; देवा ! तेथूनि तें न चले. ॥ १ ॥ धृ ॥

लंपटें गुंतलों रे ! तेथें मीपणें वेच्चलों रे !
कारणी कार्य कुंठे मन तव रूपीं येक वाटे.
आणिकें सूख न वटे. दिगंबरा ! हें सहज़ वटे. ॥ २ ॥

(१०१४)

भक्तासि भेदु नाहीं. भूतशोधन नित्य देहीं.
बीज, मातृका, न्यास पाहीं. आता दंडिनी येथ कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
भय तें चूकलें रे ! दत्ता ! द्वैत विनाशलें रे ! ॥ छ ॥
ज्ञान तें परम कायी ? येथें भेदीं चि भेदु नाहीं.
हें चि वा नित्य देयीं ! दिगंबरा ! मीं नेणें काहीं. ॥ २ ॥

(१०१५)

मी मज़ लक्ष करितां, तेथें पारुपली अवस्था.
वेदनवेद्यवेत्ता गुणभान कें भेदमुक्ता ! ॥ १ ॥ धृ ॥
वर्म तें बोधलों रे ! आतां सर्वथा न च्चळों रे ! ॥ छ ॥
शून्य अशून्य वाऊ. निज निश्चळ ठायें ठाऊ.
जेथें भक्त ना भिन्न देऊ. निराकारला द्वैत भाऊ. ॥ २ ॥
भेदत्रयातिरिक्त परब्रह्म मीं सदोदित;
खुण ज़ाणती ते विमुक्त; दिगंबराचें पूर्ण मत. ॥ ३ ॥

(१०१६)

संसार श्रमद, विजनपर भवन रे !
विषद्रुम विषय, खरतर गुण रे ! ॥ १ ॥ धृ ॥ रे ॥
न रमे मन तुज़वांचूंन रे ! ॥ छ ॥
करणगण विकळ पडती; न येती ठाया रे !
दिगंबरा ! तुमची दुस्तर माया ! ॥ २ ॥

(१०१७)

संसारवन माये ! सोडिसी काये ? गो !
मनस माये ! तुज़विण न राहे वो ! ॥ १ ॥ धृ ॥
येइन सवें; धरिं कवि धरवे ? ॥ छ ॥ वो ! ॥
अज्ञान कांय करूं ? नेणें विचारूं वो !
दिगंबरे ! माये ! घेइं माझा भारू. ॥ २ ॥

(१०१८)

क्षणु विश्रांति नाहीं; करणें; कायी ? वो !
श्रम ज्ञाला सखिये ! यये स्थूळ देहीं वो ! ॥ १ ॥ धृ ॥
न सवे मातें येणें जिवें येथें वो ! ॥ छ ॥
नित्यशा करणगण ! चपळ मन वो !
दिगंबरे तुज्ञसीं नव्हे समाधान वो ! ॥ २ ॥

(१०१९)

अरे ! रे ! चित्तच्चोरा ! मनसहरा ! रे !
हृदयीं रीघतासी गुणतस्करा ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
कळलें तूझें; सोडीं मन माझें रे ! ॥ छ ॥
एकुदां सांपडसी; केउता ज्ञासी ? रे !
दिगंबरा ! धरीन मग जीवेंसीं रे ! ॥ २ ॥

(१०२०)

यातीसि ठाऊ नाहीं ! बहू पुसें कायी ? रे!
घडलें वीपरीत यये स्थूळ देहीं वो! ॥ १ ॥ धृ ॥
बोलतां उणें लाजीरवाणें वो ! ॥ छ ॥
याती चि पालटीली; मोहिली येणें वो !
दिगंबरे ! सखिये ! मज्ञ मीं नेणें वो ! ॥ २ ॥

(१०२१)

धर्मु अधर्मु ज्ञाला; उगला राहीं रे !
संगू चि न लगावा तुझ्या यये देहीं रे ! ॥ १ ॥ धृ ॥
न स र ज नी ऐसी करणी रे ! ॥ छ ॥
सर्वस्व हानि ज्ञाली; कुंठली क्रीया रे !
दिगंबरा ! अझुणी न सोडिसी काह्या रे ! ॥ २ ॥

(१०२२)

लागटपण कैसें न दिसे डोळां ? वो !
जीवीं जिवा न कळे अकळ कळा वो ! ॥ १ ॥ धृ ॥
कैसी मीं करूं ? यया केवि धरूं ? वो ! ॥ छ ॥
सोडितां भेटि बळें, न च्चले माये ! वो !

दिगंबरु ज्राडला; वेगळा नोहे वो ! ॥ २ ॥

(१०२३)

रूप अरूप घेतां, धरितां न ये वो !
येतु जातु न कळे; करणें काये ? वो ! ॥ १ ॥ धृ ॥
मोहिलें मावा; हरिलें जीवा वो ! ॥ छ ॥
धरितां यासि माये ! मज्ज मीं लाहें वो !
दिगंबरु न कळें; कळणे खाये वो ! ॥ २ ॥

(१०२४)

स्वभक्तजनबंधू परमानंदू वो ! अवधूतु सखिये ! करुणासिंधु वो! ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन डोळां माये ! वेळां वो ! ॥ छ ॥
विज्ञानजळधरू अपरां परू वो ! दिगंबरु सखिये ! स्वसुखकरू वो ! ॥ २ ॥

(१०२५)

श्रीगुरो ! योगिराया ! अमितवीर्या ! रे !
मुनिजनवरदा ! दत्तात्रेया ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयना स्मरें क्षणक्षणा रे ! ॥ छ ॥
श्रीपती ! त्रीपुदेशा ! परमपुरुषा ! रे !
दिगंबरा ! दुसरी न करीं आशा रे ! ॥ २ ॥

(१०२६)

त्रिगुणातीतरूपा ! स्वरूपानंदा ! रे !
जय ! जगजीवना ! अभयवरदा ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
तुज़विण नेणें येणें निजमनें रे ! ॥ छ ॥
चिन्मयानंदघना ! सगुणा ! येइं रे !
दिगंबरा ! येकुदां दर्शन देईं रे ! ॥ २ ॥

(१०२७)

क्रमले जन्म कोटी; नव्हे चि भेटी.
सखया ! देखयीन कैं कैं दृष्टी ? रे ! ॥ १ ॥ धृ ॥
सद्गुरुराया ! दत्तात्रेया ! रे ! ॥ छ ॥
हृदय फ़ुटताहे; भेदु न साहे. दिगंबरा ! येकुदां दाखवीं पाये रे ! ॥ २ ॥

(१०२८)

मागणें नाहीं दत्ता ! न करीं चिंता रे !
येकुदां भेटि देयीं; ज्ञायीं अवधूता रे ! ॥ १ ॥ धृ ॥
न राहे मन रे ! देवा ! तुज़वीण रे ! ॥ छ ॥
आणीक बोलयीन तरि मज़ आण रे !
दिगंबरा ! तूज़ मीं सवें असईन रे ! ॥ २ ॥

(१०२९)

नावडे मज़ योगू, पदिये संगू वो !
नयन क्षीण ज़ाले पाहातां मार्गू वो ! ॥ १ ॥ धृ ॥
लागलें ध्यान निरंतर स्मरण रे ! ॥ छ ॥
नावडे ज्ञानवादु अद्वयबोधू वो ! दिगंबरु भेटवा परमानंदू वो ! ॥२॥

(१०३०)

माये तूं बाप माझा मुनिजनराजा ! रे !
योगिजनवल्लभा ! सुतु मीं तूझा रे ! ॥ १ ॥ धृ ॥
न बोलें भावा ! अरे ! देवदेवा ! ॥ छ ॥
तूज़सीं दुरि होतां नुरे तत्वता रे !
दिगंबरा ! तुझेनि कळलें चित्ता रे ! ॥ २ ॥

(१०३१)

तूं तेथ मीं कवणू होयीं पां ! ज़ाणू रे !
मज़ मीं निर्धारितां तुझा अनुमानू रे ! ॥ १ ॥ धृ ॥
आत्मया ! रामा ! रे ! कळलें अह्मा ! ॥ छ ॥
सत्यासि द्वैत नाहीं वेगळें काहीं रे !
दिगंबरा ! नेंदिज़े अंतर काहीं रे ! ॥ २ ॥

(१०३२)

सरसर सैरा श्रवती धारा जळिं जळ जळधरु ज़ैसा;
श्रवणीं पडिला शब्द भज़े, परि भाऊ गमे मज़ तैसा;
निंब्रची म्हुण बाहीर पडता नुरवी ते आकाशा.
ऐसें गुणसंकीर्तन श्रवणीं ज़ालें मज़ महेशा. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! सांगपा ! अडकरूनी. कैसी हे करणी ? ॥ छ ॥

जळधरु सरिते ज्ञाले, भरितें निरें निर परतें जैसें;
इस्याचें सुख दृष्टी घेतां होताहे मज्ञ तैसें.
अधिष्ठान सत्तेचें आन्वित भिन्न पडे तें कैसें !
अवधूता ! तुझां पाहातां प्रतिमां कां होताहे ऐसें ! ॥ २ ॥
जळीं जळ चळ ढळे, चंचळ लहरी निमे ते जळधरीं.
गुणी गुणगण गुणसाधन करितां माने मज्ञ तेपरी.
चित्त विचंचळ करणी तरलें, निमालें तें आविकारी.
दिगंबरा ! तुज्ञकारितां हें मज्ञ दृढतर ज्ञालें भारी. ॥ ३ ॥

(१०३३)

वय चळ चळतां तैसी सरिता वाहातां दीसे पूरू.
गेलें पानिय न वळे पुडती, टाकी तें जळधरू.
देहाची गति तैसी ज्ञाले, मरण ययाचा पारू.
इतुलें ज्ञाणोंनि कैसें करणें ? न कळे तो वीचारू. ॥ १ ॥ ध्रु ॥
दत्ता ! कैं येसी ? सांगपां ! श्रमलों मायेबापा ! ॥ छ ॥
धन धन ह्मणतां जन जन वनिता चिंतेचा पुर वाहे.
दैवाधिन तें यत्नें करणें तेणें श्रमलों उपायें.
सेवटीं प्राचीन भोगीं न चुके; तृष्णा गगनीं न माये.
क्रियमाणेंविण उगलें न सवे, बंधन तें दृढ होये. ॥ २ ॥
चंचळ हें मन स्थिरता न धरी; करणगणान्वित ज्ञाये.
कामाचें बळ सहसा न चळे; न कळे कळलें नरा हें.
रोषावेषाविधानें सरिता अहिता लोटिति आहे.
दिगंबरा ! तुझें न टके स्मरण; धाव घेइं ल्वलाहें. ॥ ३ ॥

(१०३४)

थिल्लरिचें जळ खरतर तापिया ; मीना ! तळपसी कायी !
अवसु ये तवं चिंती जळधरु, सागरु टाकुंनि ज्ञायी.
संसारिक हें तैसें मनसा ; वय तत्र निश्चळ नाहीं.
अवधूतें विण कैंचें रे ! सुख ? यत्नु करीं ल्वलाहीं. ॥ १ ॥ ध्रु ॥
आतां कैं होईल दर्शन ? उतावेळ मन; ॥ छ ॥

प्राणु वोवाळीन; लागलें वो ! ध्यान. ॥ छ ॥
मृग तळमळिती, मृगजळ भजती, काये ते निवती तेणें ?
स्वप्नधनास्तव च्राळी भूमिका, धनीकु तो न गणणें.
विषयाचें सुख तद्वन्मनसा ! भान अवस्थागुणें.
दश दिशा परिभ्रमण करितां अर्थु विनाशा जाणें. ॥ २ ॥
सद्गुरुविण गति न गमे; गमितां श्रमितां तो विश्रामु.
संसाराचें बीज करपवी निर्मळु आत्मारामु.
प्रथमावस्थे साधन भुमि सांडिपां ! गुणधर्मु.
दिगंबराचें चिंतन करितां न पवसि खलुता श्रमु. ॥ ३ ॥

(१०३५)

चंचळ हें मन निश्चळ करितां मुनिजन श्रमले बापा !
अवधूता तुजवांचूंनि न कळे; यत्नु नव्हे तो सोपा.
भक्तीचें बळ लाहोंनि जडती; योगा भजती विकंपा.
तें निश्चळलें तुझें चि ह्मणवी; ऐसी हे तव कृपा. ॥ १ ॥ ध्रु ॥
आतां ह्मणें जासी दुरि धरितां; आत्मा तूं अवधुता ! माझा. ॥ छ ॥
तापस ह्मणती, दुर्जय पुडती सन्यासी सन्यासें.
ब्रह्मा तो परि अधीनु मनसा; हारविलें कैलासें.
ईश्वरु त्रिगुण गोप्ता तो; तो परि च्राळविला मनसें.
सत्याचें मुख असोनि नेणें माझें विषयरसें. ॥ २ ॥
मन स्फुरे तवं आधी स्थिरता; जडलें तें अविनाशी.
चंचळ परि तें सत्यें धरिलें भानाचा विनाशी.
सहजें आसन बंधन मुद्रा मन चि पडलें ग्रासीं.
दिगंबरा ! तुझी ऐसी चि करणी; केवि कळे येरांसि ? ॥ ३ ॥

(१०३६)

कुकर्म आधीं करणें. केलें तें विसरणें.
पाठीं फळ भोगणें. अचुक ठाकें ! ॥ १ ॥ ध्रु ॥
काये सांगों ? देवा ! भक्तांचीया मावा !
वायां विण गवगवा करिती मूर्ख ! ॥ छ ॥
भालें भाग्य पुरे; मग देवा वीसरे; इष्टमित्र सोयेरे तें धांवती.

त्यांचें चित्त धरी; देवाचें न धरी; वरैल कवणे परी ऐसा बहु ! ॥२॥
क्षणीक भाग्य सरे; मग दरिद्र संचरे; देवा देवा स्मरे पुडतोपुडती !
नवसी सेरें गुळें राज्य चि सगळें. दिगंबरा ! कळलें भक्तप्रेम ! ॥३॥

(१०३७)

करितां देवार्चन फळपत्रजीवन, आपण षड्रस अन्न भक्तु भक्षी.
वस्त्र अलंकार नित्य नवे उपचार; देवा ! जुनें वस्त्र जर्जर जालें. ॥१॥धृ॥
काये सांगों नवल भक्तांचें केवळ ? देवार्थ पोफळ वेचणें नाहीं. ॥छ॥
तस्करु सर्व हरी; राजा दंडी जरी; मग तो त्या देवावरि घाली भारू.
पूर्वकर्में तेणें न तुटती बंधनें; मग देवाकारणें दे गालिया. ॥ २ ॥
सुटला तरि ना गुता भाग्य भवन चिंता; तत्प्राप्ती सर्वथा विसरे देवा !
दिगंबरा! कुश्चिळ ऐसे भक्त खळ; तयांचें कुशळ कवण चिंती ? ॥३॥

(१०३८)

देहीं अहंकारु, क्रोधाचा सागरु, दंभु, मद, मत्सरु आंगीं जया;
कामनेचा पुरु, स्वस्वार्थी तत्परु, तयाप्रति गुरू वदती काये ? ॥१॥धृ॥
काये सांगों येक शिष्याचें चेटकपण ?
गुरुहूनि अभिमानु धरिती देहीं ! ॥ छ ॥
सर्वस्व मागणें; नवें नवें पूसणें; आपुलें काहीं देणें; तें नावडे.
विद्याबळ होतां, आणि समानता,
काहीं न कळतां, गुरुवरि क्षोभे. ॥ २ ॥
स्वस्वार्थावांचूंन न भजे काहीं मन;
त्या शिष्या ते घर वन कैसें नव्हे ?
दिगंबरा ! जाण, ऐसें कुश्चित जन !
तया तुझें स्मरण ज्ञान कैचें ? ॥ ३ ॥

(१०३९)

गुरुमुर्ती ! दातारा ! भक्तकरुणाकरा !
लीलाविश्वंभरा ! स्मरण तुझें विज्ञानाचें सार, भक्तां प्रेमकर,
विश्रांतीचें घर, जीवन माझें. ॥ १ ॥ धृ ॥
काये मागों तुतें याहूनि ? दातारा! तें चि सर्वेश्वरा नित्य देयीं. ॥ छ ॥
कमळाक्षतळोचना ! भवदुःखसंहरणा ! दत्ता ! निर्गुणगुणा ! निरोपाधी !

तुझेनि स्मरणें दिगंबरा ! ज़ाणें, भस्म होती क्षणें द्वैतबुद्धी. ॥ २ ॥

(१०४०)

परब्रह्मअवतारा ! विज्ञानसागरा ! न कळे सर्श्वेरा ! माया तूझी.
करितां गुणश्रवण, नामसंकीर्तन कुंठित ज़ालें मनप्रज्ञा माझी. ॥१॥धृ॥
काये सांगों ? सहज़ें मीं मज़ माझें नुमज़े,
केवळ स्वरूप तूझें निर्धारितां. ॥ छ ॥
योगियांचें ध्येय, शिवरूप अव्यय, स्वरूप तूझें ज्ञेय सर्वेश्वरा !
विश्वाचें कारण, कर्मत्रयदहन, श्रीगुरपावन, दीगंबरा ! ॥ २ ॥

(१०४१)

कवळूंनि अहंता माझें माझें ह्मणतां, बहुसाल अवधूता ! जन्म गेले.
मतीसि अंधकारु केवळ तुझा विसरु;
करितां हीं वीचारु वच न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
लाधलों मीं आतां तुझे हे चरण, कैसी करूं जतन देवा ! तुझीं ? ॥छ॥
बहु योग साधितां न कळे ज़ें तत्वता; तें श्रीअवधूता ! स्वरूप तूझें.
अनायासें, ज़ाण, सांपडलें निधान. दिगंबरा ! कवण भाग्य माझें ? ॥२॥

(१०४२)

परसिद्धि हरणें, ऐसें तुझें करणें; आमुतें लाजिरवाणें ! बोलतां न ये !
तस्कराची वृत्ति कवणें केली होती ?
साधूची प्रवृत्ति ऐसी काये ? ॥ १ ॥ धृ ॥
काये सांगों तुझें नवलाचें करणें ?
जनांचीं कां मनें हरितासि तूं ? ॥ छ ॥
भक्तां सर्व देणें ? कीं त्यांचें हरणें ? ऐसें पाहे मनें वीचारुनी !
हा गुणु तुज़पासीं. कां गा ! न सांडिसी ?
फळ तैसें पावसी, सत्य मानी. ॥ २ ॥
सकळ अर्थहीनु तूं होसी अगूणु, रूपें आकिंचनु, अवधारिपां !
दिगंबरपणें भ्रमसी वनेवनें; आतां भक्तांकारणें करीं कृपा. ॥ ३ ॥

(१०४३)

भाव देखोनिया प्रकटु ज़ाला, आमृताचा मेघु ज़ेवि वोळला. ॥ १ ॥
रूप कां चोरिलें ? रे ! आत्नयां ! सुंदर सावळें रे ! ॥ छ ॥

मायया मोहिती मोहिसी कायी ? दिगंबरा ! तूंचि ब्रह्म अदेही ! ॥२॥

(१०४४)

॥ मल्हार कांबोद ॥

जन हें वन वजिन साजणी ! ज़ालें मज़ श्रीदत्तें वांचूंनी.
ने दखे हीतकर वो ! कव्हणी ? करा वेगीं तेणेंसीं मीळणी. ॥१॥धृ॥
अरे ! अरे ! कमळनयना ! कई कई करिसी करुणा ?
बाधिताहे वियोगुवेदना ! देवा ! धीरु न धरवे मना ! ॥ छ ॥
कवण दुष्ट दुरित न कळे !
नयनीं रूप न दिसे सावळें. दिगंबरीं मनस गुंतलें.
कयी भेटि देयील ! न कळे. ॥ २ ॥

(१०४५)

सजळ जळचंचळ नयन; देवा ! तुझे आठवती गुण.
वियोगदुःखसायकीं हें मन; फुटताहे हृदय कठिण. ॥ १ ॥ धृ ॥
कित्ती काळु पाहों मीं वाटुली स्वजनजनवीजनी येकली ?
देवा ! प्रीति कासया सोडिली ? तेणें मति ज़ाहाली आंधळी. ॥ छ ॥
देवा ! अंध, मूक मीं बधिर; कवण तुझें दाखवील घर ?
करणगणवीहिन शरीर दिगंबरा ! ज़ाहालें अचर. ॥ २ ॥

(१०४६)

समळ जळचंचळ सरिता भवदकर्मवासना पाहातां.
वायां मज़ लोटितासि दत्ता ! बहु रे ! बहु होति आहे वेथा. ॥१॥धृ॥
पाहीं, पाहीं परतोंनि पाहीं रे ! क्षणु येकु निश्चळु राहीं रे !
शब्दु येकु बोलोंनि ज़ायीं रे ! पुढें कैसें करूं मीं कायी ! रे ! ॥ छ ॥
पुडती मुख कई मीं पाहिन ! संगु तुझा केधवा लाहिन ?
दिगंबरा ! बोलपां ! वचन. बहू मज़ न करीं कठिण. ॥ २ ॥

(१०४७)

मायेचें मीं बाळकु धाकुलें, गुणहीन मूळिचें येकलें.
वनीं तिया मज़ वो ! सांडिलें. प्रयत्नु तो कांहींचि न चले. ॥१॥धृ॥
आतां कित्ती करूं वो ! रुदन ? अतिक्षिण ज़ाहाले नयन.
प्राणकोश वीकळ चेतन; देवा ! मज़ कां नये मरण ? ॥ छ ॥

चटपट लागली करणा; कवणाप्रति येइल करुणा?
जीवीं दुःख न साहे वेदना; दिगंबरे ! दावी वो ! वदना. ॥ २ ॥

(१०४८)

हृदयीं मज्ञ पेटला अनळु; प्राणु माझा ज्ञातसे विकळु.
तयाप्रति सारथी अनिळु; तुटोनि बाह्य पडताहे ज्वाळु. ॥ १ ॥ ध्रु ॥
दीर्घस्वरें गगन गर्जवीं; दत्ता ! तुज़लागि मीं आळवीं.
वियोगवडवानळु निववीं; येथ मज्ञ सर्वथा नेठवीं. ॥ छ ॥
विसरु नये आणितां येथुनि; क्षणक्षणा आठवसी मनी.
ते चि बाण हृदयभुवनी खरतर लागती मीपणी. ॥ २ ॥
अरे ! करुणामृतांबुधरा ! कई कई वोलसी ? शंकरा !
वाट तुझी पाहें दिगंबरा ! भेटि देयीं श्रीगुरो ! माहेरा ! ॥ ३ ॥

(१०४९)

तुज्ञलागि साधिलें तपस, योगवन लंघिलें बव्हस.
तुझें ऐसें कैसें बा ! मनस कठिण हो दिवसेंदिवस ? ॥ १ ॥ ध्रु ॥
आतां काये पडणीं पडिज्ञे ? नीडळ हें भूतळीं पीटिज्ञे ?
शरीर हें पावकीं हविज्ञे ? मोहो तुज्ञ कैसेनि उपज्ञे ? ॥ छ ॥
क्रियायोगीं सांडी गणना, तीर्थ परिभ्रमतां वेदना.
दिगंबरा ! न ये कां करुणा ? ज्ञाला सीणु सांगीज्ञे कवणा ? ॥ २ ॥

(१०५०)

वियोगदुःखें पडली त्रिकळ; करणगण ज्ञाहाले शिथळ;
मनस ज्ञाहालें अंतरीं निश्चळ; विरोनि गेले मीपण विरल. ॥ १ ॥ ध्रु ॥
आत्मा दत्तु आला वो ! तेव्हेळी गळितगुणबोधनाचा मूळीं.
रूपें रूप अवघें कवळी; वाऊ नाहीं; वेच्चली पोकळी. ॥ छ ॥
अवस्थेची मोडली पाहाणी; भानलोपु ज्ञाहाला गगनीं.
गुणी गुण कुंठली करणी, द्रष्टेपण सोडितां साज्ञणी ! ॥ २ ॥
अवो ! अंतकालिच्ञा सोयेरा न साहे स्वभाऊ या दुसरा.
भेदु नाहीं यया दीगंबरा; ज्ञाणवला यये अवसरा. ॥ ३ ॥

(१०५१)

ऐसा दिनु कैं वो ! लाहिन ? नयनीं रूप सावळें पाहिन;

हृदयीं दोहीं बाहीं आळंगिन; चटपट लागली येथुन. ॥ १ ॥ ध्रु ॥
दत्ता ! मी रे ! पोटिचें लेंकरूं. काये करूं ? न पडे वीसरू.
धरीं, परि न धरवे धीरू. भवदुःख केवि मी सावरू ? ॥ छ ॥
कसिया मी पाल्उ घरीन ? आतां तुजसंगें मी येईन.
दिगंबरा ! न वटे कठिण. बहु दुःखी जाहालेंसे मन. ॥ २ ॥

(१०९२)

आजि प्रलयानलु पेटला ! मजवरि पर्वतु पडिला !
दिशाभ्रमु सखिये ! जाहाला ! करद्वय पोटितीं नीडळा ! ॥ १ ॥ध्रु॥
अवधुतु गेला वो ! सांडुनि, सखा मज ये भवविजनीं.
बोलविता न बोले वचनीं; अश्रुपात चालिले नयनीं. ॥ छ ॥
काये करूं ? जावो मी केउती ? वियोगु माये न साहावे चित्तीं !
दिगंबर केधवां पुढती, नेणे, मज देयिल संगती ? ॥ २ ॥

(१०९३)

सुंदररूप सावळें डोळस येणें माझें हरिलें मनस;
विषयरस जाहाले विरस; गणिताहे दिवसें दिवस. ॥ १ ॥ ध्रु ॥
देखयीन कयी वो ! नयनीं ? तगबग लागली साजणी !
अवधुतु न ये कां अझुणी ? उतावेळ संगती लागूंनी. ॥ छ ॥
सांगे काये कागु वो ! सकुण ? माझा अनुस्पंदे हा नयनु.
दिगंबरें आजि वो ! सुदिनु होइल; ऐसा गमे अनुभानू. ॥ २ ॥

(१०९४)

पैलु, पाहा, येतुसे कवणु ? नव्हे कीं वो ! कमळनयनू !
सादु घालूं काये मी येथुंनु ? सखिये ! माजा न राहे वो ! मनु ! ॥१॥ध्रु॥
अरे ! अरे ! सज्जनजीवना ! अरे ! नीरजाकृतनयना !
अरे ! अनसूयेच्या नंदना ! देयीं सादु काळाग्निशमना. ॥ छ ॥
योगिजनवल्लभा ! राजया ! अवधुता ! आत्मयां ! माझया
स्वजनश्रमहरणा ! सखया ! दिगंबरा ! साधुजनप्रिया ! ॥ २ ॥

(१०९५)

भुजा दंडु लोडवी चालतां; विदगदु जाणवे पाहातां.
दुजा संगु नावडे अवधुता. होय वो ! सादु घालिन मी आतां. ॥१॥ध्रु॥

अरे ! अरे ! माझया जनका ! अरे ! अरे ! त्रीपुरनायका !
योगिजनवल्लभा ! बोलः:– कां तुझी खुण नेणवे आणिकां ! ॥ ध्रु ॥
योगिजन लक्षिती लक्षणें; तयांचें विनिर्फळ देखणें.
वेदवादु कुंठली वचनें; शास्त्रवादीं सर्वथा दूषणें. ॥ २ ॥
तुझी खुण आत्मया ! नेणवे; तुं चि तूं जाणसी बरवें.
आह्माप्रति सर्वथा आथी ठावें; दिगंबरु ह्मणौनि बरवें. ॥ ३ ॥

(१०९६)

आजि दिनु संभ्रमु सोहोळा सुंदरु दृष्टी देखिला सावळा.
अवधूतु चिद्धन पूतळा जीवाहूंनि प्रीयू वो ! जवळा. ॥ १ ॥ ध्रु ॥
चरण मी झाडीन कबरी. परमानंदु न स्माये अंतरीं !
दयामृतघनु वो ! अंबरीं देउ‍ॐ वो ! बोलला सुंदरी ! ॥ छ ॥
जीउं बलि देईन, देयीन ! ऐसें रूप कयीं मी लाहिन ?
दिगंबरु माझें वो ! चिद्धन, प्राणु प्राणा, बाइये ! जीवन. ॥ २ ॥

(१०९७)

त्रिगुणसंन्निपातु वो ! ज़ाहाला ! स्वरूप मति स्पंदु हारपला !
फांटा जनवादु संचरला ! जनु तेणें न राहे उगला ! ॥ १ ॥ ध्रु ॥
वैद्यराजु सद्गुरू सखिये ! अवधूतु न दिसे बाइये !
अंतकाळु हा चि वो ! गोरिये ! स्वरूपें जीत मरणें मेलिये ! ॥ छ ॥
अहैतुक प्रलपे वचन. अहैतुक पाहाती नयन.
मृषा सत्य ज़ाणवे हें भान. करणगण स्फूरती सगुण. ॥ २ ॥
गर्वगुणें तंद्रि का लागली ? कामक्रोध ये तिस आकळी.
दिगंबरु आठवे तेव्हेळीं; ऐसें नाहीं भेषज ज़वळी. ॥ ३ ॥

(१०९८)

शब्द निःशब्द कंठले; ज़ेथें वेद परतले;
दत्तनाम तें येकलें नित्य घेईन वो !
कोटि चंद्र शिवळ, शब्दवाद वृत्तिमूळ,
याचें वदनकमळ दृष्टी पाहिन वो !
गुण करितां श्रवण, रूपीं मिसळलें मन.
तें मीं स्वरूप सगुण कयी लाहीन ? वो !

भवदुरितहरण द्रवे ज़ेथूंनि जीवन;
ते मीं हृदयीं चरण नित्य ध्याइन वो ! ॥ १ ॥ धृ ॥
तो माझें जीवनधन वो ! बाइये ! माझें जीवनधन वो !
माझें जीवनधन अवधूतु स्वजन प्राणीं वोवाळीन वो ! ॥ छ ॥
योगमतीचा विस्तारु, ज्ञानगुणें जळधरु,
भाग्ये ज़ोडला ईश्वरु गुरु बाइये ! वो !
तेणें द्वैत निमालें; माझें मीपण पारुषलें;
रूप अरूपीं वेच्चलें गोरिये ! वो !
नेणें अवस्थेची खूण; माझें वेच्चलें मीपण;
तत्वीं ज़ालें समाधान; ज़ाण, सखिये ! वो !
दिगंबरीं आदरु; ठेला सकळ विस्तारु;
अहंमतीचा वीसरु; पारु गेलियें वो ! ॥ २ ॥

(१०९९)

लक्ष ठेवितां मीपणीं देह हारपले तीन्ही;
नेणे अवस्था; करणीं सर्व राहिलीं वो !
गुणस्वभाव कुंठले; दृश्य भान वीतूळलें;
शून्याशून्यत्व आतलें स्थिति उरली वो !
ज्ञाताज्ञेयसंवेदन, कर्तासकार्यकारण,
द्रष्टा दृश्येंसीं दर्शन; खूण मोडली वो ! ॥ १ ॥ धृ ॥
वो ! मीं दत्ती वेच्चली, गेली वो ! बाइये ! दत्ती वेच्चली गेली वो !
दत्ती वेच्चली गेली; दत्तमय ज़ाहाली; दत्ते प्रबुद्ध केली वो ! ॥ छ ॥
विमळ चैतन्यघन ज़ाहालें सखिये ! मन; माझें स्वरूपीं लीन ज़ाहालें वो !
योगवियोगकल्पना ते मी न करी वासना;
गुणे न ये गुणु गुणा; खुणा न च्चले वो !
मीतुंपणाचें स्फुरण, क्षीण ज़ालें संवेदन;
ध्येयीं कुंठलें वो ! ध्यान; मन वारलें वो !
दिगंबरीं नीजानंदु नित्य भज़तां प्रबोधु,
तया सुखास वादबोधु न कळे वो ! ॥ २ ॥

(१०६०)

द्वैतदृष्टीवेगळें मनाबुद्धी तें नकळे.
वित्त होतें संग्रहिलें; नेलें कवणें वो !
कवण आला वो ! पारिका ! परम दुर्गम भूमिका.
रीघु नव्हे वो ! आणिका; ये कारणें वो !
करितां ऐसी च्चाळणा; चित्त आडळलें गुणा;
वित्त देखिलें सिवणा; कैसें काढणें ! वो !
अवधूताचा चरणी माझें चिद्घन साज़णी!
याची नवलकरणी! कैसें करणें! वो! ॥ १ ॥ धृ ॥
हा मायावी सगुणु वो ! बायीये ! मायावि सगुणु वो !
मायावि, सगुणु, सारिसिजलोचनु, तत्वता गुणहीन वो! ॥ छ ॥
मागतां पडैल तूटि; योगिराजुधूर मोटी;
डोयी घालीन पोटीं सखिये ! वो!
नाइके परावी मातु; प्राणु माझा अवधूत;
कैसीं झाडीन पंथु ! बाइये ! वो!
दोन्ही चरण धरीन; वित्त मार्गोनि घेयीन;
त्याची दासि मीं होयीन; ज़ाण, गोरिये ! वो!
तो ज़रि न सोडी चिद्घन; तरि मीं सर्व चि ज़ायीन;
पुडती न यें परतोंन प्राणवेसिये वो! ॥ २ ॥
काये पां ! कैसें होयील ! मन होताहे व्याकुळ;
करूं नये आंगवळ; स्थळ थोरलें वो!
ठेउंनि वासनेची ऊरि, पासीं असतां उभी दूरि,
चरण धरूंनि अंतरीं मनें अचळें वो !
सगुण तें चि तें निर्गूण, ऐसी प्रकटली खुण.
आपणासहित चिद्घन माझें दीधलें वो ! ॥ ३ ॥

(१०६१)

सासुरवास.

माये खालील लेंकरूं; चित्त कैसें दृढ धरूं ?
मातें सासुरें संसारु भरु वीपर्यांच्चा .

कामु वडील सासुरा; अनुज क्रोधु त्या दूसरा;
कृतकर्माच्ना मातेरा; माये ! वेगु त्यांच्ना.
कामुकल्पना वीत्रसी सासू बैसली मूळेंसीं;
तृष्णा दुसरी परियेसी; थोरु भेऊ तीचा !
त्याचें विपार संतान, नानावीध गोत्रजन,
मातें केवळ मरण माये ! संगु त्याच्ना. ॥ १ ॥ धृ ॥
कैसें कठीण मन ! वो ! मायेचें कैसें कठीण मन ! वो !
कैसें कठीण मन ! गेली मज सांडून !
बहु, लागले दीन वो ! ॥ छ ॥
मायेचें दाहां घरिचें हें अन्न; कैसे रखूं येणें प्राण ?
मातें वीषेंसीं समान माने बाइये ! वो !
सेवा करितां ययांची, साहे तूटि शरीराची;
वय गेलें अवघें चि माझें गोरिये ! वो !
जरा पावली लवलाहे; मागें काळु दांत खाये;
धरूं कवणाचे पाये ! सांग, वेसिये वो !
दिगंबरा पां ! ज्ञाउनि कव्हणी, करा ऐसें ज्ञान::—
मातें दावा पां ! वदन त्याचें सखिये ! वो ! ॥ २ ॥

(१०६२)

तुझें करितां सेवन, गुणनामसंकीर्तन,
सत्यमहिम्नश्रवण, चित्त पारुषलें.
देह भावनावीकळ; ठेलें वासनेचें बळ;
गुणमतीचें पाल्हाळ; डाल छिन्न ज्ञालें.
देहभावना उडाली; भाना ते चि गति ज्ञाली;
अहंमाति पांगूळली; चित्त न विच्नळे.
शुद्ध स्वरूप निष्कळ; सहजें नीवळलें मूळ;
व्योम गीळूंनि वीशाळ थाळ कोंदाटलें. ॥ १ ॥ धृ ॥
तव नामस्मरण तारी रे ! वरदा ! नामस्मरण तारी रे !
नामस्मरण तारी यये भवसागरीं ! दूजें न पवे सरि रे ! ॥ छ ॥
वरदा करितां मूर्तिध्यान भेदमतीदहन, गुणी गुंपती त्रिगुण गुणगण माझे.

रविचंद्र लोपले; तेजोमय नीवळलें;
रूप नीगमा न कळे सत्य, सत्य, तूझें !
येर साधनें अव्हाड; योग न लगती गोड;
ज़ाणपणाचें प्रचंड काये करूं वोझें ?
दिगंबरा ! तूझी आण, ऐसें सुफळ भजन.
आतां यावरि दर्शनफळ कोण तूझें ? ॥ २ ॥

(१०६३)

वैराग्य वाचूंनि देवा ! नावडे संन्यासु जीवा.
जनु वायां विण मवा आसक्तु किज़े.
पदार्थपूर्वक ज्ञान, महावाक्य श्रवण,
तैसें तें मी प्रलपन केवि पां ! मानूं ? ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञानहीन कैसा गुरु मानुं ये तो इश्वरु ?
तेणें कैसा संसारु तरीज़े ? देवा ! ॥ छ ॥
येक मनस चंचळ; वरि समस्त योगबळ;
तितुलें तें निर्फळ कैसें न ह्मणों ?
रंगेविण ज़ैसें कांहीं माणिका मोल चि नाहीं;
दिगंबरेंविण देहीं तेवि साघम. ॥ २ ॥

(१०६४)

कुशळत्व बहू, देहीं प्रेम विश्वासु नाहीं;
तो भक्त संदेही केवि मानिज़े ?
अनुभवहीन वरी शास्त्रें पढला च्यान्हीं;
तयाचे देखोंनि थोर केवि मी भज़ों ? ॥ १ ॥ धृ ॥
घ्राणेंविण मुक्ताफळ घातलें ही सूढाळ;
काये तें मुखकमल तैसेनि शोभे ? ॥ छ ॥
यातिसी ठाउ चि नाहीं; कर्म आचरे देहीं;
तयाचा आचारु कांहीं कांहीं मानीज़े जगीं ?
दिगंबरें येकें विण अपार अवलंबन
तें व्यर्थ, ह्मणौन सहज़ कळे. ॥ २ ॥

(१०६५)

सकळकरणसंगु येणेंसीं काइसा योगु?
शरीरें गगनमार्गु चालतां न ये.
अवस्थांचें स्फुरे भान तवं कैंचें ब्रह्मज्ञान?
निर्विकल्प समाधान बोलतां न ये. ॥ १ ॥ धृ ॥
ज़ाणणें, ना नेणणें, विसरु ना स्फुरणें.
सहजीं सहज़पणें समाधि असे. ॥ छ ॥
देहसंगु न सूटे, भान ज़वं न तुटे; तव तें कैसेनि भेटे निजात्मपद ?
अभावाचें देखणें तें ही लक्ष सोडणें;
दिगंबरीं पावणें तें ऐसें ज़ाणिज़े. ॥ २ ॥

(१०६६)

कासया सेविसी वन ? लाविसी कां लोचन ?
तुझें तुतें जव ज्ञान प्रकटनाहीं ? कासया आसन, ध्यान, एकांतसेवन ?
ज़रि मीं तें कवण ? न कळे ऐसें ! ॥ १ ॥ धृ ॥
कासया सेविसी गुरु ? वाहसी पुस्तकभारु ?
तुझा असाक्षात्कारु तूज़ ज़ैं असे. ॥ छ ॥
कासया बोलसी खूणा ? कासया धरिसी मौना ?
कासया करिसी नाना विकार देहीं ?
कासया दंडिसी काया ? न तुटे संसारू माया.
दिगंबरा येका तया शरण ज़ाईं. ॥ २ ॥

(१०६७)

कमळनयन गुणीं भरलीं कमळें दोन्हीं.
कमळें कमळें कमळीं धरूनि देईन येक.
कमळीं कमळा थारा. अरे ! अरे ! दीनकरा !
स्थीरु राही. सोइरा पाहाणें असे. ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! सखिये ! हें कमळ स्पंदत आहे !
कमळनयनु नये ! काये मीं करूं ? ॥ छ ॥
सरोजें सरोवरें ज़ालीं; सरोजीं जळचेंर मीळीं;
सरोजां गती कुंठली: न चले कांहीं !

सरोजीं लागती बाण; सरोजीं गुंतलें मन; सरोज मीं देईन. भेटी करा! ॥२॥
कमळनयनें वीण कमळजा, जन, वन, कमळनींप्रति मरण पावतें ज़ालें!
कमळकोशु वो! घाला! कमळीं वर्षावो केला!
कमळीं प्रकटु ज़ाला! दिगंबरू! ॥ ३ ॥

(१०६८)

दाहामाजी उठी, बैसे, तया कां लागलें पीसें?
वार याच्नें माये! कैसें खेळतें आंग?
'झाड तरी तें बरें,' ऐसें बोलती चतुरें;
पायां पडती पामरें आसनावरी. ॥ १ ॥ धृ ॥
आठामाजी अतिग्रहो नामें मंडळीं राहो;
अष्टांगें कासया देहो विकळु किज़े? ॥ छ ॥
चंद्राचि घेउनि कळा उजळिज़े सुनीळा; इंद्रें इंद्रु कां घेला वामनु सये!
दिगंबर गुणा गुणी प्रकटला रजनी,
दिगंबरु नीजध्यानी प्रकटु होये. ॥ २ ॥

(१०६९)

काळातें नाकळे काष्ट सळे ज़ेणे करितां;
हरि हर ते ही परिशंकले पाहातां. ॥ १ ॥ धृ ॥
येउनि नयनीं बैसलें; मनस हिरोनि नेलें बाईये! वो! ॥ छ ॥
जित चि जीवासि ज़ेणें होये सिद्ध मरण.
दिगंबरअवशातें भवमतिहरण. ॥ २ ॥

(१०७०)

जवाच्नें मरण होतें आइकलें श्रवणी.
अजितें नयन गुणी देखिलें गे! माये! ॥ १ ॥ धृ ॥
चित्त दुचित पडलें वो! सखिये!
करणधर्म सोये अंतरलीं माझे! ॥ छ ॥ २ ॥
सकळ विषयसुख आतां कैंच्नें पुडती?
दिगंबर मज़प्राति प्रकट ज़ालें!

(१०७१)

सकळ विषय सुखकर मतिहरणा!

भवसंजीवनगुणगहननिर्दळना! ॥ १ ॥ धृ ॥
तुज्ञ भोण दत्ता! केउतें बाळपणें?
तुझेनि पूर्णपणें नुरिज़े रेया! ॥ छ ॥
सुखद स्वजन, जन, धन मतिदहना!
दिगंबरा! तुझें आतां सांगिज़े हें कवणा? ॥ २ ॥

(१०७२)

श्रवणीं पडलें पुरें; मन आंगीं झगटे;
प्रकट चि नेटे पाटे मनस हरी. ॥ १ ॥ धृ ॥
तेणेंसीं संग पडला गे! बाइये! गेल्यां परति नोहे पुडती मज्ञ. ॥छ॥
नयनीं पडे तइ त्रिपुटीसि विलयो. दिगंबरें विसरली अवघाचि विषयो. ॥२॥

(१०७३)

योगिया लाविलें वेड गुणमतिहरणें!
सदनें सांडूनि वनें भ्रमती कैसे? ॥ १ ॥ धृ ॥
तेणेंसीं मज्ञ येकांतु घडला. प्रयत्नु न चले; केला; कुंठलियें. ॥ छ ॥
देव देवपण भोंति; न करिती स्मरण;
दिगंबरें धरिली; जीवासि आलें मरण. ॥ २ ॥

(१०७४)

गुणाच्ना नव्हे मी; यासि कैसि करूं? साज़णें!
दिधलें न पुरे; उठी जीवाचेनि मरणें. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता! क्षण येकु जाइं रे! परुता.
परावी नेणसी वेथा अपरवशा! ॥ छ ॥
जीवें चि नूरिज़े. मग काये करूं? साज़णे!
दिगंबरें जन ऐसें ठकियेलें अगुणें! ॥ २ ॥

(१०७५)

कमळनयनरूप देखिलें वो! नयनीं;
मनस गुंतलें गुणीं; उपडे चि ना. ॥ १ ॥ धृ ॥
भेटि ज़ाली. मीं तृप्ति न लाहें! पुडतोपुडती सुख ऐसें चि पाहें! ॥छ॥
शुद्ध. श्यामळ परब्रह्म; वो! गोरिये!
दिगंबरु अनुपम्य अवधुतु बाइये! ॥ २ ॥

(१०७६)

करितां श्रवण मन चि गुंतलें चरणीं;
स्मरणें तन्मय भाव; अवधूत वदनी. ॥ १ ॥ धृ ॥
नावडे मज तेणें वीण दूसरें.
मनस गुंतलें भरें; परति ने घे. ॥ छ ॥
श्रवणाचें सुख मज नयनीं सांपडलें.
दिगंबर येणें पंथें विचरतां देखिलें. ॥ २ ॥

(१०७७)

चरणकमळरसरत मधुकर ते
भ्रमति सज्जन जन मना बुद्धी परुते. ॥ १ ॥ धृ ॥
तें पादांबुज धरीन मी हृदयीं; आणीक न मगें कांहीं दत्तात्रया ! ॥ छ ॥
श्रीमुखकमळ तुझें अनुपम्य जगतीं !
दिगंबरा ! मन माझें वरूं तेथ वसती. ॥ २ ॥

(१०७८)

वाटु पाहातां वेळु ज़ाहाला, वो ! बाइये !
श्रीदत्तु गुंतला कोठें ? अझुणी कां न ये ? ॥ १ ॥ धृ ॥
तो माझा प्राणु ! आत्मा ! सखिये !
मन हें न धरे. माये ! काये करूं ? ॥ छ ॥
उपाये करितां, सर्व विपरीत ज़ाहालें !
दिगंबरें अवृत्ती अंतर भरलें. ॥ २ ॥

(१०७९)

अरे ! मुनिजनाप्रिया ! पंकजनयना !
श्रीदत्ता ! सद्गुरू ! भवभयकरमथना ! ॥ १ ॥ धृ ॥
आत्मा तुं, जीवीं जिवलगु सोयेरा.
न भजें तुज़वीण परा, दीनपति ! ॥ छ ॥
कालाग्निशमनरूपा ! निजगणवरदा !
दिगंबरा ! परब्रह्म तूं गुणविषदा ! ॥ २ ॥

(१०८०)

आपुला होउंनि मज़ दुरि कां बा ! धरिसी ?
तुज़सी अंतरें होतां पडयीन तमसी. ॥ १ ॥ धृ ॥

पुडती संदेहो; कवणासि पाहे पां ?
आत्मया ! मायेबापा ! दत्तात्रेया ! ॥ छ ॥
द्रष्टा तुं ह्मणउंनि प्रतीति ज्ञाहाली.
दिगंबरा ! अतःपर कर्मज न घली. ॥ २ ॥

(१०८१)

निशि ना दिवसु ऐसें अनुदित पाहालें;
रवि ना चंद्र; तेथें देखणें हारपलें. ॥ १ ॥ धृ ॥
स्वप्न कीं मज्ञ जागृति न कळे. बोलतां बोलणें बोलें पारुषलें. ॥ छ ॥
सुषुप्तीचें सुख वीण सुषुप्ती भरलें.
तिहिचें ज्ञाणें दिगंबरें माझें हरिलें. ॥ २ ॥

(१०८२)

अवनी, गगन, वायो, अनळु ना जीवन,
प्रपंच न दिसे; दृश्य, अदृश्य गगन. ॥ १ ॥ धृ ॥
देहाची खुण न दिसे, वो ! सखिये ! उमज़ु उमज़ा न ये. काये करूं ! ॥छ॥
पाहातें पाहातां तेथें हारपलें पाहाणें.
दिगंबरीं अनुसरु ज्ञाणतें चि नेणणें ॥ २ ॥

(१०८३)

डोळां न दिसे; परि देखणें अवघे.
पाहातां पाहाणें माये ते ही मज्ञ आडवें. ॥ १ ॥ धृ ॥
सारा मीपण आंगीं न धरवे.
ययाचेनि अनुभवें गादलिये ॥ छ ॥
अभावें भासलें भावभावें मीं न धरीं.
दिगंबरीं अनुसरु गुण वृत्ति न करीं. ॥ २ ॥

(१०८४)

स्थूळ शरीर माझें हारपलें गगनीं.
गगन कवण मातें दाखवा कां नयनीं ? ॥ १ ॥ धृ ॥
रूपें अरूप रूपस पाहातां
न ये, वीसरतां, घेतां, धरिता, मज्ञ. ॥ छ ॥
असेषा पाक काही. अगुण ना सगुण.

दिगंबरु प्रकटला ! नुरवी तें गगन !

(१०८५)

पाहें तें न दिसे. ऐसें काय नेण. ज़ाहालें ?
पाहाणें येउँनि मातें आंगेंसी ज़डलें. ॥ १ ॥ धृ ॥
सारा वो ! माये ! माझें पाहाणें ! पाहातां पाहातेपणें गादलिय ॥ छ ॥
त्रिपुटी न साहे. गुणी गदळली गभिता;
दिगंबरु प्रकटला तदभावसविता. ॥ २ ॥

(१०८६)

आपणु चि दीपु दृष्टि आपणयां पाहाणें;
पाहातां पाहातां गुणें सूटलियें. ॥ १ ॥ धृ ॥
यावरि ज़ालें तें कैसेनि बोलवे ? जीवें मरों ! दैवें वाचलियें ! ॥ छ ॥
सुखाची ज़ाणीव ज़ाणे ज़ाणपणें क्षरली.
दिगंबरीं उपरति सहज़ चि उरली. ॥ २ ॥

(१०८७)

अभाव अपर दळीं जनमति क्रिडतां
ठक चि ठेलियें. येथें चंद्र ना सविता. ॥ १ ॥ धृ ॥
पाहें तें दृश्य मीं माजि अवेव, पाहातें पाहाणें जीवें साडियेलें. ॥छ॥
काळु न गणवे माझी विपरीत काळना !
दिगंबरु दिसे, तईं अनुसरु मरणा ! ॥ २ ॥

(१०८८)

अभावलेपणें रूप रूपलें. वो ! सखिये !
झाडितां न झडे मोरे ! काले कस्र ? ॥ १ ॥ धृ ॥
आतांचे मज़ भान चि पाहिें, ठेले सरूनि माये ! पाहातिसें. ॥ छ ॥
विघरलें घृत तें चि कणिकासीं निखळ.
दिगंबर गुणहिन गुणमय सकळ ॥ २ ॥

(१०८९)

छायेचें कवण मान ? पाहेपां वो ! सखिये!
धरूनि आपुली सोये अनुचरला. ॥ १ ॥ धृ ॥
येउनि खांदीं बैसली: पाहाता नयनु ज़ाली; परति ने वे ते. ॥ छ ॥

प्रतिबिंब बिंबित अनुगत ज़ाहालें. दिगंबरीं दुज़ेपण अवघें पारुषलें. ॥२॥

(१०९०)

मुखीं दर्पण प्रतिबिंब ज़ाहालें.
मुखीं मुख उमटलें, पाहातां न ये. ॥ १ ॥ धृ ॥
मीं माझें ज़ाणें: ज़ाणपण न सरे;
मनस मारूनि मनें भोगिलिसे. ॥ छ ॥
मतीचा गंगळु मातें न घाला ये श्रवणीं.
दिगंबरें न साहावे अवघी चि करणी. ॥ २ ॥

(१०९१)

प्रतिबिंबी रविबिंब गुणगुप्त ज़ाहालें.
पाहातां डोळस मेले; गवसे चि ना! ॥ १ ॥ धृ ॥
पाहिज़े ज़वें, तवें तवें न कळे;
डोळस डोळया डोळे चळती गुणीं! ॥ छ ॥
दिगंबर गुणवेधें सापडलें श्रवणी
श्रवण गीळूंनि मनी स्थीरावलें. ॥ २ ॥

(१०९२)

श्रवणी देखिलें रूप नयनी न धरवे;
नयन पावला खूण श्रवणी नाइकवे. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें माये! येक नवल चि ज़ाहालें;
बोलणें बोलतां बोलें बगळिये. ॥ छ ॥
अवस्थे चूकवी आ गुणमयी पाहातां
दिगंबर अवृत्ती सुखमय भज़तां. ॥ २ ॥

(१०९३)

सकल ऋषिपुत्र श्रीदत्तासमवेत बैसोनियां एकस्थानीं
योगें, भक्तिज्ञानें श्रीदत्तीं रंगले; वदने ज़ाले प्रीतिवचनी;
आनंदें डुलती; प्रेमें पुंजाळले; योगामृतें ज़ाली धणी.
येक सर्वांहूनि रूपी चि आसक्त: नित्य निष्ठा मूर्तिध्यानी. ॥१॥धृ॥
रे! बापा! सुखमय विश्व ज़ालें. रे! सप्त सागर सुखें भरले!
परमानंदा! तुझें रूप सुखमय दृष्टी असतां देखिलें. ॥ छ ॥

येक ह्मणतीः:—‘ बापा ! तुझेनि वचनें स्तब्ध ज़ाले करणगण;
गुणाच्ने व्यापार सर्व ही राहिले; निश्चळ ज़ाहाले मन;
अवस्थेची प्राप्ती कधी चि न कळे; निमालें वृत्तिस्फुरण;
तुझा ठायीं आह्मीं कैसे मीसललों ? जीवनीं जैसे जीवन.’ ॥ २ ॥
येक ह्मणतीः— ‘ आह्मीं आमुतें ज़ाणतां मी मी ऐसें मात्र स्फुरण;
पुडती निर्धारितां आइके, योगिराया ! तूं सत्ता, चैतन्य !
आह्मी यंत्र, तूं बा ! यंत्री ! अवधुता ! विचेष्टीं तुज़अधीन !
अवयवा सारिखे वर्तों तुझा आंगीं ! न करूं स्वहितध्यान !’ ॥ ३ ॥
येक ह्मणतीः—‘देवा ! आह्मीं प्रतिबिंबीं बिंबलों तुझेनि अंशे;
सगुण निर्गुण स्वरूप तुझें चि सकल; आह्मां दुसरी गति नसे;
भज़तां गुणी गुण निर्गुणें वेगलीक काहीं नसे;
ऐसिया निष्ठा सेवितां तुतें मां निवालों तव भक्तिरसें रे !’ ॥ ४ ॥
येक ह्मणतीः—‘आह्मां रूप चि आवडे. करूं प्रत्यक्षत्वें ध्यान.
प्राणांहूंनि प्रीय, जीवासि आवडे सावळें कमळनयन.
मन लांच्नावलें; विवेकु न धरी; नेणों बा ! आह्मीं कवण ?
तूज़वेगळें मनस कोठें चि न घलूं; तूं चि विश्रांतीच्नें स्थान, रे ! ॥ ५ ॥
अधिकाराच्नें बल लाहोंनि सकळ अनुवादले प्रीतियोगें.
मस्तकीं निजकरू ठेउंनि दिगबरु मानीतसे समान अवघे.
प्रीतियोगें गुणें अधिकारें संप्राप्ति नव्हे. येकु येकामागें.
तथापि श्रीदत्तां ! सगूणु भक्तप्रियु नित्य वर्ते दक्षसंगे. ॥ ६ ॥

(१०९४)

नाना शास्त्रकार करिती स्वमतें योग्यते अनुसार वादू.
येकांतें स्वयुक्ति; सूत्रार्थें चि येक; प्रमाण येकांसि वेदू.
बहिर्मुख जन सिद्धांत गमिती; नाहीं सत्यतत्वबोधू.
तयाचें बोलणें आहाच वाणें तेणें न गुंपती परम साधू रे ! ॥१॥ध्रु॥
बापा शब्दज्ञानी निष्ठा नाहीं रे ! वृथा श्रमकर होय देही !
सिद्ध आत्म तत्व नेणोनि प्राणिये कैसे पडले संदेही ? रे ! ॥ २ ॥
येक ह्मणती;—‘ आह्मां प्रत्यक्ष प्रमाण. परशब्दीं विश्वासु नाहीं.
अनुमानाच्नें वाक्य न मनूं, सर्वथा उपमा न कवणाच्नें काई.

दिसे तें चि असे. विनाशें विनाशे. पुडती होणें नसे कहीं.
निमाला तंगु पुडती न उमजे. कारण तें ठायिचें ठाई रे ! '॥ २ ॥
येक ह्मणती;—'शून्यीं आभासु भासला; अभावीं शून्य संचलें;
संयोगी आत्मत्व; वियेगीं शून्यता; मीपण शून्याकार ज्ञालें !
पुडतोपुडती कवणा जन्मु ? कें मरणें ? शून्यत्वा शून्यचि आलें !
शून्याप्रति कर्म हें मृषा सोसणी; केलें तें वायां चि गेलें ! ॥ ३ ॥
येक ह्मणती;—'शून्य शून्य तें सर्वदा. तयातें आभास कायी ?
यालागि पंचक भूतांचें. साकार जीउ या वेगळा देही.
जैसें कर्म करी, तैसें फळ पावे; नीयंता कव्हणी चि नाहीं.
स्वर्गु तो चि मोक्षु; येरु तो संसारु; कर्मीं नांदे दोही ठायीं रे ! ॥ ४॥
येक ह्मणती;—' विश्वकर्ता सर्वेश्वरु; जीउ तो नित्य संसारी;
अनादिसिद्ध दोघे! तैसा चि प्रपंचु; भेदू चि सत्य सर्वत्रीं.
व्यवहारू येथ प्रमाण. थोरलें सत्य विश्व सर्वांपरी !
महाप्रळयीं ही परमाणुत्वें सर्व वर्ते ये नित्य अंबरीं ! ॥ ५ ॥
येक ह्मणती;— ' मायोपाधि सर्वेश्वरु; अविद्योपाधि जीवात्मा;
उपाधिद्वयाचां मिथ्यात्वीं केवळ, कैंचा ईशु? कैंचा आत्मा ?
गुणव्यतिरेकें पाहातां अधिष्ठान वेगळें तें रूपा नामा.
गुणधर्म, कर्म, शरीर, ना भेद तीन्ही तया परब्रह्मा.' ॥ ६ ॥
येक ह्मणती;— सत्येंवांचूं नि सर्वथा भान असतासि नाहीं;
तरि जें सत्य ब्रह्म तें चि जीवेश्वरीं सत्य वर्ते दोहीं ठायीं
प्रकृतिद्वय हें विवर्त्तु ज्ञाणतां, अधिष्ठानीं भिन्न काइ ?
सत्तभेदें सर्व ब्रह्म निरंजन; भेदु नये कोठें कांहीं. ॥ ७ ॥
ऐसा करितां वादु जन्म चि लोटले. पुढें नाहीं संख्या ज्ञाण !
सद्गुरूचा संगु जयांसि घडला ते पावले यथार्थ ज्ञान.
तयाचेनि मतें शास्त्राचे अनुवाद येकदेशी खंडज्ञान.
दिगंबरकृपा जयां घडे, ते बा करिती त्यातें समाधान. ॥ ८ ॥

(१०९५)

प्रत्यक्षावांचूंनि जया नाथी ज्ञान, तेहीं बोलावें तें कायी ?
अभिमानें स्वयुक्ती देहो चि आत्मा, हें उचीत तयांचा ठायीं !

देहाचा अभावीं उरलें तें न कळे, प्रतीति जयासि नाहीं.
तेहीं शून्यवादू न जल्पावा. कैसा स्वमताभिमानु देहीं ? ॥ १ ॥ धृ ॥
रे बापा ! योग्यते अनुसार ज्ञान. काइसे तयां दूषण ?
अज्ञानांचां देहीं अभिमानु वोखटा; भ्रमासि हो कारण रे ! ॥ छ ॥
वेदवादी, रत, कर्मठ, ब्राह्मण क्रियाफळें आइकोनि,
कर्म चि जीवाचें कारण मानिती. पाहिजे ते तयालागूंनी.
प्रत्यक्षें , अनुमानें , शब्द उपामानें , व्यवहारीं पूर्ण ज्ञानी.
अनादिसिद्ध ते भेदु संपादिती. अभिमानाची ऐसी करणी ! ॥ २ ॥
अधिष्ठान ज्ञानें पाहातां औपाधिक तयासि ठाऊवचि नाहीं,
ऐसे ज़ाणीतलें तयांतें चि कळे; ऐसिया करणें काथी ?
जीवेश्वर ते ही मिथ्या चि मानिलें. ब्रह्मीं आभासू चि वायी !
स्वमतीं अभिमानु; परयुक्ति न मने; त्यावरि प्रत्ययो देहीं. ॥ ३ ॥
निरस्ताभानासि ब्रह्म लयस्थान पुढती तेथूनी चि स्फुरे.
पाहातां काहीं न भसे; परि ते तन्मय असे, ऐसें ज्ञान ज़या बा रे !
तें विश्व ब्रह्म हें बोलती चतुर. सत्यासि कैंचें दूसरें ?
बोल चि सर्वांचे आइकावे, गा ! परि साक्षात्कारु दिगंबरें ! ॥ ४ ॥

सारसुवास.

(१०९६)

संसार दुर्गमीं पडलों; अंधकारीं ज़ालासे भ्रमु जीवासी.
मार्गु तो न कळे; असोनि गेले डोळे; कां गा ! देवा ! विसरलासी ?
अंतकाळीं येका तुज़ चि स्मरोंव. बापु तूं माये आह्मांसी .
दत्ता ! दत्ता! ह्मणौनि आळवितों हें. मा सादु कवणे काळें देसी ? ॥ १ ॥ धृ ॥
रे ! बापा ! दुःखाचें कां करितासि आह्मां ? अजूनि अंतर देसी !
माये ! बापा ! तूं समर्थु; मी रंकु; सांगों ज़ावें कवणापासीं ? रे ! ॥ छ ॥
संसारसागरीं पडलों मी दुस्तरीं. देवा ! तुझी कास मागें.
भक्तचिंतामणी तारकु तूं ये जनीं, धावोंनि उडी घालीं वेगें !
तुझेनि नामस्मरणें बुडिजैतें केसणें; लघुत्व हें तूज़ लागे.
दिगंबरा ! ज़ाण ! ध्यातुसें चरण, साडूंनि प्रयत्न अवघे, रे ! ॥ २ ॥

(१०९७)

जन्मोजन्मीं आह्मीं तुझे चि, श्रीदत्ता ! गति ते नेणों दूसरी.
आह्मांलागि तुवां जन्म ही साहिले ! श्रमलासी देवा ! भारी !
तुज़करितां आह्मी निश्चीत होतों. आतां कां धरितासि दूरी ?
इतुलयावरि आह्मीं काये कीजे ? दत्ता ! सांग झडकरी, रे ! ॥१॥धृ॥
बापा ! कर्में कवणें तूटि ज़ाली ? रे ! आह्मीं दुष्ट क्रिया कैसी केली ?
अपराधी तरि दंडू चि करणें मां. संगति वायां सोडिली, रे ! बापा ! ॥ छ ॥
वियोगें तुझेनि पतीत ज़ाहालों; वरि पडलें दुःख अपार !
दुष्टांच्चेनि संगें माज़ले अवगूण; ज़ालों अपराधपर !
ययापरि तुज़सीं तूटी चि पडताहे; अंतरें पडलें अंतर.
ययाहूनि जीवें मारिसी ते बरें ! बहु ज़ाली मरमर रे ! ॥२॥
मुखाची वोळखि वीसरलें मन; आठउं मीं आतां काये ?
ऐसें सर्वीपरि निर्वाण पडलें; बा हृदय माझें फूटताहे !
तुझी प्रसन्नता आह्मीं अकिंचनीं लाहिजे कवणे उपायें ?
दिगंबरा ! आतां न करीं कठीण; तूं चि देउ, बापु, माये. ॥ ३ ॥

(१०९८)

येक मनस चंचळ असतां करितां योगू चि नोहे.
मानस पडिभरु, कैंचें तें ध्यान केलें ? वृथा चि गेलें.
माळा, कमंडलु, गोमुखें, आसन, मुद्रा लाउनि काये ?
न्यास, अंगचार, नाना मुद्रा, मंत्र, विक्षेपु खाये. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! बापा ! मनसा ! स्थीर राहीं; तुज़वीण योगू चि वायां;
भूतशुद्धि, ध्येयध्यानाची खुण न चले साधनक्रिया, रे या ! ॥ छ ॥
मन स्थीर येक देहाच्या संगु न धरूनि ठाइ कें ठायीं
अपरयोगगुणक्रियामंडणी नसतां ही चिंता नाहीं.
मारूनि मनस मनोमूळ भज़तां सत्य निरंजन देहीं.
दिगंबरें मन धरणें. साधनयोगें अपरें काज़ कायी ? ॥ २ ॥

(१०९९)

काम, क्रोध, मद, मत्सर हृदयीं; वरि वरि मुंडण केलें
स्नान शौचविधु जपतां प्रणउ दंभे सर्व हरिलें.

महावाक्यपद पदार्थशोधन वादा कारण ज्ञालें.
शांति येकि नाही; काइसा संन्यासु ?
ज्ञाणपण वायां गेलें, रे ! या ! ॥ १ ॥ धृ ॥
संन्यासें फळ नाहीं. शांतिहीना गति कैची ?
आश्रमाभिमानें तरला कवणु ? मनसें हरावी जनांची, रे ! या ! ॥छ॥
शांति सदा गुणनिवृत्ति असतां चित्ता उपरम होये.
अधिष्ठान ज्ञान मग तें सुलभ चि; ज्ञाणतां ज्ञाणोंनि ज्ञाये.
भेदाचें भान गेलें अभाऊनि; याहूंनि सन्यासु काये ?
दिगंबर परब्रह्म निरंजय शांतीसि ज्ञवळि आहे. ॥ २ ॥

(११००)

मृत्तिके ! मज्ज रक्षीं; तारीं दूर्वे ! उदका ! पवित्र करीं;
ज्योती ! तूं देऊं; रक्षीं तूं अनला ! सूर्य सेवा गायत्री.
इंद्रा, यमा, वरुणा प्रार्थूनि गति मागेपीतरीं
मी तो कवणु ? देऊं तो कैसा ? नेणें जनु संसारीं, रेया! ॥१॥ धृ ॥
भ्रमले गृहमेधी; न कळे चि तयां कांहीं.
वेदवादरत कर्मे करितां विश्रांति कोठेंचि नाहीं, रेया ! ॥ छ ॥
प्रापंचीक जन प्रपंचु भज्ञती; ध्याती फळ प्रपंचु.
ज्ञानविरोधी सिद्धांतु गमितां वयांतें होये वेचु.
सद्गुरु येकु तारी. कैंचें पाल्हाळ मानी हा नीर्वचु ?
दिगंबराप्रति रिघ कां शरण; ब्रह्म तूं निष्प्रपंचु रेया ! ॥ २ ॥

(११०१)

जनीं जन, वन, धन, जाया, भज्ञतां, माया बहु गुण होये.
आयुष्यबळ चळ; निश्चळ करितां वृथा आयासु ज्ञाणे.
क्षितितळगतजळ वाहे सरिता, धरितां धरिलें न ज्ञाये रे !
क्षणक्षणें क्षिण, क्षर, नश्वर, हे शरीर; तेंवं न राहे रेया ! ॥१॥धृ॥
सर सर रे अज्ञाना ! धरितासि तो भ्रमु वायां !
देह, गेह सर्व भ्रमाचें; फळ केवळ मृगजळ माया रेया ! ॥ छ ॥
दिनें दिनें वणवण करिसी काह्या ? वायां धन, धनसोसु.
दीनपण सांडी; दीनदयाकरु ईश्वरु गुरु अविनाशु.

दिगंबरु निजहृदयीं धरिपां ! बापा ! पूर्णपुरुषु.
बहु विध मृगजळ; पडलासि तमसीं तो गुणदोषु. ॥ २ ॥

(११०२)

देखावा तरि आत्मा चि; आइकावा तरि तो चि;
केवळ प्रवृत्ति मनाची तेथें चि करावी.
योगसेवया निदध्यासन करावें नित्यात्मचिंतन;
एवं मन, बुद्धि, करणगण तेथें चि अर्पावें.
आत्मइतर सकळ मिथ्या; माया मृगजळ;
स्वप्न पाहोंनि पाल्हाळ वृथा; काज नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
इतुलें चि साधन ज्ञान योगभूमिका पहिली ज्ञाण.
गुरु सांगती आल्या ! व्यर्थ न करिजे तया;
माप लागलें सेवया ! कां; रे ! भुलतासी ? ॥ छ ॥
शास्त्रांचें अपारपण; वरि परस्परविरुद्ध लक्षण;
असाध्य साधे; तें कारण होये दंभासि.
वेदें करूनि पूर्णता ते तंव न ये सर्वथा;
आली तरि घेतां अर्थसिद्धांतु न कळे.
येरि काइसी योग्यता व्यवहारीक पाहातां ;
जीतें न भजे ज्ञाणता वृथा विषयपर. ॥ २ ॥
येक स्वस्वरूप शुद्ध कळे; तें अपर मिथ्यात्व निवळे;
जें सत्य स्वरूप नियमलें तया भानाचें.
मृगजळाचा डोहीं साच किरण कळे ज्यीं;
तेथें थाकु तो पाहोंनि कायी काज तेथें ?
गुणभानव्यतिरेकें तत्व भजतो ठाइ कें ?
येथ सहज लटिकें; ऐसें सहज कळे. ॥ ३ ॥
किं पृथगसंतांचें भान; तें मात्र ज्ञाणावें अधिष्ठान;
जळौघवेग ते किरण मृगजळाचे जेंवि.
तेंवि नामरूपगुणाभास आत्मा चि भासतु असे;
ह्मणौनि आत्मज्ञानें सर्व कैसें आत्मत्वें कळे ?
दिगंबराचें होईजे; तरि ऐसें चि जाणिजे.

येरा सहसा नुमजे वर्म येथील काहीं ! ॥ ४ ॥

श्रुतिः—

आत्मा वा अरे द्रष्टव्यः

आत्मा देखावा, आइकावा, ह्मणौन प्रथमाधिकारियांकारणें प्रवृत्ति होआवी, ह्मणौनि बोलिला. परि आत्मा दृष्टिगोचरु नव्हे. ॥ छ ॥

(११०३)

दृढ घालुंनि आसन, करूनि मुद्रेचें अवलंबन,
आत्मा देखावा ह्मणौन, योगु करिती.
येकांतें मुद्रा भूचरी, खेचरी, चाचरी, अगोचरी,
येक सहज मुद्रया अंबरी ठेविती लक्ष.
तें पैं अवघें कुमत; नव्हे वेदविहित;
मंदमतीचें निर्मित भ्रांत भजताती. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा कव्हणीं न भजा गुरु; नव्हे तो तत्वविचारू.
कैसा देखणा देखिजे ? डोळां नयनु पाहिजे ?
आत्मा लक्षें साधिजे; ऐसें कैसेनि घडे ? ॥ छ ॥
येक मानिती मणिमयु; येकां ज्योतिस्वरूप ध्येयु;
येक ह्मणती ज्ञेयु अनारिसा आत्मा.
परमाणूंहूंनि सानेंपणें गगन व्यापिलें असे जेणें;
बुडाला तयामाजि पाहाणें प्रपंचु हा.
ऐसें आपुलालें मतभ्रमें भूललें समस्त;
अनुवदती कुश्चित तयां न कळे काहीं. ॥ २ ॥
बाहुदंडप्रमाणें सहजमुद्रया येका देखणें;
सहजसमाधिअभिमानें बोलती निष्ठा.
लक्षीं लक्षितां पोकळ, तें चि भरीव दिसे केवळ;
नितळ निवळ जळ तैसें कोंदाटे.
तें ही तया चि सारिखें, दृश्य केवळ न चुके;
वेदमतेंसीं पारिखें कवण मिरवी तया ! ॥ ३ ॥
येका प्रभा पीतवर्ण, आरक्तादि नाना वर्ण,
मिळित करूनि नयन भावना करिती.

एवं द्रष्टयाचें अज्ञान आणि दर्शनसंबंधी ज्ञान.
तें दृश्य आत्मां कैसेंन येइल मानूं ?
दिगंबराचा चरणीं कवणा ऐसियातें मानी;
उपपादिता वचनीं दोषु परमु असे. ॥ ४ ॥
श्रुतिः—
न संदृशे तिष्ठति रूपमस्य ॥ छ ॥
आत्मतत्व दृष्टिगोचरु नव्हे. तरी पूर्ववाक्यासि दोषु लागला,
आणि साक्षात्काराची प्रवृत्ति मोडली. ह्मणौन पूर्ववाक्य–
दोषनिवृत्त्यर्थ आणि साधनप्रवृत्त्यर्थ
मनें आत्मा देखावा, ऐसें वचन बोलतो.

(११०४)

शब्द बोलती कुशलपणें तो चि योगु ऐसें न ह्मणणें;
ग्रंथ चातुर्य साधणें साधन नव्हे.
हस्तक्रियेची कुशळता न मनावी तैसी चि ज्ञाणतां;
तीर्थयात्रा परिभ्रमतां योगु तो नव्हे.
वर्म इंद्रिया वेगळें जेथें शरीरा नाडळे;
अंध करूनिया डोळे मूळीं राहणें असे. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मा मनसें चि देखावा बाह्यव्यापार सांडूनि अघवा;
येर सकळ करणें वाउ॰ विण येके तेणें
मनोजयाचीं साधनें योगु न ह्मणावीं. ॥ छ ॥
प्रत्याहारु तो उपचारु, दमु तो ही परि व्यवहारु.
योगु राखावया स्थीरु उपाय हे.
त्रिबंधु धारणा, ध्यान योगीं व्यवहारुसंपादन,
जें जें कीजे आचरण तें तें बाहेरि सवडे.
हातीं मन चि नलगे, तरी यणें काये योगें ?
मुळ खांडूनि वावुगें झाड जोपितासि. ॥ २ ॥
दृष्टीचें देखणें गळे, अंतरीं मनाचें निवळे,
तरी चि ते आकळे भूमिका योगाची.
असो ! पां ! शरीर चंचळ व्यापारीं करणगण सकळ,

मन अंतरीं निश्चळ केवळ असतां
योगमतीचें करणें मार्गु ज़ाणती स्याहाणे;
एवं मनाचें देखणें; सर्व कारण येथें. ॥ ३ ॥
मनें केला तो त्यागु; अत्यागु तो अत्यागु;
योगु मनें तो चि योगु; अयोगु दुज़ा.
मनें उज़ललीं ते बुद्धी; मानी मनें ते समाधि;
ऐसें मन तें आधीं हातीं घेइज़े.
मनें गुण निरसन; मनें स्वरूपदर्शन;
दिगंबराचें सेवन मनें वांचूंनि नसे. ॥ ४ ॥
श्रुतिः—
मनसैवानुद्रष्टव्यम् ॥ छ ॥

साक्षात्कारप्रवृत्तिकारणे मनोनिग्रहार्थ चि आत्मा मने देखावा ह्मणतां. परि आत्मा मनोगोचरु नव्हे. स्वप्रकाशमयु, अक्षरु. त्यासि कोण्ही पाहाता ना तो कोण्हासि पाहाता, ऐसा अखंडु असे. ॥ छ ॥

(११०९)

मन चि ज़ेथें अपवित्र, तेथें काये करी शिखासूत्र ?
वरि वरि केले आचार पावन करिती.
ह्मणौनि सकळ सांडावें; मन चि स्वाधीन करावें;
मग मानसा पावावें योगतया. ऐसें ह्मणौनि राहिले, मनोधर्मीं गुतले,
योगविषयीं आंधळे, तें कां न ह्मणावें ? ॥ १ ॥ धृ ॥
मनस हें गुणिक, विकारी, अविधामय, चंचळ भारी.
येणें केलें तें सकळ वल्ली वासनेचें फळ.
केवि शेविती कुशळ दुःखमुळ पां ! तें ? ॥ छ ॥
मनोगोचर जें भान, तें काल्पनीक, स्वप्नासमान;
करी तयाचें निराकरण तरि ते बुद्धि.
मनोरथासवें ज़ातां वरि पडिज़े तया अनर्थी;
मनोधर्मु तो पाहातां अज्ञान कायी ?
आतां मनाचें करणें योगाप्रति न करणें
कर्मजनितें बंधनें जीवा उपज़ती. ॥ २ ॥

मनस कार्य आदरी; आदरें तें योगी न करी;
तरी चि पात्रे थोरी तया ईश्वराराची !
मन चि माया केवळ, मन संसारु, संसारमूळ;
निष्ठाहीन केवळ भल्यतें करी !
तया मनातें मारिजे ! योगु तरि चि लाहिजे !
मनें माज़लें न माज़ें भवभय समग्र ! ॥ ३ ॥
ऐसें मन मारावें ! हें कर्म मनें चि करावें;
मन चि आपुलें नव्हे तन्हेळीं कैसें ?
ऐसे निर्द्धारें ज़ाणोनि गुंपेत ज़ाले सुज़ाण;
मग सेऊनि गुरुचरण युक्ति पावले.
आत्मविषयीं अज्ञान ज़ेणें भ्रमित ज़ालें मन;
करूनि तयाचें स्फेटण योग उमज़ले. ॥ ४ ॥
स्वस्वरूपज्ञाने मन तें चि तें प्रज्ञानघन,
योगनिष्ठे कारण होतें ज़ालें.
ज़ैसा त्रिदोषु उतरे, मग तो नरु यथाचारें
आपुला धर्मी वावरे; ऐसें होये.
मन अविद्या रहित सेव्य ह्मणतां समस्त,
तव न सरे वचन येथ दुर्मतीचें ॥ ५ ॥
अविद्येचां निरासीं ठाऊ नाहीं स्वस्फुरणासि;
शुद्धे ब्रह्मीं निराभासीं मनाचें कैंचें ?
एवं अविद्यागुणकार्य, मन सर्वथा हेय;
स्वस्वरूपसन्मय अद्वैत ब्रह्म.
ऐसें मनाचें ज़ाणणें आणि वाचेचें बोलणें;
दिगंबरीं ते न मनें स्थिति सहज़ाची.
श्रुतिः---
यतो वाचो निवर्तते अप्राप्य मनसा सह ॥ छ ॥
मनावाचेसि अगोचरु अक्षरु आत्मा तो कैसा ?

(११०६)

नामें, रूपें, गुणाकारें, बाह्य दृष्टीचेनि व्यापारें,

देहो चि मीं ऐसें ज़ाणे खरें; तैं तो मूये.
सूर्याचा अस्तमानीं चंद्र प्रकाशें करूनि
पाहे आपुला नयनीं मीं देहो ह्मणौनिया.
शशिसूर्य अस्तवती, तैं अनळाची ज्योति;
तिया देहो मी प्रतीति आत्मा आपुली ज़ाणे. ॥ १ ॥ ध्रु ॥
ऐसें आपणा आपुलें ज्ञान साक्षात्कारें करूनि,
ज़ाणु मानी तो ज़ाणता होये अनुभववेत्ता.
येरु अपरु नेणता अनुमानु करी. ॥ छ ॥
शशिसूर्य अस्तमानीं, पावकु शांतु असतां स्वस्थानीं,
दावी दीसे कासेनि आत्मा प्रकाशे ?
तरि ज़ैसा साक्षात्कारु दृष्टीचा तैसा चि तो वाग्ज्योतीचा;
वचनें चि प्रकाशकु आंगाचा आंगे होये.
साक्षत्काराचें लक्षण स्थूळ शरीरें करूनि;
ऐसें तयाचें हें चिन्ह परि अन्यथा नोहे. ॥ २ ॥
शशिसूर्याते अस्तमान पावकु गेला मल्हवोन,
वाचेचा ठायीं मौन केवळ असतां.
कवणें प्रकाशें प्रकाशे ? आत्मा दावी आपणां दिसे ?
उपज़लें असतां ऐसें कैसा साक्षाकारु ?
तरि बाह्य ये प्रतीती ज़ैसा आत्मा जागृती;
तैसें स्वयं चि स्वज्योती असे प्रतीयमानु. ॥ ३ ॥
स्वप्नीं, मरणी, सुषुप्ती आत्मा प्रकाशे स्वयंज्योति;
देहापासाव प्राप्ति देहांतरीची.
देहादि करणगण स्वप्रकाशीं चि करीति मग्न;
पुनरपि तें उत्पन्न स्वप्रकाशें चि करी.
मनाबुद्धीचें देखणें सर्वस्व प्रभेचेनि गुणें;
नाहीं लोपती कारणें सत्यान्वयविशेष. ॥ ४ ॥
ज़ैसा जागृती देहाकारें निजाकाराचेनि विसरें
आत्मा सत्य शुद्धाकारें होये प्रतीयमानु;
तैसा चि अवस्थात्रयनिरासे, प्रतीयमानु होये स्वप्रकाशें.

तेथें देहादि प्रपंचु नसे; भान चि काहीं.
दिगंबरातें पावला, तो चि ज्ञाणे ऐसी कला;
येरीं आत्मा मानिला शास्त्रश्रवणे दूरी. ॥ ९ ॥
॥ श्रुतिः—
याज्ञवल्क्य. किं ज्योतिरेवायं पुरुष इति ॥ छ ॥
आत्मज्योतिः ॥ छ ॥
चंद्रज्योतिः ॥ छ ॥
अग्निर्ज्योतिः ॥ छ ॥
वाग्ज्योतिः ॥ छ ॥
आत्मज्योतिः ॥ छ ॥
कतम आत्मेति योयं विज्ञानमयः पुरुषः ॥ छ ॥
तें चि शुद्ध ब्रह्म नामरूप गुणाकारत्वें अवघें चि विश्व होये. ॥ छ ॥

(११०७)

विविक्तात्मज्ञानवशें आत्मा सहजु ज्ञेयु स्वप्रकाशें,
विण द्वैत स्फुरणरसें स्वानंदमयु.
एवं सच्चिदानंदैकरसु आत्मा तो सहजप्रकाशु.
अनुभवियां युक्तिविशेषु संप्रकटु हा.
तेथें भान निरस्त, जें कीं ज्ञालें तद्गत;
स्फुरे तयीं तदन्वित तें ही वेगळें नसे. ॥ १ ॥ धृ ॥
तरि नाम, रूप आणि कर्म अवघें चि तें परब्रह्म.
मृगजलाचे कल्लोल ज्ञवि किरण सकळ.
तैसें सत्येसीं वेगल मायामय न दिसे. ॥ छ ॥
सांडूनि उन्मनी अवस्था ज्ञानमयी प्रकृति आश्रयिता,
ज्ञाता, कर्ता, भोक्ता अवस्थांचा होये.
तैं दृष्टीचेनि आकारें आकार दृश्यत्वें स्फुरे;
द्रष्टा आत्मा चि निराकारें दृश्य सकल.
स्वप्नीं दिसे तो आभासु जैसा दे पुरुषु,
येतां जागृतीप्राति प्राप्तु करूनि ठाये. ॥ २ ॥
स्फुरणांचेनि आकारें आत्मा वक्ता चि आकारें;

मग रूपीं सकलां भरे नामाकृती.
सुवर्णाची टांकसाळ, सुवर्णमय नाणें सकल;
तैसें अनुवदतां केवल ब्रह्म चि नादाकारें.
नामें ह्मणौनि सकलें ब्रह्ममय चि केवलें;
रूपीं जाडती, नीवलें अर्थवाद तेणें. ॥ ३ ॥
नामें रूप प्रकाशितां श्रवण करी जो श्रोता,
तो ब्रह्म न होतां तेथें न वडे योगु.
ह्मणौनि आत्मा चि श्रवणाकारें नादरूपी अभिलु संचरे;
तो नादु चिदंबरें जिरे स्वरूपीं.
ऐसें श्रवणवचन; रूप तेणेंसीं अभिन्न;
परब्रह्म निर्गुण सर्व भासत असे. ॥ ४ ॥
ज्ञानाश्रयाच्येनि अंगें ज्ञानेंसि ज्ञेय अवघें;
ब्रह्म स्फुरे ज्ञानयोगें; जाणिजे खुण.
कर्म तद्वत सकल कर्ता आत्मा तन्मूल;
तरि जें क्रियेचें पाल्हाळ परब्रह्म तें ही.
ऐसें जाणोंनि राहिजे; ब्रह्म सकल पाहिजे;
देहें देवो चि होइजे योगसाधनवर्ती. ॥ ५ ॥
ब्रह्मा आणि तृणस्तंभ ब्रह्म समान स्वयंभ;
देवभक्त लाभअलाभे शिष्यगुरू.
व्यवहारतांहीं व्यवहारीं अभेदु भजिजे ययाचि परी.
भेदु तो वांचूंनि पामरीं नये मानूं.
दिगंबरातें पावले, ते हें जाणोंनि राहिले.
येर भेदें चि नाडले; जनको जाण कित्ती ? ॥ ६ ॥
श्रुतिः—
त्रयं वा इदं नाम रूपं कर्म ॥ छ ॥
ब्रह्मैतद्धि सर्वाणि नामानि बिभर्ति ॥ छ ॥
ब्रह्मैतद्धि सर्वाणि रूपाणि बिभर्ति ॥ छ ॥
ब्रह्मैतद्धि सर्वाणि कर्माणि बिभर्ति ॥ छ ॥
सर्वं खल्विदं ब्रह्म

आतां भेदवादी कैसा ? ॥ छ ॥ :——

(११०८)

प्रकृतीच्चेनि वेद्यपणें वेदनाश्रयातें ज्ञाणणें,
नुरलेनि ज्ञाणतेपणें स्थिती असतां.
पृथग संतगुणभान, तेथें चि ज्ञाये समावोन,
जेवि कणिकाभेददर्शन विघरलां घृतीं.
ज्ञानज्ञातृत्वज्ञेय सर्व ज्ञालें येकमय
सत्य अवघें सन्मय, ध्येय निवल पद. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें त्रिपुटीच्चे व्यापार परिकुंठित ज्ञाले समग्र;
स्वस्वरूपाच्चें स्फुरण तें ही नुरे संवेदन.
निर्विकल्प निर्गुण तत्व सहज्ञ ठेलें. ॥ छ॥
तेथ कवणु पाहे आणि कासेन ? आणि पाहिजे ते कें भान ?
दृश्य त्रिपुटीच्चें निराकरण येकलें स्फुरे.
कें घ्राणु ? कैंच्चा परिमळु ? ज्ञाणतां तयाच्चा केवळु.
गंधु त्रिपुटीचा सकळु आभासु लोपला.
स्थूलसूक्ष्मकारण देहत्रयाच्चें अभान;
धर्मरहित करणगुणगण ठेले. ॥ २ ॥
वाच्य ना वाचक, बचन श्रोतृत्व, शब्द श्रवण,
कवणें कवणाच्चें ज्ञान कासेन करणें ?
दुज्ञेपण चि सकल ज्ञेथें ज्ञाहालें निर्मुळ;
निर्व्यापारीं सहज्ञ स्थूळ शरीर ठेलें.
ज्ञाणपणाची त्रीपुटी तेवि क्रियेची ही नुठी;
चित्त विरालेंसे पोटीं निर्विकल्पे स्थितीच्चां. ॥ ३ ॥
कवणें काये मानावें ? कवणें काये ज्ञाणावें ?
कवणें काये ह्मणावें ऐसिया स्वरूपा ?
मन बुद्धि ना अहंकरण; विरोनि गेलें प्रवर्तकपण;
आतां इतुलें हें प्रलपन, हें ही कैंच्चें ?
सर्व प्रकाश हे ज्ञेणें; तें पैं कासेन ज्ञाणणें ?
डोळां डोळे न पाहाणें, ऐसें न घडे जेवी. ॥ ४ ॥

ज्ञाणितलें तें ज्ञेय चि; तेथें ज्ञाणे ज्ञाणणें तें चि.
यापरि महिमा ज्ञानाची ज्ञाणतां न ये.
ज्ञानाश्रयो तत्वता, तो कासेन ज्ञाणावा ज्ञाता ?
एवं सांडूंनि ज्ञानरूपता सहज असणें.
ऐसें अगम्य सद्रूप, चिदानंदस्वरूप,
दिगंबर, निर्विकल्प आपेआप निवळे. ॥ ९ ॥
श्रुतिः——————
यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत् ॥ छ ॥
तत्केन कं पश्येत् ॥ छ ॥
ऐसें निर्विकल्पें आत्मस्थिति सर्व येकाकारत्वें निर्विकल्प असतां पाहाणें,
आइकणें, बोलणें ज्ञाणणें हे न घडे चि.
स्थूळत्वें सूक्ष्मत्वें निर्विकल्पस्वरूपत्वें हीं परि पाहाणें आणि ज्ञाणणें
घडे चि. आतां तें कैसें पां ?
मना वाचेसि अगोचरु तो आत्मा कैसा ? :———

(११०९)

जया स्थूळत्व ना सूक्ष्मत्व, र्‍हस्वत्व ना दीर्घत्व,
शून्यत्व ना साभासत्व, वर्णु ना व्यक्ति,
रूप ना ज़ेथ छाया, तमस प्रकाशु ना माया,
व्योमादि भूतपंचका तया नसे स्थान मान.
शुद्ध, असंग, अक्रिय, निरंजनपदज्ञेय.
गुणरहित, अव्यय, सर्व शिवमान. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें अक्षरपद संपूर्ण ज़े अनुवदत्ती ब्राह्मण;
गुणरहितीं केवळ दृश्य ज़ालें; मृगजळ
नित्य, विचळ, निर्मळ, शिव, स्थिरावलें. ॥ छ ॥
निरवैव ज़ैसें गगन, परि तें अशून्य शब्दहीन;
कल्पांतीचें संपूर्ण उदक ज़ैसें.
परि सर्वत्ररसहीन सारद्रादिधर्मविहीन
आंगीं आडलें जीवन नाडुलें तें.
रूपु पाहतां जीवनीं शब्दु उमटे श्रवणीं;

येथें तेही गुण गुणी दोन्ही न दीसती. ॥ २ ॥
प्राणधर्मी सूटलें, देहादि प्रपंचा ना तळे,
करणसंघाता न मिळे आत्मतत्व.
सत्वादिगुणवर्जित, अवस्थाचतुष्टयाअतीत,
देहचतुष्टयविमुक्त, भोक्तें ही नव्हे.
अतद्वादाचें बोलणें, तें हीं राहिलें ज्ञाणणें,
ज्ञयाचेंनि सत्यपणें माया कोठें ही नसे. ॥ ३ ॥
अरामपण देहिचें, अभान ज्ञेथ ययाचें,
भयाभय रजोवृत्तीचें नाम चि नसे.
ज्ञेथ पूर्व नां अपर, बाह्य नां अंतर,
सदोदित निरंतर सर्वत्र ज्ञें.
अनुभवीं तें कव्हणा ? सेखीं स्वयें ही आपणा,
होये विषयो तें आना, ऐसें कैसेनि घडे ? ॥ ४ ॥
नेति ह्मणों सरलें, दृष्टांत अभावें गेले;
बोलु बोलते हारपले तया चि माजी.
देवभक्तपणें बुझलीं; गुरुशिष्यत्वें हारपलीं;
जीवेश्वरत्वें अभावलीं ज्ञेथिचीं तेथें. दिगंबर तें अक्षर, शुद्धतत्व, स्वस्थिर;
आतां जयाहूंनि पर काहीं बोलणें नसे. ॥ ५ ॥
श्रुति ॥
एतद्वैतदक्षरं गार्गि ब्राह्मणा अभिवदंति ॥ छ ॥
अक्षरा आत्मयातें कोण्ही देखता नादेखणें दृश्य,
तरि हे प्रतीति व्यवहारी केसी ? ॥ छ ॥

(११११०)

माये अविद्ये वेगळें शुद्ध अद्वय ब्रह्म संचलें.
तें न कळे; न चळे; न ढळे स्थितिपासाव.
तें असत॰चि ज्ञेसें तैसें निजमायायोगवशें
द्वैतासारिखें आभासे ज्ञाल्यापरी. तइ इतर होउंनि, पाहे इतरा लागुंनि;
आइके; जाणे; अनुमानि; स्फुरे त्रिपुटीरूपें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें द्वैताचेंनि आभासें स्फुरे ब्रह्म चि प्रकृतिविशेषें.

सेखी अचळ, अमळ, गुण त्रिपुटी वेगळ,
शुद्ध, सहज़, सकळ, असे ज़ैसें तैसें. ॥ छ ॥
अंतःकरण पंचकाकारें ज्ञातें भोक्तें कर्तें स्फुरे;
सात्वीक सर्गु तो अंकुरे ज्ञानशाक्तिद्वारा.
चेष्टा, ज्ञान, कर्म, करण, आपण चि होये अर्थसाधन;
राजसाहंकारें क्रियेपासूंन पंचदश तत्वें.
ज़ाला तामसें विषय; द्रव्यशक्ती द्रव्यमय;
कार्य पंचविध ज्ञेय; तें पैं भाग्यस्थानीं. ॥ २ ॥
ऐसें ब्रह्म जगदाकारें स्फुरे गुणाचेनि व्यापारें;
तेथ इतर कार्यें, इतरें कर्तें न निपज़े.
गुणव्यतिरेकें पाहतां आणावी न लगे अकर्मता
शुद्धा, सहज़ा, अद्वैता आत्मयांतें.
ऐसा विशुद्धीं व्यवहारु भासे विवर्तु समग्रु.
दिगंबरु निर्विकारु सिद्ध सहज़ असे. ॥ ३ ॥
श्रुतिः ——
यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं पश्यति ॥ छ ॥
ऐसें अद्वय अखंड ब्रह्म माया अविद्यागुण.
योगें द्वैतापरि व्यवहारे. तो व्यवहारु मायामयत्वें
विवर्तरूपु; तो विवर्ताभासु अधिष्टानीं चि सामावे.
शुद्ध अद्वय उरे. तेव्हेळीं कैसें ? ॥ छ ॥

(१११११)

सर्वं खल्विदं ब्रह्म, एकमेवाद्वितीयं हें वर्म,
ज़ाणतां सर्वत्र सम, परब्रह्म येक.
आत्मैवेदं इत्यादिक, ब्रह्मैवेदं वचन आणिक,
एवं ब्रह्म आत्मा सकळैक मतें वेदाचेनि.
तें चि सद्गुरूवचनें आथी निवळ देखणें;
वरि साधूंचें बोलणें; तें हीं प्रमाण थोरा. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें ज़ाणती ते येक धन्य ब्रह्मवेत्ते सुब्राह्मण !
येर पशु; कीं पामर भेदवादी; गोखर;

तयां न चुके, येरधार पढतमूढा. ॥ छ ॥
भेद विषयीं संवेदन, येथ काइसें दुर्लभपण ?
श्वाना, गोवळा हीं परिस्फुरण असे भेदाचें.
तें चि सांगे जै सद्गुरु, तैं तो काइसा ईश्वरु ?
मंदमतीच्या आचारु ज्ञाणावा तो.
हरळ वेंचिती गोवळें; तीं काये होतीं मुक्ताफळें ?
धाव घेतली कपाळें; मग न चले काहीं ! ॥ २ ॥
अवलंबूनि अविद्यागुण, लक्षूनि मायावी सगुण,
प्रत्यक्षु भेदु मानून प्रमाणें वदती.
स्वप्न स्वप्न दृष्टी ज्ञो पाहे, तें त्यातें सत्यचि होये;
भ्रमु न निरसे, तवं काये छेदे भान ?
तेथें अवस्थाजनित ज्ञान ज्ञयांचें संमत,
ते बा ! न होती पंडित मुक्त मुमुक्ष कहीं. ॥ ३ ॥
देहाद्यवस्था निरासे ज्ञो पाहे स्वरूप प्रकाशें;
तयाप्रति हें काइसें कुवाडें मां ?
येर देहेंसीं पाहाती तवं न येते प्रतीती;
मग कुमतें उठती; भेदमती घेतले !
युक्तिवादाच्येनि वळें डोळसां ह्मणती आंधळे.
तवं पशू माधवले; होडे मालिवे ढोर ! ॥ ४ ॥
माध्यान्हीं दिवसां गर्भांधें केली निशा;
ते अतिकुशलां विदुषां कैसेनि माने ?
प्रथम आपुलें अज्ञान; वरि स्फुरे विपरीत ज्ञान;
तदनुसार श्रवण करूनि शास्त्रांचें,
ज्ञानमार्गा चूकले; आड पर्वत पडले.
दिगंबरातें पावले, ज्ञाले कृतकृत्य ते ! ॥ ५ ॥
श्रुति ॥ :——

अथ योऽन्यां देवतामुपास्तेऽन्योसावन्योऽहमस्मीति न स वेद यथा पशुरेवं विधं ॥ छ ॥

(१११२)

च्यान्ही वेद मुखोद्गत; आणि तितुले हीं सार्थ;
येर शास्त्रवाद समस्त करतळामळक.
पुराणकथेच्ना सागरु, चौदा विद्यांच्ना सुरतरु,
तया येकू चि साक्षात्कारु आपला नाथी.
तेणेंकरूंनि सकळ वायां गेलें तें पाल्हाळ;
जन मोहूंनि केवळ असे फळ काहीं ? ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें येक अक्षर नेणें; निजस्वरूप अनुभवखुणें.
येर साधन अपार करी बहू संवत्सर
शतकोटि सहस्र; तेणें सुटिका नव्हे. ॥ छ ॥
अश्वमेधादि अपार याग केले समग्र;
क्रियाकुशलत्वाचें भांडार ब्राह्मणु ऐसा.
विहिता कर्माचें अनुष्ठान सिकोवि तया येकापासूंन.
आणि दाता तरि मेरु प्रमाण सुवर्ण दे.
तें पैं विहित सकळ दे अंतवंत फळ.
ज्ञानरहीत कुशळ कैंचें प्राणियांसि ? ॥ २ ॥
देहें विहित आचरतां उसंतु नाहीं सर्वथा;
ज़ालाही, न मनी चित्तामाझारी श्रमु.
यावरि ज़ें तपस काहीं तें आचरला तितुलें हीं;
आणि पुढें ही गणणा नाहीं आंचरणकाळाची.
आत्मज्ञान चि येकलें जया नाहीं प्रकाशलें;
त्याचें सकळ ही केलें भवजनक होये ! ॥ ३ ॥
वैष्णवांमाजि अग्रिकु; शैवांमाजि जो स्वयं येकु,
येरां देवांच्ना उपासकु, ऐसें ही हो.
निरंतर भरितें प्रेमाचें; निरंतर ध्यान सगुणाचें;
जप; अनुष्ठान; कीर्तनाचें नित्य प्रेम.
येके ज्ञाने वांचून नव्हे अविद्याछेदन;
येर वृथा. निरंजन भवहरण नोहे. ॥ ४ ॥
शरीर करवतीं दीधलें; शिरस शिवा समर्पिलें,

ऐसें चि सुकृत केलें अनंतकाळ.
सलोंकता, समीपता, स्वरूपत', ज़ालीयां मुक्तीची योग्यता.
हरिहरादिकां आवडता जीवाहूनि हो.
तऱ्ही अंतवंत फळ तो ज़ें पावे, तें सकळ
दिगंबरें हें पाल्हाळ सर्व दूरि केलें. ॥ ९ ॥
श्रुतिः—
यो वा एतदक्षरमाविदित्वा गार्गि अस्मिंलोके जुहोति ॥ छ ॥

(११११३)

यातीच्चा होये ब्राह्मणु; परंतु वेदाक्षरविहीनु;
ज़ेणें आजन्म यागयज्ञु देखिलाचि नाहीं.
न ये प्राकृतेवीण वचन; नामें हीं नेणें वैयाकरण;
सांग क्रियेच्चें आचरण टाकेचि ना.
येक स्वस्वरूप ज़ाणे; येर काहीं चि ज़ो नेणे;
निष्ठा निरंतर मनें तेथें पालटु नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
तो चि ब्राह्मणु ह्मणिज़े. वेदवादी तयासि भजिज़े.
अभिमानें ज़े नाडले, ते तंवं प्रत्यक्ष ठकले.
होती दुःखाच्चे डोहळे तयां कृपणासी ! ॥ छ ॥
पात्रीं न संभवे दान; तपसु न करी अनुष्ठान;
कैसें संस्कृत वचन ? तें ज़ाणे चि ना.
विष्णूच्चा ना शिवाच्चा उपासकु कव्हणा देवाच्चा;
इच्छेअधीनु ज़याच्चा विचरे देहो.
पाहातां अंतर निर्मळ; मन स्वरूपीं निश्चळ;
जया अक्षर केवळ ब्रह्म सकळ स्फुरे. ॥ २ ॥
आळसु दिसे पाहातां; पौराण नेणे कथा;
स्वाभावीकु शब्दु बोलतां पडे विसरु.
कुशळता न वर्त्ते देहीं; सर्वथा तो भलया तैसा ही;
परंतु अक्षर ब्रह्माचा ठायीं निरंतर निष्टा.
नित्य स्वरूपदर्शन, नित्य स्वरूपीं रमण,
लय विक्षेप दहन जया सर्वदा स्फुरे. ॥ ३ ॥

कर्मयोगी, अथवा त्यागी, परि ऐसा अक्षरनिष्ठु ज़ो जगीं,
जनीं असोनि असंगी जना वेगळा.
येणें स्थूळे असतेन, अथवा विलया गेलेन,
ज़ो वर्ते आतिक्रमूंनि यया लोका.
ज़ेथें तेथें तो समानु; स्वर्गीं हीं पूज्यमानु;
ब्रह्मा दुसरा; ब्राह्मणु ऐसा समर्थु होये ! ॥ ४ ॥
जया नाहीं अक्षरज्ञान, येर कर्मवर्तें संपूर्ण,
याग, तपस, विहिताचरण, भजन देवाचें;
तो शरीर सोडूंनि ज़ाये; इंद्रपदा ऐसें हीं लाहे;
तथापि समानता न ये तया समर्थाची !
होये भूपेसीं समानु, ऐसा दरिद्री कवणु ?
एवं कर्मठु कृपणु दीनु तया लक्षिता ! ॥ ५ ॥
कर्मिष्ठ जें पद मानी, ते ज़याची पाउटणी;
बैसोंनि तये स्थानीं शेविज़े जया;
तें तो ब्रह्मिष्ठु चि सहज़ें ऐसें निर्धारें ज़ाणिजे.
देवांमाजि ही दुज़ें न ये समानतें.
दिगंबराचा ज़ाहाला. पद तो येसणें पावला.
पाहातां याहूंनि आगळा होये सहजु गुणें. ॥ ६ ॥
श्रुतिः—
यो वा एतदक्षरमविदित्वा गार्गि विदित्वास्माल्लोकात्प्रैति स कृपणः ॥ छ ॥
ज्ञानादेव तु कैवल्यम् ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति ॥ छ ॥

॥ मल्हारु ॥

(११९४)

विरजु, विज्वरु, निर्विकारु, गगनाहूंनि महाअपारु,
अजु, अव्ययु, थोरु महामायेहूंनि,
नित्यु, अढळु, अचळु, गुणरहितु, केवळु,
आत्मा ज़ाणोनि कुशळु काये करी ज्ञानी ? ॥ १ ॥ धृ ॥
प्रज्ञान मग पाठीं करी, तो चि ब्राह्मणु ये संसारीं;
नेणोंनि अनुभवु, जल्पे वाचाळु, न पवे तो तयांची थोरी, रे ! बापा ! ॥छ॥

व्यर्थ श्रमासि कारण होये ह्मणौनि.
दिगंवराचें ज़ाहाले, तेथें निष्टेते पावले;
येरा अधिक न कळे वाग्विस्तराहूंनि. ॥ २ ॥
विरजः पद आकाशादज आत्मा महाध्रुवः
तमेव धीरो विज्ञाय प्रज्ञां कुर्वीत ब्राह्मणः ।
नानुध्यायाद्बहूञ्शब्दान्वाचो विग्लापनं हि तत्

(११९५)

सन्मात्र ब्रह्म अव्यय, आत्मस्वरूप शुद्ध ज्ञेय,
तें चि युक्त चिन्मय स्फुरे गुणसाम्यें.
तेथें प्रकटती गुण; मग तयांसीं मीळोन
मनोमय स्फुरे ज़ाण गुणत्रयधर्में ॥ १ ॥ धृ ॥
देऊ तुज़ प्रति नाहीं; मूळ विचारूंनि पाहीं !
सर्वेसीं द्वैत मूळीं असाचार स्वस्थिती निश्चळ होईं रे बापा !
सर्वेंद्रियगुणभासु, तूं चि साकार, साभासु,
पुण्यपापा अधिन, वशु, ज़ाहालासी.
यथाचारें भ्रमण ज़ालें तुज़ चि लागुन;
स्वर्गनरकपतन सत्य परियेसीं. ॥ २ ॥
मग करितां कर्मानुष्ठान, सत्व शुद्धीतें लाहोंन,
गुरुमुखें स्फुरतां ज्ञान स्वरूपाचें,
तेणें अविद्यादहन, गुणा सकळां छेदन,
ज़ालें स्वरूपबोधन; मग भय कैचें ? ॥ ३ ॥
ह्मणौनि सेवावा सद्गुरू चि ब्रह्म ज़ाणावें आत्मा चि
पूर्वपक्षु सहज़ चि येर बोल्णें ज़ालें.
दिगंबरें वांचूंन ऐसीं न पविज़े खुण !
ज़ेहीं सेविलें सगुणू ते चि धन्य ज़ालें. ॥ ४ ॥
स वायमात्मा ब्रह्म । विज्ञानमयो मनोमयः ॥

(११९६)

ज़ो आपुला ठायीं सकळ भूतें पाहे सर्वभूतीं आपणातें,
तो न इछी परुते ज़ाणपण कांहीं.

येर पुसिलें पुसती, नित्य नूतन सीकती,
ज्ञाणपण मीरविति यये स्थूळ देहीं. ॥ १ ॥ धृ ॥
बहु ज्ञाणे तो नेणता जनु; तत्व ज्ञाणूंनि नेणे सज्जनु;
वादु पडला अघवी येथ जिंके, तो हारवी.
खुण ज्ञाणे अनुभवी; येरां अनुमानु ! ॥ छ ॥
बट बटायमानें ज्ञैसी कीं विणा जिंकिली भेकी
मज्ञ पाहातां हे ही तैसी कीं गति ज्ञाली ?
दिगंबराचें दर्शन, जया स्वरूपवेदन
तया कुयुक्ती छळण; ऐसी कोण बोली ? ॥ २ ॥
यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ॥
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ॥ छ ॥

(१११७)

जीवन्मुक्ताचें शरीर ब्रह्म चि ऐसें दिसे साकार;
परि पाहातां अंतरज्ञान वेगळें चि.
ब्राह्य नयनीं साकार दीसे भानगोचर,
नानाविध समग्र, परि अवघें चि. ॥ १ ॥ धृ ॥
ब्रह्म चिन्मय स्फुरे येणें गुणनामें आकारें;
सर्व असर्व सर्वदा भेदु न गमे सत्पदा;
जनीं विजनत्व सदा मुक्तु स्वरूपें स्मरे. ॥ छ ॥
कणिकाभेदीं घृत अभिन्न, नानालंकार तें कांचन,
ऐसें मुक्ताचें ज्ञाणतेपण संसारीं.
दिगंबरें पूरता ज्ञाला स्वरूपज्ञाणता,
तो बा ! नव्हे मागुता जडदेहधारी. ॥ २ ॥

(१११८)

ब्रह्म सर्वत्र अभिन्न, त्रिविध भेद अतिक्षीण,
ऐसें केवळ नेणोन ज्ञो कीं भेदु भावी,
तया न चुके संसारु; कर्मबद्ध तो नरु;
मरे मरोंनि उपजु मरु पुडती सेवी. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें ज्ञाणपण ज्ञाये वायां; गति नाहीं भेदुवादियां.

द्वैतमतीचें देखणें उठी तेणेंसीं ज्ञाणणें;
याती सुटलें कवणें गुणें सेविजे तया ? ॥ छ ॥
मुळीं आपुलें अज्ञान तरि चि बाह्यभेदज्ञान,
तया मानिती सज्जन; ऐसें केवि घडे ?
पशुपामराहीं परि भेदु सहज्ञ अंतरीं;
दिगंबरीं हें चि तरि. गुरु कासया पुढें ? ॥ २ ॥
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति

११११९

आपुला मनीं विचारावें; मानैल तें सुखें करावें;
जें धरितासि तें तुझें नव्हे रे !
अवघें चि सोडूंनि द्यावें. तत्व उरैल सहज्ञस्वभावें रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
गुणहीन रे ! गुणहीन रे ! गुणहीन गमितां न ये !
ज्ञोथिचें तेथें मनें विरोनि ज्ञाईजे.
ध्येय, ध्यान तेथ काये ? रे ! बापा ! ॥ छ ॥
करितां अनुसंधान विशेषें न ये गगनातें गगनपण ज्ञैसें.
तें चि सुटे तैं निर्वाण. व्योम ज्ञैसें तैसें.
मन विरउंनि नुरवी सानसें दिगंबरीं समाधान ऐसें रेया !

(११२०)

जें मीं ह्मणौनि तत्व भज्ञसी, तें तुं सर्वथा न होसी !
आतां सोडीं रे ! ते स्वरूप वासनेसी रे !
न घडे तो यत्नु कां करिसी ?
बळें मिळतासि कां गुणदोषीं ? रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
सहज्ञ चि रे ! सहज्ञ चि रे ! सहज्ञ चि स्वरूप आहे !
सहज्ञपण ज्ञेथें सहज्ञा मायिक भज्ञतासि कां अनुपायें ? रेया ! ॥छ॥
सैंधव मिळे सागरातें ज्ञाणे तया जळधरा;
तैसा ज्ञाण तु न धरीं विचारा रे !
सुखस्पंदु नव्हे खरा रे ! ज्ञाण सहज्ञ चि दिगंबरा रेया ! ॥ २ ॥

(११२१)

आइकीलें सर्व विसरें ! विसरलासि तें न स्मरें !

चिन्मात्र चि ठाइका उरे रे ! येक भजता ये दुसेंर !
वृत्ति सोडूंनि असतां बेंर रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
ठाइका चि रे ! ठाइका चि रे ! ठाइका चि राहीं ठायीं !
ज्ञाणत नेणपण ज्ञाणे ज्ञाणिव मग पां करणें चि नाहीं रे बापा ! ॥ छ ॥
प्रबोधु ज्ञो निर्गुणाच्ञा असंगु तो चि तो गुणाच्ञा.
भःऊ॰ करि कां क्षिणु तयाच्ञा दिगंबरीं स्वस्पंदु कैंच्ञा ?
बोधु तत्वासि तत्वाच्ञों रे ! ॥ २ ॥

(११२२)

सजातीय, विजातीय, स्वगत, अद्वय तें ज्ञें भेदविगत,
काये निष्ठा पाहातासि ; तेथ रे ! सांडूंनि देयीं निजाचित्त रे !
मग भरैल सभराभरित रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
पाहातासि तवं तें नाहीं; पाहे, विसरोंनि ठायीच्ञें ठाइं;
ज्ञाणो ज्ञाणतां नेणणें ऐसें ज्ञाणतां ज्ञाणणें
संत बोलती भूषणें दोदूषणें कहीं. ॥ छ ॥
सकळां साधनांच्ञें कारण, ज्ञे सकळां वृत्तीं मरण,
तेथें विक्षेपु ह्मणिज्ञे ध्यान रे !
दिगंबरीं ऐसी खुण रे ज्ञाणों ज्ञाणती योगजिन रेया ! ॥ २ ॥
स एष नेति नेत्यात्माऽगृह्यो न हि गृह्यतेऽशीर्य्यो न हि शीर्य्यतेऽसंगो न सज्यतेऽसितो न व्यथते

(११२३)

शरीर, सुत, कळत्र मार्गी जन्म गेले अपार;
सेखीं कवण ज्ञाहालें स्थिर तुज़पासीं ?
पुढें करिसी सोसणी ते बा ! कवणालागूंनि ?
पाहे विचारूंनि वनी. वायां भ्रमु धरिसी. ॥ १ ॥ धृ ॥
आतां सांडि संगु तयाच्ञा रे ! अनुबंधु ये ममतेच्ञा.
सोये धरीं रे ! आलया ! व्यर्थ भ्रमलासि वायां !
देह ज्ञायील वीलया; मग न च्ञले काहीं. ॥ छ ॥
सर्व शरीर पवित्र; त्यामाजि द्वार अपवित्र;

कटकटा येरधार घडे तैसेनि पंथें.
जें कीं पाहातां नयनीं अन्न परते माजूंनि,
गंधु भरला येउंनि घ्राणीं विकळु करी ! ॥२॥
ज्ञाणत ज्ञाणत चि ऐसें, प्रीय ह्मणतासि तें चि कैसें ?
मळ विडुमळद्रवरसें हर्षे जेवी. यके वनितेकारणें दुःख पावसी केसणें ?
पाहीं विचारूंनि मनें ह्मणें, विलंबु करी. ॥ ३ ॥
भोगावया कुश्चिळा स्थाना, साहासी पुत्रैषणा वित्तैषणा.
येकि पाळितां अंगना दाहा पाळणें घडे !
साहातां पुत्रांचें नरक, साहावे तदर्थ आणिक;
गृहीं ह्मणे जें जें सुख तें तें दुःख सकळ. ॥ ४ ॥
मोटका गवसला देखोंनि वरि हाणती देवगण;
भाग मागती अवदान अन्न पितर ते ही.
राजा, अतीथि, तस्करु, जनु, स्वजनु अपरु
कैसा ज्ञालासी किंकरु ? सहसा सूटिका नाहीं. ॥ ५ ॥
ऐसें अनिष्ट ज्ञाणौन योगी सन्यासी ब्राह्मण
दारा दायादि जन धन सांडूंनि देती.
आत्मा ज्ञाणोंनि निर्मळु गुणरहीतु केवळु
येरु संगु सकळु मळु सांडती स्वयं ॥ ६ ॥
आतां अपार असो बोलणें; ये अर्थी येक चि करणें;
ऐसा सद्गुरू सेवणें, ज्ञो कीं तमस हरी !
दिगंबराचे ज्ञाहाले, तेहीं दुःखद जिंकिले
जाणों नेणणें आपुलें मूळसहीत मुळें ॥ ७ ॥
एवं वै तमात्मानं विदित्वा ब्राह्मणाः पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च ॥ छ ॥

(११२४)

तुं कवणु ? आधीं ज्ञाण; मग उचित तें करीं आन;
नातरि, केलें क्रियमाण दृढबंधन होयील. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! ह्मणें बोलपां तूं जडा ! बहु ज्ञाणपण साधूं पुढां;
अति अभिमानु येथें कुडा ज्ञाणोंनि, वेडा होतासि. ॥ छ ॥

यातीतें चि ठाउ नाहीं, तेणें धर्म आचरावा कायी ?
धवे मार्गु न घलीत ठाई, तो संदेही पडैल. ॥ २ ॥
ब्रह्म चिं जरि तूं साचार; तरि काइसे गुणाचे व्यापार ?
निज निश्चळ निरंतर चराचर हें मृषा. ॥ ३ ॥
दिगंबराचेनि अनुवचनें तुं चिन्मात्र ऐसें जाणें.
येरा मती भुलपां म्हणें भवबंधनें न तूटती. ॥ ४ ॥

(११२५)

ब्रह्मज्ञानाची वायी तेहीं परि सांडूनि देयीं.
ईश्वरु कैसा ? कवणु ? कायी ? विवेकु हा ही न करीं. ॥ १ ॥ धृ ॥
आधीं जाणपां आपणां, अवघीं सांडूनि कल्पना;
अभिवंदूनि श्रीगुरुचरणा, मग त्या खूणा पावसी
भेदु सत्य ? कीं अभेदु ? ऐसा न करीं वृथा वादु.
जाणतां तूं चि परमानंदु; भेदाभेदु तो लटिका ! ॥ २ ॥
बंधमोक्षाची कांडसणी शाब्दीक म्हणें वाखाणी;
स्वरूप जाणता स्वस्थानीं मग ते दोन्ही माइक.
प्रपंचज्ञान ही परी जाणोंनि आपणा मग करी;
असत्यभान दीगंबरीं निराकारीं लटिकें ! ॥ ४ ॥

(११२६)

पासीं असोंनि निधान कां भाषितासि दीनपण ?
बरवें आविद्यक जाण; सन्निधान फळलें ! ॥ १ ॥ धृ ॥
आहा ! रे ! देउ केनि दैवा ! वायां भ्रमितासि मावा !
माजि घरीं विसरोंनि ठेवा गांवोगांवा धावसी. ॥ छ ॥
बंधू चि नसतां मूळीं मोक्षु मागतासि देवाजवळि !
देवो तो स्वर्गीं ना ! पाताळीं महीमंडळीं तुजवीण ! ॥ २ ॥
दृश्य दर्शन निरासे; मग द्रष्टेपण चि आड असे !
तें निराशितां तुझें पीसें पाहातां कैसें न संपडे ? ॥ ३ ॥
शास्त्रजनित ज्ञान न करी स्वस्वरूप दर्शन !
पुडती संदेहवर्धन, आत्मज्ञान न खंडे ! ॥ ४ ॥
श्री सद्गुरूचेनि वचनें तुटती भेदाचीं बंधनें;

होयें विश्रांति समाधानें अनुसंधानें दिगंबरी ! ॥ ५ ॥

११२७

' मी ' ह्मणतासि तें चि आड; विण तेणें ब्रह्म उघड;
अवघें अक्षर, नीवीड, अज, अखंड, सर्वदा ! ॥ १ ॥ धृ ॥
अरेरे ! काये ज़ालें ? जडा ! तुं पाहतासी कवणीकडा ?
दृश्यभ्रमें होसी वेडा ! मग कुवाडां पडसी. ॥ छ ॥
प्रेम उपज़लें कवणाचें ? जीवा मूळीं रूप देवाचें,
ज़ाणोंनि पाहातां दुसरें कैंचें आत्मयांचें पूर्णत्व ? ॥ २ ॥
ज़ें आठउं पाहतासि मनीं, तें आठवांचा चि लयस्थानीं,
मना बुद्धीचां कारणीं, गुण निर्वाणीं सांपडे. ॥ ३ ॥
श्रीसद्गुरूचेनि वचनें उगा चि राहीं आत्मज्ञानें;
वायां वीण येर साधनें; खूण ज़ाणें दिगंबरीं ! ॥ ४ ॥

(११२८)

परोक्षज्ञानें परमात्मा आपरोक्षज्ञानें तो चि आत्मा;
वेगळा नामा रूपा धर्मा गुणा कर्मा नातळे. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! काये पाहातासि दूरि देवा ! ह्मणोंनि बाहेरि ?
ज़ाणें आत्मा अभ्यंतरीं चराचरीं अवघा चि ! ॥ छ ॥
अनुमानें तर्कु न करीं; साक्षात्कारीं प्रवृत्ति करीं;
स्वरूप निर्धारें निर्धारीं; भाना उरी असे चि ना ! ॥ २ ॥
शास्त्रांचें तोंड रीतें, काये आसक्तु होसी तेथें ?
वादें संतोषु न वर्ते गुरुविण मतें काइसीं ? ॥ ३ ॥
करूंनि सर्वांचें विस्मरण वृत्तिविकारातीत मन,
द्रष्टें स्वस्वरूप ज़ाण, गुणहीन दिगंबर. ॥ ४ ॥

श्रुति :—

स वा एष महानज आत्माऽजरोऽमरोऽमृतोऽभयो
ब्रह्माभयं वै जनक प्राप्तोसीति होवाच याज्ञवल्क्यः
सोऽहं भगवते विदेहां ददामि मां चापि सह दास्यायेति
स वा एष महानज आत्मा जरोऽमरोऽमृतोऽभयो ब्रह्मा भयं
वै ब्रह्मा भय ँ हि वै ब्रह्म भवति य एवं वेद ॥ छ ॥

(११२९)

अवस्थेपासाव स्फुरे भान; कारण अवस्थे तें अज्ञान;
अज्ञानपूर्वक अयथाज्ञान; हें भवस्वप्न आभासें ! ॥ १ ॥
कवणु देऊ येथें ? जना ! कीज़े कवण उपासना ?
ज्ञाणिज़े आपण आपणा. उपासना मग कीज़े. ॥ छ ॥
आत्मार्थ चि प्रीय सकळ; नव्हे सर्वार्थ सर्व केवळ.
सुखभोगासि आत्मा मूळ; येर जनजाळ स्वविषयो. ॥ २ ॥
समस्त ही देव सगुण, आणि परब्रह्म ही निर्गुण,
प्रीय आत्मार्थ; ह्मणौन प्रीतिस्थान तो आत्मा. ॥ ३ ॥
आपणा वेगळें आत्मधन, तें विषयोपासनेंसीं समान.
येक स्वरूप सेवन सत्य ज्ञाण परमार्थु. ॥ ४ ॥
हें चि मत योगियांचें, वेदा आणि ईश्वराचें,
दिगंबरा सद्गुरूचें. मत मूर्खाचें अनारिसें ! ॥ ५ ॥
श्रुतिः—
न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवत्यात्मनस्तु
कामाय पतिः प्रियो भवति ॥ छ ॥

(११३०)

तत्वमस्यादि वेदश्रुतीं जीवातें चि ब्रह्म बोलती.
निरशूंनि दृश्याची संगती अतद्व्यावृत्ती नेतित्वें. ॥ १ ॥ धृ ॥
आहा ! काये बोलसी परमाणु ? आत्मा न द्रष्टा; कवणु ?
नित्यु ह्मणतां होसी पाषाणु अवलक्षणु वेद बाही ! ॥ छ ॥
स्थूळ द्रष्टा स्थूळेंसीं, सूक्ष्म साक्षित्वें सूक्ष्मेंसीं;
आत्मा विलक्षणु दोहींसीं; जड तयासी नेणती. ॥ २ ॥
आश्रिता जाणें आत्मा साना, आश्रयत्वें विलक्षणु ज्ञाना,
परमाणुत्वें दृश्य स्थाना, कीं अज्ञाना आणिसी. ॥ ३ ॥
अवस्थात्रयीं विलक्षणता भोक्तृत्वें चि असे पाहातां.
इये हि तुरियेते ज्ञाणता तो तत्वता तुं कवणु ? ॥ ४ ॥
आत्मस्वरूपाचें ज्ञान स्वसाक्षात्कारें ज़ो नेणोन
ग्रंथाधारें बोले ज्ञान; तया सज्जन हांसती. ॥ ५ ॥

मी येथ अहिं नाहीं इतरा पुसिजे जैसें कांहीं.
तें चि ज्ञाणपण ज्याचा ठाइं अंतिसंदेहीं दिगंबरीं. ॥ ६ ॥
श्रुतिः———
स वा अयमात्मा ब्रह्म विज्ञानमयो मनोमयः
प्राणामयश्चक्षुर्मयः ॥ छ ॥

(११३१)

निदान कालिच्चा विसावां, योगियां हृदयगतु ठेवा,
पाहो ह्मणतां आठवा जीवा परुता वो !
योगें करूनियां बळ, लक्ष ठेवितां केवळ,
चूके ज्ञयाचें वीमळ रूप भज्ञतां वो ! ॥ १ ॥ धृ ॥
तो आत्मा श्रीदत्तु वो ! बाइये ! आत्मा श्रीदत्तु वो !
परब्रह्म सदोदित वो ! परिपूर्ण गुणातीत वो !
विश्वेंसीं अन्वित वो ! नामरूपविवर्जित वो !
गुणकर्मविरहित वो ! ॥ छ ॥
मना बुद्धीच्चा देखणा, विलक्षणु, देहाद्यवस्थागुणा,
दृढ धरितां मीपणाहूंनि परुता वो !
ज्याच्चें प्रकटलेंपण, कार्यसहित कारण,
सेष नुरवी सगुण अहंममता वो ! ॥ २ ॥
सकळां विद्यालयस्थान, पूर्णानंद चैतन्यघन,
परब्रह्म निर्गुण गुणमय ज्ञालें.
दिगंबरें हें केवळ नित्य, स्वरूप निर्मळ,
सत्य, सहज्ञु, केवळ, मूळ न विचळे. ॥ ३ ॥

(११३२)

वेद्य, वेदन, वेत्ता, साक्षित्वें चि विलक्षणता;
आतां ज्ञाणिज्ञे ज्ञाणता अंगें कवण ? वो !
धृति धरूनि वेगळा ज्ञाण धारणा सकळा
द्वैतभावें सूटला येणें सगुणें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
तो आत्मा अवधूतु वो ! बाइये आत्मा अवधूतु वो !
ज्ञानज्ञेयविवर्जित वो ! ज्ञानसागर श्रीदत्तु वो !

व्यक्ती आला अव्यक्तु वो ! ॥ छ ॥
दृश्याचेनि परित्यागें, तद्दर्शनाचेनि अंगें,
द्रष्टा ज्ञाणिज्े वियोगें गुणमतीचेनि.
तेथें अभाव स्वभाव भाव न धरी ज्ञाणिव.
ज्ञाणों ह्मणतां नेणिव, ठाये ज्ञाणतेपणीं. ॥ २ ॥
ज्ञाणत नेणत ज्ञाणणें, ज्ञाणोंनि तें नेणपणें,
आगां आलया देखणें खुणे खुणे सहज्ञासी.
दिगंबरीं हें बोधन, स्वयं स्वरूपवेदन,
योगी उमज्ञले खुण; ते वदवे कैसी ? ॥ ३ ॥

(११३३)

युक्तांचें गुप्तधन, आणि मुक्तीचें कारण,
कैसी करूं मीं जतन गुणरहिताची ?
जेथें धृतीचें करणें योगा न मिळे धारणे,
प्राति सहज्ञ सोडणें युक्ति धारणेची ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा आत्मा गुणहीनु वो ! बाइये ! आत्मा गुणहीनु वो !
चिद्वस्तु सनातन वो ! श्रीदत्तु निरंजन वो !
योगमायावीहिनु वो ! ॥ छ ॥
प्रवर्तन तें गुणाचें; गुण अप्रकाशक वस्तूचें;
एवं सिद्धा साधन कैचें ? बाइये ! वो !
दिगंबरीं समाधान, सिद्ध सहज्ञ चेतन,
वृत्तिविलयें साधन ज्ञाण सखिये ! वो !

(११३४)

दृश्या शरीराचा ज्ञाणता, आलिये अवस्थेचा भोक्ता,
तो तुं कवणु ? तत्वता ऐसें ज्ञाणपां गा !
ज्ञे छें देखिज्े देखणें, ज्ञो तरि श्रवणीं आइकणें,
रसु ज्ञाणवे रस्ने, स्पर्शु कळे आंगा. ॥ १ ॥ धृ ॥
तो तूं आत्मा गुणहीनु रे ! बापा ! आत्मा गुणहीनु रे !
परमात्मा गुणहीनु रे ! सर्वात्मा सगुण रे !
परब्रह्म निरंजन रे ! बापा ! ॥ छ ॥

ल्योद्भवस्थान गुणांचें, जाणसी विभेद तयांचे.
तुजवांचूंनि मतीचें होणें जाणें.
नाहीं दिगंबरेंवांचूंन, हें तव प्रकट चि खुण;
परि येथिचें साधनज्ञान न कळे कांहीं ॥ २ ॥

कोऽयमात्मेति

(११३५)

चंचळा प्राणाचा प्राणु, देख तया नयना नयनु;
आत्मा श्रवणाश्रवणु, अन्न अन्नमय.
मन मनाचें कारण, जीव मतीनिरसन,
जेथें उपजे मीपण, स्फुरण जाये विलया. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा मनें जो जाणती, बाइये ! मनसें जाणती,
ते ब्रह्म स्वयं भजती; भवसागरु तरती;
जीवन्मुक्त क्षिती चरती; गे ! बाइये ! ॥ छ ॥
मायाकृत भवभान, ययाचें जेथ निरसन,
शिवपर निर्गुण तत्व अविकारी.
दिगंबर केवळ मनें जाणोंनि पाल्हाळ,
येर सांडिजे सकळ जाळ श्रमकारी. ॥ २ ॥

प्राणस्यप्राणमुत चक्षुषश्चक्षुः ॥ छ ॥

(११३६)

आत्मत्वाचें संस्फुरण तें उपजलें जया पासून;
स्वपरवृत्ती आभासमान तें चि आत्मत्वें.
दाटेंनि तया मीपणा अंतरीं प्रगुप्त जें दिसेना;
मीपण शरीर तया मीपणा जाणे तो आत्मा.
जया जाणतां मीपण शेष न उरे स्फुरण;
शुद्ध, स्वरूप, निर्गुण, पूर्ण, प्रकट होय. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें जाणणें अध्यात्मज्ञान; एर लटिकें संप्रलपन.
यत्नु करीं रे ! आल्या ! नित्य श्रीगुरूसेवया;
वेचु मांडला सेवया; क्रिया न करीं दुजी. ॥ छ ॥
मीपण नेणे आत्मयां ; आत्मा चि जाणे तया;

नियंता अंतगु तो, या निरसूंनि ज़ाणिज़े.
पाहातां तें काहीं चि नसे; तेथ अविनाशु आत्मा चि असे;
देहावस्थाभानदोषें लिंपे चि ना.
ज़ो या सर्वांचें अंतर, ज़ेणें सर्व ही नश्वर;
ज़ो तरि स्फुरे, हें समग्र भानकार्य गुणाचें. ॥ २ ॥
अदृष्ट द्रष्टा तत्वता, अश्रुतु आत्मा श्रोता,
मानिला नव्हे सर्वथा, मानिता चि ज़ो.
ज्ञेय ना ज़ो ज्ञान, ज्ञातेपणाचें कारण;
अनुभविज़े खुण ते अखुण अनुभविता चि ज़ो.
ज़ेथें प्रवृत्ति न चले; ज़ो कीं प्रवृत्तीचेनि मूळें
कळे; कळला; न कळे; न कळणें; न साहे. ॥ ३ ॥
दुज़ा द्रष्टा ज़या सर्वथा नाहीं; मंता, विज्ञाता;
तो आपुला आपणू चि स्वतां स्वप्रकाशु आत्मा.
ऐसी ज़ाणावयाची खुण न कळे दिगंबेंर वांचूंन;
येरां मती साधन तें बाहेरि सवडे.
येक नेणती बापुडे; शास्त्रवादें ज़ाले वेडे;
साक्षात्कारू चि घडे; ऐसें बोलती जड. ॥ ४ ॥
श्रुतिः ———

य आत्मनि तिष्ठन्नात्मनोन्तरोयमात्मा न वेदेति अदृष्टो द्रष्टेति ॥छ॥

देवदत्त

(११३७)

रूपांतःपाती सान ते नाहीं परमाणूहून;
तयातें हीं सूक्ष्म गगन व्यापूंनि असे.
तें हीं परि सछिद्रपणें ज़ाणवें न ये नयनें;
तेथें अदृश्यत्वें असणें सूक्ष्मा शब्दाचें
तो हीं शब्दु श्रवणातें स्थूळत्वें वेद्यु वर्ते;
श्रोत्रसंबंधी ज्ञान तें अत्यंत सूक्ष्म. अंतः करण श्रवणा; ज्ञान अंतकरणा;
आत्मा सूक्ष्मु ज़ाणा ज्ञानाहूंनि. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें सानें आन नाहीं ज़याहूंन !

ते सूक्ष्म निर्गुण परब्रह्म गा ! ॥ छ ॥
थोरामाजि अतिथोर विराट देवाचें शरीर,
चतुर्दशभुवनाकार ह्मणौनिया.
तया विराटाहूंनि प्रचंड सप्तावरण ब्रह्मांड;
ज़यामाजि हें कोड सकळे सृष्टीचें.
ऐसिया अंडाचिया कोटी जीये मायेआतु वटी,
महामाया चि मोटी सकळांहूंनि.
ते ही ज़ेथें येकदेशी निमे ऐसिया रूपासि,
केली मर्यादा कवणासि ज़ाये ? सांग बापा ! ॥ २ ॥
ऐसें सानाहूंनि सान, असाधारणा असाधारण,
ब्रह्म चि येक; वांचूंन दुसरें नाहीं.
ज़याहूंनि पर न वर्त्ते, अपर तैसें चि आरुतें,
सर्वत्र सर्वदा जें वर्त्ते स्वयं चि सर्वाकारें.
प्रपंचाभाव दर्शनें तें निर्विकल्पत्वें सेवणें;
अथवा, अन्वयज्ञानयोगें तेणें विश्व ब्रह्म.
तेथें भेदें उपासना ह्मणें करिसि अज्ञाना !
वेदविरुद्ध कल्पना योगु ह्मणें बोलसी. ॥ ३ ॥
स्वविद्येच्नेनि निरासें सर्वा विद्या काहीं चि नसे;
तेणें चि स्वरूपशुद्धांशें मायावी वाऊ.
तेथ जीउ ना सर्वेश्वरु, देहअवस्थागुणव्यापारु,
अत्यंतीकु प्रगोचरु प्रलयो चि तो.
ठेलें स्वपरानुसंधान, सहज़ें सहज़ समाधान;
अनुभवें ऐसी खूण प्रत्यया ये.
बापु सद्गुरु ईश्वरू ज्ञान करी दिगंबरु;
यरां न दिसे; आंधारु ते पैं पाहात ठेले ! ॥ ४ ॥
यस्मात्परं नापरमस्ति किंचिद्यस्मान्नाणीयो
न ज्यायोऽस्ति कश्चित् ॥ छ ॥
अणोरणीयान्महतो महीयान् ॥ छ ॥

(११३८)

पूज्य, पूजक, पूजन, यये त्रिपुटीहूनि विहिन,

सकळे त्रीपुटीचें भान सहीत येणेंसी;
सहित तरंगाकारें, निस्तरंगु निजाकारें,
सागरु स्वस्थिती स्फुरे जैसा काहीं
तैसा अवघेपणेंसीं अवघा, दाटौनु आंगें आंगा,
आत्मा ब्रह्म जो योगा वियोगा नातळे.
ज्ञाणों ज्ञाणता अंतरीं दीसे भानाची परी
सर्व सहज्ञ अंबरीं वर्ते अंबर जैसें रे ! ॥ १ ॥ ध्रु ॥
ऐसें तें निर्गुण ब्रह्म निरंजन
ज्ञाणती सज्जन स्वस्वरूप गा ! ॥ छ ॥
नेणिजे तंवं दुरि अपार अंतर माझारि
ज्ञाणतां आपुलां अभ्यंतरीं आपण चि ते !
कीं तत्पदार्थशोधनीं तत्पर आभासे तें तें चि समग्र
त्वंपदार्थगत निरंतर अक्षर चि सर्व.
आसी पदार्थें ज्ञाणतां माजि भेदु नुरे सर्वथा;
एवं भानेंसीं येकात्मता सहज्ञ ज़याची.
ज्ञाणों ज्ञाणे तो देखणा योगी स्वरूपें आपणां;
येरांप्रति ते कल्पना मनें केलि; न वर्चें !
अतद्रूप नसे काहीं, तद्रूपभान येक ही,
ऐसोनि विरोधें नाहीं विक्षेपु ज़या.
तें चि ज़वळि, तें चि दुरि, सर्वी तें बाहेरि, अंतरीं,
मध्यें, सर्व नाममात्र, परी वस्तु सर्वत्र.
सदन्वयव्यातिरेकें भान हें बोलणें लटिकें;
ह्मणौनि सर्वमयत्व आणिकें घेतलें न वचे.
ऐसें ज़ाणतां निर्गुण आड न साहे दर्शन;
बुद्धी स्वरूपबोधन तें हीं सांडणें पडे. ॥ २ ॥
दूरील दृश्य दृश्यपणें ज़ाणोंनि तें सांडणें;
दर्शन हीं तेणें चि मानें आश्रयत्वें करून.
द्रष्टेपण प्रकल्पित दूरि त्यक्त सापेक्षित;
एवं ज़वळि ह्मणौनि अत्यंत ज़ाणणें न साहे.

सकळ वृत्तिपरित्यागें आपण चि जें कीं अवघें,
ते जवळी, दूरि, पुढें, मागें, कल्पना कासी.
सर्व अवघें अक्षर, एकपण निरंतर;
ब्रह्म स्वयं दिगंबर सिद्ध सहज असे. ॥ ४ ॥
तदेजति तन्नैजति तद्दूरे तद्वान्तिके। तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्यास्य बाह्यतः ॥ छ ॥
यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति
सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते
यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः
तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ॥ छ ॥

(११३९)

यया विश्वाचें कारण पूर्णब्रह्म चि निर्गुण;
तें चि नामरूपाकारें पूर्ण प्रपंचरूपें.
जैसें निस्तरंग जळ तें चि बुदबुद फेन कल्लोल;
परंतु, तेणें भेदें तें वेगळ नव्हे कवणेंसीं.
कार्यी सहचर वर्तमान ब्रह्म समवाइ कारण
तेथें भेदाचें भान सामावें जें,
तें तें सहज संचलें; जैसें तैसें चि उरलें;
भेदवादियां न कळे बहिर्मुखें वेदनें. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें संपूर्ण ब्रह्म सनातन जाणिजे आपण ज्ञानगम्य गा ! ॥ छ ॥
सगुण, पूर्ण, येकदेशी, मायामयत्वें परियसीं,
निर्गुण, पूर्ण, तें तयासि व्यापूंनि वेगळें हीं.
तेणें संपूर्ण निर्गुणें सगुण पूर्ण जें ग्रसणें,
तें यथापूर्व पूर्णपणें ब्रह्म चि पूर्ण.
तेथें भेद चि उपासना असंबद्ध प्रकल्पना
गुरुहीना अज्ञाना योग्य भासे.
ज्ञानविद्येचा सागरु जरि भेटे दिगंबरु,
तरि स्वरूप निर्द्धारु पारु पावती जड. ॥ २ ॥
ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते
ॐ खं ब्रह्म ॥ छ ॥

(११४०)

॥ मल्हारु ॥

व्यर्थ श्रवण मनोरंजन करितां, तें मज़ न मनँ सुखाचें;
विषयसूखस्वप्न क्षणीक भज़तां व्यर्थ चि आयुष्य वेचे.
मानव्य देह गेलियांवरि बापा ! कव्हणी नव्हे कव्हणाचें.
न धरीं श्रमु येथें कांहीं रे ! आलया ! चिंतन करिं दत्ताचें.॥ १ ॥ धृ ॥
रेया ! लाहो, घे सज्जना ! नित्य निरंतर देहीं.
सद्गुरुसंगु घडे, तरि चि तरसी; उपाॐ दुसरा नाहीं. ॥ छ ॥
श्रवण, मनन, निदध्यासन परि ते गुरुविण फळद चि नोहे.
येकु चि दिनकरु नसतां, इतरीं निसिमान ते केविज़ाये ?
सकळ श्रमकर साधन भज़सी; श्रमु चि तेणें उपायें.
दिगंबरें विण सुटिका कैंची ? तुं दृढ धरीं त्याचे पाये. ॥ २ ॥

(११४१)

अगणित मृगजळ चंचळ सरिता, पाहातां कांहीं चि नाहीं.
ॐघ वेग झरझर द्रवती. तरतासि तूं तेथें कायी ?
देहिक सुख दुःख तैसें नेणोंनि बुडतासी कोरडां डोहीं.
चेॐ धरूंनि स्वप्न त्रिसरे मायिक. गुरुप्रति शरण ज़ाईं रेया ! ॥ १ ॥ धृ ॥
चेॐ धरीं सुज़ाणा ! नरदेह ज़ातसे वायां.
ऐसा संगु तुतें कैंचा ? पुडती वेगु करीं लवलाह्या. रेया ! ॥ छ ॥
शरीर, सदन, वन, जन धन भज़तां जन्म चि गेले अपार.
बहु श्रीयकर सूतवानितादिक, तें कायें भान ज़ालें स्थिर ?
अपरबुद्धि वायां करिसी सोसणी; वेचलें हें ही शरीर.
दिगंबरू गुरू भज़; कां, आलया ! पावसील पद पर रेया ! ॥ २ ॥

११४२

सकळ क्षीतितळ जळमय, परि तें चातकु न भज़े तयासी;
निरालंबीं परिभ्रमण करि; वरि आळवितो मेघांसी !
देह पडो; परि व्रता न ढळे ! कवणु तया उपदेशी ?

सहज़ गुणु मज़ लागो कां; तेवी आळवीन दत्तासी. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ! श्रीदत्ता ! परम दयामृत वर्षें !
सकळ ताप माझे करिकां शमन ! न निवे मीं अन्यरसें रेया ! ॥ छ ॥
नामस्मरण भवनाशन; परि तें तुज़विण न मनें सुखाचें.
वियोगताप उपशांती करि. स्मारक होये तयाचें.
कवण कर्म माझें ? कैसें दुष्कृत ? दर्शन नव्हे चरणाचें !
दिगंबरा ! आतां किती आळउ ? उदर फुटे जीवाचें रेया ! ॥ २ ॥

(११४३)

नित्य श्रवण अनुचिंतन करितां, चित्तविषयो ज्ञालासी.
गुणीं गुंपलें मन, परतिसि न धरीं, आठवें चि, ज़डलें रूपासी.
सकल शरीरसुख सांडूनि, मनस धावतसे तुज़पासीं !
तथापि सूखकर कांहीं चि न मने भेटीवांचूंनि; परियेसीं. ॥ १ ॥ धृ ॥
रेया ! श्रीदत्ता ! कैं येसी ? वियोगें विकळ मन माझें !
आन योग मज़ दुःखेंसीं सम ! शरीर ज़ाहालें वोझें ! ॥ छ ॥
स्मरण नित्य गुणकीर्तन श्रवणें तें चि पुडतो पुडती.
शुद्ध, श्यामरूप, राजीवलोचन अखंड स्फुरताहे चित्तीं.
विसरीं तो चि आठउं. प्रकटे, तें दुःख साहाणें किती ?
दिगंबरा ! चित्त न करीं कठीण ! प्रकटें करुणामूर्त्ती ! ॥ २ ॥

(११४४)

अनुसूयेचां घरीं मीनलिया नारी ह्मणती,:– अनसूये ! अवधारीं वो !
श्रीदत्त सुंदरी आणिपां बाहेरी ! पाहोंनि तयासीं डोळे भरी वो ! ॥ १ धृ॥
बोले अनसूया अतिप्रीति माया,:–'बापा ! येई ! रे ! योगिया ! रे !
तुतें आळिवया पाहाती सखीया ! कृतकृत्य धन्य होती तियारे ! ' ॥छ॥
ज्ञाणीतली सूण मातेचें वचन; दुडुदुडु पावला धावोंन वो !
देउंनि आलिंगन वो सिंगां रिघो करिता ज़ाहाला स्तनपान वो ! ॥ २ ॥
कुरुवाळी माया; पाहाती सखीया; सादु घालिती दत्तात्रेया वो !
योगिजनप्रीया ! अरे ! सिद्धराया ! दिगंबरा ! आळिवया ! रे ! ॥ ३ ॥

(११४५)

'बोलु बोले, बाळा !' बोलती वेल्हाळा; रूप लक्षिती दोहीं डोळां वो !

येरु सहज़ गूणें केसणें, नसणें, अवलोकी तयांचीं वदनें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतुदर्शनें आनंदलीं मनें; सतियांचीं गुंपलीं चेतनें वो !
लक्षिती लक्षणें, अंगदभूषणें, रूप साजीर कोडीसवाणें वो ! ॥ छ ॥
येकि ह्मणतीः—‘ बाळ चित्रिचा पूतळा ! पाहावा चि वाटे वेळोवेळां वो !
अनुपम्यु कळा सुंदरु सावळा; धन्य सखी अनसूया वेल्हाळा वो ! ’ ॥२॥
पाहातां पादतळें, ज़ैसीं रातोत्पळें मृदें, साजिरीं सकोमळें, वो !
घागरियानें वोळ शब्द करिती बाळे;
मनसें मानितां कैसें कळे ? वो ! ॥ ३ ॥
नादीं वेद श्रूती स्वर उमटती; नष्ट वेद तेणें उज्वळीती वो !
असतां ऐसी स्थीती ज़ाणवों ये युक्ती पादद्वय वेदवेद्यव्यक्ती वो ! ॥ ४ ॥
ऐसें होतां ज्ञान हें रूप कवण लक्षितां कुंठीत ज़ालें मन वो !
भाग्य अनुष्टान अत्रींचें कवण ? दिगंबर सांपडलें निधान वो ! ॥ ५ ॥

(११४६)

नयन सुरेख पाहातां कौतुक, येक ह्मणती, गेली तानभूक वो !
फांके चिदात्मक तेज अलौकिक; शशि, सूर्य लोपती पावक वो ! ॥१॥धृ॥
अभिनव माये श्रीमुख मीं पाहे; तेणें सुखें गगनीं न मायें वो !
अवधूतु सैये ! परब्रह्म होये; चिद्धन ज़ोडलें अनुपायें वो ! ॥ छ ॥
दृष्टितेजें येणें कळे अनुमानें माया तमस हरे जेणें वो !
नेणं तेजोगुणें नयन वो ! येणें रूपें ब्रह्म चि साच मानें वो ! ॥ २ ॥
कृपाअवेक्षणें जडांचीं अज्ञानें तोडील श्रीदत्तु; सत्य ज़ाणे वो !
दिगंबरें येणें ज्ञानामृतघनें योगीजन तरती सगुणें वो ! ॥ ३ ॥

(११४७)

स्वभावें श्रीदत्तु मुख पसरीतु; तेथें चि येकींचा भावो स्वस्थु वो !
स्फुरे परमार्थु; येणें तुटे स्वार्थु; देखती आभासु; ऐसा व्यक्तु वो ! ॥ १ ॥धृ॥
श्रीदत्तु निधान अनसूये ! ज़ाण; करी करीं याची ज़तन वो !
ब्रह्म निरंजन सांपडलें सगूण; क्षणक्षणा देयीं आलिंगन वो ! ॥ छ ॥
ययाचां वदनीं पाहातां साज़णी ! लक्षणें देखिलीं दोनि तीनि वो !
दृढ ज़ालें मनीं ब्रह्म हें ह्मणौनी; पुससील तरी घे श्रवणी वो ! ॥२॥
अनंतें ब्रह्मांडें दीसती प्रचंडें; तयामाजि विश्व घडे, मोडे वो !

तें रूप केवढें ? गुणी न संपडे; पुडती लक्षितां वाडें कोडें वो ! ॥३॥
तीतुलें ही भान ज़ांहालें; अन सर्व शून्य अवघें गगन वो!
आदि अवसान अभावालागूंन न दिसे; पुडती दिसे अन वो ! ॥ ४ ॥
अभावो ही, ज़ाणे, नीमे पूर्णपणें; वीपुटींचें आटलें देखणें वो!
पाहातां पाहाणें अनिवड; तेणें आनंदु ज़ाहाला समाधानें वो ! ॥ ५ ॥
ऐसें दीसे माये ! पूसर्साल काये ? ब्रह्म चि केवळ सत्य होये वो !
दिगंबरू सये ! द्वैतासि न साहे. दर्शनें सायुज्य होत आहे वो ! ॥ ६ ॥

(११४८)

परब्रह्मसार, शुद्ध, निरंतर, व्योमासारिखें निर्विकार, वो !
अलक्ष, अपार, शिव, परात्पर, साकार चि, परि निराकार वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतरूप चैतन्य स्वरूप साकार चि, परि निर्विकल्प वो !
पाहातां अमूप भासे भासरूप, दर्शन ययाचें सुखरूप वो ! ॥ छ ॥
गुणदृष्टी पाहे गुणी गुणा नये; येणेंसीं अभिन्न स्फुरे माये ! वो !
नीवडों न लाहे; कैसें करूं काये ? मनस वीरोंन ज़ात आहे वो ! ॥२॥
प्रापंचीक भान तेणेंसीं अभिन्न; द्रष्टा, दृश्य तें चि; तें दर्शन वो !
बाळक सगूण पाहातां निर्गूण दिगंबर ब्रह्म परिपूर्ण वो ! ॥ ३ ॥

(११४९)

वस्त्रें अळंकार पाहातां समग्र श्रीदत्ताचे नीज सुखकर वो !
अवस्थागोचर भान होये क्षर प्रकाशे स्वरूप निरंतर वो ! ॥ १ ॥ धृ ॥
सगूण चि माये ! परि व्यक्ती न ये, ब्रह्म प्रकाशरूप होये ! वो !
योगी अनुपायें सेवितील पाये. तयांचा विभेदु ल्या ज़ाये वो ! ॥ छ ॥
ब्रह्मा भेदकर; स्वरूप साकार; संगु याचा लाहाती ज़े नर वो !
ते ही ते समग्र ब्रह्मा भेदकर; जनी जना होतील साचार वो ! ॥ २ ॥
अंगदभूषणें तें हीं जड लेणें; ब्रह्म प्रकाशक केलें येणें वो !
येणें अनुमानें सेवका कारणें तें चि पद देइज़ेल, ज़ाणे वो ! ॥ ३ ॥
वहू सांगों काये ? सत्य ज़ाणे, माये ! मही अगोचर याचे नोहे वो !
दिगंबरू सये ! मेवीं अनसूये ! पावशील पर अन पाये वो ! ॥ ४ ॥

(११५०)

दत्ताचे घरींत ते ही ते समस्त ब्रह्म प्रकाशक सुनिश्चीत वो !

मायागुणमुक्त ब्रह्म सदोदित चरीत सहीत वो ! ॥ १ ॥ धृ ॥
निरंजनपाये ब्रह्म सत्य होये; धरिजे हे कवणे उपाये ? वो !
त्याचेनि अन्वयें जग ब्रह्म आहे; आतां, हें साकार ह्मणों न ये, वो ! ॥छ॥
शब्दें संगयोगें चरीत प्रसंगें येणें तरइल जन अवघे वो !
श्रवणें प्रेमांगें येणें भक्तिमार्गें दिगंबरें मुक्ती लागे वो ! ॥ २ ॥

(११९१)

त्रिपुटीचे योग होसी बहिरंग पाहातां दत्ताचे येक अंग वो !
स्वर्ग ते ही तारी जग दर्शनें जिंकिले सर्व मार्ग वो ! ॥ १ ॥ धृ ॥
कैसें करूं ? माये ! मन स्थीर नोहे; धरिजे हें कवणें उपायें ? वो !
क्षणक्षणा पाये आठवती सैये ! कमळनयनु भेटी न ये वो ! ॥ छ ॥
नयनीं पाहीन ! बाहीं कवळीन ! श्रीदत्तु या जीवाचें जीवन वो !
योगियाचें ध्यान; जेथें ज्ञानस्थान; दिगंबरस्वरूप निधान वो ! ॥ २ ॥

(११९२)

अंतरीची खूण गेली हारपोन; लाहालें बाहेरि मज ध्यान वो !
करितां स्मरण आठवे वदन; गुंपलें, तुपडे माझें मन वो ! ॥१॥धृ॥
अतिप्रीति माये ! धरीन मीं पाये; वियोगु कैसेनि मज साहे ? वो !
जीवीं जीउ सये ! अवधूतु होये; परति न करी; करूं काये ? वो ! ॥छ॥
जप अनुष्ठान ने घे माझें मन; नयनीं पाहीन मी चरण वो !
नित्य संभाषण, संगु मीं लाहीन; दिगंबरें हरिलें बोधन वो ! ॥ २ ॥

(११९३)

हृदय दुभागे कवणापुढें ? सांगे श्रीदत्ता ! येईन तूजसवें रे !
जाउ नाहीं योगें येणें; व्यर्थ भोगे सूख तेंहीं दुःख अवघें रे ! ॥१॥धृ॥
श्रमलया जीवा तुं मज विसांवा; सत्य सत्य जाण देवदेवा ! रे !
संगु न संडावा; वियोगु नें दावा; आणिक न करी देवसेवा रे ! ॥ छ॥
तुझा नाहीं संगु; वरि दुःखयोगु; कृतकर्म लागलासे लागू रे !
उमजवी मार्गु; जेणें लाहे संगु; दिगंबरा ! न संवरे वेगू रे ! ॥ २ ॥

(११९४)

श्रीदत्तु सावळा चैतन्यपूतळा मीं कैं कैं देखयीन डोळां ? वो !
कासे सोनेसळा, तीळक पीवळा, चंदनाची उटी, वरि माळा वो ! ॥१॥धृ॥

जीवाचें जीवन जीवें वोवाळीन; अखंड लागलें त्याचें ध्यान वो !
माझे पंचप्राण श्रीदत्त निधान; न स्मरे आणीक तेणेंवीण वो ! ॥छ॥
घुंसलें श्रवणीं तें तेज गगनीं लोपूंनिया स्फुरे दीनमणी वो !
मुकुट शिरस्थानीं चिद्रत्नाची खाणी तें तेज न स्माये त्रिभुवनी वो ! ॥२॥
बाहिवटे, कंकणें, मुद्रिकांचें लेणें, अंगद कानकें, विभूषणें वो !
दिगंबरें येणें कमळनयनें हरिलीं साधूंचीं निजमनें वो ! ॥ ३ ॥

(११९५)

श्रीदत्तु निधान माझे पंचप्राण; सार्धान मीं गुप्त योगधन वो !
चंचळ हें मन बळी, अहंकरण; सकळ शरीर मी देयीन वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! शुद्धस्यामा ! अरे ! पूर्णकामा ! देवा ! नकळे तुझी सीमा रे !
स्वस्वरूपरामा ! त्रिगुणविरामा ! भेटि देसील कयी आह्मा ? रे ! ॥ छ ॥
श्रीदत्ताचें रूप चैतन्यस्वरूप, व्यक्त, सन्मय, निर्विकल्प वो !
ब्रह्म सदोदीत स्वानंदभरीत दिगंबर मूर्तिमंत वो ! ॥ २ ॥

(११९६)

बोलतीसे मायाः— अरे ! योगिराया ! तुझया लागैन नित्य पाया रें !
ह्मणें तूं आत्मया ! ज्ञासी खेळावया; तपे प्रखरु प्रतपीया रे ! ॥१॥धृ॥
तुं माझे प्राण! श्रीदत्ता ! जीवन; न राहे तुज़वीण माझें मन रे !
नित्य करितां ध्यान तुझी आठवण, गलीत ज़ाहाले करणगण रे ! ॥छ॥
वन भयंकर निर्मळ अपार; व्याघ्र क्रीडती निरंतर रे !
सकळ कौमारवय अविचार; आलें हीं नेणा भय थोर रे ! ॥ २ ॥
येरु ह्मणे::— माये ! आह्मीं करूं काये ? वासना हे उगली न राहे वो !
धरीन मीं पाये छेदीपां उपायें; वासने अर्धान देह आहे वो ! ॥ ३ ॥
अनसूया बोले::— वासना हे गळे, ऐसें वर्म काहीं न कळे रे !
योगी वेडावले; संन्यासी श्रमले; दिगंबरा ! तुतें शरण आले रे ! ॥४॥

(११९७)

ऋषिपुत्र समग्र बैसले एकत्र, बोलती स्वप्रीय उत्तर रे !
येक ह्मणती सार दत्ताचें शरीर यत्नें राखिज़े निरंतर रे ! ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्तु विसावा ! विश्रांतीचा ठेवा ! सखा ! स्वजनु, जीउ जीवा रे !
देणें क्षेम सर्वां आह्मां आहे. देवा ! रक्षीं ययासि शिवशीवा ! रे ! ॥छ॥

ययें वनीं व्याघ्र गर्जती; निसार दिसे निर्जन भयंकर रे !
रूप सकुमार, पांधुरवा शरीर, आछादूंनि ठेवा दिगंबर रे ! ॥ २ ॥

(११५८)

येकि ह्मणती:: — ' यया रक्षिजेसी क्रीया नाहीं. अगम्य याची माया रे!
दृष्टि चुकउंनि ज़ाये कवणा ठाया तो ठावो चि
नूमज़े जीवा यया रे ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! गुणहीना ! कमळनयना ! अंतरे ज़ातासि बहुगूणा रे ! '
न साहावे मना वियोगवेदना; भय तुझें चि अंतःकरणा रे ! ॥ छ ॥
येक ह्मणती काये ? धरा याचे पाये मग हा कैसेनि दूरि ज़ाये रे !
न्याळवीतु आहे ? ह्मणें गुप्तु होये ! दिगंबरा ! शब्दु न साहे रे ! ॥ २॥

(११५९)

येक ह्मणती::— ' यातें न रखने तूमते;
हृदयीं बंधन करा चित्तें रे ! येणें अवधूतें गोविलीं बहूतें;
श्रमती यालागि नाना मतें रे ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! तुझे स्थान होतें वेद्यमान, तरि हें आयासें बहु जन रे !
न श्रम ते जाण; आतां तुज़ आण; दाखवीं आह्मां लागूंन रे ! ' ॥छ॥
येक ह्मणती::— मौनें उगें चि राहा ध्यानें लक्षूंनि ययाचीं लक्षणें रे !
उपायें कवणें होइल यया ज़ाणें ? करावीं जीवाचीं बंधनें रे ! ' ॥२॥
येक वदती वचन::— ' करा आराधन; लाहा ययाचें प्रसन्नपण रे !
सांगैल स्वस्थान विश्वासैंकरूंन. न साहे उत्तर या कठीण रे ! ' ॥३॥
बोलें दिगंबरु::— पाहातां विचारु नेणा, तुह्मां न कळे प्रकारु रे !
गुणाचा व्यापारु नेघतु समग्रु मीं तुह्मां चि माजि असे निरंतरू रे ! ॥४॥

(११६०)

तूं माझा आत्मा; तें मीं तुझा कायी ऐसें अवधुता ! ज़ाणोंनि हीं ?
परमानंदा ! तूं सर्वदेहीं; सत्य तें तूं वीण दुसरें नाहीं. ॥ १ ॥ धृ ॥
आतां हा कर्मबंधु कवणासी देवा ? बहुकाळ मोहिलों तुवां मावा ॥छ॥
सत्याप्राति दुज़ें सत्य चि नाहीं. सकळ कर्म तें सत्य चि जयीं.
तें सर्व तुझें चि ज़ाणोंनि घेइं. दिगंबरा ! तो आह्मां संगू चि नाहीं. ॥२॥

(११६१)

आत्मज्ञानें म्यां संसारु केला. नवलाउ येथें येक घडला.

दत्तु ह्मणौनि भजें आत्मा आपुला. भेदु मायां परी संप्रतिष्ठीला.॥१॥धृ॥
तसा चि लेखा घडला तूह्मा. अधिकारें हाणतासी,
वियोगें हाणतासी, कर्मजें हाणतासी, कासया आह्मां ? ॥ छ ॥
तूं मज्ञ गुरु, देउ, श्रीदत्ता ! कासया करूं मीं आपुली चिंता ?
दिगंबरा ! वारि बा ! हे वेथा ! नाहीं तुतें गुरु, माता, पीता. ॥२॥

(११६२)

तूं माझा आत्मा, तरि हे आशा ? दोघां लाजिरवाणें हें जगदीशा !
कामक्रोधाचा देहीं नित्य वळसा;अशक्त ज्ञालों मीं; काये तूं हीं तैसा?।१।धृ।
आतां हें कव्हणा सांगोंनि कायी ? हृदयींचें दोघां असो हृदयीं. ॥छ॥
तुझा मीं अंशु, तरि तूं माझा अंशी; मध्यें अंतर तें कां ठेंवितासि ?
माझेनि दासत्वें तूं येकदेशी. दिगंबरा ! दोषु लागे दोघांसीं. ॥ २ ॥

(११६३)

तुझे देवा ! आह्मीं दास ? कीं पुत्र ?
अंश ? कीं काहीं न हो सत्यस्वतंत्र ?
कैसी मर्यादा धरूं ? बोल उत्तर.
ईतरु काये ज्ञाणे घरिचें क्षुद्र ? ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयना ! कां बोलसी ना ?
वर्मी लागला शब्दु माझा साहे ना ? ॥ छ ॥
दिगंबरु बोलेः:—वदतासि उणें; हृदय तुझें मीं सकळ ज्ञाणें.
उभेषांसि तुटि पडली वचनें. येथें तुवां चि येकें कां म्यां चि असणें.॥२ ॥

(११६४)

तुज्ञ देखतां मीं माझा ठायीं मज्ञ पाहातां तूं अससी काई ?
नामारूपाचा तुतें ठाउ चि नाहीं.
माणुसपण वेर्तें आमुचा देहीं. ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! मज़सीं वादा न यावें वर्म ज़ाणोनि मौनें उगे रहावें. ॥ छ ॥
ज्ञाणतां तूतें तूं देउ ना भक्तु; मातें लक्षूंनि ज्ञाहालासि समर्थु
उपकारू येसणा हा नेणसी कां तूं ?
वादीं दिगंबरा ! नव्हसी स्वशक्तु. ॥ २ ॥

(११६५)

बोलतां बोलतां बोलु सेवटा गेला. श्रीदत्तु बोलेः:—अरे ! भला भला,

लोकीं कुधर्म तुवां सर्व सांडीला.
देवत्व आहे येक, घेसी तयाला. ॥ १ ॥ धृ ॥
तुझ माझें तूटलें, जाण. बोलोंनि काये आतां वृथा वचन ? ॥ छ ॥
दिगंबरू बोलेः:—तूं तो कवणु ? देहो ? की मन ? जीउ ? कीं प्राणू ?
बहूं प्रलपन सांडी अवगूणू. अकिंचनाहूंनि तूं अकिंचनू. ॥ २ ॥

(११६६)

रूसला देउ. हा वो ! प्राणविसावां,
जीवाच्या जीउ तुह्मी कोण्ही बुझावा.
आत्मत्वें गुप्तु दृष्टी न पडे ठावा.
पाहीन नयनीं मीं या देवदेवा. ॥ १ ॥ धृ ॥
कमळनयना ! तुझी आण रूप भज़ैन; मातें न लगे ज्ञान
बुद्धी ही परुता ठेला, रूसला माये ! मना नेणवे; माझी दृष्टी न साहे.
आकृति आणूं कैसी ? व्योमीं न स्माये.
दिगंबराचे दावा येकु वेळ पाये. ॥ २ ॥

(११६७)

द्रष्टत्व आड, तेथें दृष्टि न पवे.
जीवत्व धार म्यां वो ! घातली जीवें.
प्राणाचें मज़ नाहीं ज़ाणा बरवें.
सावळें रूप मातें भेटी आणावें. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तुमचे सीवैन पाये.
निर्गुण तुझें रूप दृष्टी न पाहें. ॥ छ ॥
ज़ाणतां ज्ञान तें तें बाहेरि पडे. धरिज़े तें तें नव्हे; हा न संपडे.
पाहों मीं वाट आतां कवणीकडे ? दिगंबराचें सैये ! लागलें वेडें. ॥२॥

(११६८)

संसारसुख सकळ गोरिये ! मज़ परतलें सुविष.
कमळनयनें विण क्षणुभरी परि न धरवे मनस.
मातु अवधारिं वो ! बाइये ! झणें करिसी उदास.
भेटि कवणेपरि होइल ? बहू लागले दिवस !
प्रतिक्षणीं मज़ अनुस्मरण तें; गुणीं गुंपले गुण;

आठवे स्वरूप सावळें; नित्य लागलें ध्यान; ॥ १ ॥ धृ ॥
सर्वथा मज़ सुख ने दिती अर्थ विण तेणें आन;
भारु ज़ाले मज़ गोरिये ! माझे पांच हीं प्राण. ॥ छ ॥
गुणश्रवण परि मज़ बाइये ! जिवीं सुखकर नोहे.
वियोगदुःख संस्मारक बळें तें चि तें होये.
नावडे मज़ संगु परि कां चित्त स्थीर न राहे ?
दिगंबरु येथें आणिसी सांग कवणें उपायें ? ॥ २ ॥

(११६९)

बोले सखी::–अवो ! सखिये ! वेगु सावरीं माये !
परब्रह्म निराभास; तें गुणीं ज़ाणतां नये.
मनसें मनसाप्रति ज़ाणतां भेटि तेथें चि आहे.
त्रीवीधभेदविवर्जित त्याचा वियोगु काये ? ॥ १ ॥ धृ ॥
दृश्य ज़ाणों करी द्रष्टया तेथें ज़ाणता तो द्रष्टा.
दर्शनाचा संगु काइसा ? भ्रमु सांडिपां खोटा.
त्रीपुटी वेगळें लक्षितां लक्ष्य लाउंनि वाटा,
वीयोगु तो मग काइसा ? असद्वृत्तिचा फांटा. ॥ छ ॥
दृश्य शरीर तें वेगळें; ज्ञेय भान सकळ,
जाण तें. जाणतां अंतरीं ज़े ज़ाणिवे मूळ.
गुणकृत सर्व ळटिकें, निराकार, निश्चळ
ज़ाण. दिगंबर संचलें निजरूप केवळ. ॥ २ ॥

११७०

येरि ह्मणे ::— अवो ! बाइये ! माझें मनस न परते.
अवधूतरूप सावळें; चित्त गुंतलें तेथें.
आठवे हृदयीं तेव्हेळीं प्रेम येतसे भरितें.
अद्वय सुख मज़ नावडे; ह्मणें अनुवद येथें. ॥ १ ॥ धृ ॥
तत्व योगामृत कारण चरण पाहीन नयनीं.
श्रीमुख साजिरें आठवे कैसीं कुंडलें श्रवणीं ?
किरीटतेज अलौकिक कैसें कोंदलें गगनीं ?
शशिसूर्यभाष मोडली दीप्ति विस्फुरे दशनीं. ॥ छ ॥

पीतांबरधर रूपडें मनीं रूपलें माये !
चंदनाची ऊटि साजिरी मज़ आठवताहे.
ल्ल्लाटभरि गंध पीवळें तें वो ! उपमें न ये.
दिगंबर ऐसें नयनीं कें पाहींन सैये ! ॥ २ ॥

(११७१)

येरि ह्मणे ::— चित्र माइक अनुरंजवी जना;
नादामृतरसें नीववी; ज़ेवि स्वप्नि ची वीणा.
जागृती तो भासु लटिका, ऐसें आणिपां मना.
सावधान होयीं गोरिये ! मृषा प्रपंचु शिवणा. ॥ १ ॥ धृ ॥
सत्य तें योगविद ज़ाणती; सत्य आवडे देवां;
सत्यें चि द्वैत आछादलें; वृथा मोहिसी मावा;
सत्य दृष्टी नव्हे वीषयो; गुणभान हें सर्वां.
सत्य मानूंनि हें वचन बोध उपज़वी जीवा. ॥ छ ॥
मनबुद्धीसि अगोचर ऐसें सत्य तूं पाहीं.
प्रतीति पावोंनि मनसें मग ठाइ कीं राहीं.
विषयवासना काइसी यये नित्य अद्वयीं ?
दिगंबरीं खुण बोधपां ! भ्रांतु न होसि कहीं. ॥ २ ॥

(११७२)

येरि ह्मणे ::— ज्ञानसागरीं माझें चित्त हें लहरी.
वीरोंनि ज़ातसे, बाइये ! परस्पंदु न करी.
अवधूतगुणीं गुंपलें मन परति न धरी.
तुझें प्रलपन गोरिये ! माझा श्रमु न हरी. ॥ १ ॥ धृ ॥
कथी देखयीन सावळें रूप डोळस डोळां ?
मन माझें भ्रमताहे. वो तेणें आश्रयो केला.
अवधूत गुणसागरु परब्रह्म पूतळा.
येरु प्रलापु तो काइसा ? मज़ न लवीं चाळां. ॥ छ ॥
योगिराजीं मन रंगलें; परि पंकलें माये !
पूर्वदशेप्रति आणितां आतां सहसा न ये !
कवि परगुणु घेइल ? ऐसें ज़ाणवताहे.

दिगंबरें त्रीण सखिये ! मज़ शब्दु न साहे. ॥ २ ॥

(११७३)

येरि ह्मणे ::—तुह्मा विषयो तेवि विषयस्थानीं
अवस्थे पासूनि ज़ाहाला; ते स्फुरताहे गुणी.
निष्ठेसि स्थान तें नव्हे वो ! बोलु साचारु मानी.
स्वरूप ज़ाणतां आपुलें तें न मळे गुणी. ॥ १ ॥ धृ ॥
भ्रमभूत मन ज़ाहालें ! तुज़ लागलें पीसें !
आत्मविश्रांति न पवसी येणें सगुणरसें.
रामु आत्मा नव्हे विषयो ज़या ज़ाणतें नसे;
त्रीपुटीच्या करीं विलयो; पाहे सह प्रकाशें. ॥ छ ॥
ज़ाणिज़े तें रूप अपर; ज्ञान तें तयापर.
ज़ाण तें आश्रयो सखिये ! परब्रह्म चि सार.
ज़ाणतां सकळ मायिक भान तें विनश्वर.
दिगंबरपद निर्गुण, शिव, शुद्ध, अक्षर. ॥ २ ॥

(११७४)

येरि ह्मणे ::— गुणावार्जिती लक्ष ठेउंनि काई ?
पाहिज़े तें सुख बाइये तेथें काहीं चि नाहीं.
योगिजनप्रिय रूपडें कवळीन मीं बाहीं.
सावळें ब्रह्म निरंतर मज़ भरलें देहीं. ॥ १ ॥ धृ ॥
माझें चि परि माझें नव्हे मन वेचलें माये !
आपण आप वीसरलें त्याचे पाहातां पाये.
उमजु न धरी; परतलें गुणी; आयासि न ये.
सगुणाचें सुख गोरिये ! मज़ सांगतां न ये ! ॥ छ ॥
ब्रह्म सुखाहूंनि आगळें मनीं लागलें पुरे.
वीसराची गोष्टि काइसी ! चित्त तेथें चि मरे.
नेणसी अनुभउ तवं, तुतें न मने खरें.
विश्रांती पावले सुरवर येणें श्रीदिगंबरें. ॥ २ ॥

(११७५)

येरि ह्मणे ::— महाजन वो ! तुतें हांसती बोला.

विषयीं सांडूनि विषयों तुवां आंगळा केला.
अवस्थेचें भानगोचर स्वप्न घेऊनि गळा
भ्रमभूतपणें बोलसी. कांहीं नेणसी कळा. ॥ १ ॥ धृ ॥
पांच भूतें तुज्ञ लागलीं ! अहंकार माये हो !
म्हणें पंचात्मक सेविसी; महाखेचरु डोहो.
स्ववृत्ति झाडणी करितां कोण शकेल राहों ?
परब्रह्म आणि सावळें, तरि ते काये देहो ? ॥ छ ॥
सांडूनि आपुलें स्मरण वृथा बोलसी ज्ञान.
स्वप्न कीं भ्रमु हा ? बाइये ! भूत लागलें आन.
ज्ञाणोंनि आपणां आपण प्रलपति सज्ञान.
दिगंबरसुख बोलसी तयाहूनि तें आन. ॥ २ ॥

(११७६)

येरि ह्मणे::—मज लौकिकें माये ! नाहीं वो ! काज.
मज्ञ मी ज्ञाण; तें ज्ञाणणें तिये ज्ञाणिवे बीजं.
अवधूतरूप गोरिये ! जीवीं बैसलें मज्ञ.
हृदयींचें सुख नेणसी; भ्रमु ज्ञाहाला तूजं. ॥ १ ॥ धृ ॥
सत्य तें चि मज्ञ कळलें मी अंशु, तो अंशी;
कारणीं कार्य अनुचरे. ते चि गति तयासी.
पूर्व मज्ञ अनुस्मरलें विसंबैन मी कैसी ?
वृथा तुझें ज्ञाणपण वो ! मज्ञ न ये मनासी. ॥ छ ॥
कमळनयनाचें स्थळ स्थू वाजेंत माये !
ज्ञेथ गणसंगु सखिये ! अपरमितु आहे.
ब्रह्मनिष्ठें जन सेवक नित्य वंदिती पाये.
दिगंबरा तया नेणसी. तुतें सांगणें काये ? ॥ २ ॥

(११७७)

ब्रह्म निराकार निर्मळ नित्य पाहिजे डोळां;
ब्रह्मसुख विक्षेपक ऐसा सत्य सोहोळा.
भोगितां द्वैत भासे. परि चिदखंड ते कळा.
पाहीन रूप तें नयनीं; ज्ञायीन त्या स्थळा. ॥ १ ॥ धृ ॥

काये सांगों गुज ? गोरिये ! तु वो ! नेणसी माये !
सर्वज्ञ नेणती पारू वो ! ऐसें नवल आहे.
ब्रह्मनिष्ठाहूंनि आगळा तो चि तें पद लाहे.
अनुभवी खुण ज्ञाणती; बहु बोलणे काये ? ।। छ ।।
येर मायामय, सगुण तैसें न ह्मण माये !
ब्रह्मप्रकाशक रूपडें गुणकरण सैये !
चिन्मात्र तें चि मूळ सावळें तया आगळें आहे.
दिगंबरीं विरुद्धांसि हीं नित्य येकत्व होये ! ।। २ ।।

(११७८)

परब्रह्मानंदु सावळा मज दाखवा डोळां !
योगीजनवरवल्लभू जीवन जीवाला !
जीउ प्राणु बलि देयिन संसारू सगळा !
दत्तेंवीण मज न गमे. झोंबैन मीं गळां ! ।। १ ।। धृ ।।
जय जय जय वरदा ! चिदव्यया ! रामा !
तुं चि परंब्रह्म केवळ ! दुजें न लगे आह्मां.
योगियांचें योगधन; तूं निरोपम निःकामा !
अवधूता मनो बुद्धि हे माझी गुंपली तुह्मां ।।छ।।
भक्तजन सुरपादपा ! जया ! आनंद कंदा !
योगधन तूं बा ! अव्यय, अरे ! अत्रिवरदा !
अंतादिमध्य विवर्जिता ! जया ! संपुर्णपदा !
दिगंबरा ! जनशंकरा ! अगोचर तुं वेदां ! ।। २ ।।

(११७९)

पादांबुजरसरतु मीं नित्य भ्रमरू भवें,
रुंजि करी. गुणी गुंपलें येणें आत्मस्वभावें.
सांपडला पुरे संपुटीं; मग वेगळा नव्हे.
तेथें चि भेदु हारविन; उ[illegible] नेठवी जीवें. ।। १ ।। धृ ।।
जय जयं सुखसागरा ! जया ! अपारपारा !
चरणानुचरु भ्रमरु गुणीं नाश्रयी परा.
गुणु गुणु गुणु करितां, अगा ! पुरुषेश्वरा !

वृत्ति विसरलें ! षट्पदु तरि जीत चि मारा ! ॥ छ ॥
आसक्त ज्ञाहालें मन हें, तुझें लागलें ध्यान.
पादपद्मीं विसावले माझे करणगण.
तेथूंनि पराति धरितां करी भेदहरण.
दिगंबरा ! परमात्मया ! तुझें रंक मीं दीन. ॥ २ ॥

(११८०)

देह देवालय; देउ आत्मा अवधुतु;
प्रकटु ज्ञाहाला भाउ अर्पीन समस्तु. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन वो ! पाहिन वो ! देवीं देवपणें स्थिती राहिन वो ! मी ॥छ॥
बाहीजु भीतरु देवें भरला गे ! माये !
दिगंबरु अवघे न अवघा चि होये. ॥ २ ॥

(११८१)

पाहातां चरण मन विपरीत ज्ञालें !
सत्वरजस्तमोमय भान वीतुळलें ! ॥ १ ॥ धृ ॥
शंकलियें, शंकलियें; पाहातां अवधूतरूप शंकलियें मी ! ॥ छ ॥
दिगंबरीं मन बुद्धि दीपलें देखणें.
मीपण सखिये ! माझें नुरे तेणें गुणें. ॥ २ ॥

(११८२)

अज निराकृत मुक्त पद निरंजन;
सावळें रूप माये ! कमळ नयन. ॥ १ ॥ धृ ॥
गुणहीनु वो ! गुणहीनु वो ! पाहातां सगूण गुणहीनु वो ! ॥ छ ॥
दिगंबर सार सर्वगत निरंतर
सेविती सज्जन सुखविश्राम मंदीर. ॥ २ ॥

(११८३)

पृथ्वी आपस्तेजो वायुः साछिद्र गगन
अभावीं बुडालें; तेथें नुरे त्रिभुवन. ॥ १ ॥ धृ ॥
निदान वो ! निदान वो ! प्रबोधु ह्मणिजे गुणनिदान वो ! ॥ छ ॥
शून्य ना साभास ऐसें अमळ चैतन्य;
दिगंबर परब्रह्म गुणत्रयहीन. ॥ २ ॥

(११८४)

विराट हीरण्यगर्भ माथा महांमाया
उत्पत्तिप्रलयोस्थितिसाक्षित्वअव्यया ! ॥ १ ॥ धृ ॥
पूर्णपणें रे ! पूर्णपणें रे ! न दीसे कांहीं चि परिपूर्णपणें रे ! ॥ छ ॥
दिगंबर ब्रह्मा, विष्णु, रुद्र, सर्वेश्वरु.
आत्मत्वें मायेच्या ज्ञाला सकळे संहारु ! ॥ २ ॥

(११८५)

सूक्ष्म ना कारण स्थूल शरीर आत्मयां !
चतुर्थ शरीर भान न वर्त्ते अव्यया ! ॥ १ ॥ धृ ॥
स्वस्वरूप रे ! स्वस्वरूप रे ! निराल निरंजन निर्विकल्प रे ! ॥ छ ॥
जागृती ना स्वप्न, सुषुप्ति ना तुरीया;
दिगंबरु आत्मा तेथें अविद्या ना माया ! ॥ २ ॥

(११८६)

श्रवण करितां मन गुणी चि गुंतलें;
ज्ञानाज्ञेय ज्ञान तेथें हारपोंनि गेलें ! ॥ १ ॥ धृ ॥
संनिधान वो ! संनिधान वो ! दत्ताचें येथूनि पुरे संनिधान वो ! ॥ छ ॥
दिगंबरीं भेटि भेद त्रिविध हरण;
अखंड अमळ पद स्फुरे सनातन. ॥ २ ॥

(११८७)

वाटुली पाहतां गति कुंठली गे ! माये !
कइ देखयीन ? माझी स्फुरतीसे वाहे. ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञाइन वो ! मीं ज्ञाइन वो ! अवधूतसंगें पद पावैन वो ! ॥ छ ॥
जीवाचें जीवन माझें जीतें वोवाळीन.
दिगंबरु आला, पाये कबरीं झाडीन. ॥ २ ॥

(११८८)

हृदय दुभागे; मातें वियोगु न साहे.
कयी कयी अवधूता ! तुझे देखयीन पाये ? ॥ १ ॥ धृ ॥
राहिन वो ! चरणाजवळी; प्राणु, शरीर, जीउ देयीन बळी ! ॥ छ ॥
बहुत क्रमले काळ तुज्ञविण देवा !

दिगंबरा ! अंतकाळीं तूं मज विसांवा ! ॥ २ ॥

(११८९)

क्षितितळगतु जळमय मळ नाशी.
तीर्थ तें कैसेंनि माझी अविद्या नाशी ? ॥ १ ॥ ध्रु ॥
सद्गुरू वो ! सद्गुरू वो ! सेवीन मीं तीर्थ ज्ञानसागरू वो ! ॥ छ ॥
दिगंबरेंवीण कांहीं पवित्र न दिसे;
तयातें लाहेंन नीवयीन ब्रह्मरसें. ॥ २ ॥

(११९०)

हातिचें सुटोनि होतें बहुत काळ गेलें.
आजि सुदीनु; माझें मज सांपडलें. ॥ १ ॥ ध्रु ॥
निधान वो ! निधान वो ! अवधूतु माये गुणनिधान वो ! ॥ छ ॥
प्रयत्नें हृदयीं आतां करीन ज़तन
सर्वसुखसार दिगंबराचे चरण. ॥ २ ॥

(११९१)

आठउ करितां, तृप्ति न पवसी मना !
धरूनि चरण तेथें नुरवीं आपणा. ॥ १ ॥ ध्रु ॥
योगधन वो ! योगधन वो ! श्रीदत्तु सखिये ! माझें योगधन वो ! ॥ छ ॥
पाहातां नयनीं मज अंतर न साहे;
पाहाणें सांडूंनि भेटि घेईं लवलाहें. ॥ २ ॥
दिगंबरें वीण मज़ असिलें न ज़ाये .
सांडूंनि विभेदु आतां तो चि होइन माये ! ॥ ३ ॥

(११९२)

लक्षितां लक्षणें लक्ष पडलें वो ! दूरी.
प्रवृत्ति सांडीन माये ! येथूंनि बाहेरी. ॥ १ ॥ ध्रु ॥
आत्मारामु वो ! आत्मारामु वो ! श्रीदत्तु सखिये ! परमात्मारामु वो ! ॥ छ ॥
पाहातां पाहाणें आड पाहाणया ज़ालें;
दिगंबरीं भेटि होतां करीन वेगळें. ॥ २ ॥

(११९३)

देहेंसीं भेटणें. ज़ळो देह ! आड ठाके !

अवधूतरूप मज नव्हे वो ! पारिकें. ॥ १ ॥ धृ ॥
निधान वो ! निधान वो ! कमळनयनरूप निधान वो !
दिगंबररू जीवें जीउ प्रीती आळंगीन;सोडूंनि मीपण याचें स्वरूप करीन.२

(११९४)

आठउ करितां मध्यें वीसरू आहे;
आठव विसर आड मज तें न साहे. ॥ १ ॥ धृ ॥
चिद्घन वो ! माये ! चिद्घन वो ! कमळनयनरूप चिद्घन वो ! ॥छ॥
भेदातें मोडूनि आला भेटी दिगंबरु;
सांडीन मपिण माये ! आठउ विसरु. ॥२ ॥

(११९५)

ज़ाणिवेची खूण मातें ज़ाणवली माये !
आत्मा अवधूतु माझा; मीं चि मातें पाहें. ॥ १ ॥ धृ ॥
निदान वो ! निदान वो ! साहीन सकळगुणानिदान वो ! ॥ छ ॥
कर्म तें बाहेरि ठेलें; ज़ाणणें नेणणें.
दिगंबरी भेटि चाड नाहीं वो ! मीपणें. ॥ २ ॥

(११९६)

मनस चंचळ धर्मु न सैंवरी माये !
हातिचें ज़ाईल दत्तुधन. करूं काये ? ॥ १ ॥ धृ ॥
साहीन वो ! माये ! साहीन वो ! जीवाचें मरण आंगीं साहीन वो ! ॥छ॥
दिगंबरीं मनस हें केलें समर्पण,
आतां मीं न धरीं; मुक्त दिधलें सोडून. ॥ २ ॥

(११९७)

श्रीदत्तें मानस माझें हारिलें गे ! माये !
वालितां स्ववृत्तीं, माझें मज़प्रति नये. ॥ १ ॥ धृ ॥
अवगुणु वो ! हा गुणहीनु वो ! कमळनयनु माये ! गुणहीनु वो ! ॥ छ॥
विसरू न ये वो ! नित्य कैसें करूं काये ?
दिगंबररूप मज़ आठवत आहे. ॥ २ ॥

(११९८)

वियोगें साहिले योग तपस अपार. भेटला श्रीदत्तु; न सोडी निरंतर.

ज़ाईन वो ! मीं ज़ाईन वो ! कमळानयनासवें ज़ायिन वो ! ॥ छ ॥
दिगंबरी भेटि ज़ाली; न करी साधन;
साध्य चि ज़ाहाली परब्रह्म सनातन. ॥ २ ॥

(११९९)

पूर्वापरकृत कार्य कर्म विसरली;
श्रीदत्तदर्शनें माये ! कृतकृत्य ज़ाली. ॥ १ ॥ धृ ॥
निदैन वो ! मीं निदैन वो ! नीजी नीजानंदपदीं निदैन वो ! ॥ छ ॥
दिगंबरीं भेटि मज़ योगु ना अयोगु.
करिजेतें नाहीं शब्दु राहिला प्रसंगु. ॥ २ ॥

(१२००)

क्षीतीतळगत जळ न भजें उपायें;
चातकु सोषला परि आळवीतु आहे. ॥ १ ॥ धृ ॥
देवराया ! कइ घनु बोळसी ? दर्शनअमृतरसीं द्रवसी ? रेया ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तूज़वीण न करीं स्मरण;
निदान ज़ाहालें; आतां, देईं दर्शन. ॥ २ ॥

(१२०१)

कर्मटा पूसें, तव ते सदा अज्ञान दाविती सेण, माती, समिधा, तृण,
पृथ्वी, आपु, तेज स्वर्गभुवन; आतां कैसेनिं होये श्रीदत्तज्ञान ? ॥१॥धृ॥
कईं भेटसी ? श्रीकृष्णश्यामा ! मनंस न राहे हें आत्मया ! रामा ! ॥छ॥
भक्तांसि पूसें, तव ते करिती कोल्हाळू; नृत्य ना गीतु, देऊ स्वरु, नी ताळू,
प्रेमरूदन ऐसा तो येक खेळू. कोठें मीं पाहों दिगंबरु निर्मळु ? ॥ २ ॥

(१२०२)

जपियां पुसें, तव स्फुटकार याती, न्यास, मुद्रा अंगचार करीती;
गोमुखें पटपट मंत्र जपती; ते काये माझी माये ! फेडिती भ्रांती ? ॥ १ ॥धृ॥
ये रे ! दत्ता कमळनयना ! नावडे मज़ गुणकृत कल्पना. ॥ छ ॥
योगियांप्रति पुसों गेलियां मानूं तेही मौन चि घेलें. न कळे पंथु !
जयांतें मूळीं बंध तो चि परमार्थु.
तयां कैसा वो ! कळे माझा श्रीदत्तु ? ॥ २ ॥
देवा ! तुझें मी करीन ध्यान. कयीं पाहीन रूप श्याम सगुण ? ॥छ॥

संन्यासियांप्रति सेंडी चि नाहीं. येर ते जैसे तैसे. बोलोंनि कायी ?
शब्दें परमतत्व कें पडे ठायीं ! दिगंबरा ! म्यां आतां करणें कायी ? ॥३॥

(१२०३)

जीवात्मा जीउ माझा प्राणविसावा शास्त्रज्ञां पुसें माझा श्रीदत्तु दावा !
पुस्तकभारु तो म्यां कैसा वाहावा !
वादें विश्रांति नाहीं; श्रमु अघवा. ॥ १ ॥ धृ ॥
शब्दें श्रीदत्ता जाणें कैसी ? ऐसा कें शब्दु निजतत्वप्रकाशी ? ॥ छ ॥
पुराणीं कीं वर्म दाविलें खूणा; आइका ह्मणती जीर्ण कथा पुराणा !
तेणें विश्रांति न पवे मना. दीगंबराची सोये कव्हणी बोलेना ! ॥ २ ॥

(१२०४)

श्रमू चि जाला; माये ! त्रासलें मन; श्रीदत्तु आत्मा याची न कळे खूण
आतां मी देह हें वो ! दृश्य सोडीन;
जेथिचें देखणें, मीं तेथें आटीन. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मा रे ! तूं श्रीयोगिराया ! कयी देसील भेटी ? दत्तात्रेया ! ॥ छ ॥
द्रष्टत्वा मूळीं मीं वो ! लाधली खूण; विविक्तज्ञानें जालें देवदर्शन.
बुझावणीं फाटीं दिधलें मीपण दिगंबर मग कळलें सगूण. ॥ २ ॥

(१२०५)

श्रीदत्तेंवीण मज नावडे आन; मन वेधलें माये ! करीन ध्यान.
ध्येय सावळें रूप ध्यातां सगूण, ध्यानीं विरोनि गेलें मींतुंपण. ॥१॥धृ॥
कैसें मी करूं ! वो ! सैये ! द्वैत न साहे. अंगें कवणें पाहों ययाचे पाये ?॥छ॥
दृश्य देखणें गळे; चळे प्रेम; भेदा उरी चि नाहीं. कें रूप नाम ?
गुणाची वृत्ति आंगीं; नसाहे कर्म. ऐसें दिगंबर निर्गुण ब्रह्म. ॥ २ ॥

(१२०६)

स्मरणानंदु माये ! प्रेमरसधारा लोटली; जाईन मीं ज्ञान सागरा.
जातिसे विकळ मीं; कव्हणी धरा. बहू अंतर जालें वेगु न करा. ॥१॥धृ॥
आतां येथूनि मज परति नाहीं; जायीन पूर्वकृतें ठाईची ठायीं. ॥छ॥
येणें गेलें जे न दे तयां सकळां. पुडती परती नाही. वेचली कळा.
दिगंबरू वो ! कोठें मज भेटला ? संसारूभोगु माझा वायां गेला ! ॥२॥

(१२०७)

जळो चंचळ मन माझें माये ! कैसी मी धरू योगिराजाचे पाये ?

वयाच्या वेगु तरि हा प्रवाहो वाहे;वायां ज़ातसे जन्मु.करणें काये? ।।१।।धृ।।
श्रीगुरु येकुदां मज़ भेटवा वो ! माये ! जीउ देयीन भेटी ! धरीन पाये! ।।छ।।
लक्ष कोटी वो लाभु; मी करूं काये ? श्रीदत्तेवीण सर्व दुःख चि आहे.
वियोगवेदना आंगीं न साहे. दिगंबरेंवीण असिलें न ज़ाये ! ।। २ ।।

(१२०८)

नामें वांचूनि कांहीं श्रवणीं न साहे; दत्तेंवांचूनि स्वरूप नयनीं न पाहें.
मनस माझें ध्यानीं लागत आहे. नेघे पराति चित्त येरें उपायें. ।।१।।धृ।।
परम निदान मज़वरि पडों माये! साहीन तैसें ही दुःख ज़ें ज़ें होये. ।।छ।।
तत्व न चिंती आन वीण श्रीदत्तें; शरणगतु मी नव्हे आना येकातें.
बोलणें सत्य सत्य माझें यथार्थें. दिगंबरेंवीण नेणें परातें. ।। २ ।।

(१२०९)

देवा ! अनंतब्रह्मांडगोलकोटी तव संकल्पें, ज़ाहाली सकळ सृष्टी.
ब्रह्मादीक हे जन्मले तुझा पोटीं ; तया तुज़प्रति काये आणू भेटी ? ।। १ ।।धृ।।
क्षीरसागरु कासेन तृप्ति कीज़े ? वाहीं गगन कैसेनि कवलीज़े ?
मशकें मेरू हा कैसा जी ! आराधीज़े? योगिराया ! तुतें काये समर्पिज़े?।।छ।।
चंद्र सूर्य उज़लती ज़ेणें तेजें, तयाप्रति दीपु कवणु समर्पीज़े !
आतां भजन अवघें चि असो मातें. दिगंबरा ! तुझा चरणी नूरिज़े. ।।२।।

(१२१०)

दृष्टि पाहों, तरि तूं न होसि गोचरु; ध्यान करीं, तंवं बुद्धीहूंनि परु;
पूजा करूंनि पाहें,तंवं तूं निराकारु;कैसा व्योमासि समपूं उपचारु?।। १ ।।धृ।।
देवा ! कैसें भजन तुझें कीज़े ? क्रिया, योगु मातें कांहीं चि नूमज़े.
सर्व असो ! आतां तें येक कीज़े, तूज़माजि आह्मीं मीपण नरिज़े. ।।छ।।
देवा ! आत्मयांसि कैसें शरण ज़ावें ? सर्वव्यापी केवि शिरसें वंदावें ?
दिगंबरा ! आतां असो हे असो हें अवघें !
तूंचि होउंनि आतां उगलें असावें. ।। २ ।।

(१२११)

तूटि पडली सखिये काये करूं ? घडला अपराधु मज़ सैये ! थोरू !
म्यां वो ! केला या देवासि नमस्कारू;
देउ आत्मा ऐसा नेणोंनि विचारू ।। १ ।। धृ ।।

अवधूता ! दत्ता ! रे ! क्षमा करीं ! नमस्कारें मज्ञ अंतर न धरीं.
अवघा तूं चि तूं केला हीं नमस्कारीं;
मन न राहे. सावरूं कवणें परी ? ॥ छ ॥
अवो ! भज्य कैसें वो ! भज्ञावें ! क्रियेप्राति हेतु काहीं न संभवे !
मन न राहे; विषयो धरिला जीवें; ऐसे अपराध साहातां बरवें ? ॥ २ ॥
यातें नेणोनि भजन कैसें करूं ? यातें ज्ञाणतां भेदासि होये मारू.
दिगंबराचे चरण कैसें धरूं ? बाह्य दृष्टीसि पडला अंधकारू. ॥ ३ ॥

(१२१२)

आशा लाउंनि, निराशा येणें केली; भेटी आलें तवं, भेदु विसरली.
मीं मीपणापासूंनि अंतरली. रूप ज्ञाणें केवि ? मति पांगूळली. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें कैसें नवल याचें ? माये ! रूप दाउंनि भेदाची वृत्ति खाये ?
तेथें सर्वस्वें मज्ञ चि हानि होये. सेखी देखिलें, तें बोलतां हीं नये. ॥ छ ॥
वृत्ति नूपडे; आसक्त ज्ञालें मन; आतां नीवाडु न पवें मीं येथूंन.
दिगंबराचें पुरे वो ! संनिधान ! जीवनाशें हीं सूटिका नाहीं, ज्ञाण. ॥ २ ॥

(१२१३)

रूप दीसे; परि मायावी ज्ञाण माये ! लक्ष ठेवितां काहीं चि आया नये.
द्वैत ग्रासूंनि स्वयें चि सर्व होये ! संसारीक सकळ वायां ज्ञाये. ॥ १ ॥ धृ ॥
भेटि ज्ञालियां नीवाडु पुडती नाहीं; भेदें नुरतां कवणाचें मग कायी ?
संवंसारीक हारपे अवघें हीं. ऐसें अगूण न पाहावें डोळां दोहीं. ॥ छ ॥
यया भेटणें तें पूडती न येणें; याचें भजन वो ! काहीं न करणें.
काहीं नाहींसें होउंनि माये असणें; दिगंबररूप भज्ञावें कवणें ? ॥ २ ॥

(१२१४)

आशा करूंनि आलियें तूज्ञपासीं; सेखीं माझें चि तूं सर्व हारितासी;
पाहों ह्मणतां हीं रूप लपविसी;
ऐसी मात्र आतां न करीं आह्मांसीं. ॥ १ ॥ धृ ॥
देयीं देवा ! माझें चि मातें मन; सर्व हरूंनि गोविसी काज्ञेवीण.
पुरें, पुरें ज्ञाहालें तुझें ज्ञान; भेदु मरे ऐसें न करूं साधन. ॥ छ ॥
पाहों ह्मणतां पाहाणें चि हरितासी; तुझें गाऱ्हाणें सांगावें कवण। पासीं ?
बोलु बोलता तुटी चि वरि येसी; मौन धरीतां काहीं चि न फळसी. ॥ २ ॥

पाये धरूं, मां द्रवेल तुझें मन. काहीं राखसी आमुचें भिन्नपण.
देवा ! काये केलें तें जीवपण ? सर्व बैसलासि उदरीं घालूंन. ॥ ३ ॥
देवा ! कैंची आलियें तुजपासीं ? सिद्ध मूकलियें माणूसपणासी.
दिगंबरा ! प्रेम कैसें त्रिसंचीर्सा ?
नको ! नको ! मीं होईन तुझी दासी. ॥ ४ ॥

(१२१५)

धन्य काळु ! तुजसीं भेटि जाली ! बहू दुरूंनि तुजप्रति आली !
जीवें आशा अपार होती केली;
बोलसी ना ! कां तुवां दुरावीली ? ॥ १ ॥ धृ ॥
माझें हृदय दुःखें फूटताहे ! सांगों कवणा ? बापु तूं माझी माये !
बुझाउं तूज कवणें उपायें ? अपराधी धरीन दोन्ही पाये ! ॥ छ ॥
अमु सांगणें तें तैसें चि ठेलें. भेटी दुःख आगळें दुणावलें.
मायेबापा ! तुझेनि येकें बोलेंवीण माझें अंतर करपलें ! ॥ २ ॥
पाहावयां अधिकारू मातें नाहीं. बोलावयां आतां मीं करूं कायी ?
कैसा राखों प्राण मी ययें देहीं ? दिगंबरा ! वीनउं नेणें काहीं. ॥ ३ ॥

(१२१६)

बहु दिवस जाहाले; भेटी नाहीं! पाहावया आवडी जाली देहीं;
तें चि ध्यान लागलें डोळां दोहीं ! पासीं
आलयां उदास करिसी कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
पुढें यावया अधिकारू नाहीं; परतोंनि जावें कवणे ठायीं ?
तुजवीण आश्रयो नेणों काहीं. मध्यें ऐसें जीणें. मी करूं कायी ? ॥ छ ॥
तापत्रय लागला वन्हि देहीं; तुझा वियोगु प्रज्वळला हृदयीं;
साह्य जालासि तयातें तूं हीं; तरि आतां सर्वथा उरि नाहीं. ॥ २ ॥
आजि पर्वतु हा कोसळला ! प्रळयाग्नी म्यां नयनीं देखिला !
दिगंबरू न बोले काहीं केला ! आतां प्राणु देइन मीं आपुला ! ॥ ३ ॥

(१२१७)

जप तपसु तुजविण नेणें काहीं; माझें मनस हें तुझां चि ठायीं !
मज विश्रांति तुमचा चि ठाईं; पासीं यावया अधिकार नाहीं ! ॥ १ ॥ धृ ॥
कासया ऐसा देहो ठेवणें ? नाम स्मरतां लाजिरवाणें !

माझे अपराध मीं तवं नेणें; क्षमा करिजसु उदारपणें ! ॥ छ ॥
तुझा संगू चि मज परप्राप्ति; मा सेवया परम विश्रांति.
बहु काळ संगति मज होती. दिगंबरा ! प्रकट करु मूर्ती. ॥ २ ॥

(१२१८)

तुज सोडूंनि म्यां केलें अर्थध्यान; नाना विषय भोगिले देवा ! प्राण !
दिवा रात्रौ घडलें विस्मरण; कोण्ही यावया नाहीं आठवण ! ॥१॥ धृ ॥
अपराधांसि गणना न दीसे ! माजलों तेणें विषयरसें !
तुझां वियोगीं सतोषु ध्येला मनसें; आतां तुजप्रति येइजे कैसें ? ॥ ॥छ॥
जन, जन, जन, धन, धन, जाया वणवण केली अवघी वांयां !
क्षणक्षणें क्षीण गति ज़ाली वया ! आतां स्मरों मीं कैसोनि दत्तात्रेया ? ॥२॥
तुज सोडूंनि भाक्षिलें अन्न; केलें अन्यदेवतायजन;
आशा करूंनि सेविले देवा जन; दिगंबरा ! कित्ती करूं आठवण ? ॥३॥

(१२१९)

देवा ! अपराध घडले साचार ! परी अवधारीं माझें उत्तर.
दोषजनित तें कर्म समग्र तूं तवं ज़ाणतासि साक्षी अंतर. ॥ १ ॥ धृ ॥
मातें उपचारु कवणें करावा तुज वांचूंनि ? श्रीदेवदेवा !
मायेबापु तूं प्राणविसावां; बोलु कवणा जी ! आतां ठेवावा ? ॥ छ ॥
दोषत्रय मिनलें ये देहीं; अविद्यास्तव उमजू चि नाहीं.
दोषविकार प्रकटले, साही ! अरिषड्वर्ग ते. सांगों काई ? ॥ २ ॥
तेणें भ्रमित ज़ाहलें माझें मन; बुद्धि, चित्त, सकळ करणगण; तें तूं
मानितासि कैसें क्रियमाण ? यत्नु न करिसी; बोलसी कठीण. ॥ ३ ॥
हास्य करी, तें हांसणें न मनवे; करी रुदन, तें रुदन नव्हे;
व्यर्थ ! व्यर्थ चि धर्म अघवे काये पाहातासि ? न दिसे बरवें ! ॥४॥
पाहे माझें मज स्मरण नाहीं ! बापु तूं, तरि आरत न पाहीं !
वेगवत्वरु मज़पासीं येइं ? दिगंबरा ! दर्शनामृत देयीं ! ॥ ५ ॥

(१२२०)

ऐसी करितां सोसणी श्रमु जाला ! गुणी प्राणु विकळु माझा गेला !
बापु माझा धावोंनु पासीं आला ! अवधूतें गुणदोषु हरीला ! ॥१॥धृ॥
माझें हृदयं शीतळ ज़ालें माये ! रूप सावळें सुंदर भासताहे !

मातें वियोगवेदना ते न साहे ! बाहीं कवळीं अवधूतु माझी माये ! ॥छ॥
देवा ! आतां न सोडी तुझी कास; सर्वे येईन मीं न राहें निमिष !
परमसखे पाहीन निजदास ! दिगंबरा ! म्हणें करिसी उदास. ॥ २ ॥

(१२२१)

ज्ञायीन मी तया भूवना ! रे श्रीदत्ता ! श्रीदत्ता ! श्रीदत्ता !
तुझया निवास स्थाना !
अरे ! अरे ! कमळनयना आत्मयां ! आत्मयां !
अवधूता ! करीं करुणा ! ॥ १ ॥ धृ ॥
पाहीन येकुदां नयनीं ! हें मन हें मन हें मन
विगुंतलें तव चरणीं. ॥ छ ॥
योगविद्वज्जनवल्लभा ! हे देवा ! हे देवा ! हे देवा !
जीवन्मुक्तां परमलाभा !
दिगंबरा ! भूवी दुर्लभ आनंद आनंद आनंद
पद पूर्ण, अलभ्यलाभा ! ॥ २ ॥

(१२२२)

श्रमद सकळ साधन रे ! न करीं ! न करीं ! न करीं !
न करीं मीं येक वांचूंनि !
अवधूता तुझें चिंतन करीन ! करीन ! करीन !
तवनामामृतसेवन ! ॥ १ ॥ धृ ॥
माझें जीविचें आरत पूरवीं ! पूरवीं ! पूरवीं !
सखया ! समस्तविहित ! ॥ छ ॥
पाहिन चरण नयनी श्रीदत्ता ! श्रीदत्ता ! श्रीदत्ता ! धरीन हृदयभूवनीं !
चित्त गुंपलें सगूणी आत्मयां ! आत्मयां ! आत्मयां !
दिगंबरा तुमचा ध्यानीं ! ॥ २ ॥

(१२२३)

सुदीनु ज्ञाहाला, सखिये ! सुंदरे ! सुंदरे सुंदरे ! श्रीदत्तु भेटला गोरिये !
आरत पूरलें बाइये ! श्रीदत्तें श्रीदत्तें श्रीदत्तें;
आतां नसे वगळी माये ! ॥ १ ॥ धृ ॥
प्राणु वारीन साजणी ! सखिये ! सखिये ! सखिये !

योगिराया दत्तावरुनी ! ॥ छ ॥
हृदय आनंदें भरलें, बाइये ! वो बाइये ! वो बाइये !
भिन्नत्व दत्तेंसीं मोडलें !
दिगंबरीं चित्त गुंतलें. पूडती पूडती पूडती
न परतें काहीं केलें ! ॥ २ ॥

(१२२४)

मनस वीकारी; बाइये ! श्रीदत्तीं श्रीदत्तीं श्रीदत्तीं
क्षणु येकु स्थीरु न राहे !
जन्मु वायां गेला वो ! सैये ! मानव्य मानव्य मानव्य
ज्ञाईं जणें. करणें काये ? ॥ १ ॥ धृ ॥
अंतकाळींचा सोयेरा, श्रीदत्तें श्रीदत्तें श्रीदत्तें तेणेंसीं मज भेटि करा ! ॥छ॥
कामें व्याकुळ ज्ञाहाली ! सखिये ! सखिये ! सखिये !
तमसें वीकळ पडली !
दिगंबरें वीण येकली साज़णी ! साज़णी ! साज़णी !
कैसी राहो ? भ्रांति पडली ! ॥ २ ॥

(१२२५)

विषय विषम सरिता दुर्गमी दुर्गमी दुर्गमी
कामवेगें ज्ञातिसे, दत्ता !
केधवा पावसी ? अवधूता ! सखया ! सखया ! सखया ! सखया !
बहु मज्ज होतिसे वेथा ! ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं मीं ? साज्ञणी ! श्रीदत्तु श्रीदत्तु श्रीदत्तु
वेळु ज्ञाला न ये अझुणी ! ॥ छ ॥
कास मागों मी कवणा ? श्रीदत्ता ! श्रीदत्ता ! श्रीदत्ता !
न ये तुतें कैसी करुणा ?
सादु देयीं रे ! स्वजना ! ये देवा ! ये देवा ! ये देवा !
दिगंबरा ! कमळनयना ! ॥ २ ॥

(१२२६)

पाये पाहावया आलियें ! श्रीदत्ता ! श्रीदत्ता ! श्रीदत्ता !
बहू मीं श्रमित ज्ञालियें !

कां तुवां दूर धेलियें ? आत्मयां ! आत्मयां ! आत्मयां !
कर्मी अधीन केलियें ? ॥ १ ॥ धृ ॥
श्रमु सांगों मी कवणा ? श्रीदत्तु श्रीदत्तु श्रीदत्तु
माझी न करीं वासना ! ॥ छ ॥
माझे अपराध गणितां, या मनें या मनें या मनें या मनें
गणीत नाहीं, बा अवधूता!
दिगंबरा ! करुणावंता ! आत्मयां ! आत्मयां ! आत्मयां !
उपसाहिजो समर्था ! ॥ २ ॥

(१२२७)

॥ मल्हार. ॥ कांबोद. ॥

सुरप्रिया ! श्रीदत्ता ! अमरपती ! श्रीअवधूता !
योगनिधी ! परिपूर्णा ! सर्वज्ञा ! त्रीगुणमुक्ता ! ॥ १ ॥धृ ॥
सानंदचिद्घनानंता ! आत्रेया ! गुणवरदा ! ॥ छ ॥
अनुसूये नंदना ! दिगंबरा ! कृपेक्षणा !
कैं करिसी करुणा ? नीवारीं हे भववेदना ! ॥ २ ॥

(१२२८)

तत्वदयामृतसारा ! योगेशा ! गुणसागरा !
ज्ञानप्रिया ! ईश्वरा ! मायातमसदिनकरा ! ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्ता ! योगदमूर्ती ! त्राहि गुरो ! परसंवित्ती ! ॥ छ ॥
तामस गुण संहारा ! ज्ञान जळाब्धि ! अपारा !
कैं येसी ? दिगंबरा ! निराकारसाकारा ! ॥ २ ॥

(१२२९)

गुणमुक्ता ! सानंदा ! गुणनिधी ! अगाधा !
नित्य पदानंदतनु ! जय पूर्णाद्वयबोधा ! ॥ १ ॥ धृ ॥
भवनदजनपोता ! त्राहि गुरो ! श्रीअवधूता ! ॥ छ ॥
योगप्रभाकरमूर्ती ! दिगंबरा ! स्वयंज्योती !
अगम्य तुझा महिमा ! करींपां भवनीवृत्ती ! ॥ २ ॥

(१२३०)

चंचळ हें मन माये ! निश्चळ कैसें वो ! राहे ?

अवधूताचे पाये हृदयीं धरूं न लाहें ! ॥ १ ॥ धृ ॥
वीयोगु मज न साहे ¦ तुटे कवणें उपायें ? ॥ छ ॥
चंद्र तपे चांदणें; गायन जीवा न माने !
आंगी जळती चंदनें दिगंबरें वीण सुमनें ! ॥ २ ॥

(१२३१)

नयनीं वाट पाहीन. कैं मीं तें रूप लाहीन
सावळें, अञ्जनयन ? अखंड लागलें ध्यान ! ॥ १ ॥ धृ ॥
आरत ये जीविचें; कैं मुख पाहिन दत्ताचें ? ॥ छ ॥
न दिसे येतां अझुणी; मनस गुंपलें सगूणीं.
प्राणाची मीं सांडणी करीन माथे ! येथूंनि. ॥ २ ॥
भेटि करा तेणेंसीं ¦ न साहे अर्धु मानसीं !
दिगंबरा ! कैं येसी ? तुजलागि जालियें पीसी ! ॥ ३ ॥

(१२३२)

श्रोत्रांचें सुख नयनीं येउंनि भरलें साजणी ¦
तृप्ति जाली दर्शनीं; वासना न पवे धणी. ॥ १ ॥ धृ ॥
सावळें रूप मीं पाहें. इतुला ही वियोगु न साहे ! ॥ छ ॥
देखणें मीं सांडीन; द्रष्टेपण नीरसीन;
आत्मा दिगंबरू मीं मातें दृश्य निरासें पाहीन ! ॥ २ ॥

(१२३३)

करितां गुणश्रवण आसक्त जाहालें मन.
पाहीन कैं मीं चरण ? अवधूतु माझें जीवन. ॥ १ ॥ धृ ॥
सुंदरू वो ! सावळा नेसला सोनेसळा;
भाळी तीळकु पीवळा; पाहीन दिगंबरु डोळां
अंतर माझें वेधलें; चैतन्य जडोनि गेलें;
दिगंबरीं मन गुंतलें; न सूटे काहीं केलें ! ॥ २ ॥

(१२३४)

ब्रह्म केवळ साकार श्रीदत्ताचें शरीर;
व्यापिलें तेणें अंतर; मीपण गेलें नश्वर ! ॥ १ ॥ धृ ॥
रूप अरूप जाहालें; अवधूतु ब्रह्म सावळें. ॥ छ ॥

पाहातां पाहाणें पारुषे; द्रष्टत्व मारूनि तें दीसे;
दृश्य चि अदृश्य विशेषें दिगंबर हें आभासें. ॥ २ ॥

(१२३५)

लक्ष ठेवीन चरणीं; गोवीन मनस गूणी;
रूप देवाचें माये ! धरीन अंतःकरणीं. ॥ १ ॥ धृ ॥
मनसा ! रे ! तुं स्थिर राहीं ! रूप दत्ताचें पाहीं ! ॥ छ ॥
देहाचें मज़ नाहीं वो ! प्राणाचें मज़ काहीं वो !
दिगंबरें वीण सखिये ! न धरीं मीं हृदयीं वो ! ॥ २ ॥

(१२३६)

संत संगें धावतां, श्रमली वाट पाहातां !
श्रीदत्तु आत्मा सखिये ! नव्हे नयनी आपैता. ॥ १ ॥ धृ ॥
आतां सांडीन पाहाणें; द्रष्टत्व तुज़ कारणें. ॥ छ ॥
मनसें नूरोनि राहीन; बुद्धि निरसोंनि पाहीन
आत्मा दिगंबरु सखिये ! जीवें जीउ आळंगीन. ॥ २ ॥

(१२३७)

भैरव ॥ मल्हार ॥ देशी ॥

सकळ ही दृश्यभान नाशोंनि गेलें गे ! माये !
अवधूता दृष्टी पाहातां, अबोधु ज़ाये !
तेणें गुणें द्रष्टत्व तें हीं हालें, गे ! सैये !
हा देखियेला. न सोडीं आतां ज़ाण गोरिये ! ॥ १ ॥ धृ ॥
सकळां सुदीनु आजि आला ! श्रीगुरुराउ भेटीसि आला !
भेदु पैं गेला ! ॥ छ ॥
परतर भानहीन भासलें सुखद पूर्ण. तेथें भवभान तें ही तद्गत ज्ञाण.
देवदिगंबरीं निमग्न ज़ालें हें मन;
या प्रपंचीं न धरे यत्नें ही परि माझें ज्ञान. ॥ २ ॥

(१२३८)

भवनदगत जळ न वळे दुःखद पूर्ण;
वरि कामवातें भ्रमित न धरी यत्न.
अवधूतें वीण न पवे मीं पारु ज़ाण,

हा गुणपूरु, दुस्तरु माना येथें तरण. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मा दत्तु वो ! आजि आणा ;
मी विण तेणें न धरी प्राणा ! जीउ न धरे ज्ञाणा ! ॥ छ ॥
रजतमकृत कर्म बाधी जलचरीसम.
मन पावे दुःख परम; न धरी शम. आतिशयें ज़ालें मज़ सर्व विषम.
श्रीदिगंबरु देऊं कैं मातें करील प्रेम ? ॥ २ ॥

(१२३९)

भिन्न.

श्रमद विषय मतीहरणा ; हा रे ! भयहरणा !
तुझा पंथु न कळे यया मना ! आतां पाये दाखवीं पुण्यचरणा !
कृष्णवर्णा ! गुणसंगु हा साहावेना हे वेदना ; अरे ! देवा ! ॥ १ ॥ धृ॥
सांग, सखया ! कई येसी ; हा रे ! भेटि देसी ;
मी दीन येकलें परदेशी ; कां देवा ! वियोगें हाणितासी ;
दंडितासी ; दुःख देसी ; नयेसी; साहों मी कैसी ? ॥ छ ॥
न कळे न घडे काहीं क्रिया, हा रे ! देवराया !
हा ही देहो गेला कीं कैसा वाया ? काये कैसें होईल जीवा या ?
योगिराया ! देवा ! दिगंबरा ! रे ! करीं दयारे ; छेदीं माया ! ॥२॥

(१२४०)

देशी.

न रमे श्रीदत्ता ! तुज़वांचूंनि घडी; न रमे सखयावांचूंनि घडी.
आतां येइन मी संगें, वरदा ! पाये न सोडीं. ॥ १ ॥ धृ ॥
बहुभाग्यें गुरू मज़ ज़ोडिलासि तुं सद्गुरू मज़ ज़ोडिलासि तूं.
दत्ता ! पाहातां सोये श्रमली बहु; न कळे पंथु. ॥ छ ॥
जननी, जनकु, गुरू, तूं माझा सखा; जनकु, गुरू, तूं माझा सखा;
देवा ! दिगंबरा ! तुंवांचुनि मी नेणें आणिका ! ॥ २ ॥

(१२४१)

भिन्न.

बहुतां कष्टीं, कित्ती जन्माचा अंतीं, नानातपयोगे दृष्टी देखियेलें !
कैसें पुडती तुवां वियोगें घेलें ?

काये अझुणी पाहासी अंतु ? सकळ राहिलें. ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! मंगळा ! येईं भेटी श्यामळा !
योगिमुनीदेवसेवितपादकमळा ! ॥ छ ॥
श्रीदिगंबरा ! संसारातीता ! परा ! गणेश्वरा ! गुरो ! योगिराया !
अरे झडकरी मातें करीं दया !
देवा ! मज्ञ माझेनि हीलातें न करवे रेया ! ॥ २ ॥

(१२४२)

॥ भैरव देशी. ॥

जलजलोचना, दुःखशमना, तापशमना, आणा वेगीं सगुणा
माझा सदना ! मज्ञविषयीं न ये कां वो करुणा ?
निशिदिनु वो ! गमेना ! लोटना ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! सये ! केव्हां आणिसी ? भेटविसी ?
तुझी दासी होईन प्राणवेसी; मीं वो ! पाये झाडीन मुक्तकेसीं.
ज्ञरि हा वो न दाविसी आह्मासी राहूं मीं कैसी ? ॥ छ ॥
आतां तया न सोडीं करुणाकरा, दोहीं बाहीं कवळीं अत्रिकुमरा.
न यें न यें सखिये ! भवपुरा. दृढ धरिं या दिगंबरा शंकरा ! ॥ २ ॥

(१२४३)

कांबोद मल्हार.

पैलु कागु बोले काये ? माझा नयनु स्पंदतु आहे.
दत्तु अझुणी कां न ये ? मन वेधलें; परति न लाहे !
व्रियेगु आंगी न साहे ! त्रिविधतापु बाधिताहे !
ज्ञा ! वो ! वेगु करा ! माये !
याचे दाखवा येकु वेळा पाये ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां न धरवे धीरू; लागला भवविखारु;
दूज्ञा नेणें उपचारु; येकु समर्थु श्रीआदिगुरु. ॥ छ ॥
देवो गुरु, बापु, माये, दत्तु आत्मा माझा सैये !
तयाची वाट मीं पाहें; सवें ज्ञाइन; पुडती नये !
आनंदु आजि वाटताहे ! भाव पालटले गे ! बाइये !
दिगंबरीं भेटि होये ! ऐसें चिन्ह भासताहे ! ॥ २ ॥

(१२४४)

॥ भिन्न ॥ चाली ॥

स्वपर ही पाहातां विजन माने गे ! माये !

स्मरतुसें जो गुरु तारकु बोधकु नंदकु आहे. ॥ १ ॥ धृ ॥

सुखा हेतु कैसा ? — जैसा जळवंतु घन; न मेघु.

अतिगुणें कामीतु हा आशाव्यासु आनंदकरु. ॥ छ ॥

अतिशयें तृशिता चातका पावे गे माये ! मानतुसे हें,

हा देऊ श्रीदत्तु दिगंबरु तोषकु, छेदकु मोहा. ॥ २ ॥

(१२४५)

सखिये ! वो ! पाहे तुं, धांवतु येतु दीसे !

शोभतुसे हा; प्रिति लावितु, भेटतु, आहे. ॥ १ ॥ धृ ॥

मोहा नेतु, नाशा जैसा हिमंकरु सूखपूर्णु

अनंतरू नाशिं तमा आत्मा दत्तु आदिगुरु. ॥ छ ॥

शरीरेंसीं पाहातां कांहीं न भसे, माये !

भासतुसे हा पारवर्जितु श्रीदेऊ दिगंबरू आजि ! ॥ २ ॥

(१२४६)

वरदु हा ईश्वरु प्रकटु पाहा ! दीसे;

शोभतुसे; हा बंधा छेदितु, हरीतु, तारीतु आहे. ॥ १ ॥ धृ ॥

तो हा भेदु हरी;—जैसा दिनंकरू तमोहरु,

तैसा मोहा नाशीतु हा आत्मा दत्तु आदिगुरु. ॥ छ ॥

यया मनीं स्मरतां, मायिक जें कीं हें असे ग्रासतसे.

हा देऊ दिगंबरु शंकरु सद्गुरू हा ! ॥ २ ॥

(१२४७)

॥ मल्हार ॥ ॥ नामावळि ॥

जळजनयना ! कोटिचंद्रसुशीतळ ! जळरूप ! जय ! नमो ! नमो !

जनशंकर ! जनमोहनिवारण ! जननमरणहर नमो ! नमो ! ॥ १ ॥ धृ ॥

योगेश्वर ! ते नमो ! नमो ! लीलाकर ! ते नमो ! नमो ! ॥ छ ॥

अगुणत्रिगुणकृतकर्मनिवारण ! सगुणस्वगुणयुक्त ! नमो ! नमो !

जय ! दिगंबर ! ज्ञानप्रभाकर ! वरदस्वरूप ! ते नमो ! नमो ! ॥ २ ॥

(१२४८)

अवधूतरूप, निरामय, निर्गुण, निज गुणगण मती केवि भजों ?
भवद, भयांतक, भेदविनाशक, तमोभ्रमश्रमहर कँ न भजों ? ॥१॥धृ॥
कमळनयनरूप केवि भजें ? सगुण त्रीगुणमुक्त केवि भजों ? ॥ छ ॥
सुहृद, दयामृतवर्षद, जळजळद, ज्ञानप्रभाकर कँ न भजों ?
दिगंबर, परब्रह्म, निरंजन, साधनपर मति केवि भजों ? ॥ २ ॥

(१२४९)

भवहर, भयहर, पार्षदवंदित, कमळनयनरूप पाहिन वो !
परमपदद, करुणामृतसागर, गोचर नयनी मीं पाहिन वो ! ॥१॥धृ॥
देवाचें मुख पाहिन वो ! दत्त विमळरूप पाहिन वो ! ॥ छ ॥
पीतकनकधर, चंदनचर्चित, पीतांबरधर पाहीन वो !
योगहृदयचर, योगविदांवर, योगद दिगंबर पाहीन वो ! ॥ २ ॥

(१२५०)

बहु दिन ज्ञाले ! चरण दृष्टी पाहिन ! ज्ञाइन ते मग न यें न यें !
कमळनयनरूप लाहिन केवळ; मग मीं वो ! तेथूंनि न यें ! नयें ! ॥१॥धृ॥
या देहाप्रति न यें ! न यें ! आली तरि, तेणें विण नयें नयें ! ॥ छ ॥
श्रमलें मनस; चरणाप्रति येईन; मग तूज्ञपासूंन नयें ! नयें !
दिगंबररूपहृदयीं निरोधिन; परि तुज्ञवांचूंनि नयें नयें ! ॥ २ ॥

(१२५१)

गुणगणमुक्त, वियुक्त, गुणांतक, व्यापक, पद अविकारी,
मुनिजनमानसमोहनिवारण, सकळ दुरितदुःख हारी ! ॥ १ ॥ धृ ॥
श्याम शरीर गुणा नये नये ! ज्ञाणतां ज्ञाणिवेप्रति नये नये ! ॥ छ ॥
सुर, नर, सिद्ध, निरंतर सेवित; भेदत्रयज भान च्चोरी;
सहज, सदोदित, शुद्ध, गुणातित, दिगंबर भ्रमें जन चारी. ॥ २ ॥

(१२५२)

चालि भिन्न.

योगेंद्राप्रति योगसार सन्यासी गुणवार्जितु वा.
अतिविमळाद्वय नित्य निरंजन नरसुरवरगण चिंतित वा.
परमगुणार्णव नित्यानंदद सेवकजनपरिपालकु वा.

दिगंबर तूं शिवरूपधर जय ! जय ! जय ! जय ! गुणवर्जिता ! ॥ १ ॥

(१२९३)

ब्रह्मनिष्ठां परिपूर्णपार, ब्रह्म निरंजन तूं दत्ता !
गुणगणवर्जित तूं सच्चिन्मय, परमगुरो ! तूं हर्षपरा !
परमदयार्णव, विद्यामंदिर, विषयविकळजनसंत्राता;
दिगंबररूप तव परमाद्‌भुत जयजगनगपाति अवधूता ! ॥ १ ॥

(१२९४)

नित्यानंद, निधानसार, तुं निरवैवात्रीवरदा !
गुणगणवार्जित, ब्रह्म सनातन, स्वजनाजिवनधन विषयपरा !
नित्य, निरंजन, सर्वाश्रयपद, सकळ गुरो ! श्रीदत्ता !
दीगंबर तव रूपानंदद, जय नरसुरगण वंदिता ! ॥ १ ॥

(१२९५)

॥ सारंगु ॥

नाहीं सैये ! सगुणा त्या वो ! आमुची कल्पना ;
हें निश्चित ! हां सैये ! भेटि होये ऐसे करिपां ॥ १ ॥ धृ ॥
जावो साजणी ! विकळ हें माझें भारी
शरीर संसारदुःखें त्वरया ! ॥ छ ॥
मनि ती वो ! नोहे सैये ! निष्ठुरु; जाणें हें परी
काये चूकि जाहाली ? नेणें ! दिगंबरु देउ
अह्मांविषयीं भारी कृपाळु; संप्रति हें ऐसें जाहालें. ॥ २ ॥

(१२९६)

भिन्न

संगें संगें संगें संगें येईन दत्ता ! रे !
विनवीं निरंतरः– येईं येईं येईं येईं रे ! ॥ १ ॥ धृ ॥
पाहें पाहें पाहें पाहें पाहें तुजविण पालिता
सखया ! रे ! नाहीं नाहीं नाहीं नाहीं नाहीं बा ! रे ! ॥ छ ॥
धांवें धांवें धांवें धांवें धांवतु येईं रे ! देव दिगंबरा !
वेगें वेगें वेगें वेगें वेगें ये रे ! ॥ २ ॥

(१२९७)

प्रांती बहु सगुणीं दत्तीं जाहाली मीळणी.

हें मनस हां सैये ! न नीवडे आतां येथूनी ! ॥ १ ॥ धृ ॥
आजि सुदीनु समळ हें माझें दूरी हृदय परमानंदें भरलें. ॥ छ ॥
बहुदीनु सोये याची पाहातां श्रमली भारी !
कोण क्रिया फळली ? नेणें. दिगंबरु देऊ याचा न सोडीं आतां पाल
संसारिक हें नाहीं ज्ञाहालें. ॥ २ ॥

(१२५८)

(भिन्न)

सवे लाउनि कैसें दूरि घेलें ? केलें काठिण माये !
संगु मागे संगु मागे संगु मागे मन माझें. ॥ १ ॥ धृ ॥
सुरपती मन्माति नेणे सोये नेणे सोये नेणे सोये;
भूलि ज़ाली; करूं काये ? ॥ छ ॥
देवा ! येइं रे ! तुझी वाट पाहें. वय गेलें हें माझें.
दिगंबरा ! दिगंबरा ! दीन रंक मीं तुझें ! ॥ २ ॥

(१२५९)

॥ सारंग भिन्न ॥

कमळनयना ! तुझा भजनीं विक्षेण
मातें करीं अतिशयें ज़ाणपां ! ॥ १ ॥ धृ ॥
वरदा ! करीं भ्रमु हा दूरी; ॥ छ ॥
निरसे मज़ ऐसें न दिसे काहीं साधन देवा ! दीगंबरा ! तुज़वीण ! ॥२॥

(१२६०)

सकळविषयीं नेणु न पाहें हीताहित काहीं;
तुज़वरि असे निश्चित ॥ १ ॥ धृ ॥
चरणीं तुझा हा मनु माझा. विसरतु मनीं तुझा न पडे,
ऐसें विनवीं. देवा ! दिगंबरा ! हें चि जीवीं. ॥ २ ॥

(१२६१)

॥ भिन्न ॥

अवृत्तीवृत्ती भारी मन खेदु पावे ! दत्ता ! तुज़विण नानभावे. ॥१॥धृ॥
येइं ! श्रमु नीवारीं अरे ! शंकरा ! ॥ छ ॥
न घे मीं तुंवीण सायोज्य मोक्षु हीं; पादप्रेमसुख देइं.

दिगंबरा ! तूं माझा ईश्वरु ! देवा ! दुसरी गति मज नाहीं ! ॥ २ ॥

(१२६२)

तो हा येतो; मनस हरीतो; आह्मी यां सोडूं ना !
शोभा दावि गणसमुदार्थि; गायक गाति करुणा ! ॥ १ ॥ धृ ॥
पाहुं या गुरुचरणा ! धरूं त्या; मग सोडूं ना !
पाहातां श्रीवदना तृप्ति ज़ालि या मना !
दिगंबरें गुणि माझि गुंतलि हे वासना ! ॥ २ ॥

(१२६३)

॥ मल्हार ॥

प्रकटला मितु श्रीदत्तु हा रे !
सज्जना ! त्वरीतु प्रलपनी उल्हासादि करी तुवां
सेवनि बोध वैभवदायकु अचंचळ संतापशमनु
सन्नातनु पुराणु स्वजनामाजि बरव तुवां ॥ छ ॥
जनभानें नुरवितु जाति सत्यानंदु मिरवे या
सुधीर साधकानंदले ते मीनले सुरतरु या
विण गर्जनें गुण संहारितु गणसंगे क्रीडा क़रीतु
साही रस परीत पावले वितुलल्हे चिद्गुणि या
प्रकटला मितु श्रीदत्तु हा रे ! सज्जना ! ॥ १ ॥ धृ ॥
ऐसा सज्जनी रमतां निजगुणी
गुणवंतु बोध न रिपु तेणें संसारु विवर्त्तु हा ॥ छ ॥
अविज्जनमनोनाशकु संवेदनकळाभेदकु सन्नाशकु
गुणगणसंगें जनीं प्राणबंधन दायकु अगुणी स्फुर क्षुल्लकु हा
निधु योगुविदांप्रति दिगंबरु निर्मळु परु
चिदाद्वयसागरु सेउनि न पवति संसारु त्रा ॥ २ ॥
प्रकटला मितु श्रीदत्तु हा रे ! सज्जना ! ॥ छ ॥

(१२६४)

कांबोद.

काये मी चूकली कोणें कर्मे भूतली ?
येणें दुरि धरिली; कां प्रीति सांडिली ? ॥ १ ॥ धृ ॥

माझी जननी माझी जननी वो ! मज़ परजनी गेली मज़ सांडुनी;
काये करूं साज़णी ? नाहीं मज़ कव्हणी ! एकट निदानी. ॥ छं ॥
वीकळ ज़ाइन; प्राण मी देयीन;
दिगंबरें वांचुंन न धरीं जीवन ! ॥ २ ॥

(१२६५)

गुणी गुण गुंपलें ! रूपीं रूप रूपलें !
मानस कुंठलें ! येणें मज़ मोहिलें ! ॥ १ ॥ धृ ॥
काये करणें ? देई रे ! चुकवीसी काइ रे ?
निश्चळु पाहि रे ठाइच्या ठाईं रे ! ॥ २ ॥
येणें ज़ाणें मोडलें; साधन कुंठलें.
दिगंबरें नाशिलें; प्रेमसुख तोडिलें ! ॥ ३ ॥

(१२६६)

येकु वेळ नयनी पाहिन जननी;
अवधूतु साज़णी ज़ा कां घेउंनि. ॥ १ ॥ धृ ॥
माझी माये, माझी माये, वो ! आठवत आहे;
वियोगु न साहे; ज़ायिन मी सखिये ! येकु वेळ बाइये ! ॥ छ ॥
अवो ! अवो ! गोरिये ! ॥ धृ ॥
बहु, दिन लागले; जन्म चि लोटले;
योगवन शोधलें; दिगंबरु न कळे ! ॥ २ ॥

(१२६७)

स्वप्नीं मुख देखिलें; मन माझें गुंपलें;
तेथूनि न चले; तेणें देह सोडिलें ! ॥ १ ॥ धृ ॥
रमारमणा ! रमारमणा ! रे ! कमळनयना !
गुणनिधाना ! दत्ता ! सगुणा ! ॥ छ ॥
श्यामळ सुंदर धेलें तेणें अंतर;
दत्त दिगंबर पाहिन शंकर !

(१२६८)

जनें जन पाहिलें; योगवन शोधलें;
कर्मगिरि लंघिलें; नाहीं तुज़ देखिलें ! ॥ १ ॥

कें होतासि ? कें होतासि ? रे ! दृष्टीहूनि अंतरें;
भूलि मीं वीसरें ! आतां पुरे ! बा ! पुरे ! ॥ छ ॥
पालउ धरीन; आतां काये सोडीन ?
सर्वे येइन; न करीं साधन ! ॥ २ ॥
जाणें तुझी लपणी; होतासि मीपणी !
दिगंबरा ! येथूनी न ठेवितें अझुणी ! ॥ ३ ॥

(१२६९)

वीष विषयरसवासने मन माझें गुंतलें; सखिये ! धर्म कुंठले !
कामें चपळ,चळ,चंचळ चळताहे;नाकळे! सखिये ! कै आकळे?॥ १ ॥धृ॥
हितविषयीं देहीं अंतर पडताहे बाइये ! सखिये ! वो ! गोरिये ॥ छ ॥
क्षणक्षणें हें क्षणभंगुर वय ज़ाये माये ! वो ! आतां करूं काये ? वो !
दिगंबरें वो ! वीण न चले स्वहित माझें !
जाइ ! ज़ा ! तया येथें आणिज़ा ! ॥ २ ॥

(१२७०)

शब्दु न करा ! मज़ अर्थे अंतर ज़ालें ! बाइये ! अवो ! अवो ! गोरिये !
मन विकळ माझें चंचळ, तळमळी;
माये ! वो ! तया करूं काये ? वो ! ॥ १ ॥ धृ ॥
हृदयगतधन ज़ातसे अवधुत बाइये ! गेल्यावरि न ये वो ! ॥ छ ॥
कांहीं करा वो ! प्रातिकारु ! मी पुसतीसें या मना मनोजयसाधना !
दिगंबेंरसीं भेटि होईल तरि, मनोवासना होईल क्षीण कामना ! ॥२॥

(१२७१)

चंद्र, चांदिणें, काये चंदन करूं ! मी वो ! तापली ! गुणगणी पीटली !
निजहृदयीं दत्तु पाहिन क्षणभरि; पाउलीं त्याचां प्रीती गुंतली ! ॥ १ ॥धृ॥
शब्दजानितु भ्रमु नव्हे वो ! सखिये ! हा ! शाब्दिकें दूरि नव्हे लैकिकें ! ॥छ
मी तें कवण ? माझें मज़ स्मरण नाहीं कांहीं वो ! गुंपलिये देहीं वो !
दिगंबेंरें वो ! येणें वांचूंनि प्रातिकारू देहीं वो ! तैसा योगु नाहीं वो ! ॥ २ ॥

(१२७२)

देह धरूंनि कैसी येउं मीं तुज़ प्रति ? शंकरा ! अरे ! ज्ञानसागरा !
दृश्यदर्शनें आड पारक्य परतलें; भूलली;

मा तुझा पंथु चूकली ! ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं रे ? माझें चंचळ मन बहू चूकलें ! भवनदीं लोटलें ! ॥छ॥
रूपसगुण तुझें धरीन हृदयीं मीं; साधन तें चि योगसेवन.
दिगंबरा ! तुजवांचूनि भवदुःखहरण करूं शके कवण ? ॥ २ ॥

(१२७३)

कांबोद.

जन्म जाहाले कोटी ! काळ क्रमले ! आतां दाखवीं पाये वो !
संसारवनीं कां मज सांडिलें ? दाखवीं पाये वो ! ॥ १ ॥ धृ ॥
दाखवीं पाये वो ! अवो ! माये ! दाखवीं पाये वो !
अवधूते ! मज कां दुरि धरिसी ? दाखवीं पाये वो ! ॥ छ ॥
वाट पाहातां तुझी गेलें वो ! वय माझें ! दाखवीं पाये वो !
दिगंबरे ! तुज येइन सर्वे ! आतां दाखवीं पाये वो ! ॥ २ ॥

(१२७४)

सावळें डोळस रूप आठवे; क्षणक्षणा लागती बाण वो !
येर अर्थवाद काये मीं करूं ? मज लागती बाण वो ! ॥ १ ॥ धृ ॥
लागती बाण वो ! सखिये वो ! लागती बाण वो !
अवधूतु न ये, वियोग खरतर; लागती बाण वो ! ॥ छ ॥
माये माझिये ! तुझे बोल चि आठवितां, लागती बाण वो !
दिगंबरे ! तुज वेगळी नसें आतां ! लागती बाण वो ! ॥ २ ॥

(१२७५)

पाये धरिन; कयीं करिसी परति ? मीं वो ! ज्ञातिसें दुरि वो !
परतोनि मुख दाखवीं माये ! मिं वो ! ज्ञातिसें दुरि वो ! ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञातिसें दुरि वो ! अवो ! मीं ज्ञातिसें दुरि वो !
संसारपुर दुरूळ सासुरें ज्ञातिसें दूरि वो ! ॥ छ ॥
कंठु पालटला; शब्दा परति नाहीं; ज्ञातिसें दुरि वो !
दिगंबरे ! तुज सोडुनि, परजना ज्ञातिसें दूरि वो ! ॥ २ ॥

(१२७६)

नाम घेतां चि रूप आठवे ! मनी मज न धरे धीरु वो !
माये म्हणऊंनि झाडासि कवळीं ! न धरे धीरु वो ! ॥ १ ॥ धृ

न धरे धीरु वो ! तुजवीण न धरे धीरु वो !
भेटीवीण कैसें शरीर धरूं मीं ? न धरे धीरु वो ! ॥ छ ॥
रूप आठवतां, चंचळ मन माझें न धरे धीरु वो !
दिगंबरे ! बहु काळ क्रमले ! आतां न धरे धीरु वो ! ॥ २ ॥

(१२७७)

मार्गु न कळे माये ! चंचळ मन माझें; कुंठली गति वो !
माये ! माये ! दीर्घस्वरें मीं आळवीं ! कुंठली गति वो ! ॥ १ ॥ धृ ॥
कुंठली गति वो ! अवो ! माए ! कुंठली गति वो !
करणगुणगणीं मानस गुंपलें ! कुंठली गति वो ! ॥ छ ॥
दशामंडळ वोस ! जावें कवणीकडे ? कुंठली गति वो !
दिगंबरे ! तूं न येसि तरि, माझी कुंठली गति वो ! ॥ २ ॥

(१२७८)

विषहृदयगत चंचळ मन माझें ! न चले गति वो !
काम, क्रोध, गुण काळज फाडिती; न चले बळ वो ! ॥ १ ॥ धृ ॥
न चले बळ वो ! कैसें करूं ? न चले बळ वो !
माझें मज गुणकर्मविबंधन; न चले बळ वो ! ॥ छ ॥
अग्नि लागला देहीं ! पेटे हृदय ! न चले बळ वो !
दिगंबरे ! कयीं पावसी ? नेणवे; न चले बळ वो ! ॥ २ ॥

(१२७९)

जळें सुटला मीनु करितुसें तळमळ; करणें काये ? ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतु मज सांडूनि जातुसे ! करणे काये ? वो !
करणें काये ? वो ! अवो ! माये ! करणें काये !
पंचप्राणु हे देह सोडूनि जातिल ! करणें काये ? वो !
दत्तीं गुंपलें माये ! नूपडे मन माझें; करणें काये ? वो !
दिगंबरु माझें आयुष्य हरीतुसे ! करणें काये ? वो. ॥ २ ॥

(१२८०)

गुणी गुणदृष्टी; भजन तें वायां; सर्व ही ते गुणक्रीया. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां गुणसंगु तो नसे अव्यया ! ॥ छ ॥
विषद्रुम छाया, तेवि हे गुणमाया; योगी न रमती तिया.

श्रीदिगंबर गुणमुक्त सर्वत्र; अनुभवें ज्ञाणती तया ! ॥ २ ॥

(१२८१)

नयन वो ! दोन्ही ठेले निदानीं; स्वरूप तें भरलें मनीं. ॥ १ ॥ ध्रु ॥
आत्मयां ! तें वो ! पाहीन मीं नयनीं. ॥ छ ॥
हृदयभुवनीं, स्मरतु आहे मनीं; घेतां सुखकरु श्रवणीं.
श्रीदिगंबर सगूण, चिद्रूप, सुरनर सेवित जनीं. ॥ २ ॥

(१२८२)

नयन वो ! धालें; स्वरूप देखिलें; मनस गुणी गुंपलें. ॥ १ ॥ ध्रु ॥
आजि वो ! माझें आरत संपादलें ! ॥ छ ॥
हृदय निवालें; दुःख परिहरलें; सुखें गगन कोंदलें !
श्रीदिगंबरु देखिला वो ! सैये ! आतां येणें ज़ाणें कुंठलें ! ॥ २ ॥

(१२८३)

विपरीत कैसें देखिलें ? वो ! माये ! शरीर ज़ाहालें काये ? ॥१॥धृ॥
मन वो ! माझें परतोनि ठाया न ये ! ॥ छ ॥
गुणमती खाये; गुणहीन माये; दत्त निजरूप सखिये !
श्रीदिगबर अगुणगुणान्वित माझां मनीं, मद्गत आहे. ॥ २ ॥

(१२८४)

भिन्न.

नयन श्रमले माझे वाटुली पाहातां;
न दिसे सोये येतां दूरूनि धांवतां.
प्राणु न राहे. केव्हां पावसी ? बा ! अवधूता ! ॥ १ ॥ छ ॥
केधवां येसी ? सदुरुराया !
धीरु न धरे भवविजनी ! कां न पवसी ? ॥ छ ॥
तुज़विण येकलें न गमे परदेशीं.
दिगंबरा ! सांग आतां, केधवां पावसी ?
भक्तकरुणानिधी आपणां कां ह्मणविसी ? ॥ २ ॥

(१२८५)

(चालि भिन्न.)

गुणकृत सकळ ही जन भान, वो ! ज़सें आभासे मृगजळ वो ! सैये !

गुणहीन स्वरूप अवधूत नेणोंनि मीं तेथें मनें वेधलियें.
सत्य मानू करणी आनंदलियें.
बाइये ! नेणों, मृगजळ चि मीं ज्ञालियें ! अवो सैये ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! गोरिये ! असतां ज़वळि, माझी मीं चि दुरावलीयें.
अवो ! गोरिये ! मनस चंचळ स्थिर नव्हे; मीं मज़ न कळे माये !
कैसें मीं करूं ? निश्चळ करितां नोहे !
कद्रवणा काये पुसों मीं कवणें उपायें ? सैये ! ॥ छ ॥
परकृत सकळही जनकर्म वो ! ज़ैसें आपणावरि घेणें वो !
गुणकृत सर्व शुभाशुभ तऱ्हीं परि अवो ! तेणें बाधलियें !
आपुलि स्थिति नेणत आनंदलियें ! आत्मयां मि वो !
दिगंबरा भूललियें ! ॥ २ ॥

(१२८६)

कांबोद.

हृदयपुर वो ! पाटण अवधूतु राजा मीं पाहिन !
आत्मारामु जीवाचें जीवन ! भेटी मन आपुलें देयीन ! ॥ १ ॥ धृ ॥
सखिये ! मज़ न साहे दुसरें ! ज़ाणपण करा वो ! बाहिरे ! ॥ छ ॥
दृष्टीची करीन सांडणी ! मीपण काढा वो ! येथूंनि !
द्रष्टेपण न साहे साज़णी ! दिगंबरीं मिळैन मीळणी ! ॥ २ ॥

(१२८७)

कोटि जन्म करितां सोसणी नाहीं रूप देखिलें नयनीं !
तें अवधूतु वो ! साज़णी ! कैसी करूं ययाची सांडणी ? ॥ १ ॥ धृ ॥
माझया जीवाचें जीवन; कैसी करूं ययाची जतन ? ॥ छ ॥
ठेविन बुद्धी ही परतें मीपण सांडुनी आरुतें,
योगधन माझें हें निरुतें; दिगंबर लाधली सुमतें. ॥ २ ॥

(१२८८)

हृदयीं वो ! आठवे सगुण कृष्णश्याम कमळनयन;
तेथें माझें गुंतलें चेतन; रूप ययाचें मनसमोहन. ॥ १ ॥ धृ ॥
सखिये ! तें पाहिन नयनीं ! आळंगिन हृदयभुवनीं ! ॥ छ ॥
वडलें वो ! गुणाचें श्रवण; द्वैतमती ज़ाहालें हरण;

दिगंबरें हरिलें चेतन; परती न धरी वो ! तेथून ! ॥ २ ॥

(१२८९)

शब्दब्रह्म करितां श्रवण न निरसे आपुलें अज्ञान.
तें चि नित्य भजतां साधन वादीं मति होतांहे प्रविण. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! मीं नाइकें श्रवणीं येका गुरुवचनावांचूंनी. ॥ छ ॥
स्वस्वरूप नेणोनी तें होये बंधाचीं कारणें.
दिगंबरउदयसुदिनें मायामय तमस छेदणें. ॥ २ ॥

(१२९०)

आइकिलें बोलतां बोलणें; नेणे मन विश्रांती कारणें;
अभिमान हेतूक जाणणें, होये अभिमाना चि कारणें. ॥ १ ॥ धृ ॥
सखीये ! अर्थी पाहिन आपणा; नाइके मीं परावी कल्पना. ॥ छ ॥
ग्रंथ बुद्धी पाहातां न कळे; गुरुगम्य पाहाणें वेगळें !
दिगंबर सुदीनें नीवळें; नातरि, डोळस आंधळें ! ॥ २ ॥

(१२९१)

श्रवण नव्हे या श्रवणें; पाहासी तें पाहाणें पाहाणें;
मना ! मुळीं खुणेचें देखणें चंद्रेवीण न सुधें चांदणें ! ॥ १ ॥ धृ ॥
सखीये ! मज़ पाहातां, आपणां आपपर न नुरे कल्पना. ॥ छ ॥
प्राणसंगु सांडूनि राहाणें अभावली त्रिपुटी पाहाणें.
सांगितलें खुणेचें बोलणें, दिगंबरस्वरूपें असणें. ॥ २ ॥

(१२९२)

चिंद कांबोद.

येइं रे ! प्राणसखया ! माझी कैसी सांडिली माया ?
न धरीं मीं हें जड शरीर अतिक्षीण तुजवीण आत्मयां !
देवराया ! तुज़वीण रे ! आत्मयां ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां येथूंनी पाहिन पायां ! स्वभक्तवरदा ! येइं ! येइं !
निवारीं आपदा ! ॥ छ ॥
कठिण मन न करीं ! देवा ! माझें भयद हरीं !
दिगंबरा ! मीं तुझी बाटुली पाहातिसें ! गति नेणें मीं दुसरी ! ॥२॥

(१२९३)

॥ जति ॥

बरदस्वरूप कई पाहीन ? वो ! श्रमु तयाप्रति सांगेन ! ॥ छ ॥

(१२९४)

॥ मल्हार ॥ ॥ चिंद ॥

श्रीदत्तीं रती ज़ाहाली; गुंतली प्रीति; न रमे वृत्ती परसाधनें. ॥१॥धृ॥

येथुंनी आतां न साहे तेणेंसीं भेदु ! श्रमली बहु गुणसेवनें ! ॥ १ ॥

चांदणें आंगी न साहे चंदन माये ! बाधकें होती गुणगायेंन

देऊ तो केव्हां येईल श्रीदिगंबरु ? धरिला संदु बहु या मनें ! ॥२॥

(१२९५)

॥ जति ॥

या मनीं विकल वो ! मी दत्तीं वेच्चली, वेच्चली वो !

श्रीदत्तीं वेच्चली, वेच्चली वो ! ॥ छ ॥

न ये न ये वीसरा; न यें न ये वीसरा;

ज्ञा ! वो ! आतां साज़णी ! भेटि करा ! ॥ छ ॥

आणिज्ञा दत्तु वेगीं ! ज्ञा ! ज्ञा !मी प्राणु न धरीं !न धरीं वो ! ॥ छ ॥

चलाचल दाखवा ! चलाचल दाखवा !

या वो ! सुंदरा ! अवधूता भेटवा ! ॥ छ ॥

(१२९६)

संगीत हेजीज तिवडा.

विनटला, येकांगु ज़ाला, देहीं दुज़ा नव्हे पारिखा.

सदसंतमाय्यामृषारहिताद्वैतात्मैवामृतता पावनु गुणेशु नीयता, ॥ १ ॥

प्रथमु नमिला. ॥ १ ॥ धृ ॥

गगनु निराकारु ठेला; त्रिगुणमंडळ विसरला;

वीरतीवरी मीरउं न ये नये ज्ञाणिवेसी. ॥ २ ॥

प्रथमु नमिला.निशब्दीं भूतगळितु निजगुणी सहितु गुणगणीनिधान शोभतु

प्रपंचु कदा नेणतु, दिगंबरपदीं विरमतु प्रथमु नमिला. ॥ ३ ॥

(१२९७)

॥ शंकराभरण ॥

देह सोडि सैये ! प्राणु जळाती

तु जैसा मीनु आदिगुरो ! दत्तात्रेया ! देवा ! येई गा ! देवा ! ॥१॥
सच्चिदानंदा ! देवा ! येई ! सच्चिदानंदा ! भवसिंधु कें तरावा ?
दावा वो ! पारु दावा ! वियोगु कैसा साहावा ? काय करूं ? जि देवा ! ॥छ॥
कवनी वो ! सखि ! सैये ! भेटविल दत्तु माये ? देइन प्राणु बाइये !
नये वो ! सखा नये ! दिगंबरा ! देवा ! पावें पावें दीनदयाळा ! ॥२॥

(१२९८)

नवरोज.

रूपगुणश्रवणें मन पारुषलें; अवधूतीं बाइये ! आसक्त ज़ालें !
देहावरि न रमे; गुणहिन ठेलें; येणें श्रीदत्तें वियोगदुःखें हालें ! ॥१॥धृ॥
मळ्यानीळु वो अंगीं न साहे ! शीतळ चांदिणें पोळित आहे !
दत्तेवांचूंनी शरीर न धरीं, माये ! ॥ छ ॥
माझी अवस्था कोण ज़ाणयील ? कवण येणेंसीं भेटि करील ?
दुज़ेपण माजिचें निरसील ? दिगंबरें श्रमासि केलें मूळ. ॥ २ ॥

(१२९९)

सिद्धपुर पाटण; अवधूतु राजा; जननी जनकु आत्मा माझा.
ब्रह्मदेव ज़े याची करिती पूजा.
सावळा डोळसू शोभती च्यान्ही भुजा ! ॥ १ ॥ धृ ॥
दैवें ठेंगणें दुरि पडलियें; कर्म कवण अंतरलीयें ?
मायेबापाचें मूख मीं वीसरलियें ! ॥ छ ॥
भक्तजन सुहृदगण अगणीत, येकठ येकली पडलीयें येथ;
गुप्तपंथु न कळे; भ्रमलें चित्त ! दिगंबरे ! पुरवीं येकुदां मनोगत ! ॥२॥

(१३००)

बहुतें बाळकें असतां पासीं, जननी कठिण करी येकासी;
तयाची पाहातां दुर्गति कैसी ? तैसें ज़ाहालें मज़. मी नाहीं पासीं ! ॥१॥धृ॥
दत्ते ! माये ! वो ! कां दुरि घेलें ? येकलें नि येकटें म्यां काये केलें ?
भक्तजनसंगतीं असैन खेळें मेळें ! ॥ छ ॥
जन्मा चि पासूंनि अंतर ज़ालें ! परतोंनि वदन नाहीं दाखवीलें !
गुणगणवैरियां हातीं दिधलें ! दिगंबरे ! हृदय वियोगदुःखें पोळें ! ॥२॥

(१३०१)

संसार निर्जन, येथ वैसवीलें ! सांडुनि ज्ञातिसे, माझें काये व्हाले ?
भरले पाणियें दोन्ही डोळे ! पाहें तन्हीं वो ! परतोंनि ! बोलु बोले. ॥ १ ॥ धृ ॥
अवधूते ! काये मीं करूं ? माझा मानिला तुवां भारु;
तुजवांचुंनी पडला अंधकारु ! ॥ छ ॥
क्षितितळ कठिण; सांडिलें स्थूळ; खडसर भूमिका मातें खुपयील !
वरि तपे तापनु; लागती ज्वाळा; दिगंबरे ! कैसी पां नये कळवळ ? ॥ २ ॥

(१३०२)

गगना चुंबिती ज्वाळमाळा; संसारवान्हि वो ! ऐसा प्रज्वळला !
मज केवि लोटिसी तानयां बाळा ?
ऐसा अपराधु सांग काये केला ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ते ! माये ! वो ! कैसें करूं ? कित्ती सांगपां धीरु धरूं ?
हात देईं वो ! धरीन तुझा करू ! ॥ छ ॥
दिगंबरा बोलिली::—अरे ! मंदबुद्धी ! स्वप्नभ्रमु सांडि हा जाग समाधी !
तुजप्रति काइसा हा भवव्याधी ? सत्य तूंचि ! तूं विश्वासु न धरीं भेदीं! ॥ २ ॥

(१३०३)

संसारसागरीं जर्जर तारूं काळें देह भंगलें; न दिसे आधारू !
येथ कवणाची मीं कास धरूं ? अवधूता ! पाववी परपारु ! ॥ १ ॥ धृ ॥
गति कुंठली; परम निदान येथ मज मांडलें; सत्य जाण !
दत्ता ! काये पाहासी ? गेले प्राण ! ॥ छ ॥
दिगंबरु बोले ::— हें मृगजळ पाहातां चि लटिकें मायाजाळ;
बुडतासि तें मृषा ! निज निश्चळ अधिष्ठान तूं; न भजें हें पाल्हाळ ! ॥ २ ॥

(१३०४)

संसारनदु वो ! दुस्तरु माये ! कामवेगें लोटली वाहाति आहे !
मार्गे पुढें पाहातां, अंतु न पाहें !
यत्नु न चले ! ऐसिया करूं काये ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! येईं रे ! देयीं कास ! सादु न घलीं आणिकास !
परहस्तें जाणवे अमृत वीष ! गति कुंठली ! झणें करीसी उदास ! ॥ छ ॥
जन, वन, सदन, तनु, धन, जाया, वोसाण लागलें योगिराया !

न सुटे चि सोडितां; गुंपलें क्रीया! दिगंबरा! दुस्तर तुझी माया! ॥२॥

(१३०५)

संसार सज्जनविरहित वन; व्याळ परिवेष्टित कांटवन;
भयप्रदु ज्ञाणवे; न धरे मन; येथ बाळ सांडिलें मीं अज्ञान ! ॥१॥धृ॥
दत्ते! माये! वो! साद्दु देयीं! न करीं कठिण; परतोंनि पाहीं!
हृदय दुभागलें! बोलों कायी? कंठु दाटला! न धरे प्राणु देहीं! ॥छ॥
नीदान जाणवे इतलया वरी; तुज्ञसारखी कवण दुसरी?
माये पोटिची पडेल वरी; दिगंबरे! वियोगु पुरे करीं! ॥ २ ॥

(१३०६)

संसार सासुरे परजन माये! दूरुळ भारी वो! बाधिताहे!
मुख विसरलियें तुझें माये! केव्हां भेटसी? बाहुली तुझी पाहें! ॥१॥धृ॥
दत्ते! येइं वो! बहु श्रमलीये! जन मज्ञ पारिखें; दुःखनलीयें!
गुणवेगतपसीं सोसलीये! कर्म कवण? तूज्ञ मीं अंतरलीयें! ॥ छ ॥
काम मुख्य करूनी साही ज्ञण वैरी आगीत्रिण ज़ाळिती ये शरीरीं!
करीं तुझें स्मरण निरंतरीं; दिगंबरे! आतां न सवे संसारीं! ॥ २ ॥

(१३०७)

सात ही सागर भरले न पाहे क्षितितळिचें जळ; चातकु माये!
मेघालागुंनी आळविताहे. अतिशोषला; शरीर सांडूं पाहे! ॥ १ ॥धृ॥
तैसी आळवीं. ये! अवधूता! गुणमती तापली परमार्थता!
वरि तव वियोगें बहु गुणवेथा! देइं भेटी सद्गुरो! कृपावंता! ॥ छ ॥
आणिक परावी न करीं आशा. दृढ केलें मनस हें जगदीशा!
शरीर न सोडी जीउ हा कैसा? दिगंबरा! संप्राशवीं स्वरसा! ॥ २ ॥

(१३०८)

देहीं वडवानळु प्रदिप्तु ज्ञाला; तेणें माझें हृदय अरे! श्यामळा!
अति दग्ध ज्ञाहालें! न धरीं कळा!
तव विरहें प्रळयो व्यक्ती आला! ॥ १ ॥ धृ ॥
केव्हां पाहिन तें रूप माये! कृष्ण, श्यामळ, अवो! सखिये!
कमळनयनेंविण न राहे; मन माझें चंचळ ज़ालें सैये! ॥ छ ॥
देवा! तुझें दर्शन पीयूषपान; कैं मज्ञ होइल समाधान!

देह, गेह नावडे तुजवीण ! दिगंबरावांचून माझे प्राण ! ॥ २ ॥

(१३०९)

हें देह सखिये ! न धरी प्राण ! अवधूतेवांचूंनि न रमे मन !
मीपण न साहे; वीसरैन ! भावाभाववर्जित लागलें ध्यान. ॥ १ ॥धृ ॥
प्रीति गुंतली; न सुटे माये ! वादु वो ! करूं काये ?
अवधूतु आत्मा मज्ञ; मीं मातें पाहें ! ॥ छ ॥
द्रष्टा, दृश्य, दर्शन आलें क्षया ! ज्ञाणतां मी मज्ञ चिदव्यया !
आपपर न स्मरे ! गेलें लया ! दिगंबरें हरिला भेदु, माया ! ॥ २ ॥

(१३१०)

सुदिनु ज्ञाहाला ! येणें अवधूतें हृदयीं निवळलें चैतन्यनाथें !
तमस विनाशिलें विश्वभरीतें ! मीं मज्ञ पाहातां पाहाणें न उरे तेथें. ॥ १ ॥धृ॥
आनंदु ज्ञाहाला; गगनीं न स्माये; सिद्धि मज्ञ रोकडी ज्ञाली माये !
ब्रह्म अव्यय मीं चि, मीं आहे. आतां भेदु पुडती तो न पाहें ! ॥ छ॥
अभावदर्शनें देखिलें भान; कार्य आणि कारण सर्व सगुण;
व्यतिरेक अन्वय ठेलें साधन; दिगंबरें दीधलें संनिधान. ॥ २ ॥

(१३११)

भवदुःखसरीता मीं लोटलीयें ! कामवेगघालणी आंदोललीयें !
गुणजळचरीं विसंचिलीयें; काये करूं ? सखिये !
मानसीं पांगुळलियें ! ॥ १ ॥ धृ ॥
सादु घालिनः—ये ! रे ! अवधूता ! योगिजनवल्लभा ! हरीं भववेथा !
तुज्ञवांचूंनि कवणु आहे त्राता ? ॥ छ ॥
मागें पुढें पाहातां प्रांतु न दीसे. भय भारी ज्ञाणवे; छेदे कैसें ?
दिगंबरू ये, तें चिन्ह न दीसे. आतां मग ज्ञाइन, ज्ञाहालें मज्ञ ऐसें. ॥२॥

(१३१२)

भव दुर्ग दुस्तर; देह बंदिशाळा; कर्म त्रिविध; अवो शंकला !
मायमोहपाश हें बंधन गळा; सुटिका न दिसे;
भ्रमीत जीउ जाला. ॥ १ ॥ धृ ॥
माझा सोइरा बहु दुरि आहे! कोण्ही मातु ज्ञाणवा ! धरीन पाये !
योगिजन वल्लभु वेडंनि यां उपायें ! ॥ छ ॥

तापात्रयदंडन किती साहों ? माये ! नाना योनी जन्मतां दुरित चि होये!
दुष्कृत आपजे कर्म अनुपायें. दिगंबरें वांचूनि
सूटिका मज्ञ नोहे ! ।। २ ।।

(१३१३)

भवकृष्णसर्पु, वो ! मज्ञ दंशियेलें; आत्मभ्रमु ज्ञाहाला; लहर आलें.
बहुगुणीं मीनलें, यत्नु न चले; दृश्यवेधु होतुसे;
धरा वो ! माझे डोळे ! ।। १ ।। धृ ।।
अरे ! श्यामळा ! कमळनयना ! योगिजनवल्लभा ! कालाग्निशमना !
दत्ता येइं रे ! येइं ! भवहरणा ! ।। छ ।।
ज्ञाले धर्मरहित करणगण; माझें मज्ञ न कळे, भुललें मन!
करितां सोसणी, वय ज्ञालें क्षीण; दिगंबरा !
किती पाहासिल निदान ? ।। २ ।।

(१३१४)

दूरळ सासुरें बहु पिडिताहे; पूसतिः:— बाइया ! तुज्ञ कोण्ही आहे ?
तियाप्रति बोलतां शंका होये. माये माझी काठिण;
कैसें मीं करूं ? माये ! ।। १ ।। धृ ।।
धिग्य जन्मु हा गेला वायें वीण; अवधूतें ! मांडिलें कठिणपण !
परति न करीं. पाहीन मीं वदन. ।। छ ।।
ललाट पीटितां बहु श्रमलीयें; कवण बुझावील मग वारलीयें.
दैव उणें येथ पडलीये; दिगंबरेंवांचूंनि वायां गेलियें. ।। २ ।।

(१३१५)

दिशा अवलोकिन; पाहिन पंथु; देखईन कइं वो ! येतां अवधूतू ?
स्फुरतिसे बाहुली; नयन लवतू; पैल कवणू उचलीतुसे हातु ?।।१।।धृ।।
चिन्ह मोटकें, श्रीदत्तु आला; भाली चंदनतिलकु पिवला;
कमलनयनु नेसला सोनेसळा. ।। छ ।।
मागें पुढें धांवती अवो ! निजगण; ते माझे सखिये ! बंधूजन.
अतिप्रिति देइन आलिंगन; धरूंनि पालउ मीं सर्वे ज्ञाइन. ।। २ ।।
पुसतील बाइयाः:—हे वो ! कवण ? तियाप्रति दाविन हें गोतधन.
दिगंबरु बापु; हे बंधुजन. ययांसवें ज्ञातिसें मीं; नयें परतोन. ।। ३ ।।

(१३१६)

बहु दिन लागले; श्रमलासि काये ? बापा ! श्रीदत्ता ! देखियेले पाये !
आतां मज्ज येथूंनी घेउंनि ज्ञाये !
पालउ धरीन मी; वेगळी न राहें. ॥ १ ॥ धृ ॥
धन्य सुदीनु ! आजि दिवाळी; दत्तु भेटला यये काळीं !
आलिंगन दीधलें मज्ज हृदयकमळीं ! ॥ छ ॥
पाहातील बाइया नेतां देवदेवा; तियांप्रति मीं ह्मणे::—लोभु न संडावा;
भेटि नाहीं पुडती, खेदु न करावा. दिगंबराचिया ज्ञाति असे गावां. ॥२॥

(१३१७)

अवधूतु सखिये ! माझें प्राणधन, जविन जीविचें, योगनिधान,
प्रतिक्षणी बाइये सांभाळीन;
ज्ञळो ! ज्ञळो ! वो ! चंचळ माझें मन ! ॥ १ ॥ धृ ॥
वेगां येईं रे ! जळजनयना ! स्थिरू राहीं मानसीं, कृष्णवर्णा !
तुझा संदु लागला नित्य मना ! ॥ छ ॥
भरिन श्रवणी याचें नाम; रूप नयनीं मनोरम;
तेवि चि सकळ करणधर्म ! दिगंबरा ! हृदयीं तुझें प्रेम. ॥ २ ॥

(१३१८)

रूपें सावळा; मळपतु ज्ञाले; चंदन चर्चिलें, तें परिमळें;
वस्त्र पातळ सोनेसळे; तया पाहातां नीवती माझे डोळे. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! येईं रे ! देईं आलिंगन; बहु दिन क्रमले भेटीविण !
तुझा वियोगु न साहे माझें मन. ॥ छ ॥
परब्रह्म पुतळा; कमळनयनु; जीवीं जीउ सखिये ! माझा प्राणु;
मायेबापु वो ! नव्हे परजनु; दिगंबरें हरिला माझा मनू. ॥ २ ॥

(१३१९)

जीविचें आरत माये ! परियेसीं::— धावोंनि ज्ञाइन बापापासीं.
नाहीं मज्ज वारितें; मीं वो ऐसी !
हा ज्ञरि न बोले, तरि देईन प्राणासीं. ॥ १ ॥ धृ ॥
तुझें आलिंगे श्रीगुरुराया ! पासीं बैसवीं दत्तोत्रया !
पुसीं, पालवें नयन, योगिराया ! ॥ छ ॥

भवपुरीं क्रीडतां श्रमलियें भारी ! छाया कोठें न दिसे ये संसारीं !
भय भारी वाटलें, होतिसें दूरि; धावोंनि आलियें तो श्रमु माझा हरी! ॥२॥
तुज़वरि आत्मयां अरे ! योगिराया ! आंग मीं घालि सांडूंनि माया !
० ० ज़ायिल तेणें वायां ! दिगंबरा ! दाविसी द्वैत काह्या ? ॥ ३ ॥

(१३२०)

निज स्वरूप कैसें ? मी नेणें; गुणी गुपली तुझेनि गूणें.
नये आणितां विसरू मनें. अवधूता ! हें जीविचें ज़ाणें ! ॥ १॥धृ ॥
आत्मयां ! कमळनयना ! श्रीदत्ता ! गुणनिधाना !
तुझा वेधु कवालि या मना; बोधु दुसरा तेथ उरे ना. ॥ छ ॥
माझें मन परति न साहे ! तुझा रूपीं मिसलत आहे.
व्यवहाराची सांडूंनि सोये, दिगंबरा ! धरीतसें पाये ! ॥ २ ॥

(१३२१)

कमलनयनु सावळा, लल्लाटीं तिळकु पीवळा,
पावुरला सोनेसळा, कैं देखैन माये ! जवळा ? ॥ १ ॥ धृ ॥
वेधलें वो ! तयासि मन; मनीं लागलें अखंड ध्यान;
ध्यानीं चित्त नूरे, माये ! ज़ाण; ज़ाणपणाची मोडली खुण. ॥ छ ॥
दत्तु काळानळुशमनु , गुणकृतभवभयमथनू,
ज्ञानसागरु, मायाविहीनु, दिगंबरु योगिजनजीवितु ! ॥ २ ॥

(१३२२)

साधू जन वंदिती चरण गुणवादप्रलपनश्रवण
० ० सनी सगुण ध्यान पद पावती ते निर्वाण ! ॥ १ ॥ धृ ॥
जय जया ! मंगलधामा ! आत्मयां सुखविश्रामा !
तुझा वेधु निरंतर आह्मा लागों कां पुरुषोत्तमा ! ॥ छ ॥
शक्रारिमर्दनशीळा ! देवा ! अगम्य तुझी लीला !
सिद्धराजा ! भुवनपाला ! दिगंबरा ! तूं जीउ जीवाला ! ॥ २ ॥

(१३२३)

सांडूंनि मीपणसारा गुणस्पंदु वो ! येथ न करा !
अवस्थाचे भेद निवारा ! यया न साहे संगु दुसरा ! ॥ १ ॥ धृ ॥
ज़ो ज़ो रे ! नीज, नीज, आनंदीं नीज सहज़ !

निज मारूनि तें पद ब्रूझ आत्मयां ! परम गूज़ ! ॥ छ ॥
भार, अभाव, हे वारले ! गुण अगुण गुणें संहरले !
दिगंबरीं मनस न चळे; ऐसें निज़णें म्दां अनुभविलें ! ॥ २ ॥

(१३२४)

कमळनयनें माये ! माझें मन वेधिलें आहे.
आपपर तया न साहे. नेणवे, ज़ाहालें काये ? ॥ १ ॥ धृ ॥
आरे ! तूं लाघवी; तुवां घातली गोवी.
जीवत्व न स्मरे जीवीं, न कळे देहअभावीं भावाभावशून्यस्वभावीं. ॥छ॥
श्रवणी शब्दु न कळे ! नयन ठेले गोळे !
दिगंबरा ! नवल ज़ालें, तुझेपण वांयां गेलें ! ॥ २ ॥

(१३२५)

कई मीं देखैन डोळा, परमानंदुपूतळा ?
श्रीदत्तु जीवनकळा, स्वरूपे शुद्ध सावळा. ॥ १ ॥ धृ ॥
आनंदघनु वो ! परब्रह्म हा वो ! ऐसा मीं कोठें पाहों ?
कैसी मीं निश्चळ राहों ? लागला याचा मोहो. न सुटे सखिये ! स्नेहो ! ॥छ॥
योगियां योगविसांवा; स्वरूप लोपी मावा;
ह्रदयीं ठेवीन ठेवा ! दिगंबरु भेटैल केव्हा ? ॥ २ ॥

(१३२६)

करितां गुणश्रवण, माझें वो ! गुंतलें मन !
लागलें ह्रद्रयीं ध्यान ! वियोग वेधिती बाण ! ॥ २ ॥
आत्मयां ! येईं रे ! कमळनयना ! तुझें रूप आवडे मना,
माझया अंत:करणा; परमसुखनिधाना ! आत्मयां ! येईं रे ! ॥ छ ॥
आठवण विष ज़ाहाली; मनीं वो ! भूलि ठेली;
वियोगदु:ख आकळी; दिगंबरा ! मति बुडाली ! ॥ २ ॥

(१३२७)

मनें मन नेणसी कांहीं, कैसा तूं सकळ देहीं ?
तुज़ मज़ भेदू चि नाहीं. कर्म मनु लाविसी कायी ? ॥१॥धृ॥
हा रे ! तूं लाघवी नाथिली गोवी घालिसी मायावी कुटिळ तुझा
गावीं कवणें साच्च मानावीं ? क्रिया ते सांडूनि घावी.हारे ! तूं लाघवी! ॥छ॥

तुजवीण आह्मीं कवण ? सत्येंसीं दुसरें भान.
दिगंबरा ! कळली खूण. न भूले आतां मन. ॥ २ ॥

(१३२८)

क्षितितळअवलोकनी स्वजन स्मरले;
भक्तअनुग्रह निमित्य व्याहारिके आले !
गुणगणसंगु सोडुंनी देव रथीं बैसले,
परिवारु हाकारिती भक्तगण मीनले. ॥ १ ॥ ध्रु ॥
आनंदे जीउ रे ! शिवात्मपदीं जीउ रे ! निर्वाणपदीं जीउ रे !
स्वरूपसिद्धीं जीउ रे ! सदानंदी जीउ रे ! आनंदे जीउ रे ! ॥ छ ॥
नीज बोध काठी करकरीं विवेकु घ्येला
त्रीपुटी हाणतां स्ववृत्ती भारु संच आला.
व्यतिरेक सदन्वयो दोहीं पार्थी ज्ञाला
वीतराग चमत्कारिती तयां मानु दीधला ॥ २ ॥
चाऱ्ही योग इभ स्वयंभ ते घालूंनि पूढा
लयलक्षादिकें काइसीं त्यांच्या करूंनि दवडा
संप्रदाये भार च्रालती मती पडला वेढा
निःशब्द निसाण लागलें शंख भेरी दंडा ॥ ३ ॥
सामगायनें गर्जती भाट वैदीक ज्ञन
सत्य येक छत्र साजिरें स्वामीचें चिन्ह
शास्त्रें विद्युद्वर्णें झळकती तत्ववाद स्यंदन
योगी योद्धे रण जिंकले पापदुताशन ॥ ४ ॥
देवावरि वोवाळिती येक आपुलें मन
तीर्थ दान व्रत तपस येक धारणा ध्यान
तेथ सुभक्ती वारिलें आपुलें मीपण
मंगळ बोलती सेवक ते साधु सज्जन. ॥ ५ ॥
चंद्र सूर्य दोन्ही सारिले ते तामस प्रभा
सहज प्रकाशु साजिरा चेतनेच्या गाभा
मायामय दूरि करूंनि केला अभाऊ उभा
तो तवं स्वामीसि नावडे म्हणे येतील क्षोभा ॥ ६ ॥

व्याहारिका संपादुनी दैव आलें स्वस्थाना
समस्ता देउनि बहुडा सांडिली कल्पना
नीजपदीं ज्ञाले निद्रित प्रासूंनि चेतना
दिगंबरगुणी गुंपले ते करिती ध्याना ॥ ७ ॥

(१३२९)

॥ हुसैनी. ॥

गुणश्रवणीं गुंपली, गुणी स्थानी मन न राहे, स्थानी मनन न्हाए !
समाधीचें सुख सांडुनि, मनस आठवि तुझे पाए. ॥ १ ॥ धृ ॥
ज्ञाइन वो ! ज्ञाइन वो ! अवधूतीं मन गुंपलें ! मीं सर्वे ज्ञाइन वो ! ॥छ॥
योगसमईं तुझां ठाईं गुंपलें माझें मन;
तेथूनि परति नेघे. दिगंबरा लागलें अखंड ध्यान. ॥ २ ॥

(१३३०)

पंथु पाहाता आगळी वेथा; येतां ने दखे माये, एतां ने दखे माए
येणें अवधूतें हरलें मनस ! वियोग न साहे ! ॥ १ ॥धृ ॥
ज्ञाइन वो ! ज्ञाइन वो ! अवधूताचेनि संगें येकली ज्ञाइन वो ! ॥छ॥
मोकळें चि मन गुंपलें गोरिये ! भेदु न साहे भेदु न साहे
दिगंबरें विण नावडे दुसरें ! पाहिन पाए ! ॥ २ ॥

(१३३१)

दृष्टिचें देखणें मोडलें; येणें केलें थोर विंदाण; केलें थोर विंदाण.
मन पारुषलें; शरीर न कळे; वितुळलें मीपण. ॥ १ ॥ धृ ॥
राहिलीयें राहिलीयें गगनीं; गगन तेवि निजस्थिती राहिलीयें. ॥ छ ॥
प्रापंचिक भान अभान आतलें गेलें दृश्य विरोन गेलें दृश्य विरोन
दिगंबरें येणें द्वैत हारपलें; बुडालें चेतन ! ॥ २ ॥

(१३३२)

आणपणें विण जाणिव वाईये ! नेणीव नेणिवे खाये, नेणीव नेणिवे खाये.
येकलें मीपण मरतां, सकळ भान चि विलया ज्ञाये ! ॥ १ ॥ धृ ॥
काये मीं करूं ? काये मीं करूं ?
येणें अवधूतें भरलें अंतर; न कळे पारु. ॥ छ ॥
अभावाची खुण मोडली; स्वभाव ठेले भावविहीन, ठेले भावविहीन.

दिगंबराचें न कळे करणें. बुडालें चैतन्य ! ॥ २ ॥

(१३३३)

बोलतां लौकीकु वोखटा गोरिये ! बोलों काये ? बोलों मीं काये ?
अवधूतें वीण क्षणु न राहवे ! न चलती उपाये ! ॥ १ ॥ धृ ॥
वेञ्चलियें, वेञ्चलियें, अवधूतगुणीं गुंपली स्वरूपें वेञ्चलियें ! ॥ छ ॥
आपपर जन पाहोंनि ज़ाणवे पारिखेपण पारिखेपण.
दिगंबरें काये केलें ? नेणवें ! पारुषलें मन ! ॥ २ ॥

(१३३४)

कायसी कवण कराल ? वो ! मज़ न साहावती बोल ! न साहावती बोल !
अवधूतगुणी गुंपलें मनस न सूटे केवळ ! ॥ १ ॥ धृ ॥
रातलियें ! रातलियें ! अवधूतगुणें गुणी येकपणें रातलियें ! ॥ छ ॥
आपपर मज़ पारिखें बाइये सकळ भान, सकळ भान. ॥ छ ॥
दिगंबरें येणें हरिलें मनस; लागलें ध्यान ! ॥ २ ॥

(१३३५)

ये ! रे ! श्रीदत्ता ! दयावंता ! भक्तां तुं विश्रामु, भक्तां तुं विश्रामु,
सुरनरगण तुज़ चि ध्याती; भक्तां परम कामु. ॥ १ ॥ धृ ॥
पाहिन पाये; पाहीन पाये; भेटि देयीं;
माझें मन उताविळ; पाहिन पाये. ॥ छ ॥
आनंदकंदा ! भक्तवरदा ! सदा तुझें ध्यान, सदा तुझें ध्यान.
दिगंबरा ! तुज़वांचूंनी न करीं आणीक चिंतन. ॥ २ ॥

(१३३६)

मन लांचावलें; परति न धरी; रती खरती खाये, रती खरती खाये.
अवधूतें विण आणीक नावडे; करणें काये ? ॥ १ ॥ धृ ॥
पारुषलें, पारुषलें, अवधूतें येणें माझें हें मीपण पारुषलें. ॥ छ ॥
बुद्धीचें बोधन कुंठलें; वो ! येणें नेलें बोधनसार नेलें बोधनसार.
दिगंबरें भेटि ज़ाहाली; बाइये ! बुडालें अंतर. ॥ २ ॥

(१३३७)

॥ हुसैनी ॥

गुणश्रवणें भूलि ज़ाली; मानसें पांगुळलीं;

तुझें रूप लक्षिता, माझी बुद्धि हारपली. ॥ १ ॥ धृ ॥
न कळे काहीं मज्ञ न कळे काहीं;
न कळे काहीं तुज़विण श्रीयोगिराया ! ॥ छ ॥
बैसलें रूप मनीं; मन गुंपलें तव गुणीं;
दिगंबरा ! अवधारिज्ञो ! न परते तेथूंनि. ॥ २ ॥

(१३३८)

तुझें पाहातां रूप डोळां, नणे, जीउ हा काये ज़ाला ?
आइके श्रीदत्ता ! त्रिविध भेदु बुडाला. ॥ १ ॥ धृ ॥
मज़ मीं नाहीं, मातें मीं नाहीं,
तुझेनि मीं नाहीं जय जय देवाधिदेवा ! ॥ छ ॥
गुण करितां प्रलपन, गुणीं सूटलें नीजमन.
दिगंबरा ! देखतीसें लागलें तदंगध्यान. ॥ २ ॥

(१३३९)

तुझें सेवितां मुख, शेष ज़ाहाली परवश.
गुंपलें श्रीदत्ता ! तुझां ठायीं मनस. ॥ १ ॥ धृ ॥
ज़ाणिज़े कायी ? बोलिज़े कायी ?
भाजिज़े कायी ? तुज़विण असिज़े काई ? ॥ छ ॥
तुझा करितां भक्तिवादु, जिवें सांडिला गुणभेदु.
दिगंबरा ! परियेसीं, हा ही राहिला शब्दु. ॥ २ ॥

(१३४०)

कर्म निष्कर्म ज़ालें; बोलतां मौन ठेलें.
आइकें अवधूता ! तुझें स्मरण केलें. ॥ १ ॥ धृ ॥
काये मीं करूं ? कैसें मीं करूं ?
नुमज़े विचारु; देवा ! कोंत्र सावरूं ? ॥ छ ॥
संगेंचि संगु हाला, प्रपंचु काये के ज़ाला ?
दिगंबरा ! तुज़सी येकांतु घडला. ॥ २ ॥

(१३४१)

येइन तुज़सवें; मज़ वेगळें न सवे.
अवधुता ! भेटि देई ! मीं जाइन जीवें. ॥ १ ॥ धृ ॥

वियोगें मन वो ! वियोगें मन वो !
व्याकुळ होतसे चित्त, चेतन वो ! ॥ छ ॥
तुजवांचूंनि आन नेणें; योगधनें तूं सत्य जाणें.
दिगंबरा ! अवधारीं, तुझे चरण मीं जाणें. ॥ २ ॥

(१३४२)

मज देखतां वय गेलें; क्षिण करणगण जाले;
मरण वरि आलें दत्ता ! तुझे पाए अंतरलें. ॥ १ ॥
कमळनयना ! काळाग्निशमना ! दत्ता ! पाव सगूणा !
भवदुःख निर्दाळना ! ॥ छ ॥
दश दिशा मीं पाहें; तुझी न कळे सोये;
दिगंबरा ! न येसी. आतां तरि करणें काये ? ॥ २ ॥

(१३४३)

तुजकारणें योगसेवा, जप, तपसु, देवदेवा !
परब्रह्म सगुण तूं मज कां मोहिसी मावा ? ॥ १ ॥ धृ ॥
तुझा संगु लाहिन; तुझे पाये पाहीन;
माझें वेधलें मनस, तुजसवें येइन. ॥ छं ॥
वेद श्रमले त्यान्हीं; तुझी नेणवे थोरी
दिगंबरा ! ब्रह्म तूं तुझे मीं पाउलें धरीं. ॥ २ ॥

(१३४४)

जन, वीजन, योगिराया ! धन स्वजन, सर्व माया !
भवस्वप्न आभासु वायां. गुणीं बाधक कर्म क्रीया. ॥ १ ॥ धृ ॥
येणें विश्व बुडालें; सुख सर्व हीं गेलें;
उपदेशु न चलें; ऐसें तुवां कासया केलें ? ॥ छ ॥
अहंममता जन्मवरी जना लागली भ्रमुकरी;
मनोवासना ते चि वैरी; दिगंबरा ! अवधारीं ! ॥ २ ॥

(१३४५)

जिणें जाहालें भारु, मायें ! गुणसंगु हा बाधिताहे;
कुडे कर्म निपजे. कैसें वो ! मरण न ये ? ॥ १ ॥ धृ ॥
काये करूं ? कैसें मीं करूं ?

क्रिया करिजे ते चि वैरी ! दया नूपजे क्षणुभरी !
दिगंबरा आठवेना, ऐसी मीं पडली दूरी. ॥ २ ॥

(१३४६)

वयसारता वाहातिसे; दिनें दिनु हा जातु असे;
अवधुता ! काये करूं ? माझें काहीं हीत न दीसे ! ॥ १ ॥ धृ ॥
मज पूर्व आठवे, तें पद आठवे;
कमळनयना ! तुझा तो संगु आठवे ! ॥ छ ॥
मन साधनें स्थीर नोहे ! जनसंगु हा बाधिताहे !
दिगंबरा ! हृदयीं तुझे मीं आठवी पाये ! ॥ २ ॥

(१३४७)

मि वो ! ज़ातिसें भवपुरें, मज़ पेलितें कर्म वारें.
अवधूतु न दीसे, आतां मीं केंसेनि तरें ? ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! कास देयीं ! अवधूता ! कास देयीं !
निदान वरि आलें ! अतःपर पाहासी कायी ? ॥ छ ॥
स्वजन, जन, वन धन, धनद, गुणगण,
दिगंबरा ! दूरि करीं ! शरीरीं ज़डलें वोसाण. ॥ २ ॥

(१३४८)

तुज़ पाहातां श्रमलियें; पुरें पाटणें पावलियें;
येरधारा करितां, असुखा पात्र ज़ालियें ! ॥ १ ॥ धृ ॥
होतासि कोठें ? आलासि कोठें ?
धरीन हृदयीं; आतां तूं ज़ासील कोठें ? ॥ छ ॥
योग लंघिले गिरिवर; चलें अचल श्रमकर;
दिगंबरा ! लपणीचें तुझें तें न कळे घर. ॥ २ ॥

(१३४९)

देहधारणीं सूख कायी ? श्रमु सांगतां पारु नाहीं !
आत्मयां ! अवधूता ! भला धरिलासि ये देहीं ! ॥ १ ॥ धृ ॥
धरीन पायीं; घालीन हृदयीं ;
अवधूता ! कें ज़ासी ? तुझा विश्वासु मज़ नाहीं ! ॥ छ ॥
ग्यां पाहिलीं योगतंत्रें; क्रिया तेवी चि सर्व जाणें.

दिगंबरा ! तुज़लागी तपस, मंत्र साधनें ! ॥ २ ॥

(१३५०)

नित्य पाहातां दश दिशा, जीउ ज़ाहाला माये ! पीसा !
अवधूतु न दिसे ! आतां हा ज़ाणिज़े कैसा ? ॥ १ ॥ धृ ॥
मीपणसारा मानसें वारा !
अवधूतु सखिये ! यायाच्ना कळला थारा ! ॥ छ ॥
दृष्टी न दिसे; पाहातिये. असे तिये चि आड माये !
आत्मा अवधूतू. आतां मीं सांडीन तीये ! ॥ २ ॥

(१३५१)

हा वो ! गगना आड ठायें. नाकीं देखणा तो चि आहे.
झाडीतां मीपण हें, ययाची लागली सोये. ॥ १ ॥ धृ ॥
आतां प्राणु देयीन; जीउ देईन.
अवधूतु सांपडला, आतां मीं भेटि घेईन. ॥ छ ॥
हा वो ! मीपण आड होता; रूप न दवी शोधु घेतां.
दिगंबरु सखिये ! कैसा ? कें ज़ाइल आतां ? ॥ २ ॥

(१३५२)

॥ **मोखलीस.** ॥

च़ालतां शब्दपंथें श्रमली माये ! क्रियेचें भान मातें आंगीं न साहे.
तापें त्रिविधें चित्त ज़ळोंनि ज़ाये ! ॥
विश्रांति केंसी ? तुझे देखैन पाये ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तूज़वीण न सवे मातें ! वियोगदुःख थोर बाधी जीवातें ! ॥छ॥
संसारदुःखद्रुमुविषवल्लीछाया फळतें दीसें. परि लटिकी माया.
मांजिर भ्रामक; मीं न सेवी तया. दिगंबरा ! हें पुरे ! लागैन पायां ! ॥२॥

(१३५३)

संसार व्याघ्र, वन निर्जन, माये !
सांडूनि गेला दत्तु. करूं मीं काये ?
दुःख वाटलें जीवीं; मोकलीं धाये;
दीर्घस्वरें मीं सादु घालीत आहे. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! ये ई रे ! कमळनयना ! लीलाविश्वंभरा ! कालाग्निशमना ! ॥छ॥

काम, क्रोध, हे नित्य भुजंग दोन्ही लागले; देवा ! वेधु करीतां गूणी.
गुणाची न चले येथ करणी. दिगंबरा ! तूं पात्र. पात्र निर्वाणी ! ॥ २ ॥

(१३५४)

संसारसागरीं हें मानव्यतारू जर्जर ज़ालें क्षीण; न पवे चि पारू.
बुडैल क्षणा येका ! कैसें मीं करूं ?
न दीसे येथें तुजवीण आधारू ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! येईं रे ! श्रीयोगिराया ! वरदमूर्ती ! मीं लागैन पाया ! ॥ छ ॥
कर्मक्षयें क्षीण विछिन्न ज़ालें; जराग्रस्त संधिबंधीं सूटलें.
दिगंबरा ! तुझें चिंतन केलें; न येसि, तरि सर्व वायां गेलें ! ॥ २ ॥

(१३५५)

संसारवन्हिमाजि हरणु मीं देवा ! गुंतलों ! मार्गु नेणें; घेतुसें धांवा !
आक्रंदें ! शब्दु करीं ! पावें माधवा !
दत्तात्रेया ! येइं श्रीदेवदेवा ! ॥ १ ॥ धृ ॥
नेणें श्रीगुरू ! तुमचीं सेवा ! चुकलों ! अपराधु क्षमा करावा ! ॥छ॥
श्रमले करणगण; निर्वाण ज़ालें. मौनें चि आठवीं मीं तुझीं पाउलें.
आणीकु येथें काहीं प्रेत्नु न चले. दिगंबरा ! मीं दीन वायां गेलें ! ॥२॥

(१३५६)

संसारसंभ्रमें मीं क्रीडतां देहीं, आठऊ तुझा मज घडला चि नाहीं.
अपराध केले ते मीं सांगों कायी ?
दावीतां मुख वाटे शंका हृदयीं. ॥ १ ॥ धृ ॥
धिग्य शरीर हें माझें ज्यालें ! दत्तासारिखें रत्न हातींनि गेलें ! ॥ छ ॥
सदन, धन, वन, स्वजन, जाया, सोपितां सर्व वय गेलें हें वायां.
बाधक होये ते चि घडली क्रिया. दिगंबरा ! मीं कैसें करूं ? आत्मयां! ॥२॥

(१३५७)

कामक्रोधें नित्य अंतर जळे. कासया वरि वरि लाविसी डोळे
मनस विपर्याक बाहेरि पळे.
सुषुप्ति आली, कैसें सर्वांग डोले ? ॥ १ ॥ धृ ॥
बकाची परि ज़ाली गा ! देवा !
मायीकु भक्तु कैसा करितुसे सेवा ? ॥ छ ॥

कल्पना बैसउंनि जीवाचां मूळीं स्फट्कारें बाह्य करीं, वाजवीं टाळी.
दिग्बंधु, जपु मुद्रा क्रिया ज़े केली,
दिगंबरा ! ते सर्व दुःखार्थ ज़ाली ! ॥ २ ॥

(१३९८)

माध्यान्हीं माझा घरीं पडलें खान.
फोरटें आलें माये ! कवणी कहूंन ?
ग्रंथि भेदूंनि माझें नेलें चिद्रत्न.
जीवाची जीवें केली होती ज़तन. ॥ १ ॥ धृ ॥
देगा ! देवा ! माणीक माझें; मज़ चि माजि परि मातें तुमज़े !
येथें तवं नाहीं आलें परावें दूजें;
न दीसे; आतां काये कैसें कीज़े ? ॥ छ ॥
समाधीची वो ! खूण मोडली माये ! मीपण पडलें रीतें; ज़ाहालें काये ?
योगादि संपदा ते कवणाची होये ?
दिगंबरा ! तें रत्न परीस आहे ! ॥ २ ॥

(१३९९)

संसार वीष मेघ वर्षती धारा ! लागती बाण मातें सूक्ष्म शरीरा !
कामक्रोधादि वेगु सूटला वारा !
भुललें मन माझें; नेघें विचारा ! ॥ १ ॥ धृ ॥
पाल्वें देवा ! करिका सेउ॰, पोटांतु घालीं. मज़ येतुसे भेउ॰. ॥छ॥
विद्युल्लता झळके त्रीविधु तापू; मेघांचे शब्द थोर; येतुसे कांपू !
दिगंबरा ! माझी माये तूं बापू कवणासि भारु घालूं ? करूं विलापु ? ॥२॥

(१३६०)

॥ देशी. ॥

तुं बा ! निर्गुणु निर्मळु, नीजानंदधामा !
योगमायेच्ना नियंता; आइकें शुद्धश्यामा !
अवधूता ! ब्रह्ममूर्ती ! आत्मयां ! पूर्ण कामा !
आह्मीं दिनें ये संसारीं; कैसा पावसी मा ? ॥ १ ॥ धृ ॥
आनंदा ! नित्यानंदा ! नंदविवर्धना ! रे !
थोर शब्दें आळवीन; पाव चिद्घना ! रे ! ॥ छ ॥

नाम नाहीं, रूप, वर्ण, गुण ही योगिराया !
क्रिया करूं ते आमुची केवळ भ्रमु माया !
तुज कैसें आराधिजे ? सांगइं देवराया !
दिगंबरा ! दीनबंधो ! अमितगुणवीर्या ! ॥ २ ॥

(१३६१)

तुज नित्येशा आठउं, मन चि स्थीर नाहीं !
विसरों मीं कैसी ? देवा ! तुझा वेधु देहीं !
आतां कैसें बा ! करावें ? तुमचें मज काहीं !
अवधूता ! मायेबापा ! घेउनि मज जाइं. ॥ १ ॥ ध्रु ॥
येइं रे ! ये रे ! ये रे ! दत्ता ! योगिराया !
मज दुस्तरा न तरवे तुझी शक्ति माया ! ॥ छ ॥
ज्ञाणों तरि, तूं गुणातीतु; गुणीक ज्ञान माझें.
नेणों तरि, तुं चि आत्मा; चिन्मय रूप तुझें !
जपों तरि त्या मातृका केवळ मंत्रबीजें.
दिगंबरा ! तुं निर्मळु. न साहे तूज दुजें ! ॥ २ ॥

(१३६२)

आलविन; सादु देइं. येइं रे ! दत्तराया !
मन माझें उतावीळ; लागइन पायां !
पापा तापनिवर्तक, निरसैल माया !
आत्मयां ! निजरूपा ! दूरावीसि वायां ! ॥ १ ॥ ध्रु ॥
आत्मयां ! रामा ! येइं रे ! येइं रे ! देवदेवा !
वियोगतापु भारी, न साहावे जीवा ! ॥ छ ॥
जन्मोजन्मींचा सोयेरा देवा ! तूं चि देहीं;
तुजवीण आठवावें आणीक सांग, काइं ?
दिगंबरा ! दीनपती ! हृदयीं स्थीरु राहीं.
आठवाची खूण मोडी; त्यावरि भेटि देइं ! ॥ २ ॥

(१३६३)

गुणश्रवण करितां, हें मन पाल्हेलें !
अवधूता ! तुझां रूपीं चेतन पांगुळलें !

भान मानसगोचर; नेणवे, काये ज़ालें ?
दृश्य दर्शन द्रष्टत्व मी माजि वितुळलें ! ॥ १ ॥ धृ ॥
अद्वयानंतानंदा ! सद्गुरु ! देवराया !
तुझें नाम तारक केवल, ज्ञानसूर्या !
अवधूता ! कृपानिधी ! अमितगुणवीर्या !
तुझ येकें वीण सर्व दुःखमूळ, वायां. ॥ छ ॥
तुझ करितां नमन, हें मन मालवलें !
ज्ञेय, ज्ञान, ज्ञातेपण वितुळोनि गेलें !
शुन्य अशुन्य निरसूनी स्वरूप पूर्ण ज़ालें !
दिगंबरा ! तुझें प्रेम ऐसें गुणासि आलें ! ॥ २ ॥

(१३६४)

पाहों ज़ायें तों, नयनी रूप चि भासताहे.
आइकावें तें श्रवणी शब्दें विण काये ?
मनें ध्यावें तें मानस कल्पित होये.
अवधूताचें रूप कैसें ज़ाणों ? माये ! ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ! दत्ता ! पाहों तुझी मीं कोण दीशा ?
तूं बुद्धीचें कारण; गोचरु होसि कैसा ? ॥ छ ॥
बोलों शाब्दीक बोलणें, तें मज़ आकळेना !
शास्त्रांचा विरुद्ध भावीं भाउ चि उमज़ेना !
आधि आपण ज़ाणोंनि करिन तत्वज्ञाना !
दिगंबरें सांगितलें तें आतां पालटेना ! ॥ २ ॥

(१३६५)

अवस्थांचा पाहें मुळीं, तेथें मीं चि आहें.
भानअवस्थागोचर तो प्रपंचु माये !
ययावेगळें पाहिज़ेसें स्थान चि कोण आहे ?
'देवा ! देवा !' ह्मणती जन; तो देउ कोणु ? काये ? ॥१॥ धृ ॥
राहीं रे ! राहीं ! नावेकु ! स्थीरु राहीं !
आप ज़ाणोंनि, तद्दृष्टी देवासि मग पाहीं ! ॥ छ ॥
गुणदृष्टीचें ज़ाणणें भ्रमु तो स्वप्न वायां !

गुणनिरासें निरसे प्रपंचु, भेद, माया.
अधिष्ठान तें चि सत्य, नातळे ज़ेथ क्रीया.
भेदु नाहीं दिगंबरा ! दत्ता ! योगिराया !

(१३६६)

चंचळ मन माझें, स्थीर नव्हे; मीं आतां काये करूं ?
दत्तासारिखें रूप ज़ाइल हृदयींचें; काये करूं ?
कवण कर्म माझें केवळ विपरीत ! काये करूं ?
साधनें विण मज संतोषु ज़ाणवे; काये करूं ? ॥ १ ॥ धृ ॥
दैव कवण ! मन विवेकाहिन भ्रमे; काये करूं ?
त्यागु नुपज़े मनीं; आसक्ति बहु गुणीं; काये करूं ? ॥ छ ॥
देह वेचलें; वय ज़ातसे सरसरां ! काये करूं ?
संगु पडला देहीं; नाशाकु अवघा ही; काये करूं ?
दिगंबेरेसि नित्य अंतर पडताहे; काये करूं ?
दुःख विचारितां हृदय फूटताहे; काये करूं ? ॥ २ ॥

(१३६७)

कामें व्याकुळ माझें मानस परते ना ! काये करूं ?
सर्व शरीरसूख दत्तेंवांचूनी मीं काये करूं ?
देह ज़ाइल क्षणभंगुर; मग माये ! काये करूं ?
धिग्य शरीर माझें ! प्राण निरर्थक ! काये करूं ? ॥ १ ॥ धृ ॥
भेटी नव्हे श्रीगुरुचरणीं; आतां काये करूं ?
प्राण विकळ; मन करिताहे तळमळ; काये करूं ? ॥ छ ॥
शब्द लागती; माझें हृदय शरीर कडतरे; काये करूं ?
दत्तेंवांचुनि येरू अर्थु विनश्वरु; काये करूं ?
दिगंबरें वो ! येणें हरिलें मानस; काये करूं ?
येरें योगें मज़ काज़ न दिसे ; मीं काये करूं ? ॥ २ ॥

(१३६८)

तुझी वाट पाहे डोळुले भरि; आतां कयीं येसी ? ॥
माये, बापु, देउ तूं तरि; आत्मयां ! कयीं येसी ? ॥
चित्त भ्रमित ज़ालें तुज़वाचूनि; बापा कइं येसी ? ॥

सत्य सांग, देवा ! आजि चि पासूनि कई येसी ? ॥ १ ॥ ॥ धृ ॥
भव विजन वन गेलासि सांडून; कई येसी ?
दुःख भारि मज़ होताहे; श्रीदत्ता ! कई येसी ? ॥ छ ॥
आशा धरिली मनें; कैसें होइल ? नेणें; कई येसी ?
काम, क्रोध वरि पडताति दूर्जन; कई येसी ?
देह ज़ाहाले क्षीण; पावले अवसान कई येसी ?
दिगंबरा ! तुझें करिताहें चिंतन; कई येसी ? ॥ २ ॥

(१३६९)

कमळनयनरूप आठवे मनी; मज़ खंति वाटे.
माहेर माझें तें वो ! दुरि पडलें; भारी खंति वाटे.
दत्ताचे गुण श्रवणी पडतां, मज़ खंति वाटे !
काळ गेले बहु; परति नदिसे; आतां खंति वाटे. ॥ १ ॥ धृ ॥
दत्ता ! तुझी मज़ भारि सलगी; मनी खंति वाटे.
किती आठउं गुण ? लागलें मज़ ध्यान; खंति वाटे. ॥ छ ॥
पाये धरिन; मीं वो ! येइन; तुझी माये ! खंति वाटे.
बाधक परजन; वियोगु न साहे मन; खंति वाटे.
दिगंबरे ! तूं माउली मज़; तुझी खंति वाटे.
येर विषयविष सेवितां, मज़ तुझी खंति वाटे. ॥ २ ॥

(१३७०)

दत्तेवांचुनि काळ चळले चंचळ चळ जन्म नाना.
वीष विषयसुख नेणणें मीं सकळैके भोग नाना.
ताप त्रिविध; मोटी लागली चटपटी भ्रमु नाना
नित्य करिन नामस्मरण; नेणें आन योग नाना. ॥ १ ॥ धृ ॥
पाये पाहिन तुझे पार्षदपाति ! पद्मलोचना ! रे !
तुंचि सहज़ सारस्वरूप नीरजनयना ! रे ! ॥ छ ॥
लोचना ! रे ! ॥ छ ॥
कर्मज क्षय क्षीण क्षणीक क्षरे, क्षणु ज़ाणवेना.
धिग्य शरीर माझें ज़ाइल कई; मज़ ज़ाणवेना.
दत्ताचे पाये माये ! पाहिन कई ? ऐसें ज़ाणवेना.

दिगंबरेंसीं घडे संगाति, तरि दुःख जाणवेना. ॥ २ ॥

(१३७१)

चंचळ चळ मन निर्फळ करी अनुस्पंद नाना.
त्रिष विषयरस सेउंनि भजे मति भेद नाना.
ज्ञान विकळ करि साधन तळमळ योग नाना.
गुरुवांचुंनि कष्ट वाउगी खटपट सांडी, मना ! ॥ १ ॥धृ ॥
नामस्मरण करि सांडुनि भरोवरि क्षणक्षणा.
जन्ममरण दुरी होइल जीवपण क्षणक्षणा. ॥ छ ॥
शास्त्रश्रवण वादवर्धन, परि रूप चोजवेना.
दिगंबरेंवीण तत्वविषयीं ज्ञान चोजवेना. ॥ २ ॥

(१३७२)

चंचळ चळ वय, जातिसें भवपुरें देवराया !
सकळ स्वजन जन विण तुज निर्जन देवराया !
गुणी गुंपले, क्षीण करणें गुणगण, देवराया !
पाव ! स्वजनु बंधु बाधकु भवसिंधु देवराया ! ॥ १ ॥ धृ ॥
श्याम सगुण रूप सुंदर अरे ! तुझें देवराया !
तुजवांचूनि आन आश न धरी मन, देवराया !
चातकु मीं; कइ वोळसी जळधरू ? देवराया !
दिगंबरा ! तुझें बाळक मीं; पाव देवराया ! ॥ २ ॥

(१३७३)

आदिरूप, शिव, नित्य, निरंजन ब्रह्म जो ! जो !
आनंदवर्धन सर्वांसि कारणस्थान जो जो !
सन्मय शुद्ध सदोदित चिद्घनसार जो! जो !
तो निजपालणा परि यें हे अनसूया जो ! जो ! जो ! जो ! ॥ १ ॥ धृ ॥
जो ! जो ! जो ! जो ! जो ! जो ! जो ! निर्गुणब्रह्म जो ! जो !
तो तुं रे ! अवधूता ! निज, निज, जो ! जो ! जो ! जो ! ॥ छ ॥
नित्य, निर्मळ, कार्यकारणविरहिततत्व जो ! जो !
अत्रिवरदरूप जेथूंनि चिद्रूप तें चि जो ! जो !
योगी श्रमती, जेथें मानस न धरवे, आश्रयो, जो ! जो !

तो चि दिगंबरु अनसूयाकुमरु नीजवी जो ! ॥२॥

(१३७४)

सेरखदिरसर्पसंगति घडलीसे चंदना ! रे !
पासीं लसनराशि; कैं गुणें उरसी ? चंदना ! रे !
हृदय कठिण करीं; परगुण न धरीं चंदना ! रे !
गुणा भुलसी तरि, पडसील बोहेरि चंदना ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! रे ! रे ! रे ! रे ! रे ! परिस तुं सज्जना ! रे !
खळसंगु असतां साधुत्व काय उरे ? सज्जना ! रे ! ॥ छ ॥
शिला, पानीय, वरि घसणी पडतीसे चदना ! रे !
करवत, कुठार, तुज चि लागी पैल चंदना ! रे !
घालुंनि दहनावरि पाहों पाहाती थोरी चंदना ! रे !
दिगंबरावांचूंन न धरीं आन साधु चंदना ! रे !

(१३७५)

मुखारी.

आतां होतें पाहातां नाहीं; भक्तपण तें ज़ालें काई ?
दे गां ! देवा ! माझें मज़; ठेविन हृदयीं. ॥ १ ॥ धृ ॥
संतु ऐसा कैसा ? ऐसा कैसा ? परवित्तीं तुतें आशा.
हृदय भेदिलें तुवां, ठाकिलें मनसा. ॥ छ ॥
दिगंबरु ह्मणे:: — भलें! तुझें आलें, माझें गेलें !
पालटु ज़ाहाला आतां पुडती न बोले. ॥ २ ॥

(१३७६)

देवपणीं प्रेम नाहीं, गोड नलगे तें ये देहीं.
माझें मज़ दे भक्तपण; चाळविसी कायी ? ॥ १ ॥ धृ ॥
संगु न साहावे, न साहावे; न दिसे जीवासी बरवें.
अवधूता ! तूं समर्थु; कवणे बोलावें ? ॥ छ ॥
दिगंबरू बोले वचन::— आधीं दे तें देवपण;
पाहातां दोघांचें गेलें सांडि प्रलपण. ॥ २ ॥

(१३७७)

आतां होतें; काये पां ज़ालें ? भान हें कवणें नेलें ?

कैसें करूं देवार्चन ? देखणें मोडलें ! ॥ १ ॥ धृ ॥
शब्दु न ये वदतां, न ये वदतां; नूमज़े भेदु या चित्ता !
विहित लोपलें; मज़ लागली अवस्था. ॥ छ ॥
दिगंबरु ह्मणे::— राहे ! ज़ें ज़ेथें तेथें चि आहे.
पाहातां गाहालें; आतां विसरोनी पाहे. ॥ २ ॥

(१३७८)

नित्य करितां देवार्चन, तेथें होतें कर्तेपण;
नेणवे, ज़ाहालें कायी ? न दिसे मीपण. ॥ १ ॥ धृ ॥
धिग्य अरे ! दैवा ! अरे ! दैवा ! न चले देवाची सेवा;
उघडूनि काये करूं ? झाकिन तें मावा. ॥ छ ॥
दिगंबरु ह्मणे::— कायी वेच्रलें तें माझां ठायीं ?
ह्मणें आतां प्रलपसी, उगला ची राहीं. ॥ २ ॥

(१३७९)

नित्य करितां संकीर्तन, येथें होतें दुज़ेपण;
ह्रदयीं प्रेमासि मूळ हारपलें धन. ॥ १ ॥ धृ ॥
धिग्य, अरे ! मनसा ! अरे ! मनसा ! भक्तिभाउ॰ आला कळसा;
क्षयो लागला जीवासीं दिवसें दिवसा ! ॥ छ ॥
दिगंबरु ह्मणे::— राहीं; कैसें होतें तुझां ठायीं ?
वायां वीण बोलतासी; उमज़ोंनि पाहीं ! ॥ २ ॥

(१३८०)

सत्य बोलतां शंका नाहीं, अह्मीं पूर्वी होतों काई ?
भेदिलें कवणें ? पुढें पडले संदेहीं. ॥ १ ॥ धृ ॥
सांग सत्य, देवा ! सत्य,देवा ! वचन न बोले मावा;
अपराधी करूनि ऐसा मग तो दंडावा. ॥ छ ॥
तापत्रय भोगी वेथा, तुज़वीण कवणु आतां ?
दिगंबरा ! चूकि ज़ाली; न वदें सर्वथा. ॥ २ ॥

(१३८१)

आत्मा तूं सर्वी भूतीं, तरि तुझ्या या प्रकृती;
गुणकरणनियंता कवणु पूडती ? ॥ १ ॥ धृ ॥

सांग, आह्मीं येथें काये केलें ? दंडितासि बोलें बोलें !
सत्य हें सांडिलें तुवां; कवणाचेनि चाले ? ॥ छ ॥
कर्म केलें तो कवणु ? कां देसी वायां सीणू ?
दिगंबरा ! तुझां ठायीं न दिसे गुणू ! ॥ २ ॥

(१३८२)

कवणाकारणें माया आणिली अविद्या आया ?
बद्ध केला तो कवणु ? लाविली हे क्रीया. ॥ १ ॥ ध्रु ॥
सांग सत्य वाणी, सत्य वाणी; आह्मीं होतों कवणे स्थानीं ?
तुवां तुलें विमोहिलें; गुंतलासी गुणी. ॥ छ ॥
ऐसें कर्म घडलें कुडें; आतां तें कैसें मोडे ?
दिगंबरा ! सिरकलासी; ज़ाणपां नीवाडें. ॥ २ ॥

(१३८३)

कोसले न घर केलें तेथें कवण गुंपलें ?
विचारूनि सांग; देवा ! मज़ हें न कळे ! ॥ १ ॥ ध्रु ॥
वर्म बोलों कैसें ? बोलों कैसें ? विलया ज़ायील हांसें !
तूं देऊ, आह्मी भक्त, घडलें अयीसें. ॥ छ ॥
आतां दुःखाचें न करीं ! होतें, तैसें आह्मा करीं !
दिगंबरा ! हें गाऱ्हाणें न संगों बाहेरी ! ॥ २ ॥

१३८४

तुवां दिधलें भक्तपण; तयाची करीतां ज़तन,
कोठें ठेवावें ? न कळे; न दिसे स्वस्थान. ॥ १ ॥ ध्रु ॥
सर्व तूज़वीण उरलें नाहीं. पाहातां, मीपण तें ही
सुटोनी ज़ातसे. देवा ! आपुलें, तें घेइं ! ॥ छ ॥
देवपण तुझें देवा ! पाहावें, वाटे हें जीवा.
आहे किंवा नाहीं ? सांग; न दवी जो भावा. ॥ २ ॥
देवभक्तपण देवा ! ठेविला होता जो ठेवा,
दिगंबरा ! काये ज़ाला ? हारविला तुवां. ॥ ३ ॥

(१३८५)

भवतापें मीं तापलीं; दत्ता ! करीं का रे ! साउली !

तुझा वोसिंगां रीघैन; माये ! तूं माउली !
वापु तूं माउली ! सुखद साउली ! ॥ १ ॥ धृ ॥
संगु न सोडवे, न सोडवे; तुज़ वेगळें न सवे.
खरतरू भवतापु; ज़ायीन मीं जीवें !
शरीरस्वभावें सुखद नेणवे. ॥ छ ॥
तापत्रयाची तपणी वियोगु लागला त्र्न्ही;
दिगंबरा ! तूज़वीण नव्हती कवणी ! ॥ २ ॥

(१३८६)

भवदुःख वाहे सरिता लाटलीयें मीं अवधूता !
केवळ ज़ातीसे पुरें कामनेकरितां. ॥ १ ॥ धृ ॥
शब्द न करवे, न करवे; विश्रमु घेतला जीवें.
आपपर भूलि ज़ाली; कव्हणी न पवे. ॥ छ ॥
अवधूता ! दत्ता ! येइं ! धरीन कास, देयीं;
आणिक उपाये देवा ! न करीं मीं कांहीं. ॥ २ ॥
आणिकांचे हात पडली; मातें ते न साहाती.
दिगंबरा ! तूं जनकु; बोलणें तें कित्ती ? ॥ ३ ॥

(१३८७)

कवण स्वजन, जाया ? कवणाची धरूंनि माया,
कवणू मीं येथें आहें ? राहिलों कासया ? ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें मज़ उमज़तां उमज़तां, कारण न दीसे दत्ता !
सोयेरा तूं, देवदेवा ! कळलें तत्वता. ॥ छ ॥
धन, धनद, सामग्री माझी तूं देवा ! जरी,
दिगंबरा ! सत्य मज़ गति के दूसरी ? ॥ २ ॥

(१३८८)

योगिराया ! अत्रिवरदा ! अवधूता ! पूर्णबोधा !
भक्तजनचिंतामणी ! स्मरें मीं सर्वदा. ॥ १ ॥ धृ ॥
धिग्य न पवसी ! न पवसी ! दुःख न स्माये आकाशीं;
आदिगुरो ! देवदेवा ! संदु हा मानसीं ! ॥ छ ॥
अरे ! कालाग्निशमना ! दत्तमूर्ती ! नीरंजना !

दिगंबरा ! ज्ञानसिंधू ! स्वजनजीवना !

(१३८९)

भक्तजनसूरतरू, ज्ञानविज्ञानसागरू,
पावला श्रीसिद्धराजू आत्मा ईश्वरू,
परमात्मा ईश्वरू, दत्तु आदीगुरू. ॥ १ ॥ धृ ॥
संगु न सोडवे, न सोडवे; ज्ञायीन मीं सर्वें सर्वें.
कृष्णश्यामोंत सोडूनी, वेगळें न सवे ! ॥ छ ॥
अरे ! अरे ! मंत्रसारा ! अरे ! लीला विश्वंभरा !
मायावंता ! मायामुक्ता ! त्राहि, दीगंबरा ! ॥ २ ॥

(१३९०)

सर सर सर वाहे सरिता; गेलें पानीय न ये धरितां !
वय ज्ञातसे हें अवधूता ! क्षणक्षणक्षणें आली क्षिणता ! ॥ १ ॥ धृ ॥
हां ! मनसा ! अरे ! मनसा ! कां भ्रमसी दाहा दीशा ?
भवस्वप्न हें मायिक; न धरीं दुराशा ! ॥ छ ॥
वन, सदन, धन, जन, जाया, प्रपंचु लटिकी माया.
व्यर्थ तळमळ कारितासि काह्या ? दीगंबरेंवीण सकळ ही वायां ! ॥ २ ॥

(१३९१)

गुणगण मती न ये गणिता; पारुपर मी तु न ये ह्मणतां;
तुझें देवपण तें अवगमितां, भक्ति कैसी मीं करूं ? अवधूता ! ॥ १ ॥ धृ ॥
हां ! देवा ! अरे ! देवा ! पडसील कैसेनि ठावा ?
रूप तुझें निर्धारीतां उरि नाहीं जीवा ! ॥ छ ॥
चंचळ, चळ, भ्रमित, विकारी मन राखों कवणिये परी ?
दिगंबरा ! मज्ञ मायापुरीं ज्ञाली दुर्लभ भजनाची परी ! ॥ २ ॥

(१३९२)

मी धाली चरणगुणस्मरणें; नीवाली विमळामृतश्रवणें;
दत्तेंवीण पर काहीं न मने; रूप ज्ञाणोनि तेथें चि निमणें. ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ! दत्ता ! येईं; तुज्ञविण मज्ञ दुसरें नाहीं.
पाहीन मीं रूप हृदयीं; सवें येइन, स्थाना नेईं. ॥ छ ॥
गुणश्रवणें विमळ ज्ञालें मनस; दत्ता ! तुझेनि विषयसुख विरस.

दिगंबरा ! सकळ मायातमस हरीं माझें. चरणीं धरीं शिरस.

(१३९३)

दुडु दुडु दुडु पासीं जनका ज्ञातां, मज्ञ कायीसी शंका ?
आंगलगपणें वसवीन अंका ! मुख लावीन त्याचिये मूखा. ॥ १ ॥धृ॥
श्रीकृष्णा ! कमळनयना ! तुझी आवडी भरली मना.
बापा ! रे ! पर्यंकशया ! तेथें येउंनि लागेना चरणा. ॥ छ ॥
गुडु गुडु गुडु हासैन माये ! तेणें वदवीली वदों काये ?
दोन्ही नयन पसरोंनि पाहे. प्रीय वचन मज्ञ भासताहे. ॥ २ ॥
ढळ ढळ ढळ नयन द्रवती. भवदुःख आठवलें चित्तीं.
दिगंबरें आलंगिलें पुढती. श्रमु हरला; ज्ञाहाली उपशांति. ॥ ३ ॥

(१३९४)

॥ धवळ धानाश्री. ॥ हळदि. ॥

नमूंनि सर्वेश्वरा गुरुमूर्ती उदारा लीलाविश्वंभरा दत्तात्रेया,
हळदीची रचना पावनकर्ती जना विवेकसंभावना संपादीन.
प्रकृतिपुरुषें दोन्हीं बोवलां स्वस्थानीं चिन्मात्री निर्गुणीं बैसवीलीं.
तेथें आलिया वऱ्हाडिणी हरिद्रा घेउंनी; कुंकुमें मर्दूनी योगु केला. ॥१॥धृ॥
धवळ मंगळ गाणें उदीत येणें क्षणें शिव येणें शोभनें श्रोतयासी.
नित्यशा कल्याण वक्तयांलागुन; येणें योगें जन पावन हो कां. ॥छ॥
बाळा, प्रोढा, मुग्धा वृद्धा, अतिवृद्धा वरानना प्रसिद्धा नानासिद्धी.
वराहुनी धाकुली सहज्ञा ते करवली स्ववृत्ति बोलिली काये तेथें ?
भोजना उसीरु ज्ञाला; नवरा भुकेला विलंबु कां लागला उठणयासी ?
मग वरानना सकळैका ज्ञालिया अभिमुखा;
पुढें जगदंबिका उभी केली. ॥ २ ॥
हलदि देउनि हातीं, वरानना बोलती उटणे या चिन्मूर्ती करीं माये !
हा डोळ्यांचा डोळा, जिवाच्या जीवाळा, परब्रह्मपूतळा उटीं वेगीं.
योगियांचें धन, गुणाचें कारण, आनंदाचें स्थान रूप याचें.
चिद्गुण धनराशी सेविपां ययासीं; सकळ अंश अंशा हा चि येकू. ॥३॥
सुरगणमोक्षकरें लक्षणें पवित्रें; जे चरणीं आदरें तो उटीं आधीं.
जे चरणीं चिद्गंगा, पवित्र करी योगा; तो चरणु तूं वेगां उटीं माये !

करकमळें सुकुमारें, भक्तिमुक्तीकरें; उटीपां आदरें विमळामती !
अनुपम्य शरीर ब्रह्म निराकार, परमानंदसार उटीं माये ! ॥ ४ ॥
सरिसावे ते बाळा उन्मनी वेल्हाळा, गुणसाम्यचित्कळा उटणें करीं.
हळदि घेउंनि करीं उटिताहे नोवरी; ज़ाणती ते परी माहानुभाव.
विविक्तात्मज्ञानें हरिद्रामर्दन मलिया तेथ गुण पडते ज़ाले.
फिटलें दृश्य आधीं, दर्शन तत्संबंधीं; द्रष्टत्वाची बुद्धी गळोनि गेली.॥५॥
ज्ञाता, ज्ञेय, ज्ञान, सकार्य कारण, गुणाचें स्फुरण तें दूरि ज़ालें.
स्ववृत्तीचा मळु समाधीचा केवळु फिटला तो सकळु सहज़त्वेंसीं.
उटणें ऐसें ज़ालें; निजरूप निवळलें. बोलतां, तें बोलें न ये बोला.
वधूचिया बोलतीः:—देवा! मंगळमूर्ती! हळदि घेऊंनि हातीं, उटा वधू.॥६॥
सन्मयी साभास चिद्रत्नमांदुस ज्ञानकळा ईश! उटा वेगीं !
आनंदाची खाणी, निष्ठेची लावणी, योगांची वोवणी सूत्र जें कीं.
खेळु खेळे कोडें अनंतें ब्रह्मांडें ब्रह्मादीकां वेडें ज़ाणतां जें.
योगीं भय घेलें; देखोनी परतले; ते ही इया केले समाधिस्थ. ॥ ७ ॥
हे तुमची अंगना; उटा जी! चिद्घना! अतिकाळू भोजना होतु आहे.
इतुलेनि अवसरें तेणें सर्वेश्वरें उटणें सत्यादरें आरंभीलें.
हरिद्रेचा वर्णू सुवर्णवर्णगूणू; मंत्रार्थ संपूर्णू तो चि कायें ?
विविक्तात्मज्ञानें आदरिलें उटणें;
मलिया तेणें क्षणें पतिता होती. ॥ ८ ॥
अवस्थांचें भान ज़ाहालें स्फेटण; स्फुरण आणि ज्ञान सारिखेंची.
देहचतुष्टय कारण आणि कार्य गुणकृत तें हेय पडतें ज़ालें.
अभिमानी आणि गुण, शून्याचें शून्यपण, पावले पतन पूर्णत्वेंसीं.
उरलें निर्मळपण सन्मात्र चिद्घन; ऐसें उद्वर्तन संपादलें. ॥ ९ ॥
वेद च्यान्ही पुरुषन्हाणे वारे कळस, प्रतीतीची भाष शोभवीती.
कर्मभक्तिज्ञानें सुतिले ते त्रिगुणें; प्रत्यया जीवनें न्हालीं दोघें.
विहित सर्व ज़ालें; अंतरीं ताठ केलें; स्वसूख वोगरिलें गुरुकृपा.
सद्रुपु तो ते सत्ता चिन्मयु तो ते चित्ता
दोघां येकात्मता स्वस्वानंदीं. ॥ १० ॥
ऐसें हें उटणें विविक्तात्मज्ञानें त्या दोघां कारणें पूर्ण ज़ालें.

तिन्नेनि शुद्धपणें आधीं त्या उटणें; गुणातीतु करणें ऐसें आहे.
त्याचें निर्मळपण पावे ईलागूंन ह्मणौन हे मागूंन उटिली काये ?
ना कीं विविक्तज्ञानें प्रकृतानिरसनें पुरुषु तो जाणणें ब्रह्म सत्य. ॥११॥
तदृष्टी पाहातां नाहीं तीतें भिन्नता; पुरुषीं नीमग्नता सिद्ध तीतें.
त्याचेनि निर्गुणपणें निर्गुण तें मानणें; यालागि उटणें पाठीं तीये.
ना ! शुद्धात्मज्ञत्वें ते तदभेदत्वें अवघेनि सगुणत्वे ब्रह्म भासे.
ऐसें बोलों किसी ? अनुभवी जाणती, दिगंबरीं स्वस्थिती जयां जाली. ॥१२॥

(१३९९)

नामनिर्देशु.

संप्रदायाकारें बोवलें साजिरें; बैसलीं वधुवरें उटणयांसी.
मिनलिया वराननां घेववीती अभिधाना; करवीती वंदना परस्परा.
बोलती सकळा वधुप्रती बाळा, प्रमूख वेल्हाळातें बैसउंनीः:—
घेईं वो ! अभिधान; वंदीं याचे चरण स्वधर्मसाधन करीं माये! ॥१॥ध्रु॥
हा नामनिर्देशू छेदी द्वैतपाशू; श्रोतयां स्वरसू पूर्ण करी !
वक्तयांचें पाप भवबंधनस्वरूप, तें पैं आपेआप दूरि होये. ॥ छ ॥
ऐसी संप्रेरिली; वधू बोलविली. परि ते काहीं केली नाम ने घे.
विचारी मानसीं::— याचिया नामासी जे घेती तयांसी परति नाहीं !
नेणों, काये होये जीवा ! संसारू अघवा माळवे; वरि दैवा तूटि पडे.
नारदु जाला वेडा; जडभर्तु उघडा; नामाचा येवढा गुणु आहे. ॥ २ ॥
शुकासि जालें काये ? ह्मणौनि घेतां नये. संसाराची सोये मीं वीसरैन.
याचें नाम गाती, आणि गातां आइकती, संसाराची माती तयां होये.
आठवलें पुरें ! मग आंग आंगीं संचरे; प्रेम ! कीं तें वारें नृसिंहाचें !
लोलती रंगणीं; नयना ये वो ! पाणी ! लज्जेतें सांडूंनी, पुरुषु नाचे. ॥३॥
पुडती सोवासिणी बोलती वचनीं::— घेपां वोटप करूनी नाम याचें
ते मानी अंतरीं. आतां नाहीं उरी; न सरें मीं संसारीं होइल ऐसें.
विचारी मानसें, तव त्या नाम नसे. मेलेनि मनसें उच्चारावें.
वाचा चौघी जणी परतलिया देखोनी मनातें घेउनी समागमें. ॥४॥
बोलतां कुवाडें सहसा न संपडे. वेद जाले वेडे नाम घेतां.
योगियांतें मौन मनीं पडे विस्मरण, नामनिर्धारण करितां याचें

सरलिया मातृका अवस्था सकळैका. नाम घेतां शंका उपजली.
जयासी नाम नाहीं; कुळ तयाचें कायी ? समस्तां ही देहीं संगु याचा ॥५॥
बोलतां शंका माने. कुळा आलें उणें. नामें रूपें येणें मीं सूटलीयें
वायां गेले गुण, रूप वो ! लावण्य. याचें संनिधान ऐसें जालें !
समस्तीं बोलिलें::—मौन कां वो ! घ्येलें ? झडकरूनी बोलें नाम घेइं.
येरि पाहे चित्तीं नामाची अभिव्यक्ती,
तवं, अनंतें याप्रती दिसतीं जालीं ! ॥ ६ ॥
बहुतें नामें रूपें भर्ता केवि जल्पे ? गुंपली संकल्पें ते आपलेनी.
मग वीचारी मनी, आत्मा हा मीपणी; मीपण तें अभिधानी व्यक्तयातें.
करूनी निर्धारू मग करी उच्चारू, योगी, ज्ञानी, गुरू करूंनि साक्षी.
अहो ! मी मज्ञ मातें, न मने हें तुमतें, तुंमीपण जेथें लीन होयें.॥७॥
केला नमस्कारू; जनु हांसे चतूरू; नव्हे ह्मणे तो पामरू नोकियेला.
मग बोलती वराननाः:—वरु तो प्रमुखु आणा;वधूचिया अभिधाना घेववायां
बोलती सकुमारा::—अहो ! सर्वेश्वरा ! अभिधान उच्चारा नोवरीचें.
मुखे अभिधान, मस्तकें वंदन, करणें हें विधान येथें आहे. ॥ ८ ॥
वरु मनीं विचारी नामाची ते परी; तवं विकल्प अंतरीं उठिते जाले.
हे संत ? कीं असंत ? नये ह्मणों सदसंत. नव्हे उभयातीत अनवस्थानें.
अव्यक्त ना व्यक्त, नव्हे व्यक्ताव्यक्त; कैसी उभयातीत बोलावीं पां ?
भिन्न ना अभिन्न, नव्हे भिन्नाभिन्न; उभयभावहीन नव्हे तैसी. ॥ ९ ॥
पाहातां अभिधान कुंठलें वचन; ईश्वरें परि मौन आश्रयीलें.
बोलती सुंदरा::—शंका दूरि करा. ट, प, करूंनी उच्चारा नाम ईचें.
वरु वीचारी मनीं::—उपाधि आड करूनी गुणदृष्टी आमिन्नी कल्पना करूं.
'अवो ! मृगनयने ! 'ऐसेंनि उपमानें,
मग रूपाकारणें पाहाता जाला. ॥ १० ॥
तवं रूप ना गुण वर्णू न चले अनुमानू ; शून्या ही अकिंचनू भाऊ गमे.
मग कूळ विचारी. तवं तें आलें वरी; लग्न येके गोत्री लागोंनि गेलें.
वरु ह्मणे::—आपुला वर्णाश्रमु गेला ! कळंकु लागला नामा, रूपा !
त्यागावी स्वभावें; वरि हें भिन्न नव्हे. न वोल्तां बरवें लोकाचारीं ! ॥११॥
पुनः पुना त्या बाला बोलती येल्हाळा. वरु ह्मणे, कां आला मीं ययां स्थाना ?

मग वीचारी गुणी. तवं गुणांचा कारणीं प्रवर्ते अभिधानी ते चि माया.
मग ह्मणे मी तें हे ऐसा योगु आहे. परावें न साहे नाम ईतें.
मग स्मरे आपणातें अवो! मी मम वनिते प्रणिपातू तूतें माझ्या ठायीं. ॥१२॥
वऱ्हाडिये हांसती; विस्मयो मानिती. ऐसी कैसी रीती उभे ० ०?
येकें रूपें गुणें नामें पाचारणें; येर ह्मणती बहुमानें घटितार्थि ऐर .
नामाचे उच्चार, ज्ञाले नमस्कार. उभै ० ० ० संपादले.
अवधूतु दिगंबरू तो नेणें हा विचारू माया नाशी ० रू त्याचां गावीं

(१३९६)

॥ प्रीतिकळहो. ॥

स्वस्थान बोवलें बोहोर बैसलें; प्रकृतिपुरुषा ज्ञालें समाधान.
ज्ञालें च्यान्ही दीन; साडेसंपादन करावें ह्मणौन सभा केली.
वधूचे अपार, वराचे समग्र वऱ्हाडी नागर यथाभागें.
बैसले असतां, वराननां अनंता प्रसंगें ० ० ० कळहो ज्ञाला. ॥ १ ॥
प्रीतीचें भांडण, तें गुणविवरण; करितां श्रवण पुण्य थोर!
श्रोतया सद्गति वक्तया तत्प्राप्ति येणें संपादती सद्य हो का. ॥ छ ॥
वराचे बोलती, विचारापां युक्ती; वराची स्वस्थिती केसी शोभे ?
याचां स्वप्रकाशी परि लोपूं वधूसीं; सवज्ञा ते ऐसी कळा भासे.
आयकोनि हें वचन, वधूचें स्वजन गुणवंत ब्राह्मण वदते ज्ञाले.
वधूची बोलती:—नोवरीची दीप्ती, रूप गुण स्थीती अलोलीक. ॥२॥
इचे गुण कळा उदयो त्यांचा ज्ञाला. वरू आच्छादला तेणें योगें.
हारपला गुणी प्रकाशे इच्चेनी; महिमेतें पावोंनी शोभतुसे.
आइकोनि ऐसें वचन, वराचे तत्वज्ञ क्षोभले ब्राह्मण अनुवादती.
राहा! राहा उगले तुह्मी येके बोलें! सत्यासी न मिळे तुमचें मत. ॥३॥
तो रूप, हे छाया! तो ब्रह्म हे माया! व्यापका आश्रया न घडे ऐसें!
त्याचा रूपावारी वारावी नोवरी! दृष्टीहूनी दूरि विसर्जावी.
रूप ते कुरूप; कपट आंगी पाप; वितुळे आपेंआप तत्प्रभावें.
तमस दिवाकरें; तैसी हे भर्तारें लोपे साक्षात्कारें; आह्मी ज्ञाणों! ॥४॥
वधूची बोलती::—न बोला हे युक्ती. प्रत्यक्ष प्रतीती प्रमाण पाहा.
इच्चेनि रूपा आला; गुणवंतु भासला; सकळां वंद्यु ज्ञाला भर्त्तारू हा.

ईवीण तो कवणू ? कोठें ? किंलक्षणू ? यासि नेणे जनू निर्नामत्वें.
निर्नामांचा घरीं पडली हे नोवरी ! परि तयां उजेरी इच्चे नि ज्ञाली.॥५॥
वराच्चे बोलतीः:—सांडा ऐसी भ्रांती. विवेकु धरा चित्तीं; ज्ञाणवैल.
याच्चेनि हेस नाम; ना तरि, निर्नाम. निंद्य पैं परम रूप ईंचे.
निर्नामाची मूळी, निर्नाम कपाळीं वराचां पडली; करणे काये ?
संगें ययाच्चेनी मान्य ज्ञाली जनी. गुणी गुण पावोंनी रूपा आली. ॥६॥
वधूच्चे बोलती:–आच्छादावे कित्ती ? मुळीं ययाप्रति पुरुषत्व नाहीं !
आस्तीर्णा अभावो; प्रावर्णा के ठावो ? वरा निर्देवो आह्मीं ज्ञाणों !
नामाची हे बाळा. बोलु त्या कपाळा ; जन्मु वांयां गेला कन्निकेच्चा
दृष्टी न पाहावें, मनें न कल्पवें, वाच्चें न बोलवें रूप याच्चें ! ॥ ७ ॥
वराच्चे बोलतीः:–काइसी हे कुस्फूर्ती ? पुरुषु दुज्ञा नाथी येणेंवीण !
हे बोलती दूषण, पाहाती निर्वाण त्याच्चें निःसंतान सत्य होये !
येकें अवेक्षणें गर्भ घेला ईणें ! बाळक येसणें हे प्रसवली !
च्यारि कीं पंचक ? येक कीं अनेक ? नेणवे बाळक निर्धारिता ! ॥८॥
बोलती येर पारुः:–व्यसनशून्यु नरू. वधूनें प्रतिकारु केला यया.
इच्चेनि आंगमेळें पुरुषत्व यया आलें ! संतान ज्ञाहालें तें सर्व ईच्चे !
भाग्याची हे बाला ! इच्चेनि तो दादुला
लौकिकीं मिरवला ! ज्ञाणों आह्मीं !
येरव्हीं हा निश्चळु ! शब्दाच्चा दुःकाळू !
अंध ! मूकु ! विरळु ! निर्व्यापारी ! ॥ ९ ॥
वराच्चे बोलतीः:–तुमची ज्ञलो रीति ! वायां वीण युक्ती चाळितसा !
वचनें तुमच्चेनी नोवरी परव्यसनी ; कुयुक्तीची खाणी ; पापरूपा !
इचां आंगीं भूतें ; अवतरें तन्मत्ते ! भोग होती तेथें डोळों लागे !
रूप दाखवितां, शंका ते सर्वथा नाहीं आलंगितां परपुरुषातें ! ॥१०॥
बोळती वधूच्चेः:–अवतरण भूतांच्चें फललें हें वराच्चें सान्निधान !
यया अनुसरती ते लज्जयां सूटती ! नग्नची भ्रमती जनामाजी !
दुसरें न साहे; वरु तो ऐसा आहे ! बाळा तैसी नोहे ; ज्ञाणों आह्मीं
गुणी आच्छादली, प्रवृत्ति झांकली,
कवणें हे देखीली ? सांगा वेगीं. ॥ ११ ॥

वराचे प्रलपती::—साक्षी वदविती; भूतें कोठें होतीं याचां घरीं ?
इच्चें हें टवाळ ह्मणती ज्ञानशीळ; वराच्ने सकळ अवशीक.
इष्ट मित्र सखे आपुले पारिखे; हा तया नोळखे असतां ऐसें.
इच्चे चि ते सकळ आभास खेळ;
जाणती कुशळ अनुभवी ये. ॥ १२ ॥
वधूच्ने बोलती::—लटिकी हे वदंती. माहासिद्धांप्रति पुसाना कां ?
भान जें आभासे, सत्यत्वें जें दीसे, तेथें हें काय असे निर्धारीतां ?
याच्चें तें सकळ भासे जें पाल्हाळ ! इच्चें तें केवळ नाममात्र.
द्वैत या न साहे; आपुलें आपण खाये.
ऐसियासी काये दिधली बाळा ? ॥ १३ ॥
वधूचिया वऱ्हाडिणी इतुलें हें आइकोनि, खेदाचां वचनी प्रलपती::—
कवणे हा पाहिला ? नाहीं दृष्टि देखिला, श्रवणीं आइकिला पूर्वीं माये !
पूर्वसूत्र घडलें; येथें काये ज्ञाले ? वधूचेनी कपाळें लागला हा.
खाणें नां जेवणें, लेणें नां नेसणें,
याचां घरीं उणें धरील बाळा. ॥ १४ ॥
नव्हते जया डोळे तेहीं या पाहिलें. पौरोहित्य केलें कवणें ? नेणों.
विचारीला ज्नेहीं मनस त्याच्नें कायी मेले होतें आई मीं काये ज्ञाणे.
आइकिलें अभिधान; त्या नव्हते. श्रवण मीं ह्मणिज्ने तें कवण स्त्री ना पुरुषु
जननी ना जनकु; कुळहिनता कळंकू;
गुणु नाहीं विवेकु याचां ठाइं. ॥ १५ ॥
गजंबु ऐसा करिती. तव येर बोलती, होणेराचा गती ऐसी चि आहे.
याकरीं दिधली, तें चि ह्मणा मेली ! सांडापां उकळी ममत्वाची.
ऐसें संबोखिती विवेकें वारिती सर्वज्ञ हांसती वर प्रीय.
मूर्खांसी बोलतां आंगीं ये मूर्खता. मौन मार्गें आतां करूं साडे. ॥१६॥
ज्योतिषीब्राह्मण बोलती सर्वज्ञ::— दोघांच्नें अभिधान विचारापां.
एक चि मीपण उभेयांलागून. रूप यावरून भिन्न नव्हे.
रूपा भेदगुणें भूषणें, दूषणें, दोघांचीं समानें एके ज्ञाणा.
अनिवड येकपण ऐसें विचारून घटीत आह्मीं पूर्ण विचारीलें. ॥१७॥
ऐसा कळहो ज्ञाला; उपशांती पावला. प्रीतियोगु कळला उभेयांचा.

साडे संपादले; वऱ्हाडी बुझाविले, स्वप्रभावसेले समर्पूनी.
तो विधु संपला; गृहप्रवेशु ज्ञाला. पुरुषीं आछादला प्राकृतुभाऊ.
विवाहाची परी हे सरे संसारीं. नग्नीं दीगंबरीं ब्रह्मीं कैंचीं ? ॥ १८ ॥

(१३९७)

धानाश्री.

ज्ञान दयार्णव ! दुर्मतिहरणा ! सुरवरवंदित ! मोक्षदचरणा ! ॥ १ ॥ धृ॥
दत्ताचें रुप गुणहीन सखिये ! द्वैत न साहे अनुसरतां ! ॥ छ ॥
आदिरूप, परब्रह्म, निदान, दिगंबर ध्येयस्वरूप सगूण. ॥ २ ॥

(१३९८)

पापांकुरसंसारविमथना ! आदिगुरो ! दुःखत्रीविधहरणा ! ॥ १ ॥धृ ॥
तूं माझें ध्येय; तूं माझें ध्यान; स्वसिद्धिसाधन, स्वस्वरूप. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें चिंतन करितां, निमाली अहंमतीसीं ममता. ॥ २ ॥

(१३९९)

नामें चि संसारू नाशिळी माये ! नामें वीण मज नावडे क्रीया. ॥ १ ॥धृ॥
'जय ! दत्तात्रेया ! जय ! दत्तात्रेया ! जय ! दत्तात्रेया !' जपु जपें मीं. ॥छ॥
दिगंबरा ! गुरो ! विज्ञानसागरा !
नामें वीण अर्थु न गमें मीं दुसरा. ॥ २ ॥

(१४००)

'योगीजन प्रिय ! पंकजनयना ! आदिगुरो ! जय ! कालाग्निशमना !' ॥ १ ॥धृ॥
हें नामामृत जीवन सखिये ! चित्त न राहे येणें वीण. ॥ छ ॥
दिगंबरा ! जय ! अगणीतकीर्ती तुतें स्मरयीन मंगलमूर्ती ! ॥ २ ॥

(१४०१)

चंचळ हें मन स्थीर न राहे, दत्ताचे पाये आठवितां. ॥ १ ॥ धृ ॥
अर्थाचा लाभु; कोटी ममता. भ्रमु येणेंकारितां होतु असे.
दिगंबरेंविण विश्रांती नाहीं. मनस तये ठायीं बांधयीन.

(१४०२)

जीवाहूंनि मज प्रिय गे ! माये ! दत्ताचे पाये आठविन. ॥१॥ धृ ॥
श्रीदत्तें जपु; श्रीदत्तें ध्यान; श्रीदत्तु ज्ञान; ज्ञेयपद; ॥ छ ॥
श्रीदत्तें मुक्ति; श्रीदत्तें गति; श्रीदत्तें उपशमु; परमविश्रांति; ॥ २ ॥

श्रीदत्ता विद्या; श्रीदत्तगुरू; वेद्य, निरंजन, हा दिगंबरु. ॥ ३ ॥

(१४०३)

नामस्मरण जपु जपकां मनसा. वीण तेणें योगु न वच्चे कलसा. ॥१॥धृ॥
सावळें, परब्रह्म, सगुण, कमळलोचन न विसंर्वे. ॥ छ ॥
दिगंबरें योगें ज्ञाणें आत्मा. तूं विश्व, ब्रह्म, सह चिदात्मा. ॥ २ ॥

(१४०४)

चंचळ जळ चळे आयुष्यसरीता;
गेलें तें पानीय; न ये, न ये, धरितां. ॥ १ ॥ धृ ॥
कवणाची वास पाहातासि ? मनसा !
पळ, पल, त्रुटि, लव, जातसे वयसा. ॥ छ ॥
दिगंबरेंविण सर्व दुःखासि जनक. तयातें आठवीं. देह ज्ञायील क्षणिक.॥२॥

(१४०५)

सदन, स्वजन, धन, यौवन, वनिता,
मायिक बंधन. येणें न पवसि विहिता. ॥ १ ॥ धृ ॥
अर्थाच्या संदु काइसा ? रे ! मनसा !
प्रारब्धु न चुके. वायां दवडीसी वयसा. ॥ छ ॥
दिगंबरेंविण ज्ञाण श्रमकर सकळ.
मृगतोय पाहातासि; डहूळु कीं नितळ. ॥ २ ॥

(१४०६)

जन, जन, धन, धन, वणवण करिसी.
श्वान चि काये ? नेणों ! मनुज नव्हसी ! ॥ १ ॥ धृ ॥
दैवाधिन जीणें; दैवगती मरणें. दैवभोगु हा कवणें निवारिज्ञे ? ॥ छ ॥
आशापाशबद्ध जे काहीं करिसी; क्रियमाण खरे; तेणें अर्थु न पवसी. ॥२॥
दिगंबराप्रति वेगीं रिघ कां तुं शरण. आणिकु करितां धर्मु पावसी पतन.॥३।

(१४०७)

कवण तनुज ? तनु कवणाची ? वनिता ?
ममतासलिल वाहे दुःखाची सरिता. ॥ १ ॥ धृ ॥
वायां विण कां रे ! बुडतासि ? मनसा !
येणें, ज्ञाणें येकलें न धरीं दुराशा. ॥ छ ॥

गेलें तें आपुलें काये ? आहे तें कवण ?
दिगंबराप्रति वेगीं रिघ कां शरण. ॥ २ ॥

(१४०८)

अहित, विहित कर्म मानुनि करिसी.
निदान पावलया तुं कैसेनि तरसी ? ॥ १ ॥ धृ ॥
जाइल हें देहें सुट सकळें. स्वहित कवणें बोलें वो ! सांडिसी ? ॥छ॥
जन्मोजन्मीं तुतें येकू चि सोयेरा; दिगंबरेंविण नाहीं आणिकु दुसरा. ॥२॥

(१४०९)

चंचळ मन माझें; चंचळ वयसा; चंचळ शरीर; नाहीं भरवसा. ॥ १ ॥धृ॥
दत्ताचें रूप कैसेनि धरवे ? मज्ज माझें नांगवें; काये करूं ? ॥ छ ॥
दिगंबरें येकें वांचूंनि सकळ चंचळ मानव्य जातसे विफळ. ॥ २ ॥

(१४१०)

जन, वन, स्थान, सदन, धन, वनिता,
शरीर वेचलें माये ! काये येथें ममता ? ॥ १ ॥ धृ ॥
येणें गुणें बहू श्रमली गे ! माये ! येणें गुणें०. हीत काहीं मीं न लहें,
येणें गुणें०. सुख ही दुःख होये, येणें गुणें० तापत्रय भोगताहें. ॥छ॥
दिनेंदीनु क्षीणु, क्रमली माये ! वयसा.
दिगंबरेंवीण आतां न रंजवी, मनसा ! ॥ २ ॥

(१४११)

श्रवण, मनन, निदिध्यासन करितां,
अवस्था लागली; माये ! न ये ते विसरतां. ॥ १ ॥ धृ ॥
तेणें वीण माझें मनस न राहे. तेणें० योगु अयोगु होये. तेणें
उपशांती न लहें ! तेणें ० तमोभय बाधिताहे, तेणें वीण. ॥ छ ॥
दिगंबरतत्त्व सकळगुणविगत स्वरूप केवळ माझें सर्वेसीं सहति. ॥२॥

(१४१२)

अमळ, अचळ, मूळपद नये गणिता.
गणनासारिखें सर्वगत अनुसरतां. ॥ १ ॥ धृ ॥
तेणें माझें मन हरिलें गे ! माये ! तेणें०
माझेंपण आयासि न ये. तेणें ०

चित्त विरोनि जाये. तेणें० मीपण मीं न लाहं, माझें तेणें. ॥ छ ॥
श्रमसर्वगत, निर्वृत्त, श्रमहरणा ! दिगंबर ब्रह्म चिदन्वित सगुण. ॥२॥

(१४१३)

सुरगणपती ! कमळाकृतनयना !
त्रिभुवनपती ! काळानळशमना ! ॥ १ ॥ धृ ॥
तुजवीण माझें मनस न राहे. तुज० अर्थु मीं करूं काये ? तुज०
येरें श्रमु जि होये. तुज ० मज कवणु आहे तुजवीण ? ॥ छ ॥
अमरवल्लभा ! तापत्रयवीमथना ! दिगंबरा ! सुरगुरो ! मोक्षदचरणा ! ॥२॥

(१४१४)

अमृत तें ही तें विष मज जालें, गोरिये !
विषाचां सागरीं मन बुडताहे, बाइये ! ॥ १ ॥ धृ ॥
येणेंविण देह न धरी गे ! माये ! येणें० आंगीं प्राणु न साहे. येणें०
सर्व वायां जाये. येणें० गति न पवें उपायें येणें वणि. ॥ छ ॥
साधनें श्रमु चि मज योगें आणि तपसें.
दिगंबरें येणें वीण आनहीत न दीसे. ॥ २ ॥

(१४१५)

॥ चालि भिन्न ॥

तनुत्रय गेलियां मज तुरिया न साहे.
संग दोषजनकु भाऊ; करूं मीं काये ?
गुणसिद्धि सगूणें येणें हरिजत आहे. ॥ १ ॥ धृ ॥
सगुण वेदक, मातें स्थिती न मीळे. तें पद नें दी वो ! सखिये !
तें पद नें दी वो ! सखिये ! येणें ऐसें काये केलें ? ॥ छ ॥
येणें गुणें घेतियां मीं वो ! बरया न पाहें !
आंगें योगजनकु सैये ! संगु न लाहें.
श्रीदिगंबरें वो ! गुणी गोविजत आहे. ॥ २ ॥

(१४१६)

जन, धन, स्वजन, वन, करूं मीं काये ?
मज नित्य वियोगु याचा बाधीतु आहे.
मन, बुद्धि माझी वो ! येणें मोहिली माये ! ॥ १ ॥ धृ ॥

नयन श्रमले ; मन भ्रमीत झालें.
नये नये वो ! श्री दत्तु ! येणें कां दूरि धेलें ?
येणें कां दूरि धेलें ? ॥ छ ॥
मज भेटि झालियां मीं परति न लाहें. आंगें आंग लागैन; याचे धरीन पाये.
येणें दिगंबरें वो ! वीण आतां न राहें. ॥ २ ॥

(१४१७)

येणें दत्तें वांचुंनि रूप नयनां न पाहें.
बहु काळ जाहालें; आतां मीं करूं काये ?
निज प्राण देईन सैये ! ० ० ० ० ॥ १ ॥ धृ ॥
चांदु चंदन मातें आंगीं न साहे. तापत्रय कठीण मज बाधीत आहे. ॥छ॥
गुणगण पारूषले; परति न लाहें. मज माझें मीपण तें ही पारिखें माये ! ॥
दिगंबरे वो ! वीण मनस न राहे. ॥ २ ॥

(१४१८)

अवधूतें सर्व मजही स्वहीत आहे. गुण कर्म सकळ येर करूं मीं काये ?
अनुमातु सखीये ! झणें मीं येथ पाहें. ॥ १ ॥ धृ ॥
संगें सेवन मज साधन माये ! मंत्रसार सर्व ही मातें येथें चि आहे. ॥छ॥
ज्ञानध्यानधारणाध्येय ज्ञेय सर्व सखीये !
येणेंवीण वो ! नलगे; मातें विश्रांति नाहे.
येणें दिगंबरें विण गुणवेगु न साहे. ॥ २ ॥

(१४१९)

रूप सावळें सुंदर पाहिन नयनी वो !
मन माझें गुतलें अवधूतचरणीं वो ! ॥ १ ॥
निरंतर तेंचि ध्यान, देयीन मीं आलिंगन. विण श्रीदत्तें नसवे;
सांडिन पंचप्राण ; करा, वो ! समाधान ! ॥ छ ॥
प्रतिक्षणीं अवस्था ते चि ते लागली वो !
दिगंबरातें पाहीन; न राहें मीं येकली वो ! ॥ २ ॥

१४२०

अतिप्रीतीचें बोलणें कठीण जाणवलें.
अवधूतु कां न बोले ? प्रेम चि पारूषले ! ॥ १ ॥ ॥ धृ ॥

दत्ता ! देइं आलिंगन ! तूं चि माझें प्राणधन ! न राहें मी तुजवीण !
न धरीं हें देहप्राण ! लाडिकें मीलिलें वड !
बोलाची नेणें खण. मंदमति, ज्ञानहीन. ॥ छ ॥
कैसीं झाडीन चरण; मीं लोळैन भूमिवरी.
दिगंवरा ! दीगंवरा ! हा चि हा संदु करीं. ॥ २ ॥

(१४२१)

दोन्ही डोळुले सजल जलधर ज्ञाणवले.
मायेबापें सखिये ! हृदय वोळखीलें. ॥ १ ॥ धृ ॥
दिधलें वो ! आलिंगन; जीवें जीवा येकपण
भेटी भेटणें न दीसे स्वरूप स्थिर पूर्ण ॥ छ ॥
भेदु सारूंनी, सखिये ! श्रीदत्तु भेटी आला.
दिगंबरें भवभ्रमु माझा वो ! दूरि केला. ॥ २ ॥

(१४२२)

रूप स्मरतां अंतरीं, बाहिजु पारुषला;
झाले सजळ नयन; अधर स्पंदु आला. ॥ १ ॥ धृ ॥
न सवरे माझें मन; नामघोषें गर्जयीन.
येथ काइसा लौकीकु ? बाइये ! मीं नाम्नवीन ! ॥ छ ॥
गुणीं गुंपलें मनस, परति न धरी वो !
दिगबरीं तन्मयता आनंदु अंतरीं वो ! ॥ २ ॥

(१४२३)

गुणबुद्धीचें देखणें केवल पारुषलें.
अवधूताचें भेटणें मीपण मालवलें ! ॥ १ ॥ धृ ॥
कैसें चित्त सांवरू ? वो ! लयगत न करू ? वो !
ज्ञानसागरीं वीरतां, वृत्तीसि वीसरू ? वो ! ॥ छ ॥
भान मोडलें सकल; स्वरूप नीवळलें;
दिगंबर परब्रह्म तें चि तें सर्व ज्ञालें. ॥ २ ॥

(१४२४)

॥ चालि मिश्र. ॥

सकळ सुवर्णगत अवधतु, माये !

मंत्रसार नित्य जपताहें, बाईये ! तें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
बाईये ! तें वो ! न विसरवे ! अद्वैतभावें, अवो ! बाईये ! तें वो ! ॥ छ ॥
दिगंबर हृदयस्थ चैतन्य माये ! अनुभवें प्रतिभासताहे.
गुणमुक्त, युक्त, व्यक्त, अव्यक्त, सैये !
गुणदृष्टी गुप्त बोलों काये ! बाईये ! ॥ २ ॥

(१४२५)

सकळसंदेहमुक्त मन हें ज्ञालें,
अवधूतगुणीं मीसळलें, बाइये ! तें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
बाईये ! तें वो ! पराति न लाहे; गुणीं वेन्नताहे, अवो ! बाइये ! तें वो ! ॥छ॥
सखिये ! हृदय माझें सुखमय ज़ालें. अवधूतीं मीपण विरालें.
दिगंबरीं अवृत्ती तन्मय ज्ञाली; भेदें त्रिविधें पारुषली; बाइयें ! ॥ २ ॥

(१४२६)

श्यामसुंदर सखिये ! कमळनयन, तेणें रूपें हरिलें हें मन,
बाइये ! तें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! तें वो ! कैसेनि लाहे ! तळमळिताहें; वियोगु न साहे;
वासना होये; अवो ! बाइये ! तें वो ! ॥ छ ॥
जिविचें जिवन माझें, मद्गत धन, परब्रह्म दत्त सगुण.
दिगंबर गुणहीन तत्वचिद्घन; तेणें माझें अंतःकरण बाइये ! तें वो ! ॥ २ ॥

(१४२७)

वियोगें याच्नेनि मज्ज बहु क्लेश ज़ाले.
दुःखें हृदय आंदोळलें, बाइये ! तें वो ! ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! तें वो ! कें सूख पावें ! योगस्वभावें, अवो ! बाइये ! वो ! ॥छ॥
बाह्य व्यापारीं मज्ज संतोषु नाहीं. दत्तु देखैन आत्मा देहीं.
दिगंबर गुणभेदभाववीहीनू. दाखवा वो ! मी मज्ज हृदयीं बाइयें ! तें वो ! ॥२॥

(१४२८)

॥ धानाश्री ॥

योगवर्मी आसक्त होतें मन वो ! आत्मा ब्रह्म अखंड समाधान वो !
द्वैतशून्य सर्वत्र निरंजन वो ! सखिये येणें तें हरिलें चेतन वो !
माझें ज्ञान वो ! स्वस्फुरण वो ! ॥ १ ॥ धृ ॥

अरे ! अरे ! कमळनयना ! रे ! रूप तुझें हरिताहे अंतःकरणा रे !
आठवसी हृदयीं क्षणक्षणा रे ! तेणें योगाची सांडिली कल्पना रे ! ॥छ॥
आत्मज्ञानें न परतें माझें चित्त वो ! स्तब्ध झालें सगूणीं आसक्त वो !
प्रेम स्पंदे, नयनीं अश्रुपात वो ! दिगंबरानुस्मरणें गर्जत वो ! ॥ २ ॥

१४२९

निर्विकल्पीं समाधिभंगु जाला वो ! गुणाध्यासें तो बोधु माझा हाला वो !
अवधूतु हा येथें कोठें आला ? वो !
याचा रूपीं रूपली चित्कला वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! अरे ! मनसमोहना ! योगिराजा ! कालाग्निशमना रे ! ॥ छ ॥
दृश्यत्यागें दर्शन स्वस्थ करीं वो ! तवं हा द्रष्टा मीपणा अंतरीं वो !
आत्मारामु; येणेंसीं काइसी चोरी ? वो ! दिगंबरू नवलमायाकारी वो ! ॥२॥

१४३०

ब्रह्मस्थिती निश्चळलें माझें चित्त. वो ! तेणें रूप अवलंब केलें व्यक्त वो !
अतद्वादें नव्हे तें निरस्त वो !
आश्रयीता ब्रह्म चि सर्वगत वो ! ॥ १ ॥ धृ ॥
अवो ! अवो ! बाइये ! सत्य ज्ञाण वो !
रूप याचें अरूप गुणहीन वो !
दत्तु रूप सावळें; भला नव्हसी करितासि मनोहरणा ! रे !
कृष्णश्यामा ! कमलनयना ! रे ! ×९
सनातन वो ! आलंगीन मी जीवाचें जीवन वो ! ॥ छ ॥
निर्विकल्प समाधिपरि तो सारा वो ! सविकल्पु ही वीषयो न करा वो !
स्वर्गादिक तें काइसा मातेरा ? वो ! मन माझें न सोडी दिगंबरा वो !
साकारा वो ! अक्षरा वो ! ॥ २ ॥

(१४३१)

माझें ज्ञान ध्यान तूं अवधूता ! रे ! जपु मुद्रा श्रीगुरो ! समर्था ! रे !
योगु नेणें. नव्हें मी योगवेत्ता रे ! चित्त कोठें न रमे तुजवांचूनि रे !
नामघोषें मी गर्जेन सर्वथा रे ! ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! अरे ! तूं देवशिरोमणी रे ! संचरलासी अवधूता ! माझा मनीं रे !
तेणें दुजी न स्मरे करणी रे ! सांडिन जिऊ तुजवरि वोवाळूनी रे ! ॥छ॥

जीवाहूंनी तूं प्रीयु होसी मना रे ! देवदेवा ! कालाग्निशमना ! रे !
दत्तमूर्ती ! कमळनयना ! रे ! दिगंबरा ! प्रमादमोहहरणा ! रे ! ॥२॥

(१४३२)

जिऊ माझा जीवें वोवालीन वो ! अवधूत मीं हृदयीं धरीन वो !
पंचप्राणीं मीं आरती करीन वो ! योगिराजू सर्वस्व योगधन वो ! ॥१॥धृ॥
कैसें करूं ? वेधलें मन माझें वो ! चित्त येणें हरिलें योगिराजें वो !
आनें अर्थें तें सहसा नूमजे वो ! यया भेदु सांडूनि आलंगीजे वो ! ॥छ ॥
लवण जैसें तें न उरे सागरीं वो ! घटाकाश प्रवेशे पूर्णांबरीं वो !
प्रीति भारी मीं तेवि दिगंबरीं वो ! सामावेन ये विज्ञानसागरीं वो ! ॥ २ ॥

(१४३३)

दृश्य, द्रष्टा, दर्शन, ऐसीं तीन्हीं रे ! न सरती देवाचा भजनीं रे !
गुणागुण न साहे त्यांचा गुणीं रे !
आत्मा दत्तु सेविसी कैसा ध्यानीं रे ? ॥ १ ॥ धृ ॥
अरे ! अरे ! मनसा ! स्थीरू राहीं रे !
गुणें संगु सांडूनि रूप पाहीं रे !
अवस्थांचा बोधु तो येथें कायी ? रे !
आश्रयातें ज्ञाणेंानि लीन होई रे ! ॥ छ ॥
स्फूर्ति कारितां, वसिरू दुणावे रे ! विसरें घेपे ऐसें तें तत्व नव्हे रे !
आंगें आंग चिन्मात्र जें अवघें रे ! दिगंबर आत्मत्वें अनुभवे रे! ॥ २॥

(१४३४)

॥मारू धानाश्री॥

दुःखदुरितसमळभवहरणा ! तापत्रयानळज्वाळशमना !
अविद्यागुणवनतृणदहना ! कृष्णश्यामा ! कमळनयना । ॥ १ ॥ धृ ।
तुं चि तूं होऊंनि असावें; माजि अंतर तें न साहावे.
देवरायें ऐसें करावें, मीं नुरऊंनि अवघें स्फुरावें. ॥छ ॥
परमानंदबोधसुदीना ! गुणवर्जितसंपूर्णभाना !
योगिराया ! योगनिधाना ! दिगंबरा ! काळाग्निशमनां ! ॥ २ ॥

(१४३५)

मायातमसहरण दिनकरा ! ज्ञानविज्ञानगुणजळधरा !

परमाद्वयरसबोधचंद्रा ! स्वस्वरूपदानीं उदारा ! रे ! ॥ १ ॥ धृ ॥
देवा ! तूंवीण आणिक नेणें. तुं चि ज्ञेय; तूं जाणणें,
ज्ञातें तूं सर्वत्र ज्ञाणें; दत्ता ! स्फुरतासि येणें मीपणें. ॥ छ ॥
सिद्धराजा ! राजीवनयना ! दुःखदुस्तरसंसारदमना !
तुझा योगु न कळे मुनीजना, दिगंबरा ! गुणनिधाना ! ॥ २ ॥

(१४३६)

मंत्रवीर्या ! केवळ मंत्रमूर्ती ! तुझें स्मरण पावन त्रीजगती.
देवराया ! अमितगुणकीर्ति ! आदिगुरो ! श्रीस्वयंज्योती ! रे ! ॥१॥धृ॥
देवा ! तूं सर्व माझें ध्यान, जपु, तपसु, अनुष्टान.
नेणें मंत्र, मीं नेणें विधान, सिद्धमूर्ती ! तुजवांचूनि रे ! देवा ! ॥छ॥
मंत्रमया ! मंत्रसारा ! मंत्रहेतु ! मंत्रविस्तारा !
मंत्रफळ तूं श्रीदिगंबरा ! तुजविण जपु न करीं दुसरा रे ! ॥ २ ॥

(१४३७)

जपमाळा मीं न धरीं स्मरणी; मन ठेवीन अवधूत—चरणीं.
ध्यान, धारण, साधन, करणी, काहीं न मनें माझा मनीं,
दत्तु आत्मा हें ज्ञाणोंनी. ॥ १ ॥ धृ ॥
गे ! बाइये ! येणेंसीं मीं दुसेंर नेणें, मीपण तें हीं निरसलें जेणें.
ज्ञानें याचेनि मना ! नुरणें, निर्विकल्पनिराकारपणें. ॥ छ ॥
योग, मुद्रा, आसन, बंधू, नेणें मीं शास्त्रविवादू.
दिगंबरेंसीं न दिसे भेदु. आत्मा वो ! संपूर्ण बोधु. ॥ २ ॥

(१४३८)

तुं बा ! जननी जनकु योगिराया ! अवधूता ! सांडिली कैसी माया ?
मजपाठीं लाविली माझी क्रीया. गुणीं गुंपलों ! नेणें उपाया ! ॥ १ ॥ धृ ॥
रे ! देवा ! कां मज धरितासि दूरी ? आत्मा तूं बाह्यांतरीं.
माझें अज्ञान मज हें वैरी. तुतें पाविजे कैसियापरी ? ॥ छ ॥
बहु जन्म वेचले वायां वीण; मातें न घडे चि तुझें चिंतन.
कृपासागरा ! मीं तुझें दीन ! दिगंबरा ! देयीं संनिधान रे ! ॥ २ ॥

(१४३९)

धिग्य. धिग्य माझें ज्यालें ! देवरायेंसीं अंतर पडलें.

नरदेह वायां गेलें, भोगीतां विषयसोहोळे. ॥ १ ॥ धृ ॥
गे ! बाइये ! शंकोनि सरली माघारी; अवधूतेंसीं घडली चोरी.
मुख दाखऊं कवणिये परी ? माझें अज्ञान मज हें वैरी. ॥ छ ॥
मीं कवण ? आलियें कां वो ! येथें ? येथ धर्मु कवणु आहे मातें ?
केलें काये ? तें सांगों कवणातें ? दिगंबरभ्रमु जाला चित्तें. ॥ २ ॥

(१४४०)

गुणवर्जित गुणा आणीलें, मज्ज मीं ऐसें स्वतंत्र केलें.
कर्म काडानि कां भ्रमवीलें ?
तुझी माव हे कव्हणा न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
रे ! देवा ! कवणें तुज सीकवावें ? तुज योग्य हें करणें नव्हे.
दीन आह्मी काये करावे ? करिसील, तें पडलें साहावें. ॥ छ ॥
आह्मां अज्ञानें कां आछादिसी ? विपरीत बोधें चेववीसी ?
उपराठें कां दंडितासी ? दिगंबरा ! करणी ऐसी कैसी ? ॥ २ ॥

(१४४१)

॥ चतुरंग प्रबंध. ॥ धनाश्री.

मनि भरला अवधुतु रे ! रे ! सकलेप्सितहेतु आदिगुरु;
शरीरसंगपणें शशिशीतलु, अखंडितु वो.
सुवासीत दतु, स्रजाशोभितु, गंधें करूंनि चर्चितु वो,
अनंता सुखातें देतु; मुक्तावली यया उरी;
किरीटादि अलंकारी; दिनमणी विफलु जाला;
अरे ! उपमानें गेलीं लया. ॥ १ ॥

(१४४२)

सा सा नि पा नि सा प नि सागा मा गा सा नि प सा निनिनिनिप
मा ग म्म पा नि निसा स्सा नि प म्म गम्म पा सा ग म्म पा स म्म ग स
म्म ग स ग म पा ग म्म पा नि पा नि सा म्म ग सा नि सा प सा नि
नि नि प म्मा ग म पा नि नि सा सा नि पा मा मा ग सा ॥ छ ॥

(१४४३)

झेग् झेम् ज्ग ज्ग झक किण्णा कक्कुधांधारि तकु झेंत्र झेंत्र झंकिणा
दाम् दाम् तद्धिमि धिमि धिमि दिग्दां दिग्दां धडा धाडां

तद्धिमिकिटातथडी कुनक किणा ।। छ ।।

(१४४४)

तेन्न तेन्ना तेना तेन्ना तेन तेना तेन्ना तेन्ना तेना तेन्न तेन्ना अरे तेना
तेन्ना तेन्ना तेन्ना तीन तेना तेना
तीन तीन तेना डुती डुनतेन्नातेना ।। छ ।।

(१४४५)

मळाप

करुणाघन वोळपां देवा ! नामवादी गुणीयातें पाव तूं बा ! रे !
श्रुतिसुखा वाणी स्यां निरामयु चतुरंगें प्रबंधें
अरे ! दिगंबरु तोषवियला, लोकनायकु, मममनोलाभकु.
जीव देइन या. ॥ छ ॥ छ ॥

(१४४६)

॥ रामक्री ॥

कामितासि तो अर्थु अनर्थकू; सत्य जाणोंनि करिकां विवेकु. ।।१॥धृ॥
विक्षेपु भजतासि आपुला; तो चि लोपकु तुतें विनिर्मळा. ! ॥ छ ॥
आप जाणतां दृश्य मगजळ दिगंबरीं मन करीं निर्मळ. ॥ २ ॥

(१४४७)

आप नेणोंनि करितासि कल्पना; वादवसी मृषा वासना. ॥ १ ॥ धृ ॥
अवघें चि स्वप्न मायिक; सत्य केवळ तत्व तूं येक. ॥ छ ॥
दिगंबर निजरूप निर्मळ, आत्मतत्व हें; येर मृगजळ. ॥ २॥

(१४४८)

मृगजळें येणें न नीवजे; मृग होउंनि, कासया श्रमिजे? ॥ १ ॥ धृ ॥
संसारु जाणोंनि करिकां. भय नाहीं विषय ही भोगितां ! ॥ छ ॥
दिवंबरेंवीण वर्म न कळे. येर डोळस, ते ही आंधळे. ॥ २ ॥

(१४४९)

दृष्टी प्रसवली भाना सकळा; ते चि परतोनि लागे त्या मूळा. ॥ १ ॥धृ
तईं भान मृगजळ आतलें. द्वैत अवघें तत्वीं सामावलें. ॥ छ ॥
दिगंबरीं प्रपंचु लटिका जाणु जाणे न कळे आणिका. ॥ २ ॥

(१४९०)

अवस्था ते गुणप्रकल्पना; ते चि प्रपंचसंभावना. ॥ १ ॥ धृ ॥
बहु काये करितासि सोसणी ? ज्ञाणु हो पां जना स्वस्थानीं. ॥ छ ॥
दिगंबरासि रिघ कां शरण तेणें होइल तमसविच्छेदन. ॥ २ ॥

(१४९१)

आत्मविसरीं हे जन बुडाले; विपरीता वृत्ती चेइले. ॥ १ ॥ धृ ॥
आतां ते चि बहुगुणें पाहातां, भ्रमु न तुटे बापा ! समर्था ! ॥ छ ॥
बाह्यक्रिया तें नव्हे साधन; बाह्यज्ञानें अज्ञानछेदन. ॥ २ ॥
दिगंबरें स्वरूप नीवळें, तरि यथार्थ तत्व तें केलें. ॥ ३ ॥

(१४९२)

देह कोठें कैंचा आश्रमू ? वर्णु वैदिकु स्वधर्मू अधर्मू. ॥ १ ॥ धृ ॥
तुतें तूं चि ज़ाणसी जेधवा, तइं मिथ्या हा आभासु अघवा. ॥ छ ॥
स्वर्ग ? मृत्यु ? कैंचें पाताळ ? दिगंबर परब्रह्म केवळ. ॥ २ ॥

(१४९३)

देऊ मानिसील ते कल्पना. ज़ाण त्रिपुटीवेगळें आपणा. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें येक चिन्मय केवळ. देवभक्त मृषा भान सकळ. ॥ छ ॥
दिगंबरें वीण युक्ति न कळे. आत्मविषयीं हें जन आंधळें. ॥ २ ॥

(१४९४)

कि योगु नेणोंनि करितासि आपणा ; तेणें बद्धत्व होईल त्या मना. ॥१॥धृ॥
अरे ॑वलंबु भजती पामर. पासीं असोनि पडलें अंतर. ॥ छ ॥
ऱ्नं चि पाहातें पाहिजे. दिगंबरें चि हें वर्म ज़ाणिजे. ॥ २ ॥

सा सा नि पा . (१४९५)

मा ग म्म पा नि ॑ासि मनस विचंचळ ? अधिष्ठानेंसीं नव्हे तें वेगळ. ॥ १ ॥ धृ ॥
म्म ग स ग म पा ॑चिन्मय. मनसेंसीं परब्रह्म विज्ञेय. ॥ छ ॥
न्नि नि प म्मा ग म ॑ जळधरीं मन भ्रमे, क्रीडे, वीरे ल्हरीं. ॥ २ ॥

(१४९६)

झेग् झेम् ज्ग ज्ग झक नेरसावा ? कां योगासि आरंभु करावा ? ॥ १ ॥ धृ ॥
दाम् दाम् तद्धिमि धिमि स्थिती निर्विकल्प समाधि आइती. ॥ छ ॥
ण्णवे; ह्मणउंनि चि साधन करावें. ॥ २ ॥

(१४९७)

संसारिक करिती संसारु; योगियां योगु, तैसाचि व्यापारु. ॥ १॥धृ॥
अधिष्ठान सत्य या दूसरें; जाणतां, तें सहज न स्फुरे. ॥ छ ॥
दिगंबरू न भेटे सद्गुरू, तरी केलाचि पाहिजे तो व्यापारू. ॥ २ ॥

(१४९८)

विलावला प्रबंध देशांक

अवतरला योगीराजु आनंदु जगतीवरी पावला.
ब्रह्मादि देवीं धरणीस्थानीं येऊनि अभिनमिला रे !
वालु रे ! गुणवंतु बहुगुणी आवरिलारे !
पादांभोजीं मुनिजनु प्रिती रंगाला.
हेणें योगाची मती योगी विसरहले; यावधूतचरणाब्जि विनटले
देवीं त्रिदिवु सोडुंनि. संग धरूंनि मनें विगुंतलेया
विषयां धरा हरा सुजाला स्तविती. गायक नाचती,
कमळनयना ! श्रीदत्ता ! ह्मणउंनियां रे ! ॥ छ ॥
प नि सा गा रि सा नि स म ग्गा प्रा मा गा मा रि सा
रिगा रि सा रि सा नि धा प नि सा गा
रि सा नि नि ध प प म स !

(१४९९)

सिंहासनभासी अवलूनि सूर्यो तपीत केला.
आनन वर विचारु करितां तेंवि तुळा नाहीं चि पाहातां.
कमळें क्षयीकें चंद्र सुक्षीणु; भानु तापदोषें विफळु जाला.
तें मुख पाहातां, नेत्रीं निमेषु सांडिला.
ऐसा श्रीदत्तु निजजनाप्रति पोषकु हृदि समस्तीं धरीयला.
देउ० तो सुरेषु, दिनासि नाला;
ऋषिसेवितु. गुणधर्मा सांडूंनि, मुनिजनु वेधला.
अधिकारियां ज्ञानसमुद्रु, दिगंबरु अत्रिकुमरु सुरजना आनंदद्रु. ॥छ॥

(१४६०)

॥ विलावल ॥ देशांक ॥ खंड. ॥

देखिला गुणाईभ हरी रे !, सुरनरा प्रमम केवल्यनिधिया रे !

देखिला सिद्धराजु दुरीतदोशनाशनु; देखिला सिद्धांचियां सीद्धीतें.
अतिच्नोरिता देखिला निजभक्तांप्राति विज्ञानसागरु देउ॰.
देखिला भवहरणु, स्वजना आति दिव्यमूर्ती; शंकरवरा सर्वशुभा. ॥१॥धृ॥

(१४६१)

देखिला तापुहारी; दुरीत हरणु अमराधिपु प्रकटिनला.
संसार मळा रे! दर्शनें हानिकरणु, कारणु, सकळलोकात्मस्वरूप!
समस्त यया आधारु ज्रो, दिवाकर हिमकर प्रकाशकु,
परमपदा योगीजना अतिगुणें सुखंकरु तो गुरु अवधूतु देखिनयला. ॥२॥

(१४६२)

देखिला दिग्वाससू चिंतनें, भवभयानळु, रे! रे! पूर्णु.
देखिलें गणपति सगुणा, ज्या नाहीं गुणगतभीति, कृतनानागुणसमुद्रा.
देखिलें अवधूता, नीरुपमज्ञानमहिमा. देखिलें स्वजनवंता,
सुवासा. कीरिटु शोभे शिरीं. सकळवंदित पादकमळ रे!
देखिलें निरंजना, कनकभरणा, दत्ता, महाऋषिकुलोद्धारा,
नीरामयपददाता; अनसूयात्मज देउ॰, श्रीदिगंबरु,
कृष्णश्यामु, मायामोहनिवारणु, अतिदिननाथु,
दृष्टी आजी देखिला गुरु. ॥ ३ ॥ छ ॥

(१४६३)

उगवला दीनु. सुदीनु गमे आजि हा!
लवे, वो! लवे हा नयनु! प्रीती बहु मनी! ॥ १ ॥ धृ ॥
सखिये! दत्तु आजि येइल घरा, मानसमोहनु, नीरजनयनु,
अत्रीनंदनु, सुरारिमर्दनु, आनंदवर्धनु. ॥ छ ॥
भेटिययाची हे भेदासि खाये; मनातें मारूंन,
यया जीवातें मारूंन, बाहीं कवलीन माये!
देव श्रीदिगंबरीं मीलिणि ज्राहाली, मग
नयें न यें वो! शरीरापु; निवारें भेदमाति. ॥ २ ॥

(१४६४)

॥ मारु ॥

नामघोषामृतें रंगले, ते नर चूकले जन्म दुःखासी;

येर ते पामर जीव चि नाशले; नित्य संसारु तयांसि. ॥ १ ॥ धृ ॥
तेणें नामघोषें गर्जयीन; सर्वदा नृत्य करीन तेणें,
आनंदें नृत्य करीन. तेणें ना० कालासि कालु होईन तेणें नामघोषें. ॥छ॥
दिगंबरा ! तुझें नाम चि तारक; साधक साधिती सिद्धि रे !
जन्मदुःख तयां कधीं चि नातले; वितुलला भवव्याधी ! ॥ २ ॥

(१४६५)

नाम संसारदुःखार्कविध्वंसन, सज्जन सेविती साधू रे !
अज्ञानबंधु तो येणें चि नाशिला; सर्वत्र प्रासला भेदु. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें नाम जपा सद्गुरूचें, सद्गुरू योगिरायाचें; ऐसें ना.
बीज तें ब्रह्मसुखाचें, योगिजनवल्लभाचें. ॥ छ ॥
योगपंथें जन चालतां श्रमले; नाम विश्रांति तयांसि रे !
दिगंबरा ! तुझें नाम चि साधन ज्ञान तें हें चि आह्मासि. ॥ २ ॥

(१४६६)

आप नेणोंनियां पर चिंती जनु चुकला पारिखेपणें.
योगसेवा तया कधी चि न फले; मोहला अन्यथाज्ञानें. ॥ १ ॥ धृ ॥
आतां आपरूपीं स्थीरावले, जीत चि मुक्त ज़ाहाले,
ज़े कीं योगिजन. ॥ छ ॥
' आपणा ज़ाणोंनि दूसेंर नेणणें ' ज़ाणणें ज़ाण सुज़ाणा !
दिगंबरू ब्रह्म आत्मा चि केवल; विश्व हें भिन्न उरे ना ! ॥ २ ॥

(१४६७)

मारू ॥ चालि भिन्न ॥ दखिणसाल.

प्रेमसंवादें बोलतां शब्दें ज़ाणवलें कठीण;
बोलवितां हीं न बोले कांहीं; दैवें धरियेलें मौन.
विकळ होताहे ध्यान ! धैर्य न धरी माझें हें मन ! ॥ १ ॥ धृ ॥
त्रीपुरपती ! त्रीपुरपती ! त्रीपुरपती ! कासया धरियेलें मौन ?
देवा ! माझे तूं पांच हीं प्राण ! नेणें बोलों मी बाळ अज्ञान !
झणें धरीसी पारिखेपण त्रीपुरपती ! ॥ छ ॥
जीवनु जीवां, परमविसांवा देवा, देऊं गे ! माये !
दिगंबराची होइन दासी; केंसीं झाडीन पाये !

अतःपर जीर्णें हें काये ? येणें सांडियेली कां सोये ? ॥२॥ त्रीपुरपती !

(१४६८)

आणिक मन नाश्रयीज़ाण !—ध्यान हें तुज़वांचून.
योगु मीं नेणें; नेणतेपणें बोलतहिं वचन.
न दिसे दुसरेपण, आत्मा तूं येकु ह्मणौन. ॥ १ ॥ धृ ॥
दत्तात्रेया ! दत्तात्रेया ! दत्तात्रेया ! सांगपां मज़ ते खूण.
भिन्न तुज़सीं आह्मीं कवण ? माव सांडूंनि बोल निर्वाण !
मज़ न सहि मीपण ! ॥ छ ॥
दृश्य निमालें ! देखणें ठेलें! वितुळलें भवभान !
आप ना पर, नीराकार ब्रह्म, तूं पद निर्वाण.
दिगंबरा ! तुझी आण, आणीक नेणें मीं ज्ञान, दत्तात्रया ! ॥ २ ॥

(१४६९)

आत्मविश्रामा ! आत्मयां ! रामा ! ब्रह्म तूं नीराकार !
श्रीयोगिराया ! निवारीं माया ! तुज़हुंनि नेणें पर !
तूं चि तूं विज्ञानसार, निजपद, अज, अक्षर ! ॥ १ ॥ धृ ॥
दत्तात्रया ! दत्तात्रया ! दत्तात्रया ! तुज़ वीनटलें मन,
नेणें परतों तें मागुतें न. गुणीं गुंपलें हें चैतन्य;
भेदरहीत लागलें ध्यान. ॥ छ ॥
अगुणगुणा ! गुणनिधाना ! मना मन तूं सार !
श्रीदिगंबरा ! मंगलमूर्ती ! तुझें मीं किंकर; विसरलों आपपर !
तुझें महिमान माहाथोर ! ॥ २ ॥

(१४७०)

मारू

विण योगु ही आयेगु देवरायें वो ! कैं देखैन सखिये ! याचे पाये ? वो !
माझें मनस निश्चळता न लाहे वो !
वीण श्रीदत्तें सखिये ! करूं काये ? ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! वो ! गुणीं गुंपलें, गुण ने घे;
मन माझें रंगलें तेणें रागें. ॥ छ ॥
निरालंबीं अवलंबु तें चि ज़ालें, वो ! चित्तचैतन्य तेथें चि पांगुलें वो !

दिगंबरें वेगळेपण नेलें वो ! रूपें अरूप सर्व ज्ञालें ! ॥ २ ॥

(१४७१)

देह माझें गगनवत्त ज्ञालें वो !
दृश्य पाहिजे तें देखणें (तेणें) निमालें वो !
अवधूतें नेणवे काये ज्ञाले ? वो !
भान प्रापंचिक सकळ उडालें. ॥ १ ॥ धृ ॥
बाइये ! वो ! ध्यान लागलें मज्ञ माझें, गुणें अगुणीं गोविलें योगिराजें.।।छ।।
नव्हे जागृति, सुषुप्ति, स्वप्न नव्हे वो !
हें हीं साक्षित्व तुरीया येणें भावें वो !
वितुलली स्वरूपआत्मभावें वो ! दिगंबर परब्रह्म तें अघवें. ॥ २ ॥

(१४७२)

तुझें रूप पाहातां भूलि ज्ञाली रे ! दृश्यदर्शनद्रष्टत्वा अंतरली रे !
अहंकृतीप्रवृत्ति हारपली रे ! शून्य गीळूनि स्वरूपें नीवळली. ॥१॥धृ॥
आत्मया ! रे ! संगें वियेगु हरितासि ! द्वैतभावें भज्ञों मी तूज्ञ कैसी? ॥छ॥
स्तुति करीं, ते मौना चि माजि आटे रे ! ज्ञानें ज्ञेय कळे ऐसें तें न घडे रे !
नेणपण समूळ सर्व तूटे रे ! दिगंबरा ! द्वैत तुज्ञसीं नूमेटे. ॥ २ ॥

(१४७३)

योगिराया ! कमळनयना ! रे ! तुझा योगु दुर्लभु साधूजनां रे !
ज्ञानयोगें, तपसें, उमगेना रे ! भाग्यें ज़ोडलासि, कालाग्निशमना ! ॥१॥धृ॥
आत्मया ! रे ! ध्यानाचिंतन मज्ञ देयीं ! येरें योगें श्रमोनि काज़ नाहीं. ॥छ॥
तुझें नामानुस्मरण विसार रे ! परब्रह्म तूं केवल सुखकर रे !
आत्मस्वरूप सर्वगत निरंतर रे ! दिगंबरा ! तुझें अपूर्व साकार ! ॥२॥

(१४७४)

वाद मुद्र्या श्रमले शब्दवादी रे ! शास्त्र ज्ञालें मोहीस तें त्रिशुद्धी रे !
तेणें ज्ञानें न तुटे भवव्याधी रे ! आत्मज्ञानहीना दुर्लभु समाधि.॥१॥धृ॥
आत्मया ! रे ! आत्मा ज्ञाणोंनि स्थीरु राहीं ! ब्रह्म तूं चि सहज्ञ सर्व देहीं ! ॥छ॥
देह दृश्य धरूनि आत्मभावें रे ! गुणवद्धी मानिसी तें तें नव्हे रे !
ज्ञानाश्रया असंगु तूं स्वभावें रे ! दिगंबरु आत्मा ज्ञाण अनुभवें. ॥२॥

(१४७५)

॥ रामक्री ॥

संसारुनदु हा दुस्तरु, कैं भेटयील तारकु श्रीगूरू ? ॥ १ ॥ धृ ॥
तुझी वाट पाहे सखया ! कइं भेटसी ? बा ! दत्तात्रेया ! ॥ छ ॥
काम, क्रोध बाधिती जळचरें; दिगंबरा ! तेव्हेळीं तुज स्मरें ! ॥ २ ॥

(१४७६)

संसारु वन दत्तात्रेया ! कालु खरतर तपे तपिया. ॥ १ ॥ धृ ॥
मज्ञ पालवें करि कां साउली. देवदेवा ! तुं माझी माउली ! ॥ छ ॥
येथें विश्रांति नाहीं तुज़वीण ! दिगंबरा ! दाखवीं चरण ! ॥ २ ॥

(१४७७)

संसारसागरीं तरतां, श्रमु ज़ाला; न वचे परुता. ॥ १ ॥ धृ ॥
तुझी कास धरीन, दातारा ! अवधूता ! परम दया करा ! ॥ छ ॥
आणिकाची संगति न साहे. दिगंबरा ! तुं माझी माये. ॥ २ ॥

(१४७८)

संसारु वनवडवानलुमाजि सांपडलें देवा ! पांगुलु. ॥ १ ॥ धृ ॥
आतां वोळसी कयी ? दातारा ! अवधूता ! दत्ता ! जळधरा ! ॥ छ ॥
दिगंबरा ! प्रयत्न कुंठले ! आतां तुज़वीण काहीं न चले ! ॥ २ ॥

(१४७९)

संसारव्याघ्र भयंकरू पासीं आला; कैसा सावरू ? ॥ १ ॥ धृ ॥
तुज़ हाक देऊंनि बोभायें ! अवधूता ! परतोनियां पाहें ! ॥ छ ॥
प्राणवेग ज़ाले कुंठित; दिगंबरा ! मनस भ्रमीत. ॥ २ ॥

(१४८०)

संसारसर्पें दंशिली ! मज़ भेटवा माझी माउली ! ॥ १ ॥ धृ ॥
तुझें मुख पाहिन, श्रीदत्ते ! प्राण गेलियां वरी न परते. ॥ १ ॥ धृ ॥
दिगंबरा ! तुझें दर्शन मज़ होइल अमृतप्राशन. ॥ २ ॥

(१४८१)

संसार कूपीं पडला, मार्गु नेणे देवा ! आंधला ! ॥ १ ॥ धृ ॥
मज़ हाकु देयीं श्रीदत्ता ! उडी घालीन वचें पारुता. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें स्मरण; नेणें आणिक येणें वांचूंन. ॥ २ ॥

(१४८२)

संसारबंधन न तुटे; माझें कवण विचारील गोमटें, ॥ १ ॥धृ ॥
येकें दिंगंबरें वांचूंन ? या कां वो ! तयां घेऊंन. ॥ छ ॥
दिगंबरु माझा कुंवासा सोडवील, आहे भरवसा. ॥ २ ॥

(१४८३)

संसारचक्रीं भ्रमतां, बहु काळ क्रमले श्रीदत्ता ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां भेटि करील कवण ? तुझे पाहिन येकुदा चरण. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझेनि स्मरणें क्षीण होती संसारबंधनें. ॥ २ ॥

(१४८४)

बाबुळेचा खोडीं माकोडा सेंडया जाये, पुडती ये बुडा. ॥ १ ॥धृ॥
तैसें मज्ज जालें दातारा ! करूं कित्ती दत्ता ! येरधारा ?
विश्रांति नाहीं तुजवीण. दिगंबरा ! देयीं दर्शन. ॥ २ ॥

(१४८५)

संसार संभ्रमु सोहोळा ज्ञाण त्रीदोषु मातें लागला. ॥ १ ॥ धृ ॥
उतार करीं सच्चिद्रसें, अवधूता ! दत्ता ! परियसें. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें दर्शन करिती ते अमृतप्राशन

(१४८६)

संसारु वैरी सरकला; वरि येउंनि हात उचलिला. ॥ १ ॥ धृ ॥
म्यां लाविले दोन्ही नयन; करितूंसें तुमचें स्मरण. ॥ छ ॥
दिगंबरा ! प्राणसखया ! धांव घेईं वा ! दत्तात्रेया ! ॥ २ ॥

(१४८७)

संसार दुःखासि कारण, जन्मु मरणा, जन्मा मरण ! ॥ १ ॥ धृ ॥
येथ मज्ज सूटिका न दिसे. कर्म वेगु न संवरे मानसें. ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझें दर्शन नसे आणिक कर्म विच्छेदन. ॥ २ ॥

(१४८८)

संसारु दुरुळ सासुरें, काम, क्रोधु, बहु जन माजि रे ! ॥ १ ॥ धृ ॥
येथें कासया मज्ज दीधले ? मुख दाखवीं परतोनि आपुलें. ॥ छ ॥
बापु तूं माये दिगंबरा ! कयीं नेसील सांगयीं माहेरा ? ॥ २ ॥

(१४८९)

संसार तापें तापला ! करपादीं अनळु पेटला ! ॥ १ ॥ धृ ॥
आधि व्याधि जडलासे नेटें; तुजवांचूनि देवा ! न तुटे. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं सर्वेश्वरु, लीलावीलासु, अमृतसागरु. ॥ २ ॥

(१४९०)

अध्यात्म भोगूं ? कीं दैविक ? ताप दुस्तर हें आधिभौतिक. ॥ १ ॥ धृ ॥
धिग्य प्राणु सहसा नव जाये ! अवधूता ! हें दुःख न साहे. ॥ छ ॥
वरि वियोगु तुझा दातारा ! बहु बाधक, ज्ञाण दिगंबरा ! ॥ २ ॥

(१४९१)

अहं ह्मणउनि आत्मगोचर कां गा ! धरितासि स्थूळ शरीर ? ॥ १ ॥ धृ ॥
तरि, द्रष्टा तो सांगकवणु अहंकारसाक्षी विलक्षणू ? ॥ छ ॥
अहंकारेंसीं स्थूळ वेगळें प्रकाशे तुझेनि येणें बोलें. ॥ २ ॥
दिगंबरीं प्रतीति रोकडी अहं सांडूनि ज्ञाण फुडाफुडी. ॥ ३ ॥

१४९२

ममतेचें करूंनि बंधन धरितासि तें चि, तें कवण ? ॥ १ ॥ धृ ॥
अर्धी ज्ञाण ज्ञाण रे ! सुज्ञाणा ! तूं कवणु ? धरितासि कवण ? ॥ छ ॥
स्वप्न जैसें, तैसी चि जागृती, दिगंबर ज्ञाणतां स्वस्थित्ती. ॥ २ ॥

(१४९३)

करकमळें ठेउंनी नीडळीं, लक्ष ठेउंनि दिशामंडळीं, ॥ १ ॥ धृ ॥
तुझी वाट पाहें अवधूता ! कैं देखइन येतां, धांवतां ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझेनि दर्शनें स्वस्वानंदें होईल पारणें. ॥ २ ॥

(१४९४)

बहु दिवस जाले माहेरा; भेटि नाहीं विज्ञानसागरा ! ॥ १ ॥ धृ ॥
तुझी वाट पाहें दातारा ! करीं पराति दत्ता ! माहेरा. ॥ छ ॥
श्रमु ज्ञाला, सांगों कवणा ? दिगंबर ! दाखवीं चरणा. ॥ २ ॥

(१४९५)

भववनीं सांडूंनि येकलें, कोठें गेलासि ? तें मज न कळे. ॥ १ ॥ धृ ॥
तुझी वाट पाहें नयनीं; अवधूता ! तूं माझी जननी. ॥ छ ॥
दिगंबरा ! न करीं कठिण; तुझा वियोगु मातें मरण. ॥ २ ॥

(१४९६)

जननी तूं जनकू तत्वता सत्य निर्धारु ऐसा जाणतां. ॥ १ ॥ धृ ॥
मज लाजिरवाणें होताहे; अवधूता ! सांगोंनि काये ? ॥ छ ॥
नाना योनीचे मज अपार, पिते साहावे केवि हें उत्तर ? ॥ २ ॥
ऐसें कां मज केलें ? दिगंबरा ! अपराधाविण, सर्वेश्वरा ! ॥ ३ ॥

(१४९७)

कित्ती म्यां जनक देखिले ! कित्यांचे कुचस्वेद चाटले ! ॥१॥धृ॥
ऐसें कां मज केलें श्रीदत्ता ! तुज ऐसा जनकु असतां ? ॥ छ ॥
दिगंबरा तुं माझी जननी, तरि दाविसी मज कां या योनी ? ॥२॥

(१४९८)

तुझा पुत्रु मी, हें साचार, तरि, मज कां पीते अपार ? ॥ १ ॥धृ॥
बहु लाज जाली, श्रीदत्ता ! न ये लौकिकी मज काहीं बोलतां. ॥छ॥
दिगंबरा ! तूं येकि जननी, तरि मज कां आलिया या योनी ? ॥२॥

(१४९९)

अंशी तुं, अंशु मी, श्रीदत्ता ! चिद्रसें जालें असतां, ॥१॥धृ॥
बहुतांचे पालव लागले; सप्तधातुक कां वरि पडले ? ॥ छ ॥
सर्वज्ञांप्राति काये सांगणें ? नेणें, साहातासि हें कवणें गुणें ? ॥ २ ॥
दिगंबरा ! सज्जन हांसती; काये उत्तर देणें तयांप्रति ? ॥ ३ ॥

(१५००)

ममतेचीं पाशबंधनें, जन भजविसी जनांकारणें. ॥ १ ॥ धृ ॥
कवणाचे कवण निदानीं ? सांग संगीं, जन्मीं, मरणीं ! ॥ छ ॥
दिगंबरा ! कळलें हें आमुतें; वस्तु चाले कवणाचा येथें ? ॥ २ ॥

(१५०१)

कां गा ! लाविली अर्थकल्पना ? गत, मृत, बहू गुण वेदना ! ॥१॥धृ॥
सेखीं मज जाणें येकट; अर्थु साधितां परम दुर्घट. ॥ छ ॥
दिगंबरा ! हे सृष्टी चि कां केली ? गुणधर्मैं प्राणियें गोविली ! ॥ २ ॥

(१५०२)

माव करूंनि प्रगुप्त जालासी; तें चि अज्ञान बळवंत जनासी. ॥१॥ धृ ॥
ऐसें कां बा ! केलें ? श्रीदत्ता ! कइं प्रकटसी ज्ञानसविता ? ॥ छ ॥

दिगंबरा ! तुझें अज्ञान, तें चि संसारबंधासि कारण . ॥ २ ॥

(१९०३)

आह्मा आमुचेनि कर्मबंधन ; सुटिका ते नाहीं तुजवीण. ॥ १ ॥ धृ ॥
ऐसें कैसें हें तुझें करणें ? देइजे कव्हाणप्रति गाऱ्हाणें ? ॥ छ ॥
दिगंबरा ! हे माव न करीं. होतें पाहिलें, तैसें चि तें करीं. ॥ २ ॥

(१९०४)

सर्वकर्ता तुज वीण कवणू ? अपराधी करितासि हा जनु. ॥ १ ॥धृ॥
आतां सांगणें काये कवणा ? अकर्ता ह्मणवीसी आपणा. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं सर्वचाळकु, ऐसा योगी जाणती विवेकू. ॥ २ ॥

(१९०५)

अविद्या कवणे निर्मिली ? माया रूपासि कवणे आणिली ? ॥१॥धृ॥
आतां काये तुजसीं बोलणे ? मनीं जाणोंनि उगलें चि असणें. ॥छ॥
दिगंबरा ! आह्मी कवण ? ऐसें पाहे सत्य विचारूंन. ॥ २ ॥

(१९०६)

तूं चि निमित्य समवायी कारण;
भिन्न विश्व हें कैंचें तुजवीण ? ॥ १ ॥ धृ ॥
कटिकें कित्ती करिसी साचार ? अवधूता ! जाणती चतुर. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं स्वरूपसन्मात्र; तद्वैत चि कैसें तदीतर ? ॥ २ ॥

(१९०७)

अंधाकरीची काठी सूटली; मग ते नव्हे तया आपुली. ॥ १ ॥ धृ ॥
तैसें मज जालें गा ! देवा ! अंतरलासि; भेटसी केधवां ? ॥ छ ॥
दिगंबरें वीण गति न दिसे. अंधकारु पडला दीव्रसें. ॥ २ ॥

(१९०८)

लोभियाचें देवा ! धन जैसें जाये, तें चि लागे त्या पीसें; ॥१॥धृ॥
तैसें मज जालें रे ! स्वजना ! तुजवांचूंनि कमळनयना ! ॥ छ ॥
दिगंबराचें पीसें लागलें; नूतरे तें येराचें बोलणें. ॥ २ ॥

(१९०९)

भेटि देईं, रे ! सखया ! स्वजना !
मायेबापा ! पुरवीं वासना ! ॥ १ ॥ धृ ॥

अवकाशु न दिसे श्रीदत्ता ! वयवेगु आटली सरिता. ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं तुझें किंकर; तुझें मज़ बहु पडलें अंतर. ॥ २ ॥

(१९१०)

आजि विषाचा मेघु वोलला !
मज़ आतां चि प्रलयो पावला ! ॥ १ ॥ धृ ॥
अवधूतु गेला सांडूनी; काये करूं ? सांगई साज़णी ! ॥ छ ॥
दिगंबरेंवीण मज़ न साहे ! प्राणपंचक सांडिन हे माये ! ॥ २ ॥

(१९११)

जीउ प्राणु तूं रे ! सखया ! तुज़ सोडूंनि न सवे आत्मयां ! ॥१॥धृ॥
अवधूता ! ज़ासील केउता ? पाहे परतोंनि माझी अवस्था ! ॥ छ ॥
दिगंबरा ! न करीं कठीण; निर्वाण पडताहे येउंन. ॥ २ ॥

(१९१२ ॥

सादु घाली, तो ज़ाये विनिर्फळु !
प्राणु माझा पडताहे विकळू ! ॥ १ ॥ धृ ॥
प्रतिसादु देईं अवधूता ! कयी नयनीं पाहिन अवधूता ! ॥ छ ॥
दिगंबरा ! हृदय नेणसी; दुःखसागरु भरलाहे मानसीं ! ॥ २ ॥

(१९१३)

क्षितितळ पाहातां कठीण; वरि शून्य, निरालंब, गगन. ॥ १ ॥ धृ ॥
आतां वाट पाहों केउती ? कोण ह्मणेल मातें आरुती ? ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं मज़ येकला ! परु नाहीं संसारीं आपुला ! ॥ २ ॥

(१९१४)

वियेगाचे खरतर सायक साहों न शकें; देवा ! मीं रंक. ॥ १ ॥ धृ ॥
आतां काय मेलें चि मारिसी ? संसारीं वियोगें हाणसी ? ॥ छ ॥
दिगंबरा ! निदान ज़ाहालें. रूप दाखवीं मातें आपुलें. ॥ २ ॥

(१९१५)

मागु पाहातां देखेंन पाउलें; न्हायेंन मीं तेणें मृगजळें. ॥ १ ॥ धृ ॥
तन्हि विश्रांति नेणें न दीसे, भेटिवांचूंनि दत्ता ! परियेसें. ॥ छ ॥
ल्लाट हाणेंन भूतळीं ! प्राणु ठेवीन त्या पादकमळीं ! ॥ २ ॥
दिगंबरा ! सत्य वचन आतां न पाहिज़ो तें निर्वाण. ॥ ३ ॥

(१९१६)

कवणाची आश करणें ? कवणाचा पुत्र ह्मणवणें ? ॥ १ ॥ धृ ॥
तुज़ ऐसिया असतां संसारीं, मायेबापा ! ज़ालों दरिद्री. ॥ छ ॥
दिगंबरा ! कैसें तुज़ न कळे ? निजांगा उणेपण आलें. ॥ २ ॥

(१९१७)

मातें कवणु ज़ाणें इतरू ? तूं सभाग्यु दत्ता ! ईश्वरू ? ॥ १ ॥ धृ ॥
आतां लाज़ कवणा ज़ाहाली ? चुकवावी कवणे आपुली ? ॥ छ ॥
दिगंबरा ! घडलें अनुचित; आतां कीज़ो यावरि उचित. ॥२॥

(१९१८)

ज़ेथें ज़ाये, तुझा तुझा ची ! वास न पाहे देवा ! आणिकाची ! ॥१॥धृ॥
आतां करिसील, तें करीं उचित; मिं तवं बापा ! सोडीं स्वमत. ॥छ॥
यमु दंडील तें हीं साहीन. तेथें तुझा चि पुत्र ह्मणवीन. ॥ २ ॥
दिगंबरा ! तूं सर्वज्ञ ज़ाणता; आतां होतासि कां बळें नेणता ? ॥३॥

(१९१९)

पाशबद्धासि ज़ो नरु सोडवी, तया धर्मिष्ठ ह्मणती अघवीं. ॥ १ ॥ धृ ॥
तया वधितां, पुरुषार्थु कवणु ? दिगंबरा ! नव्हसी कां ज़ाणू ? ॥छ॥
संसारें मीं दृढु बांधला, गुणकर्मीं असतां गुंपला, ॥ २ ॥
अवधूता ! वियोगें हाणसी; पुरुषार्थु कां ऐसा साधिसी ? ॥ ३ ॥
दिगंबरा ! टाके तें करीं; मीं वेचलों तुझां व्यापारीं. ॥ ४ ॥

(१९२०)

कित्ती शब्द हे बोलणें प्रखर ? तुतें न मनें माझें उत्तर. ॥ १ ॥ धृ ॥
आतां तुज़ उचित, तें करीं ! प्राणु देयीन मीं यया चि परी. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं तवं ज़ाणता; माझी कां पां नेणसी हे वेथा ? ॥ २ ॥

(१९२१)

स्मरणीं गुंतलें मनस, परतेना. भेटि घ्यावया होतिसे वासना. ॥१॥धृ॥
अवधूत जीवन गोरिये ! विण तेणें मनस न राहे. ॥ छ ॥
दिगंबर सकळश्रमहरण; तयाचें कैं देखैन चरण ? ॥ २ ॥

(१९२२)

सखी ह्मणे::—चंचळ न करीं, मन ठांइंचें ठांइं दृढ धरीं. ॥ १ ॥ धृ ॥

तेथें आंगें आंग भेटणें, आत्मयां ! दत्तात्रे ज़ाणणें. ॥ छ ॥
दृश्य दर्शन द्रष्टत्व सारिज़े; दिगंबर अधिष्ठान लाहिज़े. ॥ २ ॥

(१९२३)

कृष्णश्याम कमळनयनें मन माझें हरिलें देखणें. ॥ १ ॥ धृ ॥
मज़ तें चि तें ध्यान ध्यान लागलें; कैं देखैन स्वरूप सावळें ? ॥छ॥
दिगंबरें येणें वांचुन मज़ नावडे दुसरें वचन. ॥ २ ॥

(१९२४)

सखि ह्मणे:—तें मायिक सगूण; त्याचा योगु वियोगासि कारण.॥१॥धृ॥
सांडि तो भ्रमु गोचरु; सेवी आत्मा दत्तु निरंतरु. ॥ छ ॥
दिगंबरीं द्वैत चि लटिक. योग, वियोग, सर्व ही मायिक. ॥ २ ॥

(१९२५)

आत्मा तो, तरि का हे आवडी ? जीवें घेतली सगुणाची गोडी.॥१॥धृ॥
मज़ा सांगणां उमज़उंनि; रूप नावडे श्रीदत्तावांचूंनी. ॥ छ ॥
दिगंबराचे पाहिन चरण. नित्य प्रेम गुण सुखवर्धन. ॥ २ ॥

(१९२६)

आत्मा चि जरि तरि आवडी; भेदु ज़ालिया न विसरे मोडी. ॥१॥धृ॥
भेदें हीं तऱ्हीं परि आवडे. तया वेगळें मनस न पडे. ॥ छ ॥
दिगंबरीं भेदेसीं ऐक्यता वृत्त्यन्वयें पाहीं अखंडता. ॥ २ ॥

(१९२७)

सरसज़नयनु सावळा दृष्टीपासूंनि न वचे वेगळा. ॥ १ ॥ धृ ॥
तें रूप सुखद; सेवनें, मी चि तो, हें कैसें मज़ मानें ? ॥ छ ॥
दिगंबरीं मी मानस घालीन; नाइकें वो ! परावें वचन. ॥ २ ॥

(१९२८)

अनुसरलिये वृत्तीसि आश्रयो आत्मा चि तरि गुणी अन्वयो. ॥१॥धृ॥
सांग स्थान कवण आनंदा ? भेदु भज़तां अभेदु सर्वदा. ॥ छ ॥
उपज़लिये वृत्तीसि कारण कार्य सहचर तत्त्व निर्गुण, ॥ २ ॥
तें चि तें आनंदकार भान सदन्वयें सुख संस्फुरण. ॥ ३ ॥
सद्व्यतिरिक्त तें सर्व अशेष, तरी प्रेम चि नव्हे तें साभास. ॥ ४ ॥
वृत्त्यन्वयें तें प्रेम भोगिसी. दिगंबरु आत्मा केवि नेणसी ? ॥ ५ ॥

(१९२९)

भेदु भज्रतां अभेदु चि आपज्रे.

तरि, भेदें चि कां हें न सेविज्रे ? ॥ १ ॥ धृ ॥

माझें मनस गुंपलें सगुणीं; नुगवे तें शब्दश्रवणीं. ॥ छ ॥

दिगंबराची पाहातिसें वाटुली; माझी मनोवृत्ति तेथें गुंपली. ॥ २ ॥

(१९३०)

आत्मान्वयें सेवितां साकार, सेविलें होणें तत्व निराकार. ॥ १ ॥धृ ॥

परि ज्राण प्रपंचु तद्वतू; जग ब्रह्म, आत्मा शाश्वतू. ॥ छ ॥

दिगंबर आठवें, वीसरें; ब्रह्म ज्राणिज्रे अद्वय खरें ! ॥ २ ॥

(१९३१)

विश्व ब्रह्मत्वें भज्रतां, सखिये ! द्वैत प्रेम मीं तैसें न पाहें.॥ १ ॥ धृ ॥

माझें मन गुंतलें आवडी; तें दत्ताचे पाये न सोडी. ॥छ ॥

तरि विश्व हें मिथ्या मानीन; दिगंबरू सदन्वयें ध्यायीन. ॥ २ ॥

(१९३२)

देश, काल, नाम, परिच्छिन्न, रूप भज्रतां देवाचें सगुण. ॥ १ ॥ धृ ॥

योगविगोगातें लेंभासति, सुखदुःखद ते पुडतेपुडती. ॥ छ ॥

नित्यानंदपद तें निर्गूण सेवीं दिगंबर सनातन. ॥ २ ॥

(१९३३)

योगें आनंदु सगुणी ज्राहाला; तो ब्रह्मानंदाहूंनि आगळा ! ॥ १ ॥धृ॥

ऐसा प्रत्यक्षु अनुभउ आमुतें दत्तु सावळें परब्रह्म बोलतें! ॥ छ ॥

वियोगें ही कारितां स्मरण, तें चि होताहे प्रेमविवर्धन! ॥ २ ॥

प्रेमें ज्राला तो आनंदु भोगितां, वाटे विक्षेपु ब्रह्मात्मकथा! ॥ ३ ॥

दिगंबरातें मीं न सोडीं; माझें मन गुंपलें आवडी ! ॥ ४ ॥

(१९३४)

सखी ह्मणे::—बलवंत, प्राचीन, तुझें ऐसें चि आहे कारण. ॥१॥ धृ ॥

आतां इच्छा ते करीं बाइये ! अवधूतु परब्रह्म गोरिये ! ॥ छ ॥

त्रिण सागरें सैंधव न विरे; ऐसें असैल कांहीं येक खरें ! ॥ २ ॥

हित, अहित, सरिता न पाहे; सागरा चि माजि मिळों पाहे. ॥ ३ ॥

तैसें असैल कांहीं कारण, दिगंबराचें करितां सेवन. ॥ ४ ॥

(१९३५)

बंधु हा मज्ञ, तरि तो मीं साहीन ! निरंतरु ऐसा चि मागैन ! ॥१॥धृ॥
मीं हीत वीहित न मनीं; न स्मरें दत्तावांचुनी. ॥ छ ॥
संत हांसती, तें मीं साहीन ! अवधूताची दासि होईंन ! ॥ २ ॥
दिगंबरीं प्रीति रातली; आतां मीं मज्ञ नव्हे आपुली ! ॥ ३ ॥

(१९३६)

तुझी दासि बहुतां काळांची नव्हें कामाळू, ज्ञाणतासि ठाईंची.॥१॥धृ॥
बैस ह्मणसी तेथें बैसेन. दोन्ही चरण नयनीं पाहिन. ॥ छ ॥
पुरे उछिष्ठु येकू चि कवळू ! दिगंबरा ! मीं नव्हे भुकाळु ! ॥ २ ॥

(१९३७)

थोटें पांगुळ तुझें मीं दासिरूं, मागें उच्छिष्ठु पसरूंनि पदरू ! ॥१॥धृ॥
दत्ता ! आंगण झाडीन कबरी ! शरीरें लोळैन भूमीवरी ! ॥ छ ॥
द्वार सांडूंनि हें दिगंबरा ! तुझी आण न वचें परवरा ! ॥ २ ॥

(१९३८)

थोटें, पांगूळ, मीं मूक, बधिर, तुझें रूप चि पाहिन साकार ! ॥१॥धृ॥
मातें " उठि " न ह्मणा कव्हणी ! दत्तें बैसाविलें मज्ञ ये स्थानीं ! ॥छ ॥
क्लेश न करवे मातें, दातारा ! आंगहीन मीं ज्ञाण दिगंबरा ! ॥ २ ॥

(१९३९)

ज्ञान करूं, तरि अंग चि न कले; कळलें, तरि मनस नातले ! ॥१॥धृ॥
तुझें रूप धणीवरि पाहीन ! तेणें वांचूंनि न रमे हें मन ! ॥ छ ॥
ध्यान तुज्ञवीण मनस न धरी ! दिगंबरा ! मीं आणिक न करीं ! ॥२॥

(१९४०)

दत्तें ! कुरंगिणी ! मीं तुझें पाडस; पाशबद्ध, चंचळ करी मनस.॥१॥धृ॥
आतां धांव घे मज्ञकारणें ! छेदीं गुणकृतें भवबंधनें ! ॥ छ ॥
दिगंबरे ! न कळे तुझा अवसरू ! वाट पाहातिसें ! न धरी मज्ञ धीरू ! ॥२॥

(१९४१)

अवधुते ! तुं घ्येनुं, मीं वो ! वांसरूं ! स्तनपान चि माझा आहारू ! ॥१॥धृ॥
अति कंठु माझा सोषला ! जठराग्नि अंतरीं पेटला ! ॥ छ ॥
सादु घालितां उत्तरु नें दीसी ! वेळु लागला ! कें गुंपलीसी ? ॥२॥

तृणचारु सांडूनि मुखिचा, धांव वेद्दं ! मोहो धरीं आमुचा ! ॥ ३ ॥
दिगंबरेचा शब्दु श्रवणीं आइकिला; आली जननी ! ॥ ४ ॥

(१९४२)

अवधूते ! तुझें मीं लेंकरूं ! हातु न साहे मज माये ! इतरू ! ॥१॥धृ॥
मातें आंग सोडूंनि न सवे ! बहु काळ तुझी मज सवे ! ॥ छ ॥
आच्छादेन तुझां उदरीं ! दिगंबरे ! घालीं पालउ मजवरी ! ॥ २ ॥

(१९४३)

अवधृता ! दयामृतजळधरा ! मीं जलचरु तुझें दातारा ! ॥ १ ॥धृ॥
वियोगें पावैन मरण ! तुझें उदर तें माझें जीवन. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं धरि कां अंतरीं ! काळु तपिया तपतूसे बाहेरी. ॥२॥

(१९४४)

दुडु दुडु दुडु धांवत येईन; आंगा मीं वरि आंग घालिन. ॥ १ ॥ धृ॥
बाळक मीं पोटिचें; मार्यादा, हें ज्ञान कईचें ? ॥ छ ॥
दिगंबरा ! हें सत्य ? कीं लटिक ? साक्षि देइजे; तें नाहीं आणिक. ॥२॥

(१९४५)

दुडु दुडु दुडु पासीं येईन; दाटिसी, तरि उगा चि राहिन. ॥१॥धृ॥
पाणियें रे ! भरले लोचन ! काये पाहातासि ? दे आलिंगन ! ॥छ॥
दिगंबरा ! उभडु न संवरे ! तुजमजमध्यें नाहीं दुसरें ! ॥ २ ॥

(१९४६)

दुडु दुडु दुडु दुडु दुडु येईन ! जानूंवांचूंनि न करीं आसन ! ॥१॥धृ॥
तुझें महिम्न काहीं न कळे ! मायेबापु हें जीवीं बैसलें. ॥ छ ॥
मीं इतरु नव्हे, दिगंबरा ! आत्मयां ! विज्ञानसागरा ! ॥ २ ॥

(१९४७)

दुडु दुडु दुडु पासीं येईन; दृष्टि मुरडीसी, तरि रुसइन ! ॥ १ ॥धृ॥
संसार कोनटां बैसली. करीं रुदन; तुवां दुराविली. ॥ छ ॥
आणिकाचेनि न यें सर्वथा गुरु तुजवीण. न करीं श्रीदत्ता ! ॥ २ ॥
ऐसें जाणोंनि आला दिगंबरु ! श्रमु हरिला तेणें समग्रू ! ॥ ३ ॥

(१९४८)

आलियें मीं तूज चि कारणें ! तुवां सांडिलें मजप्रति पाहाणें ! ॥१॥धृ॥

आतां ठाईं चि विरोनि ज्राईन ! जीउ यये चि क्षणीं देईन ! ।। छ ।।
दिगंबरु ह्मणे::—पाहाणें न अंतर सांडी पाहाते नसीं तू समग्र! ।।२।।

(१५४९)

श्रमु ज्राला ह्मणउंनि आलियें ! तुझें मोन देखोंनि परतलियें ! १।।धृ।।
मज मीपण आंगीं न साहे. दत्तें सांडिली बोलाची सोये ! ।। छ ।।
दिगंबरु ह्मणे::—सशब्द दुःखद; भोगी निःशब्द निजानंदपद. ।।२।।

(१५५०)

क्षेम यावया आलियें धावोंनि ! रूप ठेलासि कां आच्छादुंनी ? ।।१।। धृ।।
धिग्य ! माझी भेटि या न साहे ! आतां शरीर सोडीन अनुपायें ! ।।छ।।
दिगंबरु ह्मणे::—देह सांडूंनी भेटी येपां माझां येकपणीं ! ।। २ ।।

(१५५१)

पाहावया आलियें चरण; माझे हारपले दोन्ही नयन ! ।। १ ।। धृ ।।
आतां, परतोंनि ज्रावया न कळे ! पुढें होतां, पंथु न नीवळे ! ।।छ।।
दिगंबरू ह्मणे::—विण दृष्टी पाहाणें; ठायीं ठाउंचि ज्राणोंनि असणें.।।२।।

(१५५२)

गुणमहिमा श्रवणीं आइकिली; तें बा ! दाखवीं मातें आपुली !।।१।।धृ।।
कां करितासि आड गगन ? शून्य होताहे माझें मीपण. ।। छ ।।
दिगंबरु ह्मणे::— तुं मीं न संचरे ज्राण महिमान माझें तें खरें ! ।।२।।

(१५५३)

आलियें करूं गुणसंकीर्तन; कां धरितासि माझें वदन ? ।। १ ।।धृ ।।
मीमाजि माठउ बुडाला ! संसारु वार्या वीण गेला ! ।। छ ।।
दिगंबरु ह्मणे::—अनाठवें निर्विकल्प कीर्तन बरवें ! ।। २ ।।

(१५५४)

आशा धरूनि आलियें जवळी ! तुवां मातें दाविली पोकळी ! ।।१।।धृ।।
स्थीत माझें सर्वस्व हारपलें ! देणें घेणें दिसताहे कुंठलें ! ।। छ ।।
दिगंबरु ह्मणे::—सर्व हारवीं ! मग असवें सर्व अनुभवीं ! ।। २ ।।

(१५५५)

मळनीदळगत जळ चंचल ढळमळ करी; परी नव्हे निश्चळ. ।।१।।धृ।।
तैसें प्राण चंचळ शरीरीं ज्राती, नकळे कवणे अवसरीं ! ।। छ ।।

दिगंबरीं स्थीरु राहीं रे ! मनसा ! क्षिण क्षणक्षणा ज्ञातिसे वयसा. ॥२॥

(१९९६)

ढल ढल ढल मल ज्ञळे दीपकू; तयावरि पतंगु पैं येकु ! ॥१॥ धृ ॥
तैसें मज्ञ ज्ञालें, दातारा ! तुज्ञ सांडूनि वरि पडे संसारा ! ॥ छ ॥
मन चंचल चलताहे वीकारी ! स्थीर केंवि होये दिगंबरीं ? ॥ २ ॥

(१९९७)

सर सर सर सरताहे सरिता ! मृगजलपुरु वाहे परि रीता ! ॥१॥ धृ ॥
तेथें वेधले मृग धांवती ! तैसी ज्ञाली देवा ! मज्ञ गती ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुतें सांडूनि करितांहें संसारसोसणी ! ॥ २ ॥

(१९९८)

जन, जन, जन, धन, धन सोषितां काळु ज्ञातसे वायां विण रीता! ।१।धृ॥
क्षणु निश्चळ न राहे ! दशदीशा मनस भ्रमताहे ! ॥ छ ॥
दिगंबरा ! हें सांगिज्ञे कवणा ? आत्मघातकी मीं ज्ञाणु येसणा. ॥ २ ॥

(१९९९)

धन, धनद, सनद, वन, जन, जाया
नित्य सेवितां मानव्य गेलें वायां ! ॥ १ ॥ धृ ॥
आतां पावलें मज निदान ! तें मीं अवघें चि जातेंस सांडून ! ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं बहु काळ ठकलों ! पासीं असोनि तुज्ञ अंतरलों ! ॥२॥

(१९९०)

क्षितितलगतसमल जल स्थिल्लर; तेथें आनंदु करीती दर्दुर. ॥ १ ॥ धृ॥
संसारु तैसा, रे ! जना ! काये भज्ञतासि विषयवासना ? ॥ छ ॥
दिगंबरु परानंदसागरु सेविज्ञा कां लीलाविश्वंभरु. ॥ २ ॥

(१९९१)

खर प्रखर किरणगण प्रतपती ! मीना काइसी ढिल्लरिं विश्रांति ? ।।१।।धृ।।
आतां नित्य चिंती जलधरा; तेणें वोललेन; मी ज्ञाईन सागरा. ।।छ।।
हें चि मनसा ! तुज्ञप्राति सांगणें नित्य दिगंबरु अनुचिंतनें. ॥ २ ॥

(१९९२)

पलें पल, पल, ज्ञातसें वयसा; कां रे ! न संडिसी पल पल? मनसा! ।।१।।धृ।
पल, तृटि, लव लात्री कारणीं, अवधूता येकाचा घ्यानीं. ॥छ ॥

दिगंबरें वीण विश्रांति न दिसे. हित, विहित, सकल तो परियसें. ॥ २ ॥

(१९६३)

मृगजळीं तारू घातलें, परद्वीपा ज्ञाउंनि लागलें;
अविनाश केणें भरलें; ज्ञाली भरणी; पुडती मुरडीलें. ॥ १ ॥ धृ ॥
तेथें माज्ञले मीन तळपती; केणें देखोंनि विलयो पावती. ॥ छ ॥
कर्णधारू मीं चि, मीं येकला; सूत्रायें पेलू चि लागला. ॥
दिगंबरें दृष्टी देखिला माझा उद्यमु; मनीं आनंदला. ॥ २ ॥

(१९६४)

परद्वीपुनि आली भरणी; येथें वर पडि न करा कल्हणी.
केणें पडखर आइका श्रवणी. कोण साहिल मुदलाची हानी? ॥ १ धृ ॥
बहु बोलि कां मज्ञ न साहे. मनधरणीच्ना जनु पढिये ॥ छ ॥
जीउ द्या! तरि वित्त दावीन! पाहे तयाचें नयन चि फोडीन! ॥
आंगें आंग युद्ध करीन! दुजयाचें सर्वस्व हरीन! ॥ २ ॥
सर्वस्व आर्धी देइज्ञे; मग मीपण उघडूंनि पाहिज्ञे;
दिगंबर चि अवघें लाहिज्ञे; लक्ष लभु त्यावरि वारिज्ञे. ॥ ३ ॥

(१९६५)

कासविच्ना पान्हा पीलिला; तो मुरवण देउंनि विरजिला;
गगनाच्ना डेरा भरिला; तेथें गुसळणी घातला आंबुला. ॥ १ ॥ धृ ॥
कैसी मलपाति गुसली गौळणी? तीच्ना पालउ रूले धरणीं! ॥ छ ॥
निस्सार भागु निवडला; सार नवनीत झेलिते वेल्हाळा.
सत्पाकीं सद्रसु आतला; ते दिगंबरू ह्मणे आपुला! ॥ २ ॥

(१९६६)

छाया माझी मज्ञवरि परतली; पळें, तंवं तंवं पाठीं लागली;
ते म्यां उचलूंनि खांदीं घेतली; टाकिन मीं पैले पोकळी. ॥१॥धृ॥
बोलणें मज्ञ न साहे! सिकवण नाइकें गोरिये! ॥ छ ॥
छायेचा पिंजु मीं पींजीन! तदन्वयो यावरि कांतण!
बहु पातल सेला विणवीन! दिगंबरातें समर्पीन! ॥ २ ॥

(१९६७)

स्वप्नींचें सेत जागरीं पाहा! पाहा! पाहा! खादलें पांखुरीं!

गगनावरि उभा सोंकरी हाणें गोफण, तुमटे पागारीं ! ॥ १ ॥ धृ ॥
पाखुरवीं बहु नाडिलें; सांडीन सेत मीं आपुलें ! ॥ छ ॥
बहु काल होतें पडिलें ! आंग मोडूंनि तें म्यां वाहिलें !
काटवण कित्ती छेदिलें ? ते क्लेश चि मातें फललें ! ॥ २ ॥
पाखिरूवा कणस खातसे ! सोकरें, त्यामाजि न दिसे !
दिगंबरें केलें अनारीसें ! सेत खावों चि लागलें माणुसें ! ॥ ३ ॥

(१९६८)

दृष्टी पडलें, तें खायीन ! भेषज ह्मणिजे तें आइकैन !
क्षय, व्याधिंचे करा हरण ! परमार्थीक तुह्मीं सज्जन ! ॥ १ ॥ धृ ॥
जीवातें भ्रमु जाकली ! छाये न दीसे साउली !
मनातें भ्रमु जाकली ! दृष्टीतें भ्रमु जांकली ! ॥ छ ॥
भक्षीन कुपथ्य मीं अवघें ! अतिपथ्यावरि मज्ञ न सवे !
दिगंबरू ह्मणें::— बरवें ! येणें पालटु होईल स्वभावें ! ॥ २ ॥

(१९६९)

मृगजलीं उडी घातली ! बुडि देतां, सांगडि तूटली !
पडलों मीं आथि खलालीं ! थाकु न लगे रीता पोकली ! ॥१॥धृ
सांगणें काये ? कवणा ? मरणाची होतिसे वासना ! ॥ छ ॥
डोहीं तीरस्थ बुडालें ! माझें मीपण ज्ञातसे खलालें !
दिगंबरें कैसें तारिलें ? माझें मरण मज्ञ भेटवीलें ! ॥ २ ॥

(१९७०)

कोरडां नदीं विश्व बुडालें ! तेथें बुडोंनि मज्ञ म्यां काढिलें !
गगनीं तें नेऊंनि ठेविलें !
माझें मज्ञ चि कांहीं न कले ! ॥ १ ॥ धृ ॥
चीत्त दुश्चित्त होताहे ! माझें मीपण तें कोठें आहे ? ॥ छ ॥
जलचरांची अतिशयें आटणी ! परि तें वांचलें तया ग्रसूंनी !
घापीं ते कव्हणी आणुनी ! न राहे मीं तयावांचूंनी ! ॥ २ ॥
मागु घेतां, विपरीत ज्ञाहालें ! माझें मज्ञमाजि तें होतें संचलें !
दिगंबरें नकलेकाये केलें ? विश्व अवघें तारक भासलें ! ॥ ३ ॥

(१९७१)

सर्व विसरलों तुमच्येनि स्मरणें.
रूप पाहावया आसक्तु येणें मनें ! ॥ १ ॥ धृ ॥
संसारपर जनीं असतां, बहू श्रमलिये बापा ! अवधूता ! ॥ छ ॥
दिगंबरा ! तुझेनि स्मरणें, योगु, साधन, तें मज न मनें ! ॥ २ ॥

(१९७२)

योगधन तूं मज येकु, श्रीदत्ता ! सिद्ध ज्ञालों मी तुजकरितां ! ॥१॥धृ॥
संसारभय मज काइसें ? योगिराजा विनटलों मानसें ! ॥ छ ॥
दिगंबरा ! परब्रह्मसाकारा ! आत्मा तूं विज्ञानसागरा ! ॥ २ ॥

(१९७३)

जलीं जल चले चंचल लहरी; तैसा मीं भजें विज्ञानसागरीं ! ॥१॥धृ॥
आतां नामकीर्तन करीन ! तेणें आनंदें विलया ज्ञाईन ! ॥ छ ॥
दिगंबरा ! मीं तुजमाजि संचरें ! भिन्नपणें करूंनि उरें ! ॥ २ ॥

(१९७४)

करुणामृतजलधरु वोलला ! दत्तु हृदयभुवनि मायें ! प्रकटला ! ॥१॥धृ॥
माझें चित्त विरोनि ज्ञातसे. उरिजे अंग चि न दिसे ! ॥ छ ॥
दिगंबराचें होतां दर्शन, भेद त्रिविध ज्ञाती वितुलोंन ! ॥ २ ॥

(१९७५)

ज्ञानासगरा आलें भरितें. तारू पेलिलें मनस हें तेथें. ॥ १ ॥ धृ ॥
आतां रत्नबेटासि जाईन; तेथें माझे सखे स्वजन. ॥ छ ॥
दिगंबरा ! तूं माज्ञा तारकु; पारु पावविता नाहीं आणिकु. ॥ २ ॥

(१९७६)

जलीं जल विरे, जैसी लहरी; तारु चालतसे तैसीया परी. ॥१॥धृ॥
आधिं निगुणीं होये मीलणी. मग तें पद समीप तेथूंनी. ॥ छ ॥
दिगंबरें तारूं बुडउनि तारिलें. म्यां तें द्वीप रत्नमय देखिलें ! ॥ २ ॥

(१९७७)

परद्वीपीं केर्मे मरीन कृष्णश्याम कमळनयन. ॥ १ ॥ धृ ॥
बहू मार्गे सूकाळु ज्ञाहाला ! दत्तु त्रीजगती प्रकटला ! ॥ छ ॥
दिगंबराची आली भरणी वरपडि न करावे कुव्हणी ! ॥ २ ॥

(१९७८)

येक मनस आपुलें देइज्ञे; मग टाके तें केणें भरिज्ञे. ॥ १ ॥ धृ ॥
बहु दूरूनि आणिलें सूवर्ण केणें मंत्र आगम लक्षण. ॥ छ ॥
दिगंबरें विण ग्राहक न कले; पार्सी मिनले, ते जन आंधले ! ॥ २ ॥

(१९७९)

प्रेम ठेउंनि नाम घ्या! घ्या! रे! गुणकीर्तन बहुगुण सार्जिरें! ॥१॥धृ॥
आतां हें न ये पुडती संसारा ! परतोंनि मागुती ! ॥ छ ॥
दिगंबराचें नाम पावन; अतिदुर्लभ गुणसंकीर्तन ! ॥ २ ॥

(१९८०)

शुद्ध, सात्विक, अनन्यमनस, योग्य सुवर्ण हें असे तयांस! ॥१॥धृ॥
येरे न करा वरपडी ! मीं मुख मांद्दस नूघडीं ! ॥ छ ॥
दिगंबराचें हें सुवर्ण ने चोंरूनि, तयासि पतन. ॥ २ ॥

(१९८१)

नारिकेलें आदिकरूंन दान केणें भरा कांचन ! ॥ १ ॥ धृ ॥
अर्थीचि करूंनि संसाटि, पद जोडा मरणा सेवटीं ! ॥ छ ॥
दिगंबरासि बहुगुण आवडी; तुह्मीं करा कां येथ वरपडी ! ॥ २ ॥

(१९८२)

अग्निमुखि जलोंनि उजले, ऐसें केणें असे येक आणिलें ! ॥१॥धृ॥
तेथें कां न करा वरपडी ? देवा बहुसाल त्याची आवडी. ॥ छ ॥
दिगंबरा ऐसा अर्थु लाहिज्ञे; घेतलें चि तरि तें पाहिज्ञे ! ॥ २ ॥

(१९८३)

मनातें नुरउंनि ध्यानें चित्ता हरूंनि,
रतु कवीमानसनिकेतनिया देव दिगंबरु
अनसुयाकुमरु श्रीकृष्णश्याम निरंजनु सगुणु. ॥ छ ॥

(१९८४)

॥ उजू ॥

येणें वो ! गुणीं गोविलें वो! पराति ने घे, रातलें मन वो ! सैये ! ॥१॥धृ॥
आतां येणेंसीं भेदु मज्ञ क्षणु न साहे ! करूं काये ? वो! सैये! माये! वो! ॥छ॥
जाइन सर्वे जाइन; देउ दिगंबरू मीं काये सोडीन ? ॥ २ ॥

(१९८५)

॥ जाति ॥

वदनप्रभा देखोनिया दिपले सुर, नर, माया !
पावनगुण चरणांवरि लोलति योगेश्वर;
सामगायनें गर्जती; येक मुखशेष मागती; अरे !
नाना गीतीं वर्णिती; अरे ! सेविती ! आळवीती ! ॥ २ ॥

(१९८६)

॥ भिन्न प्रबंध ॥

साधक कर्षिले वळितां न वळे संदिग्ध हीत संगति रे ! ॥ १ ॥
वादसमुद्र पार पावति नावरिती दुर्मन
तामसवृत्तिसंयोगसक्तैक रे !
संपादीं विवादीं अनुवादीं प्रतिशब्दीं गुणावीण न दीसे. ॥ छ ॥
स्मर ज्ञान वक्रगति सागि वेधु तो विकारु रे !
दिगंबरें भाव नुरे ! ॥ २ ॥

(१९८७)

॥ धानाश्री. ॥

अवधूता! तुझी आण मज आतां ! तुझा वियोग न साहे ! ॥ १ ॥ धृ ॥
नको दुरि धरूं रे ! वरदा ! निवारिं वा ! संसार आपदा ! ॥ छ ॥
नयन क्षीण जाले दिगंबरा! येईं देवा! नको दूरि ! ॥ २ ॥

(१९८८) *

इष्ट संगु त्यावरि नाहीं माझी मज चिंता त्यावरि तुं ऐसा. ॥१ ॥ धृ ॥
काये नेणों तूं रे ! अझुणी ? पाहासी पैं दिनाची करणी? ॥ छ ॥
नलगे क्षणु तुवां मानसीं धरितां! दिगंबरा ! जाण देवा! ॥ २ ॥

श्री

।। श्रीमदादिगुरवे दत्तात्रेयाय नमः ।।

प्रबंध

(श्रीमद् भगवत्भक्त दासोपंत कृत.)

(१५८९)

अजा ! निर्गुणा ! निर्जना ! निर्विकारा ! परा ! पूर्णबिंबाद्वया ! योगसारा !
सुर, सिद्ध संसेविती पूर्णपरा ! तुतें वर्णितां पैसु नाथी विचारा ! ॥१॥
अमायात्मका ! चिद्घनानंदमूर्ती ! परब्रह्म सर्वांसि तूं आदि अंती.
तुतें वर्णितां, वेद न योती व्यक्ती. अतद्वादता शंकले ' नेति नेति. ' ॥२॥
दयामंदिरा ! विश्वबीजा ! पुराणा ! निराकार साकार तूं, विश्वमाना !
तुझा बोलतां योगु वाचेसी ये ना ! कईं भेटसी देवदेवा ! निधाना ! ॥३॥
शिवा ! श्रीधरा ! श्रीकरा ! सिद्धिराजा !
धरूं केवि मीं आत्मयां ! भाव दूजा ?
स्वयें नूरणें, हेचि निर्वाणपूजा. जपें जपु तो निर्विकल्पें चि वोझा ! ॥४॥
ऐसा तूं परमात्मयां ! पुरपती ! मायांधकारांतका !
सर्वज्ञा ! सकळार्थदा ! सुरगुरो ! सयोगियां सेवका !
तूझा किंकरु होय जो निजमनें सांडोनि अर्थादिकां
पाता तूं भवरोगियां शिवशिवा ! तया प्रिया बाळका. ॥ ५ ॥
वासरमणि तमसार्कु ते नाशी स्वजनदयाकर माया तैसी.
ज्ञाणिव नेणिव न ढळे मनसी गुरु प्रज्ञा मी वर्णु कैसी ? ॥ ६ ॥
विषपरि पियुषे मय तव वचनें अवधूता ! परमार्थे ज्ञाणें.
नावडती मज्ञ आणिक ज्ञानें ज्ञान नव्हे ज्ञेयाचें जेणें ॥ ७ ॥
चंचळपण मन ह्मणिजे वारा वारुनि वेदन धांवे सैरा
सैरपणें कर्मा दे थारा थारेना सर्वज्ञा ! धीरा ! ॥ ८ ॥
तैसें मन मज्ञ न वळे देहीं देहेंसीं दुरि धरितां पाईं
वरदा ! तें तुज दिधलें वेईं मन माझें वश कीजो पाईं ॥ ९ ॥
ऐसा मीं तुजमाजि भेद भजतां, भेदें चि निर्भेदता
सत्याचा गुणगायनीं श्रुतिपरू रूपाचियां शुन्यता

सर्वत्रैकरसाद्वयाव्ययमती ब्रह्मैकरूपाच्युता !
दत्ता ! दीनदयाकरा ! जय गुरो ! तूं येक माता पिता. ॥ १० ॥
धनांची जना वासना भ्रांति मोटी उपायार्थ संपादिती बुद्धि खोटी
वय वेंचलें सर्व हीं त्यां चि पाठीं अघ सांचलें कर्म हें लक्ष कोटी॥११॥
दयाधर्म नेणें सदा दीनवाणा घनलोभिया अर्थ भोगासि ये ना.
तेथें वासना योकि ते सांडवे ना जडें पाप तें दाखवीं जन्म नाना. ॥१२॥
धन सांडुनी पाप केंणें पसारा भरी तो नरू उद्यमी येक खरा.
विनाशू चि त्या आंवडि निर्विचारा:
कसा जातसे येकला देशांतरा. ॥ १३ ॥
असा जन्मुंनी वेंचला येक प्राणी अवीहीत तें सर्व हीत चि मानी
देवा ! विश्व हें मोहिलें यांच गुणीं
तुर्ते मैणती नेघती शब्द कानीं. ॥ १४ ॥
ऐसी हे धनवासना जय गुरो ! सर्वज्ञनाथा ! शिवा !
हीतार्थी विपरीत भाव भजवी अज्ञानबद्धा जिवा.
माया हे भवभूमिका गुणमयी कां सिद्ध केली तुंवां ?
तुझा पंथु गणाश्रया गुणराया मोडला आघवा. ॥ १५ ॥
नदिनदगत जळ झळझळ वाहे पाणी परते ना स्थिर राहे
तनुगत चळ वय तैसें वाहे लव त्रुटि पळ पळ क्षिणता होये. ॥१६॥
जन; वन; यौवन; तनु, धन, जाया बंधन हे वरि पडली माया.
श्रमला जिउ न पवे त्या ठाया तूं जेथें वससी गुरुराया ॥ १७ ॥
चंचळ चळ द्रव द्रवती धारा नदिनदगत जळ धावे सैरा.
चातक वरपडि न करी धारा बिंदु भजे परि न भजे येरां. ॥ १८ ॥
तैसा मज तुजवांचुनि दुसरा तारकु न मने, ऋषिकुळकुमरा !
दत्ता ! गुणमयु वाजे वारा; तव रूपीं मज देपां थारा ! ॥ १९ ॥
सर्वत्री तनु मानियां बहु जडां आस्थानसे निर्गुणी
सारासार विचारसार भजतां संयोजिती खात्रणी
शब्दीं दोष विशेष पाहुनि बळें निभ्रंशिती दाटुंनी
आतां ते जन वंदिले बहु गुणें गुरुत्व भ्यां ठेउंनी ॥ २० ॥
जनाचा जना द्वेषकर्त्यास वैरी अहंकार तो हाणतां खड्गधारी

मदें मत्सरें मातला; काय करी ?
कटा घेतला कामक्रोधें विकारीं ॥ २१ ॥
वदे तामसें शब्द वादा चि वारी जळे सर्वांग संगु शांतीसि वैरी
तयाचा जना देवदेवा ! निवारीं उपदेश तो ऐसिया काय करी ? ॥२२॥
अहो ! काष्ठिचा वन्हि काष्ठासि खाये भला तेथ जो सलिल होऊनि राहे.
कसा जिंकिला सत्वयोगें उपायें मरे तामसें मंत्र तो हा चि लाहे. ॥ २३ ॥
देवा ! हें चि मागतुसें सत्व देईं बुडो चित्त विश्वंभरा ! शांतिडोहीं !
दयामंदिरा ! भाव ठेवीन पाईं म्हणें मी चळें पारिकांचा ळिलां हीं ॥२४॥
आत्मा तूं परमात्मयां ! सुरपती ! संसारदावानळा !
संदिग्धां भवरोगियां शिवशिवा ! कैं भेटसी ? श्यामळा !
ऐसा कें परमार्थ भक्त कत्रणां कृपा तुझी ये फळा ?
त्राता तूं करुणार्णवा ! पुरपती ! होईं जडां व्याकुळां ! ॥ २५ ॥
चित्त रमे धनदारामध्यानीं पाद निरंतर तीर्थां करणीं
श्रमु देहीं बहु निद्रा नयनीं. तव गुणगायन कैंचें श्रवणीं ? ॥ २६ ॥
रस विषयांवरि धावे रसना ! शांति पळाली ! गेली राना !
रानट कुंजरु भ्रमतां मदना क्रोधी गुरुगुरु करितो, सूना ! ॥ २७ ॥
हृदयीं बळ कामाचें मोटें घे दे तरि खरियाचें खोटें
निंदकु दुर्जनु घाता पेटे निर्नाशिक वरि शंका न वटे. ॥ २८ ॥
ऐसा तो नरु परति न लाहे पळ पळ चळ वय वायां जाये
तो ही जरि धरि गुरुचे पाये पावन मग तो पहिला नोहे. ॥ २९ ॥
ऐसा सद्गुरु सेवितां कविजनां संप्राप्ति जाली कळा
योगानेकविवेकसार पदवी कैंची जडां व्याकुळां ?
देहीं देह विदेह योगभजनें सर्वज्ञ संतासला !
ऐसा तो गुरुराजता अनुभवें संवेदनें पावला. ॥ ३० ॥
मक्षिसळगत जळ चंचळ सरिता पावतु जलधरु भरिली भरिता.
तन्मय निश्चळ जळिं जळ जळता पूर्वोपाधी ने वे खलुता. ॥ ३१ ॥
तैसा अनुभउ ज्ञाण सुज्ञाणा ! मन मुळ ज्ञाणुंनि ये जो स्थाना,
भेदु नसे कल्हणेंसीं कल्हणा विनाशु तनुगुण गणितां भाना. ॥ ३२ ॥
घट मठ पट तत्तत्तन्नाशें गगनि गगन न गमे गमितां तैसें

ब्रह्म निरंतर द्वैत विनाशे सहज सनातन नभ नभ ग्रासे ॥ ३३ ॥
ज्ञाणितलें मग ते खुण नाहीं नेणिव ठाईंचि पडली घाईं
मीपण गाळुनि ठेला ठाईं सहज्ज दिगंबरु येक अदेही. ॥ ३४ ॥
ऐसा तूं सुरनायका ! सुरपती ! दीनार्तिसंन्नाशना !
मायामोहनिवारणा ! दिनमणी ! जग तुझी ईक्षणा.
संसारीं भवरोगियामृतकरा ! देवादिसंदीपना !
दत्ता ! तूं गुणगायनीं प्रकटसी; संपादिसी कामना. ॥ ३५ ॥
शिवा ! अव्यया ! सर्वसंदेहनाशा ! परब्रह्म तूं विश्वभासा ! उदासा !
परिव्राजका ! येक तूझी चि आशा
दयामंदिरा ! श्रीगुरो ! जी ! महेशा ! ॥ ३६ ॥
अजा ! निर्मळा ! निष्कळा! निर्विकारा ! परा ! पूर्णब्रिम्राद्वया ! योगसारा !
परब्रह्म तूं विश्वभासा ! अपारा ! कईं भेटसी ? योगिराजा ! उदारा ! ॥३७॥
अहो ! सच्चिदानंद संपूर्णपणें असे व्यापिलें विश्व येकें चि येणें !
खुण अंतरीं ज्ञाणता तो चि ज्ञाणे
बळी दीधला जीव जीत चि येणें. ॥ ३८ ॥
परब्रह्म नीरंजना आत्मयातें भज्ञा रे ! भज्ञा श्रीगुरो योगियातें !
ज़ग तन्मय आतले विश्व ज़ेथें नुरे त्रीपुटी शुन्य आकाश रीतें. ॥३९॥
ऐसा सज्जनसंगमीं सुखकरीं विश्रांति पावे मना !
नाहीं रे ! परमार्थ तीर्थभ्रमणीं कां मोहिसी आपणां ?
मायाविभ्रम सांडिकां श्रम करीं देवाचियां कल्पनां
तूं द्रष्टा खुण हे चि ज़ाण हृदयीं दीगंबरीं वेदना ॥ ४० ॥
अमळ शिव गुणवर्जितात्मज ज्ञेय ध्येय निरंजना !
पारवर्जित पदसदोदित सत्य येक सनातना
स्फ़ुरण वर्जित वन निराकृत कारणा प्रति कारणा
वर दिगंबर आदिशंकर जनीं भ्रमशमनाशना ॥ ४१ ॥

(१९९०)

नामावली.

अमरगुरो ! जय लोकेशा ! मुनिजनहृदयविलासा !
साधुपते ! जगदाभासा ! परमानंदा ! जगदीशा !

साधकजनप्रतिपूर्णज्ञा ! कर्माकर्मविकारहीना !
अवधूता ! गुणनिधाना ! तुजविणें आणिक मानें ना !
शोकदोषह ! विकाशा ! त्रिगुणेशा ! त्रिगुणाभासा !
दत्तात्रेया ! लोकपती ! तुजहूनि नाहीं त्रीजगती !
परमगुरो ! करुणामूर्ती ! पुण्यकराद्वयगुणकीर्ती !
अवधूता ! जय माहेरा ! मुक्तिदसाधनविस्तारा !
निर्गुण ब्रह्म ! निराकारा ! योगदयागुणउदारा !
आत्मज बोधन विश्रामा ! शिवरूपा ! जय निःकामा !
निगमागमगुणगंभीरा ! सुखमूर्ती ! सुखदाधारा !
अत्रेया ! अमरेशा ! रे ! पाहिन तुज मी ! या ! ये, रे !
श्रमहर कीर्तनगुणनामा ! करुणामूर्ति ! घनश्यामा !
विमळानंदा ! जय रूपा ! साकारा ! शिवस्वरूपा !
कल्पितभेदविनाशकरा ! गुणकृतभवतमसंहारा !
मायामुक्ता ! पूर्णपरा ! दिग्बरा ! जय दिगंबरा ! ॥ १ ॥ धृ ॥

(१५९१)

योगीजनवल्लभा ! लीलाविश्वंभरा ! श्रीदत्ता ! सद्गुरो ! कृष्णवर्णा सुरेश्वरा !
अत्रीवरदा ! अवधूता ! अनुसूयानंदना !
विज्ञानसागरा ! शिवशिव कालाग्निशमना ! ॥ १ ॥
योगिराजा ! राजेशा ! परशुधरप्रिया !
कार्तिवीर्यवरदमूर्ती ! जय जय दत्तात्रेया ! ॥ २ ॥
देवदेवा ! सर्वज्ञा ! मायाविवर्जिता !
सिद्धेशा ! जनमानसहरणा ! मायागुणयुक्ता ! ॥ ३ ॥
विश्वंभरा ! अवधूता ! जय जय दिगंबरा ! चित्कीर्तिभूषणा !
दत्ता ! सर्वज्ञा ! उदारा ! ॥ ४ ॥

(१५९२)

अवनी कण गणने प्रति आली तिया चि ते अनुमेया.
श्यामळ सुंदर स्वरूप तुझें न कळे दत्तात्रेया !
सझरा झरझर पाझर झरती जळें चि जळ गणताहे.
अगणित गणितां गणिता न धरे; सगुण हें परि मायें ! ॥ १ ॥ धृ ॥

सुरतरु तरूवरु परु चरु न घडे गणिजे मानें येणें.
दत्तात्रें रूप सर्वग; गमितां ज्ञाणीव पांगुळे तेणें.
पळ पळ चळ वय गेलें वायां ! काये करूं मी आतां ?
देवगुरो ! तुजविण जगजनका ! दत्ता ! रे ! अवधूता !
घेउंनि गुणमळ पळ पळ करि; चळ, चंचळ न वळे मन.
अवधूता ! तव पायीं न धरे ! धरितां स्थिराऔन. ॥ २ ॥
जन धन, जन धन, वन वन फ़िरितां मन हें ज्ञालें श्वान;
गुणगत मळमय वळिजे ज्ञणें तद्वत तें ही ज्ञान.
मनें मन बहुगुण कुंठित ज्ञालें; न लगे मातें ध्यान !
दिगंबरें विण न चले करणें केवळ पडलें मौन. ॥ ३ ॥

(१६९३)

॥ नाट. ॥

प्रथम योगामृतसारदा, ब्रह्मात्मज्ञानसुखसंपदा,
विज्ञानकळा नमिजे सदा या भवबंधा छेदावया. ॥ १ ॥ ध्रु ॥
मंत्रविद्या हे सरस्वती श्रीसिद्धराज गुणा संस्फूती;
जीर्णे पाविजे निज निवृत्ति स्वरूपशांति चर्मदशा ! ॥ २ ॥
अनंत सिद्ध वरले जिया, संप्रदायिका परमक्रिया,
सुवर्णमयी महदव्यया, श्रीयोगिरायाची प्रतिमा. ॥ ३ ॥
प्रथम योगीं हे चि साधन मंत्र आगम अनुष्ठान
देवी चि नामामृतसेवन संकीर्तन दिगंबरीं. ॥ ४ ॥

(१६९४)

प्रथम नमो अविघ्नकरा गुरु सर्वज्ञा आदि ईश्वरा
स्वभावशून्या लोकशंकरा बोधसागरा श्रीदत्तातें. ॥ १ ॥ ध्रु ॥
तुझेनि नामामृततुषारें हृदयीं वस्तुज्ञान अंकुरे;
कार्यकारणमति संहारे प्रेम मळू रे ! स्वरूपस्थिती ॥ २ ॥
स्वानंदु स्फुरे श्रोतया जना ! वक्तया देहभावो गमेना !
स्वरूपसिद्धा ! नमो निर्गुणा ! स्वसुखपूर्णा दिगंबरा !. ॥ ३ ॥

(१६९५)

॥ नाट, भिन्न चाली. ॥

न ये पुढती संसारा; देवा ! न करीं येरझारा;

मन श्रमलें बहु गुणमतीचंचळ; दत्तात्रिया ! अवधरा !
विचारा ! माझेरा ! ॥ १ ॥ धृ ॥
आत्मयां ! आत्मयां ! देवराया ! तुजसीं अंतर मज्ज बहुगुणें बाधक;
वरि पडली महामाया! ॥ छ ॥
देवा ! न कळे मज्ज क्रिया; नेणें भजन योगिराया !
योग, तपस, देहें येणें मज्ज न होती, दिगंबरा ! गुणवीर्या ! ॥२॥ छ ॥

(१९९६)

वृथा श्रवण काये नाना ? वृथा मनन गुण दे ना !
वृथा श्रमद काये ? शम, दम, साधन,
गुरुविण फल दे ना ! उमजेना ! ॥ १ ॥ धृ ॥
आरंभीं आरंभीं आरंभीं पदलाभीं
गुरुमुख पावोन अनुभविजे खुण.
मिसळे ज़ेवि नभ नभीं स्वयंभीं, ॥ छ ॥
देहभान चि ज़ेथ नाहिं, पदीं दर्शन दृश्य काहीं, ॥
शिवस्वरूप सम सहज़ निराकूळ
दिगंबर अवघें हीं पर नाहीं केव्हां ही ॥ २ ॥

(१९९७)

॥ अहिरी ॥

जन्म वेच़ले कोटी ! काळ क्रमले पाठी ! भेटी भेट न योगियां !
भक्तकरुणाकरा ! श्रीगुरो ! माहेरा ! केवि पाहों मीं ? आत्मयां ! ॥१॥धृ॥
आरे ! तुझें नामस्मरण भेषज तापत्रय हरण मोक्षबीज ॥ छ ॥
ज़ळो हें विषयसुख ! तुज़वीण सर्व दुःख ! मूर्ख भज़ती तैसिया !
दिगंबरा ! तुझें नाम नित्य स्मरण प्रेम साध्य परम प्राणिया ! ॥ २ ॥

(१९९८)

॥ कल्याण ॥

मीं काये भज़ों ? परि तूं चि कृपाला ! घेउंनि आंगी भार स्वल्पावलीला !
संपूर्ण मोहें करि तूं उतावीला !
येउंनी केला भवतमा वेगला. ॥ १ ॥ धृ ॥
तूं बा ! माझा ! मीं रंकु तूझा ! सर्वज्ञा ! तारियलें बरविया वोज़ा ! ॥छ॥
नेणें मीं साधनातें, विरक्तिहीनु; विषय पशु देहबुद्धि मीं अज्ञानु.

ऐसिया मातें मोहिलासि आपणु. साध्य तें केलें मज्ञ मीं चि निर्वाणु.॥२॥
भज्ञों मीं नेणें; परि दासत्व दिल्हें ! नेणें मीं, केव्हां रूप स्वरूप केले!
उत्तीर्णपणें येथ काय उरलें ? तुवां चि अंगीकृत सेवक केलें. ॥ ३ ॥
तुझेन पादबळें संपूर्ण ज्ञालों ! त्रैलोक्य ग्रासूंनि मीं चि उरलों !
कालु ही कालुलीलाविग्रहें केलों ! वेद्यत्वें वंद्य स्वयें स्वभावें ज्ञालों ! ॥४॥
प्रकटे तें रूप मायेसि नूरे; ऐसें कृपाबळें कां घडे ? बा ! रे !
अनादिसिद्ध मीं चोज न स्फुरे माया हें मृगजल कैंचें मा त्रिरे ? ॥ ५ ॥
तूं कीं मीं मीं तूं ना मिसे तुझेनि मातें बोलतां ऐसें परि बोला परुतें.
विचारु पाहे तवं तें उपाधिपंथें ऐसें चि दिगंबर तूं चि आइतें.॥ ६ ॥

(१९९९)

॥ मल्हार ॥

श्रीगुरुपदारविंदें प्रेम परमानंदें तीं तेणें मकरंदें टवटव करिती.
परि तोष परिमळें रंगीत रातोत्पलें योगीजन अलिउले रुणुझुणु करिती
संत सनकादिक साधक जन अनेक दास निज सेवक लाहो घेती
पाहातां पैं लोचन ध्यातां निववी मन बुद्धी समाधान तेथ
गे ! बाइये ! ॥ १ ॥ धृ ॥
श्रीदत्तु निर्वाण माझें जन्मस्थान शिव परम कल्याण अगुण गे! बाइये! ॥छ॥
श्रीगुरुमुखांभोज चंद्रकोटीबीज प्रकटी तेजातेजे तेजीकातें.
तात्विकें मकरंदें अर्थाच्नेनि स्पंदें मधुकरें ईष्टदें गुणु गुणु करिती.
वेधले ब्रह्मादिक पाहातां तें श्रीमुख भूलले येकानेक तन्मयत्वें
ज्ञाता ज्ञेय ज्ञान ज्ञेथूनि जनन स्फुरलें समाधान तेथ गे ! बाइये ! ॥२॥
सर्वांगें सुंदरु उपमानतें परु लेणें विश्वाकारु करूंनि ठेला !
दाउंनि जग लपवी; लपउंनि विश्व दावी सर्वांगें मायावी सर्वही ज्ञाला.
सर्वांहूंनि परू, सर्वेंसीं अनितरु, सकलभूवेश्वरू विलासला.
सत्वादि गुणमयु, गुणातें अज्ञेयु, गुणदृष्टी ज्ञेयु ज्ञाला गे ! माये ! ॥३॥
अगुणगुणभर्ता, निर्गुण न ये ह्मणतां गुणभावें आइकतां सगुण नव्हे.
व्यक्त ना अव्यक्त परि जो व्यक्ताव्यक्त मूर्त्त ना अमूर्त्त ऐसा भावें.
छंदें गुण भूलली ; पुराणें परतली ; शास्त्रें थोटावलीं ; न च्नोजवे !
दिगंबरु गुणवशें न भासतु भासतु भासे भेदा मारूंनि असे
सर्वांगें गे ! माये ! ॥ ४ ॥

(१६००)

मल्हार

सत्य वाहातुसे आण, संता सन्मुख होऊन,
दत्तात्रय हें स्मरण, ध्यान, धारण, मज्ञ.
दुःखदायकें साधनें क्लेशकरें काहीं नेणें;
भेदु गलिला भजनें, येणें दाविलें नीज.
बापु भजन सोयरें, येर लटिकें दुसरें;
रूप ध्याइज्ञे आदरें नामगजरें बीज.
तेणें तैसें चि होइज्ञे सत्य ह्मणोनि ज्ञाणिज्ञे
अन सारिखे भाविज्ञे निज्ञ सहज्ञ गुज्ञ. ॥ १ ॥ धृ ॥
आतां काये करणें ? कासया न करणें ?
स्वयें चि असणें होणें स्वपदपूर्ण.
अवधृत हा येसणा द्वैतु न लवी आपणा
भेदु जिराविला खुणा ध्याना आलियांवरी ॥ छ ॥
नामें स्वरूप आठवे मनीं धरिज्ञे स्वभावें
ज्ञानइंद्रियां नेणवे जीवीं जीवा परुतें
नित्य भज्ञतां केवल मनीं विसरिज्ञे स्थूल;
चित्त ज्ञाहालें निर्मळ; मूल आठवे तेथें.
आधीं दृश्याचें हरण होये सुलीन दर्शन
दृश्य द्रष्टत्व सांडून ध्यान ध्येयासि ज्ञेथें
स्वयें प्रकटे निर्गुण ग्रासी समाइक स्फुरण
दिगंबरीं हें भजन ज्ञान अपर ज्ञेथें. ॥ २ ॥

(१६०१)

मल्हार कांबोद.

प्रेम कलिके वो ! कंदु, बोधोदयें इंदु,
मुनीसुमनमकरंदु, दत्तु गे ! माये !
विज्ञानाचें तत्व, तत्वाचें हीं तत्व,
सत्याचें हीं सत्यत्व, श्रीदत्तु गे ! माये ! ॥ १ ॥ धृ ॥
स्वानंदकंदें हरिलीं सकलें हीं द्वंद्वें;

तनु, मन, परमानंदें धाली गे ! बाइये ! ॥ छ ॥
सचित्सुखवो ! सार, परांहूनि पर, निर्जी नीज निरंतर निरुपाधि माये!
जीवाचें जीवन; मनीं मनाचें मन; श्रीदत्तें चि निर्वाणसिद्धि गे ! बाइये!॥२॥
पंच प्राणाचा प्राणु चेतना चेतनु अधेयाधिष्ठानु प्रकटवी !
अनुभवितां समरसु विज्ञानामृतरसु गुणियां राजहंसु दात्रि गे ! माये!॥३॥
शून्याचा उलथा गगन गाळूंनि घेतां, नुरवी द्वैताद्वैता सत्तामात्रें.
ऐसा हा दिगंबरु योगियां शंकरु चित्सुखाहूंनि परु स्वातंत्र गे ! माये !

(१६०२)

गुज.

अमूनि आलियें तुजपासीं वो ! माये ! बहिणी ! कांहीं बोलईन गुज
हृदय तापलें निवें पीयूषें प्रेमसौरसें सांग ऐसें कांहीं मज.
कवणे विभ्रमें भूलि ज्ञाकली ? कांहीं न कळे मन विसरलें काज.
शरीर न दिसे व्यवहारतां; कर्म दूरि ठेलें; यत्न राहिले सहज. ॥१॥धृ॥
स्वप्न नव्हे वो ! नव्हे जागरु ! नाहीं विसरु ; जाणें अवघा विचारु !
बाह्यांतर भाव मोडली; वृत्ति निवळली; गेला विल्या आकारु. ॥ छ ॥
नयन सांडुंनि गेलें देखणें; देह मीं नेणें; माझें जाहालें वो ! काये ?
गगनाकारुवो ! सर्व अवघें देखें नवल बहु बोलतां न ये.
मज्ज मीं ज्ञाणतां रूप नाहीं वो ! ते मीं खेचरा कैसी ज्ञालिये ?
माये शशि सूर्य हे दोन्ही लोपले !
तऱ्ही अंतरीं ओम निवळत आहे. ॥ २ ॥
अदृश्य दृश्य दृश्य सांडितां दर्शन चित्ता म्या वो ! गगन गीळिलें !
देखणेंपणासि ठाउ नाहीं वो ! अतिनिर्मळ आंगें आंग भरलें !
धरिजे, सोडिजे, ऐसें नव्हे वो ! विमलाद्वयचित्सुखमय ठेलें
नेणत नेणत आते ज्ञाणनें ज्ञाणों ज्ञाणतां सुख हातिंचें गळालें. ॥३॥
जीव ईश्वर भाव न गमती भास मोडला भेदु स्वरूपीं न साहे
ऐसें हें कासया मज्ज ज्ञाहालें ? सत्य सांगपां; धरीन तुझे पाये !
आंगी आडलें परि न कळे भान स्पर्शाचें तेथ देहहीन पाहें
नयन उघडो दृश्य न दिसे शब्दु ऐकतां नेणें तयाची मीं सोये ! ॥ ४॥
वचन बोले सखी हांसोनीः:—अवो ! बहिणी ! तुज्ज भेटला कव्हणी

नाहीं कीं येकटु येकु जनी वनी कर्मसाधनी हे वो ! तयांची करणी.
येरी ह्मणे::—गुणमती क्रीडतां, अर्थु चिंतिता, आला दिगंबरु ध्यानीं.
सर्वस्वें पालटु मज ज़ाहाला ! भास लोपला ! तया दिवसापासुनी. ॥५॥

(१६०३)

॥ राग मल्हार, डांका. ॥

महाशून्याच्या वोवरा शून्यें रेखिला देव्हारा.
सुखसुमनें उपचारा; चिद्दीपक मांडले.
समाधि निःशब्दाची डांक निर्जनिवृत्तिदोरक.
होती ज्ञानस्पंदादिक ते सकलैक वागरिया.
अलयो अविक्षेप दोन्ही डांके करिती आलवणी.
गुणसाम्याचा आसनी प्रकृति जानी वैसली.
पंचाक्षरी अवधूतु पासीं वैसला श्रीदत्तु;
ब्रह्मभावना जपतु गुणवारें अवतरवी. ॥ १ ॥ धृ ॥
राहाणि माडलें अपाडें वारें घेतलें त्या झाडें
डाक्यांत उत्तडा उडे डांक वुडे सुशब्दीं.
ऐसा विसंचु तो संचु भोगा भोगा वेच्ने वेचु.
गीत साचारु असाचु तें निर्वचु उठिला. ॥ छ ॥
प्रथम डांक नादवितां नमन केलें गणनाथा,
स्वामी, सद्गुरु, समर्था, गुणातीता, केवला.
नमन सारदे अक्षरें गुरुकृपे श्रीशंकरें.
राहाणीं गाई आदरें, प्रेमभोरें डोलतु.
नमस्करु भूतनाथा, अलीवरदा, अवधूता;
तूं बा ! सकलजगकर्ता विश्वपिता ह्मणौनी.
भैरव भूतांच्या गोसावी गुरु हस्तु नमिला जीवीं
वंदुनि मस्तकीं खड्गभावीं (?) अनुभवीं पावलों. ॥ २ ॥
नमन करूं त्या खेचरां देवा श्रीयोगेश्वरां,
पंचाक्षरीया अपारां ज्ञानधीरा पुढती.
नमन भूचरातें करूं तुटे जयाचेनि संसारु
सारासारज्ञ चतुरु जनु येरु नमिला.

राहाणा यावें जी ! सकळीं भोगु घ्यावा ज्ञाप्ति मूळीं
सहज सुखाची नवाली आपापुली देववीं
म्हणें रसाल कव्हणीं आह्मी घेतसों मागोंनि
यावें यावेंपां धांवोंनि ये आसनीं अवघीं ॥ ३ ॥
जानी बैसली सन्मुख ते स्वरूपीं प्राङ्मुख
मुद्रा उन्मेषें अचूक ऐसें येक उफराठें
पंचाक्षरी ऐसें ह्मणें::—येथें पाहाणें न पाहाणें.
न पाहोंनि जें पाहाणें तेणें गुणें घे मुद्रा.
मुद्रा लाविली उन्मेषीं सुख बैसलें जीवेंसीं
आसन धेलें येकदेशी वारयास सौरसु
जानी घुमती अपारें पाडें येत आहे वारें
जती राजसीच्या गारें विसावे रे ! भाइनो ! ॥ ४ ॥
येई वो ! राजसे ! वेल्हाळे ! चतुर्मुखें खेळें, मेळें !
तुजवीणऽ ! आंधळे ज्ञाले डोले आमुचे !
तुं वो ! स्वर्गीची देवता ! आह्मी ह्मणों जगन्माता !
वेळु कां लागला पावतां ? भोगु वृथा जाईल.
कमलसंभवे वो ! नारी ! वेद शब्दु वो ! तुझे व्यान्ही !
कां नै येसी येथवरी ? कवण परी चूकली ?
जानी झडकिली तेव्हेली, वारें आलें बळेंबळीं
हाक फूटली अंतराळी ! घुमे बाली आनंदें ! ॥ ५ ॥
शुद्ध शबल ज्ञालें काये ? महाद्भूत ज्ञालें माये !
अहंकारें घुमती होये तीन्ही पाये पसरीले.
तमें व्योमा संचु केला तेथें पवनु उधलला;
दहन जन्मोनिया व्याला त्या निर्मला उदका.
पृथ्वी तरंगती ज्ञाली बा ! रे ! देतसे आरोली
शंका उठुनि पलाली बोलिनली प्रकृती.
वारें ह्मणे::— काये ? सांगा ! तुह्मीं पाहिजे ते मागा !
विश्व भरीन भोगी ! भोगा ! जे प्रसंगा पाहिजे ! ॥ ६ ॥
भूतें द्रव्यें विभागिलीं येकें दों दों ठांयीं केलीं

दोन्ही देहें उभाविलीं ते दिधलीं वांटुंनी.
शब्दु घेइं रे ! श्रवणा ! रूप प्रसादु नयना !
रसु मागते रसना ! पढिये घ्राणा परिमल !
त्वचे स्पर्श आवडला; तीतें तो चि प्रियु ज़ाला.
विराटु आपणा घेतला; विस्तारिला हा लोकु.
येक जारज, श्वेदज, अंडज, आणि उद्बीज,
तृण, वृक्ष, गुल्म, सहज़ ऐसें चौंज़ मांडिलें ! ॥ ७ ॥
कर्म प्रसादु वाटला; धर्म ज्याच्ना तया दिधला;
उपकारु महा केला. भक्ता ज़ाला संतोषु.
दिवस, निसी, पैं निदानीं शशी, सूर्य, अभिमानी
तारांगणें ये गगनीं, ग्रह, नक्षत्रें, मालिका.
नाना शिखरें पैं मेरू सप्त सागरु विस्तारु
केला महीचा समग्रु भूत ग्राम रचिला.
ऐसी पद्मजा पातली रजोगुणें खेलिनली.
आतां येइं, वो ! वहिली, सत्ववंते ! साउलिये ! ॥ ८ ॥
संखासुराची वैरिणी ! धरिणीधरे ! वो ! योगिणी !
तुझा धाकु त्रिभुवनीं अवो ! बली बलकें !
तडक फुटला अवचिता स्तंबीं प्रकटली देवता !
गर्जे हंकारें ! खालुता हिरण्यकश्यपु पाडिला !
ते तूं प्रल्हादाकारणें आलीसि माये ! योगें ज़ेणें,
तैसी करि कां वो ! धावणें ! भक्तिधरणें मांडिलें !
दशाननाच्ने वैरिणी ! अवो ! यादवे ! गौलिणी !
अवो ! मुकिये ! मानाविणी ! पावे पावे सवेग ! ॥ ९ ॥
पूर्वीं मातेचियां शोका आलीसि तैसी तूं येकां
पैला अजमेला पैं येकां गुजादिका लागुंनी
भक्तालागी उतावेिले ! अवो ! सात्विके ! वेल्हाले !
झणें उम्संडिसी ये वेले तुझेनि बलें राहाण.
तंवं तो गुणियां गुणवतु तेथें असे अनुमानितु
नेत्रस्पर्शे आकर्षितु अध्याराचेनि बलें

येती थरथरां कां० टाले स्पंदे गुणाचेनि बळें
झडकी अक्षता तेव्हेले डांका नांदु अद्भुतु. ॥ १० ॥
हांक फुटली अंत्राली शब्दु न सटे पोकली
देवता पावली पावली बोलियेली आनंदें
कवणें वलियें अबला हाला ? कवणें कवणू पैं माजिला ?
कवणें माझा धांवा केला ? तो वहिला दावावा !
भक्त ह्मणती::— अवो ! माये ! धरित असो तुझे पाये.
कवण आलीसि ? वो ! काये नाम तुझें ? स्वामिणी !
तंवं ते ह्मणे::— कां रे ! नेणां ? भूल्लेत आपणा !
जलदेवता मीं ! हें जाणा ! वसें गिरीमस्तकीं ! ॥ ११ ॥
भक्त ह्मणती::— वो ! देवते ! घेइं भोगू, खेलें येथें !
देईं प्रसादु आमुतें ! अभय हस्तें कुरवाळीं !
डांका घुमती सभारें; झाड खेलताहे वारें;
भूतें चालिलीं अपारें; हिरण्यगर्भु संचला.
विष्णु, ब्रह्मा, आणि रुद्र, झाडीं खेले इंद्रचंद्र,
नारायण, दिवाकरु, अग्नि, वायो, वरुणु.
अश्विन प्रजापतीदिगा (?) उपइंद्रु आला वेगा !
गोंदलु मांडला निजांगा आंगें आंग प्रकृती. ॥ १२ ॥
वडिल ह्मवली प्रलपे::— सत्वधीरा समाटोपें
कांहीं मागा रे ! संकल्पें अर्थरूपें देईन.
येकां भोग, मोक्षदान, काम, अर्थु, उपादान,
करवीं आपुलें ह्मणौन उच्च स्थान देईं कां.
संखासुरातें विदारी, वेद रक्षावयां च्यान्ही.
कठिण पृष्टि धरा धरी दाढेवरि मागुती
येका नेउंनि पाताला सर्वे चि होय द्वारपाला
निष्ठुर हि ते कृपाला भक्तकुला लाहाणी. ॥ १३ ॥
पुत्र रक्षिले येकाचे; निज सेवक सेवेचे.
पिते जानुवरि त्याचे हातखोंचें वधिले.
क्षेत्रकुलें संहारौनि, विप्रा दिधली मेदनी;

भुजा सहस्र छेदूनि, आणी रणी अजुना.
येका राज्य तें दिधलें; येकां राक्षस वधिले;
सत्य प्रतिज्ञेतें केलें; ऐसी महा माया हे!
मामा आपुला वधिला; भूमीभार उतरला;
धर्मु अर्जुनू स्थापिला; सहारिला कौरव. ॥ १४ ॥
सांपें आलीसें मोहना पाहे दृष्टीची या चिन्हा.
काये करील पुढें कवणा ? तें कवण जाणोंवे ?
रामा येका साटीं पैला नेलेस्वर्गा अजमेला
भक्तु पढियेतो दुबला ऐसी लीला पैं तुझी.
अभय हस्तें ह्मणे सुखें मातें वंदोंवें या लोकें
वरि पडलेनि दुःखें स्मरा येकें मानसें
ऐसें बोलेंनि ते गेली जानी सावधान जाली
आतां पाचारा वहिली रुद्ररूपी खेचरा. ॥ १५ ॥
येईं येईं वो ! त्रिनत्रे ! शुळपाणि ! पंचवक्त्रे !
गजांबरे ! कीं विचित्रे ! ध्ययमात्रे ! तामसें !
बाळी भोळी वो ! तूं कैसी ? राहाण मांडलें तूं नें येसी
पाये झाडीन मीं केशीं जेव्हां येसी आसना.
साटी थोड्या देणें बहु तुं वो ! हृदयींची मउ
परत्री केलासे आठउ तुतें जीउ न वंचु
तंवं ते बाळि मार्गां पाहे येर ह्मणती::— वो ! माये!
दृश्य वोडविलें आहे वरि काये मागणें ? ॥ १६ ॥
तंवं ते सभोरें पातली माया मौनेंसीं येकली
हाक लयें चि फुटली बोधें बाली पाहातुसे.
पहिलेनि चि प्रासें येकें स्थूलें नेलीं सकालिकें
महातेजाचेनि सुखें पैं आणिकें आवर्षणें
पाठीं वर्षें मुसलधारी जलमुखें ते धरित्री
फुटे ब्रह्मांड त्यावरी घे उदरीं विराट
आप नेलें तेजमुखें तेजें पवन हाणें तवकें
पवन गगनमुखें चाखे ते हीं येक अहंकार. ॥ १७ ॥

तामसु राजसें स्वीकारी राजस सत्वा मुखीं भरी
सत्व महत्तत्त्वीं धरी ते आहारी अव्यक्तें
ते हीं अव्यक्त नुरवी आपण आपणा हीं जेवी
प्रलयो प्रलयीं नेठवी झाडा गोवी मांडली.
वन्ही लागे त्या कापुरा तो तेणेंसी होए पुरा
मारूंनि मारका मारी मारा स्वशरीरा नुरवी.
जें जें राजस देणें सात्वीकीचेंनि सत्वगुणें,
तें तामसीचेनि भोजनें नुरे गुणें गुणीक. ॥ १८ ॥
ऐस्या तीर्थी खेळें मळें खेळनलीया सकाळें
अवस्थात्रयाचे सोहळे हे मानले जीयेंसीं
तया देव ती चि माये गुणत्रय जीचे पाये
शुद्ध सत्त्वमयी ज्ञेय जे पां ध्येय योगियां
प्रकृति आढ खेळे जिया विण प्रकृति जेला ज्ञेया
पुरुषत्व जे आलीं आया ते सन्मया पाचारु
नाम, रूप, वर्ण व्यक्ति स्वयं पुरुष ना प्रकृति
मूलभूतां अस्ति भाति प्रीय मूर्ति आवाहनु ॥ १९ ॥
गमागमविरहिते ! के मी आवाहनु वो ! तुतें
विसर्जन कें मागुतें नाहीं रितें तुझेनी.
अरूप कैसें पां वर्णनें अनाम ज ती माजि ग्णें
सर्व रूपें तें वंदणें सर्वपणें केवि पां ?
केवि पाचारु न पाचारु ज्ञाणो नेणों तुझा पारु
तूं मीपणा अगोचरु अनिद्वारु निर्धारें
द्रष्टा दृश्य वो ! दर्शन मोडी ज्ञाता ज्ञेय ज्ञान
प्रकट प्रकृति मार्जून भेदस्थान प्रासूंनि ॥ २० ॥
हाले न ज्ञानें ज्ञाना ज्ञान शून्यें अशून्यें अशून्य
स्वरूप प्रकटे चैतन्य तुझें ध्यान अद्वय.
तूं चि तुझें वो ! ज्ञाणणें आपआपुलें नेणणें
तूं चि तुझें वो ! असणें आनंनें तूं तुझें
परापासाव तूं परे आदियोगिणी ! अक्षरे !

प्रकट होइं शुद्धाकारें झडकरें करूनि.
आह्मीं मांडलें राहण तुजसाटीं ठेविलें प्राण;
वेगीं येईं वो ! ह्मणउन हात जोडूंन विनउ ॥ २१ ॥
पूर्वीं जनकांचा घरीं राहण ज़ालें या चि परी.
बहूत खेलीनली वारीं तूझी सरी न ये ची !
रोमें केलें मांगां ज़ाण ठाईं आपुलां राहण
ते चि धरिली आह्मीं खुण ज्ञान ध्यान संपती
मीनलीं असतां दोघें ज़णें राहाण घेतलें अर्जुनें
तें उगवलें नारायणें पडलें ज़ाणें तूं ते ची
ऐसे सकल ऋषीगण, देव, मानव, राहाण
घालिती गुरूचें वचन पैं प्रमाण करूनि ॥ २२ ॥
आह्मां श्रीदत्तु गोसांवीं ज़ाणे हे विद्या अघवी
राहाण मांडिलेंसे जीवीं निजभावीं निर्गुणीं
येथ यावें वो ! उगिया ! आह्मां अवधूतु बलिया
आणील बुद्धि तुंतें ठाया मानु ज़ाईल वांयां
ऐसें आइकोंनि निर्वाण देवता प्रकटली पूर्ण
प्रकृती ज़ातुसे विरोन झाडें प्राण सांडिले !
माडूनि प्रकृतीच्या थारा आपण घुमवा रे ! वारा
नेणें द्वैतभाउ. खरा स्वमाहेरा ! हांक दे ! ॥ २३ ॥
मनी प्रकृति न मरे वारें ज़ाउनि संचरे वारें तीचा ठाईं भरे येरायेरे लागली
झाडा वारया मिलणी वितुलले गुण तीन्ही
शब्द उठिले तेथूनी ते सज्जनी ज़ाणावे.
हाणा हाणा वंध्यासूतु करा आशेच्या घातु
शून्यें उबारासें होतु व्योमा हातु ने दिजा !
आकाशाचें पुष्प तोडा मृगजलाची धांव मोडा
दीपें तम वेढा वेढा ज्ञान वेढा लाविला ! ॥ २४ ॥
द्रष्टा खोंचा रे ! या दृष्टी पाहा ज़ाणीवेची पाठि
त्या कां जीणयां सेवटीं मरणा पोटीं घालुंनि
नाना मीपण हे दृष्टी न करा बोघेंसीं या भेटी
सांगेन मीं जीवीची गोठी उठा उठी तुमतें

जयासाठीं राहण केलें तेंवं नाहीं आलें गेलें
ठाईंठई चि संचलें दुन्हावलें परपारी
जरि वेन्नाल रूपा, नामा ! कर्मा, अकर्मा, विकर्मा,
देहबुद्धि, गुणधर्मा, तरि तें तुझां सांपडे. ॥ २५ ॥
अविक्षेप लागली माये ! राणी फिटे ह्मणतां ते कैसेनि ?
सांगा तीयेची सांडणी; आत्मज्ञानीं पाहिज्ञा.
पैल वंध्येच्चा कुमरु बाले द्या रे ! अहंकारु ;
आकाशाच्चा तोडा महुरु ; करा मारु कल्पने !
अंधकराची कालिमा लावा दिनकरा ते मा
आणा घाटिच्चा चेंडू मा सर्पु घ्या मा दोराच्चा.
नाथिलें तें नाहीं करा; पाठीं अविद्येतें मारा;
भेउं न धरा ! न धरा ! ते विचारा न लभे. ॥ २६ ॥
जया पदा भ्रंशलेति ते पैं पावों पाहती त्विती
तरि अइका येक उक्ति आप्त ज्ञप्ति ऐसिये.
निजमस्तकीं बैसावें; छायेपुढें न लपावें;
व्याम व्योमीं पोववावें दृष्टी पाहवे द्रष्टया.
असिजे तैसें असावया होतो होये तें व्हावया
करी क्रिया कां अक्रिया ते पैं तया बाहेरी
जें जें जैसें जेथ वर्ते तें तें असत तेथ तैसें
नसणें नाहीं जे वस्तुतें आणी सर्वांतें अस्तीत. ॥ २७ ॥
जाणोंनि चि नेणा आपा नेणोनि जाणा रे ! स्वरूपा
जाणा नेणा कैं निष्कंपा निर्विकल्पा निर्धारें.
इतुलें निर्वाण बोलली देवता स्ययं ज्ञाती जाली
झाड दे ते आलीपिली भुमंडली पडिलें.
नाना झाडेंसी सहित वारें गेलें न दिसत.
आदि येकमेकांतें हारपत वोवरा नाही वोवरा उडाला
देव्हारया गजबुज्ञाला दीपी क्षेपु मावलला
ठेक ठेला प्रबोधु प्रबोधीं बोधु बांधे रे ! ॥ २८ ॥
डांक जेथिचीं तेथ विरे ना दुजी राला अंवरें
संसारें सहित डांक विसरले आपा

चुकले स्वरूपें रूरूपा पंचाक्षरी नव्हे सोपा
आपण पयां उतरी ऐसें राहण हें संपलें
अवघे न खेलिनले जें पुसावें तें अवधूतें उगविलें
नवल ज़ालें अपूर्व काहीं न दिसे ना तें दिसे.
असे नसेसे न भासे कवण ललीत गावें कैसें अनारिसें मांडलें।। २९ ।।
भेदु भाविता दुन्हावें तुवली ह्मणतां भेदु भावे
ज़ालें मीं चि मीं आघवें तें चि कीं सुख आंगां विसावलें
काये कवण मांगां बोले ? द्रष्टा द्रष्टत्वें निवलले
सद्रूप पंचाक्षरी हा चोखडा मुलें नुरवी वारे नसी झाडा
करूंनि येरांच्या ही दवडा तत्वीं झाडा मांडिला.
मी तूं पण आटियेलें अवघेंनि दाविलें दिगंबरें ऐसें केलें उगविलें राहण.

(१६०४)

॥ अहिरी. ॥

तुमच्या हा ज़ालों गातां; वोसंडला कांह्या ?
प्रपंचें गांजिलें; आलों तुमचि ठायां ! ॥ १ ॥ धृ ॥
प्रेम ही नुरे प्रेम ही नुरे ज़ाहालों तऱ्ही मी पाहीं प्रेम ही नुरे. ॥ छ ॥
तुह्मा चि देखतां बहुवेळ आला गेला
दिगंबरा ! आतां कें होईंन वेगळा ? ॥ २ ॥

(१६०५)

न साहे, न साहे देवा ! वियोगु यया जीवा !
करि करि करुणा; दाखवी चरणा. ॥ १ ॥ धृ ॥
येई येई ! न लावि उासिरू, आाजि वो ! ये घडी. ॥ छ ॥
न धरे न धरे धीरू काये मीं वो ! करूं ?
दिगंबरा ! दावीं पाय, झडकरि रूपा.

॥ श्रीदत्तात्रेयाय नमः ॥

योवेदैरनुभूयते सुकृतिभिः सत्कर्मभिर्योर्च्यते ।
यस्यानुग्रहतस्तरंति सुधियो मायां महादुस्तराम् ॥
तं देवं वरदं पुराणपुरुषं श्रीदत्तमत्रेः सुतम् ।
संसाराब्धिमतीत्य गंतुमनसो नित्यं स्मरामो वयम् ॥